# दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

शु
भ
दि
पा
व
ली

सप्रेम नमस्कार,

सोबत 'शब्द रुची' दिवाळी अंक पाठवला आहे.

आपली प्रतिक्रिया जाणण्यास उत्सुक आहोत.

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छांसह!

आपले स्नेहांकित,

अरुण जोशी, संपादक

सुदेश हिंगलासपूरकर, विश्वस्त

आणि

ग्रंथाली परिवार


granthali01@gmail.com
granthali02@gmail.com

# शब्द रुची

दिवाळी अंक

ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१३

१०० रुपये



ग्राहकों हेतु सेन्ट्रलाइट
Centralites for Customers

सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India
1911 से आपके लिए "केंद्रित" "CENTRAL" TO YOU SINCE 1911

आईएसओ 27001:2005 प्रमाणित ISO 27001:2005 Certified

# आमच्या उत्सव बोनान्झा मध्ये

## साकारतील तुमची स्वप्ने !




उत्सवांच्या दिवसांत खालील योजनांवर आम्ही
**कोणतेही प्रक्रिया शुल्क आकारणार नाही.**

| सेंट होम | सेंट व्हेकल | सेंट मॉर्गेज# |
|---|---|---|


| पर्सनल लोन (कॉर्पोरेट आणि नॉन-कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांसाठी) | सेंट पर्सनल गोल्ड लोन |
|---|---|

#प्रक्रिया शुल्कात ५०% ची सूट दिली आहे.

ई-पेमेंट, एसएमएस अलर्ट, आरटीजीएस व एनईएफटी आणि ऑनलाईन ट्रेडिंग बरोबर ऑनलाइन बँकिंगचा आनंद घ्या.

कृपया आमची वेबसाइट www.centralbankofindia.co.in पहा. • आपल्यासाठी 24x7 (टोल फ्री) नं.1800 200 1911

*नियम आणि अटी लागू




आमच्या ग्राहकांना, भागधारकांना व हितचिंतकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

सारस्वत बँक

दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेड्युल्ड बँक)

**(देशातील सर्वात मोठी, प्रथम क्रमांकाची सहकारी बँक !)**

**कॉर्पोरेट सेंटर** - सारस्वत बँक भवन, ९५३, अप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

email : corporatecenter@saraswatbank.com website - www.saraswatbank.com

# दिपावली शुभचिंतन

**अभ्यंगस्नानाची हौस दांडगी, परी थंडीमुळे वळते बोबडी**
**सौरबंबाची किमयाच न्यारी, वीज नसताही गरम धार धरी!**




जैन सौरबंब ▪ कंदील ▪ होम लायटींग ▪ पॉवर पॅक (इन्व्हर्टर) ▪ स्ट्रीट लायटींग
ट्रॅकरसह सौरपंपः शेती, घरे व हातपंपासाठी ▪ जैन नॅनो सौरपंप ▪ ग्रीड कनेक्टेड पॉवर प्लांट

*अटी लागू

जैन सौरबंब® जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.® जैन ज्योत®

जैन ग्रीन एनर्जी पार्क; पो. बॉ. २०, जळगांव-४२५००२; फोनः ०२५७ ६६३०६१४, ६६३०६०९
फॅक्सः ०२५७ २२६११५५; ई-मेलः solar@jains.com; वेबसाईटः www.jains.com

*सूर्यनारायणासमवेत संयुक्त प्रकल्प!*

**अनुप आगीवाल** ९४२२७७५९२७ (जळगांव, धुळे, नंदुरबार) **मनोज सुतावणे**- ९४२२७७५९४४ (नाशिक)
**हितेंद्र ब-हाटे**-९४२२७७६९३७ (औरंगाबाद, जालना) **ज्ञानेश्वर भिसे** ९४२२७७५९३० (अहमदनगर, बीड)
**मनोज जैन**-९४०३६९५८२४ (अमरावती, वर्धा, यवतमाळ) **लक्ष्मण धांडे** ९४२२७७५९२८ (अकोला, वाशिम, बुलढाणा)
**विजय उरमुडे** ९४२२७७५९३९ (सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, बेळगाव, गोवा) **देवीदास पाटील** ९४२२७७५९३१ (पुणे, सातारा)
**प्रवीण कुलकर्णी** ९४२२७७५९३३ (सोलापुर, उस्मानाबाद, लातूर) **दीपक पाटील** ९८७०९९०७५० (मुंबई, ठाणे, रायगड)
**राजेश कपाले** ९४०४९५५३४० (नागपूर, चंद्रपुर, भंडारा, गोंदीया, गडचिरोली) **भागवत कुंभार** ९४२२७७५९४० (नांदेड, परभणी, हिंगोली)



We wish you a Very Happy Diwali
and a Prosperous New Year
With Best Compliments
Ravindra Sapkal
Chairman & Managing Director
Mrs. Kalyani R. Sapkal
Vice Chairperson
Kalyani Charitable Trust's
Sapkal Knowledge Hub™
SAPKAL KNOWLEDGE HUB™
Orchid International School™
• Orchid International School™
• R.G.Sapkal College of Pharmacy
• K.R.Sapkal College of Management Studies
• Late G.N. Sapkal College of Engineering
CORPORATE OFFICE: Sapkal Knowledge Hub,"Parag", 46, Ashwin Sector, Opp. Hotel Sai Palace, Mumbai-Agra Highway, Nashik 422 009, India.
Tel. 0253 - 2392450 / 51. Fax : 2375557.
Cell: 98812 02880. Website: www.sapkalknowledgehub.org
CAMPUS : Sapkal Knowledge Hub, Kalyani Hills, Anjaneri, Tal. Trimbakeshwar, Dist. Nashik 422 213.
Tel. 02594 - 220162/165/167 - 70. FAX : 02594 - 220164.

# शब्द रुची

दिवाळी विशेषांक

**ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१३, वर्ष १**
**अंक पाचवा, मूल्य १०० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ व मांडणी : **योगिता मोरे**



**कार्यालयीन संपर्क**

**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**शब्द रुची/पुस्तक वितरण – महेश गोरेगांवकर**
granthalisales@gmail.com


**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**


पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला,
यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
www.granthali.com



अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठा–समान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.


## अनुक्रम


### ललित / वैचारिक

विस्थापितांचे अंतर'रंग'
डॉ. उज्ज्वला दळवी / ११
भारतातील मुस्लिम स्थापत्य
डॉ. दाउद दळवी / १७
भिन्न प्रकृतीचे दोन समाजव्रती
अभय सदावर्ते / २७
वसंत फुलसिंग नाईक : महाराष्ट्राने दुर्लक्षिलेले व्यक्तिमत्त्व
अरुण साधू / ३५
एक सत्शील नेता – बाळासाहेब खेर
गिरीश जोशी / ४८
बौद्धिक संपदा
डॉ. ओमप्रकाश ग. कुलकर्णी / ६०
सुजनशक्ती – अभावाकडून प्रभावाकडे
सुधीर थत्ते / ६७
कहाणी 'कल्पसर'ची
वसंत वसंत लिमये / ७४
ही परिस्थिती बदलायला हवी...
डॉ. सुलभा कोरे / ७९
प्रोफ्युमो प्रकरणाची पन्नाशी
अपर्णा पाटील / १०१
जन्म कादंबरीचा
स्मिता भागवत / १०८
बकुल: मधुगन्ध:
प्रा. नीला कोर्डे/ ११४
देठातली मुळाक्षरे
डॉ. यशवंत पाठक / १२३
सर्जनांचा सहवास
डॉ. केशव साठ्ये / १३०
हृदयस्थ पंचम
निलु निरंजना गव्हाणकर / १३८

दूरचित्रवाणी : साहित्यविश्व आणि दृश्यकला
रविराज गंधे / १४३
थिएटर्समधील गमतीजमती
अरुण पुराणिक / १४८
प्रवास अजून बाकी होता...
श्रीनिवास नार्वेकर / १५५
कुंचल्याचे दोन किमयागार
प्रभाकर वाईरकर / १६२
किचन पोएम्स : एक आस्वाद्य रुचिपालट
डॉ. शुभांगी पातुरकर / १८७
आम्ही गातो, नाचतो...
शुभदा पटवर्धन / १९३
भुवनेश्वर येथील ईश्वर
डॉ. अनंत पां. लाभसेटवार / १९७
असंही एक जग
नीलिमा कानेटकर / २०९
कहाणी पार्वतीबाई आठवले यांची
प्रभाकर भिडे / २१६
कर्नल ब्याना घीयेटो
जे.व्ही. कुलकर्णी / २२६

## कथा

शोषिलेले शैशव
उमेश कदम / ८७
मोकलुनी आस । जाहलो उदास ।।
दिलीप पांढरपट्टे / १५८
खेळ
प्रा. मिलिंद जोशी / १६८
नाताशा कुठे गेली असेल?
प्रा. प्रतिभा सराफ / २०४
डायरी भरण्याचा दिवस
सुभाष सुंठणकर / २१९

## कवितेची पाने / १८०

उषा मेहता, चंद्रशेखर सानेकर, शकुंतला मुळ्ये, सदानंद डबीर, श्रीपाद भालचंद्र जोशी, सरोज जोशी, रवींद्र भगवते 'गौतम', अशोक कोतवाल, गणेश एस. भाकरे, प्रा. कैलास देवराम सलादे, रमेश पवार, प्रशांत असनारे, बबन सराडकर, गोविंद मोतलग, सदानंद सिनगरे, भगवान निळे, रमेश सावंत, बबन लोंढे

## संपादकीय

'आधा है चंद्रमा रात आधी', 'पंछी बनू उडते फिरू' अशी जुनी मधाळ गाणी बेंजो-पिपाणीवर वाजतात आणि आजची तरुणाई टिपऱ्यांचा ताल धरत धुंद नाचते, हे दृश्य नवरात्रोत्सवात अनेक ठिकाणी पाहायला मिळतं. मोठी गंमत वाटते, की इतर वेळी 'काय बोअर आहे' असं म्हणत याच गाण्यांना ही तरुणाई झिडकारते. प्रॅक्टिकल जगण्यात ही 'सोय' महत्त्वाची झाली आहे. आजी-आजोबांना वृद्धाश्रमात आणि लहान मुलांना क्रशमध्ये ठेवण्यातही सोय आहे, त्यात आपण आधीच्या अवस्थेतून गेलो आहोत आणि पुढची अवस्था येणार आहे याचं भान किती असतं, माहीत नाही. हाच 'सोय' हा प्रकार सर्व क्षेत्रांत आहे. या सोयीमागे बदसूर असतात तेव्हा मनशांती बिघडते. इथेच 'आसारामां'ची सोय लागते. या देशात मानसातल्या 'राम'चरिताला मोठी परंपरा आहे. राजकारणात आयाराम-गयाराम, कधी रोम की राम; भाविकांत आसाराम, कधी हरे राम, सारं काही ज्यांच्यात्यांच्या सोयीसाठी. 'राम'राज्याची उरते फक्त संकल्पना.

नुकतेच अलिबागमधील एका गावात कुणी दारूभट्टीविरुद्ध आवाज उठवला म्हणून तिच्या मालकानं त्याच्यावर हल्ला केला. त्या विरोधात त्या व्यक्तीनं आपल्याकडे न येता पोलिसात तक्रार केली म्हणून 'गावपंचायत' बिथरली आणि त्या व्यक्तीच्या कुटुंबाला वाळीत टाकण्याचा निर्णय झाला. दोन शाळकरी मुलांना त्याचे चटके बसू लागले. कालपर्यंत बोलणारे मित्रही बोलेनासे झाले. त्या कुटुंबाशी गावानं व्यवहार तोडला. कुटुंबातील वृद्धा डोळ्यांत पाणी आणून म्हणाली, ''मी मेले तर मला उचलणार कोण? माझ्या पोरा-नातवांचं कसं होणार, ते खाणार-जगणार कसे या चिंतेनं रात्र रात्र जागी असते.'' असल्या अघोरी उपायांना अजूनही देशात वाव आहे, हे दुर्दैव 'राम'चरणी कसं अर्पण करायचं? माणसानं माणसाला सत्ता आणि स्वार्थापुढे इतकं गौण मानावं? डॉ. दाभोलकरांचा बळी जातो आणि बळी घेणारे अदृश्य होतात, हे सांस्कृतिक महाराष्ट्राला शोभणारं नाही.

समाजातला चांगुलपणा कसा वाढीस लावता येईल याचा विचार विज्ञानाच्या परिभाषेत सुधीर थत्ते यांनी केला. त्यांचा हा विचार करायला लावणारा लेख या अंकात आहे. अंकाचा आरंभ होतो डॉ. उज्ज्वला दळवी यांच्या लेखानं. काळाला पुरून मानवीसंस्कृती कशी उरते, विस्थापित, अन्यायग्रस्त मनांची विकलता, बंडखोरी यातून आगळी अभिव्यक्ती कशी होते, हे

सांगणारा हा लेख. राज्यकर्ते सजग असतील तर समाजासाठी ते टीकेची पर्वा न करता पुढे जातात. महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून आपण यशवंतराव चव्हाणांचं नाव घेतो, ते योग्यच आहे, परंतु वसंतराव नाईक हे व्यक्तिमत्त्व दुर्लक्षित राहतं आणि त्यांच्या आधीचे मुंबईचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर तर विस्मृतीत जातात. अरुण साधू यांनी वसंतरावांच्या कारकिर्दीचा आढावा घेणारी प्रस्तावना 'चतुरस्र' या नावाने असलेल्या विधानमंडळातील निवडक भाषणांच्या संग्रहासाठी लिहिली. या अंकात ती पुनर्मुद्रित करत आहोत. गिरीश जोशी यांनी बाळासाहेब खेरांच्या काळावर प्रकाश टाकला आहे.

काही व्यक्तिमत्त्वं एका ध्यासानं जगतात, मनात समाजाचं भान असतं. त्यांचं जीवन आपल्याला समृद्ध करतं. अभय सदावर्ते यांनी कमलताई काकोडकर डॉ. अब्दुल कलाम, निलु गव्हाणकर यांनी आर.डी. बर्मन, प्रभाकर भिडे यांनी पार्वतीबाई आठवले, डॉ. सुलभा कोरे यांनी महाश्वेतादेवी या व्यक्तित्वांची चितारलेली जीवनदृष्टी वाचनीय आहे.

भारतात बौद्धिक संपदेची वानवा नाही, मात्र तिला किंमत नाही हे वास्तव कसं आहे; 'पेटंट' म्हणजे काय; याबाबतीत सरकारची उदासीनता व आर्थिक संस्थांना नसलेली चाड आणि समाजाची अनभिज्ञता यावर डॉ. ओमप्रकाश कुलकर्णी यांचे स्वकर्तृत्वावर आधारित प्रबोधन महत्त्वपूर्ण आहे.

'किचन पोएम्स' या मूळ धीरूबेन पटेल यांच्या कवितांचा तितकाच अभिजात दर्जा राखणारा मराठी अनुवाद उषा मेहता यांनी केला आहे. त्यावर डॉ. शुभांगी पातुरकर यांचा लेख त्याची महती सांगतो.

स्मिता भागवत एका कादंबरीची जन्मकथा सांगतात. वसंत वसंत लिमये 'कल्पसर' या प्रकल्पाबाबत सांगतात. दोन्ही घटना शेजारील गुजरातमधल्या. 'कल्पसर' आपल्याला अनभिज्ञ असल्याचा खेद वाटतो. यशवंत पाठकांनी लिहिलेली 'देठातील मुळाक्षरे' त्यांच्या रसाळ शैलीत गोदावरीच्या परंपरेचा ओघ सांगताना काठावरच्या ओंगळ वास्तवाबाबत डोळ्यांत अंजनही घालतात.

सुहासिनी मुळगावकर आणि जी.एन. जोशी ही दोन कलासक्त व्यक्तिमत्त्वं. त्यांनी आपली कला जोपासलीच, शिवाय उत्तम ते सादर करून जतन करण्याचा द्रष्टेपणा दाखवला. ही दुर्मिळ व्यक्तिमत्त्वं अनुभवलेल्या केशव साठ्ये यांनी त्यांचं जगणं मांडलं आहे.

अरुण पुराणिक म्हणजे संगीत आणि सिनेमाचा चालताबोलता आणि ऑथेंटिक इतिहास. तंबूतल्या सिनेमापासून थिएटर्समधील अनुभवांच्या गमतीजमती त्यांनी नेहमीच्या खुमासदार शैलीत मांडल्या आहेत.

प्रभाकर वाईरकरांनी दोन व्यंगचित्रकारांची नव्यानं ओळख घडवली आहे. 'बकुळ' या फुलाचा पौराणिक ते अर्वाचीन साहित्यप्रवास डॉ. नीला कोर्डे यांनी उत्कृष्ट सादर केला आहे. डॉ. दाउद दळवी यांचा व्यासंग 'लेणी महाराष्ट्राची'मधून प्रकटला. या अंकात त्यांनी भारतीय मुस्लिम स्थापत्याचे विविध पैलू मांडले आहेत.

सोय बघण्यात गैर नाही, पण त्यात आपली व दुसऱ्याची गैरसोय होऊ नये हे वाटणं म्हणजे विवेकानं जगणं. माहिती तंत्रज्ञानानं व संपर्कसाधनांनी जग जोडलं गेलं असलं तरी आपली संस्कृती व मूल्यं अबाधित ठेवून 'मॉडर्न' का होता येऊ नये? नीलिमा कानेटकरांचा हिमालयातल्या एका पहाडी गावातील अनुभव या संदर्भात वाचण्यासारखा आहे. रविराज गंधे यांनी 'दूरचित्रवाणी-साहित्य आणि दृश्यकला' याचा परामर्श घेतला आहे. तर अपर्णा पाटील यांनी प्रोफ्युमो प्रकरणावर प्रकाश टाकला आहे. राजकीय स्कँडल घडण्याची कारणं काहीही असली तरी त्याचा शेवट मात्र संबंधित व्यक्तीच्या राजकीय कारकिर्दीचा शेवट होण्यातच झालेला आहे, हा इतिहास आहे. असंच हे एक प्रोफ्युमो प्रकरण, पन्नास वर्षांपूर्वी ब्रिटनमध्ये खळबळ माजवलेलं.

उमेश कदम, प्रतिभा सराफ, दिलीप पांढरपट्टे, सुभाष सुंठणकर यांच्या कथा आणि वेगवेगळ्या नव्या-जुन्या कवींच्या कविता असा एकूण अंकाचा बाज आहे.

अंक तयार करायला अनेकांचं सहकार्य असतंच. मात्र प्रत्यक्ष संगणकावर मुखपृष्ठापासून आतील मांडणीपर्यंत त्याला नेत्रसुखद करण्याचं काम योगितानं चोख बजावलं. चित्रं सतीश भावसारनं रेखाटली. जाहिरातीची बाजू धनश्री धारप यांनी सांभाळली. इंडिया प्रिंटिंग वर्क्सचे मालक आनंद लिमये यांनी देखणी छपाई केली. आभार मानायचे ते हितचिंतक व जाहिरातदारांचे. त्यांचं पाठबळ नेहमीप्रमाणे मिळालं. अंक सिद्ध झाला. तुमच्या पसंतीची प्रतीक्षा आहे.

हा अंक अधिकतर विविध व्यक्तिमत्त्वांच्या जीवनधारणेवर, कर्तृत्वावर प्रकाश टाकतो. हाच प्रकाश वाढत जावा व दिवाळीचा खरा आनंद प्रकटावा हीच सदिच्छा!

**– अरुण जोशी**



आपणा सर्वांना दिपावली व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
घर असो वा शेती, उद्योग असो वा प्रकल्प
पाईपींगच्या प्रत्येक गरजांसाठी 'सुप्रीमची' दर्जेदार,
पर्यावरण पूरक उत्पादने...
Supreme ©
People who know plastics best
पाईपिंगचे संपूर्ण समाधान
aqua Gold™
उच्च दबावाची प्लबिंग प्रणाली
Lifeline™
गरम व थंड पाण्यासाठी अद्यावत प्लबिंग प्रणाली
indo green™
गरम व थंड पाण्यासाठी अद्यावत प्लबिंग प्रणाली
S.W.R.
ड्रेनेज प्रणाली
SKY RISE
हायटेक, लो नॉईज ड्रेनेज प्रणाली
Nu-Drain™
भूमिगत ड्रेनेज प्रणाली
दि सुप्रीम इंडस्ट्रीज लि. मुंबई/जळगाव
ई-मेल :pvc-pipes@supreme.co.in • वेबसाईट : www.supreme.co.in
आयुष्यभराची साथ...


शुभ दिपावली
युनियन बँक ऑफ इंडिया
सहर्ष सादर करीत आहे
फेस्टिवल धमाका
योजनेअंतर्गत
सवलतीच्या व्याज दरात
कॉम्बो रिटेल ऋण
योजना 31 मार्च 2014 पर्यंत
दुचाकी वाहन कर्ज
12.50% द.सा.*
ग्राहकोपयोगी वस्तूंसाठी कर्ज
12.50% द.सा.*
15% वरून कमी केलेला दर
*अटी लागू
युनियन बँक ऑफ इंडिया
चांगले लोक, चांगली बँक
1800 22 2244 (टोल फ्री नं.) | 022 2575 1500 (सशुल्क) | 022 2571 9600 (एनआरआयसाठी) | www.unionbankofindia.co.in

# विस्थापितांचे अंतर‘रंग’

**डॉ. उज्ज्वला दळवी**

*राज्यकर्ते येतात; जातात, धर्म बळावतात; ओसरतात, विपरीत परिस्थितीही सरते. उरतात त्या भावना, आठवणी आणि त्यांची कलावंतांनी मूर्त केलेली प्रतीकं. हरत नाही, पुरुन उरते ती मानवी संस्कृती. अन्यायानं, संहारानं केलेल्या राखरांगोळीतून ती दर वेळी फिनिक्ससारखी नवी झळाळी मिरवत पुन्हा डोकं वर काढते, नवी उंची गाठत जाते.*

‘‘नॅन्सी डॉक्टर झाली.’’

डॉ. यासर यांनी आमच्या इमर्जन्सी विभागात मिठाई वाटली. त्यांच्या देखण्या लेकींना, त्या शाळेत असल्यापासूनच मागण्या येत होत्या. पण यासर यांनी उतारवयात झालेल्या लेकीचा डॉक्टरकीचा हट्ट पुरवला. मग ओघानंच नॅन्सीच्या मागची सौसान आणि धाकटा सादेक हे देखील मेडिकल कॉलेजात शिरले.

जन्मभर सौदी अरेबियात काम करणाऱ्या डॉ. यासर यांनी आपलं आयुष्य व्यवस्थित आखलं होतं. सौसान डॉक्टर होताहोता ते निवृत्त होणार होते. नंतर सीरियात जाऊन आरामात डॉक्टरकी करायला दमास्कस शहराच्या मुख्य चौकात सुसज्ज दवाखाना तयार होता. त्यांचा प्रशस्त वाडा तिथून जवळच होता. शिवाय भाड्यानं दिलेली इतर घरं, जमीनजुमला सारं काही त्यांची वाटच बघत होतं.

पण... त्यांच्या निवृत्तीच्या वेळीच सीरियातली परिस्थिती हाताबाहेर गेली. मायदेशाची परतीची वाटच खुंटली! कुटुंबाला ऐशोआरामाची सवय झालेली; पगार नाही; आयुष्याची सारी कमाई सीरियात गुंतवलेली; असं असताना जगायचं कसं हाच मोठा प्रश्न झाला! नॅन्सीच्या बरोबरीच्या सौदी मुलींना नोकऱ्या मिळाल्या. पण नॅन्सीला अनुभव नाही या सबबीखातर नोकरी मिळेना! बंड निवळेपर्यंत सीरियनांना मायदेशी परतण्याची सक्ती करू नये असा आदेश सौदी सरकारनं उदारपणे दिला, पण पोटापाण्याच्या निश्चिंतीचं आश्वासन दिलं नाही. नॅन्सी-सौसान यांच्यासाठी सुखवस्तू सौदी मुलांकडून येणारे लग्नाचे प्रस्तावही एकाएकी थंडावले!

डॉ. यासरना कसली ना कसली नोकरी मिळावी म्हणून, डॉ. आयमन वगैरे त्यांचे तरुण मित्र कसून प्रयत्न करत होते. डॉ. आयमनची बायको नुकतीच बाळंत झाली होती. तिच्याकडे नॅन्सी आणि तिची आई हनान या दोघी बाळंतविडा घेऊन गेल्या. त्यांनी आणलेली कशिद्याची झबली, गोधड्या, चिमणाळी बघून बाळंतीण हरखली. शिवाय हनानचा अनुभव आणि नॅन्सीची डॉक्टरी जाण यामुळे बाळंतिणीला बऱ्याच

नव्या गोष्टी समजल्या. जवळच राहणाऱ्या तिच्या मैत्रिणीचीही अशीच तीन छोटी बाळं होती. तिलाही अशा सल्ल्याची, वस्तूंची गरज होती. गप्पा मारतामारता एकीची नड आणि दुसरीची सवड यांची सांगड घालायचा प्रस्ताव मांडला गेला, संमतही झाला.

बाळंतिणींना आधार, सल्ला देतादेताच नॅन्सी–हनानच्या कलाकुसरीच्या वस्तूही विकल्या जायला लागल्या. परिस्थितीशी टक्कर द्यायला नॅन्सीनं शिक्षणाचा अभिमान बाजूला ठेवला आणि तिला काम मिळालं; हातानं काहीतरी सुंदर घडवायचा आनंद मिळाला; मनातला उद्रेक आटोक्यात आला. पूर्वी सौदीत दर आठवड्याला कलात्मक सीरियन वस्तूंचे बाजार भरत. सीरियातल्या बंडामुळे ते हळूहळू ओसरत गेले होते. त्यांची उणीव लोकांना भासत होतीच. थोड्या प्रमाणात का होईना, नॅन्सी–हनानच्या वस्तूंनी ती गरज भागवली जाऊ लागली. यासर कुटुंबाच्या रोजीरोटीची सोय झाली; कलेचं कौतुक झालं; एका बाळंतिणीच्या धाकट्या दीरानं नॅन्सीला मागणीही घातली!

डॉ. यासरांची सीरियातून किंवा सौदीतूनही हकालपट्टी झाली नव्हती, पण आयुष्याच्या कमाईची अपेक्षित फळं उपभोगायला मायदेशी परतायची त्यांची वाट बंद झाली होती. सुस्थापित होण्याचा त्यांचा हक्क हिरावून घेतला गेला होता. त्यांना आठवत होता तो त्यांच्याच एका घरात भाड्यानं राहणारा निर्वासित इराकी आर्किटेक्ट. सीरियात त्याला आर्किटेक्टचं काम तर मिळत नव्हतंच पण त्यानं मनातला प्रक्षोभ कागदावर ओतून काढलेली चित्रंही विकली जात नव्हती. सीरियन प्रदर्शनांत सीरियन चित्रकारांच्याच कलाकृती मांडल्या जात कारण तो त्यांचा स्वतःचा देश होता. इराकी कलाकार तिथे उपरा, विस्थापित होता. त्याचे मित्र त्याची चित्रं आखातात आणि युरोपात नेऊन विकत.

त्याला आश्रय देणारे, जमेल तितकी मदत करणारे डॉ. यासर आता स्वतःच सौदीत उपरे, विस्थापित झाले होते. नशिबानं त्यांच्या मुलीच्या कलाकृतींचं बायकांच्यात कौतुक होत होतं. पण त्यांचं मन मात्र दमास्कसमधल्या त्यांच्या उद्ध्वस्त वाड्यात कैद झालं होतं. अशाच एका उद्विग्न क्षणी त्यांनी हातात कुंचला घेतला आणि मनातली कळ कागदावर कला बनून उतरली. प्रदर्शनात चित्रं मांडण्यासाठी नव्हे, फक्त मनाला झपाटणाऱ्या भूतकाळाच्या भुताला कागदात कैद करण्यासाठी डॉक्टर कलाकार झाले.

नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, युद्ध, अराजक, राजकीय डावपेच अशा अनेक कारणांनी माणसांची त्यांच्या मनाविरुद्ध त्यांच्या हक्काच्या ठिकाणाहून हकालपट्टी होते; ते देशोधडीला लागतात; विस्थापित होतात. त्यांच्यातल्या बहुतेकांच्या मनात असह्य उद्रेक उफाळतो. काही जण त्या तगमगीतून जगाला झपाटू शकतील अशा रसरशीत कलाकृती घडवतात. गेल्या दोन दशकांत सीरियात कलेला उत्तम प्रोत्साहन मिळालं होतं. अतास्सी, अय्याम यांसारख्या आर्ट गॅलऱ्यांची भरभराट झाली होती. अनेक इराकी कलावंतांना सीरियात आश्रय मिळाला होता. नंतर बंडामुळे बरेच सीरियन कलाकारच दमास्कसच्या अय्याम आर्ट गॅलरीत आश्रयाला आले. तिथून ते आखातात, इतर देशांत पांगले. त्यांच्यातल्याच तम्माम अझ्झाझ नावाच्या कलावंतानं आपल्या भावना व्यक्त करायला नवं तंत्रज्ञान वापरलं.



त्यानं 'द किस' हे एका नावाजलेल्या चित्रकाराचं गाजलेलं अमूर्त-चित्र सीरियातल्या बाँबस्फोटानं आणि गोळीबारानं विदीर्ण झालेल्या एका भिंतीच्या फोटोवर चपखल बसवलं आणि तो मिश्र-चित्ररूपी हुंदका फेसबुकावर टाकला. काही तासांतच तब्बल वीस हजार लोकांनी ते चित्र आवडल्याची पावती (लाईक) दिली! यंदाच्या मार्चमध्ये सीरियाच्या बंडखोर साहित्य-कलेचं एक मोठं संमेलन कोपनहेगनला झालं. त्याच्यात विस्थापितांच्या कलाकृती आणि लिखाण यांचं खास दालन होतं.

काही देशांत राजकीय छळ असह्य होतो. त्यामुळे माणसं

आपण होऊनच, लपूनछपून परागंदा होतात. कुर्ट्झ श्विटर्स हा जर्मन ज्यू हिटलरच्या काळात तसाच निसटून जाऊन नॉर्वेत पोचला. त्यानं अशाच तगमगीवर आधारलेली 'मेर्झ' (दुःख) नावाची चित्रकलेची चळवळच सुरू केली. ब्रह्मदेशातून जीव घेऊन पळालेल्या लोकांची वेदना दाखवणाऱ्या चित्रांवर ब्रह्मदेशात बंदी होती. पण त्यांना पाश्चात्य देशांतून इतकी किंमत आली की ब्रह्मदेशाच्या सरकारला पश्चात्ताप झाला; त्यामुळे त्या चित्रांची रंगूनमध्ये उघड प्रदर्शनं मांडली गेली!

तिबेटातल्या छळानं हैराण होऊन पंचावन्न सालापासून भारतात आलेल्या अनेक लहान मुलांनी आपल्या मनातल्या तिबेटची चित्रं काढली. त्यांचा एक संग्रह सत्त्याण्णव साली अमेरिकेत प्रसिद्ध झाला.

तेवीस-चोवीस वर्षांपूर्वी काश्मिरातून दिल्लीला निष्कासित झालेल्या पंडित रैनांना आठवणीतला काश्मिरी निसर्ग साद घालत राहिला. त्यांनी तो सातत्यानं आणि प्रभावीपणे कॅनव्हासवर उतरवला. त्या आयुष्यभराच्या कामगिरीबद्दल त्यांना काश्मिरी समितीकडून २००४ सालचं 'कल्हण पारितोषिक' मिळालं.

काही विस्थापित त्यांच्या नव्या देशांच्या चाकरीसाठी बळजबरीनं आयात केलेले असतात. अमेरिकेतल्या क्षितिजापर्यंत पसरलेल्या मळ्यांत राबायला मजुरांची गरज होती. त्यासाठी आफ्रिकेतून काळे गुलाम नेले गेले. गुलामांनी भरलेलं पहिलं जहाज अमेरिकेच्या किनाऱ्याला सतराव्या शतकात लागलं. तेव्हापासून एक कोटीहून अधिक गुलाम जनावरांसारखे पकडून तिथे नेले गेले. त्यांचं विस्थापित होणं भौगोलिक तर होतंच, शिवाय त्यांच्या मनातल्या संस्कृतीलाही हद्दपार करायचा त्यांच्या गोऱ्या मालकांचा इरादा होता. त्या गुलामांना आपल्या जुन्या चालीरीती उघडपणे दाखवायलाही परवानगी नव्हती. ढोलकीच्या तालावर नाचताना गुलामांच्या अंगात बंडाचं वारं येईल म्हणून त्यांच्या ढोल वाजवण्यावरही बंदी घातली गेली होती. त्यांच्यातल्या अनेकांनी आपली पारंपरिक कला लपूनछपून जतन केली. बायकांनी गोधड्यांवरच्या सांकेतिक कशिद्यात छळाच्या कहाण्या सांगितल्या; सुटकेचे मार्गही नोंदून ठेवले! अशा अनेक वस्तू हल्लीच एका पुरातत्त्व संशोधनात सापडल्या आहेत. आफ्रिकेचं नृत्य आणि संगीतही असंच गनिमीकाव्यानं फोफावलं आणि आता ते अमेरिकेच्या तरुणाईच्या गळ्यातला ताईत बनलं आहे!

काही मातब्बर व्यक्तींच्या स्पष्टवक्तेपणाचा त्यांच्या



चौदा वर्षांचा तिबेटी निर्वासित चित्र काढताना



दान्तेच्या सप्तवलयी नरकातला छळ

देशांच्या राज्यकर्त्यांना जाच होतो. म्हणून त्या मान्यवरांना सक्तीनं देशाबाहेर हाकललं जातं.

तेराव्या शतकात इटलीच्या दान्ते नावाच्या कवीला फ्लॉरेन्समधून हद्दपारीची शिक्षा झाली. त्यानंतरची त्याची परवड त्याच्या अतिशय गाजलेल्या 'Divine Comedy' या पुस्तकात त्यानं सांगितली. ती रूपकात व्यक्त करताना त्यानं नरकाच्या सात वलयांचं चित्रदर्शी वर्णन केलं. तिथून पुढे निदान पाश्चात्यांच्या मनात तरी हुबेहूब त्याच भयावह नरकाची कल्पना रुजली. धर्माची कट्टर शिस्त लोकांच्या अंगी बाणवायला धर्मोपदेशकांनी त्याच कल्पनेचा बागुलबुवा वापरला. डॅन ब्राउनची सध्या गाजणारी 'इन्फर्नो' कादंबरीही त्याच कल्पनेच्या सूत्रात गुंफली आहे.

प्रसिद्ध फ्रेंच कादंबरीकार व्हिक्टर ह्युगो तर तिसरा नेपोलियन आणि राणी व्हिक्टोरिया या दोघा मातब्बरांशी वाकड्यात शिरला! त्यामुळे त्याची आधी फ्रान्सहून, मग बेल्जियम आणि नंतर जर्सीहूनही राजकीय हकालपट्टी झाली.

त्या सगळ्या धक्क्यांत त्याचं लेखन चालूच होतं. शेवटी गर्न्सी बेटावर थोडं स्थैर्य लाभल्यावर त्यानं 'ला मिझरब्ला' (सानेगुरुजींनी भाषांतरित केलेली 'दुःखी') ही कादंबरी लिहिली. शासकीय आणि सामाजिक अन्यायाला वाचा फोडणारी ही कादंबरी एकोणिसाव्या शतकातली श्रेष्ठ कलाकृती मानली जाते.

अलेक्सांडर सोल्त्झेनेत्सिन रशियन राज्यक्रांतीच्या जरासाच आधी जन्मला; तरुणपणी अभिमानानं लाल-सेनेतला सैनिक झाला. तो दुसऱ्या महायुद्धात रशियाच्याच बाजूनं लढत होता. त्याच दरम्यान, १९४५ साली, त्याला त्याच्या विद्रोही विचारांसाठी अटक झाली आणि ती शिक्षा संपल्यावर त्याला गुलागच्या अमानुष श्रमछावण्यांत डांबलं गेलं. त्या श्रमछावण्यांतल्या हद्दपारीत त्याला जे अनुभव आले त्यांच्यावरच त्याने 'गुलाग आर्किपेलागो', 'One Day in the Life of Ivan Denisovich' यांसारखी, रशियन श्रमछावण्यांवर कडाडून टीका करणारी पुस्तकं लिहिली. ती रशियाच्या बाहेर, इस्टोनियात छापून प्रसिद्ध झाली. 'Gulag Archipelago'ला १९७० सालचं नोबेल मिळालं. त्यानंतर चार वर्षांनी अलेक्सांडरचं रशियन नागरिकत्व काढून घेऊन त्याला देशाबाहेर हाकललं गेलं. तिथेही तो वयाच्या साठी-सत्तरीपर्यंत लिहीत राहिला.

काही लोकांच्या मायदेशावरच परिस्थितीची कुऱ्हाड पडते आणि तो दुभंगतो. मग सरहद्दीच स्थानभ्रष्ट होतात आणि स्वतःला त्या अखंड भूभागाचे नागरिक समजणाऱ्यांची तळ्यात की मळ्यात अशी गत होते. 'अलिपुरका अईली', 'होशियारपुर से लाहोर तक' यांसारखी पुस्तकं भारत-पाक फाळणीतल्या स्थलांतराच्या अनुभवांत होरपळलेल्या मनांनी लिहिलेली आहेत.

धरणांच्या पाणलोट भागातले, मोठ्या प्रकल्पांच्या आवारातले, रस्ताबांधणीच्या वाटेतले रहिवासी वेगवेगळ्या कारणांनी विस्थापित होतात. 'झाडाझडती'सारख्या पुस्तकांतून त्या रंजल्या-गांजल्यांचा आक्रोश ऐकू येतो.

माणूस स्थिरावला, समाजात राहायला लागला तेव्हापासूनच हद्दपारीची शिक्षा अमलात यायला लागली असावी. नैसर्गिक कारणांनी विस्थापित होणं तर त्याच्याही आधीचं. ॲडॅम आणि ईव्हच मुळात निष्कासित होते! विस्थापित होण्याचं दुःख स्वतः न अनुभवताही समर्थपणे सादर करणं वाल्मीकी, व्यास, कालिदास या प्रतिभावंतांना सहज जमलं. ते कसब वापरायलाच कदाचित, त्यांनी आपापल्या नायकांना सक्तीनं परागंदा केलं असावं. म्हणून तर रामाचं अयन (वाटचाल) झालं म्हणजेच रामायण घडलं. पांडव वनवासात गेले नसते तर बहुतेक 'महा'भारताचं 'लघु'भारत झालं असतं. कालिदासाचा यक्षही शिक्षेमुळे अलकापुरीतून हाकलला गेला म्हणून तर मेघदूताचा तो काव्यमय प्रवास झाला.

इतिहासाच्या प्रत्येक शतकात कुठे ना कुठे तरी अशा विस्थापितांच्या जथ्थ्यांची दिशाहीन वाटचाल आणि परवड झाली. ती समस्या मानवी संस्कृतीचा अविभाज्य हिस्सा आहे. तिचा इतिहास आणि भूगोल जगाला व्यापून टाकतो. कलाकृतींच्या रूपात त्याची वारंवार नोंद झाली आहे. जुन्या काळात तशा कलाकृतींमध्ये पुराणातल्या किंवा धर्मकथांतल्या प्रसंगांचं चित्रण असे. हल्ली प्रत्यक्ष घटनांची नोंद असते. तो निरंतर ओघ लोकांच्या लक्षात आणून द्यायला युनायटेड नेशन्स या संस्थेनं २००२ च्या जुलैमध्ये प्राग शहरातल्या राजवाड्याच्या विविध दालनांत एक मोठं प्रदर्शन भरवलं.


बायबलमधली गोष्ट : निर्वासितांसाठी कातळातून पाणी उसळलं


म्यानमारच्या निर्वासितांना बांगलादेशात पाणी मिळालं (१९९२)





पहिलं महायुद्ध : सारायेवो
आशा आणि हताशा
दुसरं महायुद्ध : सारायेवो

प्रत्येक दालनाची रचना वाटचालीच्या विषयाला साजेशी, रेल्वे-स्थानकासारखी केली.

त्या स्थानकांची नावं 'निष्कासन', 'ससेमिरा', 'पायपीट', 'मदतीचा हात' अशी समर्पक ठेवली. इतिहासातल्या विस्थापितांबद्दलच्या तीनशे नावाजलेल्या जुन्या कलाकृती आणि अगदी त्यांच्यासारखीच दिसणारी, अलीकडच्या विस्थापितांची, युनायटेड नेशन्सपाशी असलेली छायाचित्रं यांची समांतर मांडणी केली. त्या जुन्या-नव्याच्या तुलनात्मक प्रदर्शनानं या विषयाचं चिरंतन स्वरूप लोकांच्या मनावर बिंबवलं.

वेगवेगळ्या काळांतल्या आणि देशांतल्या कित्येक विस्थापितांनी आपली कहाणी आपल्या मुलांना पुन्हा पुन्हा सांगितली. मागे राहिलेल्या मायभूमीचं, घराचं, माणसांचं वर्णन, ताटातुटीनं पिळवटून निघालेलं मन या साऱ्यांचं तपशीलवार वर्णन केलं. तो मौखिक वारसा पुढच्या पिढ्यांना पोचवायची त्यांनी मुलांना गळ घातली. मानसशास्त्राच्या प्रयोगांत दिसून आलं आहे की माणसांच्या आठवणी मूळ जागेशी, घटनांशी निष्ठावंत नसतात. दर वेळी एखाद्या प्रसंगाची नव्यानं आठवण काढली की ती आधीच्या आठवणीची आठवण असते. आपले विचार, त्यावेळची आपली मनस्थिती, भोवतालचं वातावरण यांचा त्या आठवणीवर प्रभाव पडतो. ती जराशी बदलते. विस्थापितांच्या मनस्थितीचाही त्यांच्या आठवणींवर तसा परिणाम झाला. प्रत्येक वेळी नव्यानं सांगताना वर्णन अधिक उत्कट होत गेलं.

पुढच्या पिढीतल्या अनेकांनी तर मूळ गाव फक्त कल्पनेत, आईबापांच्या भावनांच्या पदराआडून पाहिलं होतं. त्यांच्या अतिस्मृतीतल्या (postmemory) गावाला रहस्याचे, रोमहर्षकतेचे रंग होते. ॲलेक्स हेलीचा त्याच्या जमातीच्या पाळामुळांशी प्रत्यक्ष संबंध येण्याची सुतराम शक्यता नव्हती. ॲलेक्सची 'Roots' ही कादंबरी त्याच्या कुंटा किंटे या पूर्वजाच्या स्थलांतरानंतर दोन शतकांनी लिहिली गेली. त्यांच्यातला इतिहास खरा असला तरी भावनिक, प्रासंगिक फेरफार बरेच झाले असावेत. कदाचित त्यामुळेच ॲलेक्सनं त्याच्या पुस्तकातून दाखवलेला अन्याय वाचकांच्या मनाला अधिक भिडला असावा.

विस्थापितांची कला, त्यांचं साहित्य यांचं भांडार मोठं आहे. मानसशास्त्रज्ञांनी त्यावर विचारही भरपूर केला आहे.

आपण जेव्हा जन्मभर एकाच ठिकाणी आरामात राहतो तेव्हा आपल्या जाणिवांवर रोजच्या सवयीची एक गुबगुबीत दुलई पांघरली जाते. भोवतालच्या कित्येक गोष्टी आपल्याला जाणवत नाहीत किंवा जाणवल्या तरी अस्पष्टच भासतात. परक्या ठिकाणी केवळ प्रवासी म्हणून गेलो तरी आपण ती दुलई लपेटूनच जातो. पण परक्या गावात काही काळ ठाण मांडून राहायची पाळी आली तर मात्र ते पांघरूण हरवतं. नव्या ठिकाणच्या बारीकसारीक गोष्टी ठळकपणे दिसतात. त्यांच्यात

जागा असतात; वस्तू असतात; माणसं असतात; जेवणखाण असतं; भाषा असते; चालीरीती असतात. अनेक गोष्टींत नावीन्य दिसतं. त्या नवेपणाचा अर्थ समजून घेत, त्याचा आपल्यावरचा परिणाम जाणत, त्याच्याशी योग्य तो संबंध जोडत त्या परक्या गावात बस्तान बसवावं लागतं. जुन्या घराची आठवण येते; थोडी हुरहूर वाटते, पण बऱ्याच वेळा नव्या जागेत छान स्वागत झालेलं असतं. नवे मित्र मिळतात; नव्याची नवलाई अधिक असते; पुढची नवी स्वप्नं दिसत असतात.

मनाविरुद्ध, बळजबरीनं विस्थापित होणारे मात्र नव्या ठिकाणी कुणालाही आपलेसे वाटत नाहीत. जुन्या घरी आजूबाजूच्या जवळच्या माणसांनी दिलेलं प्रेम, दाखवलेला आदर यांच्यामुळे त्यांना स्वत्वाची ओळख पटत असते. नव्या जागेत भोवतालच्या समाजाकडून धुत्कार किंवा दुर्लक्ष एवढंच मिळतं. म्हणून तिथे स्वत्व हरवतं. 'कोऽहम्' हा प्रश्न मनाला सतावतो. शिवाय त्यांची मनं, स्वप्नं जुन्या घरानं झपाटलेली असतात. ते घर सोडायला कारणीभूत असलेला अन्याय, त्याबद्दलचा संताप, हतबलता यांनी मनात आक्रोश कोंदलेला असतो. जिणं असह्य झालेलं असलं तरीही जगण्याची इच्छा दुर्दम्य असते. अशा वेळी नव्या ठिकाणची प्रत्येक वेगळी गोष्ट अधिकच प्रकर्षानं जाणवते. दाही दिशांनी त्या बोचणाऱ्या नवलाईचं चक्रीवादळ येतं. त्या वादळात पाय रोवून टिकून राहायला अनेक नव्या गोष्टींचं तातडीनं आकलन होणं, त्यांचं विश्लेषण करून त्यांचे योग्य ते संदर्भ लावणं, त्यांच्यातून आपलं स्वत्व जाणून घेणं आणि ते तिथे टिकवून धरणं या साऱ्याची निकड असते. अनेक प्रकारच्या उलटसुलट विचारांना कह्यात आणून, शिस्त लावून त्या परिस्थितीत तगण्याचं धोरण आखावं लागतं. त्यासाठी जाणिवा प्रखर होतात; विचारांना धार येते. पंचेंद्रियांना येणारे नवे अनुभव, जुन्या आठवणी आणि धारदार विचार यांचा कलायडोस्कोप बनतो. प्रत्येक परिस्थितीकडे अनेक प्रकारे बघायची सवय लागते. अशा विचारमंथनातूनच कलाकृतीचं रत्न वर येतं.

विचारमंथनाच्या वेळी मेंदूत काय होतं ते बघायला अलीकडे fMRIसारखी (X-ray सारखं एक आधुनिक तंत्र) तंत्रं वापरतात. एखादा कूट प्रश्न सोडवताना, एखाद्या साहित्यिक कृतीचा विचार करताना मेंदूच्या दोन्ही भागांतली अनेक केंद्रं एकजुटीनं काम करतात हे त्यात दिसून आलं आहे. विस्थापितांच्या मेंदूला तसं काम करणं अपरिहार्य असतं. त्यामुळे प्रतिभाशाली कलाकृती जन्मतात.

त्या कलाकृतींचा उदोउदो होतो. नव्या ठिकाणच्या समाजाला त्या उपऱ्यांची दखल घ्यावी लागते. उपऱ्यांच्या दृष्टिकोनातून स्वतःकडे बघावं लागतं. त्या नव्या दृष्टिकोनामुळे त्या समाजाचीही दुलई दूर सरते. उपऱ्यांच्या चित्रांचा, साहित्याचा इतिहासावर खरा शिक्का उमटतो.

विस्थापितांना ज्या राजकीय उलाढालींमुळे नाइलाजानं घर सोडावं लागतं त्या उलाढालींचे त्यांच्या मायभूमीतले परिणाम मात्र त्यामानानं फार थोडा काळ टिकतात.

स्वातंत्र्य, समता, बंधुत्व यांचा उद्घोष करत १७८९ साली फ्रेंच राज्यक्रांती झाली. तिच्यात अनेकांचं शिरकाण झालं, अनेक निर्दोष माणसंही देशोधडीला लागली. बरोबर दहा वर्षांनी, १७९९ मध्ये, पहिले पाढे पंचावन्न म्हणत नेपोलियन गादीवर आला आणि सम्राट बनला. पुढचं शतकभर ते बोनापार्टी साम्राज्य आणि लोकसत्ता एकमेकांशी खो खो खेळले. १८७३ मध्ये नेपोलियन घराण्याची सद्दी संपली आणि लोकसत्ताक राजवट आली. तरीही जुलूम चालूच राहिला. एमिल झोलाला १८९८ मध्ये त्या जुलमाविरुद्ध वृत्तपत्रातून लढा द्यावा लागला; परागंदाही व्हावं लागलं!

रशियातली झारची राजवट जुलमी होती म्हणून मॅक्झिम गॉर्कीसारख्या लेखकांनी तिच्याविरुद्ध लेखणी उगारली. तिथली राज्यक्रांती १९१७ साली झाली. त्यावेळीही पळापळ झालीच. पण नंतर कम्युनिस्ट राजवटीतही लोकांची मुस्कटदाबी झाली. १९३३ साली नोबेल मिळवणाऱ्या आयव्हॅन बुनिनला १९२० सालीच पॅरिसला पळून जावं लागलं.

सीरियातही अशी राजकीय उलथापालथ अनेक वेळा झालेली आहे. त्या देशाच्या, साडेपाच हजार वर्षांच्या शांतताप्रिय संस्कृतीवर देशातल्या आणि देशाबाहेरच्या इतक्या राजवटींनी आघात केले आहेत की त्यांची नुसती नामावळीच पानभर लांबेल. त्या सगळ्या आघातांतून ती संस्कृती टिकून राहिली; अधिकाधिक समृद्ध होत गेली. यावेळच्या बंडाच्या धक्क्यातूनही ती सावरावी आणि डॉ. यासरना त्यांच्या हक्काच्या देशात पुन्हा मानानं जगता यावं अशी आम्हा सगळ्या मित्रमंडळीची इच्छा आहे.

राज्यकर्ते येतात; जातात, धर्म बळावतात; ओसरतात, विपरीत परिस्थितीही सरते. उरतात त्या भावना, आठवणी आणि त्यांची कलावंतांनी मूर्त केलेली प्रतीकं. हरत नाही, पुरून उरते ती मानवी संस्कृती. अन्यायानं, संहारानं केलेल्या राखरांगोळीतून ती दर वेळी फिनिक्ससारखी नवी झळाळी मिरवत पुन्हा डोकं वर काढते, नवी उंची गाठत जाते.

**डॉ. उज्ज्वला दळवी**
ujjwalahd9@gmail.com

# भारतातील मुस्लिम स्थापत्य

**डॉ. दाऊद दळवी**

*शहाजहानचा काळ म्हणजे मुगल स्थापत्याच्या अत्युच्च उत्कर्षाचा सुवर्णकाळ आहे. आग्रा व दिल्ली येथील इमारतीत त्याने आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. ते म्हणजे लाल वालुकाश्माऐवजी संपूर्ण शुभ्र संगमरवराचा वापर होय. आग्रा व दिल्लीतील दिवाने आम, दिवाने खास, मुसम्मन बुरुज, खास महाल, रंगमहाल इत्यादी इमारती स्थापत्यसौंदर्याने ओतप्रोत भरलेल्या आहेत.*

भारतात इस्लामचे आगमन दोन महत्त्वपूर्ण टप्प्यांत झाले. इस्लामच्या निर्मितीनंतर सातव्या-आठव्या शतकापासून मुस्लिम अरबांचे येणे-जाणे वाढू लागले. हे अरब वृत्तीने व्यापारी पण चांगल्या सुसंस्कृत परंपरेतील होते. कोकणात शिलाहार व यादवांच्या काळात मुसलमानांची व्यापारी संकुले (इजमान) स्थापन झाली. दक्षिणेत मलबार किनारपट्टीवर अनेक अरब मुस्लिम व्यापाऱ्यांनी वाणिज्य व आर्थिक व्यवहार सुरू केले. या सर्वांचे स्थानिक राजांशी व जनतेशी अतिशय सलोख्याचे संबंध होते. कोचीनपासून १५ कि.मी. अंतरावर कुडंगगल्लूर येथे सातव्या शतकाच्या सुरुवातीला भारतातील पहिली मशीद बांधली. ही मशीद सध्या अस्तित्वात असून साध्या घरासारखी दिसते. कोकण किनारपट्टीवर यादवांच्या काळात वसईजवळच्या गावात पहिल्या मशिदी बांधण्याचा पुरावा मिळतो. कोपराड व नागाव शिलालेखांत या मशिदींचा उल्लेख आहे. अरबांचे व पर्यायाने इस्लामचे पश्चिम किनाऱ्यावरील आगमन हे शांततेच्या मार्गाने व परस्पर देवाणघेवाणीतून झाले.

इस्लामची दुसरी ओळख मात्र अतिशय दुर्दैवी व दूरगामी परिणामाची ठरली. आठव्या शतकाच्या सुरुवातीला मुहंमद बिन कासिम याने सिंध व पंजाबवर आक्रमण केले. राजकीय व लष्करी वर्चस्वाबरोबर धार्मिक वर्चस्व स्थापन करणे असा त्याचा दुहेरी हेतू होता. त्याचाच पाठपुरावा त्याच्यानंतर भारतात आलेल्या आक्रमकांनी केला. गझना, घोरी, इलबारी तुर्क, खिलजी, तुघलक लोदी, अफगाण व मुगल यांच्या आक्रमणांबरोबरच पश्चिम आशियात वृद्धिंगत पावलेली इस्लामी संस्कृती, धार्मिक प्रणाली व परंपरा याही भारतात आल्या व त्यातून अभूतपूर्व राजकीय व सांस्कृतिक संघर्षाला सुरुवात झाली. मुळात इस्लाम हा शांततावादी धर्म असला तरी त्याचे वर उल्लेखित अनुयायी मात्र वृत्तीने आक्रमक शांतता व सहिष्णुता यांचा संपर्क न झालेले. जेत्यावर आपल्या धर्मबळाचा वापर करून तो स्वीकारावयास लावणारे होते. त्यामुळे शांतता व परधर्म सहिष्णुता या तत्त्वांचा पुरस्कार करणारी भारतीय संस्कृती व आक्रमक इस्लामी संस्कृती यातील संघर्ष अटळ झाला व किमान आठ शतके तो चालू



कुतुबुद्दीन ऐबकने बांधलेली उत्तर भारतातील पहिली मशिद कुव्वतुल इस्लाम, समोर चंद्रगुप्ताचा लोहस्तंभ

राहिला. भारतीय संस्कृतीला आक्रमकांचे नवे आव्हान पेलणे फार कठीण गेले.

भारतात आलेले मुस्लिम आक्रमक व एतद्देशीय भारतीय लोक यांचे परस्परसंबंध तीन महत्त्वाच्या टप्प्यांत विभागलेले दिसून येतात. पहिला टप्पा म्हणजे एतद्देशीय हिंदू व बौद्ध राजसत्ता नष्ट होऊन त्या जागी भारतात सर्वस्वी अपरिचित असलेली इस्लामप्रणित राजसत्ता प्रस्थापित झाली. मुहंमद बिन कासिमपासून कुतुबुद्दीन ऐबक व नंतरच्या मुगलांपर्यंत आलेल्या सर्व मुस्लिम सत्ता या युद्धशास्त्रात व लष्करी डावपेचांत अतिशय तरबेज होत्या. याउलट भारतात उत्तरेत अथवा दक्षिणेत अनेक छोटी छोटी राज्ये सत्तेसाठी आपापसांत झगडत होती. वायव्येकडून आपल्यावर कुणी स्वारी करेल याची कल्पना कुणालाही नव्हती. भारताचा पिंड हा शांतता व सहिष्णुतेचा असल्यामुळे या स्वाऱ्यांचा ते खडा प्रतिकार करू शकले नाहीत. या दोन सत्तांमधील संघर्ष हा केवळ राजकीय किंवा लष्करी संघर्ष नव्हता. येणारे आक्रमक हे मूर्तिपूजेविरुद्ध होते.

## संमिश्र स्थापत्यशैलीची निर्मिती

दुसऱ्या टप्प्यात आक्रमकांची एतद्देशीय लोकांशी हळूहळू ओळख होत गेली. सत्ताधीश आक्रमक असले तरी त्यांच्याबरोबर राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रांत देवाणघेवाण करणे अपरिहार्य ठरले. भारतीयांनी परकीयांची भाषा, शासनपद्धती व आर्थिक जडणघडण यात सहभाग घेण्यास सुरुवात केली. कला व स्थापत्यक्षेत्रात ही देवाणघेवाण फार मोलाची ठरली. मुस्लिम सत्ताधीशांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर भारतात वेगवेगळ्या ठिकाणी स्थापत्यकृती व वास्तू बांधण्यात आल्या. त्यावर हिंदू व जैन शैलींचा फार मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. यातून हळूहळू इंडो-इस्लामिक किंवा भारतीय इस्लामी या मिश्र शैलीचा उगम झालेला दिसून येतो. दुसऱ्या टप्प्यात कुतुबुद्दीन ऐबकापासून बंगाल, माळवा, गुजरात, काश्मिर येथील सुलतानांनी हिंदू व जैन यांच्या मंदिरांच्या व मठांच्या अवशेषांवर आपल्या मशिदी व वास्तू बांधण्यास सुरुवात केली. कुतुबुद्दीन ऐबकाने दिल्ली येथे पृथ्वीराज चव्हाणांचा पराजय केल्यानंतर इस्लामची जरब बसावी म्हणून पहिली मशीद बांधली. या मशिदीसाठी एकूण तीस जैन व हिंदू मंदिरे उद्ध्वस्त करून त्यांचे अवशेष मशिदीच्या बांधकामासाठी वापरले. उत्तर भारतातील ही पहिली मशीद असून तिचे नाव 'कुव्वतुल इस्लाम' किंवा इस्लामची शक्ती असे ठेवण्यात आले. ही मशीद बांधण्यास स्थानिक हिंदू व जैन कारागीरांची मदत घेण्यात आली. हे सर्व लोक मुस्लिम शैलीबद्दल अनभिज्ञ होते. मंदिराचे स्तंभ, चौफुले, तुळया, द्वारशाखा तशाच आणून त्या एकमेकांवर रचण्यात आल्या. कुतुबुद्दीन ऐबकाने मशिदीसमोर कमानींची भव्य भिंत उभी केली. भारतीय स्थापत्यविदांना कमान उभी करण्याचे कौशल्य माहीत नव्हते. त्याचा सराव त्यांना आता होऊ लागला. याचप्रमाणे हिंदू अवशेषांवर अजमेर येथे 'अढाई दिन का झोपडा' हे विचित्र नाव असलेली मशीद बांधण्यात आली. या दोन्ही मशिदींत हिंदू शैलीतील कोरीव काम तसेच ठेवण्यात आले आहे. मात्र त्यावरील देवदेवतांची शिल्पे नष्ट करण्यात आली आहेत. घटपल्लव असलेले स्तंभ या मशिदीत आजही दिसून येतात.

## हिंदू व इस्लामी शैलीतील फरक

या दुसऱ्या टप्प्यात हिंदू व मुस्लिम स्थापत्य शैलीतील फरक प्रकर्षाने जाणवू लागला. दोन्ही धर्मांतील मतभिन्नतेप्रमाणे दोहोंच्या बांधकामातही भिन्नता आढळते. हिंदू मंदिरे राजप्रासाद व इतर इमारती या भारसंतुलनावर आधारित आहेत. भिंती, तुळया, चौफुले व बहालांचा वापर करून अनेक मजली इमारती व मंदिरे बांधण्यात येत असत. त्यामुळे पायथ्याशी भरपूर रुंद असलेली इमारत शिखराकडे निमुळती होत जाई. भारसंतुलनावर

हिंदू मंदिरातील स्तंभांचा वापर कुव्वतुल इस्लाम मशिदीत वापरण्यात आला. घटपल्लवाचे प्रतीक स्पष्ट दिसत आहे.



आधारित असलेल्या अशा वास्तूंना trabeate असे म्हणतात. याउलट मशीद किंवा मकबरा बांधण्यासाठी कमानींचा उपयोग करीत. भव्य कमानी निर्माण करून त्या एकात एक गुंफून मोठी दालने निर्माण केली जात. त्यामुळे इमारतींमध्ये भरपूर मोकळी जागा मिळत असे व तिचा उपयोग सांघिक प्रार्थना म्हणण्यात करण्यात येई. कमानींवर अधिष्ठित असलेल्या वास्तूंना arcu-ate किंवा कमानबद्ध वास्तू असे म्हणतात. भारतीय स्थापत्य विशारदांना हळूहळू या दोन्ही पद्धतींची ओळख होत गेली. याचा पहिला प्रयोग सम्राट अकबराने आग्रा व फतेहपूर सिक्री येथील इमारतींवर केला. तो आग्र्याच्या किल्ल्यातील जहांगिरी महाल व फतेहपूर सिक्री येथील जोधाबाई व बिरबलचा महल, ज्योतिषाची इमारत व पंचमहाल यात दिसून येतो. आपल्या उदारमतवादी दृष्टिकोनातून अकबराने हिंदू, जैन व मुस्लिम धर्मप्रणालींना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. त्याचा फार मोठा परिणाम मध्ययुगीन भारतीय स्थापत्यावर झालेला दिसून येतो.

### इस्लामी स्थापत्यातील काही मर्यादा

इस्लामी स्थापत्य कला व शिल्पशैली ही जगातील एकमेव शैली आहे, जिथे माणूस, पशुपक्षी किंवा जिवंत प्राण्याची आकृती दाखवण्यात येत नाही. इस्लाममध्ये मूर्तिपूजा पूर्णपणे निषिद्ध आहे. ईश्वर हा जीवसृष्टीचा एकमेव निर्माता आहे. त्याची प्रतिकृती निर्माण करण्याचा अधिकार व शक्ती इतर कोणालाही नाही अशी इस्लामी तत्त्वज्ञानाची धारणा आहे. स्थापत्य व अलंकरणात मानवी किंवा प्राणीपक्षी यांचे चित्र नसल्यामुळे कलेवर एक प्रकारची स्वाभाविक मर्यादा पडलेली दिसून येते. इतर धर्मातील स्थापत्य व कलेमध्ये मानवी व प्राणी-पक्ष्यांची शिल्पे किंवा चित्रे विपुल प्रमाणात वापरलेली आहेत. मात्र इस्लामी स्थापत्यकलेत त्यांना मज्जाव असल्यामुळे वास्तूच्या अलंकरणावर फार मोठा परिणाम झाला. ही मर्यादा भरून काढण्यासाठी इस्लामी स्थापत्य व शिल्प यांचा कल इमारतींच्या भव्यतेकडे व विविध प्रकारच्या अलंकरण व नक्षीकामाकडे अधिक मोठ्या प्रमाणात वळलेला दिसून येतो. ही फार मोठी त्रुटी, भौमितिक आकृती नक्षीकाम, वेलबुट्टी, पाने, फळे व फुले यांचा उपयोग करून पूर्ण करण्यात आली आहे.

इस्लामी अलंकरणामध्ये व सुशोभीकरणामध्ये तीन महत्त्वाची वैशिष्ट्ये दिसून येतात. इमारतींचा बाज व अंतर्गत पृष्ठभाग हा रंगीत झिलईदार विटांचा (tiles), कांच व काचेचे तुकडे यांचा वापर करून घुमट व मनोरे बहुरंगी व सुंदर दिसतील अशा प्रकारे सजवण्यात आले आहेत.

स्टक्को (Stucco) किंवा बारोक कला (Baroque) ही शैली बायझेंटाईन व सोळाव्या शतकातील युरोपमध्ये मोठ्या प्रमाणात वापरण्यात आली. चुन्याच्या माध्यमातून इमारतीचा पृष्ठभाग, छत, स्तंभ, दारे व खिडक्यांच्या चौकटी, त्यावर वेगवेगळ्या प्रकारची फुले, फळे, पाने व वेलींचे नक्षीकाम सुंदर

पदके (Arabesque) व भौगोलिक आकृती कोरण्यात येऊ लागल्या. ओल्या चुन्यामध्ये रिबिनी कोरण्यात येऊन पानाफुलांच्या गुच्छांनी सजवण्यात येऊ लागल्या. विविध रंग व सोन्याचा वर्ख यांनी हे नक्षीकाम अधिकच उठून दिसू लागले.

शुभ्र संगमरवरी किंवा अनेक रंगांच्या दगडी लाद्या खोदून त्यात रत्ने, किमती खडे बसवण्यात येऊन व नंतर ते घासून स्वच्छ करून व एकजीव करून नक्षीकाम करण्यात आले. त्याला जडावाचे काम किंवा inlay work किंवा Pietra dura असे म्हणतात. मौल्यवान खड्यांची सुशोभनासाठी व अलंकरणासाठी वापर करण्याची पद्धत सुरू झाली. तिला कच्ची दारी (Faience mosaic) असे म्हणतात. वेगवेगळ्या प्रकारचे नक्षीकाम, वेलबुट्टी, फुलांच्या माळा, फुलदाण्या व भौमितिक आकृती यांना अधिक उठाव द्यावा म्हणून मौल्यवान खड्यांचा उपयोग करण्यात येत असे.

याचबरोबर भिंतींच्या पृष्ठभागावर कुराणातील वचने सुंदर लिपीत कोरण्याच्या कलेचा विकास झाला. इंग्रजीत तिला calligraphy किंवा सुंदर अक्षरांत लिहिलेली लिपी असे म्हणतात. अक्षराच्या वळणांवरून या कलेला कूफीक व नस्तालिक लिपी असे म्हणतात. वरील सर्व प्रकारच्या अलंकरणाचा उपयोग भारतातील मुस्लिम स्थापत्यात केलेला आहे. दिल्लीतील कुतुबमिनार अलाई दरवाजा इलतुतमिशचा मकबरा, आग्र्यातील इत्तमादुद्दौला, ताजमहाल, आग्रा व दिल्लीतील दिवाने आम व दिवाने खास, दक्षिणेत विजापूरमधील इब्राहिम रोजा, गोलघुमट व बिदर व गुलबर्गा तसेच हैदराबादेतील चारमिनार इत्यादी इमारतींत वरील प्रकारचे सुंदर अलंकरण दिसून येते.

**भारतीय स्थापत्याचा व कलेचा मुस्लिम स्थापत्यावरील परिणाम**

वर पाहिलेल्या इस्लामी स्थापत्य व भारतीय स्थापत्य यांच्या दुसऱ्या टप्प्यात तांत्रिक व कलात्मक देवाणघेवाणीला व सहकार्याला सुरुवात झाली. बहुतेक स्थापत्यविशारद हे हिंदू किंवा जैन असल्यामुळे या क्षेत्रात त्यांचा फार मोठा प्रभाव दिसून येतो. धार्मिक भिन्नता असली तरी कलेच्या प्रांगणात एकमेकांची चांगली वैशिष्ट्ये आत्मसात करण्याची सुरुवात झाली. यात दोन महत्त्वाचे प्रकार दिसून येतात. पहिल्या प्रकारात मुस्लिम स्थापत्यरचनेत हिंदू स्थापत्य वैशिष्ट्यांची जोड देण्यास सुरुवात झालेली दिसून येते. हिंदू स्थापत्य पद्धतीतील मंडप, भिंतींच्या पुढे येणारे कमळाच्या फुलांसारखे छज्जे, गवाक्षे, छतावरील टुमदार छत्र्या, नक्षीकामाने वेढल्या. त्या गच्च्या यांचा सर्रास उपयोग करण्यास सुरुवात झाली. या दुसऱ्या प्रकारात इस्लामप्रणित अलंकरण करीत असताना स्थानिक कारागिरांनी हिंदू प्रतीकांचा व चिन्हांचा वापर करण्यास सुरुवात केली. यात तारकाकृती, चक्र, स्वस्तिक, फुलांचे हार, कमळ, लामणदिवे, शृंखला असलेल्या घंटा या सर्वांचा चपखल उपयोग करण्यात आला आहे. याचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे प्राचीन काळी इमारत बांधण्यात वास्तुशास्त्र व ज्योतिष यांची सांगड घालण्यात येत असे. हुमायूनने पुराना किल्ल्याच्या महाद्वारावर षट्कोनी तारकाकृतींची चिन्हे कोरलेली आहेत. अकबराने आपल्या इमारतीत हिंदू स्थापत्य व प्रतीकांचा सर्वधर्म समभाव या नात्याने उपयोग केल्याचे आढळते. त्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे आग्र्याच्या जहांगिरी महाल व फतेहपूर सिक्री येथील जोधाबाई व बिरबलचा महाल होय! आग्र्यातील जहांगिरी महालातील पश्चिमेकडील दालन अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण व उत्कंठावर्धक आहे. सुप्रसिद्ध स्थापत्य इतिहासकार डॉ. नाथ यांनी या दालनाला 'मयूर मंडप' म्हणून नाव दिले आहे व ते योग्यच वाटते. दालनातील छज्जांना मोराच्या प्रतिमा असलेल्या हस्तांनी (brackets) पेललेले आहे. येथील पिसारा फुलवलेल्या मोरांच्या प्रतिमा अप्रतिम दिसतात. प्रत्येक मोराच्या चोचीमध्ये सापाची प्रतिकृती दाखवण्यात आली आहे. पौराणिक कथेनुसार मोर हे गणेशाचा भाऊ कार्तिकेय यांचे वाहन होते. मोर सबलांचा वाली व दुर्जनांचे पारिपत्य करणारा आहे. बहुधा अकबराने त्याचे साम्राज्य मयूराच्या रूपात पाहिले असावे व त्याचे सर्व शत्रू सर्पांच्या प्रतीकातून दाखवले असावेत. जहांगिरी महालात हंस, पोपट, चक्र, स्वस्तिक, श्रीवत्स व कमळ या प्रतीकांचा भरपूर उपयोग करण्यात आला आहे.

अकबराने याच प्रतीकांचा उपयोग शेख सलीम चिश्ती यांच्या दर्ग्यात केला आहे. इथल्या कमानींच्या टोकांना कमळाच्या फुलांचे चिन्ह आहे तर स्तंभाच्या पायथ्याशी कीर्तिमुख सदृश आकृती दिसून येते. वायव्य कोपऱ्यातील एका हस्तावर षट्कोनी तारा कोरला असून सहा सर्पांची वेटोळी एकात एक गुंफून ही आकृती किंवा 'नागपाश' कोरण्यात आला आहे. या षट्कोनात बिंदू किंवा कमळ दाखवण्यात आले आहे. डॉ. नाथांच्या मते हे अनाहत चक्राचे प्रतीक असावे व त्याचा सूफी प्रणालीशी संबंध असावा. दर्ग्याच्या दर्शनी भागातील व्हरांड्यात हस्तांना सापांचा आकार देण्यात आला आहे.

## बंगालमध्ये हिंदू स्थापत्याचा प्रभाव


बंगालमध्ये इस्लामी सत्ता स्थापन झाल्यावर त्रिवेणी गौड, पंडुवा, राजमहाल, ढाका, मुर्शिदाबाद व चितगाव ही शहरे उदयाला आली. बंगालचे वैशिष्ट्य म्हणजे भारतातील इतर प्रदेशांच्या तुलनेत येथे दगडांचा तुटवडा आहे. त्याऐवजी वेगवेगळ्या प्रकारच्या मातीच्या भाजलेल्या विटांचा वापर करण्यात आला. इथले कारागीरही बहुतांशी हिंदू असल्यामुळे त्यांनी हिंदू प्रतीकांचा सर्रास उपयोग केला. मशिदी व मुस्लिम वास्तू बांधताना उतरती कौलारू छपरे असलेल्या इमारती बांधल्या. या विशिष्ट प्रकारच्या उतरत्या छपरांना 'छप्परखाट' किंवा बंगाल शैलीचे छत असे नाव पडले. सुलतान शमसुद्दीन इलियास शाह याच्या कारकिर्दीत अदिना मशीद बांधण्यात आली. या मशिदीच्या भिंतीवर हिंदू प्रतीकांचा वापर केलेला दिसून येतो. त्यात कमळाची फुले, लामणदिवे व कीर्तिमुखेही दिसून येतात. मशिदीतील मेहराबींमध्ये साखळीने खाली सोडलेल्या दिव्यांची प्रतीके आहेत. अदिना मशीद ही आकाराने केवळ भव्यच नाही तर त्यातील हिंदू प्रतीकातून अध्यात्म व कलासौंदर्य या दोहोंचा उत्कट संगम घडलेला दिसून येतो.

## गुजरातचे अप्रतिम स्थापत्यवैभव

गुजरातमध्ये अहमदशहा याने सुलतानपद सांभाळल्यानंतर मुस्लिम स्थापत्याला बहर आला. अहमदशहापासून सुलतान मेहमूद बेगडा व बहादूरशहा यांच्या कारकिर्दीपर्यंत अहमदाबाद, सरखेज, चंपानेर, धोलका, खंबायत इत्यादी शहरांत अप्रतिम इमारती उभ्या राहिल्या. गुजरातचे वैशिष्ट्य म्हणजे मशिदी व मकबऱ्यांबरोबर राजप्रासाद व अनेक प्रकारच्या इमारती बांधण्यात आल्या. गुजरातमध्ये बहुतेक स्थापत्यकर्मी हे हिंदू होते. त्यामुळे मशिदी व मकबरे बांधताना तत्कालीन हिंदू व जैन पद्धतींचा त्यांनी अनाहूतपणे वापर केला. अहमदाबाद येथील तीन दरवाजा हे प्रवेशद्वार त्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. अहमदाबाद व सरखेजला जामा मशीद बांधतांना पुन्हा हिंदू मंदिरातील अवशेषांचा वापर करण्यात आला. हिंदू पद्धतीच्या मंदिर शिखरांप्रमाणे मशिदींच्या मिनारांची रचना करण्यात आली. इमारतीच्या बाहेर आलेले छज्जे, त्यांना आधार देणारे कमळाच्या पाकळीसारखे हस्त, मुख्य घुमटाच्या बाजूला बांधण्यात आलेल्या घुमटधारी छत्र्या व भरपूर कोरीव नक्षीकाम यामुळे गुजरातचे मुस्लिम स्थापत्य सजलेले आहे. अहमदाबादमधील अहमदशहा, हैबतखान, जामा मशीद, बीबी अछूत कुकी मशीद, रूपवतीची मशीद यांचे दर्शनी भाग हिंदू मंदिरांप्रमाणे नक्षीकामाने सजवलेले आहेत. इथे मानवी किंवा देवदेवतांच्या प्रतिमांऐवजी भौमितिक पानाफुलांच्या, लतावेलींच्या आकृती दिसू लागल्या. त्यामुळे ही मशीद आहे की मंदिर असा संभ्रम निर्माण होतो. अहमदाबादेतील जामा मशीद, रूपवतीची मशीद व सिद्दी सैय्यदची मशीद यांच्या हस्तीदंती दागिन्यासारख्या नक्षीकामातून हिंदू व मुस्लिम कलेचा सुंदर मिलाफ दिसून येतो. मशिदींप्रमाणेच अहमदशहा, मुबारक सय्यद व सरखेज येथील शेख अहमद खट्टू तसेच मेहमूद बेगडा यांचे मकबरेही मिश्र नक्षीकामाने सजवलेले आहेत. अहमदाबादची सिद्धी सय्यद ही मशीद तेथील अतिशय नाजूक नक्षीकामाबद्दल प्रसिद्ध आहे. अर्धगोलाकार चौकटींमध्ये शिंदीची म्हणजे खजुराची झाडे व त्यांना आलिंगन देणाऱ्या वेली यांची नक्षी जगातील एक अजरामर कलाकृती म्हणून ओळखली जाते. हिंदू व मुस्लिम स्थापत्यकलेतील गुजरातच्या मुस्लिम वास्तूंमध्ये झालेला संगम राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक



बिबि अछुतकुकी मशिद १४६५ अहमदाबाद
प्रांगणाच्या भिंतीवर गोलाकार मिनार इतरत्र दिसत नाहीत.
मिनारावरील अलंकरण संपूर्ण हिंदू मंदिराप्रमाणे.



हुमायूनने बांधलेल्या पुराना किल्ल्याचा महा दरवाज्यावर कोरलेली षटकोनी तारकाकृती त्याच्या ज्योतिष विश्वासाचे प्रतीक

ठरावे. गुजरातमध्ये अहमदाबाद व इतर ठिकाणी अनेक विहिरी किंवा 'वाव' खोदण्यात आले आहेत. त्या बहुमजली असून हिंदू व मुस्लिम अलंकारांचे सुंदर प्रतीक ठराव्यात.

**मांडवगड**

मध्यप्रदेशातील माळवा भागाची मांडवगड किंवा मांडू ही प्रसिद्ध राजधानी होती. १४०१ मध्ये आलापखान घोरीने माळव्याचे स्वतंत्र राज्य स्थापन केले. त्यानंतर होशंगशहा, महमूद खिलजी, बाज बहादूर इत्यादी सुलतानांनी हिंदोला महल, जहाज महल, अशराफी महल असे अनेक प्रशस्त राजप्रासाद बांधले. यामध्ये हिंदू व मुस्लिम शैलींचा मिश्र उपयोग करण्यात आला. कपूर तलाव व गुंजतलाव यामधला जहाज महल माळवा शैलीचे उत्तम प्रतीक आहे. या महालात राजपूत स्थापत्यशैलीतील छज्जे, घुमटधारी छत्र्या व प्रशस्त गच्च्यांचा वापर करण्यात आला आहे. महालाचे प्रतिबिंब दोन्ही तलावांत पडल्यावर एखादी सुंदर बोट पाण्यात उभी आहे, असा भास होतो. हिंदोला महाल एखाद्या झोक्यासारखा गतिमान दिसतो. मांडूतील होशंगशहाचा मकबरा ही भारतातील शुभ्र संगमरवरात बांधलेली पहिली इमारत आहे. हिच्यावरून ताजमहालची कल्पना सुचली असे म्हणतात. राणी रूपमती व बाजबहादूर यांचे महाल मिश्र पद्धतीचे असून दोघांच्याही असीम प्रेमाचे प्रतीक आहेत.

**दख्खनचे स्थापत्य**

इ. स. १३४७ मध्ये अल्लाउद्दीन बहामनशहा याने दिल्लीचे वर्चस्व झुगारले व दख्खनमध्ये बहामनींचे पहिले स्वतंत्र राज्य स्थापन केले. या काळात बिदर, गुलबर्गा, दौलताबाद व इतर अनेक ठिकाणी अतिशय सुंदर मशिदी व मकबरे बांधण्यात आले. गुलबर्गा व बिदरमधील अनेक मशिदी, मकबरे, मदरसे, सराया, गड व किल्ले, जलाशय याची कल्पना देतात. दौलताबाद येथील चांदमिनार, चिनीमहाल, बिदर व गुलबर्गातील मशीदी, हजरत गेसूदराज यांचा दर्गा, बिदरमधील किल्ला, तर्कशमहाल, गगनमहाल, रंगीन महाल व मेहमूद गवानचा मदरसा, दक्षिणेतील उत्तम स्थापत्याचे प्रतीक आहे. बहामनी राज्य संपुष्टात आल्यावर विजापूर, अहमदनगर, गोलकोंडा ही राज्ये अस्तित्वात आली. विजापुरामध्ये आदिलशहा राजेंनी अनेक सुंदर व भव्य इमारती बांधल्या. त्यात गगनमहाल, जामे मस्जिद, आसार महाल, मेहेतर महाल व गोलघुमट यांचा खास उल्लेख केला पाहिजे. आठ मजले असलेली व भव्य घुमट परिधान केलेली ही इमारत तिच्या प्रतिध्वनीबद्दल जगात प्रसिद्ध आहे. इब्राहीम आदिलशहा याच्या काळातील मशीद व त्याचा मकबरा किंवा रोजा या दोन इमारती मुस्लिम सौंदर्यकृतीचा उत्तम नमुना आहे. गोळकोंड्यातील किल्ला, हैदराबाद येथील चारमिनारची इमारत व कुतुबशाही मकबरे या सर्वांच्या बांधणीवर इराणी व तुर्की शैलीचा फार मोठा प्रभाव दिसून येतो. इथले स्थापत्यविशारद व कारागीर हे थेट इराण, इराक व मध्य आशियातून समुद्रमार्गाने दक्षिणेत आले. त्यामुळे इथल्या स्थापत्यावर हिंदू शैलीचा विशेष प्रभाव दिसून येत नाही. अहमदनगरच्या निझामशाहीची स्थापना अहमद निझामशहा याने १४८५ मध्ये केली. त्यानंतर अहमदनगर व परिसरात अत्यंत सुंदर इमारती बांधण्यात आल्या. त्यातील फराहबक्श महाल, हस्तबेहस्त बागेतील सोनेरी महाल व चांदबीबीचा महाल या भव्य व सुंदर इमारती आहेत. मुळात हा चांदबीबीचा महाल नसून तो निझामशाही सरदार सलाबतखान यांचा मकबरा आहे. या महालामध्ये खापराच्या नळातून पाणी आणण्यास येत असे. हे सर्व महाल अतिशय सुंदर अशा बगीच्यात बांधलेले होते. येथील काळ्या पत्थरात बांधलेली 'दमडी' मशीद शिल्पसौंदर्याने नटलेली आहे.

**मुस्लिम स्थापत्यातील लष्करी वास्तू व नगररचना**

मुस्लिम सत्ताधीशांचा सर्वात मोठा प्रभाव भारतातील

मध्ययुगीन संरक्षण व्यवस्थेवर पडला. तेराव्या शतकापासून अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत उत्तर व दक्षिण भारतात मुस्लिम राजवटींनी संरक्षणाच्या दृष्टीने अनेक गड व किल्ले बांधले व जुन्या वास्तूंमध्ये त्या काळातील लष्करी डावपेचानुसार आवश्यक ते बदल केले. हे सर्व गड, कोट व किल्ले मध्ययुगीन लष्करी व सुरक्षा व्यवस्थेची कवचकुंडले होती. याची साक्ष दिल्लीतील सीरी, तुघलकाबाद, फिरोजशहा कोटला, पुराना किल्ला व आग्रा, अजमेर, कलिंजर, लाहोर, अलाहाबाद, जौनपूर, मांडवगड, धार व आसिर गड हे उत्तरेतील किल्ले देतात. दक्षिणेत त्यांचे अनुकरण औसा, रायचूर, परेंडा, दौलताबाद, नलदुर्ग, गाविलगड, गुलबर्गा, बिदर, गोळकोंडा वरंगळ व श्रीरंगपट्टण या किल्ल्यंत दिसून येते.

मध्ययुगात लष्करी स्थापत्याला सर्वाधिक महत्त्व देण्यात आले. बहुतेक किल्ल्यांची बांधणी भौगोलिक व स्वाभाविक परिस्थितीनुसार करण्यात येत असे. किल्ल्यांना दुस्तरीय व त्रिस्तरीय तटबंदी असे. तसेच किल्ल्यांना चहूबाजूंनी वेढलेले व पाण्याने भरलेले रुंद खंदक असत. बाहेरच्या रिंगणातील भरपूर रुंदीची तटबंदी, टेहेळणी बुरुज, संरक्षण बुरुज, महाद्वारे, दारूची, धान्याची व शस्त्रागारांची कोठारे तसेच शत्रूला चकवा देणारी खास संरक्षण व्यवस्था किल्ल्याचे महत्त्व वाढवीत. दारूगोळ्याचा वापर सुरू झाल्यानंतर किल्ल्यांची मजबुती आणखी वाढवण्यात आली. आग्रा, दिल्ली, लाहोर, अलाहाबाद व अजमेर येथील मोगलांचे किल्ले, संरक्षण व्यवस्थेतील अंतिम शब्द होते.

आग्र्याचा किल्ला व दिल्लीचा लाल किल्ला यात मुगल बादशहा स्वत: राहत असत. या किल्ल्यात खाजगी निवासस्थाने, दिवाने आम, दिवाने खास, प्रशासकीय कार्यालये व उद्याने बांधण्यात येत असत.

आश्चर्य म्हणजे दिल्ली, जौनपूर, बंगाल, माळवा वगैरे सुलतानांच्या कालखंडात मुलकी स्वरूपाच्या स्थापत्यावरही लष्करी वैशिष्ट्यांचा साचेबंद प्रभाव दिसून येतो. या काळातील मशिदी व मकबरे यांचे बांधकाम मर्दानी थाटाचे व छोट्या गढीसारखे दिसून येते. दिल्लीतील गियासुद्दीन तुघलकचा मकबरा, खिडकी मशीद, सुलतान गढी कलान व बेगमपुरा येथील मशिदी, जौनपूरमधील अटाला, अदिना, जामा व झांजरी मशीद, बंगालमधील चमकाती, तांतीपुरा, छोटा सोना या मशिदी एखाद्या गढीसारख्या वाटतात. त्यांच्या मनोऱ्यांची रचना किल्ल्यांच्या बुरुजासारखी दिसून येते. स्थापत्य सौंदर्याचा येथे अभाव दिसून येतो. शेरशहाचा ससाराम येथील मकबराही भव्य गढीसारखा वाटतो.

**मुस्लिम स्थापत्याचा तिसरा टप्पा**

या टप्प्यात उत्तरेतील मोगलांच्या इमारती व दक्षिणेतील बिजापूर, गोलकोंडा इत्यादी शहरांतील वास्तू यांचा समावेश होतो. या सर्व ठिकाणी सर्वस्वी स्थानिक साधनांचा वापर करण्यात आलेला दिसून येतो. स्थानिक खाणींतील शुभ्र संगमरवर, लाल, पिवळ्या व काळ्या वालुकाश्म दगडांचा व दक्षिणेत काळ्या बसाल्टचा वापर प्रामुख्याने करण्यात आला. सर्व इमारती स्वतंत्रपणे बांधण्यात येऊ लागल्या. या काळात मुस्लिम स्थापत्याचा अभूतपूर्व विकास झालेला दिसून येतो. या वास्तूंमध्ये प्रमाणबद्धता, डौल, संतुलन व भव्यता जागोजागी दिसून येते. या इमारतींमध्ये भव्य राजवाडे, प्रशासकीय इमारती, मकबरे, हमरस्ते, सराया, स्नानगृहे, विश्रामगृहे, उद्याने, बाजार व चौराहे बांधण्यात आले. वाढत्या लोकसंख्येप्रमाणे नगररचनेतही आमूलाग्र बदल घडून आले. भारतातील मुस्लिम स्थापत्याच्या तिसऱ्या टप्प्यात इमारती, वास्तू व तंत्रज्ञान यांचा अभूतपूर्व विकास झाला. मुस्लिम स्थापत्य अधिक स्वयंपूर्ण व स्वयंसिद्ध झाले. या काळात उत्तरेत लोदी, अफगाण, मुगल व दक्षिणेत आदिलशाही व कुतुबशाही सत्तांनी अप्रतिम वास्तूंची निर्मिती केली. या टप्प्यात मोगलांच्या स्थापत्यवैभवाला कमालीचा बहर आला. अकबरापासून शहाजहानपर्यंत मोगल बादशहांनी आपल्या विचारांची व कल्पनाविलासाची छाप स्थापत्यकृतींवर बसवली. अकबराने फतेहपूर सिक्रीसारखी लाल वालुकाश्मात नूतन स्थापत्यसृष्टी निर्माण केली. वयाच्या अवघ्या अठ्ठाविसाव्या वर्षी फतेहपूर सिक्रीची नगररचना करून स्थापत्य इतिहासात नवा उच्चांक निर्माण केला. अकबर दूरदर्शी होता. हिंदू, जैन व मुस्लिम स्थापत्यांतील जे जे सुंदर ते एकत्र आणून स्थापत्यक्षेत्रात राष्ट्रीय एकात्मकतेचे व कलेचे भारतीयकरण सुरू केले. त्याचा राजपुतांशी अनन्यसाधारण संबंध होता. त्यांच्या स्थापत्याचा प्रभाव अकबरावरही पडला जोधाबाई, बिरबलचा महाल, आँख मिचौली व पंचमहाल ही हिंदू स्थापत्याची अमोलिक प्रतीके ठरावी. दिवाने खास किंवा इबादतखाना हे भारतातील सर्व धर्म समभावाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. तुर्की सुलताना व मरियम झमानीचा महाल दिवाने खास, तानसेनची बारादरी यावर तुर्की शैलीचा मोठा प्रभाव दिसून येतो. याच नगरीत त्याने दक्षिणविजय साजरा करण्यासाठी बांधलेला बुलंद दरवाजा, जामे मशीद व शेख सलीम चिश्तीचा मकबरा त्याच्या अचाट कर्तृत्वशक्तीचे द्योतक आहे. आपल्या मृत्यूनंतर चिरंतर आठवण राहावी म्हणून शिकंदरा येथे त्याने बांधलेला स्वत:चा मकबरा होय. अर्थात हा मकबरा बादशहाला

शोभेल असाच त्याचा बाज आहे. लाल वालुकाश्म व त्यावर शुभ्र संगमरवरी घुमटधारी छत्र्यांची बांधणी परीकथेतील राजप्रासादासारखी वाटते. अकबराच्या कारकिर्दीत बांधण्यात आलेली सर्वांत भव्य इमारत म्हणजे हुमायूनचा मकबरा होय. हुमायूनची राणी बेगाबेगम हिने त्याच्या मृत्यूनंतर हा मकबरा दिल्ली येथे बांधला (इ. स. १५७४). या मकबऱ्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा घुमट दुहेरी बांधणीचा असून संपूर्ण इमारत इराणी व तुर्की शैलीत बांधण्यात आली आहे. मात्र राजपूत शैलीच्या घुमटधारी छत्र्यांचाही संतुलित वापर येथे केलेला दिसून येतो. स्थापत्य इतिहासकार बियांका मारिया अलफेरी यांच्या मते मकबऱ्याच्या अष्टकोनी बांधणीची कल्पना हिंदू हेमकूट मंदिरावरून घेतलेली असावी. पण हे विधान योग्य वाटत नाही.

जहांगीरच्या काळात आग्रा व लाहोरला उत्तम वास्तू बांधल्या गेल्या. त्यातील इत्तेमादुदौलाचा मकबरा व अशरफखान या सरदाराचा चीनी का रोजा ही महत्त्वपूर्ण उदाहरणे आहेत. मिर्जा गियास बेग ऊर्फ इत्तेमादुदौला (साम्राज्याचा आधारस्तंभ) हा नूरजहानचा पिता होता.

शहाजहानचा काळ म्हणजे मुगल स्थापत्याच्या अत्युच्च उत्कर्षाचा सुवर्णकाळ आहे. आग्रा व दिल्ली येथील इमारतीत त्याने आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. ते म्हणजे लाल वालुकाश्माऐवजी संपूर्ण शुभ्र संगमरवराचा वापर होय. आग्रा व दिल्लीतील दिवाने आम, दिवाने खास, मुसम्मन बुरुज, खास महाल, रंगमहाल इत्यादी इमारती स्थापत्यसौंदर्याने ओतप्रोत भरलेल्या आहेत. शहाजहानने मुमताजमहालच्या स्मरणात बांधलेला ताजमहाल त्याच्या व्यक्तिगत कल्पनेचा व मुगल कलेचा अंतिम आविष्कार आहे. 'नियतीच्या गालावरील वियोगाचा अश्रू' असे ताजमहालचे यथार्थ वर्णन करण्यात आले आहे. शहाजहानने बांधलेला आग्र्याचा व दिल्लीचा लाल किल्ला, जामा मशीद, मोती मशीद, नगीना मशीद ही त्याच्या सार्वभौमत्वाची प्रतीके ठरावीत. शहाजहाननंतर औरंगजेबाच्या काळात मोगल स्थापत्यवैभवाला उतरती कळा लागली. फतेहपूर सिक्री, लाहोर व इतर ठिकाणी अकबराने शिल्पाकृतीत व चित्रात मानवी व पशुपक्ष्यांच्या आकृतींना मानाचे स्थान दिले होते. आपल्या कर्मठ वृत्तीने त्यांचे चेहरेमोहरे विद्रूप व उद्ध्वस्त करण्याची कामगिरी औरंगजेबाने केली. त्याच्या कारकिर्दीत त्याचा मुलगा आझमशहा याने आपल्या आईच्या व औरंगजेबाची पत्नी राबिया दुर्रानी हिच्या स्मरणार्थ दक्षिणेत औरंगाबाद येथे बीबीका मकबरा ही इमारत बांधली.




**पाणीपुरवठा व जलसंवर्धन**

मुस्लिम स्थापत्याचे एक महत्त्वाचे अंग म्हणजे त्यांची पाणीपुरवठा व पाणी संवर्धन पद्धती होय! मुस्लिम शासकांनी बहुतेक राजधानीची व इतर शहरे ही नदीकाठी व पाण्याचे भरपूर स्रोत असेल अशा ठिकाणी वसवली. नद्यांचे पाट, कालवे, तलाव, जलाशय, हौद, विहिरी किंवा वाव यांची खास व्यवस्था करण्यात आली. दिल्ली येथील मेहेरौली भागात इल्तुत्मिशने (१२११-१२३६) बांधलेला हौज-ई-शम्सी (हौद) व अल्लाउद्दीन खिलजीने (१२९६-१३१६) बांधलेला हौज-ई-अलाई (हौद) हे मोठे जलाशय तसेच गंधक की बावली, राजो की बैन, उग्रसेन की बावली इत्यादी अनेक मजली व पक्क्या बांधलेल्या विहिरी ही पाण्याची व्यवस्था स्पष्ट करतात. फतेहपूर सिक्रीतील अनुपसागर, अजमेर येथील अनासागर, अहमदाबाद येथील कंकारिया तलाव, मांडूतील मुंज व कपूर तलाव दक्षिणेत विजापूरमधील ताजबावडी यातून पाणीपुरवठा होत असे. अहमदाबादमध्ये सुलतानांच्या काळात अनेक जलाशय, विहिरी किंवा बाव बांधण्यात आले. त्यापैकी बाई हरी व भामारिया या विहिरी जलस्थापत्याच्या दृष्टीने प्रसिद्ध आहेत. दौलताबाद बिदर, गुलबर्गा, अहमदनगर इत्यादी दक्षिणेतील शहरांत मातीच्या खापराच्या जलातून पाणी आणण्याची सोय होती. आग्रा व दिल्लीच्या लाल किल्ल्यात रहाटाने पाणी उंच चढवण्याचे तंत्र प्रशंसनीय होते. पाण्याच्या स्रोताबरोबर मुस्लिम राज्यकर्त्यांनी राजधानी व मोठ्या शहरात सार्वजनिक स्नानगृहे किंवा हमाम बांधली. अमीर उमरावापासून साध्या मुशाफिरापर्यंत आंघोळीची येथे उत्तम व्यवस्था असे. कोकणात चौल, रेवदंडा येथे विजापूरकालीन हमामाची वास्तू अद्यापही दिसून येते. फतेहपूर सिक्री येथील हकीमांचे हमाम, आग्रा व दिल्लीच्या किल्ल्यातील शाही हमाम त्या काळातील वैभवाची साक्ष देतात. जहांगीरच्या काळात हमामाचे स्नानगृह हे रूप बदलून अत्यंत महत्त्वाची गुप्त बोलणी व खलबते करण्याची जागा किंवा 'घुसलखाना' असे नवे नाव त्यांना पडले. स्नानगृहात थंड व गरम पाणी तसेच गरम वाफ अंगावर घेण्याची सोय असे. येथील आराम कक्ष अतिशय कलात्मक पद्धतीने सजवलेले असत.

**शाही उद्याने**

इस्लामी स्थापत्याचे अतिशय आकर्षक अंग म्हणजे उत्तरेत मोगलांची व दक्षिणेत तेथील सुलतानांनी बांधलेली प्रशस्त उद्याने होत. मोगल साम्राज्याचा संस्थापक बाबराने हिंदुस्थानात उत्तम उद्याने नसल्याबद्दल खेद व्यक्त केला आहे. भारतात अतिशय सुंदर व प्रमाणबद्ध उद्याने बांधण्याची परंपरा त्याने सुरू केली. सन १५२६ मध्ये इब्राहिम लोदीचा पराभव केल्यानंतर आग्र्याला यमुना नदीच्या काठी त्याने निसर्गसुंदर असे पहिले उद्यान बांधले. या उद्यानचे नाव बाग-ई-गुल अफशान (फुलांनी बहरलेले उद्यान) असे ठेवण्यात आले. इराणी, तुर्कस्तान व मध्य आशियातील शहरात किंवा राजवाड्याजवळ मोठी उद्याने असत. त्याना चहार किंवा चार बाग असे म्हणत. जमिनीची विभागणी चार, आठच्या चौकोनी तुकड्यांत करण्यात येत असे. त्यांच्या मध्यवर्ती बिंदूवर उंच जोत्यावर हवेसाठी व विश्रांतीसाठी शामियाना बांधण्यात येत असे व त्यांच्या आजूबाजूला फुलांचे ताटवे, पाण्याचे कालवे, पाट, कारंजी, चौकोनी, षट्कोनी किंवा गोलाकार हौद बांधले जात. कृत्रिम धबधबे निर्माण करून टप्प्याटप्प्याने उंचीवरून खाली पाणी सोडले जाई. या छोट्या धबधब्यांच्या पाठीमागे अनेक कोनाडे निर्माण करून त्यात दिवे लावले जात. भारतात सिकंदरा येथील अकबराचा मकबरा, आग्र्यातील इत्तिमादुदौला व दिल्लीतील हुमायूनचा मकबरा हे विस्तीर्ण चहारबागेत बांधण्यात आले आहेत. ससाराम येथील शेरशाहचा मकबरा हा मोठ्या तलावामध्ये बांधण्यात आला आहे. जहांगीर व नूरजहान ही उद्यानांवर अतिशय आसक्त होती. त्यांनी काश्मीरमध्ये बांधलेली शालीमार, निशात व अचबल ही उद्याने जगभरातील पर्यटकांची आवडीची स्थळे आहेत. दक्षिणेतही बिजापूर, गोलकोंडा, व अहमदनगर येथे उद्याने बांधण्यात आली. विजापूरमधील इब्राहिम रोझा, गोल घुमट, गोलकोंड्यातील कुतुबशाही मकबरे व अहमदनगर येथील फराहबाग व हस्तबहिरत बाग ही त्या काळातील प्रसिद्ध उद्याने होती. या उद्यानांतून विविध प्रकारच्या फुलांचे ताटवे, फळांच्या बागा, लहानमोठे वृक्ष, सुगंधी फुलांची वाटिका उभारल्या जात.

भारतातील मुस्लिम स्थापत्य ही संपूर्ण एतद्देशीय शैली आहे. भारताच्या विविध भागांतील स्थापत्यपद्धतींचे प्रवाह एकत्र बांधत तिची निर्मिती झाली. या स्थापत्याच्या विकासाबरोबरच कलेचे भारतीयकरण झाले व विविध पैलू असलेली ती एकसंघ शैली झाली. राष्ट्रीय एकात्मकता व सांस्कृतिक अखंडता या शैलीची महत्त्वाची अंगे ठरावीत.

**डॉ. दाऊद दळवी**
१३/१४ भरत व्हिला, धोबी आळी,
टेंभीनाका, ठाणे-४००६०१
दूरध्वनी (०२२) २५३४५७०६
dawooddalvi123@gmail.com

**साहित्य अकादेमी** प्रादेशिक कार्यालय, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मार्ग, दादर (पूर्व), मुंबई 400014
फोन: 022-24135744, 24147650 E-mail: sahityakademimumbai@gmail.com

## महत्त्वपूर्ण मराठी प्रकाशने

**अजबग्रहाची दंतकथा** रु. 50/-
ताजिमा शिन्जी
अनु. सुलभा कोरे

**निकोबारच्या लोककथा** रु. 60/-
रॉबिन रॉयचौधुरी
अनु. अशोक बेंडखळे

**मौखिक परंपरेतील बालगीते** रु. 50/-
संपादक: मधुकर वाकोडे

**भुलवणाऱ्या गोष्टी** रु. 80/-
विभूतिभूषण बंद्योपाध्याय
अनु. विलास गिते

**निर्बुद्धीचा राज्यकारभार** रु. 60/-
गोपाल दास
अनु. मृणालिनी कामत

**टुनटुनीच्या गोष्टी** रु. 75/-
उपेंद्रकिशोर रायचौधुरी
अनु. नीलिमा भावे

## हिंदी प्रकाशने

**लघुकथा संग्रह (भाग 1 एवं 2)** प्रति भाग रु. 40/-
संपादन जयमन्त मिश्र
अनु. रेखा व्यास

**रवीन्द्रनाथ का बाल साहित्य** प्रति भाग **(भाग 1 एवं 2)** रु. 35/-
संपादन लीला मजुमदार, क्षितिश राय
अनु. युगजीत नवलपुरी

**गोसाईं बागान का भूत** रु. 30/-
शीर्षेन्दु मुखोपाध्याय
अनु. अमर गोस्वामी

**निर्बुद्धि का राज-काज** रु. 30/-
गोपाल दास

**चन्द्र पहाड़** रु. 30/-
बिभूतिभूषण बंद्योपाध्याय
अनु. अमर गोस्वामी

**अचरज ग्रह की दन्तकथा** रु. 40/-
ताजिमा शिन्जी
अनु. हरीश नारंग

**जंगल-कथा** रु. 40/-
ओरासियो किरोगा
अनु. प्रीति पंत

**सुकुमार राय चुनिन्दा कहानियाँ** रु. 30/-
अनु. अमर गोस्वामी

**जापान की कथाएँ** रु. 40/-
साइजी माकिनो

**बुलबुल की किताब** रु. 35/-
उपेन्द्रकिशोर रायचौधुरी
अनु. स्वप्ना दत्त

**भारतीय बाल कहानियाँ (भाग : चार)** रु. 40/-
संपादक : हरिकृष्ण देवसरे

**प्रेमचंद** रु. 50/-
कमल किशोर गोयन्का

**कृष्ण खटवाणी** रु. 40/-
रश्मि रमानी

## English Publications

**The Cosmic Explosion** Rs. 30/-
Jayant V. Narlikar
Tr. Sujata Godbole

**Gotya** Rs. 25/-
N.D. Tamhankar
Tr. Surekha Panandikar

**The Flying Doll** Rs. 40/-
Kalvi Gopalakrishnan
Tr. Indira Ananthakrishnan

**Anna Bhau Sathe** Rs. 40/-
Bajrang Korde

**समकालीन भारतीय साहित्य Single Copy : Rs.25, 1 Year: Rs.125, 3 Years: Rs.350**
Indian Literature **Single Copy : Rs. 50, 1 Year: Rs. 250, 3 Years: Rs. 650**

# भिन्न प्रकृतीचे दोन समाजव्रती

**अभय सदावर्ते**

कमलताई काकोडकर आणि डॉ. अब्दुल कलाम ही दोन्ही प्रकाशाची बेटे. कमलताईंच्या आयुष्यावर महात्मा गांधींच्या सहवासाचे आणि आशीर्वादाचे सोनपाणी शिंपडलेले, तर कलामांना द्रष्टे वैज्ञानिक आणि भारतीय आवकाश संशोधान कार्यक्रमाचे संस्थापक विक्रम साराभाई यांच्यासह काम करण्याचा दुर्मिळ अनुभव लाभलेला. कमलताई म्हणा वा कलाम, यांच्या आयुष्यांना झालेल्या या मोठ्या व्यक्तिमत्त्वांचा स्पर्श आणि सहवास, दोघांच्याही आयुष्याच्या दृष्टिकोनात आमूलाग्र फरक करता झाला. कमलताई देवघरातल्या समईसारख्या शांत, तर कलाम आपण शस्त्रसंपन्न असलेच पाहिजे, या दृष्टिकोनाचे आग्रही समर्थक. दोन टोकांची भिन्न व्यक्तिमत्त्वे. मात्र तरीही, आपण समाजाचे काही देणे लागतो, ही मूलभूत जाणीव या दोघांच्या मनाच्या तळाशी एखाद्या जिवंत झऱ्यासारखी वाहती राहिलेली दिसते. भिन्नत्वातले अभिन्नत्व ते हेच!

## कमलताई – एका जीवनव्रताची सांगता

ठाण्यातील गर्दीच्या रस्त्यातून आम्ही वाट काढीत चाललो होतो. सकाळचे छान ऊन डोईवर होते खरे, पण त्याला अंगावरच्या घामाच्या धारांची साथ मात्र नकोशी होती. मध्यमवर्गीयांच्या एका सोसायटीत आम्ही आलो. सुरक्षाविषयक तपासणी होऊन, अकरावा मजला गाठला.

एक साधीशी, लहानसर सदनिका. अगदीच साधी. आपल्या घरात आपली आई किंवा वहिनी फरशी पुसते तशाच फरशी पुसणाऱ्या काकोडकर वहिनी सामोऱ्या आल्या. आयुष्यभर मुंबई महापालिकेच्या मराठी शाळेत विज्ञानाची शिक्षिका म्हणून नोकरी करणाऱ्या, प्रसन्नवदना वहिनींच्या अंगावर साधी सुती साडी. हा पहिला धक्का होता. भारतीय अणुऊर्जा आयोगाच्या माजी अध्यक्षांच्या स्वत:च्या सदनिकेत पाहिलेले दृश्य अनोखे होते. माझ्या मनातले कल्पनाचित्र चांगलेच हिंदकळले!

बस, कामाच्या गडबडीत तू येणार हे विसरलेच होते मी!

आमचे बोलणे होत असतानाच एक विलक्षण काटक वृद्धा, मंद चालीने आमच्या बोलण्यात सहभागी झाली. या कमलताई काकोडकर; डॉ. अनिल काकोडकरांच्या मातुश्री. वयाची नऊ दशके ठळकपणे उलटून गेलेली होती. साऱ्या शरीरभर वार्धक्याची मऊ-मुलायम शाल, तिच्या साऱ्या वैशिष्ट्यांसह आपले अस्तित्व दाखवीत असली, तरी कान आणि डोळे उत्तम होते. चालण्यात मंदपणा होता. मात्र वाणी स्वच्छ होती. रुंद कपाळ, आणि उभ्या आयुष्याची रंगपंचमी



आता खेळून झाली आहे हे दर्शवणारा निखळ पुरावा म्हणजे डोळ्यांतला समत्व आणि स्निग्ध भाव; क्षणभर नकळत स्थिरचित्त झालो.

ये बस, कमलताई म्हणाल्या आणि गप्पा सुरू झाल्या. आवाजात चढउतार होता. आवश्यक तेथे खोचही होती. आणि विशेष म्हणजे नाशिकबद्दलचा जिव्हाळा होता. ताई कधीकाळी नाशिकला आल्या असाव्यात, त्यावेळचे नाशिक, ती स्वच्छ गोदावरी हे सारे सारे त्यांना लख्ख आठवत होते. त्यांच्या अतीव प्रेमाच्या आणि घनिष्ठ संबंध असलेल्या नाशिकमधील कुटुंबाची त्यांना अद्ययावत माहिती होती. जुन्या कुटुंबीयांचे संदर्भ एकेरी नावाने येत होते. बोलण्यातली अकृत्रिम आपुलकी पाटाच्या पाण्यासारखी शांतपणे वाहताना पाहणे, हा अनुभव हृद्य होता! आयुष्याच्या मावळतीलाही उगवतीच्या काळातील घनिष्ठ परिचितांबद्दल ओथंबून वाहणारी कृतज्ञता आजच्या कोरड्याठाक आणि रूक्ष मानवीसंबंधांच्या पार्श्वभूमीवर एखाद्या सुवर्णरेखेसारखी चमकत होती.

का कुणास ठाऊक, पण ताईंशी बोलताना मला पु.ल. देशपांड्यांच्या हरितात्याची सारखी आठवण येत होती. पिशवीतून 'एक धागा सुताचा' या ताईंच्या आत्मवृत्ताची प्रत काढताच, त्या चंद्रशांत डोळ्यांतून पाझरणारा आनंद कुणाही लहानग्याच्या निरागस हास्याशी स्पर्धा करणारा होता.

कमलताईंचा जन्म १९१४ मधला; उज्जयनीचा होता. हळूच, त्याकाळची उज्जयनी आठवते का असे विचारले मात्र, त्यांना प्रश्नातली चेष्टा जाणवली असावी. डोळ्यांनी दाबत त्या उद्गारल्या, फार शहाणपणा करू नकोस! ताई अशा म्हणाल्या मात्र, भरून आले. खूप दिवसांनी कुणा अधिकारी व्यक्तीने समज दिली; हे समाधान वेगळे होते. तत्कालीन मध्यप्रांतातल्या बडवाणीला ताईंचे सुरुवातीचे शिक्षण झाले. कारण वडील तिथेच शिक्षक होते. पुढे मामांनी महात्मा गांधींच्या वर्धा येथील सेवाग्राम आश्रमात आणले आणि तारुण्याच्या उंबरठ्यावर असणाऱ्या ताईंच्या आयुष्याला स्वत: महात्मा गांधी आणि कस्तुरबा यांचा परीसस्पर्श झाला. स्वावलंबन आणि काटकसर यांचे संस्कार खोलवर रुजले. सत्यनिष्ठा अंगी धर्म म्हणून बाणवली गेली. साध्यसाधन विवेकाचा विचार हा आयुष्याचा पाया ठरला.

'एक धागा सुताचा' या आत्मवृत्तात दिसणाऱ्या ताई आणि समोर असणारी वृद्धा यामध्ये वय सोडले तर काहीही अंतर नव्हते. गप्पा मारताहेत असा सूर, आणि आयुष्याची गोधडी मी ही अशी शिवण्याचा प्रयत्न केला, हा प्रांजळपणा सारखाच दिसत होता. इतकी निरामयता आणि अहंकारविहीनता ही सामान्य गोष्ट नव्हे.

वर्ध्याच्या आश्रमात राहणाऱ्या ताई आणि समविचारी असणाऱ्या पुरुषोत्तम काकोडकरांचा विवाह, बाबूमामांच्या पुढाकाराने आणि गांधीजींच्या आशीर्वादाने झाला.

काकोडकर पतिपत्नींचा १९४२ च्या आंदोलनात क्रिय सहभाग होता. नित्याची कामे तर होत असतच, पण मुंबईतील लालबागच्या त्यांच्या घरातून गुप्तपणे रेडिओ केंद्रही चालवले जात असे. सानेगुरुजींना मी माझ्या घरी अनेकदा जेवू घातले आहे, याचे ताईंना विलक्षण समाधान होते. याच काळात म्हणजे १९४३ मध्ये अनिल काकोडकरांचा जन्म झाला. याच सुमाराला गोवा मुक्तिसंग्रामाच्या तयारीचाही आरंभ झाला. त्या मोहिमेचा एक भाग म्हणून पुरुषोत्तम काकोडकर गोव्यात दाखल झाले. पोर्तुगीज सरकारने त्यांना नऊ वर्षांची शिक्षा ठोठावली. साहजिकच स्वत:चा लहान मुलगा घेऊन ताईंची जगण्याची धडपड सुरू झाली.

आदरणीय ताराबाई मोडकांकडे ताईंनी बालशिक्षणाचे धडे गिरवले आणि आपल्या माहेराच्या म्हणजे बडवाणीच्या जवळ, खरगोन इथे त्यांनी बाल शिक्षानिकेतनची स्थापना केली. हे निकेतन आजही सुरू आहे. यामागची आपली भूमिका स्पष्ट करताना ताई म्हणाल्या होत्या, केवळ कारकुनी करून उदरभरण करणे, हे आयुष्य मला मानवणारे नव्हतेच. समाजाचे देणे फिटले पाहिजे म्हणून मी शाळा सुरू केली.

दरम्यान, १९५६ मध्ये पुरुषोत्तम काकोडकरांची सुटका झाली आणि ताई त्यांच्यासह राहण्यासाठी मुंबईत परतल्या.

मात्र, पतिपत्नीमध्ये अंतर पडू लागले. ते वाढले. तशातच त्यांच्या मुलीचा जन्म झाला. ती म्हणजे आजची डॉक्टर सुषमा गांगल.

पुरुषोत्तम काकोडकरांनी सांसारिक जबाबदारी झटकताच, ओढाळ वयाचा मुलगा आणि लहान मुलगी यांच्यासह जगण्याची ताईंची झुंज परत एकदा सुरू झाली. काकोडकर पुढे दिल्लीच्या राजकीय वातावरणात रमले. मात्र, त्यानंतर ताई आणि काकोडकर कधीही एकत्र आले नाहीत.

काळ कुणासाठीच थांबत नसतो पण उलटणाऱ्या काळाच्या खुणा माणसांवर कायम राहतात. ताईंसारख्या सत्त्वशील, स्वाभिमानी आणि स्वतत्त्वनिष्ठ जीवनावर तर काळ अधिक खोलवर आघात करतो, असा इतिहास आहे. ताईंच्या आत्मवृत्तात हे कथन येते तेही अलिप्तपणे आणि कमालीच्या संयमी भाषेत. गप्पांच्या ओघात याही विषयाला स्पर्श झाला. तेव्हा ताई जे काही म्हणाल्या ते कुणाही विचारी माणसाने विसरू नये. ताई म्हणाल्या; ज्याला समाजकार्य किंवा देशकार्य करायचे असेल त्याने शक्यतो संसारात गुरफटू नये, उगाच फरफट होते. साऱ्या गप्पांमधला शांतपणा या एका वाक्याने डहळून टाकला. मनात चर्र झाले. उद्वेगाच्या कुठल्याशा क्षणी लोकमान्यांच्या पत्नी सत्यभामाबाई म्हणाल्या होत्या; अशा पुरुषांनी संसार करावेत कशाला?

सुषमाचा जन्म नुकताच झालेला; बाळंतपणात बाई काहीकाळ का होईना असहाय होते. अटळ असते ते! त्याकाळात तिच्या कुटुंबाने तिला समजून घ्यावे आणि गरज पडताच समाजाने तिला आधार द्यावा, ही तिची अपेक्षा आपण का समजून घेत नाही; ताईंच्या प्रश्नाचा बाण कानात घुसला. उत्तर देता आले नाही.

परिस्थितीशरण ताई नव्हत्याच. विलक्षण हिमतीने, जिवावरची दुखणी काढून त्या ताठ मानेनं जगल्या. भारतीय अणुऊर्जा आयोगाच्या प्रमुखाची आई म्हणून त्यांचा योग्य तो मानसन्मान झाला. एका अविरत कष्टाच्या यात्रेची सुफळ सांगता झाली.

ताईंनी आपल्या आत्मवृत्ताला जीविका असे संबोधले आहे. जीविका म्हणजे जीवनाम. त्याच्या अखेरी त्या म्हणतात, ते दिवस संघर्षाचे होते आणि मंतरलेलेही! स्वातंत्र्यानंतर देश, राजकारण आणि माणसे हे सारेच बदलले. आम्हाला घडवणारी पिढी प्राय: काळाच्या पडद्याआड गेली आहे. उरल्या माझ्यासारख्या काही, त्या भारलेल्या दिवसांना



उजाळा देणाऱ्या... पराकोटीचा संघर्ष, धेयवादाची पदोपदी घेतली गेलेली परीक्षा आणि देशसेवेची आंतरिक ऊर्मी यांनी भरलेली ही जीविका...

येऊन बराच वेळ झाला होता. निरोप घेत पाठ वळवली. तेवढ्यात ताई म्हणाल्या, वत्सलेच्या मुलानातवांना माझा आशीर्वाद सांग! मला वाटते, अरविंद आणि अनिल तसे समवयस्कच असावेत. वत्सला आणि मी आश्रमात एकत्र होतो असे वाटते, नक्की आठवत नाही.... हा उल्लेख नाशिकच्या दैनिक गांवकरीचे मालक असणाऱ्या पोतनीस कुटुंबीयांचा होता. मघाशी चमकलेल्या जिव्हाळ्याच्या सुवर्णरेखेचे हे पुन:दर्शन विलोभनीयच म्हटले पाहिजे.

काही दिवसांपूर्वी ताईंनी अखेरचा श्वास घेतला. नव्याण्णव वर्षांच्या एका जीवनव्रताची सांगता झाली. उंच आणि निर्जीव इमारतीत राहणाऱ्या खुज्या माणसांच्या जगातील, मनाने एका पर्णकुटीत राहणाऱ्या विलक्षण शुद्ध आत्म्याला नमन करता आले, याचे अप्रूप पामरे काय सांगावे?

# कलाम नावाचा कळवळा

त्या घटनेला एका दशकाच्या वर काळ झाला. काळाचे बरेवाईट परिणाम शरीर आणि मनावर अटळपणे झालेले आहेत, हे नाकारता येणे शक्य नाही. पण आज अधिक निबर झालेल्या मनात आणि शुष्क झालेल्या शरीराभोवती रिंगण धरून नाचणारा तो अनुभव अजूनही तितकाच ताजा, निर्व्याज आणि प्रेरणादायी आहे असे जाणवते, हे मात्र नक्की!

ती उन्हाळ्यातली एक तप्त दुपार होती. चेन्नईतल्या गर्दीने उतू जाणाऱ्या रस्त्यांतून काही मित्रांसह मी अण्णा विद्यापीठाकडे निघालो होतो. लाल पाषाणाच्या त्या घरंदाज इमारतीत असणाऱ्या लहानशा खोलीकडे आम्ही वळलो, समोर विद्यापीठाचे मैदान; विद्यार्थ्यांची गजबज आणि मोठ्या आवाजातली कानाला अनाकलनीय भाषा. खोलीच्या बाहेर सज्जात उभा असताना, अचानक हास्याचा फवारा उडाला. मनावरचे दडपण दूर सारीत मी सहज तिकडे पाहिले. फार उंची नाहीच; ठेंगणी अंगयष्टी, डोईवर काही काळे आणि बरेच पांढरे लांबसडक केस, हातात डस्टर, दोन्ही हात खडूच्या भुकटीने भरलेले कलाम आपल्या विद्यार्थ्यांसह हास्यविनोद करीत होते.

तेव्हा ते सरकारी नोकरीतून निवृत्त झाले होते आणि तरुण मुलांचा सहवास मिळावा म्हणूनच केवळ या विद्यापीठात मानद प्राध्यापक झालेले होते. आसपास सुरक्षाव्यवस्था होतीच पण त्याचा जाच किंवा देखावा मात्र नव्हता. स्वागतकक्षातून जवळून जाताना कलमांची मनस्वी शिट्टी सुस्पष्टपणे ऐकू आली होती.

काही मिनिटांतच मला आत जाण्याची परवानगी मिळाली. तर तू अभय; दाक्षिणात्य इंग्रजीत खोल, तपकिरी आणि मोठाले डोळे माझा वेध घेत बोलते झाले. पाठोपाठ एक निर्व्याज हसू. भारताचा हा एक नाणावलेला शास्त्रज्ञ समोर होता. कुठलाही रुबाबदारपणा नाही, राजबिंडे व्यक्तिमत्त्व नाही. ते बोलत होते, तेही शांतपणे. दोन वाक्यांतले अंतर लक्षात येण्याइतपत मोठे होते.

काय होते आहे हे कळण्याआधीच त्यांनी माझ्या हाताला स्पर्श केला. लक्ष कुठे आहे तुझे; प्रवासाने दमलास की काय? शाळेच्या वर्गात असताना गुरुजी समज देत तो वर्ग, ती कौलारू शाळा, डोईवरची टोपी... एका पळभरात डोळ्यांपुढून सरकले.

चुकलेच माझे. पण आपले वेगळेच चित्र डोळ्यांपुढे होते, त्या धक्क्यातून सावरायला थोडा वेळ लागला, मी संकोचत म्हणालो. आता मात्र सर मोकळेपणाने हसले. वातावरणात खेळकरपणा आला. हे बघ, मला भूक लागली आहे. तुला जेवायचे का माझ्या बरोबर? नाही आपण जेवा, मी बाहेर थांबतो. मी उठून उभा राहिलो. लांबसडक बोटे असणारा त्यांचा सावळा हात खांद्यावर स्थिरावला. तू थांब इथेच. अरे, मला भूक अजिबात निघत नाही. काय करू, आईची यावरून बऱ्याचदा बोलणी खात असे मी. त्या तपकिरी खोल डोळ्यांत आठवणींचे गलबत डोलल्याचा भास झाला.

सर एकीकडे जेवत असताना, अनेक विषय बोलण्यात येत होते. बोलणे तसे मोठ्या आवाजात आणि मोकळे. मात्र बोलण्याचा घाट नखशिखांत शिक्षकी असला तरी प्राध्यापकी नव्हता. आपण बोलतो आहोत ते समोरच्याला नीट समजते आहे ना; यावर त्यांचे बारीक लक्ष होते. समोर असलेल्या माझ्या मनातली चलबिचल माझ्याही आधी त्यांना कळत असे. तसे काही झाले की, तुला समजलेले दिसत नाही, परत एकदा समजावतो असे म्हणत. सर मनकवडे तर नाहीत ना; हा मला आजही पडलेला प्रश्न आहे.

बोलताना अचूक इंग्रजी शब्द वापरला जावा, याबद्दलची त्यांची दक्षता लक्षात येण्यासारखीच होती. त्यांचे एक पुस्तक मी मराठीत करीत होतो, त्याबद्दल परवानगी देताना इंग्रजी प्रकाशक खळखळ करतो आहे, असे मी त्यांना भीतभीत सुचवले मात्र; सरांचा हसरा चेहरा स्थिर झाला. जवळच असणाऱ्या फोनवरून पलीकडे दिल्लीला उंच आवाजात समज दिली गेली, की या मुलाच्या पत्राला तुम्ही उत्तर पाठवा. खोलीतले क्षणात बदललेले वातावरण सगळ्यांच्याच लक्षात आले.

सर, तुम्ही नाशिकला यावे असे वाटते.

नक्कीच, पण फक्त शाळकरी आणि तरुण मित्रांना भेटायला येईन. समारंभ, हारतुरे नकोत – कळलं?

तर माझी आणि कलामांची ही पहिली भेट. माझ्या लक्षात राहिलेत, ते त्यांचे उत्सुकतेने ओथंबणारे डोळे आणि वागण्याबोलण्यातली कळकळ!

पुढे गोष्टी झपाट्याने घडल्या. सर राष्ट्रपती झाले. साहजिकच, त्यावेळी ते नाशिकला येऊ शकले नाहीत, ही चुटपुट आजही मनात आहे.

मी कलामांचे पुस्तक मराठीत करतो आहे, हे एव्हाना जवळच्या मित्रमंडळींसह परिचितांपर्यंत पोहोचले होते. त्या काळात घरातल्या फोनला उसंत नव्हती. दरम्यान कलामांच्या

पुस्तकाचे काम संपत आले होते आणि एक दिवस पलीकडून विचारणा झाली; राष्ट्रपतींच्या शपथविधी समारंभाचे आपण निमंत्रित आहात... साहेबांच्या वैयक्तिक निमंत्रितांच्या यादीत तुमचे नाव आहे!

हा मला सुखद धक्का होता. निर्णय तातडीने कळवायला हवा होता. युधिष्ठिराच्या रथासारखा मी हवेत उचललो गेलो.

क्षमा करा, साहेबांचे काम अद्याप पूर्ण व्हायचे आहे (मराठी अनुवादाचे) तेव्हा काम पूर्ण होताच, मी राष्ट्रपती महोदयांची भेट मागितली तर ती मिळावी, एवढीच विनंती आहे.

मित्रांना ही बातमी कळताच सगळ्यांनी मला वेड्यात काढले. मित्रांचे काही चुकले होते, असे मला आजही वाटत नाही.

राष्ट्रपतीभवनाच्या स्वागतकक्षात उभा होतो. सरकारी अधिकारी योग्य त्या सूचना देत होते. राष्ट्रपतींनी मुलाखतीला दिलेली वेळ टळून गेली होती. साहजिकच मी अस्वस्थ होतो.

राष्ट्रपतींबरोबर कुणी आहे का? मी चुळबुळ करीत विचारले.

होय, आपले भूदलप्रमुख....

काही वेळाने अतिशय अदबीने मला राष्ट्रपतींच्या कक्षात नेण्यात आले.

काय, कसा आहेस? चेन्नईतला तो परिचित आवाज मी विसरलो नव्हतोच.

यावेळी, डोक्यावर इतर वेळी मुक्तपणे विहरणारे केस आणि चापूनचोपून बसवलेले होते. अंगात आकाशी रंगाचा सदरा. मी अंदाज घेत असतानाच सर उठून उभे राहिले आणि एका विलक्षण आत्मीयतेने त्यांनी दोन पावले पुढे येत मला थोपटले. राष्ट्रपतींच्या कर्मचारीवर्गाच्या डोळ्यांतले आश्चर्य आजही मला दिसते आहे.

विषय डॉक्टर वसंत गोवारीकरांकडे वळला. माझ्या मराठी अनुवादाला त्यांची प्रस्तावना होती.

मी आणि वसंत इस्रोतले मित्र आहोत. कसे आहेत वसंत आता? बऱ्याच दिवसांत भेट नाही.

एव्हाना राष्ट्रपतींच्या मराठी विभागाचे प्रसिद्धी सचिव वाकणकर आले होते. मला जरा वसंताच्या प्रस्तावनेचा सारांश सांग, सचिवाला आज्ञा झाली.

आजुबाजूला पुस्तकेच पुस्तके, दुसरीकडे लॅपटॉप. एका ट्रेमध्ये पत्रे होती, अक्षर लहान मुलांचे होते. काही चित्रे रंगीत, काही साधी आणि काही कशीही. बोलत असतानाच सरांचे एका बाजूला या चित्रांवर सह्या करणे सुरू होते. प्रत्येक चित्रावर 'विथ लव्ह फ्रॉम कलाम'! मला हसू आवरेना.

अरे, हसतोस काय! इतके निर्व्याज लिखाण दुसरे कुठलेच नसते. मी अगदी आवडीने वाचतो!

एक पत्र त्यांनी पुढे केले. नेमके ते मराठी होते. सांग बघू या पत्रात काय आहे? आता माझी पाचावर धारण बसली. एक तर लहान मुलीचे मराठी, त्याचे इंग्रजी रूपांतर, पण आता पर्याय नव्हता.

सर, ही मुलगी तुम्हाला सांगते आहे, आजोबा, पाऊस का पडतो हे मी तुम्हाला सांगते. कारण समुद्राला आंघोळ करायची असते! पुढे तिने रेखाटलेले चित्र होते. सरांचे डोळे एका निखळ आनंदाने न्हाऊन निघाले आणि उत्स्फूर्तपणे ते म्हणाले, याला म्हणतात कल्पनाशक्ती! त्यांना मराठी येत नाही, तरी बराच काळ कौतुकाने ते पत्र त्यांनी न्याहाळले. त्यांना आजुबाजूच्या जगाचा विसर पडला होता.

एकदा सर मुंबईत येणार होते. राष्ट्रपतींचे सगळे कार्यक्रम उरकता उरकता रात्र झाली. आम्ही दहा-पंधरा जण थांबून होतो; आणि राष्ट्रपती आले. त्यांचा धावपळीचा दिवस संपला असावा. त्यांची वेळेची ओढाताण आता सवयीची झाली होती. सरांच्या चेहऱ्यावर नाही म्हटले तरी थकवा होता, थोडे त्रासलेही असावेत.

तर मित्रांनो, मी अंधांसाठी एक सॉफ्टवेअर करतो आहे आणि म्हणून तुम्हाला बोलावले आहे. नंतर जवळजवळ पाऊण तास ते या त्यांच्या प्रकल्पाबद्दल भरभरून बोलत राहिले. त्यांच्या दृष्टीने सोप्या भाषेत, तर माझ्यासारख्या संगणकशत्रू असणाऱ्याच्या डोक्यावरून जाणारे.

सांग तुला काय समजले? बोलणे संपल्यावर त्यांनी प्रत्येकाला विचारले. प्रश्नोत्तरे होत राहिली. कार्यक्रमाच्या शेवटी, ते म्हणाले, मला माहीत आहे तुम्ही सॉफ्टवेअरमधले नाही आहात पण म्हणूनच मी तुम्हाला बोलावलं, आणि तुम्हाला मी काय म्हणतोय, ते बऱ्यापैकी समजलेलं दिसत आहे. याचा अर्थ मी योग्य दिशेने काम करतो आहे. माझी उमेद वाढवल्याबद्दल धन्यवाद... मी थिजलोच! प्रघाताप्रमाणे आधी राष्ट्रपती आणि नंतर आम्ही सारे बाहेर पडलो. रात्रीच्या अंधारात कलाम नावाचा दिवा वाट दाखवत राहिला, हे नि:संशय!

दिल्लीतील राष्ट्रपतीभवनापेक्षाही मी सरांना मुंबईतच भेटत असे. आम्हा दोघांना ते सोयीचेही ठरे. मात्र त्यांची एक अट असे; भेटीचा उच्चार करायचा नाही आणि सोबत अन्य कुणाला आणायचे नाही.

सरांच्या कविता मूळ, तामीळ या त्यांच्या मातृभाषेत ते

लिहीत असावेत. कारण मला ते नेहमीच इंग्रजीत रूपांतरित केलेल्या कविता दाखवत. आपले पु.शि. रेगे यांना आधी इंग्रजीतच कविता सुचत असे; मग त्याचा ते मराठी अनुवाद करीत, अशी माझी माहिती आहे. कलामांच्या कविता पंडिती वळणाच्या नाहीत. सरळ आणि साध्या- भावना सुस्पष्ट! एक मात्र खरे; सरांमधला शिक्षक कधीही आणि कुठेही लपत नाही. बहुतांश कल्पना लहान मुले, निसर्ग, प्राणीपक्षी यांच्या- भोवतीच गुंफलेल्या असतात.

सर, तुम्ही प्रेमकविता कधी लिहिलीच नाही का; अनेकदा माझ्या मनात डोकावलेल्या या प्रश्नाने शब्दरूप घेण्याची हिंमत अद्याप दाखवलेली नाही, हे मान्य केले पाहिजे!

सर राष्ट्रपती असताना जयपूर आंतरराष्ट्रीय चांद्र परिषद झाली होती. बहुतेक साऱ्या जगातले संशोधक, तंत्रज्ञ आदी तिथे हजर होते. परिषदेचे उद्घाटक आणि भारताचे प्रतिनिधित्व हे कलमांकडेच होते. कुणाही देशाच्या राष्ट्रपतीने संशोधकांच्या परिषदेत, त्यांच्या देशाचे प्रतिनिधित्व करणे, ही नक्कीच दुर्मिळ घटना होती.

उद्घाटनपर भाषणात सुरुवातीलाच कलाम म्हणाले, मी या चांद्र परिषदेला आलो कारण, चंद्रावर माझे प्रेम आहे म्हणून. मी आज कोणत्याही देशाचा राष्ट्रपती म्हणून वा प्रतिनिधी म्हणून आपल्याशी बोलत नाही, तर या जीवनदात्री पृथ्वीचा एक सर्वसामान्य मुलगा, चंद्राबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त करायला उभा ठाकला आहे. चंद्राबद्दल केवळ प्रेमिकांनाच कृतज्ञता वाटावी असे काही नाही. सभागारात टाळ्यांचा कडकडाट आणि हास्याचे कारंजे यांची नंतर बराच काळ लयलूट होत राहिली.

यानंतरचे त्यांचे भाषण हे वैज्ञानिक संदर्भांनी नटलेले आणि चंद्रावरील इंधनाचा आपल्याला कसा उपयोग करून घेता येणे शक्य आहे; इत्यादी तपशिलाने सजलेले होते. त्यात वेगवेगळ्या धर्मांनी केलेल्या चंद्राविषयीच्या कल्पना होत्या, धर्म या संकल्पनेला केलेला स्पर्श होता. एकूणच ती एक बौद्धिक मेजवानी होती, यात वाद नाही.


अभय सदावर्ते डॉ. कलाम यांच्यासोबत

सारी सभा, शांतपणे एका कवीचे म्हणा अथवा विज्ञानाच्या एका विद्यार्थ्याचे म्हणा, ते साधे सरळ कथन ऐकत होती. आणि सरांचा आवाज थोडा वेगळा झाला. भाषणाचा प्रवास त्याच्या अखेरच्या टप्प्यात आला होता. सर शेवटी म्हणाले, हे सगळे खरे, उद्या चंद्रावरही माणूस राहायला जाईलच, तो दिवस फार काही दूर नाही; पण माझ्या बांधवांनो, पृथ्वीच्या ज्या प्रदेशात मी जन्मलो, तिथे पातंजली नावाचा एक योग शिक्षक अंदाजे इसवी सनाच्या पाचव्या शतकात होऊन गेला. त्याने दिलेला इशारा आपण सर्वांनीच ध्यानात ठेवला पाहिजे. एके ठिकाणी तो म्हणतो, सारी पृथ्वी पादाक्रांत केलेल्या मानवाला अंतराळातही आपली सत्ता असावी, ही महत्त्वाकांक्षा आहेच आणि म्हणूनच हे साधकांनो, माझे तुम्हाला सांगणे आहे; पृथ्वीच्या वर असणारे अंतरिक्ष तुमच्या ताब्यात येईलही, पण त्याही आधी तुमच्या मनाचे अंतराळ तुम्ही स्वत:च जिंकणे गरजेचे आहे.

भाषण संपले होते. एका विलक्षण सरळ मनातून उगवलेल्या शब्दांनी सभागार चित्रवत झाले होते.

पाकिस्तानचे राष्ट्रपती भारतात आले होते. त्याच्या आगेमागे सरांच्या 'पुरा' (प्रोव्हायडिंग अर्बन फॅसिलिटीज टू रूरल एरिया) या संकल्पनेवरचे विचार ऐकले आणि रामेश्वरमसारख्या एका खेड्यातील, सामान्य नावाड्याच्या मुलाची कळकळ या देशातील गरिबांचे, तरुणांचे भले करणे हेच आता आपल्या उर्वरित आयुष्यातले कर्तव्य आहे, यात परावर्तित झालेली दिसली. संत रामदासांनी उपभोगशून्य स्वामी

या राज्यकर्त्याला दिलेल्या उपाधीचे प्रत्यक्ष उदाहरण मी पाहिले आहे, असेच हे सगळे आठवताना आज मला वाटते.

पुढे, सरांच्या भेटी क्वचित झाल्या. एकदा धाडसाने मी त्यांना म्हणालो, २०२० मधला आपल्या स्वप्नातला भारत त्यावेळेपर्यंत प्रत्यक्ष उभा राहील? कधी नव्हे ती सूक्ष्म वेदना जाणवली. सरांच्या बोलक्या डोळ्यांना ती लपवून ठेवता आली नाही. माझ्या मुला, सूर्योदय होणारच! तू पाहा. माणसाच्या चांगुलपणावर आणि सर्जनशीलतेवर असणारा माझा विश्वास अभंग आहे. उगाच आपण लहान तोंडी मोठा घास घेण्याचा वृथा प्रयत्न केला की काय; याचा माझ्या मनात असलेला सल आजही कायम आहे.

आता सरांमध्ये राजसत्ता मुरायला लागली असावी. पुन्हा राष्ट्रपती व्हावे ही त्यांची इच्छा, त्यांच्या एकूण व्यक्तिमत्त्वाला छेद देणारीच होती, असे मला वाटते. आताशा सरांचे फोन येत नाहीत. वृत्तपत्रे आणि दूरचित्रवाणीवर दिसणारे सर बघितले की जाणवते, ते युधिष्ठिराचा रथ सदैव पृथ्वीपासून एक अंगुळभर उंचावरून चालत असे, असे म्हणतात. कारण, धर्मराज सत्यनिष्ठ होता, मात्र त्यालाही एकदा मिथ्या बोलावे लागले. नरो वा; कुंजरो वा! त्याच क्षणी धर्माच्या नेहमीच हवेत चालणाऱ्या रथाचे एक चाक या भूमीला टेकले, ते कायमचे!

सर, मला तुम्हाला भेटायचे आहे. त्या भेटीत मी तुम्हाला एक प्रश्न विचारीन म्हणतो. गुरुवर्या, क्षमा करा पण सत्तेचा मोह तुम्हालाही पडावा? म्हणजे देवदूताचे पायही मातीचेच असतात तर! पण सर, तुमच्या डोळ्यांतील ती कळवळ, ती असोशी, ती देवत्वाची साक्ष या मातीच्या पायांपेक्षा अधिक महत्त्वाची आणि प्रेरणादात्री आहे. एका चाकरमानी आणि रखरखीत आयुष्याच्या वाटेवर त्या सर्वेश्वराने कलाम नावाचे सोनपाणी शिंपडले, एवढेच नव्हे, तर आपल्या अस्तित्वाचा एक ढळढळीत पुरावा माझ्यासारख्या नास्तिकाला दिला, हे नाकारू म्हणता नाकारता येत नाही, हे कबूल केलेच पाहिजे.



**अभय सदावर्ते**

८,श्री मंदार अपार्टमेंट, जनरल वैद्य नगर,
नाशिक-पुणे रस्ता, नाशिक - ४२२०११
दूरध्वनी- ०२५३ - २५९९७७७
भ्रमणध्वनी- ९४२२७७०७९५
abhaysadavarte@yahoo.co.in





Regd. Office: Laxmi Sadan, 361, V.P. Road, Girgaum, Mumbai, India - 400004
Customer Care No.: 022 2860 2000 www.nkgsb-bank.com



दीपावलीच्या साहित्यिक
शुभेच्छा !!!
नवा गंध, नवा श्वास,
नव्या साहित्याची नवी आरास
साहित्यातले रंग नवे
रसिकांमधलेच असंख्य दिवे...
रसिक साहित्य प्रा. लि.
रसिक साहित्य प्रा.लि.
ललित साहित्याचा प्रचंड साठा असलेली
एक लोकप्रिय संस्था
अप्पा बळवंत चौक, पुणे ४११००२, संपर्क: ०२०-२४४५११२९
Visit us: www.erasik.com
Rasik Advertising

# वसंत फुलसिंग नाईक

## महाराष्ट्राने दुर्लक्षिलेले व्यक्तिमत्त्व

अरुण साधू

कै. वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी निमित्त महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने नुकताच नाईक यांच्या विधानमंडळातील निवडक भाषणांचा संग्रह चतुरस्र या नावाने प्रसिद्ध केला आहे. या ग्रंथास अरुण साधू यांनी लिहिलेली दीर्घ प्रस्तावना येथे रुची च्या वाचकांसाठी पुनर्मुद्रित करीत आहोत. काही राजकीय व समाजशास्त्रीय अशा ऐतिहासिक कारणांमुळे केवळ स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय आशिर्वादाने व पाठिंब्याने त्यांच्याच कलाने घेत त्यांची गादी चालविणारा माणूस अशी मीडिया आणि राजकीय विष्लेशकांकडून नाईक यांची आजपर्यंत भलावण होत आली आहे. परंतु अत्यंत कठीण अशा खळबळीच्या कालखंडात, राज्यात मुख्यमंत्रीपदाचे निदान डझन–अर्धा डझन बलाढ्य पुढारी दावेदार म्हणून कार्यरत असतांना केवळ यशवंतरावांच्या ताकदीवर कोणत्याही लेच्यापेच्या उमेदवारास त्या पदावर एवढा दीर्घ काळ टिकून राहणे अवघड होते. नाईक यांच्या स्वतंत्र व्यक्तीमत्वाकडे दुर्लक्ष करतांना अभ्यासकांचे याही मुद्दयाकडे लक्ष गेले नसावे. म्हणूनच नाईकांच्या या प्रदीर्घ कारकीर्दीचे गंभीरपणे पुनर्मुल्यांकन होण्याची गरज साधू यांनी आग्रहाने प्रतिपादिली आहे. रुची व ग्रंथाली यांच्या परंपरेत वाङ्मय व काव्य–शास्त्र–विनोद यांच्या बरोबरीने राजकीय विश्लेषण व चर्चा यांनाही महत्वाचे स्थान आहे. म्हणूनच ही प्रस्तावना लेखरुपात या अंकात देत आहोत. वाचकांना हे विश्लेषण निश्चितच विचार करायला लावेल. – संपादक

वसंतराव नाईक यांच्या व्यक्तिमत्त्वाचे व त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या प्रदीर्घ कारकिर्दीचे मूल्यमापन करताना प्रथमत: काही गोष्टी प्रामुख्याने लक्षात घेणे गरजेचे आहे. पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे नाईक हे प्रतिष्ठित व प्रस्थापित अशा मराठी समाजाला (यात विदर्भही धरायला हवा) अगदी अपरिचित असलेल्या समाजघटकातून वर आलेले व्यक्तिमत्त्व होते. दुसरी बाब अशी, की त्यांच्या आधी मारोतराव कन्नमवार हे जरी सुमारे वर्षभर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर असले तरी यशवंतराव चव्हाणांनंतर नाईक यांनीच अकरा वर्षे राज्याचा कारभार पाहिला. यशवंतराव दिल्लीला संरक्षणमंत्री म्हणून जाण्यापूर्वी अवघी अडीच वर्षे ते मुख्यमंत्रीपदी होते. तेवढ्या अवधीतही त्यांनी आपली मुद्रा ठळकपणे येथे उमटवली हे खरे असले तरी नवनिर्मित महाराष्ट्राची जडणघडण करण्याची जबाबदारी त्यांच्यानंतर खऱ्या अर्थाने नाईक यांनाच अकरा वर्षे पार पाडावी लागली. पश्चिम महाराष्ट्र काय, विदर्भातील लोकांनी देखील या वस्तुस्थितीमधील इंगित जोखलेले दिसत नाही. तिसरी आणखी कळीची बाब अशी, की यशवंतरावांच्या आग्रहामुळे इतर बलाढ्य इच्छुकांना डावलून जवळजवळ अनोळखी व फारसे राजकीय वजन नसलेल्या वसंतराव नाईकांना मुख्यमंत्री केले गेले व त्यामुळे नाईक कायम यशवंतरावांच्या पंखाखाली असून त्यांच्या सल्ल्यानेच ते राजकीय व प्रशासकीय निर्णय व धोरणे ठरवतात, अशी हवा

उठवली गेली किंवा उठली व ती शेवटपर्यंत टिकली.. या एकाच बाबीचा देखील फार मोठा परिणाम नाईक यांच्या मूल्यमापनावर आजवर होत आला आहे, हे आपण बघतो. आणखी एका नाजूक गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. ती म्हणजे महाराष्ट्रातील प्रस्थापित व अर्ध-प्रस्थापित अशा समाजगटांमधे असलेला विचित्र अहंगंड आणि त्यातून उद्‌भवलेले काही सूक्ष्म व विकृत असे पूर्वग्रह यांचा देखील नाईक यांचे मूल्यमापन करताना परिणाम होत असणार. त्याचा आणि वर उल्लेखलेल्या मुद्यांचा थोडासा विस्तार करत नाईक यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या व कारकिर्दीच्या मूल्यमापनाची दिशा आपल्याला शोधायची आहे. असे करताना या सर्व मुद्यांची सरमिसळ होणे अपरिहार्य आहे, हे आधीच नमूद केले पाहिजे.

महाराष्ट्राच्याच नव्हे तर एकूणच देशातील राजकारणाचा व समाजकारणाचा विचार करताना समाजशास्त्रीय अडथळे पार करण्यावाचून गत्यंतर नसते. नाईकांच्या समाजघटकाची चर्चा करावी लागते ती त्यामुळे. राजकीय भोंदूपणा दूर ठेवून स्पष्ट विचार केल्यास या घटकाला जात म्हणावे लागते. प्रसिद्धीमाध्यमातील राजकीय विश्लेषक विशेषत: निवडणुकीच्या रणधुमाळीचे विश्लेषण करताना जाती-पातीच्या फॅक्टरची किती सविस्तर चर्चा करतात ते आपण पाहतोच. नाईक हे गोर वंजारा या अत्यंत अल्पसंख्य अशा समाजातून आलेले आहेत. हा विशिष्ट समाज पश्चिम महाराष्ट्रात फारसा कोठे आढळत नाही. विदर्भातही तो दक्षिण यवतमाळ जिल्ह्याव्यतिरिक्त इतरत्र फार क्वचित प्रमाणात आढळतो. त्यामुळे नाईक यांच्या पाठीशी पक्का बांधलेला कोणत्या जातीचा मतदारसंघ होता, वेळप्रसंगी कोणत्या समाजाला ते हुकमी हाक देऊ शकत होते, या प्रश्नांना उत्तर नाही. नाईक अभिजनांपैकी नव्हते ना बहुजनांपैकी. दलितही नव्हतेच. अशी एकही दणकट सामाजिक लॉबी पाठीशी नसताना हा माणूस वारंवार निवडणुका जिंकून पुन्हा अकरा वर्षे मुख्यमंत्रीपदावर कसा राहिला हे आश्चर्यच होय. त्याची सोपी उत्तरे दिली जाऊ शकतात. यशवंतराव पाठीशी होते म्हणून राहिले हे एक 'पेट' उत्तर. एवढी जरब होती यशवंतरावांची पक्षावर? मराठा लॉबीवर? बहुजन समाजावर? नेहरू पाठीशी होते म्हणून कृष्ण मेनन राहिले? मेनन यांचीही किती जबरदस्त लॉबी होती हे जाणकारांना ठाऊक आहे.त्यावर आणखी नेहरूंचे कवच. तरीही त्यांना जावे लागले. सत्तेच्या राजकारणाची गणिते एवढी सोपी नसतात. महाराष्ट्रच्या निर्मितीनंतर नाईक यांनी यशवंतरावांचे नेतृत्व पत्करले हे खरे, पण त्यांचे एवढे दुर्बळ व्यक्तिमत्त्व होते का की यशवंतरावांनी सांगावे आणि नाईक यांनी ऐकावे? पक्षानेही यशवंतरावांचे ऐकून एका दुर्बळ माणसास अकरा वर्षे मुकाट्याने डोक्यावर बसवून घ्यावे? साऱ्या लॉब्यांनी नांग्या टाकाव्यात? पश्चिम महाराष्ट्रामध्ये वजनदार व कर्तृत्ववान पुढाऱ्यांची मोठे फळी होती आणि ते सारेच एवढे लेचेपेचे नव्हते. प्रसंगी यशवंतरावांनाही माघार घेऊन त्यांचे ऐकावे लागे. तेथील सर्वात बलिष्ठ लॉबी नाईक यांच्याकडे कशी उद्धट तुच्छतेने पाहत होती हे त्या वेळच्या निरीक्षकांनी पाहिले आहे. आणि सरतेशेवटी, १९७४-७५ साली त्या लॉबीने त्यांच्याविरुद्ध कसा गहजब उठवला गेला हेही ऐतिहासिक सत्य आहे. या लॉबीस विदर्भ-मराठवाड्यातील त्यांच्या सहोदरांचाही जोरदार पाठिंबा होता, हेही नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत केवळ यशवंतराव सांगतात म्हणून ही स्वाभिमानी व शक्तीमान लॉबी त्यांच्या तालावर नाचत होती, हे मानणे कितपत वास्तवाशी धरून आहे, असा प्रश्न येतो.

या उपमुद्यात दुसराही एक कंगोरा आहे. यशवंतरावांचे राजकीय व वैचारिक श्रेष्ठत्व कबूल करूनही या लॉबीच्या मनात त्यांच्याविषयी काही समाजशास्त्रीय घोटाळे होतेच ना? या लॉबीतील त्या वेळच्या खासगी (कधी उघडही) चर्चा ज्यांनी ऐकल्या त्यांना माहीत आहे. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती ही की महाराष्ट्रातील समाजकारण व राजकारण या क्षेत्राकडे पाहणाऱ्या सर्वसामान्य प्रस्थापित, प्रतिष्ठित अशा वैचारिक नेतृत्व करणाऱ्या समाजशास्त्रीय दृष्टचा सर्व प्रकारच्या अभिजनांमधे एक सूक्ष्म विकृती वास करून असते व ती सर्व क्षेत्रांतील आपल्या श्रेष्ठत्वाचे कायम अत्यंत त्वेषाने समर्थन व संरक्षण करत असते. आपल्या व्यतिरिक्त वेगळ्या समाजगटातून वैचारिक, सामाजिक वा राजकीय क्षेत्रात श्रेष्ठ जीनियस निपजूच शकत नाही अशी या प्रस्थापितांची धारणा असते. असे नेतृत्व कोठे दिसू लागले की प्रथम प्रतिक्रिया नकाराची, नंतर सूक्ष्म विरोधाची व शेवटी चक्रावून जाऊन स्वीकाराची असते. हा स्वीकार करताना देखील त्या (कनिष्ठ) वर्गात एवढे श्रेष्ठ नेतृत्व निपजलेच कसे याचा खंतयुक्त अचंबा व्यक्त होऊ लागतो. खुद्द यशवंतरावांना देखील या विकृतीची थोडीफार झळ लागली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शिवाजी महाराज यांनाही ही झळ सोसावी लागली. त्याबद्दलच्या वादंगांनी आधुनिक काळात महाराष्ट्रात काही उग्र असे सार्वजनिक उद्रेक झाले आहेत. प्रस्थापित महाराष्ट्र जनांनी अजूनही आंबेडकरांच्या सर्वसमावेशक बुद्धीची

प्रगाढता, त्यांची प्रज्ञा आणि त्यांच्या विचारांची महानता यांना मन:पूर्वक दाद दिलेली नाही, हे लक्षात घेतले पाहिजे.

वसंतराव नाईक यांना या नामावळीत बसवणे उचित होणार नाही. मात्र वैचारिक राजकीय विश्लेषक व राजकारणाचे अभ्यासक यांनी या कोनातून महाराष्ट्राचे सांस्कृतिक व सामाजिक वास्तव नीट लक्षात घेत नाईक यांचे व्यक्तिमत्त्व, कर्तृत्व व राजकीय नेतृत्व यांचा अभ्यास करायला हवा, असे सुचवावेसे वाटते. यशवंतरावांना योग्य न्याय देईल असे परिपूर्ण चरित्र तरी महाराष्ट्राने कोठे लिहिले आहे? महाराष्ट्राच्या वैचारिक न्यूनतेचे व त्या सूक्ष्म अशा विकृतीचे हे लक्षण होय, असेही दुर्दैवाने म्हणावेसे वाटते. वसंतराव नाईक यांना सुद्धा या प्रवृत्तीची थोडीफार झळ लागलेली आहे यात शंका नाही.



वसंतरावाचा गोर वंजारा समाज हा मूळचा भटक्या तांड्यांचा असला तरी त्यांचा जन्म झाला तेव्हा दोन पिढ्या तरी त्याचा एक गट यवतमाळ जिल्ह्याच्या पुसद तालुक्यातील गहुली येथे स्थिर झाला होता. किंबहुना ते गावच या तांड्याचे नायक वसंतरावांचे पितामह चतुरसिंग यांनी वसवले होते. गावोगाव भटकणारा हा समाज शहरी संस्कार व शिक्षणापासून वंचित होता. सारे जग विकसित होत असताना अज्ञानात हरवलेला होता. जुन्या चालीरीती, श्रद्धा, अंधश्रद्धा यांमधे मग्न होता. नायक चतुरसिंग हे विचारी पुढारी असले पाहिजेत. एका जागी स्थिर होऊन शेतीचा व शिक्षणाचा स्वीकार केल्याशिवाय समाजाला उद्धार नाही हे ओळखून त्यांनी गावोगावी पाले टाकणे बंद करून एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास तांड्याला या ठिकाणी वसवले. गोर वंजारा समाजाचा हा तांडा भटक्या अवस्थेतही गावोगावच्या भीकेवर, दयेवर जगत नव्हता. या स्वाभिमानी वंजाऱ्यांचा तांडा फुटकळ उद्योग न करता व्यापारी वाहतूक करत असे. पुरातन काळापासून भारतातील व्यापारी मार्गांवर महत्त्वाच्या वस्तूंची ने-आण करणारे तांडे भरपूर माया जमवून असायचे. परदेशातील किमती जिनसांची आयात-निर्यात ते करत आणि देशातील अनेक ठिकाणचे बडे व्यापारी, सावकार, सरदार, राजे वगैरे यांच्याशी त्यांचे चांगले संबंध असत. चतुरसिंग नायकांना राठोड असेही संबोधत व मारवाडातील रजपूत घराण्यांशी त्यांचा संबंध जोडला जाई. ते काहीही असले तरी इथे यवतमाळात किंवा महाराष्ट्रात यासंबंधी फार माहिती नव्हती. विधिमंडळाच्या आवारात, महत्त्वाकांक्षी राजकीय वर्तुळांमधे वसंतरावांच्या वंजारी जातीविषयी छद्मी तुच्छतेने उल्लेख सहजपणे होई. मंत्र्यांच्या बंगल्यांवरील खाशा बैठकांमधेही विषय निघे. मुख्यमंत्रीपदी खरे म्हणजे आपलाच अधिकार आहे अशी भूमिका असणाऱ्या एका बलाढ्य मंत्र्यांच्या खासगी बैठकीत अनेकांनी असे उल्लेख वसंतराव व खुद्द यशवंतराव यांच्याबद्दलही ऐकले आहेत.

हे सांगण्याचा मुख्य उद्देश असा, की अशा तऱ्हेच्या चर्चेने वातावरण कलुषित होते व नेत्यांच्या मूल्यमापनावर त्याचा नकारात्मक परिणाम होतो. मराठीतील दिग्गज नाटककार आणि मनुष्यस्वभावाचे गाढे अभ्यासक विजय तेंडुलकर यांनी नाईक मुख्यमंत्री असतांना त्यांची प्रदीर्घ भेट घेतली होती. नंतर बऱ्याच वर्षांनी लिहिलेल्या लेखात ही भेट मुलाखतीसाठी नसून काही गोष्टी समजून घेण्यासाठी आहे असे नाईकांना आधीच स्पष्ट केल्याचे तेंडुलकरांनी नमूद केले आहे. त्यांनी नाईकांचा रुबाबदारपणा, उमदा स्वभाव, त्यांच्या बोलण्याचा लहेजा, पाईप ओढण्याची ढब आणि कधी छोट्यामोठ्या भेटींमधेही पाईप भरणे, तो कोरणे, शिलगावणे इत्यादी क्रियांचा ते चतुरपणे करत असलेला स्ट्रॅटेजिक वापर याविषयी या लेखात फार मार्मिकपणे लिहिले आहे. पण सबंध लेखावर एक छाया दिसते ती तेंडुलकरांच्या नाईक या माणसावरील अविश्वासाची, संशयाची. याच पुस्तकात (हे सर्व कोठून येते) इतर अशाच पद्धतीच्या लेखांमधे तेंडुलकरांच्या चिकित्सक स्वभावाचे दर्शन घडते खरे, पण या तऱ्हेचा अविश्वास दिसत नाही. तेंडुलकरांना तसा सर्वच राजकारणी नेते व मंत्री (विशेषकरून काँग्रेसचे) यांच्याविषयी अविश्वास व संशय

वाटत असे. नाईकांवरील लेखात या अविश्वासाला आणखी एक पोत आहे. त्या पोताची जात त्या बलाढ्य मंत्र्याच्या दिवाणखान्यातील छद्मी व शेलक्या उद्‌गारांशी जोडता येईल. आधुनिक महाराष्ट्रातील श्रेष्ठ नाटककार म्हणून तेंडुलकरांविषयी विशेष आदर असूनही हे लिहावे लागते याबद्दल खंत आहे. पण महाराष्ट्राचे मन कलुषित करणारा तो जो सर्वसाधारण पूर्वग्रह आहे त्याची लागण नकळत तेंडुलकरांसारख्या पुरोगामी विचारवंतांना व लेखकांना होत असेल तर राजकीय विश्लेषकांची कोण ग्वाही देणार? (त्या लेखाबद्दलचे हे मत एकदा खुद्द तेंडुलकरांकडे खूप सौम्य शब्दांत पण ठोसपणे व्यक्त केले तेव्हा त्यांना ते फार झोंबल्याचे आठवते.)

हा मुद्दा एवढा रेटण्याचे कारण असे, की आपल्या या तथाकथित सामाजिक-सांस्कृतिक गौण स्थानाच्या समजुतीमुळे प्रतिस्पर्धी किंवा पत्रकार, राजकीय अभ्यासक वगैरे लोक कसे बोलू-वागू शकतात हे न कळण्याएवढे वसंतराव दूधखुळे नव्हते. त्याचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर निश्चितच परिणाम झाला होता असे वाटते. त्यांची राहणी समृद्ध होती पण चीप भपकेबाज अशी नव्हती. त्यात अरिस्टॉक्रॅटिक आब असे. कपड्यांची निवड साधी पण उच्च दर्जाची, रंगसंगती उत्तम, सिगारेट, पाईपचा तंबाखू यांची निवड देखील चोखंदळ. वरील पूर्वग्रहयुक्त टीकाकारांना त्यांचे हे अबोल उत्तर असायचे. ही सवय नागपूरला कॉलेजात गेल्यापासून. टीकाकारांच्या या पूर्वग्रहांचा उलटा परिणाम नाईकांवर कधी सौम्य आक्रमकपणात झाल्यासारखे दिसते. तेंडुलकरांनी नमूद केलेल्या त्यांच्या प्रश्नांच्या उत्तरात तो जाणवतो. प्रश्नकर्त्याच्या देहबोलीत किंवा प्रश्नांमधील स्वरांच्या आघातात काय दडले आहे ते ओळखण्याएवढी मनुष्यस्वभावची जाण नाईकांनाही निश्चितच होती. म्हणून तर त्यांनी अकरा वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद सांभाळले. एकदा विधानसभेतील चर्चेत उत्तर देताना ओघात गमतीने ते बोलले की आमच्याबद्दल (विदर्भातील शेतकऱ्यांबद्दल) काय समजता, आम्ही तुमच्यासारखे एक-दीड एकरवाले शेतकरी नव्हे... यावर चवताळून बापूसाहेब काळदाते यांनी जोरदार आक्षेप घेतला, सारी विरोधी बाके खवळून उठली. हलकल्लोळ माजला. अखेर अपमान करण्याचा उद्देश नव्हता, असे सांगून वसंतरावांनी खिलाडूवृत्तीने माफी मगितली. असा सौम्य सूड घेऊ आक्रमकपणा मधूनच उसळी घेई.

वसंतराव शिकारप्रेमी होते आणि त्याचा त्यांना अभिमानही होता. ते त्यांनी कधी दडवून ठेवले नाही. प्रस्तुत ग्रंथात भंडारा जिल्ह्यातील नवेगावच्या जंगलात शिकारीसाठी गेले असताना त्यांनी केलेल्या सरकारी पैशांच्या उधळपट्टीबद्दल विरोधकांनी अविश्वास प्रस्तावात नोंद केली होती त्या वादाचे वसंतरावांनी दिलेले उत्तर छापले आहे ते वाचण्यासारखे आहे. आक्रमक पण नर्मविनोदाने ठासून भरलेले ते ठाम उत्तर होते. स्मरते त्याप्रमाणे त्यावेळी सारे सभागृह हसून हसून बेजार झाले होते. सारा खर्च आपण आपल्या खिशातून कसा केला व भरलेल्या खर्चाच्या पावत्या उपलब्ध आहेत हे सांगून त्यांनी आक्षेपकांची तोंडे बंद केली होती. हे सारे त्यांच्या प्रशस्तीसाठी सांगायचे नसून त्यांच्या मनमिळाऊ व्यक्तिमत्त्वामधे ही आक्रमक धार कशी होती आणि कोठून आली हे समजून घेण्यासाठी.


वसंतरावांचा जन्म या गहुली गावचा. गाव डोंगरांनी वेढलेले. शाळा नव्हती. वडील फुलसिंग यांचेही शिक्षण झाले नव्हते. पण कुटुंबाने फुलसिंग यांची दोन मुले, ज्येष्ठ बाबासाहेब व दुसरे वसंतराव यांना शिकवण्याचे ठरले.पैकी बाबासाहेबांना कुटुंबाकडे लक्ष देण्यासाठी शिक्षण मधेच सोडावे लागले. प्राथमिक शिक्षणासाठी देखील वसंतरावांना शेजारच्या खेड्यात जावे लागे. त्यांची घोड्यावरून पाठवणी होई. पुढचे शिक्षण विटोली या गावी काही काळ वडिलांच्या मित्राच्या घरी राहून झाले. नागपूर येथील प्रसिद्ध मॉरिस कॉलेजमधे बी.ए.साठी प्रवेश मिळाला आणि आयुष्याचे रूळ बदलून गेले. वसंतराव आपल्या समाजातील आणि घरातील प्रथम शिक्षित व्यक्ती. मागे शिक्षणाची परंपरा नाही. प्राथमिक व पूर्व-माध्यमिक शिक्षण विदर्भातील अशा ग्रामीण भागात की जेथे ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ काय सानेगुरुजींची पुस्तके देखील पोहोचली होती की नाही कुठास ठाऊक! गांधींचा चरखा मात्र पोचला होता. सेवाग्राम आणि पवनार आश्रम फार दूर नव्हते. मॅट्रिक नागपुरातील नीलसिटी हायस्कूलमधून केले. बालपणी त्यांच्यावर कशा प्रकारचे संस्कार झाले त्याचा पत्ता नाही. या सर्व विद्यार्थिदशेत किशोरवयात व पुढे तरुणपणी कोणत्या सांस्कृतिक, सामाजिक चळवळींशी संबंध आला त्याचीही महाराष्ट्राला माहिती नाही. त्यामुळे वसंतराव नाईक कोणत्या सामाजिक राजकीय मुशीतून घडले याचाही पत्ता नाही. जोतिबा फुले यांच्यासंबंधी त्यांनी काही वाचल्याचे उल्लेख आहेत. पण यशवंतराव, नाना पाटील, जेधे, मोरे, गाडगीळ, जवळकर, यांच्याशी त्यांच्या ऐन उभारीच्या काळात संपर्क नाही. त्यांनी चरखा चालवल्याचे वाचनात नाही, मात्र खादीची कास शेवटपर्यंत धरली. ती कशी तर खादीच्या उंची

सुतापासून केलेल्या वस्त्रांचे उत्तम शिवलेले जोधपुरी सूट. इतर काँग्रेस पुढाऱ्यांच्या अजागळ वाटणाऱ्या सैलसर पांढरा झब्बा धोतर व गांधी टोपी या गणवेशाची नक्कल करण्याचे त्यांनी नाकारले व त्याबद्दल पक्षातून टीकादेखील सहन केली. विदर्भात मंत्री असल्यापासून असे उत्तम दर्जाचे सूट ते कायम घालत. थोडक्यात सांगायचे तर झुंडीमधे सहजपणे सामील होण्याची वसंतरावांची मानसिकता नव्हती. स्वत:चा म्हणून वेगळेपणा ते कटाक्षाने सांभाळीत. स्वतंत्र विचार व व्यक्तिमत्त्व हा त्यांचा तरुणपणापासूनचा विशेष.

त्यावेळी मारोतराव कन्नमवारांचा त्यांच्या चळवळी व लिखाणामुळे जेवढा परिचय पश्चिम महाराष्ट्राला होता तेवढाही वसंतरावांचा नव्हता. त्यावेळी कॉलेजसाठी नागपूरला गेल्यापासून तेथील जीवन आणि गहुली परिसरातील वंजारा व इतर शेतकऱ्यांची परिस्थिती यातील तफावत जाणवून ते अस्वस्थ होऊ लागले आणि तेव्हापासूनच आपल्या अडाणी समाजाची आणि त्याचबरोबर आजूबाजूच्या दरिद्री शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली पाहिजे या विचाराने झपाटले. वकिलीची परीक्षा दिल्यावर काही काळ त्यांनी सुप्रसिद्ध काँग्रेस नेते पंजाबराव देशमुख यांच्याकडे अमरावती येथे उमेदवारी केली आणि नंतर लवकरच पुसद येथे स्वतंत्र वकिली सुरू केली. तेव्हापासून हा ध्यास अधिकच वाढला. वंजारा समाज व स्त्रिया यांना शिक्षण द्यावे, त्यांचे संघटन करावे, जुन्या नकारात्मक अंधश्रद्धा व चालीरीतींपासून त्यांना मुक्त करावे अशा चळवळींमधे ते गढले. वंजारा समाजाची सेवा करत त्यांना दारूपासून मुक्त करावे व प्रगती करावी, वंजारा स्त्रियांना रूढींपासून मुक्त करावे, गहुली खेडे नमुनेदार गाव असे विकसित करावे या ईर्ष्येने झपाटून ते सामाजिक कार्यात पडले, सरपंच झाले. शेती आणि शेतकरी आणि वंजारासमाज यांच्या सुधारणा करण्याच्या तळमळीतून त्यांचा प्रवास राजकारणाकडे झाला. शेती व गरीब शेतकऱ्याचे खेडे हा त्यांच्या विचाराचा केंद्रबिंदू झाला. ते पुसद गावचे नगराध्यक्ष म्हणून निवडून आले. हाच त्यांचा राजकारणाचा श्रीगणेशा.

पुढे १९४२ च्या चळवळीत त्यांनी झपाटून काम केले. हरिजन वसतिगृह चालवले. विनोबांची भूदान चळवळ जोरात सुरू होती. त्यातही ते ओढले गेले. स्वत:च्या हिश्श्यातील काही जमीन त्यांनी दान केली आणि यवतमाळ जिल्ह्यात दौरे करून बड्या शेतकऱ्यांना हाक देत हजारो एकर जमीन भूदान चळवलीला मिळवून दिली. त्यांचे हे काम आणि वकिलीचे कौशल्य यामुळे नागपूरच्या नेत्यांच्या नजरेत येऊन त्यांना विदर्भ काँग्रेस कमिटीवर घेतले गेले. स्वतंत्र भारतातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुका १९५२ साली झाल्या. पक्षाने मध्यप्रांत-वऱ्हाड विधानसभेतील पुसदच्या जागेची उमेदवारी या तरुण उत्साही कार्यकर्त्याला दिली. वसंतराव भरघोस मतांनी निवडून आले. पहिल्याच झटक्यात महसूल खात्याचे उपमंत्री व नंतर मंत्री म्हणून नेमले गेले. वसंतराव राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आले. तेव्हाच कदाचित ते महाराष्ट्रातील नेत्यांच्या नजरेच्या टप्प्यात आले असावेत. तोवर त्यांचे संबंध पंजाबराव देशमुख, बापूजी अणे, कन्नमवार, पंडित रविशंकर शुक्ल, ब्रिजलाल बियाणी अशा वैदर्भीय नेत्यांशीच अधिक होते. कन्नमवारांप्रमाणेच वसंतरावही सुरुवातीला स्वतंत्र विदर्भवादी होते. महाराष्ट्र राज्यासाठी ज्या वाटाघाटी सुरू होत्या त्यामध्ये ते मंत्री म्हणून ओढले गेले. नागपूर करारावर त्यांची सही होती. पुढे वसंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना एकदा नागपूर करारातील तरतुदींचा मुद्दा विधिमंडळात चर्चेला आला. एका सदस्याने खवचटपणे त्यांना आठवण करून दिली की करारावर त्यांचीही सही आहे. त्यावर वसंतरावांनी नमुनेदार उत्तर दिले, की सही आहे हे अगदी खरे. ती दिली महाराष्ट्र राज्याच्या भौगोलिक एकतेचा प्रस्ताव स्वीकृत करण्याचे तत्त्व मान्य करण्यासाठी. हे मूलभूत तत्त्व सोडल्यास इतर मागण्यांच्या ज्या तरतुदी आहेत त्याविषयी एवढेच सांगायचे आहे की अमुक दिले पाहिजे, तमुक व्यवस्था विदर्भासाठी झाली पाहिजे अशी विदर्भातर्फे भीक मागण्याची माझी मुळीच इच्छा नव्हती. जे मिळवायचे ते आपल्या मनगटाच्या जोरावर. हा मथितार्थ.

नागपूरमधे बी.ए. करत असतानाच त्यांच्या जीवनात एक मधुर घटना घडली तिची दखल प्रस्तुत विवरणात घेणे योग्य ठरेल. कॉलेजमधे त्यांचे व्यक्तिमत्त्व आकर्षक, रुबाबदार तरीही आर्जवी असे गणले जाई. ते स्वभावाने समजूतदार आणि मनमिळाऊ होते. प्रसंग येताच प्रांजळपणे आपले मत कोणाचाही मुलाहिजा न ठेवता मांडत. तशात त्यांचे वत्सला घाटे या एका प्रतिष्ठित घरातील ब्राह्मण मुलीवर प्रेम जडले. तिचाही प्रतिसाद होताच. आपल्या मुलीने काही आगा-पिछा नसलेल्या खेड्यातील कोणा वंजारा मुलाशी लग्न करावे हे कोणत्या प्रेमळ मातेला पटेल? आईचा हा नैसर्गिक विरोध वसंतरावांनी मुत्सद्दीपणाने विरघळायला लावून त्यांची संमती कशी मिळवली या विषयीच्या सुरस नर्मविनोदी कथा नागपुरात त्यांचे समकालीन सांगत. कटुता न येऊ देता नम्रआर्जवीपणाने समोरच्याचा विरोध मऊ करायचा आणि त्याला आपल्या बाजूने वळवून घ्यायचे हा त्यांच्या मुत्सद्दीपणाचा गाभा. पुढे



टीजेएस्‌बी बँक
विश्वास जिंदगी भर का
लहान असोत वा मोठी
स्वप्ने असतात साकारण्यासाठी
टीजेएस्‌बी वैयक्तिक कर्ज तुम्हाला देत आहे
एक हवेहवेसे वाटणारे सोयी-सुविधायुक्त जीवन
टीजेएस्‌बी परिवारा तर्फे
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा
Enjoy
LOW
EMI
LOAN IN
48
HOURS
प्रशासकीय आणि नोंदणीकृत कार्यालय : टीजेएस्‌बी हाऊस, प्लॉट क्र. बी ५, रोड क्र.२,
वागळे इंडस्ट्रिअल इस्टेट, ठाणे (पश्चिम)-४०० ६०४ | टोल फ्री क्र.: १८०० २२३ ४६६ | www.tjsb.co.in

सत्तेच्या राजकारणातही हे रेशमी हत्यार त्यांनी मोठ्या कौशल्याने वापरले.

या विवाहामुळे नागपुरातील प्रतिष्ठित वर्तुळातील प्रवेश सुलभ झाला आणि सांस्कृतिक विश्वही बरेच बदलले. लग्नानंतर पुरुषाचे व्यक्तिमत्त्व बदलते असे म्हणतात. आंतरजातीय विवाहानंतर– विशेषत: वंजारा मुलाने प्रतिष्ठित घराण्यातील ब्राह्मण मुलीशी– पुष्कळच बदलते. पुसद तालुक्यातील वंजारा समाजात खळबळ उडाली. नाईक घराण्याला काही काळ समाजाने वाळीत टाकले. वसंतरावांनी आपल्या स्वभावानुसार काही काळातच खेळीमेळीने तो बहिष्कार संपविला. त्या काळात ते पुसदमध्येच वत्सलाताईंसह राहत होते हे विशेष.

वसंतराव नाईक यांची सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि व्यक्तिमत्त्वाची जडणघडण समजून घेतांना त्या विवेचनात राजकारणाचेही रंग नकळत मिसळले गेले हे बरेच झाले. इकडे राज्य पुनर्रचनेमुळे द्विभाषिकाची निर्मिती झाल्यावर साहजिकच विदर्भाला या विशाल प्रांताच्या मंत्रिमंडळात यथायोग्य स्थान देणे आवश्यक होते. त्यात निवडणुकीमध्ये विदर्भातील मतदारांनी काँग्रेसला हात दिला होता. पश्चिम महाराष्ट्रात यशवंतराव सोडले तर इतर पुष्कळ ठिकाणी काँग्रेस पक्षाचा धुव्वा उडाला होता. विदर्भ आणि गुजरातच्या आमदारांच्या जीवावरच यशवंतराव चव्हाण यांची द्विभाषिकाचे मुख्यमंत्री म्हणून निवड झाली. विदर्भाला प्रतिनिधित्व देताना साहजिकच वसंतरावाना मंत्रिमंडळात स्थान मिळाले. त्यावेळी यशवंतरावांचे वसंतरावांशी विशेष सख्य होते असे कोणाच्या ऐकिवात नाही. उलट विदर्भातील ज्या ग्रामीण नेत्यांना त्यांनी हात दिला असे सांगितले जाते त्या याद्यांमधे कन्नमवार, पी.के. देशमुख, मधुसूदन वैराळे, आबासाहेब खेडकर, राम मेघे इत्यादिकांची नावे घेतली जातात. नाईकांचे नाही. असे असूनही १९६५ साली कन्नमावारांच्या अचानक मृत्यूनंतर इतर अनेक इच्छुक दावे करत असताना – त्यात विदर्भाचेही होतेच – यशवंतरावांनी वसंतरावांनाच कसे निवडले, ते समजून घेण्यासाठी १९५६ साली द्विभाषिक स्थापन होताना मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी मुख्यमंत्रीपदासाठी यशवंतरावांची उमेदवारी पुढे करून ती का तडीस नेली या गोष्टीची चिकित्सा केली पाहिजे.

स्वातंत्र्यापूर्वीच्या खेर मंत्रिमंडळात मोरारजी देसाई हे गृहमंत्री होते. कडक शिस्तीचे कुशल प्रशासक म्हणून ते गणले जात. १९४६ च्या निवडणुकीत यशवंतराव चव्हाण हा तरुण कार्यकर्ता निवडून आल्यावर खेरांनी त्यांना आपल्याच खात्यात उपमंत्री– त्यावेळी पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणत – हे पद देऊ केले. यशवंतराव मुंबईस आल्यावर योगायोगाने त्यांची आधी मोरारजींशी गाठ पडली. या तरुण माणसाचे स्वातंत्र्य–लढ्यातील कर्तृत्व, त्याची प्रगल्भता आणि बुद्धिमत्ता बघून मोरारजींनी त्याला आपल्या गृहखात्यातच खेचले. तेथेच त्यांना प्रशासनाचा दांडगा अनुभव मिळाला. १९५२ मध्ये मोरारजी मुख्यमंत्री झाले. मोरारजी आणि यशवंतराव यांचे घट्ट ऋणानुबंध निर्माण झाले. पुढे १९५६ साली द्विभाषिक निर्माण झाले तेव्हा निवडून आलेल्या काँग्रेस आमदारांकडून आपण स्वत: मुख्यमंत्री म्हणून निवडून येणे शक्य नाही याची जाणीव मोरारजींना होती. तत्कालीन राजकीय वातावरण आणि मराठी व गुजराती आमदारांचे काँग्रेसमधील बलाबल पाहता मुख्यमंत्री मराठी असणे आवश्यक होते. मराठी पुढाऱ्यांनी भाऊसाहेब हिरे यांचे नाव पुढे केले. मोरारजींना आणि काँग्रेस श्रेष्ठींना मुख्यमंत्री असा हवा होता की जो महाराष्ट्र व गुजरात यांच्या हितसंबंधांकडे समान लक्ष देईल आणि त्याचबरोबर राज्यात नव्याने सामील झालेल्या विदर्भ व मराठवाड्याच्या भावनाही जपू शकेल. अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुंबई महानगरीतील व्यापारी व उद्योगपती यांच्यामधे नव्या मराठी मुख्यमंत्र्याने विश्वासाचे वातावरण निर्माण करायला हवे. या तीनही आघाड्या सांभाळून विशाल द्विभाषिकाची आव्हाने पेलण्याची पुरेशी क्षमता हिरे यांच्यामध्ये आहे असे मोरारजींना वाटत नव्हते. आणि या समजुतीला महाराष्ट्रातूनही काही विचारी नेत्यांचा दुजोरा होता. यशवंतराव चव्हाण हे १९५५–५६ पर्यंत काँग्रसमधे दुसऱ्या फळीचे नेते मानले जात. शिवाय संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत बदनाम झालेले. परंतु मोरारजी त्यांना आठ–दहा वर्षे जवळून पाहत होते. वर वर्णन केलेल्या सर्व जबाबदाऱ्या कुशलतेने पार पाडण्याची क्षमता त्यांच्यात पुरेपूर आहे याची मोरारजींना खात्री होती. खात्री नसलेल्या श्रेष्ठींनाही त्यांनी ते पटवले. यशवंतरावांची उमेदवारी पुढे केली. यशवंतराव काँग्रेस विधिमंडळपक्षात गुजरात व मुख्यत: विदर्भातील आमदारांच्या मतांवर निवडून आले. तीन–चार वर्षातच त्यांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले. टीका झाली, मोरारजीचे पित्तू म्हणून हिणवले गेले. संयुक्त महाराष्ट्राचे मारेकरी, महाराष्ट्रद्रोही गद्दार अशी नाचक्की केली गेली. पण १९६० पर्यंत आपला स्वभाव व कर्तृत्व यांच्या जोरावर सारे वातावरणच त्यांनी पालटून टाकले. १९५० ते १९६०

दरम्यानच्या मराठी वृत्तपत्रांमधील बातम्या, अग्रलेख, लेख यांचा बारकाईने अभ्यास केल्यास यशवंतरावांविषयीची महाराष्ट्रातील मने कशी पालटली याचे नाट्यमय व मनोरंजक चित्र समोर येईल. नेपोलियन बोनापार्ट यांचे फ्रान्समधील पुनरागमन व त्याबद्दल फ्रेंच नियतकालिकांचा बदलत गेलेला पवित्रा यांचा असा दिलचस्प अभ्यास झालेला आहे.

थोड्याफार फरकाने अशीच स्थिती वसंतराव नाईकांच्या मुख्यमंत्रीपदाच्या नेमणुकीलाही लागू पडते. फरक एवढाच की १९५६ पर्यंत यशवंतराव पश्चिम महाराष्ट्रात चांगलेच माहीत झाले होते आणि नेहरूंचे भाट व संयुक्त महाराष्ट्राचे गद्दार म्हणून बदनामही होते. वसंतरावांचा महाराष्ट्राला परिचयच नव्हता त्यामुळे नाम-बदनाम होण्याचा प्रश्नच नव्हता. द्विभाषिकातील मंत्री म्हणून मराठी वृत्तपत्रे त्यांची क्वचितच दखल घेत. पण यशवंतराव त्यांचे काम पाहत होते. मध्यप्रांतात नाईक रविशंकर शुक्ला यांच्या तालमीत प्रशासनात तयार झाले होते. मुंबईत आल्यावरही त्यांचे काम चोख होते. परिश्रम करण्याचा सोस होता, समज होती, लोकांना सांभाळून घेण्याची गोड बोलण्याची हातोटी होती. डिस्ट्रिक्ट बोर्डांना अधिक लोकशाही अधिकार देऊन त्यांचे जिल्हा परिषदांत परिवर्तन करायचे होते व ती संपूर्ण योजना तयार करण्याचे काम यशवंतरावांनी नाईक यांच्या समितीवर सोपवले होते. नाईकांनी सखोल अभ्यास करून व मोठ्या परिश्रमाने अहवाल तयार केला तो भारतात आदर्श ठरला. व त्या आधारावर महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांची १९६२ मध्ये निर्मिती झाली. वसंतरावांचे व्यक्तिमत्त्व, सर्वांना सांभाळून घेण्याची वृत्ती आणि प्रशासकीय कौशल्य पाहून यशवंतराव प्रसन्न होते. दोघांनाही महात्मा गांधींबद्दल आदर होता, पण नंतरच्या गांधीवाद्यांचे विचार व योजना याबद्दल दोघांनाही फारशी सहानुभूती नव्हती. नेहरुंवरील निष्ठा हे दोघांनाही जोडणारे राजकीय सूत्र होते.

कन्नमवारांना १९६२ मध्ये मुख्यमंत्री पदी नेमले म्हणून महाराष्ट्राच्या बहुजनांमधील अभिजनांची लॉबी अस्वस्थ व नाराज होती. मुंबई व पश्चिम महाराष्ट्रातील मराठी नियतकालिकांनी कन्नमवारांच्या बारीकसारीक खोड्या काढून त्यांना हैराण करून जीव नकोसा केला होता. तशातच त्यांचे एक वर्षाच्या आत आकस्मिक निधन झाले. पश्चिम महाराष्ट्रात लॉबीचे उमेदवार इच्छुक होतेच, विदर्भाला न्याय देणे हा आग्रह असेल तर तिथलेही या लॉबीचे शक्तिशाली सदस्य तयार होते. पण या सर्व इच्छुकांना मागे सारत यशवंतरावांनी वसंतरावांना पुढे केले व पक्षश्रेष्ठींनाही पटवून देत त्यांना मुख्यमंत्रीपदी आणले. त्यावेळी यशवंतरावांच्याच दबावामुळे वसंतराव पक्षसभेत एकमताने निवडले गेले याबद्दल शंका नाही. त्यावेळी इतर इच्छुकांप्रमाणे त्यांनीही आपली उमेदवारी आक्रमकपणे पुढे रेटण्याचा प्रयत्न केल्याचे कोठे नमूद नाही. ते विदर्भाचे पण तेथील कोणत्याही लॉबीचे नव्हते. मागास भटक्या जमातीचा शिक्का त्यांच्यावर होता. त्यांचे मराठीतील वऱ्हाडी उच्चार आणि काही विशिष्ट शब्दप्रयोग महाराष्ट्राला खटकायचे; पण पुढे तेच गोड वाटू लागले व त्यांच्या काही शब्दप्रयोगांची प्रमाण मराठीत सन्मानाने स्थापना झाली. सुरुवातीला यशवंतरावांप्रमाणेच वृत्तपत्रांकडून थोडीशी अवहेलना त्यांच्याही वाट्याला आली. पक्षातील इच्छुकांच्या मनातील क्षोभ खदखदत राहिला; कधी त्याचा उद्रेकही झाला. यशवंतरावांच्या वजनामुळे हे खदखदणे काबूत राहिले हे खरेच. पण दरम्यान वसंतरावांनीही आपल्या अजातशत्रू स्वभावाने आणि प्रशासकीय व राजकीय कर्तृत्वाने सर्वसाधारण आमदारांची, विरोधकांची, प्रसिद्धी माध्यमांची आणि सामान्य जनतेचीही मने जिंकायला सुरुवात केली होती हे नीट लक्षात घेतले पाहिजे. यशवंतरावांनी महाराष्ट्राचे एक स्वप्न पाहिले. त्याचे अर्कचित्र काढून त्यात रंग भरायला सुरुवात करताहेत तो त्यांना महाराष्ट्र सोडून दिल्लीस जावे लागले. वसंतरावांनी त्याच अर्कचित्रात आपल्या पद्धतीने आपले रंग भरायला दणक्यात सुरुवात केली. १९६३ पासून १९७४ पर्यंतचा त्यांचा मुख्यमंत्रीपदाचा कालखंड विविध नाट्यपूर्ण व खळबळजनक घटनांनी भरलेला होता. या दहा वर्षांत केंद्राने विहित केलेल्या पाच खडतर दुष्काळातून महाराष्ट्राला जावे लागले. त्यातील दोन भीषण होते. अनेक आक्रमक आंदोलनांना प्रशासनाला तोंड द्यावे लागले. वसंतराव ज्या कालखंडात मुख्यमंत्री होते त्यावेळच्या विधीमंडळातील विरोधी पक्षीय नेत्यांची नावे पाहिली की कोणत्या जबरदस्त तोफखान्याला त्यांना तोंड द्यावे लागत होते ते लक्षात येऊन कोणाचीही छाती दडपून जावी- आचार्य अत्रे, एस.एम. जोशी, कॉम्रेड डांगे, अहिल्या रांगणेकर, मृणाल गोरे, कृष्णराव धुळूप, उद्धवराव पाटील, त्र्यं.शि. कारखानीस, रामभाऊ म्हाळगी, हशू अडवानी, नवनीत शाह, केशवराव धोंडगे, बापूसाहेब काळदाते, एन.डी. पाटील.... ही यादी कितीतरी लांबवता येईल.

विरोध कायम राहिला पण नाईकांनी चातुर्याने व आर्जवी प्रेमळपणाने यच्चयावत विरोधकांची मने जिंकून घेतली हे सर्वांना माहीत आहे. नाईक यांच्याच काळात मराठी शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वासाचे बी पेरले जाऊन महाराष्ट्र

अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी होण्याच्या मार्गावर आला. दोन वर्षांत महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केले नाही तर मला फाशी द्या, अशी धाडसी घोषणा दुसऱ्या कोणा मुख्यमंत्र्याने केल्याचे ऐकिवात नाही. नाईकांनी ही प्रतिज्ञाही निभावून नेली. त्यांच्याच काळात 'महाराष्ट्र, द मोस्ट प्रोग्रेसीव स्टेट इन इडिया' अशी बिरुदावली टाइप करण्याची सवय इंग्रजी वृत्तपत्रांच्या वार्ताहरांच्या बोटांना लागली. वसंतराव नाईक यांच्या नावापुढे 'हरित क्रांतीचा नायक', महाराष्ट्राचा 'विकास पुरुष' अशी बिरुदे सामान्य जनताच लावू लागली. नोकऱ्यांसाठी इच्छुक असलेली दक्षिण भारतीय मुले 'इन अवर स्टेट, अप्लाय, अप्लाय अँड देअर इज नो रिप्लाय; इन महाराष्ट्र, अप्लाय टुडे अँड रिप्लाय टुमॉरो', असे सांगू लागली. महाराष्ट्राची कीर्ती अशी वाढत होती. यशवंतरावांनी सहकारी साखर कारखान्यांना उत्तेजन दिले. त्यासंबंधीचे सुसंगत कायदे किंवा दुरुस्त्या अथवा यमनियम नाईकांच्या कालावधीत झाले. राज्यातील शेकडो तालुका पातळीवरील खरेदी-विक्री सहकारी संघामार्फत एकाधिकार कापूस वा धान्यखरेदीचे व्यवहार करवून केवळ त्या सहकारी बाजार कमिट्यांनाच नव्हे तर महाराष्ट्रातील एकूणच सहकारी चळवलीला समतोल असे बळ प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याच भक्कम पाठिंब्याने पागे योजनेचे ग्रामीण रोजगारहमी योजनेत झालेले रूपांतर आणि पुढे या योजनेचा आवाका वाढवत तिचा केंद्रीय योजना आयोगाने राष्ट्रीय पातळीवर केलेला स्वीकार या गोष्टी तर सर्वश्रुत आहेत. नवी मुंबईची योजनाही त्यांच्याच खात्यात जमा होते. तसेच झोपडपट्टी निर्मूलन कार्यक्रमाचे झोपडपट्टी विकासात रूपांतर, झोपडीत राहणाऱ्यांचे जीवन सुसह्य करण्यासाठी अशा वस्त्यांना कायदेशीर करत त्यांना पाणी, वीज, रस्ते इत्यादी सोयी पुरवण्याच्या व्यवस्था निर्माण करणे या गोष्टी त्यांनी केल्या. अर्थात यासाठी विरोधी पक्षांचाही रेटा होता व त्यामुळे बरीच कल्याणकारी कामे सुसह्य झाली. कोणत्याही घट्ट बांधलेल्या राजकीय, सामाजिक वा आर्थिक अशा पुस्तकी विचारसरणीशी ते अडलेले नव्हते. त्यामुळेच अशा गोष्टी त्यांना करता आल्या असाव्यात. समाजवादी, साम्यवादी विचारांचा स्वत:चा काँग्रेस पक्ष धरून सर्वपक्षीय आमदारांच्या विचारांचा आब राखत, त्यांनी सुचवलेले कल्याणकारी-समतावादी कार्यक्रम अथवा योजना आपल्याला हव्या त्या पद्धतीने स्वीकारून, त्या मोठी टामटूम करत आनंदाने अंमलात आणत, तसेच दुसऱ्या बाजूने नाईकही बेधडक आपला अजेंडा मोठ्या चातुर्याने निर्धोक पुढे रेटत. मोरारजी व काँग्रेस श्रेष्ठींची मुंबई व तेथील व्यापार-उद्योग, आर्थिक उलाढाल करणाऱ्या प्रचंड अशा कॉर्पोरेट संस्था यांना आधार देण्याविषयीची जी यशवंतराव चव्हाण यांच्याकडून अपेक्षा होती ती त्यांनी समाधानकारक रीत्या पूर्ण केली. वसंतरावांनीही ती किमया लीलया साधली. टाटा, बिर्ला, बजाज आणि त्यावेळी उदयास येऊ लागलेले अंबानी यांची त्यावेळी मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर चांगली उठबस असे. त्या काळात खुद्द जे.आर.डी. टाटा मंत्रालयात सहाव्या मजल्यावर जाण्यासाठी लिफ्टच्या रांगेत उभे असलेले पाहिले आहे. त्यांच्याबरोबर ना कोणी वैयक्तिक साहाय्यक होता ना शिपाई. स्वत: नाईक उद्योजकांच्या फाइव स्टार मेळाव्यात आपल्या उंची सुटात पाईपमधून चोखंदळ दर्जाच्या तंबाखूचा सौम्य धूर सोडत सहज आत्मविश्वासाने वावरत. या बाबतीत त्यांची यशवंतरावांच्या पुढची पायरी. वर सांगितलेली विरोधी आमदारांची तेजस्वी प्रभावळ या बाबतीत त्यांच्यावर घणाघाती टीका करीत असे. बाहेर सुरू असलेल्या विविध आंदोलनांना तर पारावार नव्हता. दुष्काळ, पाणी-टंचाई, चारा-टंचाई, साखर व दूध टंचाई, उद्योगातील संप, युनियनच्या मारामाऱ्या, कृषिविद्यापीठांच्या मागण्या, मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या प्रकरणाची सुरुवात, भाववाढ, जातीय दंगे, दलित पँथर, शिवसेना यांचे अगडबंब मोर्चे, मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर यांचे थाळी-लाटणे मोर्चे ... एक ना दोन. उडिपी हॉटेलांतील चहाच्या कपाचे दर एक आणा किंवा दहा पैशांनी वाढले म्हणूनही मुंबईत ग्राहक संघटनांचे हुतात्मा चौकात मोर्चे आल्याचे अनेकांना स्मरत असेल. पण नाईक अविचल असल्यासारखे भासत. मुख्यमंत्र्यांची कार वातानुकूल केली म्हणून नेहमीच्या पद्धतीने त्यांच्यावर सडकून वाह्यात टीका झाली. तीही त्यांनी शांतपणे झेलली. एका वार्ताहर परिषदेत अशाच प्रकारे प्रश्न आला असता त्यांनी या कृत्याचे इतके चपखल आणि विनोदी पद्धतीने समर्थन केले की उपप्रश्न येणे शक्यच नव्हते.

मुंबईतील उद्योजकांच्या विविध अशा विकास योजनांना (त्यात नोकर कपातही आलीच) विरोध करणाऱ्या 'कम्युनिस्ट' कामगार संघटनांची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी नाईकांनी शिवसेना निर्माण केली व तिचे पोषण केले अशी विधानसभेत आणि बाहेरही प्रच्छन्न टीका होत असे. त्यामागील तथ्य अजून कुणाला कळले नाही. त्यात खरेच तथ्य असेल तर वसंतरावांच्या मुत्सद्दीपणाचा तो कळस म्हणावा लागेल. पण मग तसे पाहिले तर काही पत्रकार हे



जनकत्व यशवंतरावांना देतात तर काही वसंतदादा पाटलांना. काही आणखी पुढे जाऊन शरद पवारांना. काहीजण हा जीनियस मुंबईच्या एका उद्योजकाचा आहे, असे मानतात. खुद्द बाळासाहेब ठाकरेंना असे प्रश्न पत्रकार परिषदेत विचारले तर ते सात्विक संतापाने अपमान झाल्याप्रमाणे पेटून उठत. किंवा प्रश्नकर्त्याची वाह्यात खिल्ली उडवून त्याला सळो का पळो करून सोडत. अशा प्रश्नांना निकाली उत्तर कधीच मिळत नसते. आणि समजा त्याचे खापर वसंतरावांच्या डोक्यावर फोडले तर मग तो त्यांच्या स्वतंत्र राजकीय जीनियसचा मोठाच मुद्दा ठरू शकतो.

यशवंतरावांच्या राजकीय व सामाजिक व्यक्तिमत्त्वावर विविध विचारसरण्यांचा कसा प्रभाव पडला, हे त्यांनीच लिहून ठेवले आहे. वसंतरावांचे तसे रेकॉर्ड नाही आणि पोथीबद्ध इझम्सचे त्यांना आकर्षणही नव्हते. विचारसरणीची गुलामगिरी नसेल पण कल्याणकारी प्रशासनाची नेहरूप्रणीत मध्यममार्गी आर्थिक विकासाची संकल्पना त्यांनी आपल्या पद्धतीने राज्यात अंमलात आणण्याचे प्रयत्न केले. याबाबतीत त्यांचे व यशवंतरावांचे जुळत होते. संपत्तीच्या वाटपाची संकल्पना त्यांनी आपल्या पद्धतीने घेतली. समाजाचा सर्वांगीण विकास साधताना राज्यातील खेड्यांकडे आणि शेतकऱ्यांकडे प्राथम्यक्रमाने लक्ष पुरवले पाहिजे असा त्यांचा आक्रमक आग्रह होता. तसे करताना शहरांकडे काही काळ दुर्लक्ष झाले तरी चालेल, अशी त्यांची धारणा होती. अर्थात अशी विधाने विधिमंडळांमध्ये, जाहीर सभांमध्ये किंवा अधिकृत प्रशासकीय बैठकांमध्ये करणे शक्य नसते. पण खाजगीत बोलताना ते अधिक आक्रमक प्रांजळपणाने बोलत. खेड्यांची परिस्थिती काय आहे, ते तुम्हा शहरी पत्रकारांना काय ठाऊक? हरितक्रांतीच्या बोलबाल्यावर जाऊ नका, तळातील शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. ते अन्नपाण्याला मोताद असतात. डोक्यावर छप्पर नीट नसते. पाणी, वीज, रस्ते यांची वानवा... तिकडे प्रायॉरिटीने लक्ष द्यायचे आहे. शहरी लोकांच्या गैरसोयींची जास्त बोंबाबोंब होते. काही काळ त्यांच्या गैरसोयी झाल्या तरी बिघडत नाही... असे ते बोलत. संपत्तीच्या वाटपाची ही त्यांची रीत... खासगीत असे विचार

ते स्पष्टपणे मांडत. प्रस्तुत लेखक टाइम्स ऑफ इंडिया या इंग्रजी दैनिकात रिपोर्टर असल्याने एकास-एक मुलाखतीचे बरेच प्रसंग येत. मुख्यमंत्रीपदावरून निवृत्त झाल्यावरही त्यांच्या ग्रँड पोराडी अपार्टमेन्टमध्ये काही भेटी झाल्या. त्यावेळीही ते मनापासून बोलत. म्हणून हे इथे लिहिण्याचे धाडस केले. त्याच काळात बोलताना त्यांनी एका प्रश्नाला उत्तर दिले ते थोडे वेगळे असले तरी तेंडुलकरांकडे काढलेल्या उद्गारांशी त्याचे साम्य होते. -'सगळ्या विषारी टीका पचवून आणि प्रतिस्पर्ध्यांना नामोहरम करून मीच या खुर्चीवर राहिलो. तुम्ही विचारता, ही कसली जिद्द. सत्तेचा मोह असे म्हणाल. मोह कोणाला नसतो. जरूर मलाही होता. संपत्ती काही इथून मिळत नाही. माझा खर्च मी घरच्या उत्पन्नावर चालवत होतो. पण जिद्द वेगळी होती. यशवंतरावजी तर दिल्लीला गेले. इथे महाराष्ट्राचा हा गाडा चालवण्यासाठी माझ्याएवढा लायक दुसरा कोणीच नाही, असे माझे ठाम मत होते आणि अजूनही आहे.(इथे तत्कालीन काही घटनांसंबंधी टिपणी) आणि सांगतो, तुम्ही तपासून घ्या. असे स्वत:विषयी पूर्ण आत्मविश्वासानिशी ठाम मत असल्याशिवाय माणूस या ठिकाणी इतका काळ टिकून राहू शकत नाही... तुमच्या व्यवसायात काय चालते मला माहीत नाही. पण अशा जागेवर स्वत:च्या लायकीवर आणि श्रेष्ठत्वावर पक्की निष्ठा पाहिजे...' वगैरे.

या ठाम आत्मविश्वासामुळे ते कधी कधी केंद्राच्या काही धोरणांवरही उघडपणे कडक टीका करायला कचरत नसत. शेतमाल भावासंबंधी त्यांनी वारंवार दिल्लीवर टीका केली आहे. केवळ राज्य सरकार आपले असे शेतमालभावाचे धोरण ठरवू शकत नाही. केंद्राचे धोरण नुसतेच अव्यवहार्य नसून शेतकऱ्यांच्या अहिताचे आहे; व्यापारी व कारखानदार यांना धार्जिणे आहे, अशा तऱ्हेचे उद्गार त्यांनी भर असेंब्लीत काढल्याचे आढळेल. या भाषणाचे आणि इतरही रिपोर्ट दिल्लीला नेऊन तेथे नाईकांबद्दल चुगल्या करण्यात आल्याचे अनेकांना माहीत आहे. अशा दोन-तीन चुगलखोर पुढाऱ्यांचा वावर त्यावेळी मंत्रालयाच्या प्रेस रूममध्ये दिसत असे. नाईकांना तेही माहीत असायचे. आणि वेळप्रसंग आला तर वार्ताहरांकडेच या पुढाऱ्यांची मजेने खिल्ली उडवत. प्रेसरूममध्ये त्यांचे खबरे तर होतेच, पण दिल्लीचे आणि इतर प्रतिस्पर्ध्यांचे देखील खबरे आहेत हे आपल्याला चांगलेच ठाऊक असल्याचे एखादे वेळी ते खेळीमेळीने प्रेसला जाणवून देत. त्यात कटुता नसे.

शेती, आधुनिक कृषितंत्रज्ञान, नवे बी-बियाणे, धान्याच्या नव्या जाती, हायब्रीड कापूस, ज्वारी इत्यादी बाबतीत ते स्वत: घरच्या शेतीवर प्रयोग करतच, शिवाय राज्यस्तरावरही त्याचा मोठ्या तळमळीने प्रचार करत. विधिमंडळात वेगवेगळ्या प्रसंगाने या विषयांवर विस्तृत व मनापासून बोलत. काही गोष्टी कटाक्षाने सभागृहाच्या ध्यानात आणून देण्याचा प्रयत्न करत. महाराष्ट्रातील हरितक्रांतीचा गाजावाजा होऊ लागल्यावर ही तर धनिक शेतकऱ्यांची घरभरणी आहे, सरकार बड्या शेतकऱ्यांना धार्जिणे आहे, अशी टीका होऊ लागली. अशाच प्रश्नासंदर्भात विधानसभेत बोलताना त्यांनी काही विचार मोकळेपणाने मांडले आहेत. ते म्हणतात, की सरकारच्या सर्व योजनांचे लक्ष्य गरीब शेतकरी हाच आहे. महाराष्ट्रातील शेतकरी गरीबच आहे. जो शेतकरी आतापर्यंत दैववादी होता, तो आता कर्तृत्ववान बनतो आहे. कष्ट करून आणि नव्या पद्धती, नवे तंत्रज्ञान आत्मसात करून आत्मविश्वासाने पुढे जात आहे. शेतीशास्त्रातील टेक्निकल गोष्टी बोलू लागला आहे....काही गरीब शेतकरी आपल्या कर्तृत्वाने धनवान होत असतील तर लगेच त्याला भांडवलदार म्हणून हिणवणे हे चूक आहे. सर्वच शेतकरी दरिद्री राहिले म्हणजे सर्वांना बरोबर न्याय मिळाला, हे गणित पटत नाही. ज्या दिवशी महाराष्ट्राला हे गणित संमत होईल त्या दिवशी महाराष्ट्राची प्रगती खुंटल्याशिवाय राहणार नाही...

वरील उद्गारांमधे वसंतराव नाईक यांचे एकूणच विकास व संपत्ती वाटपाचा वेग याविषयीचे विचार स्पष्ट होतात. थोडे बारकाईने पाहिले तर गमतीची गोष्ट अशी की त्यांच्या या उद्गारांवर कम्युनिस्ट चीनमध्ये आर्थिक क्रांती घडवून आणणारे क्रांतिकारी अध्यक्ष डेंग झ्याओ पिंग यांच्या विचारांची सावली पडल्याचा भास व्हावा. पण तसे नाही. वसंतरावांचे हे उद्गार १९७०च्या मार्चमधले. डेंग हे १९७८ साली सत्तेवर आले. त्यानंतरच त्यांनी लोकहो, श्रीमंत व्हा अशा तऱ्हेची घोषणा दिली. श्रीमंत होण्यात काहीच चुकीचे नाही. नाहीतरी कम्युनिझमचे लक्ष्य सर्व जनतेला सुखी, सुखवस्तू करण्याचेच आहे. लोक कायमचे दरिद्रीच राहावेत असे कम्युनिझम म्हणत नाही. पण देशातील सर्व लोक एकदम एकाच वेळी श्रीमंत होत नाहीत. म्हणून टप्प्याटप्प्यानेच गरीबी दूर करत सधनता आणावी लागेल.... अशा तऱ्हेचे डेंग यांचे विचार होते.

रोजगारहमी योजनेची प्रशस्ती करताना देखील १९७२

मधे विधिमंडळात वेळोवेळी आपल्या विचारांना नाईकांनी शब्दरूप दिले. दुष्काळाच्या काळात किंवा एरवीही, बेरोजगारांना फुकट बेकारीभत्ता – डोल– देण्याची ही योजना नाही, हे कटाक्षाने लक्षात घेतले पाहिजे, असे ते म्हणत. कष्ट करण्याची ज्याची तयारी आहे त्याच्या हाताला काम मिळाले पाहिजे. जो काम करेल त्यालाच दाम आणि जेवढे काम करेल त्या प्रमाणातच दाम. सरकारचा पैसा वाटून आपल्याला फुकटे आळशी लोक निर्माण करायचे नाहीत. गरजू लोकांकडून विकासाची कामे या योजनेतून करवून घ्यायची आहेत, असे ते म्हणत. जानेवारी १९७२ मध्ये दुष्काळाची व्याप्ती एवढी भीषण होती की एका वेळी पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील दुष्काळी कामांवर रोजी १५ लाख लोक काम करत होते. उन्हाची प्रखरता वाढली तसा हा आकडा २५ लाखांवर गेला. मराठवाड्यातील शंभर–शंभर कोरडवाहू एकर मालकीचे शेतकरी दुष्काळी कामांवर राबत होते. सुशिक्षित बी.ए., एम.ए. झालेले तरुण खडी फोडत होते. कामाचा अधिकार कार्यरत झाल्यावर नोंदणी केलेल्या बेरोजगारांना काम नसेल तेव्हा बेकारीभत्ता देण्याची कल्पना नाईक यांना आवडली नसती हे उघड आहे. काम करेल त्यालाच दाम हे त्यांचे उद्‌गार तत्कालीन केंद्रीय नियोजनकारांच्या धोरणांवर छुपी टीकाच असल्याचे त्यावेळी बोलले गेले आणि त्यासाठी पक्षश्रेष्ठींचा रोषही पत्करावा लागला. रोजगारहमी योजनेचे स्वरूप व आवाकाच एवढा प्रचंड आहे की योजना कडक शिस्तीने राबवली नाही तर त्यात गैरव्यवहारालाही मोठा वाव निर्माण होतो. नोकरशाहीच्या भोंगळपणामुळे पुष्कळ ठिकाणी तसे प्रकार झाले. परंतु असे होते म्हणून योजनाच बदनाम करू नका असे वसंतरावांचे कळकळीचे सांगणे असे. पुढे जागतिक बँकेने गौरवून नियोजन मंडळानेच योजना स्वीकारल्याने तिची योग्यता सिद्ध झाली.

वसंतराव नाईक यांनी मुख्यमंत्री म्हणून घेतलेला एक महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय बऱ्याच वेळा सरकारी प्रसिद्धीच्या याद्यांमधून गाळलेला दिसतो. राज्यावर आल्यावर दोन वर्षांच्या आत दारुबंदीविषयीचे धोरण शिथिल करून बंदी टप्प्याटप्प्याने उठवण्याचा निर्णय घेतला. त्यावर काँग्रेसपक्षात देशव्यापी काहूर मोजले. पक्षातील मोरारजी, ढेबर यासारख्या गांधीवादी पुढाऱ्यांनी जोरदार टीका केली. पक्षाच्या सर्व स्तरांवर निषेध झाला. आधीच वसंतरावांची वेषभूषा, डोक्यावर टोपी न घालण्याचा त्यांचा ठाम निर्धार, त्यांनी काही ठिकाणी टकळी–चरखा–सूतकताई इत्यादी गांधीवादी फॅडांविषयी प्रांजळपणे व्यक्त केलेले आपले मत इत्यादी गोष्टींमुळे पक्षातील हा गट नाराज होता. वसंतरावांनी त्यांच्या टीकेला उत्तर दिले नाही पण कमीही लेखले नाही. दारुबंदीमुळे केवळ मुंबई–पुणेच नव्हे तर राज्यातील सर्व शहरी व ग्रामीण भागांत फोफावलेल्या बेकायदेशीर दारु गाळण्याच्या भट्ट्या, त्यातून वाढलेली गुन्हेगारी वृत्ती, या उद्योगाच्या आश्रयाने वाढलेले इतर गुन्हेगारी स्वरूपाचे उद्योग, बेकायदेशीर वाहतूक, स्मगलिंग आणि या सर्वांचा पोलिसांच्या नीतिमत्तेवर होणारा परिणाम, तसेच अशुद्ध किंवा विषारी दारुचे दुष्परिणाम अशाच गोष्टींविषयी ते थंडपणे बोलत राहिले. एक मात्र झाले, मुंबईसारख्या शहरी भागांमधे ज्या धनिक व उच्च मध्यमवर्गीय वर्गांमधे माफक प्रमाणात सुसंस्कृत पद्धतीने मद्यपानाची सवय होती त्यांना दारुबंदीमुळे गुन्हेगारांप्रमाणे चोरटे वाटत असे, त्यातून वसंतराव नाईकांनी त्यांची सुटका केली. या स्टायलिश जोधपुरी सुटातील 'पाइप–स्मोकिंग' चीफ मिनिस्टरची प्रतिमा मुंबईच्या धनिकांमध्ये आणि इंग्रजी वृत्तपत्रांमधे अधिकच उजळ झाली. त्यांच्या कृषीविकासाच्या ध्यासामुळे महाराष्ट्रातील सर्वसामान्य शेतकरी देखील त्यांच्याविषयी सहसंवेदना बाळगून होता.

वसंतराव नाईक हे फार मोठे 'मास लीडर' होते असे नव्हे. पण त्यांच्यामध्ये दुसरी कोणतीतरी कळीची जादू होती की ज्यामुळे मोठमोठ्या जाहीर सभा त्यांची भाषणे तन्मयतेने ऐकत असत. मुंबईच्या वार्ताहरांना त्यातील इंगित कळत नसे. मुंबईतील औद्योगिक कामगारांना नाईकांविषयी फारसे प्रेम नव्हते हे जाहीर आहे. ग्रामीण भागात वसंतरावांबरोबर गेलेले शहरी वार्ताहर शेतकऱ्यांच्या सभांमध्ये वसंतरावांचे 'रटाळ' भाषण सुरू झाले की लगेच बोअर होऊन चकाट्या पिटू लागत किंवा बिड्या प्यायला, चहा मारायला उठून जात. तेच भाषण डोळे विस्फारून, तोंडाचा आ वासून मन लावून ऐकणाऱ्या शेतकऱ्यांकडे त्यांनी लक्षपूर्वक पाहिले असते तर त्यांना थोडा उलगडा होऊ शकला असता. वसंतराव बोलत ते सध्याच्या शेतीच्या अवस्थेबद्दल, ती परिस्थिती बदलण्याच्या नेमक्या उपायांसंबंधी, शेतीच्या नव्या पद्धती, हायब्रीड बियाणे, नवे तंत्रज्ञान, शेतीशास्त्रातील नवे शोध यांबद्दल. पाच–सात वर्षांनंतर याच गोष्टी महाराष्ट्रात सर्वत्र दिसू लागल्या. त्यांच्या भाषणांचा ग्रामीण श्रोतृवर्ग वाढीस लागला...

खरे म्हणजे सगळ्या जगासाठीच १९६५ ते १९७४ ही

वर्षे हा झपाटलेला कालखंड होता. भारत-चीन युद्ध १९६२ चे. आणि १९७४ च्या सुमारासच टीपेला पोचलेली गुजरात व बिहारमधील विद्यार्थ्यांची आंदोलने, जयप्रकाशांचे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन व त्यातून उद्‌भवलेली आणीबाणी, निवडणुका, इंदिरा गांधींचा पाडाव, केंद्रस्थानी प्रथमच आलेले बिगर काँग्रेस जनता पक्षाचे सरकार, त्या सरकारचे कोलमडणे आणि पुन्हा इंदिराबाईंची १९८० मध्ये दिल्लीत प्रस्थापना अशी १९६० ते १९८० ही दोन दशके देशाच्या दृष्टीने खळबळीची व नाट्यमय प्रसंगांनी खचून भरलेली होती. याच दरम्यान अकरा वर्षे महाराष्ट्रात मुख्यमंत्रीपदावर राहून वसंतरावांनी पक्षाला दोन निवडणुका जिंकून दिल्या आणि तीन वेळ विधिमंडळ पक्षाने त्यांना मुख्यमंत्री म्हणून निवडून दिले. अर्थात यात इंदिरा गांधी यांचा देशव्यापी करिष्मा, यशवंतराव चव्हाणांचे महाराष्ट्रातील वजन यांचाही वाटा होताच. या दुहेरी करिष्म्याच्या झळाळीमध्ये वसंतरावांची जमीनीवरची महत्त्वाची कामगिरी झाकोळून जाते. शेवटी करिष्मा कॅश करण्यासाठी जागेवर ठेंबेठोक असा वजनदार माणूस उभा पाहिजे. श्रेय देताना त्याचाच विसर पडतो. हे सगळीकडेच होते. १९७४ मधील दुष्काळाची झळ, जागतिक भाववाढ, त्या परिणामी साऱ्या भारतात व महाराष्ट्रात निर्माण झालेली अभूतपूर्व टंचाई, भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाची वाढत चाललेली तीव्रता आणि या सर्व गोष्टींमुळे इंदिरा गांधींच्या स्थानाला निर्माण होत असलेला धोका यामुळे एक विचित्र उष्णतेचे वातावरण देशात तयार झाले होते. त्यावर उपाय म्हणून इंदिराबाईंना राजकारणाची दिशाच बदलून टाकायची होती. त्यासाठी यशवंतरावांचे पंख कापणे त्यांना आवश्यक वाटत होते. त्या गडबडीत वसंतरावांना राजीनामा देऊन इंदिराबाईंचे खंदे समर्थक व यशवंतरावांचे प्रतिस्पर्धी शंकरराव चव्हाण यांना वाट करून द्यावी लागली. हे साध्य करण्यासाठी वसंतरावांच्या पक्षातील विरोधकांनी मोठाच धुरळा उडवून त्यांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न केला. त्या मलीन प्रतिमेसहच त्यांना जावे लागले. त्याचाही काहीसा परिणाम वसंतराव नाईकांचे मूल्यमापन करणाऱ्यांच्या विचारपद्धतीवर होतो असा अनुभव आहे.

सुरुवातीला वसंतरावांच्या कारकिर्दीचे मूल्यमापन करताना काही मुद्दे उपस्थित केले होते. या सर्व विवरणातून आपल्या मूळ प्रश्नाचे उत्तर मिळू शकते. अकरा वर्षे एवढी महत्त्वाची कामगिरी पार पाडूनही वसंतराव नाईक यांना यथायोग्य असे श्रेय देण्यात महाराष्ट्र कमी का पडलेला आहे? संध्येतील नामावळीप्रमाणे महाराष्ट्रातील कर्तबगार मुख्यमंत्र्यांची नावे घेताना यशवंतरावांनंतर एकदम उडी मारून वसंतदादा पाटील, शरद पवार अशी गाडी जाते. बहुतकरून अनवधानाने वसंतरावांचे नाव राहून जाते. हा प्रकार पश्चिम महाराष्ट्रातच नव्हे तर विदर्भातही घडतो. त्याची कारणे वेगळी आहेत. या चर्चिलेल्या दशकांत सर्वांगाने विकसित झालेल्या महाराष्ट्राचा प्रामाणिक आढावा घेतला तर असे दिसते की वसंतराव नाईक हे स्वतंत्र बुद्धीचे व स्वतंत्र प्रज्ञेचे नेते होते व त्यामुळेच यशवंतरावांचा यथायोग्य मान ठेवत त्यांनी आपल्या पद्धतीने तळमळीने महाराष्ट्राचा विकास साधण्याचा प्रयत्न केला आणि राज्याला देशाच्या नकाशात उच्च स्थानावर नेऊन ठेवले. त्यांच्यानंतर दहा-पंधरा वर्षे तरी महाराष्ट्र हे स्थान टिकवून होता. सध्या विकासाच्या व इतर अनेक मापदंडांमध्ये महाराष्ट्राचे स्थान वेगाने घसरत आहे, हे खरे. इतर राज्यांनी महाराष्ट्रापासून विकासाचे धडे गिरवले आणि ते पुढे गेले, यात वैषम्य वाटण्याचे कारण नाही, असे आपण म्हणू शकतो. शिवाय त्या घसरणीची कारणमीमांसा करण्याचे हे स्थान नव्हे. त्यामुळे यशवंतराव व वसंतराव या दोघांचीही महाराष्ट्राच्या दृष्टीने असलेली महत्ता कमी होत नाही.

खरे म्हणजे महाराष्ट्राच्या विद्यापीठातील राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी व पीएच.डी.च्या स्नातकांनी या दृष्टिकोनातून नाईक यांच्या कारकिर्दीचा अभ्यास केला तर त्यातून काही चांगले निष्पन्न निघू शकेल. विधिमंडळातील वसंतराव नाईक यांच्या निवडक भाषणांचा संग्रह प्रसिद्ध करून विधिमंडळ सचिवालयाने त्यांचे हरवलेले श्रेय त्यांना परत देण्याच्या प्रयत्नातील पहिले पाऊल टाकले आहे. त्याबद्दल तेथील प्रधान सचिव डॉ. अनंत कळसे, ग्रंथाचे समन्वयक संपादक नागेश केसरी व संपादक मंडळ यांचे अभिनंदन केले पाहिजे.

(महाराष्ट्र विधानमंडळाचे प्रधान सचिव डॉ. अनंत कळसे आणि समन्वय संपादक तथा वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे संचालक नागेश केसरी यांच्या सौजन्याने)

**अरुण साधू**
४५, पत्रकार वसाहत
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००७१
sadhu.arun@gmail.com

# एक सत्शील नेता- बाळासाहेब खेर

**गिरीश जोशी**

बाळासाहेब खारला राहायला आले असता एके दिवशी नित्यनियमाप्रमाणे ते फिरायला बाहेर पडले. त्यावेळेस खार रेल्वेस्टेशनच्या पूर्वेकडील 'चमडेवालाकी वाडी' पाहून ते हादरूनच गेले. जनावरापेक्षाही हीन अवस्थेत जगणारी तेथील प्रजा पाहून ते प्रचंड अस्वस्थ झाले. तेथील लोकांना निदान माणसाप्रमाणे जीवन जगण्याची संधी मिळावी म्हणून त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. सार्वजनिक स्वच्छता, आरोग्यसेवा आणि त्या लोकांसाठी शिक्षणाची सोय बाळासाहेबांनी सुरू केली. पाहता पाहता त्या वस्तीचे स्वरूप पालटले. पुढे बाळासाहेब जेव्हा दुसऱ्यांदा मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री झाले तेव्हाही ते त्या वस्तीत जात व तेथील लोकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करीत. त्या वस्तीतील एका कार्यक्रमात तर बाळासाहेबांमुळे भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूही सहभागी झाले होते.

देशाची एकूण सामाजिक आणि राजकीय सद्यस्थिती पाहता, साठ-सत्तर वर्षांपूर्वी महाराष्ट्र शासनात स्वच्छ आचार, स्वच्छ विचार, तसेच बुद्धिमान असलेल्या राजकीय व्यक्ती कार्यरत होत्या. त्यांना सामान्य माणसांबद्दल तळमळ होती. समाजकारण, राजकारण याबद्दल प्रामाणिक आस्था होती. असं सांगितलं तर आजच्या सामान्य जनतेस ती दंतकथा वाटेल, कदाचित त्यांचा त्यावर विश्वासही बसणार नाही. मात्र वास्तवात तशा निष्ठावान व्यक्ती कार्यरत होत्या हेदेखील तितक्याच ठामपणे सांगणं क्रमप्राप्त आहे. दुर्दैव इतकंच की संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर मोठ्या चतुराईने, कोणाला समजून येणार नाही अशा रीतीने त्या निष्ठावान व्यक्तींचं अस्तित्व अक्षरश: पुसून टाकण्यात आलं. आणि ते करणाऱ्यांना त्यात यशही आलं. कारण आज त्या निष्ठावान व्यक्तींचं नाव सरकारी पातळीवरच काय सामान्यांच्या स्मृतीतूनही निघून गेलंय. त्यातलं एक प्रमुख नाव बाळासाहेब खेर.

महाराष्ट्र राज्य अस्तित्वात येण्याआधी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात मुंबई प्रांताचे नामदार बाळासाहेब खेर हे मुख्यमंत्री होते. त्या काळात मुंबईच्या मुख्यमंत्र्यांना पंतप्रधान असेही संबोधले जाई. तत्कालीन मुंबईप्रांतात आजचा महाराष्ट्र, गुजरात आणि कर्नाटक प्रांतातील काही प्रदेशाचा समावेश होता. बाळासाहेब खेर हे अनुक्रमे १९३७ आणि पुढे १९४६ मध्ये मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री होते. जरी नामाभिधान आणि भौगोलिक सीमा वेगळ्या असल्या तरी एका अर्थाने बाळासाहेब खेरांना आपले मुख्यमंत्री म्हणण्यास सुजाण व्यक्तींचा आक्षेप नसावा.

बाळासाहेब खेरांचा जन्म २४ ऑगस्ट १८८८ रोजी रत्नागिरीला झाला. मात्र त्यांचे प्राथमिक शिक्षण कुंदगोळला झाले. त्यामुळे बाळासाहेबांना कानडी भाषाही उत्तमप्रकारे लिहिता, वाचता आणि बोलता येत होती. माध्यमिक शिक्षणासाठी बाळासाहेब पुण्याला आले. १९०२ मध्ये म्हणजेच वयाच्या १४ व्या वर्षी ते मॅट्रिकची परीक्षा उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले व पुढे उच्च शिक्षणासाठी त्यांनी मुंबईच्या

विल्सन महाविद्यालयात प्रवेश घेतला. पुढे इंटर आर्टस् व पदवी परीक्षेत मुंबई विश्वविद्यालयात ते संस्कृत विषयात सर्वप्रथम आले होते. त्यामुळे हरजीवनदास माधवदास शिष्यवृत्तीचे व भाऊ दाजी बक्षिसाचे ते मानकरी झाले. पदवीपरीक्षेनंतर बाळासाहेबांनी १९०८ मध्ये एल.एल.बी. ही पदवी संपादन केली. त्या काळात एक हुशार, निगर्वी, मेहनती आणि उत्तम विद्यार्थी म्हणून बाळासाहेबांची ख्याती होती.

तत्कालीन भारतीय नागरीकांप्रमाणेच बाळासाहेबांनाही मातृभूमीचे पारतंत्र्य मनोमन डाचत होते. राष्ट्राभिमानाचे बाळकडू लहानपणातच त्यांना मिळाले होते. त्यांच्या वडिलांनी टिळकांबद्दल वाटणाऱ्या आदराचे प्रतीक म्हणूनच त्यांचे नाव बाळ ठेवले होते. लहानपणातील संस्कारांमुळे बाळासाहेब स्वातंत्र्य आंदोलनात न उतरते तरच नवल होते. १९२२ मध्ये मोतीलाल नेहरू व सी. आर. दास यांनी स्थापन केलेल्या स्वराज पार्टीचे ते त्यांच्यातील स्वकर्तृत्वावर मुंबई शाखेचे सेक्रेटरी झाले. पुढे काही कारणाने स्वराज पार्टीचे काँग्रेसपक्षात विलीनीकरण झाले आणि संपूर्ण देशाचे नेतृत्व गांधीजींकडे आले. ते साऱ्यांनी मनापासून स्वीकारले. बाळासाहेबही त्याला अपवाद नव्हते. बाळासाहेबांची संपूर्ण हयातीतील गांधी तत्त्वज्ञान निष्ठा वादातीत होती.

सुराज्याशिवाय स्वातंत्र्यप्राप्ती यशस्वी होऊ शकणार नाही, असे बाळासाहेबांचे ठाम मत होते. त्यासाठी जनजागृती होणे आवश्यक आहे असे त्यांना वाटे. त्याचबरोबर जनहितासाठी कायद्याचा वापर अधिक सक्षमपणे झाला पाहिजे. समाजातल्या अगदी शेवटच्या स्तरावरील व्यक्तीच्याही हक्कांची पायमल्ली होता कामा नये असे त्यांना मनोमन वाटे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला किमान पातळीवर तरी कायद्याचे ज्ञान आवश्यक आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती होणे गरजेचे होते. कारण सरकार कायदा करते, मात्र कायद्याची अंमलबजावणी होते का नाही हे पाहण्यासाठी घरोघर फिरू शकत नाही. म्हणून कायद्याच्या सार्वत्रिक प्रचारासाठी १९२३ मध्ये त्यांनी 'बॉम्बे लॉ जर्नल' हे कायदाविषयक भारतातील पहिले मासिक प्रकाशित केले. या मासिकाचे ते संस्थापक-संपादक होते. तसेच सामान्य माणसाला कायदाविषयक मदत सुयोग्य रीतीने आणि अल्प मोबदल्यात मिळावी, या हेतूने बाळासाहेब इनकॉर्पोरेटेड लॉ सोसायटीचे सक्रिय सदस्य झाले. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कायद्याची सुजाण अंमलबजावणी व्हावी यासाठीचा त्यांचा तो प्रयत्न होता. समाजसेवेचे एक अंग म्हणून ते राजकारणात ओढले गेले. राजकारणात प्रवेश करताना विचारात श्रद्धा, शब्दांत सूज्ञता, कृतीत धैर्य आणि जीवनात सेवा हेच त्यांचे ब्रीद होते. बाळासाहेब खेर हे जेव्हा मुंबई प्रान्ताचे पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले तेव्हा भारतात स्वातंत्र्यप्राप्तीचे आंदोलन ऐन बहरात होते. त्यातच जागतिक मंदीचीही लाट उसळली होती. वॉल स्ट्रीटची पडझड झाली होती. संपूर्ण जगाच्या अर्थकारणावर त्याचा विपरीत परिणाम होत होता, शिवाय याचकाळात जर्मनीत हिटलरचा आणि रशियात स्टॅलीनचा उदय झाला होता तर स्पेनमध्ये यादवी माजली होती. ह्या सगळ्या घडामोडींचे परिणाम भारतीय लोकजीवनावर कळत नकळत मात्र अपरिहार्यपणे होत होते. रुपयाची पाचावर धारण बसत महागाई वाढत होती. या सर्वांवर कडी म्हणजे १९३९ मध्ये ब्रिटनने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. काँग्रेसला नाझीझमबद्दल घृणा असली तरी इंग्लडने एका शब्दानेही न विचारता भारताला परस्पर युद्धात ओढले हे काँग्रेसला पसंत नव्हते. यामुळे २२ ऑक्टोबर १९३९ रोजी काँग्रेस वर्किंग कमिटीने भारतातील सर्व काँग्रेस सरकारांनी राजीनामा द्यावा, असे आवाहन केले. या पक्षादेशानुसार खेर मंत्रिमंडळाने आपला राजीनामा दिला. त्यानंतर बाळासाहेब खेर स्वातंत्र्य आंदोलनात अधिकच सक्रिय झाले. त्या कारणाने त्यांना कारावासही भोगावा लागला.

बाळासाहेब मुख्यमंत्री असताना त्यांनी स्वतःकडे स्वेच्छेने शिक्षणखाते ठेवले होते. मुख्यमंत्र्यांनी स्वखुशीने स्वतःकडे शिक्षणखाते ठेवावे ही त्या काळातही एक आगळीवेगळीच घटना होती. गांधीजींच्या 'नई तालीम' या शिक्षणविशयक तत्त्वांशी असलेल्या आपल्या बांधिलकीमुळे बाळासाहेबांनी स्वतःसाठी शिक्षणखाते निवडले होते. आपल्या अधिकारात त्यांनी शिक्षणक्षेत्रात धडाडीने अनेक बदल सुचवले व ते अमलात आणण्याचाही प्रयत्न केला. शिक्षण अधिकाधिक जीवनाभिमुख केले. हे धोरण राबवताना केवळ एक काहीतरी नवीन करण्याचा त्यांचा वृथा अट्ट नव्हता. भारतीय संस्कृतीला पोषक असे शिक्षण असावे ही त्यांची त्यामागची धारणा होती. त्यासाठी त्यांनी शिक्षणक्षेत्रासाठी खऱ्या शिक्षणतज्ज्ञांची एक समिती नियुक्त केली. अभ्यासक्रमात काही मूलभूत स्वरूपाचे बदल घडवून आणले. भारतीय शिक्षणपद्धतीत हिंदीला सुयोग्य आणि मानाचे स्थान मिळालेच पाहिजे याबाबत बाळासाहेब आग्रही होते. त्याचबरोबर शिक्षणाचा सार्वत्रिक स्तरावर विस्तार झाला पाहिजे आणि तळागाळातल्या विद्यार्थ्यालाही शिक्षणाची संधी



मिळाली पाहिजे या हेतूने ज्या ग्रामीण भागात सरकारी शाळा नाही, तेथे शिक्षणासाठी या नव्या सरकारने खाजगी प्राथमिक शाळा उघडण्यास उत्तेजन दिले. त्यामुळे १९३६-३७ मध्ये सरकारी अनुदानित शाळांची १८०३ असलेली संख्या १९४१-४२ मध्ये ८०४९ झाली. शाळेत विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी उत्तम प्रशिक्षित शिक्षक मिळावेत म्हणून प्रथम बाळासाहेबांनी शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी खाजगी प्रशिक्षण संस्था स्थापण्यास उत्तेजन दिले. शिवाय त्या संस्थात प्रशिक्षणार्थींना सरकारी खर्चाने शिक्षण देण्याची व्यवस्था केली. या त्यांच्या धोरणामुळे खाजगी संस्थाचालकांच्या मनमानीवर सरकारी सजग अंकुश ठेवणे सहजशक्य झाले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शालेयशिक्षणात कला आणि शारीरशिक्षण ही शिक्षणक्रमातील दोन महत्त्वाची अंगे आहेत, हे ध्यानी घेऊन विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना चालना देण्यासाठी शाळाशाळांत चित्रकला शिक्षकांबरोबरच हस्तकलेच्या तज्ज्ञ शिक्षकांचीही नेमणूक करण्यात आली.

स्वामी कुवलयानंद यांच्या अहवालानुसार त्याकाळी मुंबईतील कांदिवली येथे शारीरशिक्षणाचे प्रशिक्षण देण्यासाठीही एक संस्था स्थापन करण्यात आली. तसेच शारीर शिक्षण कमिटीचीही स्थापना करण्यात आली. राष्ट्राच्या सबलीकरणासाठी आधी राष्ट्रातील नागरिक सबल झाले पाहिजेत आणि त्यात शासनानेही डोळसपणे सहभागी झालेच पाहिजे, हे बाळासाहेब खेरांचे आग्रही मत होते. संपूर्ण जनतेत शिक्षणात अंतर्भूत होणारे सर्व ज्ञान प्रसारीत करून त्याची साधने सर्वत्र उपलब्ध होतील, याकडेही त्यांनी लक्ष पुरवले. शारीरिक शिक्षणात केवळ शरीराचे बळ व स्नायू वाढवणारी प्रवृत्ती श्रेष्ठ मानू नये. त्याचबरोबर जीवनात स्वदेशी व विदेशी खेळांना महत्त्व द्यावे. तसेच केवळ अंधपरंपरेला जखडून राहिल्याने आपले पाऊल प्रगतिपथावर पडणार नाही म्हणूनच स्त्रियांनीही अबला राहू नये. यासाठी स्त्रियांनाही शारीरिक शिक्षण द्यावे असा त्यांचा अट्टहास असे.शारीर शिक्षणासाठी सर्वत्र क्रीडांगणे उपलब्ध असावीत. तसेच वर्षातून एकदा शारीरिक शिक्षणदिन पाळावा, अशी आपली शारीरशिक्षणाविषयीची मते बाळासाहेब सदैव आपल्या व्याख्यानांतून मांडत. स्त्रीशिक्षणासाठी विशेष प्रयत्न करणाऱ्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विश्वविद्यालयीन पदव्यांना इतर विद्यापीठीय समकक्षतेची मान्यता त्यांच्याच काळात प्राप्त झाली. भारतातील शिक्षणक्षेत्रात प्रौढ साक्षरतेचा टप्पाही महत्त्वपूर्ण आहे हे ध्यानात ठेवून प्रौढशिक्षणाच्या कार्यवाहीसाठी एका महामंडळाची स्थापना बाळासाहेबांनी केली. त्यासाठी योग्य निधीही उपलब्ध करून देण्यात आला.

शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणाला त्याची स्वतःची अशी एक मर्यादा असते हे जाणून घेण्यासाठी इतर मौलिक ग्रंथाची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळेच आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीत बाळासाहेबांनी ग्रंथालयांकडेही विशेष लक्ष पुरवले. १९३३ पर्यंत गृहखात्याच्या अखत्यारीत असलेला ग्रंथालय विभाग बाळासाहेबांनी शिक्षणखात्याच्या अखत्यारीत आणला व ए.ए.ए. फैय्याज यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथालय समितीची स्थापना केली. निरक्षर, साक्षर व सुशिक्षित अशा जनता-जनार्दनाची वैचारिक जडणघडण करण्यात ग्रंथालयाचा वाटा सिंहाचा असतो. म्हणूनच इयत्ता सातवीपर्यंत शाळा असलेल्या प्रत्येक गावात ग्रंथालय असावे, मराठी ग्रंथालयांची संघटना व संवर्धन करून त्यांच्या अभिवृद्ध्यर्थ शक्य त्या मार्गाने सर्वांनी झटावे, ग्रंथालय चळवळीला वाहिलेले एक नियतकालिक असावे, ग्रंथ प्रदर्शने भरवावीत, ग्रंथ नामसूची तयार करावी व ती सातत्याने अद्ययावत करावी, फिरत्या पेट्यांची ग्रंथालये सुरू करावीत असे काही उपाय बाळासाहेबांनी ग्रंथालय चळवळ दृढमूल व्हावी, या हेतूने सुचवले होते.

बाळासाहेब खेरांनी शिक्षण हे अधिकाधिक मानवी



जीवनसन्मुख करण्याचा प्रामाणिक व सातत्यपूर्ण प्रयत्न केला. शिक्षणपद्धतीत विद्यार्थ्याएवढाच शिक्षकही महत्त्वाचा आहे त्यामुळे शिक्षकाचा सामाजिक दर्जा, त्याचे राहणीमान व त्यासाठी आवश्यक असणारे आर्थिक पाठबळ याचाही विचार त्यांनी केला. शिक्षणाचा एवढा सांगोपांग विचार करूनही त्यांनी घेतलेल्या एका निर्णयामुळे त्यांना सदैव टीकेचेच धनी व्हावे लागले. तो निर्णय म्हणजे शिक्षणातून त्यांनी इंग्रजी भाषेचे उच्चाटन करण्याचा केलेला प्रयत्न आणि प्रादेशिक भाषेस दिलेले प्राधान्य. या धोरणाची अंमलबजावणी सुरू झाल्यावर समाजातील तथाकथित विचारवंतांमध्ये या निर्णयावर टीका करण्याची फॅशनच झाली. अजूनही त्या पिढीतील अनेक लोकांची धारणा अशी आहे की, बाळासाहेबांच्या धारेणामुळे महाराष्ट्रातील एका पिढीचे भयंकर नुकसान झाले.

परंतु या धोरणामागे बाळासाहेबांचा इंग्रजी भाषेचा द्वेष अथवा तिरस्कार अजिबातच नव्हता. स्वतः बाळासाहेब इंग्रजी भाषेचे उत्तम जाणकार होते. इंग्रजी भाषेचे ते सुजाण अभ्यासक होते. इंग्रजी भाषेतील उत्तमोत्तम वाङ्मयीन उतारे त्यांना तोंडपाठ होते. मात्र शिक्षणशास्त्राच्या निकषानुसार मातृभाषेतील शिक्षण हे अधिक परिणामकारक असते. तसेच मातृभाषेतून संक्रमित होणार ज्ञान आकलण्यास व व्यक्त करण्यास अधिक सुगम असते, शहरात आणि विशेषतः खेड्यापाड्यापर्यंत एकाच पातळीचे शिक्षण सर्वांना मिळावे, शिक्षणामुळे समाजात दुही निर्माण होऊ नये यासारख्या काही हेतूंनी बाळासाहेबांनी शिक्षणात मातृभाषेला अधिक प्राधान्य दिले. राष्ट्रीय अस्मिता ही परकीय भाषेतून वाढीस लागत नाही. भाषा हे विचाराभिव्यक्तीचे एक साधन आहे. भाषा म्हणजे साध्य नाही. भाषा ही विणकराच्या मागाप्रमाणे असते. माग महत्त्वाचा असला तरी त्यायोगे विणले जाणारे वस्त्र हे त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे असते. तद्वत् भाषारूपी मागाद्वारे विणले जाणारे विचारवस्त्र हे अधिक महत्त्वपूर्ण असते अशी त्यांची भाषाविषयक भूमिका होती. समाजात भाषिक दुराभिमान निर्माण न होता राष्ट्राभिमान वर्धिष्णू व्हावा यासाठी बाळासाहेबांनी शिक्षणात देशी भाषांचा आग्रह धरला होता. परंतु ह्या वैचारिक भूमिकेची डोळस अंमलबजावणी समाजमानसापर्यंत सुव्यवस्थित रित्या न झिरपल्याने बाळासाहेबांच्या भाषाविषयक धोरणाची थट्टा अथवा निंदा केली गेली. बाळासाहेबांच्या या भाषाविषयक धोरणाला विरोध करणारी मंडळी आज मात्र व्यासपीठावरून राष्ट्रीय जीवनातून इंग्रजीचे उच्चाटन करण्याच्या सवंग घोषणा देताना दिसतात. अथवा मराठी भाषेच्या आजच्या अवनतीवस्थेबद्दल गळे काढताना दिसतात किंवा आपल्या पुढच्या पिढयांना उत्तम इंग्रजी माध्यमाच्या शाळांत घालून मराठी भाषेच्या भवितव्याबद्दल इंग्रजी भाषेतूनच मोठ्या कळकळीने विचार मांडतात.

मुंबई प्रांत सरकारने शिक्षणाबरोबरीनेच बहुजन हिताय आणि बहुजन सुखाय निर्णय घेऊन त्यांची डोळस अंमलबजावणी करत असतानाच, राजकीय परिस्थितीत झालेल्या बदलामुळे गांधीजींनी दिलेल्या आदेशानुसार राजीनामे दिले व बाळासाहेब खेरांची मुख्यमंत्रीपदाची दोन वर्षांची कारकीर्द संपुष्टात आली. मंत्रिमंडळाच्या



राजीनाम्यानंतर बाळासाहेब समाजकार्यात अधिकच सक्रिय झाले. 'पहिले ते समाजकारण' हीच बाळासाहेबांची खरी प्रवृत्ती होती. राजकीय जीवनातून अथवा राजकीय जीवनासाठी समाजकारण हे बाळासाहेबांचे जीवनसूत्र नव्हते. बाळासाहेब आपल्या राजकीय कारकिर्दीपेक्षा सामाजिक कारकिर्दीला अधिक महत्त्व देत असल्याने, सत्ताप्राप्ती हे त्यांचे ब्रीद नव्हते, म्हणून पुन्हा नव्याने त्यांनी समाजकार्य सुरू केले.

बाळासाहेब खारला राहायला आले असता एके दिवशी नित्यनियमाप्रमाणे ते फिरायला बाहेर पडले होते. त्यावेळेस खार रेल्वेस्टेशनच्या पूर्वेकडील 'चमडेवालाकी वाडी' पाहून ते हादरूनच गेले. जनावरापेक्षाही हीन अवस्थेत जगणारी तेथील प्रजा पाहून ते प्रचंड अस्वस्थ झाले. त्या लोकांची स्थिती सुधारण्याचा त्यांनी मनोमन निश्चय केला. त्यासाठी ते स्वत: सातत्याने त्या वस्तीत जाऊ लागले. तेथील लोकांना निदान माणसाप्रमाणे जीवन जगण्याची संधी मिळावी म्हणून, त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. सार्वजनिक स्वच्छता, आरोग्यसेवा आणि त्या लोकांसाठी शिक्षणाची सोय बाळासाहेबांनी सुरू केली. पाहता पाहता त्या वस्तीचे स्वरूप पालटले. पुढे बाळासाहेब जेव्हा दुसऱ्यांदा मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री झाले, तेव्हाही ते त्या वस्तीत जात व तेथील लोकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करीत. त्या वस्तीतील एका कार्यक्रमात तर बाळासाहेबांमुळे भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूही सहभागी झाले होते. 'चमडेवालाकी वाडी'चा बाळासाहेबांनी जो कायापालट केलेला होता त्याबद्दलची कृतज्ञता म्हणून त्या लोकांनी त्या विभागाचे 'खेरवाडी' असे पुढे नामाभिधान करवून घेतले. एवढेच नव्हे तर वांद्र्याच्या नंदादीप उद्यानात बाळासाहेब गेल्यानंतर बाळासाहेबांचा पूर्णाकृती पुतळाही उभारला. त्यासाठी खेरवाडीतील लोकांनी उत्स्फूर्तपणे वर्गणी जमा केली होती. चमडेवालाकी वाडीतील लोकांबरोबरच आदिवासींच्या कल्याणासाठीही बाळासाहेबांनी अनेक योजना आखल्या. या योजनांद्वारे आदिवासी जीवनाची स्वतंत्र ओळख जोपासत बाळासाहेबांनी त्या आदिवासींना देशाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला होता. परंतु काही मंडळींच्या हटवादीपणातून जेव्हा याबाबत शासनाला आंधळा विरोध सुरू झाला तेव्हा अतिखेदाने मात्र कठोर पावले उचलून बाळासाहेबांनी त्या बंडाचा बीमोड केला. सर्वसामान्यांच्या भल्यासाठी कुळकायदा आणि भाडेकायदाही अमलात आणला. भ्रष्ट लोकानुनय अथवा वैयक्तिक किंवा पक्षीय स्वार्थासाठीही तत्त्वच्युती हा शब्द बाळासाहेबांच्या शब्दकोशात नव्हता. व्यवहारात आपण जरी मुख्यमंत्री असलो तरी मनोमन आपण गांधीजींचे अनुयायी आणि जनताजनार्दनाचे सेवक आहोत, हीच बाळासाहेबांची दृष्टी होती. अन्नधान्य टंचाई, लोकसंख्येचा स्फोट, निर्वासितांचे लोंढे, काळाबाजार, जातीय तेढ यांसारखे जटील आणि गुंतागुंतीचे प्रश्न मानवता–वादी दृष्टिकोनातून सोडवण्याचा बाळासाहेबांनी शर्थीनं प्रयत्न

केला. सवंग लोकप्रियता टाळत आणि वेळप्रसंगी विरोधही पत्करत, आपल्या कृतीतील सत्यता लोकांना पटवून देण्याचा प्रयत्न करीत बाळासाहेब आपला लोकसेवेचा मार्ग आचरत होते. त्याचबरोबर प्रांताचा मुख्य म्हणून प्रांतातील चांगल्या कृतींचे अथवा प्रगतीचे श्रेय त्यांनी कधीही एकट्याने घेतले नाही. त्यापाठी हे सर्व सांघिक प्रयत्नाने शक्य झाले हीच त्यांची भूमिका असे.

आपल्या सामाजिक जीवनात भ्रष्टाचार आणि अस्पृश्यता हे दोन महाभयंकर दोष आहेत. त्यासाठी हे दोष का निर्माण झाले याचा शोध घेऊन मुळापासून ते दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे व जीवनात प्रत्येकाने कठोर आत्मपरीक्षण केले पाहिजे असे ते कायम म्हणत.

बाळासाहेबांच्या मुख्यमंत्रीपदाच्या दुसऱ्या पर्वात भारत स्वतंत्र झाला. देशाची फाळणी झाली. त्यात महात्मा गांधींची हत्या झाली व गांधीहत्येचे पडसाद विशेषतः महाराष्ट्रात मोठ्या तीव्र प्रमाणात उसळले. बाळासाहेबांनी ती परिस्थिती त्याकाळात मोठ्या कौशल्याने हाताळली पण बदलत जाणाऱ्या समाजमानसाने त्यांना व्यथित केले होते. सामाजिक जीवनातील वाढत जाणारी विधिनिषेधशून्यता पाहून त्यांनी आता राजकारणापासून दूर होत पुन्हा जोमाने स्वतःला समाजकार्यासच वाहून घेण्याचे ठरवले होते. मात्र पंडित जवाहरलाल नेहरूंनी घटनासमितीत आणि इंग्लंडमधील भारताचे उच्चायुक्त, गांधी समितीचे अध्यक्ष, भाषा आयोगाचे अध्यक्ष म्हणून त्यांची नेमणूक केली. राष्ट्रसेवा करण्याची एक संधी म्हणूनच त्यांनी हे पदभार स्वीकारले.

बाळासाहेब मुंबई राज्याचे मुख्यमंत्री असताना गणेश ऊर्फ नानासाहेब कपोले नावाचे एक सुप्रसिद्ध वैद्य होते. त्यांचा वैद्यकीय व्यवसाय हा भरभराटीचा होता. आपल्या व्यवसायाकडे ते सेवाभावाची एक संधी म्हणूनच पाहत. आपला पेशा सांभाळून ते कीर्तनेही करत. विशेषत: दुष्काळी भागात कीर्तने करून दुष्काळग्रस्त जनतेला मानसिक उभारी देत. कीर्तनाद्वारे मिळणारा पैसाही ते दुष्काळी भागासाठीच खर्च करत. बाळासाहेब खेर मुख्यमंत्री असताना कपोले यांच्या उपक्रमाकडे त्यांचे लक्ष गेले. व्यक्तिगत पातळीवरून केल्या जाणाऱ्या या समाजउभारणीच्या कार्याचे महत्त्व ओळखून बाळासाहेब खेरांनी शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन त्यांचा जाहीर सत्कार केला होता. बाळासाहेब केवळ त्यांचा सत्कारकरूनच थांबले नाहीत तर धुतपापेश्वरच्या नानासाहेब पुराणिकांशी त्यांनी संपर्क साधून कपोले यांना अल्प किमतीत औषधे पुरवण्याची विनंतीही केली. पुराणिकांनीही आदराने त्यांना त्याबाबत रूकार दिला होता. शासनकर्ता व प्रजा यांच्यातील बंध-अनुबंधाचा गोफ या प्रसंगातून आपल्याला जाणवतो.

लंडनला भारताचे उच्चायुक्त असताना त्यांना एका भारतीय विद्यार्थ्याचे पत्र आले. कुलाबा जिल्ह्यातील हा विद्यार्थी कायद्याचे शिक्षण घ्यायला लंडनला गेला होता. त्याची आर्थिक परिस्थिती ही फारशी चांगली नसल्याने पैशांअभावी त्याच्या शिक्षणात खंड पडण्याची वेळ आली होती. आपली ही अडचण त्याने मोकळेपणाने भारतीय उच्चायुक्तांना कळवली व शक्य असल्यास नोकरीसाठी शिफारस करण्याची विनंती केली. बाळासाहेबांनी या पत्राची दखल घेतली. त्याला नोकरी मिळवून दिली. पुढे त्याच्या शिक्षणावरही त्यांनी बारकाईने लक्ष ठेवले. शिक्षण पूर्ण करून तो तरुण भारतात परतला. वकिली व्यवसायाबरोबरच त्याने राजकारणातही प्रवेश केला व पाहता पाहता महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदापर्यंत त्याने मजल मारली. तो तरुण म्हणजे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर अब्दुल रहमान अंतुले हे होत. उच्चायुक्तपदी असताना आपल्या देशवासियांचे प्रश्न जातीने सोडवण्याचा बाळासाहेबांचा हा प्रयत्न त्यांच्यातील सत्तेचा सदुपयोग करण्याची वृत्ती दर्शवितो. जनसेवातत्पर असलेल्या बाळासाहेबांनी आपल्या सत्तेचा वापर आपल्या कुटुंबीयांसाठी वा स्वत:साठी मात्र कधीही केला नाही.

गाडगेबाबांच्या समाजकार्याविषयी बाळासाहेबांना आदर आणि विश्वास होता. गाडगेबाबांच्या सामाजिक संस्थांची कायदेशीर बांधणी करण्यात बाळासाहेबांचे योगदान मोलाचे होते.

दिवाळीच्या आगेमागे मुख्यमंत्री बंगल्यातील सर्व कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना बाळासाहेब चहाफराळासाठी बोलावत. त्यावेळेस त्या कर्मचाऱ्यांना कुठलेही काम सांगितले जात नसे. या समारंभाचा सगळा खर्च बाळासाहेब स्वत: करत. सरकारी पैशांचा वापर त्यांनी यासाठी कधीच केला नाही. आपल्या कार्यालयीन खर्चाबाबत बाळासाहेबांचे अधिकाऱ्यांना सदैव सांगणे असे की एखाद्या खर्चाबाबत जरा जरी अडचण अथवा शंका आली तर तो खर्च वैयक्तिक पैशांतून वसूल करावा. अशा वैयक्तिक खर्चाबाबत बाळासाहेब सरकारी अधिकाऱ्याला कधीही जाब विचारत नसत किंवा त्याबद्दल कुरकुर करत नसत. कायद्याची चौकट ही प्रामाणिकपणे पाळली गेलीच पाहिजे. माणसासाठी कायदे असले तरी जोपर्यंत कायदा अस्तित्वात आहे तोपर्यंत त्याची पायमल्ली होता कामा नये, घडलेल्या कृतीला कायद्याचा

कीस काढून कायदेशीर चौकटीत बसवण्याचा अट्टहास करायचा नाही असे त्यांचे ठाम मत होते. अगदी शेवटपर्यंत खाजगी आणि सार्वजनिक जीवनात बाळासाहेबांनी कायद्याचे उल्लंघन कधी केले नाही.

बाळासाहेबांनी खाजगी आणि सार्वजनिक आचरणात कधीच फरक केला नाही अथवा कधी कोणत्याही प्रकारचे मुखवटे धारण केले नाहीत. बाळासाहेब मुख्यमंत्री असताना त्यांना हृदयविकाराचा त्रास सुरू झाला. तेव्हा मुख्यमंत्र्यांनी आपल्या निवासस्थानी लिफ्ट बसवून घ्यावी म्हणजे त्यायोगे जिने चढउतार करायचा त्यांचा त्रास वाचेल असे डॉक्टरांनी सांगितले. परंतु वैयक्तिक सोयीसाठी मी जनतेचा पैसा का खर्च करू, ही बाळासाहेबांची दृष्टी असल्याने त्यांनी आपला मुक्काम तळमजल्यावर हलवला. सरकारी खर्चाने लिफ्ट बसवली नाही.

सरकारी कामकाजासाठी त्यांना रेल्वेने प्रवास करावा लागे त्यावेळी त्यांच्यासाठी त्या गाडीला खास डबा जोडण्यात आला. प्रवास सुरू झाला. प्रवासात सोबत म्हणून असलेल्या आपल्या चिरंजीवांना जवळजवळ मध्यरात्री त्यांनी 'हा माझा प्रवास म्हणजे जनतेच्या पैशांचा अपव्यय नाही ना?' असा प्रश्न केला. आपण डॉक्टरी सल्ल्यानुसार सरकारने देऊ केलेल्या सवलतीचा वापर हा सरकारी कामासाठीच उचितप्रकारे करत आहात. त्यात अधिकाराचा गैरवापर अजिबात नाही, हे त्यांच्या चिरंजीवांनी बाळासाहेबांना स्पष्टपणे सांगितल्यावर हेही खरेच आहे म्हणत मग त्यांनी तो विषय बाजूला ठेवला.

मुख्यमंत्रीपदी असताना वा नंतर त्यांच्या मुलांचे विवाह झाले. मात्र विवाहाआधी प्रत्येक सुनेला ते बोलावून घेत व स्पष्टपणे सांगत की हे पाहा, मी मुख्यमंत्री असलो अथवा हे मुख्यमंत्र्याचे घर असले, तरीही येथे आर्थिक श्रीमंती नाही. आमच्या घरात तुम्हाला सारी कामे करावी लागतील. आपल्या घरात तुम्हाला वैभवात लोळायला मिळणार नाही व तशी अपेक्षादेखील करू नका. कारण मला वैयक्तिक त्याचा हव्यास नाही. हे लक्षात घ्या आणि मग हे मनापासून पटत असेल तरच विवाहास होकार द्या. तुमच्यावर दडपण नाही.


बाळासाहेबांनी आयुष्यात कधीच कुठल्याही प्रकारच्या मालमत्तेबद्दल हव्यास बाळगला नाही. जीवनात साध्य आणि साधने शुद्धच असली पाहिजेत ही त्यांची ठाम भूमिका होती. म्हणूनच वडिलोपार्जित व स्वकष्टार्जित मालमत्तेविषयी जराही लोभ न धरता त्यांनी ती समाजकार्यासाठी मुक्तहस्ते वाटून टाकली. अगदी आपला रत्नागिरीचा पूर्वजांचा वाडाही त्यांनी समाजकार्यासाठी देऊन टाकला. आपल्या बँकेच्या खात्यातील सर्व पैसे त्यांनी मणिलाल आणि खेर या सॉलिसिटर फर्मचे कॅशिअर (रोखपाल) असलेल्या आर.जी. जोशी यांना देऊन टाकली होती.


माझ्या मुलांना मी सुयोग्य शिक्षण आणि चांगले संस्कार देण्याचा प्रयत्न केला. आता पुढे त्यांच्या जीवनाची वाटचाल त्यांनी करावी असे त्यांचे मत होते. आपले हे मत त्यांनी अखेरपर्यंत जपले.

दुसऱ्या व्यक्तीमधील असलेल्या लहानात लहान सद्गुणाचेही बाळासाहेब मोकळ्या मनाने आणि भरभरून कौतुक करत. सद्गुण हा सद्गुणच असतो, त्यात लहानमोठा असा भेदभाव कधीच नसतो असे ते सदैव म्हणत. दुसऱ्यांच्या सद्गुणाच्या कौतुकात मग्न असणाऱ्या आणि आनंद मानणाऱ्या बाळासाहेबांनी आपल्या कर्तृत्वाची कधीच स्वमुखाने जाहिरात केली नाही अथवा कोणाला करू दिली नाही. भारत सरकारने त्यांना पद्मविभूषण या किताबाने सन्मानित केले होते, तरी तो किताब त्यांनी कधी मिरविला नाही. किंबहुना तो किताब स्वीकारायचा का नाही, याबद्दलही त्यांच्या मनात द्वंद्व होते. कारण आपण जे काही कार्य केले ते केवळ मातृभूमीची अल्पशी सेवा होती, ही त्यांची भूमिका होती. तरीही हा सन्मान नाकारणे हे औधत्याचे लक्षण आहे असे मानून त्यांनी तो स्वीकारला. पुढे भारताच्या राष्ट्रपतीपदासाठीही त्यांना विचारण्यात आले मात्र त्याला त्यांनी ठाम नकार दिला. राजकारण सोडून आपले जीवन सार्वजनिक कार्यातच खर्च व्हावे, हीच त्यांची मनीषा होती.

राजा हा पृथ्वीचा उपभोगशून्य स्वामी असतो या वचनाचे काटेकार पालन बाळासाहेबांनी आजन्म केले. नुकतेच २४ ऑगस्ट २०१३ रोजी त्यांचे रौप्यमहोत्सवी शताब्दी जन्मवर्ष होऊन गेले. त्याकाळातच त्यांच्या कार्यकर्तृत्वाच्या स्मृती जाग्या व्हाव्यात यासाठी त्यांच्या नातीने सोनवी देसाईने आपल्या 'इंडस सोर्स बुक्स' या प्रकाशनातर्फे त्यांचे मराठीतील चरित्र प्रकाशित केले आहे. ते मूळ इंग्रजी भाषेतून मराठीत अनुवाद करण्यास मला मिळाले, हे माझे भाग्य!

**गिरीश रा. जोशी**
३, श्रीपाल, प्लॉट नं. ८७
टिळक रोड, घाटकोपर (पूर्व),
मुंबई-४०० ०७७
revajoshi257@gmail.com


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
उजळणारी मने
फुलणारी भूमी
उज्ज्वल महाराष्ट्राच्या
भविष्याची हमी
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
पृथ्वीराज चव्हाण
मुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री


नेतृत्व आणि त्याहून पुढे
शुभ दिपावली
सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
बिझनेस क्रेडिट शील्ड
हाऊसहोल्डर पॉलिसी
मेडिक्लेम पॉलिसी
कार्यालय संरक्षण शील्ड पॉलिसी
पशु विमा पॉलिसी
मोटार पॉलिसी
सागरी मालवाहतूक पॉलिसी
दुकानदार पॉलिसी
व्यक्तिगत अपघात पॉलिसी
प्रकल्प विमा पॉलिसी
ज्वेलर्स ब्लॉक पॉलिसी
विद्यार्थी सुरक्षा विमा
दि न्यू इन्डिया एश्योरन्स कंपनी लिमिटेड
भारतातील सर्वात मोठी सर्वसाधारण विमा कंपनी
The New India Assurance Co. Ltd
India's Largest General Insurance Company
मुख्य कार्यालयः न्यू इंडिया बिल्डिंग, 87, एम.जी.रोड. फोर्ट, मुंबई - 400001 भारत
95th YEAR of
राष्ट्राच्या सेवेत समर्पित
वैयक्तिक | वाणिज्यिक | औद्योगिक | दायित्वे | सामाजिक | ग्रामीण | कर्ज विमा
24x7 - टोल फ्री नंबर 1800-209-1415 | online.newindia.co.in | www.newindia.co.in

EVERY THING UNDER ONE ROOF
Pre Press, Press, Post Press & Digital

IPW
CONCEPT TO COMPLETION

# INDIA PRINTING WORKS

PRINTERS AND PUBLISHERS


81
1932-2013

- डिझायनिंग
- टाइपसेटिंग
- प्रिंटिंग
(कलर आणि ब्लॅक ॲण्ड व्हाईट)
- डिजीटल प्रिंटींग
- बाइंडिंग
- तत्पर सेवा
- माफक दर
- वेळेची खात्री



एक दिवसात, अत्यल्प किंमतीत १ ते २०० प्रती छापून देण्याची सुविधा

आमची प्रकाशने



## ८१ वर्षांची हीच आमची परंपरा

दर्जेदार ग्रंथ छपाईसाठी अवश्य भेटावं असं नाव

**आमचे नावाजलेले प्रकाशक**

श्रीविद्या प्रकाशन, पुणे • ग्रंथाली • पॉप्युलर प्रकाशन • मैत्रेय प्रकाशन • नवता प्रकाशन • रोहन प्रकाशन • वास्तुरविराज

इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, गं. द. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१
फोन : + 91 22 66624969 • फॅक्स :+ 91 22 66624970
इ-मेल : ipw@vsnl.net • वेबसाइट : www.ipworks.in



# दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

**स्वप्नपूर्ती** गृह कर्ज
घर खरेदीसाठी रू. ७० लाखापर्यंत
२० वर्षाकरिता कर्ज



**मनोरथ** वाहन कर्ज
वाहन खरेदीसाठी
१००% कर्ज



**ज्ञानवर्धिनी**
शैक्षणिक कर्ज



देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी कर्ज– रू. १० लाखापर्यंत
परदेशातील उच्च शिक्षणासाठी कर्ज– रू. २० लाखापर्यंत

**व्यापार आणि उद्योग धंद्यासाठी**
सुलभ कर्ज
रू. ८ कोटीपर्यंत



**शिवाय**

ए.टी.एम. सुविधा, मुद्रांक सेवा, परकीय चलन विषयक सेवा, RTGS / NEFT, ई-पेमेंटव्दारे विविध कर भरण्याची सुविधा व कोअर बँकिंग प्रणालीचे सहाय्याने व्यक्तिगत सेवा.

## ठाणे भारत सहकारी बँक लि.
शेड्यूल्ड बँक

सहयोग मंदिर, सहयोग मंदिर पथ, घंटाळी, ठाणे - ४००६०२. फोन नं. २५४४ ७८१६ / २५४० ८०७६
मुख्य शाखा : शततारका, बाजी प्रभू देशपांडे मार्ग, ठाणे. फोन नं. २५४२ ९४३२ / 33

ठाणे मुख्य शाखा : ठाणे पूर्व / पोखरण / चंदनवाडी /चेंदणी कोळीवाडा / श्रीनगर / शिवाईनगर / ऋतूपार्क / घोडबंदर रोड/ लोकमान्य नगर

कल्याण | डोंबिवली | ऐरोली विस्तारित कक्ष | मुलुंड | घाटकोपर-पूर्व | घाटकोपर-प. | भांडूप | दादर

*अटी लागू

॥ग्रंथाली॥

# अमेरिकेतील लेखकांची ताजी पाच पुस्तके

**क्षितिज पश्चिमेचे**

विनता कुलकर्णी

**मूल्य २५० रुपये**

**सवलतीत १५० रुपये**








**देश, परदेश आणि मी**

गजानन सबनीस

**मूल्य २०० रुपये**

**सवलतीत १२० रुपये**




**समाजरंग**

ज्ञान मयूर

अनिता वाकणकर-कुलकर्णी

**मूल्य २५० रुपये**

**सवलतीत १५० रुपये**

**दत्तकवेणा**

प्रगती कोळगे

**मूल्य १५० रुपये**

**सवलतीत ९० रुपये**







**रंग दे बसंती चोला**

स्मिता भागवत

**मूल्य २०० रुपये**

**सवलतीत १२० रुपये**

# बौद्धिक संपदा

**डॉ. ओमप्रकाश ग. कुलकर्णी**

*एखाद्याची एखादी कृती ही त्या व्यक्तीचे 'पेटंट' आहे असे कौतुकाने बोलले जाते. प्रत्यक्षात 'पेटंट' म्हणजे काय, त्याचे महत्त्व काय, याबाबत अनभिज्ञता अधिक असते. 'पेटंट' या शब्दामागे बौद्धिक संपदा असते. या बुद्धिसामर्थ्याने एखादी व्यक्ती नवीन असे काही निर्माण करते की त्याला तोड नसते. हा प्रयोग असतो. त्याचे सादरीकरण स्पर्धांमध्ये वा प्रदर्शनांत होते. त्याला बक्षीसही मिळते. परंतु त्या कौतुकापलीकडे त्यातून मिळणारे कायमचे आर्थिक स्थैर्य, मानसन्मान याबाबत मनात फार काही नसते. मात्र हीच बौद्धिक संपत्ती हे सारे देताना, देशालाही प्रतिष्ठा देत असते. त्याकडे गांभीर्याने पाहावे असे सरकारला वाटत नाही ना वित्तीय संस्थांना. समाजातील अनभिज्ञता आणि शासनाची उदासीनता यामुळे अनेकदा अशी बौद्धिक संपदा वाया जाते...'*
*पेटंट' या क्षेत्रात जागतिक स्तरावर गुरुतुल्य असलेल्या*
*डॉ. ओमप्रकाश ग. कुलकर्णी यांनी स्वानुभवातून केलेले हे प्रबोधन...*

१४ ऑगस्ट २००६ रोजी स्वातंत्र्यदिन पूर्वसंध्येनिमित्त राष्ट्राला संबोधित करतांना तत्कालीन राष्ट्रपती माननीय डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी एक महत्त्वाचा संदेश दिला होता की, ''जे राष्ट्र ऊर्जा व तंत्रज्ञानाच्या बाबतीत स्वयंपूर्ण व सुरक्षित असते तेच स्वतःला खऱ्या अर्थाने स्वतंत्र म्हणवून घेऊ शकते.''

दुर्दैवाने, ह्याविषयीची आम्हा भारतीयांची उदासीनता, राष्ट्रविकासपेक्षा वैयक्तिक विकासाचाच विचार करण्याची वृत्ती त्यातून परदेशातून सेवाविषयक व्यापाराची संधी मिळवून धन्यता मानणे खेदजनक आहे. पुढील एक अनुभव आपल्याला झणझणीत अंजन घालणारा आहे. राष्ट्रार्पित प्रभावी व समर्थ राजकीय नेतृत्वाचा स्वातंत्र्योत्तर अभाव आपल्या देशाच्या नशिबी आलेला आहे.

माझ्या एका बकॉंक भेटीत मला सरकारी मॉलमधे जाणे होते, टॅक्सीसाठी चौकशी केली असता प्रत्येकजण मला हॉटेल ते मॉल, तेथे थांबणे व परत हॉटेलला सोडणे मोफत करण्यास तयार होता. मी खोलवर चौकशी करून कारण शोधण्याच्या प्रयत्न केला तेव्हा मला गहिवरून आले व ह्या विपरीत भारतातील मनोवृत्तीची लाज वाटली. टॅक्सीड्रायव्हरने उत्तर दिले की, ''सर, हे राष्ट्र माझे आहे, आपल्याला मी जरी मोफत नेले तरी आपण जे काही खरेदी कराल त्यामुळे माझ्या देशाचा व्यापार, रोजगार व उत्पन्न वाढते, त्याचा अप्रत्यक्ष फायदा मलाही मिळणार. माझ्या देशाच्या विकासासाठी हे माझे कर्तव्य आहे.'' अशीच - माझा देश, माझ्या देशाची भरभराट ही राष्ट्रभावना मी भारत सोडून अनेक देशांत, चीनमधेही अनुभवलेली आहे. त्याविपरीत अनुभव भारतातील टॅक्सीड्रायव्हर, गाईड, अधिकारी, राजकारणी, व्यापारी यांच्याकडून पावलोपावली येतो. देश बदनाम झाला तरी स्वतःची तुंबडी भरणे ह्यालाच बहुतेकजण प्राधान्य देत असलेले आढळते. ह्याचा अर्थ भारतातील सगळेच अनुभव वाईट व परदेशातील सगळेच अनुभव चांगले असा अर्थात नाही.

सामर्थ्यशाली भारताची निर्मिती ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे. काही गौरवशाली अनुभव सुद्धा आहेत. उदाहरणार्थ, अवकाशयानाच्या प्रक्षेपणांस लागणाऱ्या घन इंधनाच्या बाबतीत भारत आजमितीला जगात सर्वश्रेष्ठ आहे. संपूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर व मालावर आधारित संशोधाने श्रेय मा. डॉ. वसंतराव गोवारीकरसरांना जाते. तसेच प्रक्षेपकाच्या बाह्य कवचासाठी लागणारे विशिष्ट प्रकारचे मारएजिंग स्टील निर्मिती, त्याचे वैशिष्ट्यपूर्ण वेल्डिंग तंत्रज्ञान ह्याचे श्रेयही काही भारतीय संशोधक व उद्योजकांना जाते. डॉ. होमी भाभा यांचे व त्यांच्या फास्ट ब्रीडर रिऍक्टरचे तंत्रज्ञान प्रत्यक्षात उतरवणारे डॉ. शंकरराव गोवारीकरसरांचे (ज्याचा अवलंब केला असता तर आज आपल्याला याचकाप्रमाणे अणुतंत्रज्ञानासाठी व अणुइंधनासाठी अमेरिका व पाश्चात्त्य राष्ट्रांकडे पदर पसरावा लागला नसता व लाचारीने बंधने लादून घ्यावी लागली नसती).

खरे तर आपण भारतीय साऱ्या जगावर बौद्धिक गाजवण्याच्या क्षमतेचे आहोत ह्याचा आपल्याला विसर पडलेला आहे. ग्रहणे, पृथ्वी गोल आहे, गणितातील शून्य, भौतिक, रसायन, वैद्यक, राज्य शासन, अर्थ, खगोल, समाज, धर्म इत्यादी अनेक शास्त्रांत भारताने जगाला ज्ञान दिलेले आहे. परंतु हे ज्ञान संरक्षित करण्याचे भान न ठेवल्यामुळे बासमती, कडुनिंब, हळद इत्यादी अनेक विषयक पेटंट अमेरिकेने घेतल्यावर आपल्याला जाग आली व भारताच्या हितासाठी लढा देण्याऱ्या मा. डॉ. रघुनाथ माशेलकरसरांना, १९७१ च्या संग्रामांत पाकी जनरल नियाझीला गुडघ्यावर आणून, बिनशर्त शरणागती पत्करण्यास भाग पाडणारे देशाचे सुपुत्र  जनरल जगजीतसिंगजी अरोरा ह्यांना विरोध करणारे भारतीय राजकारणीच होते हे सर्वाधिक दुर्दैव होय.

केवळ वैयक्तिक लाभासाठी क्रिकेट खेळणारा खेळाडू, अभिनय करणारा नट यांची भारतरत्नसाठी शिफारस होते पण वरीलपैकी कोणाचे, तसेच अनेक योग्य व्यक्तींचे 'भारतरत्न'साठी न जनतेला ना राजकारण्यांना स्मरण होते ही अत्यंत खेदनजनक व लाजिरवाणी बाब होय.

आजच्या स्पर्धात्मक जगात आपल्या बौद्धिक संपदेचे कायदेशीर संरक्षण करणे अत्यंत अगत्याचे आहे. त्यामुळे प्रतिष्ठा, पैसा व राष्ट्रविकास असे अनेकविध उद्देश साध्य करता येतात. बौद्धिक संपदेविषयी (पेटंट  – Intellectual Property Rights - IPR) यथार्थ ज्ञान मिळवून त्याचा कटाक्षाने अवलंब करणे ही काळाची व आपले वैश्विक अस्तित्व



टिकवण्यासाठीची गरज आहे.

सर्वसामान्यपणे बौद्धिक संपदेचे तीन भाग करता येतात– अ) पेटंट ब) ट्रेड मार्क व क) कॉपी राइट.

केवळ वरील बाबींचे महत्त्व समजावे ह्या उद्देशाने स्वतःचे व माझ्या निकटवर्तीयांचे काही अनुभव वाचकांसमोर मांडत आहे, यात आत्मस्तुतीचा भाग नाही.

अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे आपल्या शासनाची उदासीनता – भारतांत बौद्धिक संपदेला कवडीची किंमत नाही ही वस्तुस्थिती आहे. कारण त्याला व्यापारमूल्य (Tangible asset) आहे हेच नाकारण्यात येते. न सरकार त्याला कोणत्याही स्वरूपात सन्मान देते न कोणतीही बँक किंवा वित्तीय संस्था त्याला भांडवल म्हणून स्वीकारते, त्यामुळे माझे कितीही बहुमोल पेटंट असले तरी त्याआधारे मला पाच पैशांची कोथिंबीर सुद्धा कोणी देत नाही, ही वस्तुस्थिती आहे. ह्याउलट परदेशांत त्याला केवळ सन्मानच नव्हे तर बहुमोल संपदा म्हणून मान्यता मिळते. इतकेच नव्हे, तर त्याच्या जोरावर अर्थार्जनाच्या सर्वोत्तम व सुलभ संधी उपलब्ध होतात. एकदा सहज म्हणून के.पी.एम.जी. ह्या आंतरराष्ट्रीय मूल्यमापन संस्थेने माझे व्यक्तिगत मूल्यमापन केले होते. (सुमारे २००४-०५ साली), त्यांच्या निष्कर्षानुसार केवळ अंगावरील कपड्यानिशी मी उभा राहिलो तरी जागतिक पातळीवरील माझे बौद्धिक मूल्य किमान ८७ कोटी रुपयांपेक्षा अधिक होते.

वरील तीनही प्रकारच्या बौद्धिक संपदा नोंदणीने संबंधिताच्या नावलौकिक, प्रतिष्ठेत भर पडतेच, शिवाय प्रसंगी ते हक्क योग्य रीतीने विकल्यास एकत्रित तसेच दीर्घ काळासाठी




MEDA ॲवॉर्ड – वसंतराव गोवारीकर यांच्या उपस्थितीत

उत्पन्नाचे साधन बनू शकते. अशाच पेटंटद्वारा मिळवलेल्या प्रचंड संपत्तीचा ट्रस्ट बनवून त्याच्या व्याजातून दिला जाणारा जगातील सर्वश्रेष्ठ मानाचा असा नोबेल पुरस्कार सर्वांच्याच परिचयाचा आहे. स्वतःच्या हयातीत व मृत्यूनंतरसुद्धा चिरंतन नावलौकिक व संपन्नतेचे हे सर्वोत्कृष्ट उदाहरण होय. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ थॉमस अल्वा एडिसन यांचे एकूण २३३२ पेटंट होते. त्यापैकी १०९३ अमेरिकेत नोंदवलेले होते. ड्युपॉंट ह्या आंतरराष्ट्रीय कंपनीच्या जगभर विखुरलेल्या ७५ संशोधन केंद्रांमधे ८५०० पेक्षा अधिक संशोधक काम करतात, १.४ शतलक्ष डॉलर प्रतिवर्षी केवळ संशोधानावर खर्च करते व कंपनीचे २००० पेक्षा अधिक पेटंट विविध १३ क्षेत्रांत आहेत. अशाच स्वरूपाचे पेटंट ग्लॅक्सो, फायझर, सिबा इत्यादी अनेक कंपन्यांचे आहेत व त्याजोरावर ते आज जगावर त्या त्या क्षेत्रांत राज्य करून भरमसाट नफा कमावत आहेत. बौद्धिक संपदेचे फायदे व तोटे हे ज्याचे पेटंट आहेत त्यांची नैतिकता व ज्या क्षेत्रातील आहेत त्यावर अवलंबून असतात. उदाहरणार्थ, रॅनिटिडिन हे ॲसिडिटीवर औषध आहे ते ग्लॅक्सो विविध कंपन्यांना विकते व देशपरत्वे जनतेची लूट केली जाते. उदाहरणार्थ, जे झिनेटॅक भारतात ७ ते १० रुपयांना मिळते ते शेजारील पाकिस्तानात १५० ते १७० रुपयांना विकले जाते. जेनेरिक औषधांबाबतचा वाद अजून मिटलेला नाही व सामान्य नागरिकाची लूट केली जात आहे.

माझा एनरकॉन इंडिया लि. ह्या कंपनीशी २०१० साली प्रथम संबंध आला. २००७-०८ च्या सुमारास ही कंपनी मूळ जर्मन कंपनीपासून विभक्त झाली व भारतीय कंपनी विरुद्ध मूळ जर्मन कंपनी असे पेटंट – बौद्धिक संपदा – युद्ध सुरू झाले. भारतीय कंपनीच्या बौद्धिक संपदेच्या वकिलांना विंड पॉवर जनरेटर तसेच पेटंट ह्या दोनही क्षेत्रांत तज्ज्ञ असेलेली सल्लागार व्यक्ती हवी होती व त्यांनी माझ्याशी संपर्क साधला व आजमितीला मी त्या कंपनीचा मुख्य तांत्रिक सल्लागार (चीफ टेक्निकल ॲडव्हायजर व इंजिनिअरिंग डेव्हलपमेंट – President & All India Head - Engg. & Dev. - Chief Technical Adviser) विभागाचा भारताचा प्रमुख अशी भूमिका निभावत आहे. माझ्या सल्ल्यानुसार व प्रयत्नांनी जर्मन कंपनीचे आजमितीला १९ पेटंट रद्दबादल ठरवले आहेत व हा एक जागतिक विक्रम आहे. एवढ्यावरच न थांबता कंपनीसाठी स्वतःचे नवनवीन तंत्रज्ञान विकसित करून ४ शोधांचे पेटंट अर्ज दाखल केलेले आहेत व अजून किमान १० ते १२ पेटंट दाखल करायचे आहेत. हे सदर भारतीय कंपनीच्या शिरपेचात आंतरराष्ट्रीय पातळीवर केवळ मानाचा तुरा खोचणारे नाही तर त्यामुळे त्यांचे आंतरराष्ट्रीय स्तरावर मूल्यवर्धन झालेले आहे. ह्या उपक्रमाने प्रेरित होऊन आता कंपनीतील इतरही कर्मचाऱ्यांना संशोधनात्मक दिशा मिळालेली आहे.

विशेष लक्षात घेण्याची बाब ही आहे, की मला २००९ साली, वयाच्या साठीत तीव्र हृदयविकाराचा झटका येऊन ओपन हार्ट बायपास शस्त्रक्रिया होऊन ६० टक्के हृदय निकामी झालेले असताना आज ६३ व्या वर्षीसुद्धा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सन्मान तर मिळतोच, शिवाय ऐच्छिक पद्धतीने काम करून स्वतंत्र राहून, आर्थिकदृष्टीने सुद्धा सर्वांत लाभदायक व सुलभ साधन माझ्या हाती आहे. एवढे उत्पन्न मी माझ्या तीन फॅक्टरी चालवून व राबराब राबलो तरी मिळत नव्हते, ही वस्तुस्थिती आहे.

माझे स्वतःचे एकूण १२ पेटंट असून त्यापैकी ४ आंतरराष्ट्रीय आहेत. पहिले पेटंट मी १९८१ साली घेतले. ऑटोमोबाईल, वैद्यकीय उपकरणे, टेक्स्टाईल, ऑटोमेशन, कंट्रोल सिस्टिम, सेन्सर, बँकेच्या व्यवहारांत सुरक्षितता, अपारंपरिक ऊर्जा इत्यादी विविध क्षेत्रांतील ते आहेत. त्यापैकी काही मी देशांतर्गत व काही आंतरराष्ट्रीय स्तरावर विकून आर्थिक लाभ व प्रतिष्ठा मिळवलेली आहे. माझे आंतरराष्ट्रीय दर्जाचे ४३ पेक्षाही अधिक शोधनिबंध विविध विषयांवर प्रसिद्ध झालेले आहेत. अजूनही सुमारे ६ संशोधनांचे पेटंट घेणे बाकी आहे. उर्वरित आयुष्यभर हा प्रवास असाच चालू राहणार हे निश्चित आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवर संशोधक किंवा विद्वांनाच्या जगतात, परिषदेत किंवा संमेलनांत, केवळ तीनच निकष

लावले जातात सदर व्यक्तींच्या नावे १) आंतरराष्ट्रीय दर्जाचे किती शोधनिबंध आहेत २) किती पेटंट आहेत ३) त्यांच्या मार्गदर्शनाखाली किती जणांनी संशोधन केलेले आहे.

मला आलेल्या अनुभवांवरून काही सावधगिरीच्या बाबी नजरेस आणणे अगत्याचे वाटते.

गेल्या १० वर्षांपासून नाशिकच्या का. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यायातर्फे 'कर्मवीर एक्स्पो' ह्या नावाने राष्ट्रीय पातळीवरील व आंतरराष्ट्रीय संस्थेकडून (IEEE, USA) पुरस्कृत चलत उपकरणांचे (Working Model) स्पर्धात्मक प्रदर्शन भारतभरातील अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्षी नाशिक येथील महाविद्यालयाच्या प्रांगणात भरवण्यात येते. २-३ वर्षांपूर्वीच्या स्पर्धेत एका विद्यार्थ्याने एक सुंदर, साधे पण अत्यंत उपयुक्त असे उपकरण सादर केले होते. मी ह्या स्पर्धेत सुरुवातीपासून दर वर्षी मुख्य परीक्षकाची भूमिका सांभाळत असतो. (सांगावेसे वाटते की, संशोधकतेला उत्तेजन देणारा हा एक फारच सुंदर उपक्रम असून विद्यार्थ्यांसाठी नव्हे तर उद्योजक संशोधनात्मक चिकित्सा असलेल्यासाठी ही अत्यंत उत्तम संधी असते.)

आपण अनेक प्रसंगी मोटारसायकल साइड स्टँडवर उभी केलेली असते व कधी कधी गप्पांच्या ओघात किंवा अनवधानाने तो तसाच राहून मोटारसायकलस्वार पुढे जाऊ लागतो आणि तो साइड स्टँड अडखळल्याने अपघात होऊन गंभीर दुखापत वा मृत्यूपण ओढवलेले आहेत.

वरील बाबींचा विचार करून त्या विद्यार्थ्याने तयार केलेले उपकरण मोटारसायकलला बसवलेले असल्यास कोणत्याही गिअरमध्ये मोटारसायकल चालू केल्याबरोबर तो स्टँड आपोआप रिट्रॅक्ट होऊन मूळ स्थितीला येईल अशी सोय व सुरक्षा होती. उपकरणाची किंमत कवळ १५० ते २०० रुपये इतकीच होती. तो विद्यार्थी व त्याचे उपकरण बक्षीसास पात्र असूनही मला मनातून वाटत होते की त्याला बक्षीस मिळू नये. परंतु परीक्षकांच्या पॅनेलच्या निकालानुसार त्याला ५० हजार रुपयांचे द्वितीय पारितोषिक मिळाले. साहजिकच ही बातमी अनेक माध्यामांतून प्रसिद्ध झाली. पण ह्याच कारणाने तो त्या संशोधनाचे पेटंट मिळवण्यास अपात्र झाला व नेमके हेच कारण माझ्या मनांतील विचारांमागे होते. त्याने जर त्याचे पेटंट मिळवले असते तर ते अनेक कंपन्यांना विकून तो अधिक धनवान झाला असता व त्याने सन्मान पण मिळवला असता. कदाचित परदेशांतही ते विकले गेले असते. आपल्याकडे याबाबत असलेली अनभिज्ञता आणि वैचारिक उदासीनता



राष्ट्रपती ॲवॉर्ड - राष्ट्रपती व्यंकटरमण यांच्या हस्ते

यामुळे अशा अनेक प्रयोगांना एखाद्या पुरस्काराएवढेच मोल राहते, हे मला खेदजनक वाटते.

पेटंटपात्रतेसाठीचा एक महत्त्वाचा नियम आहे की, ते संशोधन अर्ज दाखल करतेवेळी, ते कोठेही पूर्वी प्रसिद्ध झालेले नसावे. (Publish and Perish). दोन प्रसंगी माझे स्वतःचे शोधनिबंध मला पेटंट मिळण्यात बाधक ठरलेले आहेत हा अनुभव माझ्या पाठीशी होता.

तसेच आपल्या संशोधनाचे पेटंट आर्थिक लाभाच्या मोबदल्यात कोणासही विकताना फसवणूक होण्याची शक्यता फार असते. हा प्रकार नागपूरच्या संशोधक डॉ. सौ. अलकाताई झाडगांवकर यांच्या बाबींत झालेला आहे व माझ्या स्वतःच्या वाट्यासही अशी घोर फसवणूक आलेली आहे. केवळ व्यापारी मनोवृत्ती असलेल्या व आर्थिक लाभासाठी कोणतीही नैतिकता न पाळणाऱ्या आपल्या देशातील काही प्रसिद्ध जमातींपासून सावध राहणे गरजेचे आहे. दोघांचेही बाबतीत त्याच जमातीच्या व्यक्तीचे अत्यंत वाईट अनुभव आलेले आहेत. सुरुवातीस अत्यंत गोड बोलून आपल्याला फशी पाडतात व एकदा कागदपत्रावर सह्या आपण केल्यानंतर ते त्यांचे गुण दाखवतात व आपण पूर्णपणे लुबाडले गेलो आहोत हे कळते तेव्हा वेळ निघून गेलेली असते. किंबहुना माझ्या बाबतीत मला डायबेटिस, कोलेस्ट्रॉल व ब्लड प्रेशर यांपैकी कोणताही त्रास नसताना, कोणताही कौटुंबिक इतिहास नसताना, हृदयविकाराचा तीव्र झटका येण्यास ह्याच व्यक्तींनी केलेली घोर फसवणूक व मानसिक त्रास आहे. केवळ

जिवावरच बेतले नाही तर, माझी आयुष्यभरची कमाई गमावून भिकारी होण्याची वेळ माझ्यावर आली होती. वयाच्या साठीत मला शून्यातून नव्हे तर आर्थिक बोजाच्या गर्तेतून वर यावे लागले. 'असंगाशी संग व प्राणाशी गाठ' ह्याचा माझा हा अनुभव हे ज्वलंत उदाहरण आहे. दुर्दैवाने मी निवडलेला आर्थिक सल्लागारसुद्धा त्याच जमातीचा होता व मला चुकीचा सल्ला देण्यासाठी तो त्यांना विकला गेला होता, हे उशिरा मला फार कळले.

पण त्यातही विशेष उल्लेखनीय बाब ही होय की, बौद्धिक संपदेच्या ज्ञानानेच व क्षेत्रानेच मला ह्या घोर संकटातून सुलभपणे बाहेर काढले.

ह्याचे श्रेय इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस, बंगळूर ह्या संस्थेस मी देईन. कारण तेथील पदव्युत्तर शिक्षणाच्या कालावधीत जे ज्ञान मिळाले होते तेच मला संकटातून तारण्यासच नव्हे तर प्रतिष्ठा व पैसा दोन्ही मिळवून देण्यास उपकारक ठरले ह्याबद्दल मी संस्थेचा सदैव ऋणी आहे.

वास्तविक पाहता बौद्धिक संपदेविषयी व्यवस्थित ज्ञान देणे, मार्गदर्शन करणे ही प्रत्येक शिक्षण संस्थेची जबाबदारी आहे. परंतू आपल्या देशात आय.आय.टी. (IIT) आणि आय.आय.एस्सी. (IISc) ह्या संस्था सोडल्या तर अलीकडील काळापर्यंत कोणत्याही संस्थेत ह्या विषयाची जागरूकता नव्हती.

शासनाची उदासीनता वित्तीय संस्थांनी अंगिकारली व ती तशीच शिक्षणसंस्थांच्या माध्यमातून तरुण पिढीतही उतरली. आपल्यात प्रचंड क्षमता असूनही, एखाद्या पक्ष्याने पंख असूनही तो उडू शकतो हे विसरण्यासारखी आपली अवस्था झालेली आहे. (यासंदर्भात 'Jonathan Livingston Seagull' हा सिनेमा अवश्य पाहावा असा आहे.)

विद्यापीठे (Universities) व अनुदान/मान्यता आयोगांनी (UGC/AICTE) प्रत्येक विद्यालय-महाविद्यालय यांच्यासाठी हे बंधनकारक केरण्याची व त्यासाठी नियमावली, मार्गदर्शकतत्त्वे (Mandet and Guidelines) ठरवण्याची आज नितांत गरज आहे.

प्रत्येक शिक्षणसंस्थेत बौद्धिक संपदा विभाग तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली स्थापन करून प्रत्येक शिक्षक, संस्थाचालक यांच्यात त्याविषयी जागरूकता निर्माण करणे व ती विद्यार्थ्यांत भिनवणे, त्यातून संशोधनास उत्तेजन देऊन देश स्वयंपूर्णतेकडे व सामर्थ्यशीलतेकडे नेणे, हे राष्ट्रीय कर्तव्यच नव्हे तर अनिवार्य जबाबदारी आहे ह्याची जाण असणे गरजेचे आहे.

पेटंट घेताना योग्य व विश्वसनीय पेटंट वकिलाची निवड करणे हे सुद्धा अत्यंत महत्त्वाचे असते. माझ्या अनुभवात अशीही उदाहरणे आहेत की, ज्यांत वकिलांवर विश्वास ठेवून सर्व गुपिते त्यांच्या हाती दिल्यावर त्यांनी ती इतरांस विकली आहेत किंवा स्वतः पेटंट घेऊन त्याचे उत्पादन करून गडगंज झाले व मूळ संशोधक मात्र फकीरच राहिला आहे. ह्या बाबतीत सुद्धा दक्ष राहणे अगत्याचे आहे.

संशोधक असण्यासाठी शिक्षण, आर्थिक क्षमता, अधिकार, निवासक्षेत्र, साधनांची उपलब्धता इत्यादी कोणतेच बंधन नसते हे ध्यानात ठवणे गरजेचे आहे. मादाम क्युरीने पाचव्या मजल्याच्या माळ्यावर असलेली मर्यादित साधने, उपकरणे वापरून रेडियमचा शोध लावला होता व एकदा नव्हे तर दोनदा नोबेल पारितोषिक मिळवले होते. हेन्री कॅव्हेंडिश इत्यादी अनेक शास्त्रज्ञांनी लावलेले अलौकिक शोध ह्याची ज्वलंत व प्रोत्साहनात्मक उदाहरणे आहेत. फॅरडे, एडिसन, आइन्स्टाईन इत्यादी अनेक शास्त्रज्ञ त्यांच्या शालेय जीवनात सर्वसाधारण कसोटीवर मठ्ठ म्हणून गणले गेले होते, पण त्यांनी विज्ञानाच्या क्षेत्रांत नेत्रदीपक क्रांती घडवून आणली आहे.

आपल्या महाराष्ट्रातीलच एक ज्वलंत उदाहरण आहे. तो मी नव्हेच ह्या सुप्रसिद्ध नाटकाचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्याचा फिरता रंगमंच. मुंबईच्या जुन्या बाजारातून वस्तू आणून प्रभाकरजी पणशीकरांच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूरच्या म्हादबा मिस्त्री यांनी तो तयार केला होता. नमूद करावयाची विशेष बाब ही की, म्हदबा मिस्त्री हे पूर्णपणे निरक्षर होते असे असून त्यांनी हा जगातील पहिला पोर्टेबल (बसच्या टपावर ठेवून कोठेही नेऊन थोड्या वेळात उभा करता येणारा फिरता रंगमंच तयार केला होता. परंतु दुर्दैवाने त्याचे त्यांनी पेटंट घेतले नव्हते. आज ही संकल्पना जगभर नक्कल करून वापरली जात आहे. ह्या आधी फक्त लंडन येथील नाट्यगृहांत कायमस्वरूपी फिरता रंगमंच होता.

शिक्षकांना त्यांच्या सुप्त क्षमतेची जाणीव नव्हती असेच म्हणावे लागेल. हे मी अधिकारवाणीने प्रतिपादन करेन कारण माझ्या आजच्या यशाचे श्रेय जसे माझ्या प.पू. आई वडिलांना आहे तसे काही शिक्षकांना पण आहे.

मी ९ वर्षांचा असताना, मराठी सहावीत होतो तेव्हा, मला विज्ञान व इंग्रजी शिकवण्यासाठी उषाताई जोगळेकर (आताच्या सौ. सुमित्राताई भिडे) ह्या शिक्षिका होत्या. त्यांनी त्यावेळी मला प्रोत्साहन दिले व एक आत्मविश्वास निर्माण केला. त्या मला

नेहमी म्हणत असत की, ''ओमप्रकाश, तुझे इंग्रजी छान आहे, लक्ष दे. मोठा होशील तेव्हा तुझे जगात कोठेही बोलण्यास, लिहिण्यास प्रभावीपणा राहील व आपल्या वक्तृत्वाने जग जिंकशील. तसेच विज्ञानात तुझी विलक्षण असामान्य गती आहे, तू त्यावर पूर्णपणे केंद्रित राहा. तू मोठा शास्त्रज्ञ होशील.'' वास्तविक पाहता त्या साधारण २०-२२ वर्षांच्या असतील व शिक्षकीपेशातही नुकतेच पदार्पण त्यांनी केले होते. एका ९ वर्षांच्या मुलात त्यांनी काय पाहिले हे त्यांचे त्यांना माहीत, पण त्यांनी बी रोवले व त्याला खतपाणी घातले. मला आज जागतिक पातळीवर शास्त्रज्ञ म्हणून जो सन्मान मिळतो तो त्यांच्या चरणी कृतज्ञता व नम्रतापूर्वक समर्पित आहे.

आज माझ्याकडे एक असे प्रशस्तिपत्र (Certificate) आहे की जे जगात कोणाकडेही नसेल. माझी मॅट्रिकची परीक्षा संपून १०-१५ दिवस झाले होते. रिझल्ट लागण्यास दोन-अडीच महिने होते. एक दिवस आमच्या शाळेचा शिपाई (रामनाथ) माझ्या घरी आला व आमच्या शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय बेदरकरसरांनी बोलाविले आहे असा निरोप मला दिला. मी थोडासा भांबवलेल्या मानसिकतेतच शाळेत गेलो. सर कामात होते व मला समोर खुर्चीत बसावयास सांगितले. मनावरील ताण वाढतच होता. २-३ मिनिटांनी हातातील काम संपवून, माझ्याकडे पाहून म्हणाले, ''तुझा चेहरा असा का?'' मी मला का बोलावले हे विचारल्यावर ते प्रसन्नपणे हसून म्हणाले, ''अरे, तुला एक छानसे सर्टिफिकेट - प्रशस्तिपत्र द्यायचे आहे म्हणून बोलावले आहे.'' मी साहजिकच विचारले की, ''सर, मी तर तसे काही, कधी मागितले नव्हते.' त्यावर त्यांचे उत्तर खरोखरच त्यावेळीच नव्हे तर आजही अनाकलनीय होते. ते म्हणाले, ''तू पुढे इतका मोठा होईल की, त्या अवस्थेत तुला कोणाच्या प्रशस्तिपत्राची किंवा शब्दाची गरजच नसेल, पण त्यावेळी तुझ्याकडे एक असे सर्टिफिकेट असेल की तसे जगात कोणाकडेही नसेल.'' असे म्हणून त्यांनी कारकुनास बोलावून मजकूर निवेदन केला व एक पूर्ण पानभर असेलेले सर्टिफिकेट दिले. त्यावर शाळेच्या शिक्क्यानिशी त्यांनी सही केलेली आहे व अनेक प्रशस्तीपर विधानांसोबत म्हटलेले आही की, ''ओमप्रकाशने शाळेला स्थानीय, राज्य व राष्ट्रीय पातळीवर विज्ञान प्रदर्शनांत अनेक वर्षे गौरव मिळवून दिला असून तो एक उच्च दर्जाचा उगवता शास्त्रज्ञ आहे. त्याला नेहमी संधी व प्रोत्साहन दिले जावे अशी मी आग्रहपूर्वक शिफारस करतो.'' आजही ते प्रशस्तिपत्र माझ्यासाठी अनमोल ठेवा आहे.

शाळेच्या शिक्क्यानिशी लेखी असे प्रशस्तिपर विधान एका १५ वर्षांच्या मुलाबद्दल करण्यामागे त्यांची दूरदृष्टी, हाडाचे शिक्षकत्व आणि आपल्या अधिकाराचा योग्य वापर हे धाडस खरोखरच एकमेव असावे. अर्थात विज्ञान प्रदर्शनासाठी मला नेहमीच प्रोत्साहन व मार्गदर्शन देणारे आदरणीय ग. म. अकोलकरसर ह्यांना त्याचे श्रेय जाते.

आदरणीय उषाताईंसारख्या, ग.म. अकोलकरसर व कै. बेदरकरांसारख्या शिक्षकांची ह्या देशाला नितांत गरज आहे. असे शिक्षकच आजच्या तरुण पिढीतील सुप्त शक्तीचा शोध घेऊन, त्यांच्यात ठिणगी पेटवून त्यांना शास्त्रज्ञ होण्यास प्रोत्साहित करतील. केवळ उपजीविकेचे साधन म्हणून शिक्षकी करणाऱ्यांचे हे काम नव्हे.

मला वाटणारी महत्त्वाची बाब म्हणजे अध्यात्माचा पाया असणे गरजेचे आहे. माझा जगप्रसिद्ध शोध, ''सूर्याच्या उष्णतेचा वापर करून थंडावा निर्माण करणे (Solar Thermal Air Conditioning)'' ह्या सकंल्पनेचे संपूर्ण श्रेय माझे आध्यात्मिक गुरू व दैवत तीर्थराज प.पू. पांडुरंगशास्त्री आठवले (दादा) यांनाच जाते. त्यांनीच


दीपावलीच्या ''संगीतमय'' शुभेच्छा



हार्मोनियमचे सूर,
तबल्याचे बोल,
सतारीचा झंकार,
मृदुंगाची आस,
टाळांची किणकिण..
नादब्रह्म निर्मिणारी,
भारतीय संगीताला
जगभर नेणारी
आमची वाद्ये!

हरिभाऊ विश्वनाथ
म्युझिकल इंडस्ट्रीज
शोरूम : ४१९, सरदार वल्लभाई पटेल मार्ग, प्रार्थना समाज,
गिरगांव, मुंबई - ४००००४. फोन : २३८२१४२५, २३८५०४६१.
फॅक्स : ९१-२२-२३८९१७३५ Email : hvmi@vsnl.com

माझ्या मनात ह्या विषयाचे बीज रोवले व यशाचा आशीर्वाद दिला. त्यामुळेच माझे हातून ते घडले व मी निमित्त ठरून यशाचा धनी ठरलो. अभिमानपूर्वक निवेदन करावेसे वाटते की, २०१० सालच्या भारतीय सेवेच्या (UPSC) परिक्षेत विचारलेल्या प्रश्नापैकी एक प्रश्न होता की, जगात सोलार एअरकंडीशनरचा शोध प्रथम कोणी लावला – साहजिकच बरोबर उत्तर माझ्या नावे होते. तसेच २०११ साली टाटा–मॅकग्रोहिल प्रकाशन संस्थेने पुणे विद्यापीठातील पदव्युत्तर व पीएच.डी.साठी संदर्भ ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत त्यात माझ्या वरील संशोधनाविषयी पाच पाने भरून मजकूर आहे. पुढील किमान तीन पिढ्या त्या विषयावर – मी केलेल्या कार्यावर संशोधन करतील. हा सन्मान सामान्य म्हणून ठरवता येणार नाही. लोकमान्य टिळकांच्या उक्तीनुसार 'मरावे परि कीर्तीरूपे उरावे' त्या दिशेचे हे एक पाऊल म्हणता येईल. श्रीमद्‌भगवद्‌गीता ही तरुणपणीच समजून घेण्याची, आचरणांत आणण्याची नितांत गरज आहे. युद्धप्रसंगी मनोबल गमाविलेल्या अर्जुनाला युद्धप्रवृत्त करून ईश्वराधिष्ठित यशाचा धनी बनवणारी गीता आहे हे बुद्धिनिष्ठपणे समजून घेतले तरच त्याचा उपयोग होईल. आज समृद्ध भारत घडवण्यासाठी तरुणपिढीला मार्गदर्शन करण्याची क्षमता केवळ गीतेतच आहे ह्याचा सुद्धा आपल्याला विसर पडलेला आहे हे ह्या मातृभूमीचे दुर्दैव म्हणावे लागेल. अतिरेकी भक्तिभाव अथवा धर्मभोळेपणा या विचाराने खऱ्या ज्ञानाकडे दुर्लक्ष करण्याऐवजी ते समजून घेण्याची आणि त्यावर साधकबाधक विचार करण्याची आवश्यकताच आपल्याला वाटत नाही.

मी नाशिक जिल्ह्यातील नांदगांव येथे जन्मलो असून मध्यमवर्गीय मराठी कुटुंबातील आहे. शाळेत सामान्य विद्यार्थीच होतो. पुढे अभियांत्रिकी शिक्षणाच्या कालावधीत जेव्हा सहज मनात आले कोणीतरी पहिला येतो मग मी का नाही? तेव्हापासून प्रथम येणे कधी अशक्य व अवघड वाटले नाही. किंबहुना तो जीवनाचा सहज सामान्य भागच बनला.

आजवर केलेले संशोधन कोणत्याही सरकारी, वित्तसंस्थेच्य मदतीशिवाय स्वतःच्या उत्पन्नातूनच केलेले आहे. अधिकांश वस्तू मी जुन्या बाजारातून, मोडीतून आणत असे. अनेक प्रसंगी आय.आय.टी., मुबईच्या डॉ. मिलिंद राणेसरांनी केलेले मार्गदर्शन, मा. डॉ. देवीसिंगजी शेखावत, मा. सौ. प्रतिभाताई पाटील, मा. भीष्मराजजी बाम यांनी दिलेले प्रोत्साहन उल्लेखनीय आहे.

फक्त एक आवर्जून सांगावेसे वाटते, की त्यासाठी पछाडलेले बनले पाहिजे, एकाग्र बनले पाहिजे, समर्पित बनले पाहिजे. झापडे लावलेला घोडा अवश्य बघा. आसपासच्या गवताकडे, हिरवळीकडे त्याने लक्ष दिले तर तो कधीच इच्छित स्थळी पोहोचणार नाही. आपल्यालाही तसेच बनले पाहिजे. आपण नेमके नको त्या हिरवळीतच रमतो आणि ध्येय विसरून जातो. तरुण पिढी आज पॅकेजच्या मागे लागलेली आहे. ही अमेरिकेची भारताची तरुण पिढी नासवण्याची – दिशाभूल करून – देशाची पीछेहाट करण्याची चाल आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

२५ जानेवारी २००६ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्राला उद्देशून दिलेल्या संदेशात, तत्कालीन राष्ट्रपती मा. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी म्हटले होते की, ''जगात भारत हा एकच संपन्न देश आहे की ज्याची ५४ कोटीपेक्षा अधिक लोकसंख्या पंचविशीच्या आतील आहे. ही पिढीच संपन्न, समृद्ध व सामर्थ्यशाली भारत २०२० चे आधारस्तंभ आहेत. हे आपण सर्वांनी नेहमीच स्मरणात ठेवून आचरण करणे, कार्यरत राहणे अगत्याचे आहे. ''संशोधनक्षेत्राला समर्पित राहणे आवश्यक आहे. मग त्यासाठी वैयक्तिक लाभांत थोडी तडजोड करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. असे केले तरच आपण ह्या देशाचे नागरिक म्हणवून घेऊ शकतो.

भारतीय बंधू व भगिनींना माझी नम्र विनंती आहे की ह्या तीनही माध्यमातून आपली जागतिक दर्जाची ओळख निर्माण करण्याचा निदान प्रयत्न तरी करावा, तुमच्यातील कोणातही ख्यातनाम संशोधक दडलेला असू शकतो हा विश्वास बाळगा. स्वामी विवेकानंदांचा उपदेश जीवनांत महत्त्वाचा आहे– ''कोणीतरी उदाहरण घालून देईल याची वाट पाहू नका, तुम्हीच स्वतः एक उदाहरण बना'' – ''Instead of waiting for an Example, Why not yourself be an Example?''

**डॉ. ओमप्रकाश ग. कुलकर्णी**
४, मालिनी गार्डन्स, शुभमंगल मेडिकल्सजवळ,
टेलिफोन एक्स्चेंजच्या समोर, कॅनडा कॉर्नर,
नाशिक–४२२००२ (महाराष्ट्र–भारत)
भ्रमणध्वनी : ९४२२२४५४४६
kulkarnismo@gmail.com

# सुजनशक्ती - अभावाकडून प्रभावाकडे

**सुधीर थत्ते**

उष्मागतिकी सांगते की, तापमान जसे वाढते तसे विशिष्ट गतीपेक्षा जास्त गती असणाऱ्या रेणूंची संख्या वाढत जाते. तापमान वाढण्यासाठी आपल्याला त्या पदार्थाला उष्णता द्यावी लागते. यावरून आपण असे अनुमान काढू शकतो की, समाजातल्या सुजनांची संख्या वाढण्यासाठी समाजातला सरासरी चांगुलपणा वाढायला हवा. समाजातला सरासरी चांगुलपणा वाढण्यासाठी आपल्याला संपूर्ण समाजाला समाजाभिमुख ज्ञानाने चेतवावे लागेल.

समाजात आज सर्वात मोठी उणीव कशाची भासत असेल तर ती सुजनशक्तीची. समाजात सुजनांचा अभाव नाही. विविध वर्तमानपत्रांमधून, वाहिन्यांवरून आणि प्रत्यक्ष दिसणाऱ्या कार्यक्रम-उपक्रमांमधून आपल्याला समाजातल्या सुजनांचा सुखद प्रत्यय येत असतो. तरी त्याच माध्यमांमधून समाजात रोज घडणाऱ्या घटनांचे जे चित्र आपल्यासमोर येते, त्यातून मात्र आपल्याला समाजावर नक्की प्रभाव कोणाचा, सुजनांचा की दुर्जनांचा, असा प्रश्न पडतो. आज आढळणाऱ्या सुजनशक्तीच्या अभावाकडून भविष्यकालीन प्रभावाकडे सामाजिक स्थित्यंतर कसे घडवून आणता येईल, याचा आपले मन नकळत विचार करू लागते.

आपल्या विविध प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी मानवाने विज्ञानाचा यशस्वी वापर केला आहे, याचा प्रत्यय आपल्याला आजवरच्या भौतिक प्रगतीतून पावलोपावली येत असतो. विज्ञानातल्या अनेक कल्पना, संकल्पना आणि नियम समाजालादेखील लागू पडतात. अर्थात, ही गोष्ट स्वाभाविकच आहे. कारण विज्ञानात ज्यांचा विचार केला जातो त्या भौतिकवस्तू आणि समाज या दोन्ही गोष्टी निसर्गाचाच भाग आहेत. वैज्ञानिक नियम हे निसर्गाचे नियम असतात. त्यामुळे निसर्गातल्या दोन प्रणालींमध्ये ज्या प्रमाणात साम्य असेल त्या प्रमाणात ते नियम दोन्हींना लागू होणार, मग त्या प्रणाली भौतिक असोत की सामाजिक! त्यामुळे सामाजिक प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार करणे शक्य आहे.

प्रथम आपण सुजनांची संख्या अल्प का असते, या प्रश्नाकडे वळूया. याचे उत्तर आपल्याला दोन सिद्धांतांच्या आधारे सापडते. पहिला सिद्धांत आहे उष्मागतिकीचा म्हणजे थर्मोडायनॅमिक्सचा. या सिद्धांताप्रमाणे कोणत्याही वायू किंवा द्रवातले रेणू हे त्यांच्या तापमानामुळे विविध गतींनी सर्व दिशांनी भटकत असतात. बहुसंख्य रेणूंची गती सरासरी गतीच्या आसपास असते. रेणूंची सरासरी गती ही त्या वायू किंवा द्रवाच्या तापमानानुसार वाढत जाते. पण कोणत्याही

तापमानाला सरासरीपेक्षा खूप जास्त किंवा खूप कमी गती असणाऱ्या रेणूंची संख्या ही नेहमीच अतिशय कमी असते.

ही स्थिती कशी निर्माण होते हे पाहण्यासाठी आपण पाण्याने भरलेला एक पेला समोर ठेवला आहे, अशी कल्पना करूया. हा पेला खोलीच्या तापमानाला आहे. त्यातल्या पाण्याच्या बहुसंख्य रेणूंची गती ही सरासरीच्या जवळपास असली तरी काही रेणूंची गती ही उकळत्या पाण्यातल्या रेणूंच्या सरासरी गतीएवढी असते. पेल्यातल्या पाण्याचे बाष्पीभवन होते ते याच रेणूंमुळे. पण पाण्याचे बाष्पीभवन खूपच सावकाश होताना दिसते. कारण अशा जास्त गतिमान रेणूंची संख्या पेल्यातल्या पाण्याच्या रेणूंच्या तुलनेत खूपच कमी असते.

आता आपण रेणूंऐवजी समाजातल्या व्यक्ती घेऊया आणि गतीऐवजी सुजनता म्हणजे चांगुलपणाचा गुण विचारात घेऊया. उष्मागतिकीचा नियम समाजालादेखील लागू पडतो, असे आपल्याला दिसते. समाजामध्ये अतिशय चांगली (म्हणजे सरासरीपेक्षा खूप जास्त सुजनता असणारी) आणि अतिशय वाईट (म्हणजे सरासरीपेक्षा खूप कमी सुजनता असणारी) माणसे फारच कमी असतात. बहुसंख्य लोकांचा चांगुलपणा हा समाजाच्या सरासरी चांगुलपणाच्या आसपास असतो.

असे का होते? उष्मागतिकी सांगते की, रेणूंच्या आपापसात टकरी होऊन त्यातून सातत्याने त्यांच्यात गतीची देवघेव होत असते. जास्त गती असणाऱ्या रेणूची कमी गती असणाऱ्या रेणूशी टक्कर झाली तर गतीच्या देवघेवीतून सरासरीपेक्षा जास्त गती असणाऱ्याची गती कमी होऊ शकते आणि कमी गती असणाऱ्याची गती वाढू शकते. म्हणजेच दोन्ही रेणूंची गती सरासरीच्या जवळ सरकते.

आपण रेणूंच्या जागी समाजातल्या व्यक्ती घेतल्या आहेत. या व्यक्तींमध्ये सतत व्यवहार चालू असतात. त्यातून या व्यक्तींना समाजातल्या इतर व्यक्तींच्या चांगलेवाईटपणाचा अनुभव येत असतो. जर एखादी व्यक्ती इतरांशी सतत फार चांगुलपणाने वागत राहिली, पण इतर लोक मात्र आपल्याशी स्वार्थीपणानेच वागतात असा अनुभव तिला सतत येत राहिला, तर त्या अनुभवांमधून त्या व्यक्तीचे व्यावहारिक शहाणपण वाढत जाते. परिणामी, ती व्यक्ती अधिक स्वार्थाकडे वळते. म्हणजेच तिची अधिक चांगुलपणाकडून सरासरी चांगुलपणाकडे वाटचाल होते. तरी चांगुलपणा हा मूलभूत गुण कायम राहतो. अतिरेकी चांगुलपणाला लगाम बसतो. इतकंच.

मानवांमध्ये व्यक्तीचा स्वार्थ हा नेहमीच समाजहिताच्या विरोधात असतो, असे नाही. उदा. एखाद्या व्यक्तीने चांगले शिक्षण घेतले, तर त्यातून त्या व्यक्तीप्रमाणेच समाजाचेही हित होऊ शकते. मात्र एखाद्या व्यक्तीचा स्वार्थ प्रमाणाबाहेर वाढला तर ती व्यक्ती समाजहिताची पर्वा न करता, आपल्या स्वार्थासाठी ज्ञानाचा दुरूपयोग करून समाजाला घातक ठरू शकते. याउलट, काही व्यक्ती स्वतःचा स्वार्थ बाजूला ठेवून समाजाच्या हितासाठी कमी-अधिक प्रमाणात कार्य करतात. अशा व्यक्तींना त्यांच्या कार्यानुसार आपण समाजसेवक, संत, महात्मे वगैरे म्हणतो. अशांची संख्या उष्मागतिकीच्या नियमांप्रमाणे नेहमी कमीच असते. अशा व्यक्तींची समाजातली संख्या वाढण्यासाठी काय करता येईल, याचे उत्तरही आपल्याला उष्मागतिकीच्या नियमांमध्ये शोधावे लागेल.

उष्मागतिकी सांगते की, तापमान जसे वाढते तसे विशिष्ट गतीपेक्षा जास्त गती असणाऱ्या रेणूंची संख्या वाढत जाते. तापमान वाढण्यासाठी आपल्याला त्या पदार्थाला उष्णता द्यावी लागते. यावरून आपण असे अनुमान काढू शकतो की, समाजातल्या सुजनांची संख्या वाढण्यासाठी समाजातला सरासरी चांगुलपणा वाढायला हवा. समाजातला सरासरी चांगुलपणा वाढण्यासाठी आपल्याला संपूर्ण समाजाला समाजाभिमुख ज्ञानाने चेतवावे लागेल.

मानवजातीला भेडसावणाऱ्या प्रदूषणापासून भ्रष्टाचारापर्यंतच्या आजच्या विविध समस्यांचा उगम हा कोणाच्या ना कोणाच्या स्वार्थात झालेला आपल्याला दिसतो. या सर्व समस्या सातत्याने वाढतच आहेत. गरीब, मध्यम वर्गीय आणि श्रीमंत, सत्ताधारी आणि विरोधक या सर्वांच्याच स्वार्थाचा आणि भ्रष्टाचाराचा आपल्याला पदोपदी प्रत्यय येत असतो. योग्य किंवा अयोग्य कामांसाठी लाच देण्यापासून घेण्यापर्यंत, खोटी कागदपत्रे बनवून अनुदान घेण्यापासून विविध प्रकारचे कर चुकवण्यापर्यंत आणि मुलांना योग्य ते पोषण-शिक्षण देण्याची कुवत नसताना जास्त मुले आणण्यापासून भ्रामक कल्पनांमधून मुलीऐवजी मुलगा हवा म्हणून वाटेल ते करण्यापर्यंत अनेक गोष्टी समाजात घडताना आपल्याला सातत्याने दिसतात. त्यामुळे, लोक शहाणे होतील, समाजातला वैयक्तिक स्वार्थ कमी होईल आणि संपूर्ण समाजाच्या हिताचा विचार वाढीला लागेल, ही गोष्ट आपल्याला जवळजवळ अशक्यप्राय वाटते.

मात्र ही गोष्ट अवघड असली तरी अशक्य का नाही,

या प्रश्नाचे उत्तर आपल्याला विज्ञानाच्या सिद्धांतांमध्येच सापडते. गेली साडेचार अब्ज वर्षे पृथ्वी सूर्याभोवती फिरते आहे. साडेतीन अब्ज वर्षांपूर्वी विविध प्रकारचे गुंतागुंतीचे रेणू एकत्र येऊन जगातली पहिली यशस्वी पेशी तयार झाली. सुमारे एक अब्ज वर्षांपूर्वी अशा अनेक पेशी एकत्र येऊन पहिला यशस्वी बहुपेशीय सजीव निर्माण झाला. नंतरच्या एक अब्ज वर्षांत या बहुपेशीय सजीवांची उत्क्रांती होत त्यांच्यापासून मानवासारखा बुद्धिमान सजीव निर्माण झाला.

एक अब्ज वर्षांपूर्वीचा हा टप्पा खूप महत्त्वाचा आहे. एकपेशीय सजीवांपासून बहुपेशीय सजीव निर्माण होताना एकपेशीय सजीवांच्या स्वार्थापेक्षा बहुपेशीय सजीवपणाचे उत्क्रांतीतले फायदे जास्त महत्त्वाचे ठरले. हे परिवर्तन स्वतःचे अन्न स्वतःच बनवणाऱ्या वनस्पतींचे पूर्वज असणाऱ्या एकपेशीय सजीवांमध्ये जसे घडले, तसेच ते प्राण्यांचे पूर्वज असणाऱ्या परोपजीवी एकपेशीय सजीवांमध्येही घडले. यावरून बहुपेशीय सजीवाचा उदय ही उत्क्रांतीमधली अटळ अशी घटना होती, हे स्पष्ट होते.

मात्र, एकपेशीय प्राणी उत्क्रांतीच्या प्रवासात टिकून राहणे अशक्य झाले होते म्हणून बहुपेशीय प्राणी निर्माण झाले, असे नाही. आज एक अब्ज वर्षांनंतरही एकपेशीय प्राणी पृथ्वीवर आहेत. पण बहुपेशीय प्राण्यांच्या क्षमता एकपेशीय प्राण्यांच्या तुलनेत प्रचंड प्रमाणात वाढल्या आहेत.

खरे तर खुद्द मानवसुद्धा केवळ मानवी पेशींचा बनलेला बहुपेशीय प्राणी नाही. एका मानवी पेशीमागे मानवाच्या शरीरात दहा एकपेशीय जंतू असतात, असे आढळले आहे. हे जंतू उपयोगी जीवरसायने निर्माण करण्यापासून अनावश्यक रेणूंचे विघटन करण्यापर्यंत अनेक मानवोपयोगी कामे करतात. किंबहुना, मानवी पेशी आणि हे जंतू मिळून आपले शरीर परिपूर्ण बनते आणि काम करू शकते. मानवी पेशी आणि हे जंतू या दोघांचेही अस्तित्व एकमेकांवर अवलंबून असते. म्हणजेच, मानवदेखील एक बहुपेशीय आणि अनेक एकपेशीय सजीवांचा बनलेला समूह आहे. मात्र, मानवाच्या शरीरातल्या मानवी आणि जंतू पेशींचे स्वत्व किंवा स्वातंत्र्य पूर्णपणे हिरावलेले नसते. मानवी शरीरातल्या मानवी पेशी सगळ्यांना एकत्र आणून सुसूत्रपणे कारभार चालवणारी यंत्रणा म्हणून काम करतात. आणि शरीर चालते ते या सर्वांच्या संयुक्त कार्यातूनच.

याचे मानवी समाजाच्या स्थितीशी खूपच साम्य आहे. म्हणूनच, अब्जावधी वर्षांच्या काळात निसर्गात घडलेल्या असंख्य प्रयोगांमधून मानवी शरीराचा कारभार चालवणारी जी यंत्रणा उभी राहिली आहे, तिच्या उभारणीमागची निसर्गाने वापरलेली मूलतत्त्वे ही मानवी समाजाच्या हितासाठी कार्य करणारी यंत्रणा उभारण्यासाठी आदर्श आणि उपयुक्त ठरतील.

मानवी शरीरयंत्रणेत एकूण पेशींपैकी मानवी पेशींची संख्या अवघी दहा टक्के एवढीच असते. (कारण उरलेली नव्वद टक्के संख्या ही एकपेशीय जंतूंची असते.) पण मानवी पेशींच्या काही महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यांमुळे साऱ्या यंत्रणेचा कारभार हा शरीराच्या हितवर्धनासाठीच चालतो. शरीरातल्या प्रत्येक मानवी पेशीकडे शरीराचा कारभार चालवण्यासाठी लागणारे सर्वच्या सर्व ज्ञान जनुकांच्या रूपाने साठवलेले आहे. मात्र त्या त्या पेशीच्या शरीरातल्या कामानुसार संबंधित माहिती साठवलेले जनुक सक्रिय केलेले असतात. शरीरात मानवी पेशींचे एक जालक उभे केलेले असते. शरीरात प्रत्येक ठिकाणी घडणाऱ्या सर्व गोष्टींवर हे जालक बारीक नजर ठेवून असते. कोणताही घटक प्रमाणापेक्षा जास्त किंवा कमी झाला तर तो पुन्हा मूळपदावर आणण्यासाठी मानवी पेशींकडून त्या घटकांचे नियंत्रण करणारी यंत्रणा या जालकाकडून सक्रिय केली जाते. ज्या पेशी शरीराच्या चालनात बाधा आणतात, त्यांचा बीमोड केला जातो. खुद्द मानवी पेशींची संख्या प्रमाणाबाहेर वाढू लागली तर त्यांच्यावरदेखील कारवाई होते. किंबहुना, जोपर्यंत अशा पेशी नष्ट केल्या जातात, तोपर्यंतच आपण कर्करोगमुक्त जीवन जगू शकतो.

आता आपण शरीराच्या जागी मानवसमाज घेऊ, आणि मानवी पेशींच्या जागी सुजनांचा समूह. सुजनांची समाजातली संख्या दहा टक्के असली तरी, जर ते एकत्र आले तर ते शरीरातल्या मानवी पेशींप्रमाणे समाजाचा कारभार संपूर्ण समाजाच्या हितासाठी चालवू शकतील. हे कसे घडू शकेल हे आपल्याला उत्क्रांतीच्या प्रवासातून उलगडते.

निसर्गात बहुपेशीय सजीव निर्माण होण्याचे प्रयत्न किमान पंचवीस वेळा तरी झाले होते. यातल्या दोन यशस्वी प्रयत्नांमध्ये बहुपेशीय प्राणी आणि बहुपेशीय वनस्पतींची निर्मिती झाली. मानवांमध्येही एक-व्यक्तीय प्राण्यापासून बहु-व्यक्तीय समष्टीची निर्मिती करण्याचे अनेक प्रयत्न झाले आहेत.

सुमारे एक ते दोन लाख वर्षांपूर्वीच्या टोळ्या हा असाच एक प्रयत्न होता. मानवाच्या आदिम भाषांनी टोळीकडची माहिती साठवणे, तिची देवाणघेवाण करणे आणि टोळीतल्या व्यक्तींचे जालक उभारणे यात महत्त्वाची भूमिका बजावली.

टोळीतल्या व्यक्तींमध्ये विविध कार्यांची विभागणी करण्यात आली. पुरुष शिकार करायचे, तर स्त्रिया मुलांचे संगोपन करायच्या. हजारो वर्षे चाललेल्या या पद्धतीचे अनेक परिणाम आपल्याला आजही आपल्या भाषांपासून जनुकांपर्यंत सर्वत्र दिसतात. रजोनिवृत्तीनंतरही स्त्रीला लाभणाऱ्या दीर्घायुष्या-पासून स्त्री-पुरुषांच्या प्रवृत्तीतल्या आणि वागण्या-बोलण्यातल्या फरकांपर्यंत विविध गोष्टींची घडण टोळी या बहु-व्यक्तीय समष्टीत झाली. विविध धर्म, देश, संघटना आणि राज्यप्रणाली यांची स्थापना हेदेखील बहु-व्यक्तीय समष्टीची निर्मिती करण्याचेच वेगवेगळे प्रयत्न आहेत.



सुरुवातीच्या बहुपेशीय सजीवांमध्ये विविध कामांचे वाटप हे खूपच मर्यादित प्रमाणात झालेले होते. त्यामुळे बहुपेशीय सजीवाच्या शरीराचे कोणत्याही प्रकारे तुकडे झाले तरी ते तुकडेदेखील स्वतंत्रपणे बहुपेशीय प्राणी म्हणून जिवंत राहू शकत. आज मानवासारख्या बहुपेशीय प्राण्यांमध्ये कामाचे विशेषीकरण एवढ्या प्रचंड प्रमाणात झाले आहे की मानवाच्या देहाचे दोन तुकडे केले तर ते दोन्ही तुकडे स्वतंत्रपणे मानव म्हणून जगू शकत नाहीत. विशेष म्हणजे, रोपण केलेल्या अवयवांच्या किंवा पेशीसंवर्धाच्या (सेल-कल्चर) रूपात पेशीपातळीवर मात्र हे तुकडे जिवंत राहू शकतात!

मानवाच्या बहु-व्यक्तीय समष्टीची आजची स्थिती ही सुरुवातीच्या बहुपेशीय सजीवांसारखी आहे. बहु-व्यक्तीय समष्टींचे तुकडे पडले तरी ते स्वतंत्रपणे जिवंत राहू शकतात. किंबहुना, ते असे स्वतंत्रपणे जगू शकतात, म्हणूनच वैयक्तिक स्वार्थापोटी धर्मांचे किंवा राजकीय पक्षांचे तुकडे पडताना दिसतात.

सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वीच्या भारतातल्या आणि ग्रीसमधल्या नगरराज्यांपासून आजवर लोकशाहीचे अनेक प्रयोग केले गेले. लोकशाहीचे अनेक दोष आजवर स्पष्ट झाले असले तरी अन्य राज्यप्रणालींच्या तुलनेत लोकशाही हा अधिक चांगला पर्याय मानला जातो. या लोकशाहीत समाजातल्या सुजनांची काय भूमिका आहे? 'आपल्या एका मतानं काय फरक पडणार आहे?', 'कोणताही पक्ष निवडून आला तरी सगळे तेच करणार!' वगैरे मते मांडणारे बरेचसे 'सुजन' हे नेतृत्व तर सोडाच, साधे मतदानही करायला जात नाहीत! ही परिस्थिती बदलायची असेल तर सुजनांना स्वतः सक्रिय व्हावे लागेल. प्रत्येक व्यक्तीमध्ये एक 'सत्' असतो. तो सुजनांनी जागृत केला तर समाजातले बहुसंख्य लोकही सुजनांच्या बाजूने येऊ शकतील आणि सुजनशक्ती प्रभावी होऊ शकेल.

किंबहुना, समाजातल्या बहुसंख्य लोकांना सुजनतेकडे वळवून सक्रिय बनवणे अत्यावश्यक आहे. शरीरातल्या सर्व मानवी पेशी एका समान पातळीवर असतात, त्याप्रमाणे सर्वांना

समान पातळीवर आणणे आणि ठेवणे फार महत्त्वाचे आहे. वैयक्तिक किंवा विशिष्ट गटांचे स्वार्थ साधण्यासाठी भेदनीतीचा वापर केला जातो. तथाकथित लोकशाहीवाद्यांनीसुद्धा पहिल्या महायुद्धापूर्वीपर्यंत अनेक देशांत स्त्रियांना निवडणुकीतील मतदानाच्या किंवा उमेदवारीच्या अधिकारांपासून वंचित ठेवण्यासाठी स्त्री-पुरुषांमधील पारंपरिक भेदांचा दुरुपयोग केला होता, ही गोष्ट या संदर्भात लक्षात ठेवायला हवी. तथाकथित सुजनता ओळखून लोकशाही ही कोणाचीही मक्तेदारी बनता कामा नये. सुजनतेच्या नावाखाली स्वतःचे, आपल्या सग्यासोयऱ्यांचे किंवा आपल्या गटाचे स्वार्थ साधण्याचा अधिकार कोणाला मिळाला तर ते तथाकथित सुजनही भ्रष्ट नेत्यांइतकेच नतद्रष्ट ठरतील. म्हणून सुजनशक्ती ही सर्वांना समान संधी, समान आधार आणि समान अधिकार देणारी राहील, याचीही दक्षता घ्यावी लागेल.

शतकापूर्वीच्या काळातले सुजन हे परिस्थिती बेताचीच असली तरी, प्रसंगी समाजाचा रोष पत्करूनही समाजहितासाठी स्वतः तोशीस सोसून काहीतरी करायचे. आज सुजनांच्या कार्याला परिस्थिती पूर्वीपेक्षा कितीतरी अनुकूल आहे.

त्या काळी समाजकार्याला प्रामुख्याने दानशूर व्यक्तींचा आधार असायचा. आज शासनाकडून आणि कंपन्यांच्या 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी'तल्या निधींमधून चांगल्या कामांसाठी पैसे उपलब्ध होणे शक्य आहे. तसेच, समाजाचा सरासरी आर्थिक स्तर उंचावल्यामुळे आपला काही पैसा हा सामाजिक कार्यासाठी देणे अनेकांना शक्य आहे. यातून समाजहिताच्या कामांना आर्थिक आधार मिळू शकेल.

मनुष्यबळ प्राप्त होण्यासाठी वर्षातून एखादा आठवडा आपल्याला आवडणाऱ्या सामाजिक कार्यासाठी द्यायला युवा-सुजनांना प्रवृत्त करता येईल. सध्या, निवृत्त झालेल्या, सांसारिक जबाबदाऱ्या पार पाडलेल्या, पण शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या सक्षम असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढते आहे. या ज्येष्ठांना सुजनकार्यात सामील करून घ्यायला हवे. जशी भारताल्या तरुणांची वाढती संख्या हा 'जनसांख्यिकीय लाभांश' (डेमोग्राफिक डिव्हिडंड) आहे, तशी सामाजिकदृष्ट्या सक्रिय अशा ज्येष्ठ नागरिकांची वाढती संख्या हा 'जनसांख्यिकीय अधिलाभांश' (डेमोग्राफिक बोनस) ठरू शकेल!

आज इंटरनेटमुळे अनेक गोष्टी सोप्या झाल्या आहेत. इंटरनेट हे सुजनांचे जालक निर्माण करण्याचा आधार आणि साधन बनू शकते. बहुपेशीय प्राण्यांमधल्या पेशींप्रमाणे समाजातल्या प्रत्येक व्यक्तीला सुजनतेसाठी लागणारे सगळे ज्ञान इंटरनेटमुळे उपलब्ध होऊ शकते. यासाठी हे ज्ञान लोकांना त्यांच्या भाषेतून उपलब्ध करून देण्याचे काम सुजनांनी करायला हवे. इंटरनेटमुळे एकमेकांशी संपर्क ठेवणे सहज शक्य झाले आहे. त्यामुळे विविध कामांचा समन्वय साधणे शक्य होईल.

इंटरनेटच्या जाळ्याचा उपयोग करून कोणत्याही कामासाठी शासकीय कार्यालयात जाण्याऐवजी नेटवरूनच ते लोकांना त्यांच्या सोयीस्कर वेळात करता येईल, अशी रचना करायचा आग्रह सुजनांनी धरायला हवा. कोणाही व्यक्तीचे शासनाकडचे काम कोणाही शासकीय कर्मचाऱ्याकडे ऐन वेळी ऑन-लाईन जाऊ लागले तर कामासाठी लाच देणे-घेणे कठीण होईल.

अनेक व्यक्ती एखाद्या गोष्टीवर इंटरनेटवरून देखरेख करत असतील तर त्यात होणारी चूक ही पटकन दुरुस्त केली जाते, हे सत्य 'विकीपिडिया' या मुक्त विश्वकोशावरील संशोधनातून स्पष्ट झाले आहे. कोणत्याही तज्ज्ञाकडून मानधन देऊन विकिपिडियाचे संपादन करून घेतले जात नाही. ते काम हौशी संपादक स्वेच्छेने करतात. असे असले तरी विकिपिडियातल्या मजकुराची अचूकता किंवा विश्वासार्हता ही 'ब्रिटानिका'सारख्या तज्ज्ञांनी संपादित केलेल्या लब्धप्रतिष्ठित विश्वकोशांएवढीच असते, असे संशोधनात आढळले आहे.

लोकांसाठी केल्या जाणाऱ्या शासकीय कार्यावर इंटरनेटवरून लक्ष ठेवण्यासाठीही याच तत्त्वाचा उपयोग होऊ शकतो. गोपनीय अशा गोष्टी वगळता सर्व कामांच्या शासकीय फाइल्स, पत्रव्यवहार, टेंडर्स, कंत्राटदारांना दिलेल्या ऑर्डर्स अशा सर्व गोष्टी सातत्याने इंटरनेटवरूनच हाताळण्यात आल्या पाहिजेत आणि त्या तात्काळ लोकांना दिसत राहिल्या पाहिजेत, असा नियम करण्यासाठी सुजनांनी प्रयत्न करायला हवा. त्यामुळे आपल्या पैशांमधून होणाऱ्या शासकीय कामांवर लोकांना देखरेख करता येईल. न झालेल्या किंवा असमाधानकारक कामांसाठी दिले जाणारे पैसे रोखता येतील. लोकांसमोर कारभार चालवावा लागला की भ्रष्टाचार, कारभारातला गलथानपणा आणि नकळत होणाऱ्या चुका कमी व्हायला खूपच मदत होईल. ज्याप्रमाणे दहा अन्य एकपेशीय जंतूंमागे एक एवढ्या अल्प प्रमाणात असणाऱ्या मानवपेशी त्या साऱ्यांवर नियंत्रण ठेवून योग्य ते काम घडवून आणतात, त्याप्रमाणे कारभारावर दक्षतेने लक्ष ठेवणारे सुजनही

# नवीन मौज प्रकाशने

अभिरुचीसंपन्न, प्रतिभाशाली लेखकाबरोबर जगलेल्या समृद्ध क्षणांकडे मागे वळून पाहत,
त्यांना पुन्हा अजमावत स्वत:सह पूर्ण आयुष्याचा तटस्थपणे घेतलेला एक उत्कट शोध

**अमलताश : सुप्रिया दीक्षित**

३५२ पृष्ठे + २० रंगीत पृष्ठे किंमत ३७५ रुपये

मं० वि० राजाध्यक्ष यांच्या निवडक लेखांचे संकलन

**निवडलेले खर्डे : मं० वि० राजाध्यक्ष**

मोठा आकार, पुठ्ठा बांधणी, ३५२ पृष्ठे किंमत ४०० रुपये

ग्रंथव्यवसायाव्यतिरिक्त राजकारण, संगीत, नाटक अशा विविध क्षेत्रातील
आपल्या उल्लेखनीय मुशाफिरीचे दिलखुलास, नि तितकेच प्रामाणिक कथन

**रिंगणाबाहेर : रामदास भटकळ**

१५६ पृष्ठे किंमत १७० रुपये

लंपनच्या भावविश्वात वाचकांना गुंतवून टाकणाऱ्या लेखकाच्या ललित लेखांचे भावस्पर्शी लेणे

**चांदण्याचा रस्ता : प्रकाश नारायण संत**

९६ पृष्ठे + ८ रंगीत पृष्ठे किंमत १२५ रुपये

एका अभिजात चित्रपटाच्या निर्मितीमागच्या 'दृश्यांचा' स्मृतिरूप चित्रदर्शी उजाळा
बाळ ठाकूरांची नयनरम्य सजावट

**निर्मिती : दो आँखे बारह हाथ : प्रभाकर पेंढारकर**

मोठा आकार, पुठ्ठा बांधणी १३६ पृष्ठे किंमत २५० रुपये

आपल्या जीवनाचा अविभाज्य भागच बनून गेलेल्या विविध क्षेत्रांतील
आपुलकीच्या माणसांच्या व्यक्तित्वाचा जिवंत नि मनोज्ञ वेध

**मनातली माणसं : नरेंद्र चपळगावकर**

२२८ पृष्ठे किंमत २२५ रुपये

**मौज प्रकाशन** गृह, गोरेगांवकर लेन, मुंबई ४००००४ दूरध्वनी: २३८७ १०५० इमेल: moujprakashan@gmail.com

शासकीय यंत्रणेला समाजहिताचा कारभार करायला भाग पाडू शकतील.

सामान्य माणसेही अनेकदा 'कोण बघतंय?' किंवा 'काय फरक पडतोय?' असा विचार करत अनेक नियम तोडत असतात. ही सवय वाढत जाते आणि एक दिवस घातक ठरते. अशा गुन्ह्यांवर लक्ष ठेवायला आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि योग्य समज मिळावी यासाठी सकारात्मक सेवा करायला लावण्याचा वापर करण्यासाठी सुजनांना प्रयत्न करता येतील. उदाहरणार्थ, वाहतूक सिग्नल मोडणाऱ्यांवर कॅमेरे लावून लक्ष ठेवता येईल आणि सिग्नल तोडणाऱ्यांना दंडाऐवजी एक दिवस वाहतूक नियंत्रणात पोलिसांना मदत करण्याचे काम देता येईल. यातून सामान्य माणसाला नियम पाळण्याचे फायदे कळतील. तो स्वतःही सुधारेल आणि इतरांनाही सुधारू शकेल.

समाजात चालणाऱ्या अन्य उपक्रमांमध्येही सुजनांनी सामील होऊन त्यांना सकारात्मक दिशेने नेण्याची गरज आहे. उदाहरणार्थ, समाजात उत्सवांचे अनेक कार्यक्रम वगैरे चालूच असतात त्यांना अधिक चांगले समाजोपयोगी स्वरूप कसे देता येईल यासाठीच्या कल्पना उत्सव करणाऱ्या मंडळांमध्ये सामील होऊन प्रत्यक्षात आणता येतील. यातल्या यशस्वी कल्पना वेबपेजवर माडून इतरांनाही उपलब्ध करून देता येतील. यातून असे उत्सव अधिक वरच्या पातळीवर पोचू शकतील.

अर्थात, नवनवीन प्रकारची वैशिष्ट्यपूर्ण कार्ये करणाऱ्या पेशींच्या उत्क्रांतीत बहुपेशीय सजीवांचे खरे सामर्थ्य आहे. उत्परिवर्तनाने काही पेशींमध्ये नवे जनुक निर्माण झाले. या जनुकांमुळे कोणते उपयुक्त नवे बदल घडतात, या निकषावर उत्क्रांतीच्या प्रवासात त्यातले जनुक निवडले गेले. यातूनच एकपेशीय सजीवांच्या पेशींच्या समुदायापासून सुरुवात होऊन मानवी मेंदूपर्यंत विविध पेशींची निर्मिती झाली.

मानवसमाजात नवनव्या संकल्पना ह्या जनुकांचे कार्य करतात. विज्ञानातल्या संकल्पना सतत उत्क्रांत होत राहतात. जुन्या संकल्पना, जुने नियम यांच्या मर्यादा स्पष्ट होताच त्यांची जागा नव्या संकल्पना, नवे नियम घेतात. अशा संकल्पनांच्या शोधासाठी विज्ञानसंशोधनात वापरली जाणारी पद्धती मानवसमाजासाठी नवनव्या संकल्पना शोधण्याकरिता उपयोगी ठरेल. विज्ञानसंशोधन हे निरीक्षण, अनुमान, प्रयोगाने पडताळणी, निष्कर्ष, नियम, उपयोजन या टप्प्यांमधून जात राहते. त्याचबरोबर नवी निरीक्षणेदेखील सुरूच राहतात. ही नवी निरीक्षणे जुन्या निष्कर्षांशी जुळत नसतील तर नव्या निष्कर्षांचा, नव्या नियमांचा शोध घेतला जातो, आणि विज्ञानसंशोधनाचे चक्र पुढे फिरत राहते. विज्ञानाची खरी ताकद ही या पद्धतीत आहे. तिचा वापर मानवसमाजासाठी नवनव्या संकल्पनांच्या निर्मितीसाठी आणि निवडीसाठी करता येईल.

नवसंकल्पनांची निर्मिती करण्यासाठी समूहस्रोताचा वापर करता येईल. समाजात अनेक व्यक्ती विविध गोष्टींवर काम करत असतात. या कामांच्या अनुभवांमधून त्यांना नवनवीन संकल्पना सुचतात. अशा संकल्पना सर्वांपर्यंत पोचवण्यासाठी वेबपेजचा उपयोग करता येईल. मूळ संकल्पना, ती का आणि कशी सुचली, तिची अंमलबजावणी कशी केली आणि तिचे फायदे, अशा गोष्टी या वेबपेजवर मांडता येतील. त्यावर कोणालाही भाष्ये करता येतील. तिचे अन्य फायदे, मर्यादा आणि तोटे यांवर चर्चा होऊ शकेल. तिच्यात सुधारणा किंवा बदल सुचवता येतील. त्यातून ती संकल्पना विकसित होऊन ती मोठ्या प्रमाणात राबवण्यासाठी गट निर्माण होऊ शकतील. यातून विविध प्रयोग होत राहतील, त्यातल्या संकल्पनांचे मूल्यमापन होईल. उपयुक्त संकल्पना सर्वांना उपयोगी ठरतील, तर निरुपयोगी संकल्पनांचीही नोंद राहून त्यांच्यावर वेळ वाया घालवणे इतरांना टाळता येईल. या प्रक्रियेतून अनेक नवनवीन उपक्रम समाजात साकारू लागतील. समाजाला पुढे नेण्याची प्रक्रिया अधिक वैज्ञानिक आणि वेगवान बनेल.

ज्याप्रमाणे, एक अब्ज वर्षांपूर्वीच्या एकपेशीय प्राण्याकडे पाहून यातून मानव निर्माण होईल हे सांगणे अशक्य होते, त्याप्रमाणे आपण या साऱ्यातून कुठपर्यंत मजल मारू याची आज कल्पनाही करणे अशक्य आहे. कारण भविष्यात कोणाला काय संकल्पना सुचतील, हे थोडेच आज आपल्याला सांगता येणार आहे! पण एक गोष्ट मात्र नक्की, की बहुपेशीय प्राण्याच्या उत्क्रांतीप्रमाणे या प्रयत्नांमधून घडून आलेल्या सामाजिक उत्क्रांतीमुळे सुजनांचा प्रवास आज जाणवणाऱ्या अभावापासून भविष्यात साकारलेल्या प्रभावापर्यंत निश्चितच झालेला असेल!

**सुधीर थत्ते**
फ्लॅट नं. ११३, टॉवर ए ६, गोदरेज गार्डन एन्क्लेव्ह,
पिरोजशा नगर, विक्रोळी (पूर्व), मुंबई ४०० ०७९
भ्रमणध्वनी ९९८७५८८५८३
sudhirthattey@yahoo.com

# कहाणी 'कल्पसर'ची

**वसंत वसंत लिमये**

'कल्पसर'बद्दल माहिती गोळा करायला सुरुवात केली. या संकल्पनेचे जनक डॉ. अनिल काणे असं मराठी नाव एक सुखद धक्का देऊन गेलं. 'कल्पसर' ही कल्पनाच अनंत सागराला गवसणी घालणारी होती. घोघा ते हान्सोट असा सुमारे ६४ किमी लांबीचा बंधारा, खर्च ४५ ते ६० हजार कोटी! आकडेच धडकी भरवणारे. ८६ साली प्रथमच डॉ. अनिल काण्यांनी ही कल्पना मांडली आणि गेली दोन तपं, अथक परिश्रम करून तिचा पाठपुरावा केला. कित्येकदा आपण भौगोलिक दृष्ट्या झापडं लावून वावरतो. 'कल्पसर' या अफाट प्रकल्पाबद्दल, जो गुजरात राज्यात गेली २५ वर्षं चर्चेत आहे, मला कल्पनादेखील नव्हती, म्हणून मी स्वतःशीच खजील झालो. पण लगेचच एक ठरवून टाकलं की डॉ. अनिल काणे यांची भेट घ्यायची!

गुजरातमधील रस्ते छानच होते. आम्ही आणंदहून खंबातकडे निघालो होतो. हायवेवरून आम्ही छोट्या रस्त्यावर दक्षिणेकडे वळलो. गावातील छोटा रस्ता असूनही खड्डे विरळच! महाराष्ट्रात आजकाल गाडीचं गलबत होतं, पण इथे मात्र गाडी मजेत पळत होती. तारापूरमार्गे आम्ही खंबातला पोचलो. एकेकाळचं श्रीमंत गाव, काप गेले पण भोकं राहिली अशा अवस्थेत होतं. शंभरएक वर्षांपूर्वी हजचे यात्रेकरू या गावात जमा होत. खंबात हे महत्त्वाचं बंदर होतं. बंदरावरील गढीसारख्या वास्तूला दक्षिणेकडे 'हज दरवाजा' होता. या दरवाज्यातून यात्रेकरू जहाजावर चढून, खंबातच्या आखातातून मक्केकडे रवाना होत असत.

आज या गावाला काहीसा बकालपणा आला आहे. जुन्या देखण्या दुमजली इमारती रस्त्याच्या दुतर्फा अंग चोरून उभ्या होत्या. विजेच्या, टेलिफोनच्या तारांचं जाळं, टपऱ्या यांच्या गर्दीत या इमारती हरवल्या होत्या. गाडी वेगात असती तर या इमारती लक्षातही आल्या नसत्या. पण रस्त्यावरील गर्दी व थंड निर्विकारपणे फिरणाऱ्या गायींमुळे आम्ही हळुहळू चाललो होतो. इमारतीवरील नक्षी लक्ष वेधून घेणारी होती. मी गाडीतून उतरून पायीच निघालो. पोर्तुगीज नक्षीचे खांब आणि गुजराती नक्षीच्या लाकडी कमानी आणि तुळयांनी सजलेल्या इमारती जुन्या वैभवाची साक्ष देत होत्या. वाडा आणि हवेली यांचं एक देखणं मिश्रण होतं. इथे पूर्वी व्यापारी आणि धनिकांची वस्ती असावी. याच गर्दीच्या रस्त्यावर मिठाईच्या दुकानात, खंबातची खासियत असलेली, 'हलवासण' ही मिठाई सापडली. सुकामेवा, साखर, मैदा आणि सढळ हस्ते तुपात बनवलेली ही मिठाई जिभेवर ठेवताच विरघळते.

बाजारपेठेतून वाट काढत आम्ही बंदरभागात पोचलो. किनाऱ्याला समांतर रस्ता आणि बसक्या झोपड्यांची गर्दी, त्यापलीकडे क्षितिजापर्यंत पसरलेली पिवळसर वाळू आणि मिठागरातील छोट्या पिरॅमिडसारखे मिठाचे डोंगर. झोपड्यांतून वाट काढत आम्ही वाळूच्या किनाऱ्यावर पोचलो. मागे वळून पाहता, इमारतींच्या अंगाखांद्यावर झाडाझुडुपांची गर्दी

दिसली. लक्षपूर्वक पाहिल्यावर, एकेकाळचा भव्य दरवाजा पुसटपणे जाणवला. हाच तो 'हज दरवाजा' असावा. दक्षिणेकडे पाहिल्यावर दूरवर थरथरत्या मृगजळात हरवलेली पाण्याची एक रेष दिसली. चौफेर पसरलेली वाळू, मिठाचे डोंगर आणि दूरवर चमकणारं पाणी, डोक्यावर तळपणारं ऊन नजरेसमोर विविध भास उभे करत होतं. लाटांवर डुचमळणारी प्रचंड शिडांची गलबतं, तिरप्या फळ्यांवरून मालाच्या गासड्या उतरवणारी गुलामांची मुंग्यांसारखी रांग, मध्येच उंची कपड्यातील, डोक्यावर मंदिल-पगड्या घालून मिरवणारे रुबाबदार व्यापारी, बलदंड काळ्या तुकतुकीत शरीराच्या मुकादमानं हवेत काड्कन फटकारलेला चाबूक. मी स्वत:लाच चिमटा घेत, वैराण क्षितिजाकडे पाहत स्वतःलाच विचारलं, खंबातचं आखात कुठाय?

एकेकाळी घोघा, भावनगर, खंबात, ढोलेरा, भरुच, दहेज, सुरत अशी मातब्बर बंदरं असलेलं, मध्यपूर्वेशी भरभराटीला आलेला, प्राचीन काळापासून चाललेला व्यापार असलेलं खंबातचं आखात, आज जणू जादू झाल्याप्रमाणे गायब झालं आहे. बहुतेक बंदरं गाळ भरल्यानं निकामी झाली आहेत. साठलेल्या वाळूमुळे सारं आखातच आक्रसल्यासारखं झालं आहे. आम्ही पोचलो ती वेळ ओहोटीची होती आणि म्हणूनच बोडका किनारा आणखीच भीषण दिसत होता.

खंबातच्या आखाताचा आणि खंबात बंदराच्या वैभवाचा उल्लेख मार्कोपोलो, फ्लीनी अशा ऐतिहासिक प्रवाशांनी मोठ्या गौरवानं केलेला आहे. या आखातातील व्यापार कदाचित ५००० वर्षांपूर्वीपासून मध्यपूर्व, इजिप्त आणि आफ्रिका येथील देशांशी चालू होता. या आखाताचं एक दुर्दैवी वैशिष्ट्य असं की भरती आणि ओहोटीच्या पातळ्यांत पडणारा सुमारे ११ मीटर म्हणजेच ३५ फुटांचा फरक. यापेक्षा जास्त फरक जगात फक्त आणखी एकाच ठिकाणी म्हणजे बे ऑफ फंडी या पूर्व कॅनडातील आखातात आढळतो. या फरकामुळे जहाजांना भरतीबरोबरच आत येऊन, झटपट माल उतरवून भरतीसोबतच बाहेर पडावं लागतं. नाहीतर जहाज रुतून फसण्याची शक्यता संभवते. तसंच, मोठी गलबतं इथे आत येण्यास कचरतात. नर्मदा, माही, वार्तक, साबरमती अशा सात नद्या गेली हजारो वर्षं या आरवातात गाळ आणून सोडत आहेत. यामुळेच इथली बहुतेक बंदरं निकामी झाली आहेत. हे हडप्पा काळातील 'लोथल' बंदर असू शकेल यावर विश्वासच बसत नाही. कारण इथून आखाताचं पाणी सुमारे ८ किमी अंतरावर आहे. यावरून गाळामुळे किनारा कसा आक्रसला आहे याची कल्पना येते.



डॉ. अनिल काणे

खंबातहून काहीसा खट्टू होऊनच वटामणमार्गे भावनगरला मुक्कामास पोचलो. भावनगर हे एक पूर्वीचं संस्थान. संस्थानाच्या कारभारात अनेक मराठी कुटुंबं दोनशे वर्षांपूर्वी इथे स्थायिक झालेली. दुसऱ्या दिवशी वेरावळकडे मार्गस्थ होण्यापूर्वी, भावनगरच्या थोड्या दक्षिणेस घोघा नावाचं जुनं बंदर पाहण्यासाठी निघालो. इथेही बंदराच्या फक्त खुणाच दिसतात. एस्सार कंपनीच्या जेटीचं बांधकाम सुरू होतं. इथे सर्वप्रथम आखाताचं उदंड पाणी दिसलं. समोर पश्चिमेकडे आखातापलिकडे, धूसर क्षितिजावर दहेज, भरुच यांचा किनारा दिसला. आखाताची व्याप्ती प्रथमच नजरेत भरत होती.

जेटीच्या कामावरील वॉचमन जरा आखडू वाटला. 'इथे गाडी पार्क करू नका', 'फोटो काढायला मनाई आहे', वगैरे सांगत आमच्यावर डाफरला. थोड्या इकडच्यातिकडच्या गप्पा झाल्यावर कळलं की साहेब युपीकडले आहेत. बॉलिवूडच्या कृपेनं, बच्चनच्या खर्जाची नक्कल करत, ''कहाँ के हो? कौन जिला?'' असं मी विचारलं. नंतर माझी पत्नी लखनौची आहे असं सांगताच साहेबांची कळी खुलली आणि आमच्या मस्त गप्पा सुरू झाल्या.

''भाईसाब, यहाँ एक बहुत बडा डॅम बननेवाला है ।'' इति वॉचमन.

मी काहीसा बुचकळ्यात पडलो. डॅम सहसा नदीवर बांधतात, आणि इथे तर उसळणाऱ्या लाटांपलीकडील किनारा दिसणंदेखील मुश्किल होतं.

''डॅम तो नर्मदापर बन रहा है!'' मी माझं अज्ञान पाजळलं.

“नही भाईसाब, एक नया डॅम यहाँसे हान्सोट तक बननेवाला है । कल्पसर एक बहुत बडा प्रोजेक्ट है!” वॉचमन ठामपणे म्हणाला.

“क्या नाम बताया आपने?” माझ्या स्वरातील आश्चर्य आणि साशंकता लपवणं अशक्यच होतं.

“कल्पसर!” वॉचमन संथपणे म्हणाला. एक मोठ्ठं रहस्य सांगितल्याचा आविर्भाव त्याच्या चेहऱ्यावर होता. गाडीच्या खिडकीतून फरफरणारा कोमट वारा, पळणारी नारळाची झाडं आणि उचंबळणारं डावीकडील खंबातचं आखात, मला काहीच जाणवत नव्हतं. माझ्या डोक्यात एकच शब्द घुमत होता, ‘कल्पसर’.

मी त्यादिवशी संध्याकाळीच ‘ओम गूगलाय नमः’ मंत्र आळवला आणि ‘कल्पसर’बद्दल माहिती गोळा करायला सुरुवात केली. या संकल्पनेचे जनक डॉ. अनिल काणे असं मराठी नाव एक सुखद धक्का देऊन गेलं. प्राथमिक माहिती मिळताच माझे डोळे विस्फारले. ‘कल्पसर’ ही कल्पनाच अनंत सागराला गवसणी घालणारी होती. घोघा ते हान्सोट असा सुमारे ६४ किमी लांबीचा बंधारा, खर्च ४५ ते ६० हजार कोटी! आकडेच धडकी भरवणारे. ८६ साली प्रथमच डॉ. अनिल काण्यांनी ही कल्पना मांडली आणि गेली दोन तपं, अथक परिश्रम करून तिचा पाठपुरावा केला. या काळात १० मुख्यमंत्री, अनेक अधिकारी आणि कमिट्या आल्या आणि गेल्या, पण डॉ. काण्यांनी निरुत्साही न होता, लाल फितीच्या जंजाळातून निर्णयाची गंगा प्रत्यक्षात आणण्यासाठी भगीरथ प्रयत्न केले. कल्पवृक्षाप्रमाणे रसाळ, गोमटी फळे देणारा हा ‘कल्पसर’ प्रकल्प अजूनही अनिश्चिततेच्या भोवऱ्यात अडकला आहे.

या माझ्या साऱ्या प्रयत्नात एक गोष्ट प्रकर्षानं जाणवली ती म्हणजे कित्येकदा आपण भौगोलिक दृष्ट्या झापडं लावून वावरतो. ‘कल्पसर’ या अफाट प्रकल्पाबद्दल, जो शेजारच्याच राज्यात गेली २५ वर्षं चर्चेत आहे, मला कल्पनादेखील नव्हती, म्हणून मी स्वतःशीच खजील झालो. पण लगेचच एक ठरवून टाकलं की डॉ. अनिल काणे यांची भेट घ्यायची!

डॉ. अनिल काणे यांचे पूर्वज मराठी असले तरी काण्यांचा जन्म भावनगरचा. मातृभाषा गुजराती. मेकॅनिकल इंजिनीयरिंग करून, Reverse Osmosis या तशा अनोळखी क्षेत्रात अमेरिकेतील कॅलिफोर्निया इथून Ph.D., त्यानंतर महाराज सयजीराव युनिव्हर्सिटीचे उपकुलगुरू, अनेक कंपन्यांचे यशस्वी डायरेक्टर – अशी एक थोर आसामी. डॉ. काणे सध्या Wind Energy या विषयातील जगप्रसिद्ध तज्ज्ञ मानले जातात आणि ते Suzlon या कंपनीचे डायरेक्टर असून, सध्या त्यांचं वास्तव्य बडोद्याला असतं.

अशा असामान्य व्यक्तीला भेटायला जाताना साहजिकच मनावर एक दडपण आलं होतं. माझी त्यांची पहिली गाठ पुण्यात Suzlonच्या ऑफिसात पडली. सहा फुटांपेक्षा जरा जास्तच उंच, तुरळक केसांसह जवळजवळ पूर्ण टक्कल, जाड फ्रेमचा चष्मा, भरघोस वर वळलेल्या काळ्या मिशा, वय सत्तरीच्या पुढे असूनही ताठ असलेला हा माणूस, तरुणालाही लाजवेल अशा उत्साहानं हस्तांदोलन करण्यासाठी पुढे आला. त्यांचा हुद्दा ‘रिटायर्ड जनरल काणे’ असावा, असं एकंदरीत दबदबा निर्माण करणारं व्यक्तिमत्त्व. पहिल्या जुजबी गप्पांतच त्यांनी माझं दडपण दूर केलं. मराठीत बोलताना थोडी गुजरातीची झाक जाणवत होती. ‘कल्पसर’ हा अर्थात त्यांचा लाडका विषय असल्यानं काही वेळातच ते भरभरून बोलू लागले. त्यांच्या डोळ्यांत आपल्या लाडक्या कल्पनेबद्दल बोलताना एक वेगळीच चमक होती.

गुजरातमधील पाणी समस्येसंदर्भात सरकारतर्फे विविध कल्पनांसाठी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून डॉ. अनिल काण्यांनी ‘कल्पसर’ ह्या प्रकल्पाची संकल्पना १९८६ साली प्रथम एका परिषदेत मांडली. ‘कल्पसर’ या शब्दाचा जन्म कल्पवृक्ष आणि अमृतसर या दोन शब्दांवरून झालेला असून अनेक कल्पना, इच्छांची फलप्राप्ती देणारं सरोवर म्हणजे ‘कल्पसर’.

खंबातच्या आखातात सात नद्या उदंड गोडं पाणी आणून सोडतात. या आखातातील भरती–ओहोटीच्या पातळ्यांतील भलाथोरला फरक आणि गाळामुळे निकामी होणारी बंदरं अशा विविध घटकांचा विचार करून ‘कल्पसर’ या संकल्पनेचा उदय झाला. घोघा ते हान्सोट असा सुमारे ६४ किमीचा पश्चिमेकडून पूर्वेकडे पसरलेला बंधारा, तसंच उत्तर–दक्षिण बंधाऱ्यानं या जलाशयाला छेद दिलेला असेल. यामुळे उत्तर–दक्षिण बंधाऱ्याच्या पूर्वेला गोड्या पाण्याचा जलाशय तर पश्चिमेस खाऱ्या पाण्याचा तलाव. गोड्या पाण्याच्या जलाशयाची पातळी स्थिर राहणार तर खाऱ्या पाण्याच्या तलावाची पातळी भरती–ओहोटीवर अवलंबून असेल.


सिंचनासाठी किंवा वीजनिर्मितीसाठी बांधण्यात येणाऱ्या धरणांमागे खूप मोठा खर्च होतो, गुंतवणूक होते, परंतु यामागे हे प्रकल्प व्यापारी तत्त्वावर स्वयंपूर्ण होतील असा विचार बहुतेक वेळा नसतो. लोकांचं हित एवढाच प्रमुख हेतू असतो.

'कल्पसर'चं वैशिष्ट्य म्हणजे ही संकल्पना व्यापारी तत्त्वावर स्वयंपूर्ण असून भविष्यात केवळ लोकांसाठीच नव्हे तर सरकारसाठी देखील फायदेशीर ठरेल. यासाठी प्रचंड गुंतवणुकीच्या आकड्यांनी न घाबरता या प्रकल्पाचे विविध फायदे विचारात घ्यावे लागतील.

'कल्पसर'मुळे १४०० कोटी घनमीटर गोडं पाणी साठेल. पूर्वेकडून येणाऱ्या नद्यांमुळे खारं पाणी दूर सारून दोन वर्षांत पूर्वेकडील जलाशय पूर्णपणे गोड्या पाण्यानं भरेल. यातील फक्त २/३ पाणी पूर्व जलाशयात असेल. या पाण्यावर सुमारे ७५ लाख हेक्टर जमिनीचं जलसिंचन करता येईल.

'कल्पसर' बंधाऱ्यावर रस्ते आणि रेल्वे असेल. दक्षिण गुजरात व दक्षिण सौराष्ट्र यांतील अंतर सुमारे २८० किमी इतकं कमी होईल. रेल्वे आणि रस्ता टोल ही उत्पन्नाची साधनं असतील.

'कल्पसर'च्या पूर्व जलाशयात भरती-ओहोटी असणार नाही. यामुळे मोठ्या गलबतांसाठीदेखील अनेक बंदरं पूर्व जलाशयात असतील. ही एक मोठी पोर्ट ॲथॉरिटी बनेल. बंधारा असेल तर जहाजे आत कशी येणार, अशी स्वाभाविक शंका उपस्थित होते. अर्थात याचाही विचार करण्यात आला आहे. या तंत्रास 'लॉक चेंबर' पद्धत म्हणतात. धरणाच्या बाहेर




याचबरोबर आखाताच्या परिसरातील, विशेषतः सौराष्ट्रातील मोठ्या शहरांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करता येईल.

पश्चिमेकडील तलाव खाऱ्या पाण्याचा असेल. या तलावाच्या बंधाऱ्यात Tidal Power वर चालणारी जनित्रं बसवली जातील. भरती-ओहोटीच्या प्रवाहावर ही जनित्रं चालतील आणि यातून ६५०० मेगा वॉट एवढी वीजनिर्मिती करता येईल. फ्रान्समधील ल रान्स येथे अशा धर्तीचा प्रकल्प गेली ४० वर्षं यशस्वीरीत्या चालू आहे. ब्रिटनमध्ये सेव्हर्न बराज येथे ८४०० मेगा वॉट प्रकल्प प्रस्तावित आहे. 'कल्पसर' प्रकल्पात वर्षभरात १२०० कोटी युनिटस् वीजनिर्मिती होईल. यामुळे एका वर्षात वीजनिर्मितीसाठी वापरण्यात येणाऱ्या तेलावरील २००० कोटींचा खर्च वाचेल. २००० कोटींच्या परकीय चलनात बचत होईल. याशिवाय अशा वीजनिर्मितीमुळे पर्यावरण कमी दूषित होईल.

दोन दरवाजे असलेला आणि जहाज मावेल असा कप्पा असतो. आखाताकडील दरवाजा उघडून जहाज आत घेतलं जातं. दरवाजा बंद होतो. आतील जलाशयाचा दरवाजा उघडून जहाज पूर्व जलाशयात शिरेल. दरवाजा बंद होईल आणि जहाज जलाशयातील बंदराकडे जाईल. बाहेर पडताना उलटी प्रक्रिया राबवली जाईल. खारं पाणी मिसळण्याची शक्यता नगण्य असेल. यामुळे पूर्व जलाशयात सुरक्षित, खोल पाणी असलेली उत्तमोत्तम बंदरं कार्यान्वित होतील.

याशिवाय खंबातच्या आखाताच्या पूर्व किनाऱ्यावरील सुमारे १.५ लाख हेक्टर खारी जमीन सुजलाम्, सुफलाम् करता येईल. वीज, पाणी आणि मुबलक सपाट जमिनीमुळे औद्योगिकीकरणाला अफाट चलना मिळेल. मत्स्योद्योग, जलक्रीडा पर्यटन, पर्यावरणरक्षण अशा विविध उपक्रमांना- देखील या प्रकल्पात मोठा वाव आहे. भारतीय संदर्भात आणखी

एक लक्षात घेण्यासारखा मुद्दा म्हणजे, ‘कल्पसर’ प्रकल्पाच्या सीमा पूर्णपणे गुजरात राज्यातच असल्यानं शेजारच्या राज्यांशी भांडणाचे मुद्देच उपस्थित होणार नाहीत. इतर प्रकल्पांच्या पूर्वानुभवानुसार हा खूप महत्त्वाचा फायदा असेल. तर असा आहे, हा आखूड शिंगी, बहुदुधी ‘कल्पसर’ प्रकल्प!

८६ साली ही कल्पना प्रथम मांडल्यावर डॉ. काणे यांनी या प्रकल्पाची आखणी, प्रचार यासाठी अनंत कष्ट घेतले. नोकरशाहीच्या सुस्त हत्तीला जागं करून प्रकल्पाच्या प्राथमिक कामांना सुरुवातही झाली. ९१ साली शंकरसिंह वाघेला यांनी या कल्पनेत रस घेतला. ९२ साली मुख्यमंत्री चिमणभाई पटेल यांनी उद्योगपतींची बैठक आमंत्रित केली. डॉ. काणे यांनी या बैठकीत ‘कल्पसर’ संकल्पना विशद करून मांडली. ९७ सालापासून कल्पसर संदर्भातील विविध समित्यांवर डॉ. काणे यांनी प्रयत्न चालू ठेवले. नेदरलँडमधील हासकोनिंग या कंपनीस प्राथमिक सर्व्हेचं काम गुजरात सरकारनं सोपवलं आणि त्यांचाही निर्वाळा या संकल्पनेस मिळाला आहे. मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी ‘कल्पसर’साठी भावनगर येथे बॅथिमेट्रिक सर्व्हेचं २००४ फेब्रुवारीमध्ये, मान्यवर उद्योगपतींच्या उपस्थितीत उद्घाटन केले. मोदींच्या मदतीनं डॉ. काणे काही मोजक्या मान्यवर उद्योगपतींना भेटले. टाटा समूहाचे रतन टाटा, रिलायसन्सचे मुकेश अंबानी, एस्सारचे रूईया, L & T चे नाईक आणि बिर्ला या सर्वांनी कल्पसर संकल्पनेचं उत्स्फूर्त स्वागत केलं आणि सक्रिय सहभागाची हमीही दिली.

गेल्या काही वर्षांत दुर्दैवानं डॉ. काणे यांना काहीसं बाजूला करण्यात आल्यासारखं दिसतं. नोकरशाहीच्या मस्तवाल हत्तीनं व्यापक ‘कल्पसर’ बाजूला ठेवून एक छोटेखानी डॅम प्रकल्प हातात घेण्याचा मठ्ठ प्रयत्न चालवला आहे. राजकीय इच्छाशक्तीची उदासीनता किंवा चुकीच्या मार्गानं जाण्याचा हेकटपणा राष्ट्रीय हिताच्या कसा आड येतो याचं हे मूर्तिमंत उदाहरण आहे. यामागची राजकीय समीकरणं आणि अर्थकारण कोड्यात टाकणारं आहे.

मी स्वत: इंजिनीयर असल्यानं, डॉ. अनिल काणे यांच्या ‘कल्पसर’ संकल्पनेमागील कल्पकतेच्या उत्तुंग भरारीचं अफाट कौतुक वाटतं! या भराऱ्या पोकळ नसून, एका जगड्व्याळ प्रकल्पाचा सर्वंकष विचार, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या भक्कम पायावर त्या अधिष्ठित आहेत. गेल्या शतकातील भाक्रानांगलनंतर, या शतकातील हा सर्वात मोठा कल्पक, बहुउद्देशीय आणि खऱ्याखुऱ्या जनकल्याणासाठी फायदेशीर असलेला प्रकल्प प्रत्यक्षात येणं अत्यावश्यक आहे. या संदर्भात प्रचार, जनजागृती आणि जनमताचा रेटा गरजेचा आहे. राजकारणी आणि नोकरशाहीला सुबुद्धी होवो एवढीच प्रामाणिक इच्छा! डॉ. अनिल श्रीधर काणे यांना मन:पूर्वक शुभेच्छा देऊन ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सफळ संपूर्ण!


**वसंत वसंत लिमये**
ईप्सित, सर्व्हे नं. ११०/१/ए,
बळवंतपुरम, पौड रोड,
कोथरूड, पुणे ४११०३८
दूरध्वनी : (०२०) २५३९४५४०/२५३९९४८६
vasantlimaye@gmail.com



वसंत
वसंत
लिमये
लिखित

ड्रॉक ग्रिफिन

गेल्या तीन पिढ्यांचा संदर्भ असलेली, आंतरराष्ट्रीय राजकीय-सामाजिक पटावर उलगडणारी उत्कंठावर्धक कादंबरी

मूल्य ५०० रु.
सवलतीत ३०० रु.



# ही परिस्थिती बदलायला हवी...

**डॉ. सुलभा कोरे**

बोलता बोलता महाश्वेतादेवी थांबतात. त्यांच्या चश्म्याआडच्या तीक्ष्ण नजरेत एक असीम वेदना तरळू लागते. एका सृजनशील व्यक्तिमत्त्वाची आपल्या पीडित, दलित देशबांधवांबद्दलची ती सहसंवेदना आपल्यालाही हलवून सोडते. त्यांचं हे वेगळं सृजन आपल्यालाही विचार करायला भाग पाडतं. या वयात एवढी धावपळ करणं, आपल्या पीडित, शोषित, गांजलेल्या, आदिवासी भावंडांसाठी काम करणं, त्यांचं दु:ख दूर करण्यासाठी सतत प्रयत्न करणं, त्यासाठी उरफोड करणारी धावपळ या वयात करणं, त्यांच्या भावनिक, शारीरिक जखमांना मलमपट्टी करणं, त्यावर आपल्या हळुवार श्वासांची फुंकर घालणं, या सर्वच गोष्टी महाश्वेतादेवींच्या सहसंवेदनशील मनाचंच नव्हे तर त्यांच्या जाज्वल्य देशप्रेमाचं अन् सामाजिक सृजनशीलतेचं प्रतीक आहे.

भारतीय साहित्यातील अतिशय महत्त्वाचा किंवा सर्वोच्च पुरस्कार म्हणून ज्ञानपीठ पुरस्काराकडे अतिशय मानानं व अभिमानानं पाहिलं जातं. अनेक भाषांनी व त्यातील साहित्यानं समृद्ध भारतीय साहित्य, प्रत्येक भाषेची एक वेगळी संस्कृती, ओळख, त्यातील परंपरा, त्या त्या प्रांताचा व भाषेचा सुगंध घेऊन दरवळत असतं. ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या साहित्यिकांना भेटणं म्हणजे दुग्धशर्करा योग! माझ्या सुदैवानं हा योग माझ्या वाट्याला अनेक वेळा आला अन् साहित्य-क्षेत्रातील महान व्यक्तिमत्त्वांना भेटून माझं जीवन एका वेगळ्या साहित्यिक अनुभूतीनं व्यापून गेलं.

महाश्वेतादेवी म्हणजे तर जिवंत साहित्यिक आख्यायिका. भारतीय साहित्यातील सर्वच सर्वोच्च, उत्कृष्ट, महान अशा साहित्यिक पुरस्कारांनी महाश्वेतादेवींचा सन्मान करून स्वत:ला कृतार्थ करून घेतलंय. 'आपली माती, आपली माणसं' यांच्याशी एका आगळ्या-वेगळ्या आपुलकीच्या अन् आपलेपणाच्या भावनेनं बांधलं गेलेलं हे व्यक्तिमत्त्व, साहित्य अकादमी, ज्ञानपीठ अन् मेगॅसेसे ॲवॉर्ड यांच्याबरोबर इतरही अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरवान्वित केलं गेलंय. पण या व्यक्तिमत्त्वानं सगळ्यात मोठा ठेवा भारतीय जनतेला दिलाय, तो म्हणजे गरिबांविषयी, दीनदुबळ्या व दलितांविषयी असलेला आपला कळवळा, कणव अन् त्यांच्यासाठी सतत कार्यरत असण्याची वृत्ती अन् प्रवृत्ती.

बंगाली साहित्यातच नव्हे तर हिंदी-इंग्रजी साहित्यातही आपली वेगळी ओळख व ठसा उमटवणाऱ्या महाश्वेतादेवींना त्यांच्या साहित्यातून, त्यांच्या साहित्यावर आधारित फिल्म्स अन् सीरियल्समधून भारतीय जनता अनेक वर्षं पाहत आलीय. पण त्यांना प्रत्यक्ष भेटणं, पाहणं, त्यांच्याशी बोलणं, त्यांच्याशी चर्चा करणं, त्यांचे विचार ऐकणं, हा एक आगळावेगळा अन् अविस्मरणीय अनुभव माझ्या वाट्याला आला. या अनुभवानं मला समृद्ध केलं, एक वेगळा आनंद दिला. आज महाश्वेतादेवी ८८ वर्षांच्या आहेत, मात्र आजही

त्यांचा उत्साह, समाजासाठी कार्य करण्याची त्यांची सक्रियता, एखाद्या तरुणालाही लाजवेल अशी आहे.

कोलकात्यात त्यांना भेटण्यासाठी वेळ निश्चित करण्यास मी फोन केला तेव्हा त्यांनी स्पष्ट सांगितलं की जर साहित्याबद्दल चर्चा करण्यासाठी तुला भेटायचं असेल तर माझ्याकडे अजिबात वेळ नाही. साहित्य लिहायलाही मला आता वेळ नाही. आतापर्यंत जे काही मी लिहिलंय ते १९ मोठाल्या खंडांमधून साहित्यप्रेमींसाठी देऊन टाकलंय. आता मी फक्त माझी ज्यांना गरज आहे, अशा लोकांसाठी काम करण्यात गर्क आहे. 'मला फक्त तुम्हाला भेटायचंय. तुम्हाला पाहायचंय' या माझ्या आग्रहावर त्यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी अकरा वाजता भेटायची वेळ दिली. कारण त्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्या दिल्लीला जाणार होत्या व त्यानंतर तिथूनच बडोद्याला.

दुसऱ्या दिवशी कोलकात्याच्या गल्लीबोळातून त्यांच्याकडे पोचायला तसा थोडा उशीरच झाला. पण त्यांना भेटले, त्यांना पाह्यलं अन् मी फक्त त्यांच्या पायांवर झुकले. त्यांचा तो गोरापान, सुरकुत्यांनी भरलेला पण वेगळीच आभा घेऊन चमकणारा चेहरा, चश्म्याआड असलेली पण समोरच्याचा आरपार वेध घेणारी तीक्ष्ण नजर अन् चहा घेण्यासाठी आग्रह करणारं आतिथ्य...सारंच काही झुकवणारं.

'जे का रंजले, गांजले, त्यांसी म्हणी जो आपुले...तोची साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा' या ओळींना खऱ्या अर्थानं सार्थक करणाऱ्या महाश्वेतादेवी वयाच्या या पायरीवरही आपला जनसेवेचा वसा घेऊन सतत धावत असतात.

''मी अशीच धावत असते, काम करत असते. लोकांचा माझ्यावर भरवसा आहे अन् त्या भरवशावरच मी धावत असते, काम करत असते. त्यामुळेच लोक मला आराम करायला देत नाहीत अन् मलाही आराम करायला आवडत नाही'' इति महाश्वेतीदेवी.

महाश्वेतादेवी बडोद्याला जाणार असतात. बडोद्यातील तेजगडला त्यांनी आदिवासी अकादमी स्थापन केलीय. भारतातील आदिवासींसाठी काम करणारी ही पहिलीच अकादमी आहे.

''लेखन बंद का केलंत, ही नाराजी कशासाठी?'' माझ्या या प्रश्नावर त्या म्हणाल्या,

''नाराजी अजिबात नाही, पण साहित्यलेखनासाठी आता मला वेळच नाही. मी अगोदरच पुरेसं अन् भरपूर लिहिलंय. पण याचा अर्थ मी काहीच लिहीत नाही, असाही



महाश्वेतादेवींसोबत डॉ. सुलभा कोरे

नाही. आताही मी काही इंग्रजी वर्तमानपत्रांसाठी लिखाण करते, पण त्या लेखनाचा उद्देश वेगळा आहे. सामाजिक उद्देश्यांसाठी मी हे लिखाण करते, समाजातील अनुभव शब्दबद्ध करते. पण या व्यतिरिक्त इतर काही लिहायला मात्र मला अजिबात वेळ नाही. अतिशय व्यस्त दिनचर्या असते माझी. अनेक सामाजिक कार्यांशी मी स्वत:ला जोडून घेतलंय. नंदिग्रामबद्दल सर्वांनाच माहीत आहे. नंदिग्रामची लढाई अजूनही सुरूच आहे. आम्ही तिथल्या पीडित लोकांना तांदूळ, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करतो, पण तेवढं पुरेसं नाही. अनेक गावं त्यावेळी जाळली गेली, स्त्रियांवर पाशवी अत्याचार केले गेले. नंदिग्रामचा प्रदेश संपूर्ण पर्वतीय, तिथं डॉक्टर्स, नर्स घेऊन जाणंही एक दिव्य असतं. काहीच पुरेसं नसतं, काहीच भरपूर नसतं, अडचणींशिवाय.

अनेक गावं आहेत. खजुरी, सोनाचुडा, किती नावं सांगावी? या सर्वच गावांना आम्ही मदत देण्याचा प्रयत्न करतो पण काहीच पुरेसं नसतं. महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, ओरिसा अशा अनेक राज्यांतून मी स्वत: फिरलेय. भारतातील जंगलांत, पहाडी प्रदेशांत असलेल्या आदिवासी, वेठबिगारांसाठी आम्ही काम करतोय. या लोकांना त्यांचे अधिकार मिळावेत, त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांविरुद्ध दाद

मागण्यासाठी मी अन् माझी माणसं लढतोय. माझा भारत मला याच लोकांमध्ये दिसतो. पण मला दु:ख याच गोष्टीचं आहे की स्वातंत्र्य मिळून एवढी वर्षं झाली तरी या लोकांच्या स्थितीत अजूनही काही फारसा फरक पडलेला नाही. आजही गावांगावांतून या लोकांवर अत्याचार केले जातात, त्यांच्यावर अन्याय केले जातात. बायकांची अवस्था तर फारच कठीण आहे. गावांतूनच नव्हे तर शहरांतूनही बायकांवर अत्याचार केले जातात. नंदिग्रामात बायकांच्या बाबतीत जे काही घडलं ते फक्त दानवी होतं. ही परिस्थिती कधी बदलेल सांगता येत नाही. आभाळच फाटलंय, ठिगळ तरी कुठे कुठे लावायचं? पण ही परिस्थिती बदलायला हवी, या परिस्थितीचा शेवट व्हायला हवा. माझी ही प्रामाणिक इच्छा आहे की मी जिवंत असेपर्यंत तरी या परिस्थितीचा शेवट व्हायला हवा.''

बोलता बोलता महाश्वेतादेवी थांबतात. त्यांच्या चश्म्याआडच्या तीक्ष्ण नजरेत एक असीम वेदना तरळू लागते. चश्म्याच्या त्या जाड काचेतूनही त्या नजरेतील ती वेदना आम्हाला वेढून घेते. एका सृजनशील व्यक्तिमत्त्वाची आपल्या पीडित, दलित देशबांधवांबद्दलची ती सहसंवेदना आपल्यालाही हलवून सोडते. त्यांचं हे वेगळं सृजन आपल्यालाही विचार करायला भाग पाडतं. या वयात एवढी धावपळ करणं, आपल्या पीडित, शोषित, गांजलेल्या, आदिवासी भावंडांसाठी काम करणं, त्यांचं दु:ख दूर करण्यासाठी सतत प्रयत्न करणं, त्यासाठी उरफोड करणारी धावपळ या वयात करणं, त्यांच्या भावनिक, शारीरिक जखमांना मलमपट्टी करणं, त्यावर आपल्या हळुवार श्वासांची फुंकर घालणं, या सर्वच गोष्टी महाश्वेतादेवींच्या सहसंवेदनशील मनाचंच नव्हे तर त्यांच्या जाज्वल्य देशप्रेमाचं अन् सामाजिक सृजनशीलतेचं प्रतीक आहे. दलित व आदिवासींसाठी एका वेगळ्या सृष्टीच्या या निर्माणकार्यानं त्यांना एक स्वप्नही दिलंय. नाही म्हटलं तरी कलाकार हा नेहमीच स्वप्नं पाहत असतो अन् ती स्वप्नं प्रत्यक्षात उतरवण्यासाठी जीवापाड मेहनतही करत असतो. महाश्वेतादेवींचं स्वप्न फारच मोठं आहे पण ते साकारणं अशक्य मात्र नाही. माणसावर माणसानं अत्याचार करण्याच्या परिस्थितीचं जगातून समूळ उच्चाटन करण्याचं त्यांचं स्वप्न आहे आणि ते प्रत्यक्षात उतरवण्यासाठी त्यांना आपणा सर्वांची मदत हवीय.

महाश्वेतादेवींचं हे स्वप्न जर आपणा सर्वांचं स्वप्न बनलं तर... महाश्वेतादेवींची ही दलित, दमितांच्या अत्याचारा-विरुद्धची मोहीम जर आपणा सर्वांची बनली तर... मी जर तरची गोष्ट सांगत नाही तर; असं जर घडलं तर महाश्वेतादेवींच्या तीक्ष्ण नजरेत सतत तरळणारी ती तीव्र व असीम वेदना थोडीशी तरी नक्कीच कमी होईल, असं मला वाटतं.

**डॉ. सुलभा कोरे**
ए ३१३-३१४, अर्जुननगर कॉम्प्लेक्स,
पाथर्ली रोड, डोंबिवली (पूर्व)४२१२०१
kore.sulabha@gmail.com

इंग्रजी थिसॉरसच्या धर्तीवर मराठीत प्रथमच
सुरेश वाघे लिखित 'संकल्पनाकोश'चे पाच खंड




संचाची मूळ किंमत ३२०० रु. सवलतीत २४०० रुपयांत

# राज्य मराठी विकास संस्था

**एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महानगरपालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१.**

**दूरध्वनी : (०२२) २२६३ १३ २५ / फॅक्स : २२६५ ३९ ६६**

**प्रशासनिक मराठी भाषेचा विकास** - गीता भागवत- रु.२७५ .
**कोश व सूची वाङ्मय : स्वरूप आणि साध्य** - सरोजिनी वैद्य - रु.२७५ .
**मराठी लेखन मार्गदर्शिका** - यास्मिन शेख - रु.८०.
**मराठी लघुलेखन शब्दकोश** - व. वा. इनामदार - रु.१४०.
**विज्ञान संकल्पना कोश** - रा. वि. सोवनी - रु.२५०.
**शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम** - वा. ब. पटवर्धन- रमेश पानसे - रु.१६०.
**मराठी भाषा : वाढ आणि बिघाड** - श्री. के. क्षीरसागर- रु.२२५ .
**वृद्धिः भाषेचे व भाषाभ्यासाचे विकसन** - दिनेश द. माहुलकर - रु.१६०.
**भाषा-आपली सर्वांचीच** - अविनाश बिनीवाले - रु.१५०.
**महाराष्ट्र साहित्य परिषद** - म. श्री. दीक्षित - रु.१२०.
**व्याकरणकार मोरो केशव दामले : व्यक्ती आणि कार्य** - कृष्ण श्री. अर्जुनवाडकर - रु.१००.
**काकासाहेब कालेलकर : व्यक्ती आणि कार्य** -मृणालिनी जोगळेकर - रु.१५०.
**गंगाधर बाळकृष्ण सरदार : व्यक्ती आणि कार्य**- हेमंत वि. इनामदार - रु.६०.
**बालगंधर्व : व्यक्ती आणि कार्य** - मोहिनी वर्दे - रु.६०.
**मातृसेवा संघ** - विनया खडपेकर - रु.६०.
**'सकाळ' वृत्तपत्र आणि वृत्तसमूह** -स्वाती सुहास कर्वे -रु.१२५ .
**शंतनुराव किर्लोस्कर : व्यक्ती आणि कार्य**- भा. र. साबडे- रु.१६०.
**डॉ. अ. का. प्रियोळकर : व्यक्ती आणि कार्य** - वि. बा. प्रभुदेसाई - रु.१५०.
**त्र्यंबक शंकर शेजवलकर यांच्या साहित्याची वर्णनात्मक सूची** - सुषमा पौडवाल - रु.१५०.
**त्रिवेंद्रमची मराठी हस्तलिखिते**- वसंत जोशी - रु.५०.
**मद्रासची मराठी हस्तलिखिते** - वसंत जोशी - रु.१५०.
**हैदराबादची मराठी हस्तलिखिते** - श्री. रं. कुलकर्णी, व इतर - रु.१००.
**कर्नाटकातील मराठी हस्तलिखिते** - भीमाशंकर देशपांडे - रु.१५०.
**तंजावर सूची (खंड सहावा)** - भीमराव केसकर - रु.२००.
**दक्षिण भा. मराठी वाङ्मयाचा इतिहास-तंजावर खंड**-वसंतजोशी - रु.५००.
**दक्षिण भारतातील वाङ्मयाचा इतिहास - आंध्र-कर्नाटक खंड** - वसंत जोशी व द. दि. पुंडे - रु.५००.
**दाक्षिणात्य साहित्य संस्कृतीचा मराठीशी अनुबंध**-माणिकधनपलवार-रु.३००.
**साहित्यसेतू** - श्री. रं. कुलकर्णी - रु.४५ .
**दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार**- श्री. रं. कुलकर्णी- रु.४५ .
**करुणाष्टक** - व्यंकटेश माडगूळकर - विनायक नारायण सप्रे - रु.७५ .
**राजमाची का बुधा** - गो. नी. दांडेकर - मीरा नांदगावकर- रु.७५ .
**बिंदिया जितनी झील** - निर्मला देशपांडे - सुनीता परांजपे - रु.१००.
**कल्याणी** - ज्योत्स्ना देवधर - ७५ रु.
**मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे** -माधव कोंडविलकर-अविनाश बिनीवाले-रु.१५०.
**दिन ब दिन** - शं. ना. नवरे - सुभाष रणदिवे - रु.१००.
**साँस भर का फासला** -अंबिका सरकार- शरयू पेडणेकर - रु.१००.
**श्रीमती रमाबाई रानडे** - मा. श्री. विद्वांस - वासंतिका पुणतांबेकर - रु.११०.
**मैं कृतार्थ हुई** - मेहरून्निसा दलवाई - विजया - रु.११०.
**रोहिणी** - केशव केळकर - विलास गिते - रु.१००.
**बौद्धिक संपत्ती अधिकार** - विशाल कटारिया- अनु.-अनिता जोशी - रु.२५ .
**यंत्रालयाचा ज्ञानकोश** - शंकर गोपाळ भिडे - रु.१६००.
**मराठी ग्रंथसूची भाग १ व २** -संपा.- शंकर गणेश दाते - रु.२६००.
**मराठी ग्रंथसूची भा. ३ (१९५१-६२)** - शरद साठे - रु.१०००.
**मराठी ग्रंथसूची भा. ४ (१९६३-७०)** - शरद साठे - रु.११००.
**मराठी ग्रंथसूची भा. ५ (१९७१-७८)** - शरद साठे - रु.१६००.
**मराठी विज्ञान ग्रंथसूची** - रा.वि.सोवनी, संजीवनी शिंत्रे - रु.१५०.
**मराठी वैद्यक ग्रंथसूची** - सुरेश नाडकर्णी, कविता महाजन - रु.१२५ .
**मराठी कोश व संदर्भ साधने यांची समग्र सूची** - वसंत कुलकर्णी - रु.२००.
**वस्त्रनिर्मिती माहिती कोश खंड १ - तंतुनिर्माण व तंतुविज्ञान** - रु.४००.
**वस्त्रनिर्मिती माहिती कोश खंड २ - सूतनिर्माण** - रु.४००.
**वस्त्रनिर्मिती माहिती कोश खंड ३ - कापडनिर्माण** - रु.५००.
**शिक्षणाचे अंतरंग** – लीला पाटील - रु.३५५ .
**फार्सी-मराठी व्युत्पत्तिकोश** - यू. म. पठाण - रु.६००.
**पालघर तालुका-बोली समाज व संस्कृती** - प्रतिभा कणेकर - रु.६५०.
**दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश** - गंगाधर पानतावणे - रु.३५०.
**दलित-ग्रामीण साहित्य : रूढी, प्रथा, परंपरा, विधिकोश** - गंगाधर पानतावणे, अशोक सोलनकर - रु.५६२.
**महाराष्ट्राचा भाषिक नकाशा** - रमेश धोंगडे, अशोक सोलनकर - रु.५३०.
**का ? आणि कसे ?** - अनु. संध्या पाटील-ठाकूर - रु. १५५ .
**कृष्णाकाठ - यशवंतराव चव्हाण आत्मचरित्रात्मक पुस्तकाची** audio C.D. रु.१००.
**श्रीदासबोध - श्री. समर्थ रामदास स्वामी**-audio C.D. ५ सीडीसंच- रु.२५०.

## ✱ आगामी प्रकाशने ✱

१) **दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश (द्वितीय खंड-च-न)**-गंगाधर पानतावणे
२) **वस्त्रनिर्मिती माहितीकोश - खंड ४ - रासायनिक प्रक्रिया** - वामन अचवल.
३) **स्वातंत्र्यापासूनचे भारताचे राजकारण** -अनु. अभर दातार, विवेक घोटाळे
४) **प्राचीन आणि मध्ययुगीन भारतीय धातुशास्त्राचा संक्षिप्त इतिहास** - प्रवीण प्र. देशपांडे
५) **भारतातील सामाजिक परिवर्तन आणि विकास** - संजयकुमार कांबळे
६) **भारतीय इतिहासातील काही अभ्यास-विषय**-जास्वंदी वांबूरकर उटगीकर
७) **मराठी ग्रंथसूची भाग ६ (१९७९-८५)** - शरद साठे
८) **शालेय मराठी शब्दकोश**-वसंत डहाके, गिरीश पतके (सुधारित आवृत्ती)

## ✱ सर्व पुस्तकांवर २०% सवलत ✱

**संस्थेचे संकेतस्थळ** : http://rmvs.maharashtra.gov.in **ईमेल** : rmvs_mumbai@yahoo.com

A MyVishwa Venture
BookGanga
Creation | Publication | Distribution

|| दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा ||



९५,००० हून अधिक पुस्तके, ई-पुस्तके आणि ई-मासिके उपलब्ध

सर्व प्रकाशकांची, सर्व पुस्तके १०%* सवलतीत
भारतात मोफत घरपोच उपलब्ध

10% OFF* | Free* Shipping | 24x7 Customer Care | Cash On Delivery* Available

फोन ऑर्डर साठी संपर्क

8600741110
8600751110
8600761110

*अटी लागू

Visit us at www.BookGanga.com


57 वर्षे
प्रकाशमय
जीवनाची
LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
विमा ही आग्रहाची विषयवस्तू आहे.
www.licindia.in

**ग्रंथाली**

द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.),
मुंबई-४०००१६ दूरध्वनी : २४३०६६२४ / २४२१६०५० ● granthali01@gmail.com ● वेळ : सकाळी ११ ते सायं.६.३०

## डॉ. नरेंद्र जाधव यांचे प्रसिद्ध विचारसंचित

**मराठी ग्रंथविश्वातील अपूर्व घटना!**
**आमचा बाप आन् आम्ही नाबाद १,६०,००० प्रती**


मूळ किंमत १२० रुपये
सवलतीत ८० रुपये
टपालखर्च ३० रुपये






जनआवृत्ती मूळ किंमत ४०० रुपये
सवलतीत ३०० रुपये
टपालखर्च ६० रुपये

**डॉ. नरेंद्र जाधव यांचे अनुवादित व संपादित साहित्य**
**'बोल महामानवाचे' (तीन खंड) आणि 'प्रज्ञा महामानवाची' (चार खंड)**










**प्रज्ञा महामानवाची**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र लेखन कार्य-भाग १**
**राजकीय लेखन** मूळ किंमत ३५० रु. **सवलतीत २०० रु.**

**प्रज्ञा महामानवाची**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र लेखन कार्य-भाग २**
**अर्थशास्त्रीय व समाजशास्त्रीय लेखन** मूळ किंमत २०० रु. **सवलतीत १२० रु.**

**प्रज्ञा महामानवाची**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र लेखन कार्य-भाग ३**
**मानववंशशास्त्रीय लेखन** मूळ किंमत २२५ रु. **सवलतीत १५० रु.**

**प्रज्ञा महामानवाची**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र लेखन कार्य-भाग ४**
**बुद्ध आणि त्यांचा धम्म** मूळ किंमत ७५ रु. **सवलतीत ४० रु.**
(मूळ लेखक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर)


**सारांश, संपादन आणि अनुवाद डॉ. नरेंद्र जाधव**








**'बोल महामानवाचे' - जनआवृत्ती संच**
**मूळ किंमत १२०० रु. सवलतीत ८०० रुपयांत**


शामराव विठ्ठल बँक
व्यक्तिगत सेवेसाठी
दि शामराव विठ्ठल को-ऑप. बँक लि.
( मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक )
लक्ष दिव्यांचे तोरण ल्याली, उटण्याचा स्पर्श सुगंधी,
फराळाची लज्जत न्यारी, रंगावलीचा शालू भरजरी,
आली आली दिवाळी आली.
शुभ दिपावली
पत्ता : एस व्ही सी टॉवर , नेहरु रोड,
सांताक्रुज (पूर्व ) मुंबई - ५५
: ०२२ ६६९९९९९९ / ७१९९ १२१३
www.svcbank.com

# शोषिलेले शैशव

**उमेश कदम**

''जोनास बंडखोरांबरोबर जंगलात गायब झाला. त्याच्या कानावर पडणारा आक्रोश हळुहळू कमी होत गेला व नंतर ऐकू यायचा बंद झाला. त्याचे मन बधीर झाले होते. एक रात्र जंगलात घालवल्यानंतर दुसऱ्या दिवशी दुपारी ते सारे एका तळावर पोचले. तेथे जोनासला त्याच्यासारखी इतर मुलेही दिसली. आता तो त्यांच्याबरोबर राहणार होता. इतर मुले १० ते १५ वयोगटातील होती. त्यांचे प्रशिक्षण सुरू झाले. त्यांना शस्त्रास्त्रे कशी चालवायची, हल्ले कसे करायचे, स्फोटके व दारुगोळा कसा हाताळायचा, शत्रूला कसे चकवायचे, जंगलात अन्न संपल्यावर काय खाऊन निभावून न्यायचे, या व अशा अनेक गोष्टींचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यानंतर त्यांच्यावर लहानसहान कामगिऱ्या सोपवण्यात येऊ लागल्या. त्यात ते तरबेज झाल्यावर काही जोखिमीच्या कामगिऱ्यांवर त्यांना पाठवण्यात येऊ लागले. जोनासला त्यांच्यात सामील होऊन आता सहा महिने उलटले होते. त्याला आता घरची आठवण देखील येत नव्हती.

''आफ्रिकेच्या वेगवेगळ्या भागांतील सिएरा लिओन, लायबेरिया, अंगोला, मोझांबिक, काँगो, रुआंडा या व इतर अनेक देशांत गेल्या जवळजवळ वीस ते तीस वर्षात झालेल्या युद्धांमध्ये लाखो बालकांना सशस्त्र गटांच्या नेत्यांनी बळजबरीने भाग घ्यायला लावून त्यांचे शैशव हिरावून घेतले ही एक क्रूर व निंदनीय गोष्ट आहे. त्यांना बऱ्याच वेळा धोकादायक चकमकींमध्ये भाग घ्यायला लागायचे. अन्य वेळी शस्त्रास्त्रांची वाहतूक करण्यासाठी, सैनिकांना जेवण करून खाऊ घालण्यासाठी व लैंगिक शोषणासाठी बालक-बालिकांवर सक्ती केली जायची. काहीही कळत नसताना हिंसाचारातील सहभाग; आई-वडील, भाऊ-बहिणी व सवंगड्यांपासून झालेली ताटातूट; सतत मृत्यूच्या सावटाखालील वावर; वारंवार होणारी उपासमार; न पेलणारी श्रमिक कामे व नेहमीचे स्थलांतर यामुळे त्यांच्या कोवळ्या शरीरावर नि मनावर झालेले तीव्र आघात त्यांचे उर्वरित आयुष्य उद्ध्वस्त करतात. युद्धसमाप्तीनंतर देखील त्यांचे पुनर्वसन करणे अशक्यप्राय होते. या भयावह समस्येकडे आमच्या संस्थेने लक्ष घातले व अशा बालक-बालिकांच्या पुनर्वसनासाठी, त्यांना त्यांच्या आघातांतून सावरण्यासाठी व त्यांचे उर्वरित आयुष्य सुसह्य करण्यासाठी आम्ही काही ठोस पाउले उचलली. त्याचाच एक भाग म्हणून आमच्या संस्थेने मनोआघाततज्ज्ञांची पथके आफ्रिकेच्या वेगवेगळ्या भागांत पाठवली, युद्धग्रस्त मुला-मुलींना शिक्षण देण्यासाठी खास केंद्रे उघडली व आता मोठे झालेल्या पूर्वाश्रमीच्या बालयोद्ध्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची सोय केली. आमच्या या उपक्रमास आम्ही 'आशेचा किरण' हे नाव दिले आहे...''

मोझांबिकची राजधानी मापुतो येथे आंतरराष्ट्रीय रेड

क्रॉसमार्फत 'युद्ध आणि बालके:' समस्या नि उपाय' या विषयावर आयोजित केलेल्या एका परिसंवादात 'सेव्ह द चिल्ड्रेन' – बालकांना वाचवा – या आंतरराष्ट्रीय सेवाभावी संस्थेचे डॉ. एफ्रेम कासाम्बी बोलत होते.

बालकांच्या सैन्यभरतीविरोधी आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तरतुदींवरील माझे सत्र नुकतेच संपले होते. परिसंवाद दोन दिवस चालणार होता. त्यासाठी साऱ्या आफ्रिकेतून मानवतावादी सेवाभावी संस्थांचे पस्तीस प्रतिनिधी मापुतो येथे आले होते. डॉ. एफ्रेम मूळचे मोझांबिकचेच. ते मानसोपचारतज्ज्ञ होते. त्यांची व माझी ओळख सहा-सात महिन्यांपूर्वी झाम्बियाची राजधानी लुसाका येथे एका कार्यक्रमादरम्यान झाली होती. आम्ही दोघे एकमेकांशी इ-मेलवर सतत संपर्क साधून होतो. मी स्वतः मानवतावादी संघटनेमध्ये काम करत असल्याने त्या क्षेत्रात काम करणाऱ्यांशी मला खूप आपुलकी वाटते व त्यांच्याशी लगेच जवळीक निर्माण होते. एव्हाना आमचा परिचय दृढ झाला होता. परिसंवादाच्या पहिल्या दिवशी संध्याकाळी त्यांना मी उतरलेल्या काटेम्बे गॅलरी हॉटेलवर भोजनासाठी आमंत्रण दिले होते. हॉटेलच्या आवारातील पोहण्याच्या तलावाशेजारील उपाहारगृहात आमचे जेवण व गप्पा चालल्या होत्या. त्यांनी मला मोझांबिकमधील बाल-योद्धध्यांच्या समस्येबद्दल बरीच माहिती दिली. मला मोझांबिकच्या अलीकडील इतिहासातील ठळक घडामोडींची थोडीफार माहिती होती...

पोर्तुगालने १७५२ साली मोझांबिकमध्ये आपली वसाहत वसवली. पुढे विसाव्या शतकाच्या मध्यावधीस आफ्रिकेमध्ये स्वातंत्र्याचे वारे वाहू लागल्यावर दहा वर्षांच्या स्वातंत्र्यलढ्यानंतर १९७५ साली मोझांबिक स्वतंत्र झाला. तो लढा पुकारला होता 'फ्रेलिमो' या मुक्तीचळवळीने. तिच्या नेत्यांचा कल होता साम्यवादाकडे. त्यामुळे त्यांना सोविएत युनियनचा भरभक्कम पाठिंबा होता. 'फ्रेलिमो'चे नेते सत्तेवर आल्यानंतर त्यांना विरोध करणाऱ्या लोकशाहीवादी नेत्यांनी 'रेनामो' ही आघाडी उघडली. आफ्रिकेमध्ये साम्यवादाचा प्रसार नि सोविएत युनियनचा प्रभाव रोखण्यासाठी अमेरिकेने 'रेनामो'स पाठिंबा द्यायला सुरू केले. रेनामो व फ्रेलिमो समर्थकांमध्ये संघर्ष वाढू लागला व हिंसाचाराची ठिणगी पडली. त्याने यथावकाश यादवी युद्धाचे स्वरूप धारण केले. त्यावेळी अमेरिका व सोविएत युनियन यांच्यातील शीतयुद्धाने कळस गाठला होता. त्या दोन्ही महासत्तांनी आपल्या स्वार्थी हेतूने दोन्ही विरोधकांना उत्तेजन दिले व आर्थिक मदत नि शस्त्रास्त्रे पाठवायला सुरू केले. साऱ्या देशात युद्धाचा वणवा पेटला. दोन्ही बाजूंनी युद्धात वर्चस्व मिळवण्याच्या अट्टहासापायी हजारो बालकांना सक्तीने आपापल्या सैन्यात भरती केले. जवळजवळ पंधरा वर्षांच्या यादवी युद्धानंतर १९९०च्या दशकाच्या सुरुवातीस चकमकी थंडावल्या. त्यासुमारास दोन्ही बाजूंना मिळणाऱ्या परकीय मदतीचा ओघ थंडावला. कारणच त्या सुमारास सोविएत युनियनची शकले झाली व शीतयुद्ध समाप्त झाले. दोन्ही महासत्तांना आता मोझांबिकमध्ये रस उरला नव्हता. त्यामुळे १९९२ मध्ये दोन्ही पक्षांनी शांतताकरारावर सह्या केल्या व १९९४ मध्ये सार्वत्रिक निवडणुका घ्यायचा निर्णय घेतला. पण तोपर्यंत दहा लाख लोक यादवीमध्ये मृत्युमुखी पडले होते व त्यापैकी ४५ % केवळ १५ वर्षांखालील बालके होती! युनिसेफ' या संयुक्त राष्ट्रसंघाच्या मुलांचा विकास नि कल्याण यासाठी झटणाऱ्या संस्थेच्या मते मोझांबिकमधील अडीच लाख मुले-मुली युद्धाच्या शारीरिक व मानसिक आघातांमुळे सर्वसामान्य जीवन जगण्यास असमर्थ झाली होती.

कदमसाहेब, आमच्या संस्थेला असे दिसून आले की या अडीच लाख मुला-मुलींचे पुनर्वसन करण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. जी मुले-मुली शांतता प्रस्थापित झाल्यानंतर आपापल्या गावी परतली, त्यातील कित्येकांना समाजाने स्वीकारायला टाळाटाळ केली. कारण त्यांच्यावर हिंसेचा कलंक लागला होता. बऱ्याच जणांची कुटुंबे युद्धात उद्ध्वस्त झाली होती. काहींचे आई-वडील, भावंडे नि इतर नातेवाईक युद्धात बळी पडले होते. अशांना मानसिक आधार द्यायला कोणी मागे राहिले नव्हते. ज्या निष्पाप मुलींवर लैंगिक अत्याचार करण्यात आले होते, त्यांना त्यांची काही चूक नसताना वाळीत टाकले गेले. शांतता प्रथापित झाल्यानंतर देखील त्यांची परवड चालूच राहिली. म्हणून आमच्या संस्थेने 'आशेचा किरण' हा उपक्रम हाती घेतला.''

''फारच कौतुकास्पद आहे तुमचे कार्य, डॉक्टर. आता युद्ध संपून जवळजवळ वीस वर्षे झाली. पूर्वाश्रमीच्या बाल-योद्ध्यांची व युद्धाचा विपरीत परिणाम झालेल्या इतरांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया आता पूर्ण झाली असेल, नाही का?''

''बऱ्याच जणांचे पुनर्वसन झाले म्हणायला हरकत नाही. पण काहींचे आघात पुनर्वसनाच्या पलिकडले होते. विशेषतः कोवळ्या वयाच्या मुलींच्या मनावर लैंगिक अत्याचाराने झालेले आघात खूप तीव्र होते. शिवाय सर्वांच्या



बाबतीत काही अनपेक्षित समस्या उद्‌भवल्या.''

''असं? त्या कोणत्या बरे?'' मी अधीरतेने विचारले.

''सांगतो. शांतता प्रस्थापित झाल्यानंतर 'युनिसेफ'ने या समस्येची सखोल पाहणी केली व आपला अहवाल प्रकाशित केला. त्या समस्येस जागतिकस्तरावर प्रसिद्धी मिळाली. त्यामुळे बऱ्याच पाश्चात्य राष्ट्रांनी व आंतरराष्ट्रीय सेवाभावी संस्थांनी मदतीचा हात देऊ केला. त्यांनी मानसोपचारतज्ज्ञांची पथके मोझांबिकला पाठवली. अशा तज्ज्ञांनी त्यांच्या पाश्चात्य उपचारपद्धतीच्या निकषांनुसार मानसोपचाराच्या कार्यास सुरुवात केली. पण त्यातून काहीच फलनिष्पत्ती झाली नाही. कारण त्या तज्ज्ञांना आफ्रिकन समाजातील चाली-रीती, रुढी-परंपरा तसेच संस्कृती यांचा गंध नव्हता. आफ्रिकन मुला-मुलींवर लहानपणापासून झालेले संस्कार अशा पारंपरिक मूल्यांवर आधारित असतात. लहान वयातच त्यांच्या मनाची जडण-घडण संपूर्णतः आफ्रिकन साच्यात झालेली असते. त्यांच्या वैचारिक, कौटुंबिक, सामाजिक व भावनिक विश्वाचे त्या संस्कृतीशी अतूट नाते निर्माण झालेले असते. मानसोपचार करताना एखाद्याच्या मनाची जडण-घडण कशी झालेली आहे, हे ठाऊक नसेल तर उपचार प्रभावकारक होत नाहीत.

''पण यावर तोडगा कसा काढला गेला?''

''कदमसाहेब, तुम्हाला ठाऊक आहे, की मी मूळचा मोझांबिकचाच आहे. पण माझे उच्च शिक्षण युरोपमध्ये झाले. माझ्यासारखे बरेच मानसोपचारतज्ज्ञ, येथील गंभीर समस्या व परिस्थिती यांची जाणीव झाल्यावर मोझांबिकला परतले. आम्हा सर्वांचा एकच ध्यास होता - युद्धग्रस्त मुला-मुलींचे पुनर्वसन करणे! आम्हाला येथील रुढी, परंपरा नि संस्कृतीचे सखोल ज्ञान होतेच. त्यास आम्ही आमच्या उच्च शिक्षणाने मिळवलेल्या ज्ञानाची जोड दिली व समस्या सोडवायला सुरवात केली.''

''तुम्ही खरंच सुयोग्य पद्धत वापरली असणार. आधुनिक ज्ञान व स्थानिक संस्कृती यांचा संयोग साधल्याचे एखादे उदाहरण तुम्ही मला देऊ शकाल? मला ते जाणून घ्यायची उत्सुकता आहे.''

''हो, नक्कीच. मी असे करतो, तुम्हाला मी पुनर्वसन केलेल्या जोनासची कहाणी सांगतो. ती ऐकल्यावर तुम्हाला येथील समस्यांचे वैशिष्ट्य नि त्या आम्ही कशा हाताळल्या हे समजायला सोपे होईल'', असे म्हणून डॉक्टरांनी मला जोनासची कहाणी ऐकवायला सुरुवात केली...

''मोझांबिकच्या पश्चिमेकडील एका दुर्गम भागातील झेम्बा या खेड्याजवळ, गावाबाहेर रॉबेरोची वस्ती होती. चार एकर शेती, दोन गाई, चार शेळ्या व आठ-दहा कोंबड्या

यांच्या आधारे त्या सहाजणांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कसाबसा चालला होता. थोरला अकरा वर्षांचा जोनास, त्याच्या पाठीवरची कॅरोल, नंतरचा सीझर व शेवटची एमी अशी चार अपत्ये नि पत्नी फिन्नी हे रॉबेरो यांचे कुटुंब. मोझांबिकमधील बहुतांशी जनतेप्रमाणे ते देखील कॅथलिक ख्रिश्चन होते. पोर्तुगालहून आलेल्या धर्मगुरूंनी त्यांच्या आधीच्या पिढ्यांना त्या धर्माची दीक्षा दिलेली होती. सर्वसाधारणपणे १९८० पासून फ्रेलिमो व रेनामो यांच्यातील संघर्षाने व हिंसाचाराने उग्र रूप धारण केले होते. युद्धाची झळ साऱ्या देशवासियांना बसली होती. जीवनावश्यक वस्तूंची चणचण, सततची असुरक्षितता, विस्कळीत कायदा व सुव्यवस्था; तसेच आरोग्यसेवेचा अभाव यामुळे सर्वसामान्य माणूस पिचून गेला होता. यादवीस खतपाणी घालणाऱ्या महासत्तांना जनतेच्या हालअपेष्टा दिसत नव्हत्या. त्यांना फक्त त्यांचा राजकीय स्वार्थ साधायचा होता. ऑगस्ट १९८५ मध्ये थोडाफार पाऊस झालेला. रॉबेरो यांच्या वस्तीला लागून जंगल सुरू होत होते. एके संध्याकाळी जोनास व सीझर वस्तीच्या अंगणात जंगली बियांचा कसलातरी खेळ खेळत होते. मुली आईभोवती घोटाळत होत्या. रॉबेरो नुकतेच दिवसभर मक्याच्या शेतातील तण काढून, दमूनभागून वस्तीवर परतले होते. ते झोपडीच्या पडवीत भिंतीला पाठ टेकून बसले होते. फिन्नी संध्याकाळच्या जेवणाच्या तयारीला लागली होती. जेवण म्हणजे मक्याच्या शिजवलेल्या पिठाचा 'उगाली' हा लगदा व त्यासोबत शेतातील एखाद्या पाल्याची भाजी! इतक्यात सात-आठ बंदुकधारी रेनामो बंडखोरांचा एक गट तेथे जंगलातून अचानक अवतरला. साऱ्यांनी मळकट हिरवे कपडे घातलेले. साऱ्यांच्या कंबरेला काडतुसांचा पट्टा बांधलेला होता. त्यांना पाहताच घाबरलेल्या मुली आईला बिलगल्या तर मुले रॉबेरोंजवळ गेली. रॉबेरो व फिन्नी यांचीदेखील भीतीने गाळण उडाली होती. त्या बंडखोरांचा म्होरक्या आपली बंदूक रॉबेरोकडे रोखत पुढे सरसावला व त्यांना दरडावून म्हणाला, 'आम्ही काय सांगतो ते लक्ष देऊन निमूटपणे ऐक. जरा जरी चलाखी दाखवलीस तर एका क्षणात तुझ्या मेंदूच्या ठिकऱ्या उडवल्या जातील व तुझे सारे कुटुंबही खलास केले जाईल. हे बघ, आम्हाला सैनिकांची कमतरता भासत आहे. फ्रेलिमो या दुष्ट शत्रूचा बीमोड करून त्यांना नामशेष करायचा निर्धार आम्ही केला आहे. त्यातच आपल्या देशवासीयांचे दूरगामी हित आहे. आम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहोत. तुमच्यासारख्यांनी आमचे हात बळकट करायला हवेत. आमच्या या उदात्त कार्याला साऱ्या देशवासीयांनी हातभार लावला पाहिजे, असे म्हणून तो भेदरलेल्या जोनासकडे पाहत पुढे म्हणाला, 'या तुझ्या मोठ्या मुलाला तू आमच्या हवाली कर. आम्ही त्याला चांगला योद्धा बनवू. काय रे, काय नाव तुझं?'

'जोनास...'

'पोर फार लहान आहे. अजून खेळाबागडायचं वय आहे त्याचं...त्याला लढाई म्हणजे काय समजणार? तुम्हाला त्याचा काही उपयोग होणार नाही...कृपा करून त्याला या भरीस पाडू नका. निष्पाप जीव आहे लेकराचा...' फिन्नी धाडसाने पुढे होऊन म्हणाली.

'ए, तू चूप बस. आम्हाला शहाणपणा शिकवतेस?'

'अजून एक-दोन वर्षे जाऊ द्या, मग पाहू. जरा अंगाने भरू दे पोराला...' रॉबेरो वेळ काढायच्या हेतूने म्हणाले.

'आम्हाला ठाऊक आहे कोणत्या वयात प्रशिक्षण दिल्यावर चांगला योद्धा बनतो. तू आम्हाला त्याबाबतीत सल्ला देऊ नकोस. आमचा या क्षेत्रातला अनुभव खूप दांडगा आहे. मार्को, जोनासला आपल्या ताब्यात घे आणि ती संगीन बांधलेली काठी त्याच्याकडे दे आणि शिकव त्याला धडाडी काय असते याचा पहिला धडा!'

त्या म्होरक्याचा एक सहकारी, मार्को, पुढे सरसावला. त्याने जोनासला सर्वांपासून बाजूला घेतले. त्याच्या हातात एक धारदार संगीन बांधलेली काठी होती. ती जोनासकडे देता देता त्याने जोनासच्या कानात काहीतरी सांगितले. ते ऐकल्यावर जोनास घाबरून म्हणाला,

'नाही...नाही...मी हे करणार नाही...'

हे ऐकल्यावर तो म्होरक्या पुढे सरसावला व जोनासला म्हणाला,

'जोनास, तुला शेवटची संधी देतो. मार्कोने सांगितल्याप्रमाणे जर तू केले नाहीस, तर आम्हाला तुम्ही सारे फ्रेनामोचे समर्थक आहात असे समजून सर्वांना खलास करावे लागेल!'

रॉबेरोंना रेनामोंची कार्यप्रणाली ठाऊक होती. मार्कोने जोनासला काय करायला सांगितले असावे याचा त्यांना अंदाज आला व ते जोनासला म्हणाले,


'पोरा, मला माहीत आहे की ते खूप कठीण काम आहे, पण तुला ते करावेच लागेल. आता यातून आपली सुटका नाही. मन घट्ट कर आणि टाक करून एकदाचे!'

''जोनासला आपल्या वस्तीचा परिसर आपल्याभोवती

गोल फिरत असल्याचा भास झाला. काही क्षण त्याने आपले डोळे घट्ट मिटले. ते उघडल्यावर पटकन त्याने संगीनीची काठी उचलली व रोबेरोंच्या छातीत खुपसली. त्यांच्याकडे न पाहताच त्याने ती काठी तेथेच टाकली व तो बंडखोरांच्या गटाकडे पळाला. इकडे रॉबेरो तडफडत होते तर फिन्नी व इतर मुलांनी हंबरडा फोडला होता. जेव्हा बंडखोर कोवळ्या वयातील मुलांना आपल्यात सक्तीने भरती करत तेव्हा अशा मुलांचा व त्यांच्या कुटुंबीयांचा संबंध कायमचा तोडण्यासाठी ते असे एखादे अघोरी कृत्य त्यांच्या हातून करण्यास भाग पाडायचे! असे नाही केले तर लहान मुले घरच्या आठवणी काढत बसत किंवा तिकडे पळून जायचा प्रयत्न करत. आता घराचे दार कायमचे बंद झाल्यामुळे तिकडे पळून जायचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता.

''जोनास बंडखोरांबरोबर जंगलात गायब झाला. त्याच्या कानावर पडणारा आक्रोश हळुहळू कमी होत गेला व नंतर ऐकू यायचा बंद झाला. त्याचे मन बधीर झाले होते. एक रात्र जंगलात घालवल्यानंतर दुसऱ्या दिवशी दुपारी ते सारे एका तळावर पोचले. तेथे जोनासला त्याच्यासारखी इतर मुलेही दिसली. आता तो त्यांच्याबरोबर राहणार होता. इतर मुले १० ते १५ वयोगटातील होती. त्यांचे प्रशिक्षण सुरू झाले. त्यांना शस्त्रास्त्रे कशी चालवायची, हल्ले कसे करायचे, स्फोटके व दारुगोळा कसा हाताळायचा, शत्रूला कसे चकवायचे, जंगलात अन्न संपल्यावर काय खाऊन निभावून न्यायचे, या व अशा अनेक गोष्टींचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यानंतर त्यांच्यावर लहानसहान कामगिऱ्या सोपवण्यात येऊ लागल्या. त्यात ते तरबेज झाल्यावर काही जोखिमीच्या कामगिऱ्यांवर त्यांना पाठवण्यात येऊ लागले. जोनासला त्यांच्यात सामील होऊन आता सहा महिने उलटले होते. त्याला आता घरची आठवण देखील येत नव्हती.

''यथावकाश जोनास एक कुशल योद्धा बनला. त्याच्यावर लहान-मोठ्या जबाबदाऱ्या सोपवण्यात येत होत्या. त्याला रेनामोंच्या राजकीय महत्त्वाकांक्षांशी काही मतलब नव्हता. त्याचे नेहमी एकच ध्येय असायचे - आपल्यावर सोपवलेली कामगिरी फत्ते पाडायची! ती का व कशासाठी पार पाडायची आहे, हे त्याच्या दृष्टीने महत्त्वाचे नव्हते. वर्षांमागून वर्षे जात होती. जोनासला रेनामोंमध्ये सामील होऊन सात वर्षे झाली. ते साल होते १९९२. आता रेनामो व फ्रेलिमो यांच्यातील चकमकी थंडावल्या होत्या. त्याच वर्षी त्या दोन्ही बाजूंनी शांतताकरारावर सह्या झाल्या. यथावकाश देशात शांतता प्रस्थापित झाली. बंडखोरांचे गट विखुरले गेले. पूर्वाश्रमीच्या अनुभवी योद्धांना नव्या सरकारच्या सैन्यात दाखल व्हायचे आवाहन करण्यात आले. काहींनी त्याचा स्वीकार


**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**
**टपाल खर्च ३० रु.**

## सारांश शून्य – संजय कळमकर

आपल्या भोवतीचं एकही क्षेत्र असं नाही की ज्यात आज भ्रष्टाचार अनुभवास येत नाही. या स्थितीचा सर्वात वाईट परिणाम म्हणजे, तिनं माणसातलं माणूसपण, संवेदनशीलता, उपक्रमशीलता हे आणि असे सगळेच गुण गिळून टाकले आहेत आणि माणसाला अंतर्बाह्य हिडीस, ओंगळवाणं करून टाकलं आहे.

अशा परिस्थितीत, या सडलेल्या व्यवस्थेच्या विरोधात आजची तरुण पिढी निकरानं, अभिमन्यूच्या त्वेषानं लढू पाहते आहे.

या व्यवस्थेतच असणारे आणि सजगपणे परिस्थितीला सामोरं जाणारे तरुण लेखक संजय कळमकर हे त्यापैकी एक. त्यांनी शिक्षणक्षेत्रातली भ्रष्ट व्यवस्था थेटपणे, पण डोळसपणे; चिंतनशील वृत्तीनं अनुभवली आहे; याचं भान देणारी, नारायण जगदाळे या शिक्षकाची, व्यवस्थेत राहूनच तिच्या विरोधात लढण्याचा निश्चय करणाऱ्या तरुणाची ही कथा... चित्रदर्शी आणि प्रत्ययकारी...

केला, तर काही हिंसाचाराला कंटाळलेल्या योद्ध्यांनी ते आवाहन नाकारले. त्यांना आता आपापल्या गावी जाऊन काही नोकरी-व्यवसाय करता येईल का, किंवा आपली शेती करता येईल का, हे पाहायचे होते.

''जोनासने आपल्या खेड्याकडे जायचा निर्णय घेतला. त्याला आपले राहिलेले कुटुंब परत स्वीकारेल की नाही, याची शास्वती नव्हती. तरीही त्याला तेथे जावेसे वाटत होते. जेव्हा शांतताकरारावर सह्या झाल्या, तेव्हा तो मोझांबिकच्या उत्तरेला होता. तेथून मजल-दरमजल करत चार दिवसांनी तो झेम्बाला पोचला. तो जेव्हा वस्तीवर पोचला तेव्हा संध्याकाळ होत आली होती. फिन्नी पडवीत मका निवडित बसली होती. एमिली तिच्याजवळ काहीतरी खेळत होती, तर पंधरा-सोळा वर्षांची कॅरोल भाजी चिरत होती. जोनास त्यांच्याकडे गेला. त्यांच्यापैकी एकानेही त्याला ओळखलेच नाही. तो एव्हाना चांगलाच उंच झाला होता नि शरीराने भरला होता. जंगलातील राकट जीवन जगून तो चांगलाच कणखर झाला होता. त्याने आपण कोण आहोत हे सांगितल्यावर फिन्नीने हंबरडा फोडला. ते पाहून एमिली व कॅरोल देखील रडू लागल्या. जोनासने आईला जवळ घेतले. काही वेळाने फिन्नीच्या रडण्याचा आवेग कमी झाल्यावर जोनासने तिला विचारले,

'सीझर कोठे दिसत नाही?'

'काय सांगू तुला? ते दुष्ट बंडखोर तुला घेऊन गेल्यावर दोन तीन वर्षांनी त्यालाही घेऊन जातील या भीतीपोटी सरकारी सैन्याबरोबर काम करणाऱ्या एका सशस्त्र दलात सामील व्हायला मी त्याला पाठवले. तेव्हापासून त्याचा पत्ताच नाही!'

''जोनासला ते ऐकून मोठा धक्का बसला. त्याच्या व सरकारी सैन्याशी संलग्न असलेल्या सशस्त्र दलांच्या कित्येक हिंसक चकमकी झाल्या होत्या. त्याने सरकारी सैन्यांच्या व त्यांना मदत करणाऱ्या सशस्त्र दलांच्या जीपच्या मार्गांवर भू-सुरुंग पेरून कित्येक स्फोट घडवून आणले होते. कदाचित आपल्याच हातून आपला भाऊदेखील मारला गेला असावा की काय, या विचाराने त्याच्या मनात काहूर उठले. आधीच त्याच्या हातून झालेली वडिलांची हत्या, युद्धादरम्यान ठार मारलेली कित्येक निरपराध माणसे, शेकडो सैनिकांची क्रूरपणे केलेली हत्या, लूटमारीदरम्यान केलेले अत्याचार, यांच्या विचाराने तो खूप गोंधळून गेला होता. त्यातच सीझरच्या प्रश्नाने त्याच्या समस्येत भर टाकली. युद्धात भाग घेत असताना या गोष्टींचा विचार करायला त्याच्याजवळ वेळच नव्हता. आता मात्र त्या साऱ्या विचारांमुळे त्याचे मानसिक संतुलन बिघडले. त्याला झोप येईनाशी झाली. खाण्यापिण्यावरचे लक्ष उडाले. तो रात्री दचकून उठायचा. अशावेळी त्याच्या अंगाला दरदरून घाम फुटायचा. दिवसेंदिवस त्याची अस्वस्थता वाढू लागली. तो शेतातील एका झाडाखाली तासन्‌तास शून्यात नजर लावून बसू लागला. त्याच्या मनावर झालेल्या आघाताने फिन्नी काळजीत पडली. त्यातून त्याची सुटका होण्याची काही चिन्हे दिसत नव्हती. जोनास जवळजवळ माणसातून उठला होता...

''कदमसाहेब, आमच्या संस्थेने युद्धाचा आघात बसलेल्या मुला-मुलींचा शोध घ्यायची देशव्यापी मोहीम हाती घेतली. त्यासाठी आमचे कार्यकर्ते खेडोपाडी गेले. ते झेम्बाला गेले असता त्यांना जोनासच्या समस्येविषयी माहिती मिळाली. आमच्या संस्थेने देशाच्या वेगवेगळ्या भागात उपचार केंद्रे उघडली होती. जोनासला झेम्बाजवळील एका केंद्रात दाखल करण्यात आले. प्रत्येक केंद्रात तीस ते चाळीस जणांवर उपचार करण्याची व त्यांच्या राहण्या-जेवणाची सोय केली होती. त्यासाठी आम्हाला काही युरोपीय राष्ट्रांनी आर्थिक मदत दिली होती. मी स्वतः जोनासची केस हाताळत होतो. त्याच्याशी प्राथमिक चर्चा केल्यावर मला समजून चुकले की त्याच्यावर मानसोपचार करताना त्यांना पारंपरिक उपचारांची जोड देणे आवश्यक आहे. तुम्हाला ठाऊक असेलच, की बरेच मांत्रिक-देवऋषी सद्हेतूने समाजोपयोगी दृष्टिकोनातून काही कर्मकांडं नि मंत्रोपचार करत असतात. दुभंगलेल्या समाजात एकी साधनं, सामाजिक समस्या सोडवणे, कौटुंबिक समस्या सोडवून सौख्य साधनं अशाप्रकारची अनेक सत्कृत्ये उदात्त हेतूने करण्यासाठी ते त्यांचे ज्ञान व अतींद्रिय शक्ती वापरत असतात. मी अशाप्रकारचे उपचार करणाऱ्या काही व्यक्तींशी संपर्क साधून जोनासच्या समस्येविषयी त्यांच्याबरोबर चर्चा करून त्याच्या बाबतीत काय करावे लागेल याची रूपरेषा ठरवली. त्यासाठी मी माकुआक्का या देवऋषींची मदत घ्यायचे ठरवले.

''असं? त्यांनी काय सुचवले?''

''माकुआक्का मला म्हणाले की मी माझे उपचार चालूच ठेवावेत. पण ते स्वतः जोनास वर 'कु-फाहा' किंवा कु-फेम्बा' या विधिपद्धतीचा अवलंब करणार होते. ते एक प्रकारचे प्रयोगच म्हणायचे.''

''त्यात काय करत असतात?'' मला आता त्याबद्दल ऐकण्याची उत्सुकता लागली होती.

सांगतो. ''कु-फाहा'मध्ये देवऋषी बाधित व्यक्तीला संमोहित करतात व तिला आपल्या पूर्वजांशी संवाद साधायला

लावतात. तसे झाल्यानंतर बाधित व्यक्तीस आपल्या हातून घडलेल्या दुष्कृत्यांबद्दल पूर्वजांकडून क्षमेची याचना करायला सांगितले जाते. 'कु-फेम्बा'मध्ये देवऋषी बाधित व्यक्तीचे संपर्कमाध्यम बनतात. ते ज्या व्यक्तींबाबत बाधित व्यक्तीच्या हातून चुका झालेल्या असतात किंवा ज्यांच्या हत्येसारखा घोर अपराध घडलेला असतो, त्यांच्या मृतात्म्यांशी संवाद साधतात. या पद्धतीत देखील बाधित व्यक्तीला संमोहित केलेले असते. अशी संमोहित बाधित व्यक्ती देवऋषींच्या मदतीने त्या मृतात्म्यांशी संभाषण करू शकते व त्यांच्या क्षमेची याचना करू शकते. असे मृतात्मे बाधित व्यक्तीस माफ करू शकतात. काही वेळेस त्यासाठी ते काही अटीही घालू शकतात. अशी माफी मिळाल्यानंतर किंवा त्या अटींचे पालन केल्यानंतर बाधित व्यक्तीच्या मनावरील बोजा उतरतो व तिला असे वाटू लागते की आता त्या मृत व्यक्तींनी दिलेल्या शापातून आपली मुक्तता झाली आहे. यथावकाश तिच्या मनावरील ताण-तणाव कमी होतो व तिचे मानसिक आरोग्य सुधारते.''

''जोनासच्या बाबतीत त्या विधिपद्धतींचा उपचार केला गेला? त्यातून काय निष्पन्न झाले?'' मी अधीरतेने विचारले.

''मी सांगणार होतोच तुम्हाला'', असे म्हणून डॉ. एफ्रेम सांगू लागले व मी आश्चर्यचकित होऊन ऐकू लागलो...

''माकुआक्का व मी जोनासवरील उपचारांची तयारी सुरू केली. त्याच्यावर सर्वप्रथम 'कु-फेम्बा' या विधिपद्धतीचा उपचार करायचे ठरले. त्यासाठी दिवस ठरवण्यात आला. हा प्रयोग बाधित व्यक्तीच्या शेतात केला जातो. प्रत्येकाच्या शेतात एक पवित्र झाड असते. ते झाड म्हणजे पूर्वजांना आदरांजली वाहण्याचा एक प्रकारचा देव्हारा असे मानायला हरकत नाही. तो प्रयोग अशा झाडाखाली केला जातो. त्याप्रसंगी बाधित व्यक्तीच्या जवळची एखादी-दुसरी व्यक्ती हजर असावी लागते. प्रयोग करणारे सोडले तर तिऱ्हाईत व्यक्ती किंवा बघ्यांना तेथे थांबता येत नाही. ठरलेल्या दिवशी माकुआक्का, त्यांचे दोन साहाय्यक व मी झेम्बाला पोचलो. जोनासच्या घरी थोडा वेळ थांबून आम्ही चौघे, जोनास व फिन्नी त्यांच्या घराजवळील शेतात गेलो. तेथे पोचल्यावर सर्वप्रथम माकुआक्कांनी आपला पारंपरिक रंगी-बेरंगी पायघोळ कोट अंगावर चढवला. गळ्यात रंगीत मण्यांच्या पवित्र माळा घातल्या. डोक्यावर लाल रंगाचे मुंडासे बांधले. त्यांनी आपल्या हातात गाईच्या शेपटीच्या केसांपासून तयार केलेला एक पट्टा घेतला व जोनासला शेतातील पवित्र झाडाखाली बसवले. आता त्यांनी सर्वांना शांत राहायला सांगितले. ते जोनासकडे भेदक नजरेने पाहत म्हणाले,

'जोनास, आम्ही तुझ्या भल्यासाठी कु-फेम्बा या विधिपद्धतीचा आपल्या पारंपरिक कर्मकांडांत सुचवलेला प्रयोग करणार आहोत. हा प्रयोग खूप गंभीर स्वरूपाचा आहे. तो यशस्वी होण्यासाठी तुझ्या सहकार्याची गरज आहे. तुझी तयारी आहे यासाठी?'

'आहे.'

'आम्ही जे जे सांगू ते ते करायला व आमच्या सर्व प्रश्नांना खरी उत्तरे द्यायला तू तयार आहेस?'

'आहे.'

'आता तू या प्याल्यातील पेय तोंडात घे, पण ते न पिता या झाडाच्या मुळाशी थुंकून टाक', असे म्हणून माकुआक्कानी एक चीनी मातीचा प्याला जोनास समोर धरला. जोनासने तो त्यांच्या हातातून घेतला व त्यांनी सांगितल्याप्रमाणे केले.

'आता तू परत झाडाखाली बस. मी काय मंत्रोच्चार करेन तो लक्षपूर्वक ऐक. डोळे बंद ठेव. ते मी सांगितल्यावरच उघडायचे', असे म्हणून त्यांनी काही मंत्र म्हणायला सुरुवात केली. मधूनच ते जोनासच्या कानाशी जाऊन काही मंत्र म्हणत होते. जोनास हळुहळू संमोहित होत होता. आता माकुआक्का मंत्रोच्चार करत जोनासच्या भोवती गोल फिरू लागले. त्यांनी जोनासला डोळे उघडायला सांगितले. त्याची नजर दूर कशावर तरी खिळली होती. त्याला आता आजूबाजूचे काहीही दिसत नव्हते. तो पूर्णपणे संमोहित झाल्याचे ते लक्षण होते. माकुआक्कांच्या गोल चकरा चालूच होत्या. फिरता फिरता ते कशाचातरी वास घेत होते. माझ्या शेजारी बसलेला माकुआक्कांचा एक साहाय्यक त्यांच्या कानात हलक्या आवाजात कुजबुजत म्हणाला, ते जोनासच्या भोवती जमा होणाऱ्या मृतात्म्यांचा वास घेत आहेत. एवढ्यात अचानक माकुआक्का जमिनीवर कोसळले व निश्चेष्ट झाले. त्यासरशी त्यांचा एक साहाय्यक पुढे सरसावला व त्याने माकुआक्कांच्या नाकाजवळ एक विचित्र वास येणारा कपडा धरला. नंतर त्याने हलक्या हाताने त्यांच्या हातातील पट्टा काढून घेतला. त्यासरशी माकुआक्कांमध्ये अचानक चैतन्य संचारल्यासारखे झाले व ते उठून बसले. त्यांचे डोळे अर्धोन्मीलित होते. आपल्या भोवातलचे सारे विसरून ते एका वेगळ्या तंद्रीत गेले होते. आता एक मृतात्मा त्यांच्यात संचारला होता व तो माकुआक्कांच्या मध्यस्थीने जोनासशी संवाद साधणार होता. त्या दोघांमध्ये संवाद सुरू झाला. तो इतर उपस्थितांना ऐकू येत होता.

माकुआक्का : जोनास, तू ओळखलेस मला?

जोनास : नाही.

माकुआक्का : माझ्यामुळे तुझी झोप उडाली आहे. माझ्यामुळेच तू सदैव बेचैन असतोस.

जोनास : पण मी काय केले आहे?

माकुआक्का : काय केले आहे? विसरलास इतक्यात तू मला काय केलं होतास ते?

जोनास : बोबोलेनंतर आम्ही पकडलेले शिनावानचे ते गृहस्थ तर नाही तुम्ही?

माकुआक्का : हं, विसरला नाहीस तर!

जोनास : पण तुम्ही तेच गृहस्थ असाल तर...तर तुम्हाला ठाऊक आहेच खरे काय घडले...मी जे काही केले, ते केले नसते तर कमांडरने आम्हाला ठार मारले असते...

फिन्नी : जोनास, हे गृहस्थ कोण आहेत? तू त्यांना काय केले होतेस?

फिन्नीने हा प्रश्न विचारल्यावर जोनास गप्प बसला.

माकुआक्का : आता का तुझा आवाज फुटत नाही? बोल ना आता, सांग तुझ्या आईला सारं काही...कळू दे तिला तुझा प्रताप...

...आणि त्या क्षणी जोनास बोलू लागला. गेल्या सहा-सात वर्षांपूर्वीच्या घटना त्याच्या डोळ्यांसमोर जशाच्या तशा उभा राहिल्या. तो त्यांचे वर्णन करू लागला. आता तो पूर्णपणे भूतकाळात हरवून गेला होता...

‘हे पाहा मुलांनो, मी काय सांगतो याकडे लक्ष द्या. तुम्ही आता आमचे योद्धे झाला आहात. तुमचे प्रशिक्षण संपले आहे. आता आम्ही तुमच्यावर लहान-मोठ्या कामगिऱ्या सोपवणार आहोत. मी तुमचा कमांडर, म्हणजे तुमच्या गटाचा प्रमुख आहे. तुम्ही माझे आदेश पाळण्यात जरा जरी कसूर केली किंवा टाळाटाळ केली तर त्याचे खूप गंभीर परिणाम



होतील. आम्ही सर्व चुकांसाठी एकच शिक्षा देतो, ती म्हणजे शिरच्छेद! मी आतापर्यंत शत्रूच्या हजारो सैनिकांना व समर्थकांना, तसेच आमच्या चुकार योद्ध्यांना खलास केले आहे. हवे तर आपल्या गटातील काही मोठ्या मुलांना विचारा. बरे, आता तुमचे वेगवेगळे छोटे उप-गट केले जातील. प्रत्येक उप-गटाला वेगवेगळी जबाबदारी दिली जाईल...

त्यानंतर चार-चार जणांचे लहान गट करण्यात आले. प्रत्येक लहान गटात १७-१८ वर्षांचा एक मोठा मुलगा होता.

तो त्यांचा प्रमुख किंवा म्होरक्या. जोनास ज्या गटात होता त्या गटाला कमांडरने त्यांच्या एका कामगिरीचा तपशील समजावून सांगण्यासाठी त्या सर्वांना आपल्या तंबूत बोलावले.

हे पाहा, आल्वारोच्या नेतृत्वाखाली तुम्ही सर्वांनी काम करायचे आहे. तुमची पुढील एक महिन्याची कामगिरी आहे मापुतो ते चिमोओई या मार्गावरील वाहतूक विस्कळीत करणे. तुम्ही एस्पुंगाबेराच्या आसपास राहून हे काम करायचं आहे. तुम्ही दिसेल त्या वाहनावर हल्ला करा, ती जाळून टाका, लूटमार करा व प्रवाशांना खलास करा. लूटमारीमध्ये काही किंमती ऐवज मिळाला तर तो आपल्या बोटेरोच्या विभागीय तळावर जमा करायचा आहे. तुम्ही तिकडे गेल्यावर त्यांच्याशी एका खबऱ्यामार्फत संपर्क साधा. मी अधूनमधून तुम्हाला भेट देईन. कोणीतरी तुम्हाला दारूगोळा पुरवेल. तुम्हाला लूटमारीवरच तुमची गुजराण करावी लागेल. आसपासच्या खेड्यात तुम्हाला आपले हस्तक व समर्थक भेटतील. शत्रूच्या सैनिकांची चाहूल लागली तर लपून बसा. त्यांच्यावर हल्ला करू नका. ते काम दुसऱ्या गटाचे आहे...'

त्याने त्या सर्वांना अजून बऱ्याच सूचना दिल्या. त्यानंतर त्यांना रात्री एका बंद टेम्पोमधून एस्पुंगाबेरा या लहान गावाजवळ सोडण्यात आले. तेथे पोचल्यावर त्यांच्या कामगिरीस सुरुवात झाली. कमांडरने सांगितल्याप्रमाणे त्यांनी त्यांच्यापैकी एकास बोटेरो येथील विभागीय तळावर पाठवून संपर्क साधला. तो तळ त्यांच्या कार्यक्षेत्रापासून तीस किलोमीटर अंतरावर घनदाट जंगलात, डोंगरावर होता. कमांडरने त्यांच्या गटाला मापुतो ते चिमोओई महामार्गावर रोज जागा बदलायचा सल्ला दिला होता. कामगिरी सुरू झाल्यावर त्यांनी येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांवर बेछूट गोळीबार करायला सुरू केले. काही वाहने न थांबता तशीच जोरात निघून जात, तर काहींची चाके पंक्चर झाली तर त्यांना पळून जाता येत नसे. अशावेळी ते वाहनांतील प्रवाशांना बाहेर काढून ठार मारत, मौल्यवान वस्तू काढून घेत व वाहने जाळून टाकत.

एके दिवशी त्यांना बोटेरोच्या विभागीय तळावरून संदेश मिळाला की त्यांचा कमांडर तेथे आला आहे. त्याने एखादी बस अडवून, लूटमार करून, किमती ऐवज घेऊन तळावर यावे असा निरोप पाठवला होता. तसेच येण्यापूर्वी बसमधील प्रवाशांना खलास करायचे होते. पण त्यांच्यापैकी एखाद्या तरुण बाईस तळावर घेऊन यायचे होते. त्या निरोपानुसार त्या गटातील मुलांनी त्या रात्री एक प्रवासी बस अडवली. सर्व प्रवाशांना खाली उतरायचे आदेश दिले. भयभीत प्रवासी हात वर करून खाली उतरू लागले. जोनास व आणखी एकाला अल्वारोने प्रवाशांवर लक्ष ठेवायला सांगितले, तर इतर दोघांना लुटमारीच्या कामास लावले. त्या साऱ्या प्रवाशांमध्ये फक्त तीन स्त्रिया होत्या. एक म्हातारी, एक मध्यमवयीन व एक तरुणी. त्या तरुणीच्या पाठीला सहा महिन्यांचे एक मूल बांधले होते. अल्वारोने त्या तरुणीस बाजूला थांबायला सांगितले. त्याने जोनासला तिच्यावर लक्ष ठेवायला सांगितले. इतक्यात आल्वारोचा डोळा चुकवून एक प्रवासी पळत पळत जवळच्या झाडीत घुसला. अल्वारोच्या ते पटकन लक्षात आले व त्याने जोनासला त्याचा पाठलाग करायला व तो सापडल्यावर त्याला जागच्याजागी ठार मारायला सांगितले. आसपासचे जंगल दाट नव्हते, काही खुरटी झुडुपे व बाभळीची झाडे होती. तो माणूस जवळच्याच एका झुडुपात लपला होता. त्याला शोधून काढण्यात जोनासला फार वेळ लागला नाही. तो सापडल्यावर जोनासने त्याच्यावर टॉर्चचा झोत टाकला व बंदूक रोखली. तो गोळी झाडणार इतक्यात त्याच्या लक्षात आले की तो त्या माणसास ओळखत होता. शिनावाने या गावात जोनासची एक आत्या होती. जोनास अधूनमधून तिच्याकडे राहायला जायचा. तिचा तेथील मार्केटमध्ये भाजीचा ठेला होता. त्या माणसाचा, कार्लोचा, ठेला तिच्या शेजारी होता. जोनास आत्याकडे राहायला गेल्यावर तिला तिच्या ठेल्यावर तो मदत करत असे. त्यावेळी त्याची व कार्लोची ओळख झालेली. जोनास त्याला मामा असे संबोधायचा. जोनासने आपली बंदूक खाली केली. तो काही बोलणार इतक्यात जोनासचा एक सहकारी तेथे आला. जोनास त्याला म्हणाला,

आज आपण त्या बसमधील सामानाची खूप लूटमार केली आहे. ते सारे सामान आपण डोंगरावरील तळापर्यंत वाहून नेऊ शकणार नाही. त्यासाठी आपल्याला दोन-तीन लोकांची मदत लागेल. हा माणूस तगडा दिसतोय. आपण त्याला या कामाला लावू. नंतर त्याचे काय करायचे ते पाहू.

जोनासच्या सहकाऱ्यास ते पटले. त्या दोघांनी तो प्रस्ताव अल्वारोला सुचवल्यावर त्याने देखील त्यास संमती दिली. अल्वारोने आणखी दोन प्रवाशांना बाजूला केले. बाकीच्यांना एका रांगेत उभे करून मशीनगनने ठार मारले. त्या सर्वांनी लुटलेले सारे सामान त्या तिघांच्या डोक्यावर व खांद्यांवर लादले. त्या सर्वांना बोटेरो तळावर पोचायला तीन दिवस लागणार होते. कारण दिवसा त्यांना दाट जंगलात लपून बसावे लागणार होते. सारा प्रवास चालत, तोही फक्त रात्री करावा

# माहितीचा वैविध्यपूर्ण खजिना खुला करून देणारी 'रोहन'ची ६ वैशिष्ट्यपूर्ण पुस्तकं...

रोहन प्रकाशन

स्वतंत्र भारतात गेल्या ६५ वर्षांत विविध क्षेत्रांत महत्त्वाचं काय घडलं?
जाणून घ्या एकाच महद्ग्रंथातून...

## असा घडला भारत
१९४७-२०१२

अल्पावधीत ५००० प्रती

*घटना-घडामोडींतून उलगडलेला स्वतंत्र भारत*

संपादक : **सुहास कुलकर्णी** ◆ **मिलिंद चंपानेरकर**
प्रस्तावना : **कुमार केतकर** ◆ पृष्ठं ९२४
मूळ किं.रु.१५०० सवलतीत रु.१२५०

१९७१ च्या बांगलादेश युद्धात पाकिस्तानच्या लष्कराला फक्त १८ दिवसांत शरण आणणाऱ्या सेनानीचं रोमहर्षक समग्र चरित्र...



## फील्ड मार्शल सॅम माणेकशा
भारतीय लष्कराचा मानबिंदू

लेखक : **मे. जन. शुभी सूद** ◆ अनु.: **भगवान दातार**
पृष्ठं २१२ + दुर्मीळ छायाचित्रांची १६ पानं
मूळ किं.रु.२५० स्वागतमूल्य रु.२००

या थरारक कारवाईच्या प्रत्येक टप्प्यावरील नियोजनात आणि प्रत्यक्ष कारवाईत ऑपरेशन-प्रमुख ले. जन. **के. एस. ब्रार** सहभागी होते. त्यांच्याच शब्दातली ही कहाणी...पूर्णपणे सत्य...

## ऑपरेशन ब्लू स्टार
जसं घडलं तसं...

लेखक : **ले. जन. के. एस. ब्रार** ◆ अनु.: **भगवान दातार**
पृष्ठं १५२ + छायाचित्रं व नकाशे
मूळ किं.रु.१९५ स्वागतमूल्य रु.१५०



## नोबेल कथा
'नोबेल'ची पार्श्वभूमी आणि विविध क्षेत्रांत नोबेल पुरस्कार मिळवणाऱ्या व्यक्ती व त्यांच्या कार्याचा सोप्या भाषेत घेतलेला वेध..

लेखक : **डॉ. प्रबोध चोबे**
पृष्ठं २८४ ◆ छायाचित्रांसह
मूळ किं.रु.२४० स्वागतमूल्य रु.२००



## पर्यटन एक संजीवनी
*देश-विदेशातील भन्नाट भटकंती...*
इजिप्त • स्कॉटलंड • ग्रीस • अमेरिका झिंबाब्वे • द. आफ्रिका • चीन • इटली भारत इ. देशांमधले अनोखे अनुभव

लेखिका : **डॉ. लिली जोशी**
पृष्ठं २२४ + रंगीत छायाचित्रांची १६ पानं
मूळ किं.रु.२०० स्वागतमूल्य रु.१६०

सर्वोत्कृष्ट अनुवादासाठी राज्य पुरस्कारप्राप्त पुस्तक

## लोकशाहीवादी अम्मीस... दीर्घपत्र
व्यापक जनजीवनाच्या अनेक पैलूंच्या दर्शनाद्वारे अलगद हिंदोळे देत आगळा मानसिक प्रवास घडवणारी एक आगळी साहित्यकृती

लेखक : **सईद मिर्झा**
अनुवाद : **मिलिंद चंपानेरकर** ◆ पृष्ठं ३६२
मूळ किं.रु.३२० सवलतीत रु.२५०

Online खरेदी : **www.rohanprakashan.com**

रोहन प्रकाशन
५ व ६ धवलगिरी
४३० शनिवार पेठ
पुणे ४११०३०

✆ पुणे २४४८०६८६ मो. ८१४९१२०२१०
✆ मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२
E-mail : rohanprakashan@gmail.com

* टपाल खर्च वेगळा
◆ सर्व पुस्तक विक्रेते
◆ ग्रंथप्रदर्शनं
◆ FLIPKART येथे उपलब्ध

लागणार होता. त्यांचा मार्गही खडतर होता. बऱ्याच ठिकाणी तो दऱ्या-खोऱ्यांतून गेलेला.

तुम्ही चालताना ढिलाई केलीत तर जागच्या जागी गोळी घालेन, अल्वारोने त्या चौघांना तंबी दिली. त्या बाईकडे सामान दिले नव्हते, कारण तिच्या पाठीला मूल बांधले होते. त्या खडतर मार्गावर चालताना त्या चौघांची खूप दमछाक व्हायची, पण जिवाच्या भीतीने ते चालतच राहायचे. ती बाई मात्र पाठीवरील मुलाच्या ओझ्याने मागे मागे राहू लागली. तिला इतरांसारखे झपझप चालवत नव्हते. त्यामुळे सर्वांना तिच्यासाठी मधूनमधून थांबावे लागत होते. भारवाहकाना त्यामुळे थोडा आराम मिळायचा, पण आल्वारो मात्र खवळू लागला. असे वारंवार होऊ लागल्यावर दुसऱ्या रात्री तो त्या बाईस म्हणाला,

हे बघ, तुला मूल घेऊन चालायला व चढ चढायला त्रास होतोय. तू मुलाला येथेच सोडून दे!

नाही रे बाबा, माझे लाडके तान्ह मूल कसे सोडू या जंगलात? लांडगे-तरस त्याला बघता बघता खाऊन टाकतील. मला नि माझ्या मुलाला इथेच सोडून दे. जवळच्या एखाद्या वस्तीवर दिवस उजाडेपर्यंत आसरा घेईन नि नंतर हळुहळू रस्त्याकडे जाईन. माझे ऐकलेस तर तुझे उपकार आयुष्यभर विसरणार नाही.

मूर्खासारखे काही बोलू नकोस. तळावर गेल्यानंतर आमचे कमांडर काय म्हणतात त्याप्रमाणे आम्ही करणार. तुला वाटेत सोडता येणार नाही. मुकाट्याने पटपट चालायचे.

मला पटपट चालवत नाही तर मग काय करू मी? हा भार घेऊन डोंगर कशी चढू मी?

त्यावर एक उपाय आहे, असे म्हणून आल्वारो पुढे सरसावला, त्याने तिच्या पाठीची झोळी सोडली व त्या बाईला व इतरांना काय होतेय हे समजायच्या आत त्याने त्या मुलाच्या पायाला धरून त्याचे डोके एका जाड झाडाच्या बुंध्यावर आपटले! त्या बाईने टाहो फोडला तर ते मूल तडफडू लागले व काही क्षणांत त्याचा प्राण गेला. हे अघोरी कृत्य पाहून कार्लोने आपले सामान खाली टाकले व तो अल्वारोच्या अंगावर धावून गेला. एवढ्यात जोनास व त्याचे सहकारी पुढे सरसावले व त्यांनी कार्लोवर बंदुकी रोखून खाली पडलेल्या अल्वारोला उठवले. त्या धक्क्यातून सावरलेला अल्वारो कार्लोला म्हणाला,

चलाखी दाखवतोस काय? थांब, तुला आता आमचा हिसका दाखवायलाच हवा. पण आधी हे सामान उचल. तळावर ते पोचायला हवं. जोनास, तू याच्यावर लक्ष ठेव. याने पुन्हा काही चलाखी दाखवली तर सरळ गोळ्या घाल. सामानाचे पाहू नंतर. तळावर गेल्यावर कमांडर त्याला योग्य ती शिक्षा करतीलच. चला, उचला सामान अन् चालू लागा!

इतक्यात दुसरा एक भारवाहक अल्वारोला म्हणाला,

आम्ही तुमचं सर्व काही ऐकू. माझी एक विनंती आहे. या मुलाचा देह असाच उघड्यावर सोडायला नको. आम्ही पाच-दहा मिनिटांत एक खड्डा खणतो. आम्ही त्याचे दफन करून प्रार्थना करू. कृपा करून नाही म्हणू नका.

अल्वारोने थोडा विचार केला व त्याने ती विनंती मान्य केली. त्या तीन भारवाहकांनी पटपट एक खड्डा खणला व त्यात त्या मुलाचे दफन केले. त्याची हतबल आई रडत रडत ते हृदयद्रावक दृश्य पाहत होती. ते सारे तेथून जायला निघाले. ती बाई मात्र हुंदके देत, वारंवार मागे वळून पाहत होती. ती त्यांची दुसरी रात्र होती. तिसरी रात्र उलटून पहाटे ते बोटेरो तळावर पोचले.

कमांडरला भेटल्यावर तो अल्वारोला म्हणाला, शाब्बास, अल्वारो. चांगली कामगिरी पार पाडलीस. तुम्ही आता आराम करा. संध्याकाळी आपण बोलू.

त्या तिघा भारवाहकाना एका तंबूत, त्या बाईस दुसऱ्या एका तंबूत व सैनिकांना वेगळ्या तंबूत झोपायची सोय केली. त्या तळावर व त्याच्या आसपास बरेच लोक गस्त घालत होते. तेथे एकूण चाळीस लोक होते. तो संपूर्ण दिवस आराम केल्यावर त्या संध्याकाळी कमांडर व अल्वारो बोलत बसले. त्याच्या गटातील जोनास व इतर जवळच बसले होते. कमांडरने त्यांच्या अलीकडील कामगिऱ्यांबद्दल माहिती करून घेतली. त्यांची बरीच चर्चा झाल्यानंतर अल्वारोने जंगलात घडलेल्या प्रकाराची माहिती कमांडरला दिली. ते ऐकल्यावर कमांडर खवळला. त्याने आपल्या एका साहाय्यकाला बोलावले व तो म्हणाला,

जा, तो कार्लो म्हणून कोण कैदी आहे त्याला घेऊन ये इकडे ताबडतोब.

थोड्याच वेळात तो साहाय्यक कार्लोला कमांडरकडे घेऊन आला. त्याच्याकडे रागाने पाहत कमांडर म्हणाला,

माझ्या सहकाऱ्याच्या अंगावर हात टाकलास काय? थांब, तुला योग्य ते शासन व्हायलाच हवे. अल्वारो, इतर कैद्यांना बोलाव. त्यांना पाहू दे आमची आज्ञा पाळली नाही तर काय परिणाम होतो. जोनास, हा पांगा घे आणि संपव त्या हरामखोराला. बंदूक चालवू नकोस. शत्रूचे सैनिक आसपास फिरत असतील तर त्यांना आपला ठाव ठिकाणा कळेल.

बाकीच्या कैद्यांना तेथे आणण्यात आले. जोनास कमांडरला नाही म्हणू शकत नव्हता. त्याने आपली व कार्लोची ओळख आहे हे कटाक्षाने गुप्त ठेवले होते. कार्लो भेदरलेल्या नजरेने जोनासकडे पाहत होता. आता तो थरथर कापत होता. त्याचे हात मागील बाजूस बांधले होते. त्याला जमिनीवर गुडघे टेकून बसवले होते. जोनासने कमांडरकडून तो दोन फूट लांबीचा धारदार पाते असलेला पांगा घेतला. पण त्याचे पाऊल उचलेना. ते पाहून कमांडर म्हणाला,

जोनास, पाहतोस काय, चल चालव तो पांगा त्याच्या मानेवर!

जोनास यंत्रवत हालचाली करत कार्लोकडे गेला व त्याच्या चेहऱ्याकडे न पाहता त्याने त्याच्या मानेवर पांगाचा जोराने वार केला. त्यासरशी मानेतून रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. त्यापैकी एक जोनासच्या चेहऱ्यावर उडाली व काही रक्त त्याच्या डोळ्यांत गेले. कमांडरने जोनासच्या हातातील पांगा घेऊन कार्लोचे शिर धडावेगळे केले.

जोनास : मी जर तुम्हाला मारले नसते तर कमांडरने मला ठार मारले असते. त्यावेळी त्याच्या डोळ्यांत अंगार फुलला होता. माझ्यावर बळजबरी करण्यात आली होती...पण अजूनही माझ्या डोळ्यांसमोर तुमचा केविलवाणा चेहरा येतो...तुमचे मला विनवणी करणारे डोळे येतात...तुम्हाला मारण्याआधी तीन दिवसांपूर्वीचा प्रसंग तुम्हाला आठवत असेल, मामा. त्या झुडपात तुम्ही मला मिळाल्यावर मी शक्कल लढवून तुम्हाला अभय दिलं...पण नंतर परिस्थिती माझ्या हाताबाहेर गेली. पण तरीही...अजून मला तुमचे धडावेगळे शिर आणि धडपडणारे शरीर दिसते...ते दृश्य वारंवार माझ्या स्वप्नात येते...मामा, मी खरे सांगतो, मला तुम्हाला मारायचे नव्हते...

माकुआक्का : पण तुझ्या हातून माझा मृत्यू झाला हे सत्य आहे. मी काय रानटी पशू होतो पांगा चालवून मारायला? शिवाय माझा मृतदेहही तसाच उघड्यावर जंगलात टाकून दिला तुम्ही लोकांनी, तेथे सडायला, रानटी श्वापदांनी खायला...माझ्यावर पारंपरिक अंत्यसंस्कारही केले नाही तुम्ही कोणी...

फिन्नी : त्यात माझ्या पोराचा काय दोष होता? त्या नराधमांनी त्याला जबरदस्तीनं पळवून नेलं होतं, त्याच्या हातून वाईट गोष्टी करायची जबरदस्ती केली. त्यावेळी तो लहान होता. आता यातून मार्ग कसा काढायचा तुम्हीच सांगा.

माकुआक्का : ठीक आहे, मी एक मार्ग सुचवतो. माझ्या गावी जाऊन माझ्या बायको व मुलांना भेटा. घरात माझे जुने कपडे आहेत, त्यांच्यावर रीतसर अंत्यसंस्कार करा. ह्या पोराने माझ्या घरी एक वर्ष राहून माझ्या कुटुंबीयांना शेतीमध्ये मदत करायला हवी. त्याने तसे केले तरच मी त्याला माफ करेन.''

''डॉक्टर, खरेच तसे केले जोनासने?'' मी डॉ. एफ्रेमना विचारले. त्यांनी सांगितलेल्या त्या अद्‌भुत 'कु-फेम्बा' या प्रयोगाची माहिती ऐकून मी थक्क झालो होतो.

''अर्थातच. जोनासने त्या मृतात्म्याच्या सर्व सूचनांचे तंतोतंत पालन केले. नंतर आम्ही त्याच्यावर आमचे कल्पक मानसोपचार सुरू केले.''

''कल्पक मानसोपचार? ते कसे असतात? या पूर्वी हा शब्दप्रयोग मी कधी ऐकलेला नाही.''

''सांगतो. आफ्रिकन संस्कृतीत पूर्वजांना खूप महत्त्व असते. त्यांचे आत्मे जीवित व्यक्तींचे सरंक्षण करतात व त्यांना अडी-अडचणीच्या वेळी मार्गदर्शन करतात असा समज दृढ आहे. प्रत्येकाचे नाव हे त्याच्या एखाद्या पूर्वजाच्या नावावरून ठेवलेले असते. तो पूर्वज त्या व्यक्तीचा त्राता व मार्गदर्शक असतो. जोनास हे नाव त्याच्या आजोबांचे, त्याच्या वडिलांच्या वडिलांचे. त्यामुळे त्यांचा आत्मा जोनासचा संरक्षक व मार्गदर्शक ठरतो. या परंपरेस अनुसरून आम्ही जोनासला त्याच्या मृत आजोबांच्या आत्म्याशी संवाद साधायला सांगितले. त्याने कल्पना करायची की आपण आजोबांशी बोलतोय. त्यांच्याजवळ आपल्या चुकांची कबुली देऊन त्याचे मन हलके करायला मदत झाली. आम्हाला त्याचे उपचार सुरू केल्यापासून हळुहळू फरक जाणवत होता. सहा महिन्यांच्या उपचारानंतर तो पूर्ण बरा झाला. त्याच्या मनावरील दडपण व ताण नाहीसा झाला. त्याला भयावह स्वप्ने पाडायची बंद झाली. त्याला व्यवस्थित झोप लागू लागली. आणि अशा रीतीने त्याचे पुनर्वसन झाले.''

''तुम्ही रुढी-परंपरा नि मनोविश्लेषणाचे आधुनिक तंत्र यांची सांगड घालून त्याला पुन्हा माणसात आणले. कमाल आहे तुमच्या कल्पकतेची आणि दूरदृष्टीची!''

रात्रीचे साडे-दहा वाजले होते. घड्याळाकडे पाहत डॉ. एफ्रेम म्हणाले,

''कदमसाहेब, तुम्ही आता आराम करा. उद्याही तुम्हाला चर्चासत्राचे बरेच काम आहे. आपण असे करू, उद्या चर्चासत्र संपल्यावर माझ्या घरी जाऊ. तुम्ही माझ्याकडे

जेवायलाच या. त्या निमित्ताने आपल्याला अजून गप्पा मारता येतील.''

''ठीक आहे, डॉक्टर. गुड नाईट!''

मला 'गुड नाईट' करून डॉक्टरांनी माझा निरोप घेतला.

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी चर्चासत्र संपल्यावर आम्ही डॉक्टरांच्या घराकडे जायला निघालो. त्यांच्याकडे लँड-रोव्हर जीप व ड्रायव्हर होता. त्यांच्या घरी कोण कोण असते हे मला ठाऊक नव्हते. आम्ही त्यांच्या घराकडे जाताजाता मी त्यांना विचारले,

''आपल्या घरी कोण कोण असतं?''

''हसत हसत डॉक्टर म्हणाले, मी एकटाच, मी कधी लग्नाच्या फंदात पडलो नाही. जनसेवेला वाहून घेतले. त्यामुळे वारंवार फिरती, दूरचा प्रवास, खेडोपाडी करावा लागणारा मुक्काम, शिवाय युद्ध व हिंसक परिस्थितीत सातत्याने जाणवणारी अनिश्चितता, या कारणास्तव लग्नाचे बंधन स्वीकारले नाही. ज्यांच्यावर उपचार करून माणसात आणले तीच माझी मुले-बाळे म्हणायची!''

मला डॉक्टरांच्या त्यागाचे कौतुक वाटले. आम्ही त्यांच्या घरी पोचल्यावर डॉक्टर म्हणाले,

''एक मुलगी संध्याकाळचा स्वयंपाक करून फ्रीजमध्ये ठेवून जाते. मी जेवण मायक्रोवेव्हमध्ये गरम करून घेतो. सकाळी बाहेरच एखादे सँडविच किंवा हलके लंच घेतो. बरे, आज पोर्तुगीज पद्धतीचा ग्रिल्ड पॉपलेट, बेक्ड पोटॅटोज् व परतलेल्या भाज्या, असा साधाच बेत आहे. तुम्ही ज्युस किंवा सरबत काय घ्याल? बीयर हवी असल्यास ड्रायव्हरला पाठवून आणावी लागेल, कारण मी मद्य घेत नाही.''

''डॉक्टरसाहेब, मला बीयर वगैरे काही नको, कसलाही ज्युस चालेल. तुमच्याशी गप्पा मारणे महत्त्वाचे आहे'', मी म्हणालो.

आम्ही डॉक्टरांच्या दिवाणखान्यात गेलो. मी तेथे बसल्यावर डॉक्टर व त्यांचा ड्रायव्हर आत गेले. थोड्यावेळाने ड्रायव्हरने एका ट्रेमधून अननसाच्या रसाचे ग्लास, वेफर्स व खाऱ्या काजूंचा कटोरा आणून टी-पॉयवर ठेवले. डॉक्टरांचा तो केवळ ड्रायव्हर नसून त्यांचा मदतनीसही होता हे माझ्या लक्षात आले. इतक्यात डॉक्टरही फ्रेश होऊन, कपडे बदलून बाहेर आले. आमच्या गप्पा सुरू झाल्या. मी त्यांना कालच्याच विषयासंदर्भात विचारले,

''डॉक्टर, अनोख्या नि कल्पक मानसोपचारपद्धतीने सुधारलेल्या पूर्वाश्रमीच्या बाल-योद्ध्यांना समाजात नंतर कसे वागवले जाते? त्यांच्याकडे पूर्वग्रहदूषित नजरेने पाहिले जाते की समाज त्यांना पुन्हा आपल्यात सामावून घेतो?''

''तुम्ही एका महत्त्वाच्या मुद्याला हात घातलात, कदमसाहेब. केवळ मानसिक व्याधींतून त्यांची सुटका करून समस्या मिटत नाही. त्यांना पुन्हा सन्मानाने व सचोटीने उर्वरित आयुष्य जगण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी आमच्या संस्थेने खूप प्रयत्न केले नि उपक्रम राबवले. त्याचा परिणाम असा झाला की आज त्यांच्यापैकी बरेचसे शेती करतात, काही नोकऱ्यांच्या शोधात शहरांकडे धाव घेतात तर काही आपला स्वतःचा छोटासा व्यवसाय सुरू करतात. पण सर्वसाधारणपणे पापक्षालन झालेल्या व्यक्तीकडे पूर्वग्रहदूषित नजरेने पाहिले जात नाही. आम्ही कित्येक उद्योगधंद्यांच्या मालकांना अशा व्यक्तींना नोकऱ्या द्यायची विनंती केली. दयाळूपणा दाखवून कित्येकांनी आम्हाला चांगला प्रतिसाद दिला. तुमची एका सुधारित बाल-योद्ध्याला भेटायची इच्छा आहे?''

''अरे वा! शक्य होईल ते?'' मी साशंकतेने विचारले. दुसऱ्या दिवशी सकाळी मी मापुतोहून नैरोबीला जाणार होतो. वेळ फार थोडा होता.

''का नाही?'' असे म्हणून डॉक्टरांनी आतील खोलीत बसलेल्या ड्रायव्हरला, आबुरो! अशी हाक मारून त्यांच्या भाषेत कदाचित त्याला बाहेर यायला सांगितले असावे. तो बाहेर आल्यावर डॉक्टर म्हणाले, ''आता तुम्ही याचेच उदाहरण घ्या!''

डॉक्टरांचा पस्तिशीचा ड्रायव्हर नम्रपणे उभा होता. त्याला इंग्रजी समजत नसल्यामुळे आमची कोणत्या विषयावर चर्चा चालली आहे हे त्याला ठाऊक नव्हते. त्याच्याकडे पाहत मी डॉक्टरांना विचारले,

''हा एकेकाळी बाल-योद्धा होता?''

''अर्थातच. काल तुम्हाला ज्याची कहाणी ऐकवली तो जोनास हाच! मी त्याला 'आबुरो', म्हणजे आमच्या यारुबा भाषेत 'धाकटा भाऊ' असे संबोधत असतो!''

**उमेश कदम**
'आनंद', २५-ई, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३
दूरध्वनी : (०२३१) २६५३४६०
kadamumesh@hotmail.com

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!



**प्रोपा. शिंदे ब्रदर्स**

9923678910 / 9767621268 / 9823443728



# हॉटेल साईकृपा

शुद्ध शाकाहारी फॅमिली गार्डन रेस्टॉरंट

कसारा बायपास-मोखावणे, ता. शहापूर, जि. ठाणे - ४२१ ६०२

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!



# यथार्थ टूर्स अ‍ॅन्ड ट्रॅव्हल्स

**प्रो. रमेश भोईर**

कसारा

# प्रोफ्युमो प्रकरणाची पन्नाशी

अपर्णा पाटील

जगाच्या पाठीवर घडलेली राजकीय स्कँडल्स ही राजकारणाइतकीच जुनी आहेत. सत्ता, पैसा, ईषा, महत्त्वाकांक्षा आणि स्त्रीचा मोह यातून घडलेल्या राजकीय स्कँडल्सना तोटा नाही. त्यातल्या एकेका प्रकरणाच्या तपशीलात शिरलं तर जे बाहेर पडतं, त्यातून मतदारांना धक्का बसतो. साहित्याला उपहास मिळतो आणि राजकीय पक्षांमध्ये पळापळ होण्याचा अनुभव येतो. काही राजकीय स्कँडल्स ही निव्वळ विवाहबाह्य संबंधांतून घडलेली असतात. पण त्याचं उघड होणं संबधित पक्षासाठी तोंड लपवण्यासाठी जागा न उरावी, इतक्या वाईट पद्धतीने चर्चिली जातात. तर संशयास्पद मृत्यूशी संबंधित असणं किंवा सत्तेचा गैरवापर करणं हे स्कँडल्स घडण्यामागचं कारण असू शकतं. राजकीय स्कँडल्स घडण्याची कारणं निरनिराळी असली तरी या सगळ्याची परिणती मात्र संबंधित व्यक्तीच्या राजकीय कारकिर्दीचा शेवट होण्यातच झालेली आहे.

जगाच्या पाठीवर घडलेली राजकीय स्कँडल्स ही राजकारणाइतकीच जुनी आहेत. सत्ता, पैसा, ईषा, महत्त्वाकांक्षा आणि स्त्रीचा मोह यातून घडलेल्या राजकीय स्कँडल्सना तोटा नाही. त्यातल्या एकेका प्रकरणाच्या तपशीलात शिरलं तर जे बाहेर पडतं, त्यातून मतदारांना धक्का बसतो. साहित्याला उपहास मिळतो आणि राजकीय पक्षांमध्ये पळापळ होण्याचा अनुभव येतो. काही राजकीय स्कँडल्स ही निव्वळ विवाहबाह्य संबंधांतून घडलेली असतात. पण त्याचं उघड होणं संबधित पक्षासाठी तोंड लपवण्यासाठी जागा न उरावी, इतक्या वाईट पद्धतीने चर्चिली जातात. तर संशयास्पद मृत्यूशी संबंधित असणं किंवा सत्तेचा गैरवापर करणं हे स्कँडल्स घडण्यामागचं कारण असू शकतं. राजकीय स्कँडल्स घडण्याची कारणं निरनिराळी असली तरी या सगळ्याची परिणती मात्र संबंधित व्यक्तीच्या राजकीय कारकिर्दीचा शेवट होण्यातच झालेली आहे.

अनेक राजकीय नेते स्वतःला कायद्यापेक्षा श्रेष्ठ समजतात. जगातील कोणतीही यंत्रणा त्यांना धक्का पोचवू शकत नाही, अशा गुर्मीत ते जगत असतात. यातून उचललेली पावलं त्यांना स्वतःच्या नाशाकडे ओढून नेतात. त्यातून जे काही घडतं, त्यातून समाजमन हादरतं. पण अशा घटना इतिहासात घडूनही त्यापासून धडा घेण्याचं भान आजवर राजकीय नेत्यांना आलेलं नाही, हेच सत्य आहे. त्यातूनच स्कँडल्स हा राजकारणाचा भाग झाला आहे. तरीही काही प्रकरणं विसरता न येणारी. अमेरिकेतलं क्लिंटन-मोनिका प्रकरण, इस्रायलमधलं मोशे कात्साव प्रकरण, इटालीतलं सिल्वियो बेर्लेस्कोनी यांचं 'बुंगा-बुंगा' पार्टी प्रकरण... यासारखी असंख्य प्रकरणं तर केवळ स्त्रीसुखाच्या लालसेने वेडावलेल्या राजकीय नेत्यांची. क्षणिक मोहाने घडलेली ही प्रकरणं वर्षानुवर्षं चळघली गेली.. जातीलही.

ब्रिटनमधल्या प्रोफ्युमो अफेअर या स्कँडलने माजवलेला गहजब मात्र सगळ्यात सनसनाटी होता. त्यात खूप सारं नाट्य होतं. एक टॉपलेस मॉडेल, एक डॉक्टर, युद्ध खात्याचा सचिव

ही त्यातील प्रमुख पात्रं होती. ब्रिटिश संसदेतील सन्माननीय राजकीय नेत्यानं दिलेल्या दिखामदार पार्टीत ते सुरू झालं आणि एका आत्महत्येनं त्या प्रकरणाचा शेवट झाला. ज्याची राजकीय कारकीर्द पणाला लागली तो पुढचं आयुष्य शौचालय स्वच्छ करत राहिला. त्याहीपेक्षा एमआय-५ यासारख्या गुप्तचर यंत्रणा शत्रूराष्ट्रांची हेरगिरी करण्यासाठी महिलांचा कसा वापर करतात, ज्या राजकीय नेत्यांना जनता पूजनीय मानते, त्यांचं खासगी आयुष्य कसं रंगीतसंगीत आणि वादग्रस्त होतं, याचं उघडवाघडं प्रदर्शन या स्कँडलच्या निमित्ताने झालं. त्यामुळे हे जगातलं सगळ्यात धक्कादायक स्कँडल ठरलं.

प्रोफ्युमो अफेअर राजकीय स्कँडल्सच्या यादीत आजवर नंबर वन राहिलंय. ते उघडकीला आलं १९६३मध्ये. तेव्हापासून म्हणजे अर्धशतक झालं तरी हे प्रकरण ब्रिटिशांना विसरता येत नाही.

ब्रिटनमधले प्रतिष्ठित लॉर्ड विस्काऊंट ॲस्टर यांनी, ॲक्युप्रेशरतज्ज्ञ असलेल्या डॉ. स्टीफन वॉर्ड यांना आपल्या क्लाइव्हडेन इथल्या अलिशान घरी पार्टीसाठी बोलावलं. तिथून या प्रकरणाची सुरुवात झाली. वॉर्ड आपल्याबरोबर एकोणीस वर्षांच्या ख्रिस्टीन किलर हिला घेऊन आला होता. ॲस्टर यांच्या हवेलीतल्या स्विमिंग पूलमध्ये ख्रिस्टीननं कपड्याविना शिरणं, हे पार्टीला जमलेल्या पाहुण्यांमध्ये हलचल निर्माण करणारं होतं. त्यापैकी एक होते जॉन प्रोफ्युमो. पंतप्रधान हेरॉल्ड मॅकमिलन यांच्या सरकारमध्ये ते युद्ध खात्याचे सचिव होते. प्रोफ्युमो आणि ख्रिस्टीन यांना जवळ येण्यासाठी फार वेळ लागला नाही. प्रोफ्युमो यांचं अफेअर सुरू झालं, हा वादाचा मुद्दा नव्हता, तर रशियन गुप्तहेर असल्याचा संशय असलेल्या युजीन इव्हानोव्ह याच्याशीही ख्रिस्टीनचे खास संबंध असल्याचं उघड झालं. ख्रिस्टीनच्या आणखी एका ड्रग डिलर मित्रानं गोळीबार करून तिला भेटण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ख्रिस्टीनचं नाव पोलिसांपर्यंत पोचलं. त्या ड्रग डिलरच्या अटकेनंतर प्रकरण कोर्टात गेलं तरी ख्रिस्टीन काही तिकडे फिरकली नाही. इतकं बिनधास्त ख्रिस्टीन राहू शकली यात तिला कोणीतरी तगड्या राजकीय माणसाचा वरदहस्त लाभलाय हे पत्रकारांना कळणं, हे स्कँडल लोकांसमोर येण्याची सुरुवात ठरली. ब्रिटिश सभागृहात वादळ घोंघावत आलं, त्यावेळी प्रोफ्युमो यांनी ख्रिस्टीनशी आपला संबंध नसल्याचं ठामपणे सांगून टाकलं. पण ब्रिटिश दैनिकांनी सत्य खोदून काढलं. त्यामुळे प्रोफ्युमोंना अफेअर मान्य करावं लागलं. राजीनामाही द्यावा लागला. त्यानंतर काही महिन्यांतच प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणावरून मॅकमिलन यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला. खरं तर प्रोफ्युमो अफेअर हेच त्याचं खरं कारण होतं. थेट पुरावा कधीही उघड झाला नसला तरी या प्रकरणानं संसदेची लाज गेली होती. त्याची भरपाई राजीनाम्यानं देण्याचा प्रयत्न केला गेला.

या प्रकरणाचा त्याहीपेक्षा मोठा फटका बसला तो त्याच्या पुढच्याच वर्षी झालेल्या म्हणजे १९६४च्या निवडणुकीत. हुजूर पक्षाला सणसणीत पराभव पत्कारावा लागला. बारा वर्षांची एकहाती सत्ता गमावावी लागली. या सगळ्यात भयावह काय असेल तर, ख्रिस्टीन आणि डॉ. वॉर्ड दोघांची वाताहत झाली. दोघेही गुन्हेगार ठरवले गेले, पण प्रोफ्युमोंच्या आयुष्यात हे वादळ घडवून आणणारी ब्रिटिश इंटेलिजन्स संस्था मात्र नामानिराळी राहिली.

### ख्रिस्टीन किलर

प्रोफ्युमो प्रकरणाच्या केंद्रस्थानी असलेली ख्रिस्टीन किलर प्रत्यक्षात एक सोनेरी सापळा होता, रशियन गुप्तहेरांना तावडीत पकडण्याचा. पण त्यात बळी गेला तो डॉ. स्टीफन वॉर्डचा. शीतयुद्धाच्या काळात रशिया विरुद्ध इंग्लड, अमेरिका, अन्य राष्ट्र अशी विभागणी झाली. या साऱ्यांनी एकमेकांची हेरगिरी करण्याचा चंगच बांधला. त्यासाठी कोणत्याही थराला जाण्याची तयारी या गुप्तचर संघटनांनी केली होती. रशियन गुप्तहेरांना जाळ्यात पकडण्यासाठी महिलांचा वापर केला जाणं, हे त्यापैकी एक. इंग्लडमध्ये एमआय-५ या गुप्तचर संघटनेनं त्यासाठी डॉ. वॉर्डला नेमलं होतं.

देशभक्तीचं हे काम करण्यास वॉर्ड तयार झाला. अत्यंत उच्चभ्रू वर्तुळात वावरणारा वॉर्ड एकीकडे डॉक्टर म्हणून वावरत होता, तर दुसरीकडे रशियन गुप्तहेरांना जाळ्यात ओढणाऱ्या महिला पुरवण्याचं काम करायचा.

ख्रिस्टीन जन्मली ती मिडल्ससेक्समधल्या उसब्रिजमध्ये. रेल्वेच्या दोन बोगी जोडून बनवलेल्या घरात तिचा जन्म झालेला. मग त्या घरात तिचं काय कोडकौतुक झालं असणार? गरिबी तर होतीच, मग मोठं होण्याची स्वप्नं तिला पडली तर नवल ते कसलं. त्यासाठी ती लवकरच घराबाहेर पडली. पंधराव्या वर्षी स्वप्नांच्या शोधात बाहेर पडलेली ख्रिस्टीन सोहो या ब्रिटनमधल्या एका लोकप्रिय भागातल्या एका दुकानात सेल्सगर्ल म्हणून काम करत होती. १७ व्या वर्षी जिम या लँकनेहिथ नौदलाच्या तळावरील सार्जंटशी तिची ओळख होऊन काही दिवस न जात, तोच तिला दिवसही गेले होते. तिच्या मुदतपूर्व प्रसूतीनं सहा दिवसांतच ते बाळ मरण

पावलं. हा सगळा भूतकाळ मागे ठेवून तिला नव्यानं सुरुवात करायची होती.

दुकानात आलेल्या लोकांना कपडे दाखवत पोटापुरती कमाई करणं, हे काही तिच्या आयुष्याचं ध्येय नव्हतं. त्यासाठी स्वतःचे कपडे उतवरण्याची मात्र तिची तयारी होती. ती संधी नंतर तिला वॉर्डनं दिली.

विसरून जावा असा आपला भूतकाळ मागे टाकत ती बेकर स्ट्रीटवरच्या रेस्तराँमध्ये वेट्रेस म्हणून काम करायला लागली. तिथे आलेल्या मॉरिन ओकॉनरनं तिला कॅबरे क्लबमध्ये काम मिळवून दिलं. पर्सी मरे या मालकाच्या क्लबमध्ये टॉपलेस मॉडेल म्हणून ती वावरू लागली. नवनवीन मुलींच्या शोधात येणाऱ्या वॉर्डची नजर तिच्यावर पडली. तोवर कुठलाही निवासी पत्ता नावावर नसलेली ख्रिस्टीन विम्पोल म्यूमधल्या त्याच्या घरात राहायला गेली. पुढे हेच घर आपल्याला अडचणीत आणेल, याचा अंदाज तिलाही नव्हता ना वॉर्डला.

वॉर्डच्या संगतीत राहिल्यानं शोगर्ल अशी ख्याती मिळवायला ख्रिस्टीनला फार काही करावं लागलं नाही. मात्र वॉर्डच्या फ्लॅटवर राहायला आल्यानंतर त्यानं आपल्या मैत्रिणीलाही तिथे आसरा दिला. त्या मॅंडी राइस-डेव्हीसचं तिच्याबरोबर असणंही प्रोफ्युमो प्रकरणाला वेगळा अँगल देणारं होतं.



मॅंडी राइस-डेव्हीसचे वडील पोलिस होते तर आई अभिनय करायची. वयानं लहान असून तरुण दिसणारी मॅंडी बर्मिंगहॅममधल्या स्टोअरमध्ये मॉडेल म्हणून काम करायला लागली. सोळाव्या वर्षी लंडनला पोचलेल्या मॅंडीनं कार शोमध्ये भाग घेत ब्रिटनमध्ये लोकप्रिय असेल्या मिस ऑस्टीन स्पर्धेचा किताबही मिळवला. सोहोतल्या कॅबरे क्लबमध्ये ती डान्सर म्हणून काम करायची. तिथेच तिची भेट ख्रिस्टीनशी झाली. ख्रिस्टीनचे संबंध त्यावेळी झोपडपट्टी दादा म्हणाव्या अशा गुंड पीटर रॅंचमनबरोबर होते. तो स्त्रियांचा शौकीन होता. ख्रिस्टीनमधून रस संपलेल्या रॅंचमनचं लक्ष मॅंडीकडे गेलं. दोघांना चोरून भेटण्याचं हक्काचं ठिकाणं होतं ब्रायनस्टन म्यूज हे अपार्टमेंट, जे वॉर्डच्या घराजवळच होतं. मग रॅंचमनला भेटायला आलेली मॅंडी ख्रिस्टीनला भेटायला जायची. पुढे ख्रिस्टीनसोबत राहत असलेला वॉर्डच मॅंडीच्या प्रेमात पडला. त्यामुळे मॅंडीनं आपला बोराबिस्तरा थेट वॉर्डच्या घरी आणून टाकला. वॉर्ड आणि या दोघी असं त्रिकूट पार्ट्यांना एकत्र हजेरी लावत असे. पण तिघांचे या पार्ट्यांना जाण्याचे हेतू आणि हिशेब वेगवेगळे होते.

**स्टीफन वॉर्ड**

स्टीफन वॉर्ड हा ऑर्थर इव्हलिन वॉर्ड या खिश्चन धर्मगुरूंचा मुलगा. आपल्या कामामुळे मुलाची रवानगी त्यांनी डॉर्सेटच्या शाळेत केली. तिथे एका वर्गमित्राला मारहाण करून जखमी केल्याचा आरोप वॉर्डवर ठेवला गेला. प्रत्यक्षात त्या घटनेला तो जबाबदार नव्हता. त्याला बळीचा बकरा बनवलं होतं. पुढे आयुष्यभर असंच बकरा बनणं त्याच्या नशिबी आलं आणि त्याचा बळीही दिला गेला.

स्टीफन वॉर्डच्या वडिलांना त्यानं विद्यापीठात शिक्षण घ्यावं, असं वाटत होतं. पण शाळेतल्या त्या घटनेनं लहानग्या स्टीफनला हादरवून टाकलं होतं. त्यामुळे त्यानं थेट लंडन गाठलं. शाळेपेक्षा कामधंदा करण्याच्या उद्देशानं सतरा वर्षांच्या स्टीफननं कार्पेट सेल्समनची नोकरी मिळवली. पुढे शेल कंपनीत तो भाषांतराचं काम करू लागला. काही काळानं पुन्हा सेल्समनगिरी केली. भारतीय चहा, मासिकाचा विक्री एजंट झाला. पण आईच्या आग्रहाखातर तो मिसुरीला पोचला. तिथे कर्कविले कॉलेज ऑफ ऑस्टोपथी अँड सर्जरी हा अभ्यासक्रम पूर्ण केला. जवळपास वैद्यकीय अभ्यासासारखाच हा कोर्स होता. अमेरिकेतल्या त्या अभ्यासक्रमानं त्याच्या नावापुढे डॉक्टर ही पदवी लागली. पण ती पदवी इंग्लडमध्ये कायदेशीर नव्हती. शरीराच्या दुखऱ्या भागाला दाब देत वेदना दूर करण्याचं शास्त्र या अभ्यासक्रमात शिकवत. अनेकदा तो ओहियो आणि मिसिसीपीमध्ये वादळाच्या तडाख्यात सापडलेल्यांवर डॉक्टरी इलाज करत असे. अमेरिकन लोकांच्या दिलदारपणामुळे तो भारावला होता. कारण ब्रिटनमधले लोक आपल्यावर इतक्या सहजपणे प्रयोग करू द्यायला राजी होणार नाहीत, हे त्याला माहीत होतं.

दरम्यान दुसरं महायुद्ध झालं. त्यानंतर स्टीफन पुन्हा

डॉर्सेटमध्ये परतला. तिथे त्यानं ऑस्टोपॅथिक क्लिनिक सुरू केलं. सर्वोत्तम ऑस्टोपॅथ म्हणून अल्पावधीतच तो लोकप्रिय झाला. त्याच्या पेशंटमध्ये विन्स्टन चर्चिलपासून एव्हा गार्डनर या अभिनेत्रीपर्यंत अनेक नामवंतांचा समावेश होता. त्यात लॉर्ड ॲस्टरही होते. तसेच डेली टेलिग्राफचे संपादक कोलिन कूट, एमआय-५चे प्रमुख रॉजर होलिस, कुख्यात गुंड पीटर रॅचमनही होता.

आपल्या ऑस्टोपॅथ असण्याचा फायदा त्याला श्रीमंत आणि पॉवरफुल माणसांमध्ये सहजतेनं वावर करण्यासाठी झाला. तो एक चांगला चित्रकार होता. त्यामुळेच ब्रिटनच्या राजघराण्यातली मंडळी किंवा पुढारी आपलं पोर्ट्रेट काढून घेण्यासाठी हमखास त्याला भेटत.

स्टीफननं एका विख्यात मॉडेलशी लग्न केलं. पण ते फक्त सहा आठवडे टिकलं. वॉर्डला सुंदर पण गरीब मुलींविषयी आकर्षण होतं. त्याच्या मते, अशा मुली आपल्या गरजांबाबत संवेदनाक्षम असतात. याच विचारानं तो त्यांना शोधून श्रीमंत आणि लोकप्रिय लोकांसमोर नेत असे. त्यातल्या काही त्याच्या गर्लफ्रेंडही होत्या तर काही नुसत्याच मैत्रिणी. ख्रिस्टीन ही त्याची अशीच निव्वळ मैत्रीण होती. ती वॉर्डच्या घरात राहायला आली, त्यानंतर काही दिवसांतच मॅंडी. तिच्याशी मात्र तो लग्न करण्याच्या मनस्थितीत होता, पण तशी वेळ प्रोफ्युमो अफेअरमुळे त्याच्या आयुष्यात आलीच नाही.

१९४०च्या आसपास वॉर्डनं टॉर्कमध्ये आपल्या व्यवसायाचा जम बसवला. पण युद्धाचे वारे वाहण्याची चिन्हं दिसत असल्यानं सैन्यात दाखल व्हावं किंवा जखमी जवानांची सेवा करण्याची भावना तीव्र झाली. रॉयल आर्मी मेडिकल कॉर्प्समध्ये स्वयंसेवक होण्याची त्याची तयारी होती. पण त्याची अमेरिकन पदवी तिथे आडवी आली. मग तो रॉयल आर्म्ड कॉर्प्समध्ये दाखल झाला. तो तिथे जवानांच्या पाठीच्या आणि स्नायूंच्या दुखण्यावर इलाज करत असे. कोणीतरी त्याच्या अजब उपचार पद्धतीबाबत तक्रार केली. परिणामी, कोर्ट मार्शल होऊन त्याच्यावर केवळ स्ट्रेचर वाहून नेण्याचं काम सोपवलं गेलं.

मार्च १९४४मध्ये वॉर्डला ब्रिटिशांच्या अमलाखाली असलेल्या भारतात धाडण्यात आलं. तेव्हा त्यानं महात्मा गांधींच्या डोकं आणि मानदुखीवर उपचार केल्याचं सांगितलं जातं. तसा उल्लेखही विकीपीडीयात सापडतो. खरं तर एका ब्रिटिश माणसानं आपल्यावर उपचार करावेत, याविषयी गांधींजींना खेद वाटत होता. पण वॉर्डशी भेट ही त्यांच्या



आयुष्यातील महत्त्वाची होती, अशा शब्दांत गांधींजींनी त्याचं कौतुक केलं होतं. खुद्द महात्माजींच्या तोंडून कौतुक ऐकलेल्या वॉर्डला पुढच्या आयुष्यात फक्त टीकेचा धनी व्हावं लागलं.

खरं तर वॉर्ड एमआय-५ नं सोपवलेलं काम करत होता. ॲस्टर हे ब्रिटनमधलं नामवंत राजकीय घराणं होतं. त्यांच्या मालकीच्या क्लाइव्हडेन या वास्तूत आयोजित केलेल्या पार्टीला तो दोन महिलांसह आले होते, तेही एका मिशनवरच.

क्लाइव्हडेन ही वास्तू कधीकाळी नॅन्सी अस्टर यांच्या मालकीची होती. १९२०-३०च्या दशकात राजकीय नेत्यांच्या बौद्धिक चर्चांचा तो हक्काचा अड्डा होता. बकिंगहॅमशायरमधल्या टॅप्लोमध्ये क्लाइव्हडेन नावाची हवेली आहे. थेम्स नदीच्या काठी उभारलेली ही इमारत म्हणजे इटालियन वास्तुरचनेचा अप्रतिम नजराणाच. ब्रिटिश राजघराण्याचं वस्तीचं हे ठिकाणं. १८९३मध्ये श्रीमंत अमेरिकन विल्यम वॅलडोर्फ ॲस्टर यांनी खरेदी केल्यानंतर ते काही काळ तिथे राहायला आले. त्यांनी आपला मुलगा वॅलडोर्फकडे त्याची मालकी सोपवली. त्यानं नॅन्सी लॅंगहॉर्नशी विवाह केला होता. ॲस्टर आपल्या घरात अनेक पाहुण्यांची खातिरदारी करत. चार्ली चॅप्लिनपासून महात्मा गांधीपर्यंत अनेकजण या वास्तूत राहिले. या वास्तूवर कायम हुकूमत राहिली ती नॅन्सी यांचीच.

नॅन्सी लॅंगहोर्न विस्काऊंट्स ॲस्टर या ब्रिटनच्या पहिल्या महिला खासदार. त्या जन्मानं अमेरिकन होत्या. त्यांचं राजकीय स्थान इतिहासानं नोंद घ्यावी असं होतं तर विख्यात साहित्यिक जॉर्ज बर्नाड शॉ यांची खास मैत्रीण ही त्यांची ओळखही नोंद

घ्यायला लावणारी होती.

अनेक वर्षं राजकारणात रमलेल्या आणि लोकप्रिय झालेल्या नॅन्सी यांना तीसनंतरचं दशक त्रासदायक गेलं. त्यांच्या पहिल्या पतीपासून झालेल्या मुलाला समलैंगिकतेच्या आरोपावरून अटक झाली होती. या प्रकरणानं तोल गेलेल्या नॅन्सी यांनी आपला मुलानं दारूच्या नशेत असं कृत्य केलं हे सांगण्याच्या नादात, इंग्लडची क्रिकेट टीम ऑस्ट्रेलियाकडून हरण्याचं कारण दारू असल्याचं बोलून गेल्या. त्यावर झालेलं वादळ शमत नाही तोच प्रोफ्युमो अफेअर त्यांच्याच क्लाइव्हडेन इस्टेटीत घडलं. ती पार्टी त्यांच्या मुलानं आयोजित केलेली होती.

त्या पार्टीला ब्रिटनच्या राजकारणातली अत्यंत वजनदार माणसं हजर होती. त्याहीपेक्षा तिथे रशियन नौदल अधिकारी युजीन इव्हानोव्ह यांना आमंत्रित केलेलं होतं. ब्रिटनच्या गुप्तचर संघटनेला, इव्हानोव्ह ब्रिटनमध्ये हेरगिरी करत असल्याचा संशय होता. त्याला एखाद्या सुंदर तरुणीच्या जाळ्यात ओढून खरं काय ते शोधण्याचा डाव शिजलेला होता. त्यासाठी लावलेला सापळा होता ख्रिस्टीन किलरचा.

डॉ. वॉर्ड आपल्यासोबत ख्रिस्टीनला क्लाइव्हडेनमध्ये घेऊन आला तेव्हा त्याच्याबरोबर आणखीही एक तरुणी होती. दोघींपैकी एकीनं इव्हानोव्हला आपल्या जाळ्यात ओढायचं होतं. इव्हानोव्हचं लक्ष वेधून घेण्यासाठी ख्रिस्टीननं आपल्या अंगावरचे कपडे उतरवून थेट स्विमिंग पूलमध्ये स्वतःला झोकून दिलं. ब्रिटनच्या सन्मानाची झूल मिरवणारी अनेक व्यक्तिमत्त्वे तिथे होती. पण ख्रिस्टीननं फेकलेल्या त्या जाळ्यानं सगळ्यांची ती झूल उतरवली. तिनं फेकलेल्या जाळ्यात

### सिनेमा, नाटक, संगीत आणि साहित्य...

वॉर्डच्या मृत्यूचा कोणी उघड निषेध केला नाही. पण त्याच्यावर अन्याय झाल्याचं सगळ्यांनीच मूकपणे मान्य केलं. म्हणूनच पुढे सिनेमा, पुस्तकातून वॉर्डविषयी सहानुभूती व्यक्त केली गेली. १९८९मध्ये आलेल्या 'स्कँडल' सिनेमात वॉर्डची भूमिका जॉन हर्ट यानं केली होती. सिनेमासाठी 'नथिंग हॅज बिन प्रुव्हड' हे गाणं समाविष्ट केलं होतं. ते गाणं ब्रिटनमध्ये भलतंच पॉप्युलर ठरलं होतं. १९९७मध्ये आलेल्या 'लंडन ब्ल्यूज' कादंबरीत वॉर्ड होता तर 'अ लिटील व्हाइट डेथ' यातही त्याच्यावर बेतलेलं पात्र होतं. थॉमस हाइड या ब्रिटिश संगीतकारानं 'द मॅन स्टीफन वॉर्ड' नावाची सांगीतिका लिहिली. २०१३मध्ये याचवर्षी विख्यात संगीतकार अण्ड्रू लॉइड वेबर या प्रकरणाशी संबंधित 'स्टीफन वॉर्ड द म्युझिकल वेस्ट एण्ड'वर सादर करणार आहेत.

आणखीही एक जण अडकला, त्याचं नाव होतं जॉन प्रोफ्युमो.

### जॉन डेनिस प्रोफ्युमो

जॉन डेनिस प्रोफ्युमो हे ब्रिटनमधले लोकप्रिय राजकारणी असले तरी त्यांचं मूळ इटलीतलं. राजघराण्याच्या सेवेसाठी त्यांच्या घराण्याला मानमरातब प्राप्त झाला होता. कायद्याचा अभ्यास केलेले प्रोफ्युमो रॉयल आर्म्ड कॉर्प्समध्ये सेकंड लेफ्टनंट होते. लष्करातून बाहेर पडले तोवर ते ब्रिगेडियरच्या पोस्टपर्यंत पोचले होते. त्यानंतर ते राजकारणात उतरले.

राजकारणाच्या अनेक शिड्या ते सावधपणे आणि यशस्वी होत चढत होते. ब्रिटनमधल्या त्यांच्या लोकप्रियतेचे किस्से लोकांच्या तोंडी होते. अशातच त्यांनी प्रसिद्ध अभिनेत्री व्हॅलेरीशी विवाह केल्यानं प्रोफ्युमोंच्या लोकप्रियतेला ग्लॅमरही मिळालं. त्यामुळे प्रसिद्धीमाध्यमांचा झोतही त्यांच्यावर राहत असे.

प्रोफ्युमो क्लाइव्हडेनमध्ये ख्रिस्टीनला भेटल्यानंतर लगेचच त्यांच्यात शारीरिक संबंध आले. पण ख्रिस्टीन क्लाइव्हडेनमध्ये येण्याचं कारण होतं, इव्हानोव्ह. तिनं त्यालाही गाठलं. एकाच वेळी ती दोघांशी संबंध राखून होती. यात अफेअर नावाची गोष्ट केवळ शारीरिक संबंधांपुरती होती. कारण खरंच तिचं त्यापैकी एकावर जरी खरं प्रेम असतं तरी पुढचं रामायण घडलं नसतं.

प्रोफ्युमो ख्रिस्टीनला भेटत होते, ही गोष्ट काही दिवसांतच कुजबुजीचा विषय ठरली. कारण राजकीय वर्तुळात त्याची चर्चा व्हायला लागली. काही जणांना हे प्रकरण म्हणजे धोक्याची घंटा वाटायला लागली. ख्रिस्टीनच्या इव्होनोव्हशी असलेल्या अफेअरमुळे राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात येण्याची शक्यता आहे, अशी भीती व्यक्त होऊ लागली. प्रोफ्युमो यांनी लगेचच एक पत्र पाठवून, यापुढे न भेटण्याचं ख्रिस्टीनला कळवून टाकलं. प्रोफ्युमोंनी घेतलेला सावध पवित्रा लग्न टिकवण्यापेक्षा राजकीय बस्तान डळमळू नये, यासाठी होता. प्रोफ्युमोंनी हे प्रकरण झाकलं जावं यासाठी अगदी चिडीचुपीनं हे केलं. पण ख्रिस्टीनच्या आणखी एका प्रियकरानं केलेल्या गोळीबाराने प्रोफ्युमो अफेअरचा बॉम्ब फुटलाच.

प्रोफ्युमो आणि किलर यांच्याशी कथित अफेअर सुरू होतं त्याचं काळात तिचे येव्हगेनीशीही संबंध होते, पण त्याच वेळी जॉनी एजकॉम्बशी या ड्रग डीलरलाही तिनं जवळ केलं होतं. त्यासाठी तिनं वॉर्डचं घरही सोडलं होतं. १४ डिसेंबर १९६२ च्या रात्री ख्रिस्टीन मॅंडीला भेटायला आली. त्याचवेळी जॉनीने तिला भेटण्यासाठी वॉर्डच्या फ्लॅटमध्ये शिरण्याचा

प्रयत्न केला. किलर दार उघडत नाही हे पाहून त्यानं दारावर गोळी झाडली. घरात घुसण्याचा प्रयत्न आणि गोळीबाराच्या आरोपाखाली एजकॉम्बला पोलिसांनी तात्काळ अटक केली. ताबडतोब प्रकरणही सुनावणीला घेतलं गेलं. जिच्यासाठी आणि जिच्यामुळे हे घडलं ती ख्रिस्टीन सुनावणीसाठी मात्र न्यायालयात हजर राहिली नाही. त्यामुळे आधीच कुजबुजत असलेलं प्रोफ्युमो– ख्रिस्टीन प्रकरण जाहीर व्हायला निमित्त झालं इतकंच.

खरं तर प्रोफ्युमो–किलर प्रकरण त्या घटनेपूर्वीच पत्रकारांपर्यंत पोचलं होतं. ब्रिटिश नेत्यांच्या खासगी आयुष्याचा आब राखण्याची परंपरा पत्रकारांना पाळावी लागली होती. शिवाय असं काही छापल्यास कायदेशीर कटकटी निर्माण होण्याची शक्यताही होतीच. त्यामुळेच १९६३पर्यंत हे प्रकरण लपून राहिलं. पण आपल्या प्रतिस्पर्ध्याचं वस्त्रहरण करण्याची संधी सोडेल तो विरोधक कुठला!

प्रोफ्युमो–किलर यांच्या कथित प्रेमप्रकरणामुळे देशाची सुरक्षाच धोक्यात येत असल्याचं मजूर पक्षाचे खासदार जॉर्ज विग यांनी भर सभागृहात सांगितलं. त्यानंतर हे प्रकरण नको त्या पद्धतीनं उघडं पडलं. आता हे प्रकरण प्रसिद्धीमाध्यमांतून रंगणार अशी चिन्हं दिसताच, घाईघाईनं प्रोफ्युमोंना ख्रिस्टीनशी संबंध नसल्याचं जाहीर करावं लागलं. शिवाय असं काही वर्तमानपत्रांनी छापलंच तर कोर्टात खेचण्याचा इशारा त्यांनी दिला. पण भर सभागृहातच वाच्यता झाल्यानं प्रोफ्युमोंचा तो इशारा वर्तमानपत्रांनी जुमानला नाही. या गदारोळात पंतप्रधान मॅकमिलन यांची इभ्रत पणाला लागली. परिणामी आपण सभागृहात खोटं बोलल्याची जाहीर कबुली देण्यासाठी प्रोफ्युमोंवर दबाब आणला गेला. ५ जून १९६३ रोजी प्रोफ्युमोंनी तसं कबूलही केलं. आपल्या पदाचा राजीनामाही दिला. आपल्या अफेअरची जाहीर कबुली देण्याआधी त्यांनी पत्नीकडे त्याची कबुली दिली. तिनं त्यांना मोठ्या मनानं माफ केलं. असाच मनाच्या मोठेपणाचा इतिहासात पुढे क्लिंटन–मोनिका प्रकरणाच्या वेळी हिलरी क्लिंटन यांनी दाखवला.

खरं तर प्रोफ्युमोंनी देशाला कोणत्याही संकटात टाकल्याचं कधी सिद्ध झालं नाही. पण त्यावेळी त्याकडे कोणीही लक्ष दिलं नाही. उलट हे प्रकरण तापवत ठेवत मजूर पक्षानं पुढील निवडणुकीसाठी त्याचा वापर करून घेतला. अनेकदा या प्रकरणामुळेच हुजूर पक्षाची सत्ता गेली, असं बोललं जातं. प्रत्यक्षात पंतप्रधान मॅकमिलन यांची अपयशी आर्थिक धोरणं त्याला अधिक जबाबदार होती. पण प्रोफ्युमो



अफेअर जाहीर होणं इतकं खळबळजनक ठरलं की मॅकमिलन यांचा राजीनामा आणि हुजूर पक्षानं सत्ता गमावण्याच्या चर्चेचा निष्कर्ष तिथवर येऊन थांबतो.

प्रोफ्युमोंनी जून १९६३ मध्ये जेव्हा राजीनामा दिला तेव्हा ताबडतोबीनं एक काम केलं गेलं. ते म्हणजे ख्रिस्टीनला प्रोफ्युमोंच्या संपर्कात आणण्यास कारणीभूत असलेल्या डॉ. वॉर्डला अटक. १९५६च्या लैंगिक कायद्यान्वये त्याच्यावर जानेवारी १९६१ आणि जून १९६३या दरम्यानच्या काळात

**क्लाइव्हडेनचा रोमांचक इतिहास**

नॅन्सी यांच्या पालकांनी अमेरिकन यादवी युद्धाच्या काळात हलाखीचं आयुष्य घालवलं होतं. पण नॅन्सीच्या जन्मानं जणू त्यांचा भागोदय झाला. काही काळातच ते मालामाल झाले. नॅन्सी यांच्या चारही बहिणी त्यांच्या सौंदर्यानं उच्चभ्रू वर्तुळात लोकप्रिय होत्या. अठरा वर्षांच्या असताना नॅन्सीचा विवाह झाला तो रॉबर्ट शॉ यांच्याशी. पण ते लग्न म्हणजे त्यांच्या आयुष्यातली भयावह आठवण ठरली. शॉ दारूच्या नशेत नॅन्सीवर अनेकदा बलात्कार करायचे. त्याचं लग्न चार वर्षं टिकलं, पण या काळात त्या अनेकदा माहेरी निघून जात. कालांतरानं घटस्फोट झालेल्या नॅन्सी कायमच्या माहेरी परतल्या. एकदा फिरण्यासाठी म्हणून त्या लंडनला आल्या आणि तिथेच रमल्या. नॅन्सी यांना तिथे रमलेलं पाहून वडिलांनी त्यांना तिथेच राहण्याचा आग्रह केला. त्यांच्याबरोबर तीन बहिणीही तिथे पोचल्या. नॅन्सी यांचे दुसरे पती झाले ते वालडोर्फ ॲस्टर.

ॲस्टरही त्यांच्याप्रमाणे अमेरिकेतच जन्मलेले. वयाच्या बाराव्या वर्षापासून ते इंग्लडमध्ये राहायला आले होते. जसे ते दोघे अमेरिकन होते, तसे ते दोघेही एकाच तारखेला जन्मलेले होते. त्यांच्यातल्या सारख्याच आवडी, आयुष्यातल्या अनेक गोष्टींमध्ये चमत्कार वाटावं असं साम्य होतं. दोघांचं लग्न झाल्यावर ते क्लाइव्हडनमध्ये राहायला आले.

दलालीची कमाई केल्याचा आरोप ठेवण्यात आला. २२ जुलै रोजी सुनावणीला सुरुवात झाली. त्यानंतर लगेचच एमआय-५नं आपल्याला वॉर्डनं प्रोफ्युमो अफेअरविषयी माहिती दिल्याचा इन्कार केला.

सुनावणीवेळी आणखी अन्य दोन शरीरविक्रय करणाऱ्या महिलांची दलाली वॉर्डनं खाल्ल्याचा आरोप ठेवण्यात आला. त्या दोघींनी त्याच्यावरील आरोप मागे घेतले तेव्हा या सगळ्यामागे काय षडयंत्र रचलं हे जनतेला समजलं. पण वॉर्ड हार मानायला तयार नव्हता. पण अंतिम सुनावणीच्या वेळी सरकारी महिला वकीलानं केलेल्या शाब्दिक हल्ल्याने तो घायाळ झाला. इतका, की सुनावणीच्या त्याच रात्री त्यानं झोपेच्या गोळ्या घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. तो कोमात गेला.

प्रोफ्युमो अडचणीत आले तेव्हाही वॉर्डला आपण ब्रिटिश गुप्तहेर खात्याला मदत करतोय, त्यामुळे आपल्याला वाचवण्याचे अप्रत्यक्षपणे प्रयत्न होतील असं वाटलं होतं. प्रत्यक्षात सरकारनं आपली लाज राखण्यासाठी वॉर्डवर ख्रिस्टीन आणि मँडीचे दलाल असल्याचा आरोप लावला. त्यानंतर सगळेच त्याला टाळू लागले. एमआय-५नं तर जाहीरपणे त्याच्याविरोधात बोलून त्याला संकटात ढकललं.

कोमात गेलेल्या वॉर्डची बाजू मांडणारा कोणी नसल्यानं सुनावणीचा पुढचा भाग पार पडून ज्युरींकडे निर्णय सोपवला. ज्यावेळी ज्युरींनी निर्णय सुनावला तेव्हाही वॉर्ड कोमातच होता. ३१ जुलैला त्याला दोषी ठरवण्यात आलं. तो पुन्हा कोर्टात येईल, या अपेक्षेनं तो पूर्ण बरा होईपर्यंत सुनावणी तहकूब झाली. पण त्यानंतर तीनच दिवसांनी वॉर्डचं निधन झालं आणि त्यानंतर दोन दिवसांनी त्याच्यावर कोणतीही शिक्षा न सुनावता हे प्रकरण त्याच्यासारखंच दफन झालं. प्रत्यक्षात ख्रिस्टीनच्या पैशांवर तो जगत नव्हता, तर तीच त्याच्या पैशांवर जगत होती, हे सत्य सांगण्यासाठी तो कधीच उठू शकला नाही.

ख्रिस्टीननं मात्र सगळ्या जगाला प्रोफ्युमो आणि तिचं अफेअर सांगायचं ठरवलं. पैशांच्या मोबदल्यात स्वतःची कहाणी विकायचं ठरवलं. ती छापली जाऊ नये, असा खटाटोपही केला गेला. पण सत्य लोकांसमोर आलंच. इतकंच नाही तर त्यांच्या आयुष्यावरचा सिनेमा काढण्याची तयारी सुरू झाली. त्यासाठी तिचं फोटोसेशनही केलं गेलं. ख्रिस्टीनचा त्यातला एक फोटो जगभरात लोकप्रिय झाला. एका खुर्चीवर कपड्याविना बसलेली ख्रिस्टीन पाहून लोकांमध्ये खळबळ माजली तर ब्रिटिश राजकारणाचं पित्त खवळलं आणि तो सिनेमा कधी आलाच नाही. अधूनमधून या प्रकरणाची याद जागवत राहणं हेच ख्रिस्टीनच्या नशिबी आलं.

ख्रिस्टीनची मैत्रीण मँडीलाही वॉर्ड आणि ख्रिस्टीनवर चालवलेल्या खटल्यामुळे बदनामीला तोंड द्यावं लागलं. या प्रकरणानंतर मँडीनं ज्यू धर्म स्वीकारला. तिनं इस्रायली उद्योगपती रफ शाऊलीशी विवाह केला. तेल अवीवमध्ये तिच्या नावानं त्यानं नाइट क्लबही सुरू केलेत. मँडीनं गायिका म्हणूनही नशीब आजमावून पाहिलं, पण त्यात तिला कधी यश आलं नाही.

प्रोफ्युमो यांनी आपल्या पुढील आयुष्यात या प्रकरणाविषयी चकारही काढला नाही. अगदी 'स्कँडल' नावाचा या प्रकरणावरचा सिनेमा रिलीज झाल्यावरही ते शांत राहिले. आपल्या अफेअरमुळे बदनाम झालेल्या प्रोफ्युमोंनी राजीनाम्यानंतर धर्मादाय संस्थेत चक्क स्वच्छतागृह साफ करून आत्मक्लेशाचा मार्ग पत्करला. पुढची चाळीस वर्षं ते तेच काम करत होते आणि जणू विजनवासात जगत होते. आपल्या आधीच्या राजकीय संपर्कावर त्यांनी त्या संस्थेसाठी बराच निधी जमवून दिला. त्यांची पत्नी वॅलेरी हॉब्सन जी अभिनेत्री होती, तिनंही त्यांच्यासह धर्मादाय कामासाठी वाहून घेतलं. १९७५मध्ये जेव्हा प्रोफ्युमो यांना 'ऑर्डर ऑफ द ब्रिटिश एम्पायर'चे कमांडर म्हणून नेमलं तेव्हा त्यांना पुन्हा सन्मानानं जगण्याची संधी देण्याचा तो प्रयत्न असल्याचं मानलं गेलं. मार्गारेट थॅचर यांच्या सत्तराव्या वाढदिवसाला त्यांना आमंत्रित करण्यात आलं. पण ते क्वचितच सार्वजनिक कार्यक्रमांना हजर राहत. ९१ वर्षांचं दीर्घ आयुष्य त्यांच्या वाट्याला आलं. पण काही आठवड्यांच्या अफेअरनं ते कलंकित झालेलं होतं.

प्रोफ्युमो अफेअर घडल्यानंतर क्लाइव्हडेन हे ठिकाण वारंवार चर्चेत राहिल्यानं बदनाम झालं. सत्तरच्या दशकात स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियाकडे त्याचा ताबा गेला. आता त्याची मालकी नॅशनल ट्रस्टकडे गेली असून त्याचं आता पंचतारांकित हॉटेल झालंय. आज बॉलिवूडच्या सिनेमातून किंवा हौशी पर्यटक म्हणून पाहिलेल्या या वास्तूची रचना मोठी आकर्षक आहे. पण याच इमारतीतल्या एका घटनेनं घडवलेलं नाट्य ब्रिटनच्या राजकारणाला कायम अस्वस्थ करून सोडतं.

**अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१ ५०१
aparna.patil1@gmail.com

# जन्म कादंबरीचा

स्मिता भागवत

असह्य देहदाहाने त्रस्त तानसेन रानोमाळ भटकत होता. दाढीमिशांचे जंगल वाढलेला, काशायवर्णी ढगळ वस्त्रे परिधान केलेला, तानसेन नव्हे तर यात्रेकरू साधू वाटत होता. त्याची पुष्टीमार्गी वल्लभाचार्यांची भेट घडली. या आधीही त्यांनी त्यास कुलदैवताचे दर्शन घेण्याचा सल्ला दिला होता. पण तो ते जुळवू शकला नव्हता. वल्लभाचार्यांनी तिथे हरिदासस्वामींचे शिष्य – म्हणजे तानसेनच्या गुरुबंधूंचे वास्तव्य आहे, असे सांगून पुन्हा तोच सल्ला दिला. म्हणून तो वडनगरला गेला नि त्यास अलौकिक गुर्जर कन्यांचे दर्शन घडले. त्याने नम्र याचना केली, 'माई, म्हारो दीपक बुझाओ!'

घन घन बरसी जलधारा... ही ऐतिहासिक कांदबरी प्रकाशित करण्याचा आनंद अनोखा आहे. आनंदास अनोखा म्हणण्यास कारणे दोन! काही प्राण्यांचा गर्भवास कमी तर काहींचा अधिक असतो. मांजरीचे पिलू ६४ दिवसांनी तर मानवी मूल सुमारे नऊ महिन्यांनी जन्मते. हत्तीचे पिलू मात्र जन्मण्यास दीड वर्षाहून अधिक काळ – ६१६ दिवस – गर्भवास सोसते. साहित्यकृतींचेही तसेच असते. काही कृती वेगाने पूर्ण होतात तर काही अडचणींच्या निबिड जंगलातून वाट काढत धीम्या गतीने पुढे सरकतात. ही कृती तशी! त्रेसष्ट साली या कथावस्तूचे बीज माझ्या मनोभूमीत पडले. कादंबरीची पार्श्वभूमी ऐतिहासिक असल्याने सविस्तर माहिती मिळाल्याविना लेखन होणार नव्हते. माहिती जमवण्यात रास्त आणि अनपेक्षित आपत्तींमुळे फार वेळ गेला. इतका की एकविसाव्या शतकाचे पहिले दशक संपले तरी कादंबरीचे लेखनच सुरू झाले नाही. २०१३ साली म्हणजे बीजारोपणानंतर पन्नास वर्षांनी कादंबरी पूर्ण झाली. म्हणून हा आनंद अनोखा!

दुसरे म्हणजे हा इतिहास समृद्ध गुर्जर भूमीवर घडल्यामुळे ती सविस्तर माहिती असणारे मराठी लोक विरळा! जीवनाची पहिली चाळीस वर्षे मी गुजरातेत होते. म्हणून मातृभाषा आणि राज्यभाषेत मी सारख्या सहजतेने व्यक्त होते. मराठी समाजाचे गुण गुजरात्यांना नि गुजरातच्या अभिमानास्पद बाबी मराठी लोकांना सांगण्याचा मला छंद आहे. ज्ञानेश्वरादी भावंडे, समर्थ रामदास–शिवाजीमहाराज सख्य आणि बाजीराव– मस्तानीची अनोखी प्रेमकहाणी मी गुजरातीत लिहिली. त्याच भावनेने गुर्जर भूमीवर घडलेली एक अमर कहाणी मला मराठी समाजास सांगावीशी वाटली.

हे अलौकिक मेघ गुजरातच्या धरणीवर बरसले तरी सम्राट अकबर, बिरबल, तानसेन, वैष्णव भक्तश्रेष्ठ नरसिंह महेता, (मराठीत मेहता लिहीत असले तरी या नागर संताचे आडनाव महेता आहे.) पुष्टीमार्गी वल्लभाचार्य, काहीशी मीराबाई .... अनेक दिग्गजांशी या कथानकाचा पदर जुळला आहे. फितुरी या जुनाट रोगाशीही! आपल्याकडे एका अलौकिक

व्यक्तिमत्त्वापाठी 'सूर्याजी पिसाळची' जमात जन्मते. ती निष्ठावंतांच्या उत्तम कार्यावर पाणी फिरवते. या कहाणीतही तसे आहे. प्रत्येक गुणी व्यक्ती आपल्या दरबारातच असावी, हा अकबराचा हट्टाग्रह, तरी दरबारात गुणांचा तिरस्कार करणाऱ्यांची गर्दी! बहुतेक सरदार स्त्री सौंदर्याची अभिलाषा बाळगणारे भोगलोलुप! दुसरीकडे यवनांची डाळ शिजू न देणारी शूर नागर प्रजा! छोट्या मोहास वश होऊन, यवनांना वश होऊन स्वजनांची वाट लावणारे फितूर! प्रत्येक सत्यानाशास कुणी फितूर जबाबदार असणे, हे या देशाचे प्राक्तन! डूख धरणाऱ्या कपटी स्त्रीची इच्छा पूर्ण करण्यासाठी तिच्या मोहवश नवऱ्याने महन्मंगल काव्य ठरावे अशी लोभस कहाणी करुणांताने संपवली. पण हा कादंबरीचा विषय, नागर समाजाची क्षमता अनोखी का, या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या उत्पत्तीत शोधणारा! हे कथानक निवांत फुलवण्याचे. ते चार-पाच ओळींत उरकणे म्हणजे पंचपक्वान्नाच्या ताटातील सुग्रास पदार्थांच्या चवीचा आनंद न लुटता व्हिटॅमिनच्या गोळ्यांवर समाधान मानणे होय.

माझा जन्म आणि शिक्षण गुजरातच्या बडोद्यात. डोळस संगोपन करणाऱ्या, मुलगी असल्याचे बुजगावणे धरून कोणतीही संधी न नाकारणाऱ्या पुरोगामी घरात! स्वातंत्र्यपूर्व काळात गुजरातच्या बऱ्याच भागांत मराठी गायकवाड सरकारची सत्ता होती. तिसऱ्या सयाजीराव महाराजांनी बडोद्यात मराठी-गुजराती सद्‌गुणांचा मिलाफ घडवला. सयाजीराव महाराजांच्या कारकिर्दीत जन्मले नसले तरी त्यांच्या नवमतांचा ठसा असलेल्या संस्कारनगरीत वाढले. पणजोबा सयाजीराव महाराजांच्या सैन्याचे कप्तान! म्हणून इतरांना अटोकाट प्रयत्नांती प्राप्त होणारी वा तरी हाती न येणारी माहिती, प्राप्त करण्याची संधी माझ्यासाठी जन्मदत्त ठरली.

आठवतो मला इवल्या डोळ्यांत कुतूहलाचा सागर भरून जगाचे निरीक्षण करण्याचा बालपणीचा सुखाचा काळ! विख्यात तानसेनचे नाव त्रिलोचन मकरंद पंड्या असून सारे त्यास प्रेमाने रामतनू म्हणत, हे कळले. यात मी अभिमान बाळगावा असे काही नाही, हे न कळण्याचे वय! कोणत्याही चांगल्या घटनेचा स्वतःशी बादरायण संबंध जोडून अभिमान बाळगण्याचे! ७ वर्षांच्या वयास मी गायन शिकू लागले. तानसेनचे चरित्र वाचनात आले. तानसेन गुजराती असणे भाबड्या मनास मोहक वाटले. जन्मतः कुणी लहान-महान नसते, ही जाणीव नसल्याने तानसेन आपल्याप्रमाणे ब्राह्मण होता, हेही अभिमानास्पद वाटले होते, तेव्हा!

पुढे समजमंजुषा जड होऊ लागली. कॅलेंडरच्या पानाबरोबर भाबडेपणाचे पापुद्रे उडू लागले. त्यात कळले की एकदा दीपक राग आळवल्यामुळे तानसेनच्या देहात असह्य दाह उद्दिपित झाला. तो त्यास मरणपंथास नेता झाला. पण दोन गुर्जरकन्यांनी मेघमल्हार आळवून तो दाह शमवला. हे आक्रित सिद्ध करणाऱ्या या तरुणींना मेघमल्हार वारशात मिळाला होता. त्यांचे पणजोबा भक्तश्रेष्ठ नरसिंह महेता यांनी मेघमल्हार रागाची उपासना केली होती. मराठी समाज काठेवाड म्हणतो त्या सुराष्ट्र वा सौराष्ट्र प्रदेशात एकदा असह्य दुष्काळ पडला. उन्हाच्या तीव्र झळा गुरेढोरे आणि प्रजेस मारत होत्या. नावाआधी 'रा' उपाधी लावणारे जुनागढचे राज्यकर्ते, अतिप्रेमळ नि प्रजापालक. कट्टर शैव. सागरतीरावरील वेरावळचा सोरठी सोमनाथ त्यांचे दैवत. 'त्या'वेळी गादीवर 'रा'नवघण जुनागढच्या गादीवर विराजमान होते. प्रजापालनास आद्य कर्तव्य समजणारे. म्हणून स्वतः शैव असूनही त्यांनी वैष्णव भक्त नरसिंह महेता यांना या संकटातून वाचवण्यासाठी साकडे घातले. 'आपण शिव आणि विष्णूचे सख्य सिद्ध करू,' असे म्हणत भक्तश्रेष्ठांनी अनोखे मेघमल्हार व्रत आरंभले. मेघमल्हार गुणगुणत ते कलशात पाणी भरू लागले. नगरातील स्त्रिया त्या पाण्याने शिवाचे अभिषेकपात्र भरू लागल्या. मेघमल्हारचे सूर भरलेल्या पात्रातून शंकरावर अभिषेक सुरू झाला. सतत सात दिवस! आणि निरभ्र आकाशात अचानक काळे मेघ दाटले. पाऊस पडण्याची सुतराम लक्षणे नसताना त्यांनी मुसळधार पाऊस पाडण्याचे आक्रित घडवले, अशी गुजरातेत अख्यायिका आहे.

माझ्या मनात अधिक जाणण्याची आस! प्रसंगी ओठी येणारी. पण तो काळ औपचारिक अभ्यासाचा. कॉलेजच्या पहिल्या वर्षात असताना मला काकांनी (गायकवाड राजपुत्रांचे प्रशिक्षक स्व. वसंतराव कप्तान) स्थानिक वृत्तपत्रातील एक बातमी दाखवली. ते कात्रण जपावे, अशा कात्रणांचा समूह इच्छित माहितीकडे नेईल; हे सांगून. त्या क्षणी माझ्या मनात कादंबरीकाराचे बीज पडले असावे. त्या बातमीचा मथितार्थ असा...

"तानसेनवर अकबराचे अतिप्रेम! सरदारांच्या मनात हेवा निर्माण करणारे. कुणी तानसेनास संगीतात हरवले तर हे प्रेम घटणार! त्यासाठी सरदारांनी केलेले सारे प्रयत्न वाया गेले. तानसेन मेला तरच हा तिढा सुटेल, ही खात्री पटली असताना, मलिका-ए-हिंदोस्ताँ जोधाबाईच्या दासीकडून एक अतर्क्य घटना कळली- 'उज्जैनीच्या राजा विक्रमास दीपक रागाचे वरदान होते. तो दीपक राग आळवून दीपक प्रज्वलीत करत असे. वरदान नसलेला सिद्धहस्त गायकही ते करू शकतो; पण

तसे करणाऱ्याच्या देहात गूढ उष्णता प्रकटते. तिचे शमन फक्त सिद्धहस्त गायकाने मेघमल्हार गाऊन पाडलेल्या पावसाच्या जलधारांत असते. तशा पावसात स्नान करणे न जमल्यास, देहदाह असह्य होऊन दीपक राग गाणारा गायक झिजून झिजून मरतो.' 'साप मरे और लकडीभी न तुटे' अशी ती माहिती ऐकून कपटी सरदार रंगात आले. त्यांनी अकबरास समर्थ गायक दीपक राग गाऊन दीपक प्रज्वलीत करतो, इतकेच सांगून तानसेनच्या सामर्थ्याची परीक्षा घेण्यास भरीस घातले. संभाव्य दुष्परिणाम न सांगता! तानसेनने दीपक प्रज्वलीत केले तर त्यास बक्षीस द्यावे, असे सांगण्याचा शहाजोगपणा करून! अकबराने तानसेनास ते सांगताच त्याने अशा गायकास कोणत्या दुष्परिणामास सामोरे जावे लागते ते सांगून नकार दिला. सरदारांनी तो आपली अक्षमता लपवत आहे, असा कालवा केला. अकबरास आपल्या दरबारी असलेले चमत्कृतीपूर्ण कर्तृत्व सिद्ध करण्याचा सोस. स्वभावात भिनलेला राजहट्ट! तानसेनास ही किमया करावी लागली. पण देहात गूढ उष्णतेस उधाण आले. कपटी सरदारांचा आनंद गगनात मावेना. अकबरास सरदारांचे हे कपट कळले. मेघमल्हार आळवून पाऊस पाडण्याची क्षमता असलेला कलाकार दरबारात नसल्याने, त्यास अपार खिन्नता आली. पण ही पश्चात् बुद्धी वांझ ठरली.

असह्य देहदाहाने त्रस्त तानसेन रानोमाळ भटकत होता. दाढीमिशांचे जंगल वाढलेला, काशायवर्णी ढगळ वस्त्रे परिधान केलेला, तानसेन नव्हे तर यात्रेकरू साधू वाटत होता. त्याची पुष्टीमार्गी वल्लभाचार्यांची भेट घडली. या आधीही त्यांनी त्यास कुलदैवताचे दर्शन घेण्याचा सल्ला दिला होता. पण तो ते जुळवू शकला नव्हता. वल्लभाचार्यांनी तिथे हरिदासस्वामींचे शिष्य – म्हणजे तानसेनच्या गुरुबंधूंचे वास्तव्य आहे, असे सांगून पुन्हा तोच सल्ला दिला. म्हणून तो वडनगरला गेला नि त्यास अलौकिक गुर्जर कन्यांचे दर्शन घडले. त्याने नम्र याचना केली, 'माई, म्हारो दीपक बुझाओ!' तानसेनची बोलण्याची शैली आणि सुस्वर ऐकून त्यातील मोठी स्त्री दचकली. तिच्या मनात संशय उपजला. पण त्या होत्या तानसेनच्या नागर गुरुबंधूंच्या नाती आणि वडनगरच्या मंडलेश्वरांच्या कुळातील मर्यादाशील सुना, ताना आणि रिरी! साहित्य, कला आणि संस्कृतीचे अनुपम उदाहरण ठरणारी ही गुजरातची सुसंस्कृत जमात. वडीलधाऱ्यांचा आदर करणारी. त्यांनी वडिलांची संमती घेऊन मदत करण्याचे वचन दिले. त्यांना मेघमल्हारचे वरदान होते. कारण त्या होत्या वैष्णव भक्तश्रेष्ठ नरसिंह महेतांची लेक कुंवरबाईच्या नाती! वडीलधाऱ्यांची परवानगी घेऊन त्यांनी तानसेनचा देहदाह शमवला. अमदावादचे इतिहास संशोधक डॉ. हरिदास गौदानी यांना वडनगर नजिक या गुर्जरकन्यांच्या देरीचा (अलौकिक व्यक्तीच्या स्मरणार्थ बांधलेले देऊळसदृश समाधीस्थळ) शोध लागला असून त्यांचे अधिक संशोधन चालू आहे....''

गुजरातेत डॉ. हरिदास गौदानींच्या विद्वत्तेविषयी अपार आदर. ते मेडिकल प्रॅक्टिशनर. तरी इतिहास घडवणाऱ्या महानुभावांविषयी त्यांना अपार कुतूहल. संशोधनाचा ध्यास. सोमवार ते शनिवार रुग्णसेवा संपवून ते या छंदाच्या स्वाधीन होत. कधी अमदावादला परतण्यास त्यांना सोमवारची पहाट उजाडे. अद्ययावत कॅमेरे, दुर्बिण वगैरे संरजाम घेऊन होणाऱ्या त्यांच्या मुशाफिरीच्या आणि त्यांनी जमवलेल्या पुरातन वस्तूंच्या खजिन्याच्या चित्तरकथा आम्ही कॉलेज कँपसमध्ये आदराने चघळत असू. त्यांना भेटण्याची आस पूर्ण झाली नाही तरी त्यांचे संशोधन वाचण्याची सवय अवश्य जडली. कुतूहलापोटी 'संगीत सम्राट तानसेन' चित्रपट बघितला. पण चित्रपटात खूपदा इतिहासाचा अपलाप आणि विकृत सादरीकरण दिसते. स्त्रियांनी प्रेमात पडण्याची शक्यताच नसलेल्या काळात, चित्रपट उद्योगाने ज्ञानेश्वरांच्या प्रेमिकेचा जावईशोध लावला होता. तानसेन चित्रपटही मनास भावला नाही.

मग जीवनात लग्न नावाचे वळण आले. जबाबदाऱ्या बदलल्या. बाळगुटीत सयाजीराव महाराजांचा 'वाचाल तर वाचाल' मंत्र असल्याने वाचन चालू राहिले. पुढे वाचणाऱ्या डोळ्यांनी लेखकाचे 'हात' घेतले. स्वभावात कुतूहल असले तरी नजर संशोधकाची नसून कादंबरीकाराची आहे, हे जाणवले. ऐतिहासिक कादंबरीच्या लेखनापूर्वी संशोधन अपरिहार्य. पण बदल्यांचे चक्र, त्यात सतत बदलणाऱ्या माझ्या नोकऱ्या, मुलांचे अभ्यास, लेखन-वाचन, फॅमिली काउन्सेलिंग... गदारोळात संशोधन अशक्य. काका काळाच्या पडद्याआड गेल्यावरही या 'झाडाने' मला सोडले नाही. त्यामुळे ऐतिहासिक घटनांचा मागोवा घेत कात्रणे जमवणे होत राहिले. विषय निवांत वेळ मागणारा. संसाराची धुमष्चक्रीची वर्षे संपल्याविना निवांत वेळ हाती येणार नव्हता.

१९९६ पर्यंत बहुतेक प्रापंचिक जबाबदाऱ्या मार्गी लागल्या. १९९५ साली बाजीराव-मस्तानीच्या प्रेमकथेवर बेतलेली 'श्वेत प्रेमनां रक्तिम पडछाया' ही वेगळा विचार सादर करणारी महाकादंबरी प्रसिद्ध झाली. ती चर्चेत होती. गुजराती साहित्य परिषदेने तिला १९९५च्या सर्वोत्तम कादंबरीचा सन्मान दिला. म्हणून अमेरिकेतील गुजराती चाहत्यांनी मला निमंत्रण धाडले. तिथे या वाचकांनी सयाजीराव महाराज तसेच या गुजरात

भूषण भगिनींवर संशोधन करून लिहावे, अशी प्रेमळ गळ घातली. मी होकार दिला; पण....

१९९७ मध्ये अनपेक्षितपणे महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराच्या वादळाने आम्हास कर्जबाजारी अवस्थेत कॅनडास फेकले. पायाखालची वाळू सरकून तोल जावा तशी पायाखालची सरावाची जमीन सरकली. मानसिक, दैहिक नि आर्थिक समतोल बिघडवला. बिकट स्थिती निर्माण झाली. हा देश तरुणांसाठी लँड ऑफ ऑपॉर्च्युनिटी, पण आम्ही पन्नाशी उलटलेले! इथे भ्रष्टाचाराची कीड नाही, हीच जमेची बाजू. तोल सावरून मूळ स्पिरीट प्राप्त करून ताठ उभे राहणे हे लोखंडाचे चणे खाणे होते. अर्थात संशोधन ठप्प! तरी सयाजीराव महाराजांच्या ग्रंथाच्या संदर्भात माहिती जमवण्यात भाऊ अविनाश कप्तानची मदत घेता आली. म्हणून त्या चरित्रग्रंथाचे लेखन मी पूर्ण करू शकले. त्यास महाराष्ट्र सरकारचा विठ्ठल रामजी पुरस्कार मिळाला. पण 'ताना-रिरी'ची माहिती जमवण्यात त्यास स्वारस्य नव्हते. शिवाय अमदावादच्या डॉ. गौदानींना वडनगरला पोहोचणे मुश्किलीने जमले होते. मी टोरांटोत! माझ्यासाठी ते किती कठीण ठरेल, हे त्रैराशिक माझ्याने सुटत नव्हते. पण तिथे मात्र सुखद दिशेने परिस्थिती बदलली होती.

कॅनडात थोडा जम बसल्यापासून मी स्नो टाळायला हिवाळ्यात भारतात येते. अशा एका भेटीत इतिहासात रस असलेल्या आणि पूर्वी डॉ. गौदानींशी मैत्रीसंबंध असलेल्या माझ्या ज्येष्ठ लेखक मित्र दांपत्याने माझ्याबरोबर वडनगरला येण्याची तयारी दर्शवली. त्यामुळे डॉ. गौदानींना हे समाधीस्थळ शोधण्यास झाला त्याच्या शतांशानेही त्रास मला झाला नाही. कारण 'खुश्बु गुजरातकी' या प्रकल्पात आता या स्थळाचा समावेश झाला असल्याने अमदावादहून (अहमदाबाद नव्हे) वडनगरला बसेस जातात आणि खास गाडी करूनही सहज जाता येते.

महेसाणा प्रांतातील वडनगरचा हाटकेश महादेव, गुजराती नागर (नागर म्हणजे सुसंस्कृत) प्रजेचे कुलदैवत. कलम, कडछी आणि कट्यार बाळगणारी ही संपन्न जमात. बुद्धिप्रामाण्यवाद सूचित करणारी कलम - लेखणी, सुगरणीचा स्वादिष्ट स्वयंपाक सुचवणारी कडछी - ओगराळे आणि शौर्यसूचक कट्यार! समृद्धी, सौंदर्य, साहित्य, कला, संस्कृती, रसिकता, शौर्य, स्वाभिमान... सारे सद्‌गुण ठासून भरलेली प्रजा. पंधरा-सोळाव्या शतकापर्यंत साहित्य, कला आणि संस्कृतीसाठी गाजणारे वडनगर हे समृद्ध शहर होते.

प्राचीन काळापासून नागर प्रजा साहचर्याने राहते. आता सरमिसळ झाली असली तरी अजूनही गुजरातेत प्रत्येक शहरात नागरवाडा नावाची वसाहत दिसते. पूर्वी सारे नागर 'समानशिले व्यसनेषु सख्यम्' न्यायाने नागरवाड्यात राहत. वडनगरच्या हाटकेशाचे महात्म्य त्यांना सोरठी सोमनाथाहून अधिक! सोमनाथवर वारंवार यवनांची आक्रमणे होऊन विनाश होई. पण नागर प्रजेने हाटकेशास धक्का लागू दिला नाही. एक तर ते केवळ नागरांचे कुलदैवत. छोटे. बहुसंख्य यवनांना अपरिचित! नागर प्रजा शूर. स्वाभिमानी. त्यांनी आपल्या कुलदैवताच्या रक्षणासाठी अटोकाट प्रयत्न केले. वडनगरच्या वारीत सारे सविस्तर कळले. अखिल भारतीय महिला मंडळ वडनगरच्या अध्यक्षा इंदुमती व्होरा यांनी ताना-रिरी भगिनींवर सुंदर लेख लिहिला होता. त्याचे कात्रण मिळाले. ताना-रिरीच्या देरीचे दर्शन घडले. जीर्णोद्धारामुळे आता तिथे प्रसन्न वाटते. तरी संस्कृतीचा डिंडिम गगनभेदी सुरात गाणाऱ्या भारतीय समाजाने वास्तवात इतिहास - संस्कृतीची हेळसांडच केली; हे कबूल करावे लागते. थेऊरला थोरल्या माधवरावांसंगे सती जाणाऱ्या रमाबाईंच्या संगमरवरी चौथऱ्यावर आदीवासींची चिरगुटे वाळताना पाहून हृदयास इंगळ्या डसल्या होत्या. कुतुबमिनारला कबुतरांच्या विष्टेच्या दुर्गंधामुळे उलटी झाली होती. ताजमहालच्या शुभ्रतेवर फॅक्टरीतून उडणाऱ्या सल्फरच्या वाफांनी पिवळेपण लादलेले पाहून मन खिन्न झाले होते. इतर काही ऐतिहासिक ठिकाणीही मी अशाच वेदनेस सामोरी गेले होते. त्या तुलनेत जीर्णोद्धार झालेल्या या स्मृतिस्थळांचे दर्शन मन प्रसन्न करणारे होते, हे नक्की!

१२-१५ वर्षांत खूप कात्रणे जमली होती. सुरुवातीची काही तर ४०-५० वर्षे जुनी! पिवळे पडलेले कागद, उचलले की तुटत म्हणून सारी माहिती मी संगणकात टाकली. काही सुटत असल्यास बघावे असे वाटले म्हणून सन्मित्र दांपत्याची मदत घेण्यासाठी समग्र माहिती मी त्यांना इ-पत्राने पाठवली. सुटत असणाऱ्या रिकाम्या जागा भरण्याची विनंतीही केली. ते काम करून त्यांचे उत्तर आले तोवर २००९चा हिवाळा जवळ आला होता. म्हणून ते उत्तर संगणकात महत्त्वाच्या डॉक्युमेंट्समध्ये जमा (सेव्ह) करून मी भारतात गेले. अमदावादला पुन्हा त्यांच्याशी चर्चा झाली. त्यांचे मराठीत बरेच वाचन होते. या माहितीचे कांदबरीत रूपांतर होणे पाहण्याची त्यांनी उत्सुकता दर्शवली. माझा उत्साह द्विगुणित झाला. घरी पोहोचताच कादंबरीचे लेखन सुरू करणार, असे जाहीर करून मी त्यांचा निरोप घेतला. पण....

टोरोंटोत एका आनंदाच्या बातमीस माझी प्रतीक्षा होती.

निर्वासिताहून अधिक हलाखीच्या परिस्थितीत आम्ही कॅनडास आलो होतो. तरी आम्ही लोनच्या मदतीने का असेना, घर घेण्याइतकी प्रगती साधली होती.

मग स्वप्नातील घरटे शोधण्याची झुंबड उडाली. त्यात काही कामे रेंगाळली. सारे ऑगस्टपर्यंत मार्गी लागेल, अशी अटकळ होती. म्हणून १५ ऑगस्टच्या शुभमुहूर्तावर लेखनाचा श्रीगणेशा करायचे ठरवले. पण....

सोळा जुलैस उत्साह भुईसपाट करणारी घटना घडली. संगणक नावाच्या जिवलग दोस्ताने मान टाकली. वर्षानुवर्षे परीश्रमाने गोळा केलेल्या माहितीसह! मित्राने पाठीत वार केल्यागत मी कळवळले. संगणक मित्र नसून यंत्र आहे आणि मी संगणकअज्ञ आहे, (कंप्युटर इल्लिटरेट) हा विदारक साक्षात्कार घडला. वयस्क असूनही मी हे आधुनिक यंत्र आत्मसात केले, हा माझा गोड गैरसमज ठरला. ज्ञान आत्मसात केलेले खरे तज्ज्ञ आवर्जून करतात, ते बॅकअपचे काम मी केले नव्हते. संगणक अमर असल्यागत मी ही महत्त्वाची माहिती फक्त महत्त्वाच्या डॉक्युमेंट्समध्ये सेव्ह केली होती. जमवलेली कात्रणे, तुटू लागलेले जुने कागद, घर बदलताना चक्क फेकून दिले होते! मनात स्वतःच्या अज्ञानाविषयी अपार रोष असताना, नेमका एका तरुणाने 'हा निव्वळ मूर्खपणा आहे. पेन ड्राइव्हवर माहिती न घेण्याचा मूर्खपणा तुम्ही केला कसा?' हा परखड प्रश्न विचारला. नैराश्याच्या गर्तेत ढकलणारा! आता आपला मूर्खपणा कुणाला सांगण्याचा मूर्खपणा तरी करायचा नाही, असा मी घोर निश्चय केला.

या प्रकल्पात मला खूप मदत करणारे दांपत्य इ-पत्राद्वारे लेखन कुठवर आले, ते विचारत असे. निश्चयाचे इमान राखून तो प्रश्न नजरेआड करून मी उत्तर धाडत असे. पुस्तक समोर ठेवून चकित करण्याचा माझा मानस असावा, असे समजून त्यांनी प्रश्न विचारणे थांबवले. त्या हिवाळ्यात मी अमदावादला गेले, तेव्हा त्यांच्या पत्नीने 'द्या' म्हणतच माझे स्वागत केले. मी गोंधळले. तिच्या खुलाशाने काळाने धरलेली जखमेवरील खपली काढली. नकळत सुहृदांपाशी जखम भळभळू लागली. मी बांध फुटल्यागत बोलू लागले. माझ्या अज्ञानाविषयी! मूर्खपणाविषयी! धारेस लागल्यावर थांबणे जमत नसताना, अचानक श्रोत्यांची नजर व्यथित नसून मिश्किल असल्याचा संशय आला. संगणकाने पाठीत वार केला, तेव्हा ते यंत्र आहे, हे आश्वासन घेता आले. पण हे साक्षात मित्र! ते 'ब्रूटस यू टू,' ही जखम देणार, या विचाराने 'त्या' तरुणाने मूर्ख म्हटले तेव्हा नव्हते झाले इतके मला घायाळ केले. मी थांबलेच.

'खरंच मूर्ख आहात तुम्ही!' फट मिळताच मित्र उद्‌गारला. मी दचकले. पण मित्रांच्या नजरेत हास्य! 'पेन ड्राइव्हवर माहिती सेव्ह केली नाही, म्हणून म्हणत नाहीय मी! तारुण्य उतरणीस लागले तरी मनाच्या वयास जमेस धरून आपण काळाशी ताल जुळवतो. आपला प्रयत्न प्रामाणिक असला तरी दैहिक वयाची मानसिक वयाशी रस्सीखेच होते. प्रसंगी दमछाकही होते. म्हणून काही चुका होतात. त्यास मूर्खपणा का म्हणायचं? उतावळ्या तरुणांनी शेरा मारला तरी आपण मनावर घेऊ नये. इ-पत्रातील प्रश्न तुम्ही डावललात, यास मी मूर्खपणा म्हणतो. वेळीच कळते तर मी पुन्हा मेल पाठवली असती. एव्हाना पुस्तक तयार झाले असते.'





**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**
**टपाल खर्च ३० रु**

## तांडव हरवताना... – रवी परांजपे

भारतीय कलाजीवनांत एक पैलूदार स्वशैलीची भर टाकणारे ज्येष्ठ कलावंत. त्यांना आजपर्यंत अनेक महत्त्वाचे कला पुरस्कार मिळाले आहेत. 'शिखरे रंग-रेषांची' हा सुबोध-सुंदर-भावस्पर्शी पूर्वसुरी चित्रकारांवरील परिचय ग्रंथ (चंद्रकला प्रकाशन, पुणे १९९८) 'ब्रश मायलेज' हे स्व-कलाप्रवासाचे आत्मकथन (राजहंस प्रकाशन, पुणे २००६) आणि 'नील-धवल ध्वजाखाली' (कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे २००६) हे वैचारिक लेख संकलन, अशी पुस्तके त्यांनी आजवर लिहिली आहेत. यापैकी 'ब्रश मायलेज'ला २००६ चा 'भैरू रतन दामाणी साहित्य पुरस्कार' आणि 'नील-धवल ध्वजाखाली'ला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा २००८ चा 'अभिजात' पुरस्कार लाभला आहे.

मी धाडलेली माहिती त्यांनी डिलिट केलेली नाही, हे ऐकून मी अवाक्! त्यांची पत्नी आश्वासक स्वरात म्हणाली, 'ह्यांना सतत वाटे, काही गडबड झाली तर? पुस्तक प्रकाशित होईतो ही माहिती सांभाळली पाहिजे.'

पत्नी बोलत असतानाच त्यांनी ती माहिती छापून कागद माझ्या सुपूर्द केले. माझ्या मनात शब्दांपलिकडची कृतज्ञता उचंबळली. विलक्षण भारावले मी! वास्तविक तेही लेखक. अनायासे नि क्रमवार माहिती त्यांच्या हाती आली होती. पण त्यांना गैरफायदा घेण्याचा विचार शिवला नाही. भ्रष्टाचारी महाराष्ट्रात माझ्या काही छापील कथा आपल्या नावावर दूरदर्शनवर खपवण्याचा दिग्गजांनी संभवितपणा केला. हे चोर समाजातच नव्हे तर माझ्यासमोरही निर्लज्जपणे छाती काढून वावरतात. त्यांच्या उर्मट नजरेत 'तुम्ही माझा केसही वाकडा करू शकत नाही' ही गुर्मी! मलाच नजर चुकवायला लावणारी! त्या पार्श्वभूमीवर मैत्रीचे हे दर्शन मला फार लोभस वाटले. नकळत हे पुस्तक या दांपत्यास अर्पण करण्याचा विचार माझ्या ओठी आला. पण त्यांचा तीव्र विरोध. पुस्तकाची भेट मात्र अवश्य हवी, हे सांगून! एका हाताने दिलेले दान दुसऱ्या हातास कळू न देण्याची आपली संस्कृती. हे तर दानही नाही. तुमचा माहितीसंचय मी तुम्हाला दिला, हे सांगून! सन्मित्र कसा असावा, ते सोदाहरण दाखवून! आता घरी जाताच लेखन सुरू करायचे, हा निश्चय करण्यास भरीस घालणारे सुसंस्कृत वर्तन.

पण या कथानकाचे माझ्या मर्जीनुसार वेगाने लेखन होऊ नये, असा योग असावा. टोरोंटोस पोहोचले न पोहोचले तोच या दांपत्याच्या अपघाती निधनाची कटू वार्ता कळली. हा धक्का पचवणे फार कठीण होते. नकळत ही कथा–व्यथा इथल्या ज्येष्ठ मैत्रिणीकडे – दुर्गा पाच्छापूरकरकडे व्यक्त झाली. ती म्हणाली, 'त्यांच्या इच्छेस मान देऊन हे पुस्तक त्यांना अर्पण करू नकोस; पण श्रद्धांजली दिल्यागत त्यांची आदर्श वर्तणूक प्रस्तावनेत अवश्य लिही.' मला ते पटले. पण....

या इच्छापूर्तीत 'पण' नावाचे अनेक फत्तर आडवे आले. बराच काळ मला आजारपणाने घेरले. तरी ही कादंबरी पूर्ण करायच्या दृढ संकल्पाने हे सारे फत्तर ओलांडले. ही सवड आणि संधी देणाऱ्या विधात्याची आणि प्रकाशकाची मी ऋणी आहे. म्हणून हे प्रकाशन मला अत्यंत आनंदप्रद वाटते.

इतिहासाचे पहिले पान फाटलेले असते. म्हणून इतिहास म्हणजे अर्धी–मुर्धी उपलब्ध छापील पाने आणि अर्ध्या कच्च्या स्मरणांच्या श्रुतीतून तयार झालेले मिश्रण समजतात. आपल्याकडे इतिहासाचे नेमस्त लेखन झालेले नाही. म्हणून प्रामाणिकपणे माहिती जमा केली तरी त्यात परस्पर विरोधी काहीबाही जमते. चक्षुर्वै सत्य – आय विटनेस मिळणे अशक्य! मन संभ्रमित होणे अटळ ठरते. म्हणून तार्किक विचारास पटले आणि कादंबरीकारास रुचले ते स्वीकारले, हे नमूद करावेसे वाटते.

ऐतिहासिक कादंबरीची संकल्पना नवी नाही. पण विषय मराठी समाजास अपरिचित आहे. यवन आक्रमणे महाराष्ट्रात पोहोचली त्याच्या अनेक शतके आधी सीमेवरील गुजरातने ती झेलली. गुजरात ओलांडून कलीने देशाच्या दक्षिणेत प्रवेश केला. शिवाजीमहाराजांच्या जन्माच्या खूप आधी. त्या स्थल–कालाचा संदर्भ मराठी समाजापाशी नसणे ही स्वाभिक घटना! म्हणून सरळ कथानकास हात घातल्यास काही बाबी बुचकळ्यात पाडतील, असे वाटले. मध्ये मध्ये माहिती देण्याने कथावस्तूचा रसभंग होतो. रसाळपणा कादंबरीचा आत्मा. म्हणून विषयाची मांडणी सरसकट कादंबरीसारखी करू नये, असे वाटले. पूर्वीच्या साहित्यात नमनास नांदी, पूर्वभूमिका, उपोद्घात, असे काही आणि शेवटी उपसंहार वा भरतवाक्य असे. तद्वत आधी कथावस्तूची पार्श्वभूमी द्यावी आणि मग मूळ कथानकास हात घालावा, असा बेत केला.

कादंबरीत वातावरणनिर्मितीस प्राधान्य असते. मोगलांचा सतत वावर असल्याने, शिवाजी महाराजांच्या काळात मराठी बोलीभाषेत उर्दू शब्दांचे प्राबल्य होते – जसे हल्ली इंग्रजी भाषेतील शब्द मराठीत घुसखोरी करतात. म्हणून वातावरणनिर्मितीसाठी या कादंबरीत मी काही प्रचलित संबोधने आणि थोडे अप्रचलित गुजराती शब्द पेरले आहेत. बेन, बा, भाभी... अशा प्रचलित शब्दांसाठी ताई – आई – वहिनी शब्द वापरणे वा तळटीपा देणे टाळले आहे. अप्रचलित शब्द वा रुढी–परंपरांसाठी तळटीपांत खुलासे दिले. सुरुवातीस वाचकांना हे गैरसोयीचे वाटू शकते. पण अर्थ उमगण्यास मदत झाली की ते सवयीचे नि रास्त वाटेल अशी आशा आहे.

खूप उशिरा का होईना, पण पूर्ण होणाऱ्या कादंबरीच्या प्रकाशनास मदत करणाऱ्या प्रत्येक मदतकर्त्याचे आणि हितचिंतकाचे मनःपूर्वक आभार.

**स्मिता भागवत**
53 Towney Cres. ON. Canada L6Z 4S9
Phone : 289 752 8885
smitacap@gmail.com

# बकुलः मधुगन्धः

## प्रा. नीला कोर्डे

बकुलफुलांनी आदिकवी वाल्मीकींच्या 'रामायणा'पासून इसवी सनाच्या सतराव्या शतकातील पंडितराज जगन्नाथाच्या 'भामिनीविलासा'पर्यंतच्या संस्कृत साहित्याला सुवासिक केले आहे. हीच 'बकुल' फुले 'बकुळ' होऊन मराठी साहित्यात आजही ताजी टवटवीत राहिली आहेत. आयुष्याच्या बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य अशा तिन्ही अवस्थांमध्ये आपली सुगंधी साथ देत आहेत.

बकुळीच्या फुलाविषयी लिहायचं ठरवलं आणि एरवी 'डोक्यावर' केसांत माळेच्या रूपाने विराजमान होणारं हे टिकलीएवढं पिटुकलं फूल 'डोक्यात' कधी शिरलं ते कळलंच नाही! तसं पाहिलं तर 'काय भुललासी वरलिया रंगा' असे सांगणारे हे फूल...! पण सुमार रूपाच्या मुलीने अंगच्या सद्गुणांनी सर्वांना आकर्षित करावे तसा या मातकट रंगाच्या फुलाचा सुगंध... सर्वांना आकर्षित करणारा...! बकुळीचा वृक्षही तसा रुक्षच! पण वरून आडदांड वाटणाऱ्या माणसाच्या मनात हळव्या, कोमल भावना असाव्यात तशी या वृक्षाला येणारी कोमल फुले...! मातीत मिसळल्यावर केवळ गंधाने आपले अस्तित्व जाणवून देणारी...! त्यांना पाहिल्यावर आठवण येते ती आकाशाशी असलेले नाते तोडून उल्का बनून जमिनीवर येणाऱ्या शापित तारकांची! या शापाला उ:शाप आहे तो फक्त सुगंधाचा!

आपल्या सुगंधाने सर्वांना आकर्षित करणाऱ्या या फुलाने प्राचीन संस्कृत साहित्यालाही सुगंधित केले आहे. शब्दसंपन्न संस्कृत भाषेत या फुलाला 'बकुल' या चिरपरिचित नावाखेरीज मधुगन्धः, सीधुगन्धः, मद्यगन्धः, मद्यामोदः, मद्यदोहदः, स्त्रीमुखमधुः, मधुपुष्पः, चिरपुष्पः, सुरभिः, भ्रमरानन्दः, केसरः यांसारखी अन्य नावेही आहेत. ही सर्व नावे अर्थपूर्ण असून बकुळीची वैशिष्ट्ये स्पष्ट करणारी आहेत.

वामनपुराणाच्या 'कामदाहः' नामक सहाव्या अध्यायात पुलत्स्य याने नारदमुनींना सांगितलेल्या 'मदनदहना'च्या कथेत बकुल वृक्षाच्या उत्पत्तीविषयीची माहिती आली आहे. कैलास पर्वतावर तप करणाऱ्या योगीराज शिवाला पार्वतीकडे आकर्षित करण्यासाठी देवांनी मदनाला पाठविले. त्याने आपल्याजवळील 'संतापन' बाणाने शिवाला विद्ध करण्याचा प्रयत्न केला. शिवाच्या ते ध्यानात येताच त्याच्या तृतीय नेत्रातून निर्माण झालेल्या अग्नीने मदन भस्मसात झाला. मदनाने भस्मसात होण्यापूर्वी आपले धनुष्य फेकून दिले. त्या धनुष्याचे पाच तुकडे होऊन त्यापासून बकुल, चंपक, जातिपुष्प (मालती), पाटल (पाडळ) आणि मल्लि (मोगरी) असे पाच

प्रकारचे वृक्ष निर्माण झाले. त्यापैकी बकुल वृक्षाच्या उत्पत्तीविषयी पुढील श्लोक आला आहे :

*नाभिस्थानं शुभाकारं यदासीद् वज्रभूषितम् ।*
*तज्जातं केसरारण्यं बकुलं नामतो मुने ।।*

अर्थ : पुलस्त्य म्हणतो– ''हे नारदमुने, मदनाच्या धनुष्याची जी चांगल्या आकाराची (शुभाकारं), रत्नजडित (वज्रभूषितं) दोरी (नाभिस्थानं) होती तिच्यापासून केसरारण्य म्हणजे बकुल वृक्षांचे अरण्य निर्माण झाले.''

मादक गंध असणाऱ्या बकुल फुलांचा संबंध अशा प्रकारे पुष्पधन्वा मदनाच्या धनुष्याशी जोडला गेला आहे. यातूनच या फुलाची कामोत्तेजकता सूचित होते.

बकुल वृक्षाची प्राचीनता रामायण आणि महाभारत या ग्रंथांतील त्याच्या उल्लेखावरून दिसून येते.

रामायणाच्या 'किष्किन्धाकाण्डा'त, पंपा सरोवराच्या परिसरात अन्य वृक्षांबरोबर बकुलही असल्याचे पुढील श्लोकावरून दिसून येते–

*चिरबिल्वा मधूकाश्च वञ्जुला बकुलास्तथा ।*
*चम्पकास्तिलकाश्चैव नागवृक्षाश्च पुष्पिता: ।।*

किष्किन्धाकाण्ड, सर्ग–१ श्लोक क्र. ७८

महाभारताच्या द्रोणपर्वातही बकुलाचा उल्लेख आहे :

*अशो कैश्चम्पकैश्चू तैरनेकैरति मुक्तकै: ।*
*पुन्नागै: कर्णिकारैश्च बकुलैर्दिव्यपाटलै: ।।*

द्रोणपर्व, अध्याय–५६ श्लोक क्र. २७

यानंतर पुराणांमध्येही बकुल आला आहे. त्यांपैकी वामनपुराणाचा उल्लेख यापूर्वीच केला आहे. 'ब्रह्मवैवर्तपुराणम्' या कृष्णचरित्राशी संबंधित असलेल्या पुराणात 'बकुलरण्यमाहात्म्यम्' नावाचा स्वतंत्र अध्यायच आहे.

अभिजात संस्कृत साहित्यात तर या बकुळ फुलांची मोहक पखरणच झालेली आपल्याला पाहावयास मिळते.

कवींचा मानदंड मानल्या गेलेल्या कविकुलगुरू कालिदासाच्या सात ग्रंथांपैकी एक 'विक्रमोर्वशीयम्' हे नाटक सोडल्यास, अन्य सहाही ग्रंथांमध्ये बकुलाचे उल्लेख सुंदर संदर्भांसह पाहावयास मिळतात. कालिदासाच्या 'ऋतुसंहारम्' या पहिल्याच लघुकाव्यात वर्षाऋतूच्या वर्णनात दोन श्लोकांमध्ये बकुलफुलांचा उल्लेख आला आहे.

पुढील श्लोकार्धात कवी म्हणतो :

*माला: कदम्बनवकेसरकेतकीभि–*
*रायोजिता: शिरसि बिभ्रतियोषितोऽद्य ।*

ऋतुसंहारम्, सर्ग–२, श्लोक क्र. २०

अर्थ : आज युवती मस्तकावर कदंब, ताजी बकुल फुले आणि केतकी यांच्या माला धारण करत आहेत.

दुसऱ्या एका श्लोकात वर्षाऋतूलाच बकुलमालेमध्ये मालतीची आणि जुईच्या ताज्या फुलांची व कळ्यांची गुंफण करून ती आपल्या प्रेयसीच्या केसांत माळणाऱ्या प्रियकराची उपमा कालिदासाने दिली आहे. बकुळीच्या माळा केसांत माळण्याची आजही असलेली प्रथा कालिदासाच्या काळापासून होती. यावरून स्त्रियांना वाटणारे या फुलाचे आकर्षण किती प्राचीन आहे हेही दिसून येते. 'अभिज्ञानशाकुन्तलम्' या नाटकातही शकुंतलेची पतिगृही पाठवणी करताना तिच्या साजशृंगारासाठी तिच्या सखीने, अनसूयेने 'केसरमालिका' म्हणजे बकुळफुलांची माला गुंफल्याचा उल्लेख आहे. या मालेसाठी 'कालान्तरक्षमा' हे अगदी उचित विशेष कालिदासाने योजिले आहे.

'कालान्तरक्षमा' म्हणजे खूप दिवस टिकून राहणारी!

याच नाटकाच्या पहिल्या अंकात बकुलवृक्षाच्या संदर्भात एक सुंदर उत्प्रेक्षा आली आहे. या अंकात शंकुतला आणि तिची सखी प्रियंवदा यांचा संवाद आहे. वृक्षवेलींवर प्रेम करणाऱ्या शकुंतलेला 'केसरवृक्ष:' म्हणजे बकुलवृक्ष वाऱ्याने सळसळणाऱ्या पालवीच्या बोटांनी जणू आपल्याला बोलावीत आहे असे वाटते. सुकुमार शकुंतला त्याच्याजवळ जाऊन उभी राहिली असता प्रियंवदा तिला थट्टेने म्हणते–

*''यावत्त्वयोपगतया लतासनाथ इवायं केसरवृक्षक: प्रतिभाति ।''*

''तू या बकुलवृक्षाच्या जवळ उभी राहिलीस म्हणजे एखाद्या लतेबरोबर त्याचं मीलन झाल्यासारखं दिसतं!''

कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्रम्' या नाटकाची नायिका मालविका हिच्या सखीचे नाव मुळी 'बकुलावलिका' आहे. अग्निमित्र राजाच्या प्रेमात पडलेल्या मालविकेला सर्वतोपरी साहाय्य करणारी ही सखी खरोखरच 'बकुलावलिका' म्हणजे बकुलमालेप्रमाणे आहे. 'विमर्दसुरभि:' म्हणजे कुस्करली गेल्यावर अधिकच सुगंध देणे हे बकुलमालेचे वैशिष्ट्य आहे. मालविकेची सखी बकुलावलिकाही मालविकेसाठी कष्ट घेताना जणू आपल्या सद्‌गुणांचा अधिकच सुगंध देणारी आहे.

कालिदासाच्या 'कुमारसम्भवम्' या महाकाव्यातही बकुलमाला आली आहे. प्राचीन काळी बकुलमाला केवळ शिरोभूषण म्हणून धारण केली जात नव्हती, तर ती 'कटिबंध' म्हणून स्त्रियांच्या कमरेवरही विराजमान होत होती. 'कुमारसम्भवम्'च्या तिसऱ्या सर्गात, कैलासावर तप करणाऱ्या शिवाची सेवा करणाऱ्या पार्वतीचे वर्णन आले आहे.

पुष्पालंकार धारण करणाऱ्या या निसर्गकन्येने 'केसरदामकाञ्ची' म्हणजे बकुलफुलांची माला कटिबंध म्हणून धारण केली होती. या बकुलमालेला कालिदासाने एक सुंदर शृंगारिक उपमा दिली आहे. तो म्हणतो–

*स्रस्तां नितम्बादवलम्बमाना पुन: पुन: केसरदामकाञ्चीम् ।*
*न्यासीकृता स्थानविदा स्मरेण मौर्वी द्वितीयामिव कार्मुकस्य ।।*

कुमारसम्भवम्, सर्ग–३ श्लोक, क्र. ५५

अर्थ : वस्तूंचे योग्य 'स्थान' जाणणाऱ्या मदनाने ठेवलेल्या धनुष्याच्या जणू दुसऱ्या दोरीप्रमाणे (मौर्वी) असणारी, वारंवार घसरणारी नितंबांवरील बकुलमाला पार्वती पुन्हा पुन्हा सावरत होती.

कटिबंधासाठी मेखला, रशना यांसारखे संस्कृत शब्द रूढ असताना येथे 'काञ्ची' हा शब्द कालिदासाने अगदी विचारपूर्वक योजिला आहे. 'काञ्ची' म्हणजे एकपदरी कटिबंध! कालिदासाने बकुलमालेला दिलेल्या धनुष्याच्या दोरीच्या उपमेशी हा शब्द अगदी सुसंगत आहे. या उपमेतून विविध अर्थच्छटा व्यक्त झाल्या आहेत. पुष्पधन्वा मदनाच्या अरविंद (लाल कमळ), अशोक, चूत (आम्रमंजरी), नवमल्लिका आणि नीलकमल या पुष्पबाणांमध्ये बकुलाचा समावेश नाही याची खंत कालिदासाला वाटत असावी. कारण मदनाच्या पुष्पबाणांप्रमाणेच बकुलही कामोत्तेजक आहे. शिवावर शिरसंधान करणाऱ्या मदनाने धनुष्याची एक दोरी तुटली तर खबरदारी म्हणून ही दुसरी दोरी धनुष्याला लावली आहे. पार्वतीच्या नितंबांचे वक्राकार धनुष्याशी असलेले साम्यही येथे वर्णनात उत्तानता न येता सूचित झाले आहे.

कालिदासाच्या 'रघुवंशम्' या महाकाव्यातील 'अजविलापा'त मात्र या बकुलफुलांच्या विलासमेखलेला एक करुण संदर्भ आहे. मृत झालेल्या आपल्या प्रिय पत्नीसाठी–इंदुमतीसाठी विलाप करताना अज राजा म्हणतो :

*तव नि:श्वसितानुकारिभि–*
*र्बकुलैरर्धरचितां समं मया ।*
*असमाप्य विलासमेखलां*
*किमिदं किन्नरकण्ठि सुप्यते ।।*

रघुवंशम्, सर्ग–८, श्लोक क्र. ६४

अर्थ : हे मधुरभाषिणी, आपल्या श्वासाप्रमाणे सुगंध असलेल्या बकुलफुलांची मेखला तू माझ्याबरोबर गुंफत असताना अर्धवट सोडून का बरे निद्रिस्त झाली आहेस?

अलंकार म्हणून धारण करण्यात येणाऱ्या या सुकुमार बकुलाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या सुवासाचे मादक मदिरेच्या गंधाशी असलेले साम्य! यामुळेच त्याला मधुगन्ध:, मद्यगन्ध:, मद्यामोद: आणि सीधुगन्ध: ही नावे प्राप्त झाली आहेत.

'कुमारसम्भवम्'च्या आठव्या सर्गात बकुल आणि मदिरा यांच्यातील साम्याचा निर्देश आला आहे. गंधमादन पर्वतावरील वनदेवतेने पार्वतीला कल्पवृक्षाची मदिरा दिली असता शिव पार्वतीला म्हणतो :

*आर्द्रकेसरसुगन्धि ते मुखं*
*मत्तरक्तनयनं स्वभावत:*
*अत्र लब्धवसतिर्गुणान्तरं*
*किं विलासिनि मधु: करिष्यति ।।*

कुमारसम्भवम्, सर्ग–८, श्लोक क्र. ७६

अर्थ – हे विलसिनी! तुझ्या मुखाला ताज्या बकुलाचा सुवास आहे आणि नयन स्वभावत:च आरक्त आहेत. तेव्हा ही मदिरा आणखी काय करू शकणार?

या श्लोकात बकुलामध्ये मदिरेची मादकता आणि सुगंध असल्याचे सूचित केले आहे.

बकुल आणि मदिरा यांच्यातील या साम्यावर आधारित एक सुंदर कविसंकेत आहे. किंबहुना, हा कविसंकेत घेऊनच अभिजात संस्कृत साहित्यातील बकुल फुलला आहे.

गर्भवती स्त्रियांना जसे दोहद म्हणजे डोहाळे लागतात तसेच डोहाळे सुंदर फुले येणाऱ्या काही वृक्षांनाही लागतात असा कविसंकेत आहे. विशेष म्हणजे या 'रसिक' वृक्षांचे डोहाळे नवयौवना सुंदर स्त्रियांकडूनच पुरविले जातात. या कविसंकेतात स्त्रियांची कोमलता आणि त्यांचे फुलांशी असणारे साम्य अभिप्रेत आहे. बकुल, अशोक, कर्णिकार (बहावा) यांसारखे सुंदर नाजूक फुले येणारे वृक्ष स्त्रियांच्या सहभागाशिवाय फुलत नाहीत ही कल्पनाच किती कोमल आणि सुंदर आहे!

या वृक्षांचे दोहद पुरविण्याच्या ज्या विविध पद्धती आहेत त्यासुद्धा स्त्रिया आणि वृक्ष यांच्यातील साम्यावर आधारित आहेत. बकुलाच्या दोहदाविषयी 'बकुल: सीधुगण्डूषसेकात्' म्हणजे 'स्त्रियांच्या मुखातील मदिरेच्या चुळकीने बकुल फुलतो' असा कविसंकेत रूढ झाला. स्त्रियांच्या मुखाला ताज्या बकुलाचा सुवास असल्यामुळे आणि बकुलाच्या मादक गंधाचे मदिरागंधाशी साम्य असल्यामुळे, स्त्रीमुखातील मद्याच्या चुळकीचा संबंध बकुल दोहदाशी जोडण्यात आला. यावरूनच बकुलाला मद्यदोहद: आणि स्त्रीमुखमधु: ही नावे प्राप्त झाली आहेत.

बकुलाचे दोहद पुरविणारी ही मदिरासुद्धा 'सीधु' या खास प्रकारची आहे. भावमिश्रांच्या 'भावप्रकाश' या ग्रंथात

'सीधु' ही मदिरा उसाच्या रसापासून करण्यात येत असल्याचा उल्लेख आहे. तसेच या सीधूचे 'पक्वरससीधु' म्हणजे उसाचा रस उकळून केलेली मदिरा आणि 'शीतरससीधु' म्हणजे उसाच्या कच्च्या रसापासून केलेली मदिरा असे दोन प्रकार असल्याचाही उल्लेख आहे.

मधुमासात म्हणजे वसंतऋतूत बकुल फुलत असल्यामुळे त्यावेळी त्याचे दोहद पुरविण्यात येत असल्याचा उल्लेख रघुवंशाच्या नवव्या सर्गातील वसंतवर्णनात आहे. याच सर्गात स्त्रियांनी वसंतोत्सवात 'केसरा'च्या म्हणजे बकुलाच्या सुगंधाला मागे टाकणारे मद्य प्राशन केल्याचाही उल्लेख आहे.

कालिदासाने रघुवंशाच्या एकोणिसाव्या म्हणजे अंतिम सर्गात सुखलोलुप, विलासप्रिय, अग्निवर्ण राजाचे वर्णन केले आहे. स्त्रियांच्या मुखातील मद्य प्राशन करू इच्छिणाऱ्या या राजाला, त्याने बकुलवृक्षाची उपमा दिली आहे.

कालिदासाच्या 'मेघदूतम्' या लघुकाव्यातील 'उत्तर मेघा'त यक्षाच्या गृहाचे जे वर्णन आले आहे त्यामध्येही यक्ष-पत्नीकडून 'वदनमदिरे'ने दोहद पुरवून घेण्याची इच्छा करणाऱ्या 'केसरा'चा म्हणजे अर्थात बकुलाचा उल्लेख आला आहे.

इथे एक विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे कालिदासाने काही अपवाद वगळल्यास बकुलासाठी 'केसर' हा शब्द योजिला आहे. 'केसर' याचा अर्थ 'फुलातील पराग' असाही होतो. तसे पाहिले तर बकुलातील पराग अतिशय नाजूक! पण तरीही 'प्रेम' या नाजूक भावनेचे प्रतीक असणाऱ्या या नाजूक फुलातील नाजूक केसर कालिदासाच्या कविमनाला आकर्षित करीत असावेत.

इसवी सनाच्या सातव्या शतकात होऊन गेलेला सम्राट हर्षवर्धन हा नाटककारही होता. त्याच्या 'रत्नावली' या नाटिकेच्या पहिल्या अंकात वसंतोत्सवाचे वर्णन आले आहे. त्यामध्येही वसंतऋतूत फुलणाऱ्या बकुलाचे दोहद युवतींकडून पुरविले गेल्याचा उल्लेख पुढील श्लोकांमध्ये आला आहे :

*विकसितबकुलाशोकक: कांक्षितप्रियजनमेलक: ।*
*प्रतिपालनासमर्थकस्ताम्यति युवतिसार्थक: ।।*

रत्नावली, अंक-१, श्लोक क्र. १४

अर्थ : बकुल आणि अशोक यांना बहर आणणारा, प्रियकराच्या भेटीची इच्छा करणारा आणि प्रतीक्षा करण्यास असमर्थ असणारा युवतींचा मेळा खिन्न झाला आहे.

दुसऱ्या एका श्लोकार्धात 'मूले गण्डूषसेकासव इव बकुलैर्वास्यते पुष्पवृष्ट्या ।' ''मूळाशी मदिरेची चुळूक टाकल्याप्रमाणे बकुलांनी जमिनीला सुवासिक केले आहे.'' असे म्हटले आहे. (रत्नावली, अंक पहिला, श्लोक क्र. १८)



आणखीही एका श्लोकात अशोक आणि बकुल यांच्या दोहदांचा उल्लेख आला आहे-

*पादाहत: प्रमदया विकसत्यशोक: ।*
*शोकं जहाति बकुलो मुखसीधुसिक्त: ।।*

रत्नावली, अंक-१, श्लोक क्र. २२

अर्थ : प्रमदेने पायाने ताडन केल्यामुळे अशोक फुलतो आणि मुखातील सीधु मदिरेचे सिंचन केला गेलेला बकुल शोकाचा त्याग करतो. (आनंदित होतो.)

बकुलदोहदाच्या या पुनरावृत्तीने 'रत्नावली'तील वसंतऋतू 'मदिर' झाला आहे.

श्रीहर्षानंतर होऊन गेलेल्या 'भवभूति' या नाटककाराच्या 'मालतीमाधवम्' या नाटकात, बकुल महत्त्वाची भूमिका बजावताना दिसतो. नाटकाच्या पहिल्या अंकात येणाऱ्या बकुलमालेमुळे या अंकाला 'बकुलवीथी' हे नाव देण्यात आले आहे.

'रत्नावली'प्रमाणेच 'मालतीमाधवम्'च्याही पहिल्या अंकात वसंतोत्सवाचे वर्णन आहे. प्राचीन काळी साजरा होणारा हा वसंतोत्सव म्हणजे 'मदनमहोत्सव'च होता. आजच्या भाषेत बोलायचे तर 'व्हॅलेन्टाइन डे'!

'मालतीमाधवम्'ची नायिका मालती हिला कामदेवाच्या

मंदिरात जाताना पाहून नायक माधव प्रथमदर्शनी तिच्या प्रेमात पडतो. प्रेमविव्हल झालेला माधव एका 'बालबकुला'च्या झाडाखाली पडलेली ताजी बकुलफुले गोळा करून त्यांची माला गुंफतो. मालतीच्या मुखाकडे पाहत या मालेची गुंफण झालेली असल्यामुळे ती एका बाजूला विषम होते. तरीही तिच्यात गुंफली गेलेली माधवाची प्रेमभावना महत्त्वाची आहे.

माधव ही बकुलमाला मालतीच्या लवंगिका नावाच्या सखीमार्फत मालतीकडे 'प्रेमभेट' म्हणून पाठवितो. मालतीला देण्यासाठी ही बकुलमाला स्वीकारणाऱ्या लवंगिकेच्या तोंडी भवभूतीने जी 'द्व्यर्थी' शब्दयोजना केली आहे. तीसुद्धा अतिशय चातुर्यपूर्ण आहे. लवंगिका माधवाला म्हणते–

*''महाभाग सुश्लिष्टगुणतया रमणीय*
*एष: व: सुमनसां संनिवेश: ।''*

अर्थ : हे महाभाग या फुलांमधून (सुमनसां) दोरा (गुण) नीट ओवला गेल्यामुळे (सुश्लिष्ट) यांची गुंफण (संनिवेश:) किती रमणीय झाली आहे!

दुसरा अर्थ : एकमेकांना गुणांनी सुयोग्य असल्यामुळे दोन 'सु–मनां'चे मीलन किती रमणीय झाले आहे!

लवंगिका म्हणते – ''कुलू हलिनी च नो भर्तृदारिका वर्तते । तस्यामभिनवो विचित्र: कुसुमेषु व्यापार: ।''

अर्थ : आमच्या राजकन्येला (भर्तृदारिका) या मालेविषयी कुतूहल वाटते. कारण तिला तर हा कुसुमव्यापार (फुलांची गुंफण) अगदी अनोखा आहे.

दुसरा अर्थ : आमच्या राजकन्येला हा कुसुमेषु (कुसुम+इषु) म्हणजे पुष्पबाण असणाऱ्या मदनाचा 'व्यापार' अगदी अनोखा आहे. (म्हणजे तिला प्रथमच 'मदनबाधा' झाली आहे.)

लवंगिका पुढे म्हणते–

*''तद्भवतु कृतार्थता वैदग्धस्य ।*
*फलतु निर्माणरमणीयता विधातु: ।*

अर्थ : हे कौशल्य कृतार्थ होऊ दे आणि निर्मात्याला त्याच्या निर्माण रमणीयतेचे फळ मिळू दे.

दुसरा अर्थ : या मालेच्या निर्मात्याला म्हणजे माधवाला त्याच्या निर्माण रमणीयतेचे फल म्हणजे मालतीची प्राप्ती होऊ दे.

पुढे तर लवंगिकेने धिटाईने द्व्यर्थी शब्दयोजनेतून आपल्या सखीला, मालतीला माधवाकडून कंठालिंगन मिळण्याची इच्छा सूचित केली आहे. ती म्हणते–

*''समासादतु सरस एष भर्तृदारिकाया:*
*कण्ठावलम्बनमहार्घतामिति ।''*

अर्थ : हा 'सरस' कुसुमव्यापार म्हणजेच ही बकुलमाला ताजी असतानाच आमच्या राज्यकन्येच्या गळ्याभोवती पडून या मालेला तिचे मूल्य मिळू दे.

दुसरा अर्थ : माधव 'स–रस' म्हणजे प्रेमरसपूर्ण (प्रेमनिर्भर) असतानाच त्याला मालतीला आलिंगन देण्याची संधी मिळू दे.

हे सर्व तपशीलवार देण्याचे कारण म्हणजे प्राचीन काळी प्रणयात बकुलफुलांना किती महत्त्व होते ते आपल्याला इथे दिसून येते. आज 'व्हॅलेन्टाइन डे'ला विदेशातून आलेल्या दिखाऊ (आणि गंधहीनसुद्धा) 'काटेरी' गुलाबांची 'प्रेमभेट' देण्याची प्रथा सुरू झालेली असताना ही 'बकुलमालेची प्रेमभेट' अगदी अनोखी वाटते. 'दिखाऊ' रूपापेक्षा 'टिकाऊ' गुणांच्या सुगंधाने आकर्षित करणारी ही 'बकुलफुले' आजच्या तरुण पिढीला खूप काही सांगून जातात.

कालिदासाच्या नाटकांमध्ये जसे 'अभिज्ञानशाकुन्तलम्' तसेच भवभूतीच्या नाटकांमध्ये 'उत्तररामचरितम्'! रामाच्या जीवनाच्या उत्तरार्धावर म्हणजेच 'सीतात्यागा'वर आधारित या नाटकात बकुल फुले आली आहेत. मला तर असे वाटते की, ही बकुल फुले जणूकाही दवबिंदूंनी नव्हेत तर रामाच्या अश्रूंनी भिजली आहेत. 'एको रस: करुण एव' मानणाऱ्या आणि 'कारुण्यं भवभूतिरेव तनुते ।' – 'भवभूतीच करुणरस निर्माण करू शकतो!' असे उद्‌गार ज्याच्याविषयी काढले गेले आहेत, त्या भवभूतीने उत्तररामचरितातील 'कुमारप्रत्यभिज्ञानम्' नावाच्या सहाव्या अंकात वाल्मीकींच्या आश्रमाजवळ राम आणि लव–कुश यांच्या झालेल्या प्रथम भेटीचे चित्रण केले आहे. लव–कुश हे आपलेच पुत्र असल्याचे जाणल्यावर राम यांना वाल्मीकींनी रचलेल्या रामायणातील काही श्लोकांचे पठन करण्यास सांगतो. त्यावेळी लवाने म्हटलेल्या पुढील श्लोकात 'केसर' म्हणजे 'बकुलवृक्ष' एका वेगळ्याच संदर्भात आला आहे–

*त्वदर्थमिव विन्यस्त: शिलापट्टोऽयमग्रत: ।*
*यस्यायमभिमत: पुष्पै: प्रवृष्टइव केसर: ।।*

उत्तररामचरितम्, अंक ६, श्लोक क्र. ३६

अर्थ : राम सीतेला म्हणतो– ''हा समोरचा शिलापट्ट (विशाल शिळा) तुझ्याचसाठी राखून ठेवला आहे. त्याच्यावर बकुलवृक्ष सर्व बाजूंनी पुष्पवृष्टी करत आहे.''

या श्लोकात शिलापट्टावर बकुलवृक्षाने रचलेल्या पुष्पशय्येच्या निर्देशातून शृंगारिक अर्थ सूचित झाला आहे. लवासारख्या बालकाच्या मुखी तर हा श्लोक अगदी विसंगत

वाटतो. (टीव्हीवरील आजच्या 'रिॲलिटी शो'मध्ये लहान मुले शृंगारिक गीते गाताना दिसतात त्याचीच इथे आठवण होते!) निष्पाप लवाने म्हटलेल्या या श्लोकामुळे रामाची विरहव्यथा अधिकच तीव्र होते. 'उत्तर रामचरिता'तील हा बकुलवृक्ष त्याच्या वेगळेपणामुळे लक्षात राहतो.

सम्राट हर्षवर्धनाच्या राजसभेतील कवी 'बाणभट्ट' याची 'कादम्बरी' आणि 'हर्षचरितम्' ही दोन गद्यकाव्ये प्रसिद्ध आहेत. या दोन्ही गद्यकाव्यांमध्ये बकुल आला आहे. 'कादम्बरी' हे बाणभट्टाचे 'कथा' या प्रकारात येणारे गद्यकाव्य आहे. त्यामध्ये उज्जयिनीचा राजपुत्र चंद्रापीड आणि गंधर्व राजकन्या कादंबरी यांची प्रणयकथा आली आहे. कादंबरीच्या पूर्वभागात विन्ध्याटवीचे म्हणजे विंध्य पर्वतावरील अरण्याचे वर्णन आहे. या अरण्यात अन्य वृक्षांबरोबर 'केसर' म्हणजे बकुलवृक्षही होते. तसेच जाबाली मुनींच्या आश्रमाभोवतीही विपुल बकुलवृक्ष असल्याचा उल्लेख आहे. चंद्रापीडाचा पिता राजा तारापीड याच्या प्रणयक्रीडा वर्णनात स्त्रियांकडून मुखमद्याने बकुल पुष्पित होण्याचा कविसंकेत आला आहे.

बाण म्हणतो–

*''कदाचिब्दकुलतरुरिव*
*कामिनीगण्डूषसीधुधारास्वादमुदितो विकाशमभज्वत्।''*

कधी कामिनींच्या मुखातील मद्याच्या चुळीने तो बकुलवृक्षासारखा फुलून येई. (प्रफुल्लित होई.) तारापीडाने मीलनाचा संकेत पाळला नाही तर अंत:पुरातील स्त्रिया बकुलमालांनी त्याचे पाय बांधून अन्य फुलांच्या मालांनी त्याला ताडन करत असत. आणखी एक विशेष म्हणजे येथे स्त्रियांप्रमाणे पुरुषांनीही बकुलमाला धारण करण्याची प्रथा दिसून येते. बकुलाच्या 'केसर' या नावावर श्लेष साधून खांद्यावर रुळणाऱ्या केसरमाला धारण करणाऱ्या तारापीडाला, बाणाने 'केसर' म्हणजे 'आयाळ' असणाऱ्या सिंहाची उपमा दिली आहे.

कादंबरीत आणखीही एका ठिकाणी 'केसर' आला आहे. राजकन्या कादंबरीच्या कुमारीपुरातील म्हणजे कन्यानिवासातील सख्यांच्या थट्टामस्करीत चाललेल्या संवादात, 'केसरिका' नावाच्या कन्येला उद्देशून म्हटले आहे– 'केसरिके सिञ्च मदिरारसेन बकुलकुसुममालागृहाणि।' या कन्येचे 'केसरिका' हे नाव बकुलाच्या 'केसर' या नावाशी साम्य दर्शवणारे असल्याने तिला बकुलफुलांच्या माला लावलेल्या गृहात मदिरारसाचे सिंचन करण्यास सांगितले आहे. इथेही बकुलाचे मदिरेशी साहचर्य आहेच!

कालिदासाच्या कुमारसंभवातील पार्वतीप्रमाणे या कन्यकांनीही बकुलफुलांची मेखला घातली आहे. पण त्या इतक्या नाजूक आहेत की, ही मेखला चालताना त्यांना अडथळा आणते.

'कादंबरी'मध्ये आणखीही एका ठिकाणी ही 'बकुलमाला मेखला' आली आहे. कादंबरीची सखी महाश्वेता हिच्या प्रियकराला– पुंडरीकाला पारिजाताची पुष्पमंजरी देणाऱ्या नंदनवनदेवतेने 'बकुलमालिका मेखला' धारण केली होती.

बाणभट्टाच्या 'आख्यायिका' या गद्यकाव्य प्रकारात येणाऱ्या 'हर्षचरितम्'मध्येही बकुल आला आहे. हर्षचरितातील विंध्याटवी वर्णनात ग्रीष्म ऋतूत केसर वृक्ष पुष्पित झाल्याचा उल्लेख आहे. आणखी एक विशेष म्हणजे हर्षचरिताच्या पाचव्या उच्छ्वासात 'मालतीमाधवम्' प्रमाणेच 'बालबकुला'चा उल्लेख आहे. राजा प्रभाकरवर्धनाची राणी आणि हर्षवर्धनाची माता यशोमती सती जाण्यापूर्वी अंत:पुर उद्यानातील वृक्षवेलींचा निरोप घेताना बालबकुलाला उद्देशून म्हणते– ''पुत्रक अंत:पूर बालबकुलक वारुणीगण्डूषदुर्ललित दृष्टोऽसि।'' ''पुत्रा, अंत:पुर बालबकुला मद्याच्या चुळीने लाडावलेला तू माझ्या दृष्टीस पडला आहेस!'' ज्याअर्थी 'मालतीमाधवम्'मध्ये 'बालबकुला'च्या फुलांचा उल्लेख आहे आणि 'हर्षचरिता'त बालबकुलाचे दोहद पुरवल्याचा उल्लेख आहे, त्याअर्थी 'बालबकुल' म्हणजे वाढ न झालेले बकुळीचे झाड नसून प्राचीन काळी बकुळीची ती एक वेगळी जात असावी.

हर्षचरितातही पुरुषांनी बकुलमाला धारण करण्याची प्रथा दिसून येते. हर्षचरिताच्या पहिल्या उच्छ्वासात, सरस्वतीचा प्रियकर दधीच याने मस्तकावर बकुलमाला धारण केली आहे. चौथ्या उच्छ्वासात हर्षाच्या जन्मोत्सवाच्या वेळी कान्यकुब्जमधील युवकांनी खांद्यांवरून रुळणाऱ्या केसरमाला घातल्याचा उल्लेख आहे.

बकुलफुलांचा मादक गंध हा तर संस्कृत कवींच्या आकर्षणाचा विषय! विशेषत: स्त्रियांच्या मुखाला बकुलाचा सुगंध असल्याची कल्पना बऱ्याच वेळा आली आहे. परंतु बाणाचे वेगळेपण म्हणजे हर्षवर्धनाच्या 'दर्पशात' नावाच्या लाडक्या हत्तीच्या मदाला बकुलफुलांचा मादक गंध असल्याचा उल्लेख त्याने केला आहे. असा मादक गंध असणे हे उत्तम हत्तीचे लक्षण आहे.

बाणाच्या बकुलवर्णनात आणखीही एक विशेष आहे. केवळ बकुलफुलांभोवती भ्रमराप्रमाणे रुंजी घालणाऱ्या अन्य

संस्कृत कवींप्रमाणे हा कवी नाही. बकुलफुलांबरोबरच 'बकुलफलां'चेही आकर्षण या निसर्गाशी तादात्म्य पावलेल्या कवीला आहे.

बकुळीच्या झाडाला येणारी निंबोणीपेक्षा आकाराने जरा मोठी, लंबगोल, पिवळसर-शेंदरी फळे बाणाच्या नजरेतून सुटलेली नाहीत. या 'बकुलफुलां'चे आगळेवेगळे उल्लेख त्याच्या 'कादंबरी'त आणि 'हर्षचरिता'तही पाहावयास मिळतात. कादंबरीतील महाश्वेतेचा प्रियकर ऋषिकुमार पुंडरीक याच्या हातातील लंबवर्तुळाकार कमंडलू 'सनालबकुलफलाकार' म्हणजे देठासकट बकुळफळाच्या आकाराचा असल्याचे बाणाने म्हटले आहे.

हर्षचरितात या 'बकुलफला'वर एक सुंदर उत्प्रेक्षा बाणाने केली आहे. दधिचाची सखी मालती हिच्या कानांमध्ये बकुलफलाच्या आकाराच्या तीन तीन टपोऱ्या मोत्यांच्या 'बालिका' म्हणजे 'बाळ्या' होत्या. (मराठीत 'बाळी' हा शब्द या 'बालिका'वरून आला आहे.) त्यांच्यापासून निघणारे तेजस्वी किरण मालतीच्या भुजलतांवर म्हणजे वेलींप्रमाणे नाजूक बाहूंवर पडले होते. जणूकाही 'दोन बालिका' अधोमुखी होऊन स्वच्छ जल, लतांना घालत होत्या. श्लिष्ट रचना प्रिय असणाऱ्या बाणाने इथे 'बालिका' या शब्दावर साधलेला श्लेषही नावीन्यपूर्ण आहे.

इसवी सनाच्या बाराव्या शतकात बंगाल येथे होऊन गेलेल्या जयदेव कवीचे 'गीतगोविन्दम्' हे एक अत्यंत लोकप्रिय असे संगीत-नृत्यप्रधान काव्य आहे. राधा-कृष्णाच्या प्रेमावर आधारित बाह्यत: शृंगारिक परंतु अंतरंग भक्तिरसाने ओथंबलेल्या या काव्यात 'बकुल' आला आहे. कुंजवनात गोपींसवे नृत्य करणाऱ्या कृष्णाचे वर्णन करताना कवी जयदेव म्हणतो :

*उन्मद-मदन-मनोरथ-पथिक-वधूजन-जनितविलापे*
*अलिकुल-संकुल-सुमनसमूह-निराकुल-बकुलकलापे ।।२ ।।*
*विहरति हरिरिह सरस वसन्ते । नृत्यति युवति जनेन*
*समं सखि विरहिजनस्य दुरन्ते ।।धृ. ।।*

अर्थ : वासंतिक समयी ज्यांच्या मधुर पुष्पांवर भ्रमरपंक्ति विराजमान झालेली आहे, असे अनेक बकुलवृक्ष असलेल्या



कुंजवनात गोपींसमवेत गोविंद नर्तन करत आहे.

संस्कृत सुभाषितांमध्येही बकुलाला महत्त्वाचे स्थान आहे.

पंडितराज जगन्नाथाच्या 'भामिनीविलास' या काव्यातील 'प्रास्ताविक' या पहिल्या प्रकरणात बकुलाला उद्देशून पुढील 'अन्योक्ति' आहे–

*निसर्गादारामे तरुकुलसमारोपसुकृती*
*कृती मालाकारे बकुलमपि कुत्रापि निदधे।*
*इदं को जानीते यदयमिह कोणान्तरगतो*
*जगज्जालं कर्ता कुसुमभरसौरभ्यभरितम्।।*

अर्थ : जन्म स्वभावानेच झाडांची रचना करण्याच्या कामात कुशल अशा माळ्याने, बकुळीचे झाड कानाकोपऱ्यात कुठेतरी लावले. पण बकुळ आपले गुण थोडेच सोडणार? कुठेतरी कोपऱ्यात पडलेले व म्हणून अज्ञात राहिलेले हे बकुळीचे झाड आपल्या फुलांच्या सुगंधाने सर्व जग लवकरच भरून टाकणार आहे, याची कल्पना कोणाला आली होती?

*दुसऱ्या एका बकुलान्योक्तीत म्हटले आहे :*
*दधान: प्रेमाणं तरुषु समभावेन विपुलं*
*न मालाकारोऽसावकृतकरुणां बालबकुले।*
*अयं तु द्रागुद्यत्कुसुमनिकराणां*
*परिमलैर्दिगन्तानाने मधुपकुलझङ्कारभरितान्।।*

अर्थ : जो माळी सर्व झाडांवर समभावाने प्रेम करतो त्याने 'बालबकुला'च्या रोपाच्या बाबतीत विशेष दयाबुद्धी दाखविली नाही. (इथेही 'बालबकुल' आहे.) पण या बालबकुलाने मात्र लवकर (द्राक्) फुले धरून त्यांच्या सुगंधाने व त्यांच्यामुळे जमलेल्या भ्रमरकुलाच्या गुंजारवाने सर्व दिशा व्यापून टाकल्या.

या दोन्ही बकुलान्योक्तींचा मथितार्थ असा की, सत्पात्र मनुष्याची उपेक्षा केली तरी तो आपल्या गुणांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतोच!

अशा या बकुलफुलांनी आदिकवी वाल्मीकींच्या 'रामायणा'पासून इसवी सनाच्या सतराव्या शतकातील पंडितराज जगन्नाथाच्या 'भामिनीविलासा'पर्यंतच्या संस्कृत साहित्याला सुवासिक केले आहे.

हीच 'बकुल' फुले 'बकुळ' होऊन मराठी साहित्यात आजही ताजी टवटवीत राहिली आहेत. आयुष्याच्या बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य अशा तिन्ही अवस्थांमध्ये आपली सुगंधी साथ देत आहेत.

''या बाई या बकुळीच्या झाडाखाली फुले वेचू या'' या 'बालगीता'तील बकुळफुले 'भावगीतां'मध्येही गुंफली गेली. किंबहुना, 'प्रेमा'सारखी हळवी, नाजूक आणि चिरंतन भावना बकुळ फुलांशिवाय अन्य फुलांनी व्यक्तच होऊ शकत नाही. म्हणूनच मराठी भावगीतांमध्ये एक 'बकुळ गीतामाला'च निर्माण झाली आहे.

या गीतमालेतील पुढील गीतांचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो–

मानसकन्या कण्वमुनींची बसुनी वनी एकांती
गुंफिते माळ बकुळफुलांची

*– गायिका गीता रॉय*

तुझी नि माझी प्रीत जशी रे बकुळफुलांची माळ...

*– मोहनतारा अजिंक्य*

गुंफिते बकुळांच्या माळा तुजसाठी रे घननीळा

*– माणिक वर्मा*

शब्द शब्द जपून ठेव बकुळीच्या फुलापरी

*– सुमन कल्याणपूरकर*

बकुळफुला कधीची तुला धुंडते बनात

*– मंगला नाथ*

घाई नको बाई अशी आले रे बकुळफुला

*– आशा खाडिलकर*

या बकुळीच्या झाडाखाली

*– सुषमा श्रेष्ठ*

डॉ. शरदिनी डहाणूकर यांचा 'फुलवा'मधील 'तळी माती गंधवती' हा बकुळफुलावरील लेख म्हणजे एक सुंदर गद्यकाव्यच आहे! उषा दातार यांनी 'हरिपंतांच्या जिवावर' या कथेत आवळ्याच्या छोट्या छोट्या सुबक वड्यांना दिलेली बकुळफुलांची उपमाही अशीच मनात ठसून राहिली आहे!

अशी ही बकुळफुले... 'अल्लड' बाल्यात फुले वेचण्याची हौस पुरविणारी...

'फुलत्या' तारुण्याला मादक सुगंधाची साथ देणारी, 'शुष्क' वार्धक्याला सद्गुणांच्या सुवासाने आपल्याप्रमाणेच 'अम्लान' ठेवणारी...!

**प्रा. नीला कोर्डे**
'वरदान', ए/४४ एदलजी रोड,
टेंबीनाका, ठाणे (प), ४००६०१
दूरध्वनी : (०२२) २५३९७९१२

स्वातंत्र्योत्तर काळात प्रथमच भारतीय भाषांचे सर्वेक्षण होत आहे.
समकालीन परिस्थितीत अस्तित्वात असणाऱ्या आणि
विस्मरणाच्या सीमारेषांवर असणाऱ्या भाषांची नोंद व दस्तऐवजीकरण या निमित्ताने होत आहे.




# भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण महाराष्ट्र

**संपादक : अरुण जाखडे**

**सर्वेक्षण मालिका संपादक : डॉ गणेश देवी**

आकार : डबल क्राऊन, पृष्ठे : ८००
मूळ किंमत : ₹ १२०० सवलत २०%

**वाङ्मयीन प्रतिष्ठा असलेला दिवाळी अंक**

# पद्मगंधा

दीपावली २०१३ । १५० रुपये

◆ **मुलाखत :** श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार **गुलजार** यांची अंबरिश मिश्र यांनी घेतलेली मुलाखत

◆ **साहित्यविचार :** डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी कादंबरी या वाङ्मयप्रकाराविषयी केलेली प्रदीर्घ चर्चा

◆ **आंदोलन :** बारामती आंदोलनाबद्दल राजू शेट्टी यांचा लेख

◆ **विशेष विभाग – दुरावा**

या विभागात 'दुरावा' मांडला आहे तो –

रुक्मिणी आणि सत्यभामा, गांधीजी आणि त्यांची मुलं, कुमार गंधर्व आणि रामकृष्ण बोंद्रे, टिळक आणि आगरकर, उद्धव आणि राज ठाकरे यांमधील अरुणा ढेरे, अरुण खोरे, रविप्रकाश कुलकर्णी, अरविंद गोखले, सुकृत खांडेकर अशा मान्यवर लेखकांनी

◆ **कथा :** नागनाथ कोत्तापल्ले, अरुण साधू, श्रीकांत बोजेवार, प्रल्हाद जाधव अशा मान्यवर लेखकांच्या पाच कथा

**याशिवाय** ललित लेख व इतर वाङ्मयीन लेखांनी समृद्ध झालेला परिपूर्ण दिवाळी अंक

**साहित्य आणि सिनेमा विशेषांक**
**अभिजात आणि संग्राह्य दिवाळी अंक**

# उत्तम अनुवाद

दीपावली २०१३ । १५० रुपये

साहित्य आणि सिनेमा या दोन कलांमधील परस्पर संबंध आणि फरक स्पष्ट करणारे लेख आणि ज्या साहित्यकृतींवर सिनेमे निर्माण झाले अशा भारतीय व परदेशी कथा, कविता, नाटक यांचे अनुवाद

**कथा –** मन्नू भंडारी (रजनीगंधा), मुन्शी प्रेमचंद (शतरंज के खिलाडी), गि द मोपांसा (द डायमंड नेकलेस), ओ हेन्री (लुटेरा), फणीश्वरनाथ रेणु (तिसरी कसम), चुनिलाल मडिया (मिर्च-मसाला), सी. व्ही. श्रीरामन (चिदंबरम), राजेंद्रसिंह बेदी (गर्म कोट), ताराशंकर बंदोपाध्याय (जलसाघर), टेनिसी विल्यम्स (अकाले), विनोदिनी नीलकंठ (काशिनो दिकरो), अशा अनेक भारतीय, जपानी, इंग्रजी व इतर भाषांतील कथा, कविता व नाटक या साहित्यप्रकारात सर्वश्रेष्ठ साहित्याचा एक अभिजात दिवाळी अंक. एकूण विविध भाषांतील **१६** कथा, **२५** कविता, **३** लेख व **एक** नाटक, **एक** मुलाखत

# देठातली मुळाक्षरे

**डॉ. यशवंत पाठक**

*गोदावरी वाचता वाचता वाढत गेलो. खडकांशी बोलता बोलता ऋतू फुलले. कालांतराने खडक संपले. तरीही गोदावरी वाहते आहे. तिचा जगण्याचा देठ पक्का आहे. त्यात खूप अक्षरे खेळतात. ती आपल्याशी बोलतात. जीवनातला रस जपतात. घंटांच्या नादात सावध करतात. आसपासचा निसर्ग सतत नवीन सांगतो. गोदावरीचे वाहणे सुरेल असते. आयुष्याला तीच सोबत करते. गोदावरीने हे दिले. ते आपण कितपत घेतो यावर सारे आहे. मला नेहमी वाटते. आपण नदीकाठी राहावे. नदीकाठ वेगळाच असतो. नदीला अनुभवणे हा एक अनुभव ठरतो.*

मला गोदावरीतीरी राहायला नेहमी आवडे. विविध ऋतूंतली गोदावरी देखणी असे. गोदावरीतले खडक म्हणजे तिने लिहिलेली मुळाक्षरे होय. खडकातली गोदावरी बघत राहावीशी वाटे. तिचा प्रवाह खडकांना घाट देई. खडकाला नवा आकार येई. तेव्हा तो खडक नवा होई. त्याचे ओबडधोबडपण संपे. तो बोलका होई. त्याला किती बोलू, आणि किती नको, असे होई. खडकातली भौगोलिक प्रक्रिया आपणास माहीत आहे. ती तात्पुरती नसते. तिच्यात विविध घटक समाविष्ट असतात. खडकांचे आकार झिजेतून जन्मतात. हे त्याचे झिजणे चंदनासारखे असते. खडकांना वेगळा वास असतो. कधी कधी त्यातल्या खोबणी छोटी छोटी तळी करतात. ती सारखी नसतात. त्यात वैविध्य असते. हे सारे सहसा लक्षात येत नाही.

कुठल्याही फॉर्मचे असेच असते. ते लक्षात आले की फॉर्ममधली सहजता लोपते. खडकातील पाझर फॉर्म निर्माण करतात. पाझर खडक फोडीत नाहीत. ते खडकातून नवा खडक तयार करतात. अशा खडकांवर बसायला रामायणातील रामाला आवडे. सीतेने पंचवटीत काही काळ वास्तव्य केले. तिला खडक हेच माहेर होते. मनातले ती खडकांशी बोले. खडकांवरून वाहणारी गोदावरी कधी तिला बिलगे. तर कधी गोदावरी गप्प राही. थोड्यावेळाने सीतेच्या लक्षात येई. गोदावरीची झुळझुळ थांबली आहे. सीतेला वाटे; तिला आपल्याशी बोलण्याचा कंटाळा आला आहे. सीता अचानक थांबे. गोदावरी तिच्यात थांबे. प्रवाह संथ राही. तळाशी खळाळ होई. व्यक्त अव्यक्त होई. ही व्यक्त होण्याची अर्थपूर्ण रीत आहे. ती जाळीत जाळी निर्माण करते.

फक्त काळजीपूर्वक ऐकावे लागते. लक्ष देऊन ऐकले नाही, तर कोणीच कोणाचे ऐकत नाही. हा सिद्धांत गोदावरी आज सांगते आहे. गोदावरीला ऐकण्याला वेगळा कान लागतो. तो मनाचा कान असावा लागतो. व्यवहारात वरवरचे ऐकणे सुरू असते. ते कितपत मनावर घ्यावे, हे ज्याच्या त्याच्या संवेदनांवर असते. संवेदना ही एक वेगळी देणगी आहे. गोदेच्या

प्रवाहाने ही संवेदना विश्वाला दिली. ती किती वर्षे वाहते आहे, यापेक्षा काहीही झाले तरी ती आज वाहते आहे. हे लक्षात घेण्याजोगे आहे. हे सोपे नाही. त्यासाठी तिने जे काही सोसले, त्याच्या 'मिथ्' झाल्या.

सीतेला गोदावरीने सतत धीर दिला. पंचवटीला सांभाळले. तपोवनातील ऋषींना जोपासले. दंडकारण्य समृद्ध केले. यातून मनाची जडणघडण झाली. ते मन सतत सकारात्मक राहिले. आजही गोदावरीतले खडक धीर देऊन आहेत. यातील बरेच खडक सिमेंटच्या माऱ्यात संपले आहेत. सिमेंटच्या सपाटीकरणाने गोदावरीची चौपाटी झाली आहे. संध्याकाळी चिवड्यांचे कागद, भेळेच्या प्लास्टिकच्या पिशव्या, आइसक्रीमचे कप यांचा खच पडलेला असतो. दुसऱ्या दिवशी तो उचलला तर नशीब, नाहीतर त्यावर आणखी एक खच पडतो. असे खचावर खच चढत माणसाचे खच्चीकरण होत आहे. याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. गोदावरीची निर्मळता ही आपल्यासाठी मोलाची आहे. भावी पिढ्यांचे आरोग्य यात आहे. पर्यावरणाचे जाणीवपूर्वक भान गोदावरी देते. खडक गेल्याने गोदावरी अकारण तुरुंगात अडकली. प्रवाहातली नैसर्गिकता संपली, खडकांचे सौंदर्य लोपले.

गोदावरीच्या काठी रमणीय बने होती– चिंचबन, औदुंबरबन, आंबाबन, पिंपळबन इत्यादी. रामायणकाळात ही बने समृद्ध होती. ऋषींनी या बनांत आश्रम काढले. अभ्यासाची जागा इतकी सुंदर कोणतीही नाही, हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी स्थापन केलेली गुरुकुले ज्ञानाच्या कक्षा ठरल्या. निसर्गातला सहवास अभ्यासाला प्रवृत्त करतो. वृत्ती पुलकित करतो. मनाला उभारी देतो. अस्तित्वाला आपला म्हणून एकसाथ प्रत्यय येतो. अशी गुरुकुले पाहायला मिळाली असती तर? त्यात प्रवेश घेतला असता, या जर-तरच्या द्वंद्वात आज ही 'मी' गुंतलेला आहे. गुरुकुलातून अभ्यासाची खोली मिळते. ज्ञान घ्यावेसे वाटते. कालांतराने गुरुकुलाच्या पाठशाळा झाल्या. अध्ययनाची केंद्रे बदलली. पठणपरंपरेने वेगळा विश्वास निर्माण केला. वेदपाठशाळा निर्माण झाल्या. स्वरांना सामर्थ्य आले. शब्दांच्या उच्चारातून त्या त्या विशिष्ट भावांचे प्रकटीकरण जन्मले. हे व्यक्त होण्याला पोषक ठरले. गोदाकाठी फिरताना एक सतत जाणवते ते असे.

समर्थ रामदास अभ्यासासाठी गोदाकाठी आले. गौतमऋषींनी पहिली भातशेती गोदाकाठी केली. त्यांना गोदावरी कशी दिसली असेल? समर्थ गोदाकाठी भरपूर फिरले. आपल्या काळातील जनस्थानाकाठी असलेल्या गोदावरीची किती रूपे त्यांनी अनुभवली असतील! गोदावरीने नारायणाला समर्थ केले. समर्थांनी माधुकरी घेऊन गोदाकाठी सेवन केले. माधुकरीतून निर्माण झालेली मधुकर वृत्ती अभ्यासाला पूरक ठरली. चिंतनाला गोदेने खोली दिली. कदाचित चिंतनाचा उत्कट उदगार करुणाष्टकांत प्रकटला. गोदेची खोली करुणाष्टकांतून दिसली. मनाचे बोलणे करुणात्रिपदी ठरली. मानवी मनाचे नेमके वर्णन करुणाष्टकांत येते. मनाची ओळख अवघ्या एका शब्दातून कळते. मन कसे आहे? 'अचपळ मन माझे'. मनाचा वेग अतर्क्य आहे. त्याला कोणीही जिरवीत नाही. मनाला सांगणे हेच कठीण काम आहे. कारण ते मन ज्याचे आहे, ते त्याच्याही हातात राहत नाही. ते कधीही थाऱ्यावर नसते. अशा मनाला गोदावरी सरळ करते. गोदाकाठी उभे राहिले की मनाला उकळी फुटते. मन बोलू लागते. बोलता बोलता अंतर्मुख होते.

पंचवटीत समर्थांनी गोदावरीच्या साक्षीने श्रीरामांशी संवाद साधला. तो करुणाष्टकांच्या रूपाने विलक्षण आहे. त्यात मनाबद्दलचा सगळा कबुलीजबाब येतो. मनाविषयीची निरीक्षणे त्यात येतात. ही निरीक्षणे केवळ माणसांना बघून येत नाहीत. तर मानवी मनाच्या तळाशी पाणबुड्यासारखे हिंडावे लागते. मनातल्या प्राणवायुशी खेळावे लागते. खेळता खेळता बऱ्याच गोष्टी काढून घ्याव्या लागतात. सदा सर्वदा मन बोलते असे नाही. मनातले धुमसणे मनातल्याच बर्फातून येते. हे कळायला मन लागते. तुम्ही किती सांगणार! तुम्ही किती बोलणार! याला काहीही अर्थ नसतो. मनाने घेतले तर सारे काही घडून येते. म्हणून समर्थांनी मनोबोधाला 'योगवाशिष्ठा'चा आधार घेतला. वसिष्ठ ऋषींनी रामाला मनाविषयी काही विवेचन केले. यातून त्यांनी रामाला असे सांगितले, की, 'रामा!, ध्यानात घे. मनाने कोणतीही गोष्ट घेणे महत्त्वाचे आहे. इथे माणूस, छोटा आहे का मोठा आहे, हा प्रश्न नाही. तर, माणूस मनाने किती घेतो आहे, मन लावून किती काम करतो आहे, मनाला आपल्याबरोबर पुढे जायला किती लावतो आहे, हे खूप महत्त्वाचे आहे. मी हे केले. मी ते केले. यात मनाचा कोतेपणा आहे. यामुळे मोठेपण सिद्ध होत नाही. मनाने केलेले कोणतेही चांगले काम सिद्ध होते, तेव्हा दुसरी मने त्याची आदरपूर्वक नोंद घेतात, ते अर्थपूर्ण आहे. कोणत्याही कामाचे मूल्यमापन काळ ठरवितो. माणसाला ते ठरविणे अवघड आहे. कारण माणूस क्षणभंगुर आहे. मनाला एवढे कळले, तरी ही मन नक्की पुढे जाते. अशी सुंदर मने इतिहास निर्माण करतात. संस्कृतीचे मानदंड ठरतात. इतरांना प्रेरणा देतात.'

खडकांचे वय आपण काढावयाचे. त्यांना ते माहीत असेल? त्यांच्यापाशी जन्माचा दाखला नाही. तो कदाचित पृथ्वीच्या कपाटात असला तर असला. खडक नेहमीच

वर्तमानात असतात. त्यांना झिजण्यात आनंद वाटतो. संपण्यात समाधान वाटते. ते तक्रार करत नाहीत. तुम्ही माझा किती वेळ घेतला, म्हणून कुरकुरत नाही. त्यांना एकच ठाऊक असते. ते म्हणजे, पाण्यात खेळणे. पाण्याशी मैत्री करणे. पाणी अंगावर घेणे. यदाकदाचित पाणी थकले, की ते खडकाच्या माजघरात जाऊन बसते. निवांत पडते. आभाळाला त्याचा हेवा वाटतो. म्हणून ते अलवारपणे त्याच्या कुशीत येते.



पाण्याला उठवत नाही. जेव्हा पाण्याला जाग येते, तेव्हा ते आभाळाकडे बघते. आभाळ शांत असते. आभाळातली शांतता हेच त्याचे बोलणे असते. दोन शांत मने एकमेकांना भेटल्यावर अथांग तृप्तता प्रकटते. तिथे बोलणे गौण ठरते. कारण ते समर्पणाचे होणे असते. शब्द अशा आनंदात आपणहून एक होतात. अशी दृष्टी नितळ भान देते. खडकांवर ऋषी तप करीत, असे लहानपणी अनेकदा गोष्टीतून एकले आहे. बरेच दिवस तप म्हणजे नक्की काय, ते कळले नाही. एकदा गुरुजींना विचारण्याचे धाडस केले. अगाऊपणे गुरुजींच्या पुढ्यात उभा राहिलो. त्यांना म्हणालो,

''तप म्हणजे काय?''

यावर गुरुजी माझी कीव करीत हसत राहिले. मी गप्प बसलो. काही वेळाने गुरुजी माझ्या खांद्यावर हात ठेवीत म्हणाले,

''थोडा मोठा झालास की आपोआप कळेल.''

''गुरुजी, शब्दकोशात बघू?''

''शब्दकोशात नाही सापडणार. तप हे शब्दांत सांगता येत नाही. तो अनुभव आहे. त्याचा अनुभव जो घेतो, त्याला तो कळतो. कदाचित तपाला समांतर असे शब्द सापडतील. परंतु तपाचा अनुभव येणार नाही. आचार्य विनोबा भाव्यांचं एक वाक्य तुला सांगतो. 'शब्द पुस्तकात असतात. अनुभव सृष्टीत असतो.' लक्षात ठेव. अरण्यात ऋषी तप करतात. प्रयोगशाळेत वैज्ञानिक तप करतात. उद्योगशाळेत उद्योजक तप करतात. घण मारणारा लोहार तप करतो. या सगळ्यांना अफाट परिश्रम करावे लागतात. परिश्रमातून जो आपलं ज्ञान व्रतस्थ वृत्तीनं मिळवून लोककल्याणार्थ देतो, त्याला तप म्हणतात. म्हणजे तू न सांगता केलेला अभ्यास हे तप आहे. तपाला वय नसतं. तपामुळे वय वाढतं. सुंदर काम हे सुंदर तप असतं. ध्रुव वयानं लहान होता. परंतु तपातून तो अढळ झाला. प्रल्हादाला बालवयात तपाची गोडी लागली. म्हणून तो श्रेष्ठ साधक झाला. गॉलिलिओ सतत अभ्यासात आणि निरीक्षणात असे. तेच त्याचं तप होतं. कोपर्निकसच्या अवलोकनानं विज्ञानाच्या अभ्यासाला वेगळी गती आली. आइन्स्टाईननं आजन्म अभ्यासाचं तप केलं. अशी विविध उदाहरणं आहेत. थोडा वाढलास की तप कळेल. तुझ्या घरात उदाहरण आहे. तुझे बाबा सतत अभ्यास करतात. हेच तप आहे.''

मी खडक झालो. माझ्या अंगावर गुरुजींचा वाक्प्रवाह वेगाने वाहत होता.

यावरून एक लक्षात आले. तप हे सगळ्यांना शक्य आहे. परंतु ते सगळ्यांना जमत नाही. कारण उथळ स्वभावाचे नमुने आसपास सतत फिरतात. त्यांना वाटते आपण थोर तपी आहोत. गुरुजींनी बाबांबद्दल जे उद्गार काढले, त्याने छाती फुगली. म्हणजे माझे बाबा ग्रेटच आहेत. मी बाबांना बघत होतो. ते माझ्याशी नेमके बोलायचे नि अभ्यासात कायम

MAjESTIC ON THE NET
majesticonthenet.com

# आता मिळवा घरपोच पुस्तके !

www.majesticonthenet.com या साईटवर
आपणांस आता घर बसल्या पुस्तके खरेदी करता येतील.

कादंबरी, कथा, कविता, नाटक, चरित्रे-आत्मचरित्रे,
ललितलेखन, आरोग्य, पाककला, व्यक्तिमत्त्वविकास,
मानसशास्त्र, संगीत, कला... यांसारख्या अनेकानेक
वाङ्मयप्रकारांतील सर्व प्रकाशकांची मराठी व इंग्रजी पुस्तके.

कथाकथन, नाटक, बालगीतं, शास्त्रीय संगीत, भक्तिगीते,
चित्रपट इ. मराठी सिडीज् उपलब्ध.

३०० रुपयांवरील ऑन लाईन कार्ड खरेदी केलेली पुस्तके
पाठविण्याचा खर्च आमचा. (Free shipping)

रुपये ५०० व त्यावरील किंमतीची पुस्तके मागविल्यास
'कॅश ऑन डिलिव्हरी' सध्या मुंबई, ठाणे, डोंबिवली, कल्याण,
वाशी आणि पुणे येथे उपलब्ध.

तर रसिकहो, आपली आवडती पुस्तके मागविण्यासाठी
Click करा-
www.majesticonthenet.com या साईटवर
Customer Care No. +91-9167566213

VISIT US
www.majesticonthenet.com

राहायचे. मात्र त्यांचा अभ्यास पुस्तकापुरता मर्यादित नव्हता. ते किल्ले बघायचे, जंगले बघायचे तीर्थांच्या निमित्ताने नद्यांचा अभ्यास करायचे. डोंगरांशी बोलायचे. अरण्यातील वनस्पतींचा त्यांचा अभ्यास विलक्षण होता.

ते आयुर्वेदाचे उतम अभ्यासक होते. आयुर्वेदाचार्य विष्णुशास्त्री केळकर, वैद्य अण्णाशास्त्री दातार, वैद्य श्रीराम करमरकर हे त्यांचे स्नेही होते. ते नेहमी आमच्या घरी येत. थोडा वेळ घरात बसत. मग ते बाबांना घेऊन गोदाकाठी खडकांवर बसत. तिथे त्यांच्या गप्पा होत. आपापले दवाखाने संभाळून ते येत. स्वच्छ वाहणाऱ्या गोदावरीला पाहून त्यांना भरती येई. ते सायम् संध्या करीत. अस्तास जाणाऱ्या सूर्याला ते अर्घ्य देत. तेव्हा त्यांचे चहरे तेजस्वी दिसत. या चौघांच्या कपाळावरील अष्टगंधाचे टिळे उद्याचे सूर्य होत.

खडकाला बिलगणारा वारा त्यांना हलवी. तो त्यांना हवाहवासा वाटे. सोबत नाशिकचा प्रसिद्ध चिवडा असे. नवीन संशोधनाच्या वाटा ते बघत. अभ्यासातून आणि प्रत्यक्ष अनुभवातून गोदावरीच्या साक्षीने आपण काहीतरी वेगळे करावे, असे त्यांना वाटे. हे त्यांना गोदावरीने दिलेले सामर्थ्य महत्त्वाचे होते. मुळात गोदावरीचे पाणी कठीण, पचायला जड. ते पाणी पचवायला थोडा वेळ लागतो. एकदा त्याची सवय झाली, की मग गोदावरी आपली होते. कठीण पाण्याच्या गुणधर्मामुळेच त्या पाण्यातली तेजस्विता काही प्रतिभावंतांनी सहज हेरली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर आणि कविश्रेष्ठ कुसुमाग्रज अर्थात नाटककार वि.वा.शिरवाडकर हे गोदेच्या तेजाचे ठळक मानबिन्दू आहेत. 'स्मृतिचित्रे'कार लक्ष्मीबाई टिळक यांची आणि गोदावरीची मैत्री खूप आहे. बालकवी गोदाकाठच्या औदुंबरबनात खूपदा रमत.

कविवर्य सोपानदेव चौधरी गोदावरीच्या खडकांवर नेहमी येत. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लिहिलेली, 'गोदाकाठचा संधिकाल' ही कविता हा एक सुंदर अनुभव आहे. 'स्वप्नाची समाप्ती', 'पृथ्वीचे प्रेम-गीत', या कविता कुसुमाग्रजांना गोदेकाठी स्फुरल्या. सुधाताई अत्रे आणि दुर्गा भागवत यांनीही गोदाकाठ अनुभवला. नारदीय कथेचे महत्त्वाचे श्रेष्ठ कथाकार गोविंदबुवा होशिंग हे गोदाकाठी राहत. यांनी नाशिकच्या गोराराम मंदिरात अनेक चातुर्मास केले. ते मंदीर आजही गोदाकाठी आहे. ल.रा. पांगरकरांचे 'मुमुक्षू' हे मासिक गोदाकाठी सुरू झाले. चित्रपटसृष्टीचे आद्यजनक दादासाहेब फाळके यांनी स्थापिलेली 'गोदावरी सिनेटोन' ही संस्था गोदाकाठी होती. वेदमूर्ती म.म. श्रीधरशास्त्री वारे, लक्ष्मणशास्त्री गर्गे, नारायण देव, शांतारामजी भानोसे, लक्ष्मीकांत दीक्षित, एकनाथशास्त्री दीक्षित आदींनी प्राच्यविद्येची परंपरा जोपासली. थोर पंडित कवी मधवमुनिश्वर आणि निरंजन रघुनाथ यांना गोदाकाठ अतिशय प्रिय असे. त्यांच्या कवितेत तो आलेला आहे. ही सारी समृद्धी गोदावरीने संस्कृतीला दिली. खडकांवर बसल्यावर माझ्या मनात हे सारे उमटे. समृद्ध वारसा याला म्हणतात. गोदावरीचे पाणी हे नुसते पाणी नाही. ते मानवी जीवन आहे. त्या जीवनात निव्वळ जगणे नाही. 'मी' समृद्ध करणे. ती समृद्धी इतरांना देणे. समृद्धीतून ज्ञान, कला, विज्ञान, संस्कृती, व्यापार, उद्योग या सगळ्यांनी मिळून माणसाच्या पूर्णत्वाकडे जाण्याचा आराखडा तयार करणे. याला 'कुंभ पर्व' म्हणतात.

गोदावरीचे स्थान गंगेइतके महत्त्वाचे आहे. गोदाकाठच्या नाशिकला दक्षिणकाशीचा मान आहे. हे थोर संचित फार महत्त्वाचे आहे. यामुळे संस्कृतीचे स्तर अभ्यासता येतात. नदीला प्रत्येक ऋतूत वेगवेगळे रूप असते. म्हणून नदी बाराही महिने रूपवान असते. ती कधीही क्षीण होत नाही. तिच्या इवल्याशा प्रवाहाला देखील सैंदर्य असते. पुरातही तिचे लावण्य विराट वाटते. तिच्यातले भोवरे हे दर्शनांचे मंडप वाटतात.

गोदावरीला पहिला पूर येई. पूर अधिक वाढे. पुरात अनेक वृक्ष येत. राडारोडाही येई. कितीदा खाटा वाहिलेल्या आहेत. त्यावरल्या माणसांचे काय झाले असेल! काही अंतरावरच भोवरा तयार होई. वरवर पाण्याची गोलगोल आवर्तने दिसत. त्यातून पाण्याला वेग येई. गोलात जे सापडे, ते पुढे कुठे जाई, ते न कळे. अशा भोवऱ्यांना तालीमबहाद्दर पार करीत.

पुरात पोहणे हे काही माणसांचे वैभव होते. पूर पाहायला गाव लोटे. व्हिक्टोरिया पुलावरून पैलवान उड्या मारीत. पोहत पोहत अनेक भोवरे कापीत. ते गाडगे महाराज धर्मशाळेच्या काठाला लागत. गोदावरीच्या पाण्याची श्रीमंती श्रावणात पाहावी. पुराचे पाणी सराफ बाजारात शिरले, किंवा नावदरवाज्यात शिरले की अनेक स्त्रिया गोदावरीच्या ओट्या भरीत. काही तिचे औक्षण करीत. नारोशंकराच्या घंटेला पाणी लागले, म्हणजे सरकारवाड्याच्या पायऱ्यांशी पाणी खेळे. अर्धे नाशिक पाण्यात असे. आम्हा मुलांना पुरामुळे शाळेला सुट्टी मिळे. आपल्या गल्लीत गोदावरी आली याचे आम्हा पोरांना अप्रूप वाटे. गल्लीतल्या पाण्यात आम्ही पोरे पळापळी खेळत असू. पोलिस आले की आम्ही ओळखीच्या वाड्यात पटकन शिरायचो. मावशींना सांगण्याच्या आत त्या आमच्याकडे बघायच्या. आम्हाला पंचा द्यायच्या. आम्ही पंचाने अंग पुसायचो. थोड्यावेळाने गरम सांजा बशीत यायचा. सोबत कैरीचे लोणचे किंवा लिंबाचे लोंणचे असायचे. गोदेत खेळून

सांज्याची पहिली वाफ तोंडावर घेताना, आपण सूर्याशी खेळत आहोत असे वाटे.

पहिल्या वाफेचा सांजा शरीराला आणि मनाला तरतरी आणी. सोबत लिंबाचे लोणचे. त्यातून निर्माण होणारी चव सांगता यायची नाही. आम्हा पोरांना वाटे, गोदावरीने असे रोज रोज गल्लीत यावे. आमच्या घराला पाण्याचा वेढा घालावा. म्हणजे आम्हाला मावशींच्या हातचा गरज सांजा मिळेल. यावर मावशी म्हणायच्या,

''अरे, रोज सरकार वाड्यापाशी गोदावरी आली, तर आपल्याला पंचवटीत जाता येईल काय? आपले दैनंदिन व्यवहार कसे होणार? किराणा गोदावरीने घेतला तर आपण काय करायचे?''

यावर आम्ही सारे खो खो हसू. पुराखाली खडक जात. खडकांचे काय होत असेल? ते गुदमरतील. त्यांना पूर सहन होणार नाही. व्हिक्टोरिया पुलाच्या कमानीला पाणी लागले की खडक आहेत की नाहीत, असे होई. बाजारातून नवी कोरी वही घरी आणल्यावर जशी दिसे, तशी गोदावरी पुरात दिसे. तिच्या आत अनेक देवळे लपत. अनेक समाध्या लपत. अनेक धर्मशाळांचे तळ गायब होत. प्रवाहाचे विश्वरूप बघताना बाकी काहीही आठवत नसे. पण कविवर्य चंद्रशेखरांच्या 'गोदागौरव' या खंडकाव्यातील पुढील ओळी आठवत–

तल्लीलेमधि तल्लीन नहो कल्लोलिनि कवि कवण तरी।
जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे भवताप हरी।।

यातील लय पुराच्या लयीत सामावे. पूर अनुभवणे ही मनाची विश्वात्मकता होते. गोदावरीचे विराट रूप हे एक विश्वरूपदर्शन होते. पुरातून काही मंदिरांचे दिसणारे कळस उद्‌गारचिन्हांसारखे दिसत. दूरवर बघितले की फक्त गोदावरी दिसे. पावसात भिजतोय, कपडे ओले झाले आहेत, छत्रीचा काहीही उपयोग नाही असे होई. पावसाची झड चालू असे. तीन–तीन चार–चार दिवस सूर्यदर्शन नसे. कधी कधी तर ढगच दिसेनात. आकाश रजेवर गेले की काय? पाऊस आकाशाचा सारा कब्जा घेई. हे वर्षाकाळाचे विराट भान फार वेगळे होते.

पुराचे पाणी कालांतराने ओसरे. पाण्यातल्या वस्तू दिसायला लागत. मंदिरावरले कळस स्वच्छ होत. मंदिरात चिखल होई. काही घरे पडत. झोपड्या पडत. काही ठिकाणी घरांचे अवशेष दिसत नसत. हळूहळू सारे दिसू लागे. काही भिंतींमध्ये झाडांच्या फांद्या ताटकळत. चिखलातून पाणसाप वळवळत. शंखात लपलेल्या गोगलगाई येत. कधी कधी विंचूही फिरत. काही प्राणी मृत होऊन पडत. जिकडेतिकडे गाळच गाळ पसरे. गोदावरी शांत होई. खडक पुन्हा दिसत. खडकांवरला चिखल कमी कमी होई. घाटांच्या पायऱ्यांवरला चिखल ठप्प पडे. गोदावरीतली विविध तीर्थे आहे त्या जागी चिखलासह शांतपणे उभी असत. पंचवटीचा पूल बऱ्यापैकी पडलेला असे. पंचवटीतली पडझड कल्पनेच्या पलीकडली असे.

पडझडीतून माणूस पुन्हा स्वत:ला गोळा करीत उभा राहिला. वस्तूंना पाहू लागला. प्रत्येक पुराच्यावेळी त्याच्या ध्यानात आले, की आपण संसारात किती निरर्थक वस्तू गोळा करतो! त्यांचा काहीही उपयोग नसतो. जे गोळा करायला पाहिजे, ते करीत नाही. उदा. गोदेच्या पात्रात घर बांधायचे नाही. वृक्षांना हटवून बांधलेल्या घरात सतत ओल राहते. सामान कोंबायचे नाही. मानवी वृत्तीसारखे ते हलके ठेवायचे. सामानाचे ओझे केले की माणूस जड होतो. त्याला त्याचे सामान उचलण्याइतकी त्याच्यात शक्ती हवी. नाहीतर सर्व फरफट होते. सामान वाहून गेले की माणूस हाय हाय करतो. या करण्याला काहीही अर्थ नसतो. पुन्हा त्याला गोदावरीपाशीच यावे लागते. गोदावरीची विनवणी करावी लागते. कारण ती जीवनदायिनी आहे. ती नाहीशी झाली तर माणसाचे काय होईल? गोदावरीला त्रास द्यायचा नसतो. जे काही करायचे, ते तिच्या साक्षीने करायचे. तिच्या भोवतीचे वृक्ष कापले की तिला, आपल्या नात्यातला माणूस गेल्यासारखे वाटते.

ती आदिकाळापासून मुळांना सांभाळत आलेली आहे. तिच्या मुळाशी नितळ शब्द आनंदाने खेळतात. आजही तिला पाहून अनुभवाचे भरते येते. तिच्याकाठी विविध कला–साहित्य भरते आहे. कसे व्यक्त व्हावे हे गोदावरीकडून शिकावे. ज्याचा त्याचा अनुभव भिन्न आहे. त्यातील प्रवाह ध्यानात घेतला, तर जगण्याला धीरोदात्त अशी रम्य लय सापडते. गोदावरीने दिलेली समृद्ध जाणीव आपण लक्षात घ्यावयास हवी.

मी नवे घर घेतले. ते गोदाकाठी आहे. खिडकीतून गोदावरी दिसते. रामशेजचा डोंगर दिसतो. स्वच्छ आभाळ बोलते. झाडे मला बघून डोलतात. गोदावरी सतत वाहते. कधी कधी ती थकलेली दिसते. परंतु तिचे प्रवाही राहणे हे, आजच्या वर्तमानात कसे राहावे याचे सुरेख उत्तर आहे. तिला लागून डांबरी रस्ते झाले आहेत. हौसिंग सोसायट्यांचा कोलाहल माजला आहे. त्यामुळे पक्ष्यांची किलबिल दूर दूर चालली आहे.

सुरुवातीला मी राहायला आलो तेव्हा पहाटे मला मोर उठवीत. मोरांचा केकारव मला गोड वाटे. पहाटेच्या पावसात मोराचा फुललेला पिसारा बघितला की मी हरखून जाई. पिसाऱ्यातले आभाळ मोराच्या पायात येई. तेव्हा मोर असा काही नाचे की वा रे वा! मोराबरोबर लांडोरही येई. तिची पिलेही

असत. मोराचे कुटुंब सभ्य होते. माणसाच्या पायाचा आवाज आला की, मोर बोरीबाभळीच्या वस्तीत पटकन पळत.

मोर कुत्र्यांना घबरत नसत. पक्ष्यांच्या किलबिलीत ते आपला सूर मिसळवीत. मोरांना आवाजाचे ज्ञान उत्तम असावे. म्हणूनच त्यांच्या गळ्यातील निषाद- नि- संगीताने स्वीकारला. पंडित कवी मोरोपंतांना केकारवातून 'केकावली'सारखे उत्कृष्ट काव्य लिहावेसे वाटले. मोराचा केका जितका आर्त आणि भावुक असतो, तितका भक्ताने देवासाठी केलेला धावा तसा असतो. केकावलीत पृथ्वी वृत्तातली रचना आहे. पृथ्वी हे सहनशील वृत्त आहे. ते सर्वसमावेशक आहे. मोरोपंतांनी या वृत्तातून केकावली लिहिली. कधी कधी मोर माझ्या घराजवळ येई. पहाटेची शांतता अनुभवी. मी त्याला मदत करी. मलाही वाटे, अशी शांतता हवी. परंतु काही क्षणांत गॅलरीतून आवाज येत. हे आवाज कधी भांड्यांचे, कधी कपड्यांचे तर कधी माणसांचे असत. आवाज जराही कानावर गेला की मोर चपळ गतीने गोदाकाठच्या वृक्षबनात निघून जात. तेव्हा पिसारा शेपटी होई. पिसाऱ्यावर थोडा उजेड पडला की मोर दूर दूर निघून जात. मोरांना माणसे नको असत. त्यांनी बरोबर ओळखले. आज माणसाचा माणसाला उपयोग नाही, तर मोर कशाला माणसाची मदत मागेल!

माणूस माणसाच्या जीवावर उठला आहे. जीवाशी खेळ करण्यात तो रमतो. यातून हिंस्र वृत्ती वाढते आहे. तोंडावर ॲसिड फेकले जात आहे. सामुदायिक बलात्काराच्या भीषण बातम्या वाचवत नाहीत. अत्याचारांना धरबंध राहिलेला नाही. हे सारे कशाने घडते आहे? माणसाच्या अंतरंगातली स्वच्छता होत नाही. तो विकृतींनी पछाडलेला आहे. पैसा आणि भोग हे त्याच्या जगण्याचे दोन पाय आहेत. त्याला त्याचे काहीही नाही. ही वृत्ती नाहीशी करण्यासाठी मोराच्या केकारवातली पहाट नीट ऐकली पाहिजे. गोदावरीच्या पवित्र पाण्याला जागले पाहिजे. वृक्षांच्या सान्निध्यात निरपेक्ष जीवन जगणे शिकले पाहिजे. हा सगळा संस्काराचा भाग आहे. तो आपला आपण केला पाहिजे. या गोष्टी शिकवून येत नाहीत. त्या आत्मसात कराव्या लागतात. मलाच वाटले पाहिजे; हा जगण्याचा अध्यादेश माझ्यातल्या 'मी'ने काढायला हवा. असे करता येईल?

गोदावरी वाचता वाचता वाढत गेलो. खडकांशी बोलता बोलता ऋतू फुलले. कालांतराने खडक संपले. तरीही गोदावरी वाहते आहे. तिचा जगण्याचा देठ पक्का आहे. त्यात खूप अक्षरे खेळतात. ती आपल्याशी बोलतात. जीवनातला रस जपतात. घंटांच्या नादात सावध करतात. आसपासचा निसर्ग सतत नवीन सांगतो. गोदावरीचे वाहणे सुरेल असते. आयुष्याला तीच सोबत करते. गोदावरीने हे दिले. ते आपण कितपत घेतो यावर सारे आहे. मला नेहमी वाटते, आपण नदीकाठी राहावे. नदीकाठ वेगळाच असतो. नदीला अनुभवणे हा एक अनुभव ठरतो.

गोदावरीने दिलेली मुळाक्षरे आजही मला नवीन वाटतात. त्यातून सतत जगण्याचा धीर मिळतो. निसर्ग माणसाला सांभाळत असतो. आपण निसर्गाला त्रास देतो. मग तो त्याची जागा दाखवून देतो. निसर्ग निसर्गाचे काम करतो. ते आपल्याला ओळखता आले पाहिजे. त्यासाठी मुळाक्षरे गिरवायची असतात. त्यासाठी बोटे आणि मन संवेदनाशील हवे. म्हणजे निसर्गाच्या मैत्रीला भावार्थ प्राप्त होतो. आजच्या जीवनात हे लक्षात घेण्याजोगे आहे.

बऱ्याच दिवसांनी गोदाकाठी गेलो. सारेच अनोळखी वाटले. दोन्ही काठांवर इमारतींचे मजल्यांवर मजले चढलेले होते. भाजीबाजारात वास येत होता. सांडपाणी गोदावरीत घाइघाईने चालले तेव्हा गोदावरी हताश झाली. तिचा नाइलाज झाला. तिने ते आपल्यात सामावून घेतले, पण ती असमर्थ ठरली. काठ बकाल झाले. खाण्याची दुकाने वाढली. सगळ्यांची विक्री सुरू झाली. लोक येत होते. जात होते. यात्रस्थ यात्रा उरकत होते. क्रिया-कर्माचा धूर वर वर जात होता. त्यातून आक्रोश एकू येत होता. जवळच वासुदेव झांज वाजवीत पैसे मागत होता. कपडे पळवून नेणाऱ्या मुलाला पकडले. त्याला बदड बदड बदडले. त्याने हूं की चूं केले नाही. तो उघडा होता. त्याला संवेदना नसाव्यात. समोर दुसऱ्या एका छोट्या मुलाने डुबकुळी मारली. अनाम अस्थी हातात घेतल्या. त्यातले पैसे गालात ठेवले. हात झटकले. पोहत पोहत दुसऱ्या काठावर आला आणि पळाला. हे दाहक वास्तव गोदावरी आजही सोसते आहे. गर्दीत काहीही होऊ शकते. हे सारे अनाकलनीय आहे.

तरीही गोदावरी पोर्णिमेच्या चांदण्यात कविता होते. अमावास्येत नक्षत्रांची गाथा होते. शुद्ध प्रीतिकथेची चंद्रकोर होते. प्रवाहातून संवादते. निवांततेत मौन होते. आरतीच्या प्रकाशात आजही सोनसळा होते. मंदिरातला घंटानाद मनाला सावध करतो. मंत्रघोषाचा स्वर मनातली अभ्रे दूर सारतो. समयांचा गाव सुखात नांदतो. नमस्कार झेपावतात.

**डॉ. यशवंत पाठक**
राम-जानकी, ए-२०१, चैतन्यनगर,
गंगापूर रोड, नाशिक-४२२ ०१३
yashwantpathak3@gmail.com

# सर्जनांचा सहवास

**डॉ. केशव साठ्ये**

'अभ्यासोनी प्रकटावे'चा वस्तुपाठ देणाऱ्या संगीत आणि माध्यमक्षेत्रातील दोन दिग्गज व्यक्तींचा सहवास मला मिळाला. जी.एन. जोशी यांच्या घरातच मी पेइंग गेस्ट म्हणून राहत होतो तर सुहासिनी मुळगांवकर दूरदर्शनमधील माझ्या ज्येष्ठ सहकारी होत्या. त्यांच्या सहवासातून माझ्या अनुभवाच्या शिदोरीत कायमच्या वस्तीला आलेल्या आठवणींची ही पुरचुंडी...

सुहासिनी मुळगांवकर हे नाव उच्चारलं की एक मंद सुगंध येऊ लागतो, एक चैतन्याची झुळुक आसमंतात पसरू लागते. तुम्हाला वाटेल असं एवढं पोएटिक होण्यासारखं काय आहे? पण खरं सांगतो, जे कोणी सुहासिनी मुळगांवकर या व्यक्तीला ओळखतात,त्यांना भेटले आहेत ते नक्कीच माझं हे म्हणणं पटून 'क्या बात है!' असं म्हणतील. १९८१ साली मी मुंबई दूरदर्शन केंद्रावर रुजू झालो होतो. तेव्हाचं दूरदर्शनचं वातावरण एकदम प्रसन्न होतं. सार्वभौम साम्राज्य, कुणाची स्पर्धा नाही, आपण करू तेच प्रेक्षक छोट्या पडद्यावर पाहणार असा एकूण मामला असल्यामुळे तेथील निर्माते, तंत्रज्ञ हे एका वेगळ्या विश्वात वावरत होते. सुहासिनीबाईही त्याला अपवाद नव्हत्या. दूरदर्शनचा दबदबा तर होताच, पण बाई स्वत: एका वेगळ्या मुशीत घडलेल्या होत्या. त्या संस्कृत स्कॉलर होत्या, मराठी भाषेवर त्यांचं प्रभुत्व होतं. उत्तम व्यक्तिमत्त्व, सुंदर आवाज त्यांना लाभला होता. टेलिव्हिजनसारख्या झगमगत्या माध्यमात शोभतील अशी फारच थोडी माणसं तिथं कार्यरत होती; त्यांत बाईंचा नंबर अव्वल होता. बाईंचा एकूण कलाक्षेत्रातला वावर आणि त्यांचं योगदान यामुळे त्यांना दूरदर्शनच्या कुबड्या कधी घ्याव्या लागल्या नाहीत. त्या स्वयंभू होत्या. त्यांच्यामुळे आमच्या केंद्राला शान होती. संगीत, साहित्य, संस्कृत भाषा यात त्या वाकबगार होत्या. बाई कधी साडीत, पंजाबी ड्रेसमध्ये तर कधी चक्क शर्टपँटमध्ये असायच्या, आणि या साऱ्या पेहेरावात त्या अगदी सहजपणे वावरायच्या. सहजपणा हा आत्मविश्वासातून येतो. बाईंकडे तो मुबलक होता. एखादा कार्यक्रम हा त्या निर्मात्याची ओळख होतो. जसं 'गजरा' म्हटलं की विनायक चासकर आठवतात, 'ज्ञानदीप' म्हणजे आकाशानंद तसं 'सुंदर माझं घर' म्हटलं की सुहासिनीबाईंची आठवण येते.

खास गृहिणींसाठी घरगुती बाजाचे हे कार्यक्रम नसायचे तर त्यातल्या 'सुंदर' या संकल्पनेशी यांचं नातं अधिक होतं. त्यामुळे संगीत, साहित्य, सामाजिक विषय असा मनोहारी गोफ या कार्यक्रमातून प्रकट व्हायचा. 'खाना खजाना' हा

आजचा लोकप्रिय कार्यक्रम आहे पण त्याकाळी मालती कारवारकर यांना घेऊन बाईंनी 'सुंदर माझं घर' अतिशय रुचकर असं बनवलं होतं. 'आवळे-जावळे' ही स्पर्धा घेऊन जुळ्यांवरचा अत्यंत कल्पक कार्यक्रम त्यांनी केल्याचं मला आजही लक्षात आहे.



त्यांच्या संस्कृतच्या व्यासंगामुळे 'अमृतमंथन' हा अभिजात भाषेचा, त्यातील संस्कृतीचा गौरव करणारा कार्यक्रम जन्माला आला. त्यात दाजी भाटवडेकर, वसुंधरा पेंडसे-नाईक अशी दिग्गज मंडळी भाग घ्यायची. प्रेक्षकांना या निमित्तानं आपल्या प्राचीन भाषेच्या सौंदर्याचा खरा लहेजा समजला.

त्यांना एकदा तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या दौऱ्याच्या वेळी माझगाव डॉक इथं स्वागतगीत संगीतबद्ध करण्यासाठी आमंत्रित केलं होतं. त्यांनी ते संस्कृतमधे बसवलं. या कार्यक्रमात आर. वेंकटरामन (तत्कालीन संरक्षणमंत्री) हेही सहभागी झाले होते. त्यावेळचे बाईंचे साहाय्यक पुरुषोत्तम गांगुर्डे, जयंत ओक यांनी ते गीत गायलं होतं. इंदिरा गांधी ते गीत ऐकून खूष झाल्या. अजित कडकडे, पद्मजा फेणाणी या गुणी गायकांना त्यांनी या माध्यमात संधी दिली, तीही आपण संगीतबद्ध केलेल्या गाण्यातून.

कार्यक्रमाच्या प्रसारणासाठी निर्मिती आणि तांत्रिक विभागातील कर्मचारी, अधिकाऱ्यांना सारथ्य करायला लागायचं. संध्याकाळी ५ पासून रात्री ११ पर्यंत- जयहिंद म्हणेपर्यंत - आम्हाला थांबून त्यांचं नियोजन करायला लागायचं. अनेक वेळा बाईंबरोबर माझी ड्युटी असायची. राष्ट्रीय कार्यक्रम चालू असताना आम्हाला आराम असायचा. अशावेळी बाईंबरोबर गप्पांच्या अनेक मैफली झडल्याचं मला आठवतं. सरकारी ऑफिसात वरिष्ठ, कनिष्ठ असा चातुर्वर्ण्य असतो, मात्र दूरदर्शनवर त्याला अजिबात थारा नव्हता. उपसंचालक याकुब सईद यांना चक्क सिगारेट मागायला निर्मिती साहाय्यकाला संकोच वाटत नसे. (होय, त्यावेळी अंबुमणी रामदास नव्हते, त्यामुळे सिगारेटला बंदी नव्हती) एकेरी नावानं हाक मारणं, स्त्री-पुरुष असा भेदभाव न करता सहकारी मित्रमैत्रिणींना येताजाता सहज आलिंगन देणं हा इथला नित्यक्रम होता. त्यामुळे एक उत्तम संवाद करायला अत्यंत पोषक वातावरण इथं होतं. बाईही मोकळेपणानं बोलायच्या. 'मी कशी दिसतेय रे?' केसांत फूल माळलेलं असेल तेव्हा हमखास हा प्रश्न त्या विचारायच्या. आपण नेहमीप्रमाणे 'छान दिसता बाई' म्हटलं की त्यांची कळी खुलायची. मग सांगायला लागायच्या, 'अरे, नाटकाची खूप आवड होती मला. गळाही चांगला होता. एकपाठी होते मी.' 'पण मग नाटकात नाही चान्स मिळाला का?' असं विचारलं की म्हणायच्या, 'माझी उंची आडवी आली.' पावणेसहा सहा फूट उंच होत्या त्या. त्यामुळे त्यांच्याहून उंच नायक मिळायची पंचाईत व्हायची. मग काय, एवढे गुण असूनही बाई नापास! मग त्यांनी एक युक्ती काढली. 'एकपात्री संगीतनाटकं बसवायला त्यांनी सुरुवात केली. त्याच धैर्यधर व्हायच्या आणि त्याच भामिनी, त्याच कृष्ण आणि त्याच द्रौपदी. सुहासिनीबाई यांच्या एकपात्री नाटकांची नोंद तेव्हा अनेक वृत्तपत्रांनी गौरवपूर्वक घेतली आहे. प्रसिद्ध नाटककार वि. वा. शिरवाडकर यांनी जाहीरपणे त्यांना 'एकपात्री नाटकाच्या जनक' असा किताब दिला होता. केवळ आपले संवाद नाही, तर संपूर्ण नाटक पाठ म्हणायचं म्हणजे काय चेष्टा आहे का? पण बाईंनी ते करून दाखवलं. त्याबद्दल विचारलं असता त्यांनी सांगितलं, 'मी तशी एकपाठी. लहानपणी घरात गाडी असूनही सर्वसामान्यांसारखे राहायची सवय वडिलांनी लावली. तेव्हा बसनं शाळेत जाताना बसच्या तिकीटाच्यामागे वडिलांनी लिहून दिलेला गीतेतील एकेक श्लोक मी रोज पाठ करायचे आणि हा हा म्हणता म्हणता माझी भगवद्गीता मुखोद्गत झाली.' त्यांनी सूत्रबद्ध केलेल्या गीताश्लोकांची ध्वनिमुद्रिकाही पॉलिडॉरनं बाजारात आणली होती. त्या दिवशी बाईंनी अनेक आठवणी जागवल्या. लहानपणापासून घरात संगीत, साहित्याचे संस्कार झाल्यामुळे त्यांच्यात एक जातिवंत कलासक्तता होती आणि म्हणून

कुमारगंधर्वांपासून वसंत बापट, शंकर वैद्य यांसारखी कलाकार, कवी मंडळी त्यांच्या कार्यक्रमात अगत्यानं सहभागी व्हायची. कलाकारांचा रागरंग बघून त्यांना कार्यक्रमात सहभागी करून घेणं हे कौशल्य बाईंकडे पुरेपूर होतं, आणि म्हणूनच पंडित कुमारगंधर्व यांच्या मुंबई भेटीत त्यांच्या खनपटीला बसून त्यांनी 'मल्हार के रंग' हा नितांतसुंदर कार्यक्रम पेश केला.

सुहासिनीबाई काही निवडक कार्यक्रमांचं सूत्रसंचालन करायच्या. सरस्वती त्यांना प्रसन्न होतीच पण आपण पडद्यावर छान दिसलो पाहिजे याचा त्यांचा कटाक्ष असायचा. टीव्ही माध्यमात पडद्यावर येणारा कलाकार, मुलाखतकार हा दिसायला चांगला असलाच पाहिजे असा त्यांचा आग्रह असायचा, त्यामुळे एरवी ज्ञानी पण दिसायला यथातथा मंडळींना बाई कार्यक्रमात घेण्यास नाखूष असायच्या. मला आठवतं, की ग्वाल्हेर घराण्याचे एक ज्येष्ठ गायक, बाईंना त्यांच्या गाण्याबद्दल आदर होता, पण त्यांच्या तोंडात दात नव्हते त्यामुळे ते पडद्यावर विचित्र दिसतील असं बाईंना वाटायचं आणि म्हणून त्यांना सांगितलं की तुम्ही ज्या दिवशी कवळी बसवाल त्या दिवशी मी तुमचं रेकॉर्डिंग करेन.

नाट्यसंगीत, शास्त्रीय संगीत असेही काही कार्यक्रम त्यांनी केले पण 'सुंदर माझं घर' हा त्यांचा पेट कार्यक्रम. या कार्यक्रमाबद्दल एक आक्षेप मात्र घेतला जायचा, तो म्हणजे हे कार्यक्रम उच्चभ्रू महिलांसाठी असतात, यात मध्यमवर्गीय महिलांच्या विषयांना स्थान नसते, काही अंशी खराही होता. मुळात बाईंचं वर्तुळ आता ज्यांना पेज ३ म्हणतात अशा प्रकारच्या लोकांचं जास्त होतं. विमला पाटील, इंद्रायणी सावकार, मोहिनी निमकर, संजीवनी खेर यांसारख्या प्रथितयश स्त्रिया त्यांच्या सूत्रसंचालक होत्या. लोकल ही ज्यांनी फक्त गाडीतून जाताना पाहिली त्यांना मध्यमवर्गाच्या आयुष्याची ओळख नीट होणं अवघडच असतं. पण एक कार्यक्रम मला अजूनही आठवतोय. आधुनिक विचारसरणीच्या त्या असल्यामुळे घटस्फोटित स्त्रियांनी पुनर्विवाह करावा या मताच्या त्या होत्या. त्यावेळी त्यांनी घटस्फोटित आणि पुनर्विवाह केलेल्या जोडप्यांच्या मुलाखतीवर आधारित एक कार्यक्रम केला होता. त्या कार्यक्रमात त्यावेळच्या रंगभूमीवर गाजलेल्या एका नटाची घटस्फोटित आणि पुनर्विवाह केलेली पत्नीही सहभागी झाली होती. कार्यक्रम प्रक्षेपित झाल्यानंतर हे महाशय आपली बाजू मांडण्यासाठी बाईंकडे आले होते. त्यांना कसंबसं पटवून बाईंनी त्यांची बोळवण केली. एकदा त्यांच्याकडेच बसलो असताना एक नावाजलेल्या मराठी उद्योजिका आल्या. चेहरा त्रासलेला, थकून आल्या होत्या. सुहासिनीबाईंनी विचारलं, 'काय झालं ग?' 'अग काय सांगू, गाडी गॅरेजला गेली आहे. टॅक्सीनं यावं लागलं, वैताग आहे नुसता..!' आता दु:खाच्या या कल्पना असलेल्या गोतावळ्यात राहिल्यानंतर त्याचा थोडातरी परिणाम मानसिक जडणघडणीत होतोच, नाही का?

पण काहीही असलं तरी सुहासिनीबाई यांचं आपल्या निर्मितीवर मनापासून प्रेम होतं. कार्यक्रमाची संहिता, चित्रिकरण, नियोजन यात त्या गढलेल्या असायच्या. टीव्ही माध्यम हे क्लोजअपचं माध्यम आहे याची त्यांना जाण होती. आणि म्हणून आपली प्रत्येक फ्रेम सुंदर दिसावी असा त्यांचा कटाक्ष असायचा. पण या पलीकडे तांत्रिकतेत त्या फारशा निष्णात नव्हत्या, पण दूरदर्शनमधील तंत्रज्ञांच्या सहकार्यानं कार्यक्रमनिर्मिती नीटपणे पार पडायची. आपल्या कामात ढवळाढवळ केलेली त्यांना खपायची नाही. एकदा असं झालं, की संगीतकार कनू घोष यांचं ध्वनिचित्रमुद्रण होतं. हा कार्यक्रम आमच्यावर दिल्लीने लादलेला होता.आम्ही जेथे हे मुद्रण करतो त्या कक्षात परवानगीशिवाय इतरांना प्रवेश नसायचा. कनू घोष हे आत येऊन मशीनवर बॅलन्सिंग करू लागले. बाईंनी त्यांना नम्रपणे सांगितलं की आपण कलागारात (studio) जा. माझं काम मला करू दे, तुमचं काम तुम्ही करा. चित्रिकरणानंतर तुम्ही ते ऐका. नीट नसेल तर ते आपण पुन्हा करू. कोणत्याही मोठ्या माणसाचं उगीचच टेन्शन घ्यायचा त्यांचा स्वभावच नव्हता.

त्या चांगल्या लेखिकाही होत्या. लोकप्रभा या साप्ताहिकात त्या सदरलेखन करायच्या. त्यांनी अनेकदा परदेशप्रवास केले, जगभर हिंडून प्रवासवर्णनं लिहिली, त्याची पुस्तकं निघाली. जगण्यावर मनापासून प्रेम करणाऱ्या त्या सदाफुली होत्या. त्यांना मोजकेच पण जिवाभावाचे मित्र-मैत्रिणी होते. पारंपरिक, काळाशी सुसंगत नसलेल्या पापपुण्याच्या संकल्पनांपासून त्या चार हात दूर होत्या. रसिकपणे जगावं, जगातील सर्व सुखांचा डोळे उघडे ठेवून आस्वाद घ्यावा ही त्यांची धारणा होती. आमच्या एका सहकाऱ्याचं त्यावेळी नुकतंच लग्न झालं होतं. मग काय म्हणतो आहे हनिमून असले मध्यमवर्गीय प्रश्न विचारणाऱ्यांपैकी त्या नव्हत्या, त्यांनी सरळ सरळ त्याचा प्रणय कसा करायचा असतो याचा वर्गच घेतला. लाइट बंद करून, नजरेला नजर न भिडवता केलेला प्रेमालाप त्यांना मंजूर नव्हता, हा सगळा पाढा ऐकून आमचा मित्र कसा गोरामोरा झाला होता ते मला आजही स्पष्ट आठवत आहे.

नेपियन सी रोड या कादंबरीत वाचलेल्या, किंवा व्यापार खेळातलं एक कार्ड म्हणून आम्हाला माहीत असलेल्या उच्चभ्रू

वस्तीत जलदर्शन या आलिशान इमारतीत त्या राहायच्या. एका पावसाळ्यात त्यांच्या निमंत्रणानुसार मी त्यांच्या घरी गेलो होतो. मुंबईच्या पावसाने मला गाठलेच. चिंब भिजून मी त्यांच्या दारात उभा होतो. घरी गेल्यावर त्यांच्या यजमानांचे-सुरेशचे कपडे त्यांनी मला घालायला दिले, मस्त जेवण बनवलं आणि पोटभर गप्पा मारल्या. एकदा एखाद्याशी तार जुळली की त्या कमालीच्या सहजतेनं वावरायच्या आणि समोरच्या माणसालाही मोकळं करायच्या. मनस्वी या एकाच शब्दात त्यांचं वर्णन करता येईल. भरभरून जगल्या आणि कॅन्सर होऊन अकाली गेल्या. ती बातमी आली तेव्हा मी म्हैसूर येथे राष्ट्रीय बालचित्रपट महोत्सवासाठी गेलो होतो. नुकताच दिल्लीच्या केंद्रानं सादर केलेला 'फुलांचा इतिहास' हा माहितीपट पाहून बाहेर पडत होतो. एकानं हातात पेपर ठेवला आणि ती बातमी दाखवली. त्या बातमीकडे पाहताना पेपरमधील त्या ओळी अंधुक झाल्या आणि काही क्षणापूर्वी पाहिलेल्या गुलाबांच्या ताटवांच्या दृश्यात सुहासिनीबाईंचा चेहरा कधी तरळला ते समजलंही नाही.



**जी.एन. जोशी**
**व्हॉइस ऑफ अमेरिकासाठी रेकॉर्डिंग करताना (१९५६)**

झी टीव्ही या वाहिनीवरील सारेगमप या रिॲलिटी शोने महाराष्ट्रातच काय पण जिथे जिथे मराठी माणूस आहे तिथे तिथे आपला ठसा उमटवला होता. यासाठी झीच्या निर्मिती टीमने साऱ्या महाराष्ट्रात फिरून ऑडिशन्स घेतल्या होत्या आणि गाणारी रत्ने शोधली. तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल पण कलाकारांपर्यंत जाऊन त्यांच्या कलेची दखल घेण्याचे काम ६०-७० वर्षांपूर्वी एका व्यक्तीने केले होते. ते होते एच.एम.व्ही. या ख्यातनाम ध्वनिमुद्रक कंपनीचे प्रमुख जी. एन.जोशी .

पं. रवीशंकर, उस्ताद अली अकबर खाँ, बिस्मिला खाँ, अल्लारखाँ, पन्नालाल घोष अशा अनेक दिग्गज कलाकारांचे पहिले ध्वनिमुद्रण करणाऱ्या जी. एन. यांची नोंद भावगीत गायनाचे जनक म्हणूनही मराठी भावविश्वात झाली आहे. माझे सुदैव असे की मला त्यांच्याच घरात, त्यांच्या शयनगृहाच्या शेजारी पेइंग गेस्ट म्हणून राहण्याचा योग आला.

त्यामुळे अनेक वेळा त्यांच्याशी गप्पा मारता आल्या. वरवर दिसायला गंभीर, पण एकदा ओळख पटली, सूर जुळले की मग अगदी मैत्रीच्या नात्याने वागवत. अत्यंत मृदू स्वभाव आणि माध्यमक्षेत्रात संचार असल्यामुळे आमच्या वयातील अंतर केव्हाच पार झाले होते. त्यामुळे या महान कलाकाराच्या आयुष्यातील अनेक सोनेरी क्षण माझ्यासमोर त्यांनी साक्षात उभे केले. जी.एन. म्हणजे दादा मूळचे विदर्भाचे. गाता गोड गळा घेऊन जेव्हा ते मुंबईत आले तेव्हा एच.एम.व्ही.च्या रमाकांत रूपजी यांनी त्यांना एक-दोन गाणी कंपनीसाठी

गाण्याची विनंती केली. दादा मैफलीतून भावसंगीत सादर करायचे. मग काय, पेटी आणि तंबोरा एवढ्या दोनच वाद्यांवर आणि दोन गाणी रेकॉर्ड करण्यासाठी गेलेले जोशी तब्बल चौदा गाणी करून बाहेर पडले.

याच गाण्यांमध्ये होते अवघ्या महाराष्ट्राने डोक्यावर घेतलेले 'रानारानात गेली बाई शीळ...' ना.घ. देशपांडे या त्यांच्या कवी मित्राने लिहिलेले हे गीत. ते इतके लोकप्रिय झाले की अगदी लहान गावात, एस.टी. स्टँडवर, हॉटेलात, टपरीवर या शिळेने साऱ्यांना झपाटून टाकले. तत्कालीन मंत्री बाळासाहेब देसाई हेही या गाण्याचे जबरदस्त फॅन होते. खरे म्हणजे तो काळ होता नाट्यसंगीताचा. अधूनमधून कवी मंडळींचे काव्यवाचनाचे कार्यक्रमही व्हायचे पण त्याला तेवढी मागणी नव्हती. चांगल्या कवितेला, गेय काव्याला चाल लावून ती तालासुरात सादर करायची, त्यातल्या भावना रसिकांपर्यंत पोहोचाव्यात म्हणून त्याला संगीताची जोड द्यायची ही कल्पनाच नवी होती. प्रेमभावना, निसर्ग, मनोव्यापार, समाज अशा विविध विषयांवरील या भावसुमनांनी श्रोत्यांना एक वेगळीच अनुभूती मिळू लागली आणि म्हणता म्हणता भावगीत जन्माला आले. जी. एन. जोशी यांचे हे फार मोठे योगदान आपल्या संगीत आणि साहित्यक्षेत्राला आहे. पण इथेच त्यांचे कार्यक्षेत्र संपत नाही. एच.एम.व्ही.मधील त्यांची कारकीर्द प्रत्येक मराठी मनाला अभिमान वाटायला लावणारीच आहे.



भीमसेन जोशींसोबत जी.एन. जोशी

दादांकडे किश्शांचा खजिना होता. त्यावेळच्या गाजलेल्या खुर्शीद या नटीच्या ध्वनिमुद्रणावेळचा एक प्रसंग त्यांनी सांगितला. त्यावेळी नटनटी स्वत: गात असत. आवाज चांगला असो वा नसो. अर्थात खुर्शीद त्याला अपवाद होती कारण ती चांगली गायिकाही होती. 'शादी' या सिनेमाच्या गाण्याचे ध्वनिमुद्रण होते. खेमचंद प्रकाश हे संगीतकार होते. ध्वनिमुद्रणाच्या वेळी त्यांनी कांतीलाल नावाच्या आपल्या कंपनीतल्या नटाला आत जाऊन ते गाणे ऐकायला सांगितले. झाले! या खुर्शीदला राग आला. हा कोण माझे गाणे ऐकून सल्ला देणार? मग काय, बाईंनी शिव्यांची लाखोली वाहायला सुरुवात केली. दादांनी रेकॉर्डिस्टला खूण केली आणि ते सगळे ध्वनिमुद्रित करायला सांगितले! शिव्या संपल्या. बाई फणकारलेल्याच होत्या. दादांनी लगेचच ध्वनिमुद्रित केलेले ते शिव्याशाप वाजवायला सांगितले. बाई ते ऐकून अवाक् झाल्या. हळूहळू शांत झाल्या. 'जोशीसाहेब, माफ करा. माझी चूक झाली' असंही म्हणाल्या. मग क्षणार्धात वातावरण निवळले आणि गाणे ध्वनिमुद्रित झाले. बोल होते 'भिगोई मेरी सारी रे'. आज पत्रकार असे ध्वनिमुद्रण, चित्रीकरण करतात आणि तहलका माजवतात. मला वाटते भारतातले कलाक्षेत्रातले हे पहिले कँडिड ध्वनिमुद्रण असावे.

दादांनी सिनेसृष्टीतील अनेक दिग्गजांना मोठे होताना पाहिले होते. एकदा बेगम अख्तर यांच्याविषयी आठवण सांगत होते. बॉम्बे टॉकिजचे राय बहादूर चुनीलाल हे एक संचालक होते. ते एके दिवशी दादांकडे आपल्या संगीतप्रेमी मुलाला घेऊन आले आणि म्हणाले त्याला संगीताचे प्राथमिक शिक्षण द्या. दादांनी त्याला तानपुरा दिला आणि गायला सांगितले आणि त्याने बेगम अख्तरची ठुमरी म्हटली. त्यानंतर तो अधूनमधून यायचा, सराव, रियाज करायचा आणि जायचा. पुढे तो सैन्यदलात दाखल झाला. नोकरीनिमित्त लखनौला असताना बेगमला भेटला आणि पुढे त्यांच्याशी त्याचा चांगला स्नेह जुळला.

कालांतराने सैन्याला कंटाळून हा मुलगा नोकरी सोडून आला. मग त्याला रेडिओत नोकरी मिळाली आणि मग त्याने बेगमच्या जुन्या गझलांना आपल्या सुरांमध्ये बांधण्याचा प्रयत्न केला. सिनेमात ती गाणी खूप गाजली, आणि तो नावाजलेला संगीतकार झाला. असे असले तरी दादांना तो आवर्जून

''१९३२ साली मराठीतील पहिलं युगुलगीत मी गायलं 'चकाके कोर चंद्राची' आणि सहगायक होते जी. एन. जोशी.'' हे सांगताना बाईंचा स्वर हळवा झाला होता. मध्येच त्यांची नजर शून्यात जायची पुन्हा सावरायच्या, पुन्हा एकदा आठवणीच्या राज्यात जायच्या. गाताना उच्चार कसे असावेत याचे मार्गदर्शन ते करायचे. अनेक होतकरू गायकांना त्यांनी संधी दिल्याचेही त्यांनी आम्हाला सांगितले.

हे ऐकल्यानंतर मला दादांबरोबर झालेल्या गप्पा आवर्जून आठवल्या. त्यांची जीवनविषयक दृष्टी काळाच्या दोन पावले पुढेच होती, वयाच्या अवघ्या सत्ताविसाव्या वर्षी या भावगीत गायकाने आफ्रिकेचा दौरा केला. आज कलाकारांसाठी परदेशदौरा ही काही नवलाईची गोष्ट राहिलेली नाही, पण १९३६ साली सातासमुद्रापलीकडे भावगीत गायनाचा कार्यक्रम करणारे ते पहिलेच मराठी गायक असावेत. गप्पांच्या ओघात त्यांनी मला त्यांच्या ध्वनिमुद्रणाच्या रोचक कथा सांगितल्या. तबकडीवर तीन-साडेतीन मिनिटांचे गाणे रेकॉर्ड करणे, त्यासाठी कलाकारांना राजी करणे, त्यांचे मूड सांभाळणे हे जिकिरीचे काम त्यांनी लीलया केले. लता मंगेशकर यांचे 'जारी जारी ओ कारी बदरीया' हे गाणे एका टेकमध्ये झाल्याचे त्यांना पक्के स्मरत होते आणि त्या आठवणींचे त्यांना विशेष कौतुक होते. कारण ते केवळ एच.एम.व्ही.चे अधिकारी नव्हते तर एक संपन्न कलाकार होते, आणि त्यामुळे या कलाकारांशी त्यांचा दोस्तानाच व्हायचा. दादांच्या पुतणीच्या विवाहमुहूर्ताला भीमसेन जोशी येऊ शकले नाहीत, स्वागत समारंभाला आले म्हणून दादांनी त्यांना दोन शिक्षा सुनावल्या. एक, समोर ठेवलेल्या डिशेस संपवण्याची आणि दुसरी, गाण्याचा कार्यक्रम करण्याची. भीमाण्णांनी मोठ्या आनंदाने त्या स्वीकारून आपल्या पक्क्या मैत्रीची साक्ष दिली. अशा अनेक आठवणींचे मोहोळ या गप्पांत जागे व्हायचे.


शास्त्रीयसंगीत हा विभागच दादांकडे होता. त्यामुळे ओंकारनाथ ठाकूर, अमीर खान, डी.व्ही. पलुस्कर, कुमारगंधर्व अशा दिग्गजांचाही त्यांना सहवास मिळाला. त्याबद्दलची



जी.एन. जोशी आचार्य अत्रेंसोबत

भेटायचा, आपल्या रियाजाची आठवण काढायचा. पुढे त्याने 'मेरा साया', 'वह कौन थी', 'अनपढ' अशा सिनेमांना अजरामर संगीत बहाल केले. त्याचे नाव मदन मोहन. एका श्रेष्ठ संगीतकाराला संगीताचे प्राथमिक धडे देणारा जाता जाता सहज आपल्याला या आठवणी सांगतोय हे मला खरे वाटत नव्हते.

२००९ मध्ये दादांची जन्मशताब्दी साजरी झाली तेव्हा त्या कार्यक्रमाच्या संयोजनात मी होतो. त्या वेळेला गंगुबाई हनगळ, जसराज, शिवकुमार शर्मा, सारंगीवादक रामनारायण या मंडळींना भेटण्याचा योग आला. प्रत्येकाचे क्षेत्र वेगळे पण भावना एकच होती, आज आम्ही जे काही आहोत त्याची सुरुवात जोशीसाहेबांमुळे झाली. यात केवळ कृतज्ञतेचा भाव नव्हता तर होती जी. एन. जोशी यांच्या गुणग्राहकतेला दाद. गंगुबाई हनगळ यांचे दादांबद्दलचे विचार ध्वनिचित्रमुद्रित करण्यासाठी २००९ मध्ये आम्ही गंगुबाईंच्या हुबळीच्या घरी पोहोचलो. गंगुबाई वय वर्षे ९४! पण सगळ्या आठवणी अगदी ताज्या. त्या बोलू लागल्या,


"मी पांडुरंग सांगवीकर.
आज उदाहरणार्थ
पंचवीस वर्षांचा आहे..."
कोसला
भालचंद्र नेमाडे
५०
गौरवशाली
पन्नास वर्षे
अर्धशतकानंतरही तरुण मनाला
भुरळ घालणाऱ्या
या कादंबरीची गौरवशाली
सुवर्णमहोत्सवी
आवृत्ती
भालचंद्र नेमाडेंच्या स्वाक्षरीसह...
किंमत रु. ५२५/- सवलतीत : रु. ३५०/-
भालचंद्र नेमाडे यांचे दुर्मीळ फोटो, प्रस्तावना आणि
'कोसला'विषयीची संदर्भ सूची हे या आवृत्तीचे खास वैशिष्ट्य!
पॉप्युलर प्रकाशन प्रा लि.
३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई-२६, फोन : २३५३०३०३
Email : info@popularprakashan.com Website.popularprakashan.com

कृतार्थता मला त्यांच्या चेहऱ्यावर दिसायची. दादांचे मोठेपण हे केवळ ते भावगीत गायक किंवा एक अधिकारी म्हणून नव्हते तर एक प्रयोगशील कलावंत, काळाची पावले ओळखून कलेकडे वस्तुनिष्ठपणे पाहणारी सर्जनशील व्यक्ती म्हणून अधिक होते.

शिवकुमार शर्मा, हरिप्रसाद चौरसिया आणि ब्रीजभूषण काब्रा यांची 'कॉल ऑफ व्हॅली' ही गाजलेली तबकडी ही त्यांचीच निर्मिती होती. गजाननराव वाटवे यांच्या 'वारा फोफावला' या लोकप्रिय भावगीताची तबकडी दादांनीच काढली.

संगीत आणि चित्रकला यांचा काही संबंध आहे का हे पाहण्यासाठी त्यांनी काही गायकांना आमंत्रित केले, त्यांच्याकडून काही राग गाऊन घेतले आणि प्रख्यात चित्रकारांना त्या रागामुळे मनात निर्माण होणाऱ्या प्रतिमांचे रेखाटन करण्यास सांगितले. प्रत्येक रागाचे एक वैशिष्ट्य असते. भैरव रागातून सकाळ डोकावते तर मारवा आपल्याला कातर करतो, मध्यरात्रीचा गडदपणा दरबारी कानडामधून व्यक्त होतो तर मेघमल्हार वर्षाऋतूचे आगमन दर्शवतो. बऱ्याच अंशी हा प्रयोग यशस्वी झाला. या विषयावर देश-विदेशात आजही मोठे संशोधन होत आहे.

मेघमल्हारविषयी अशीच एक आठवण दादांनी सांगितली, ''पावसाळ्याचे दिवस होते. त्या दिवशी मी बडे गुलामअली खाँ यांच्या मलबार हिलवरील बंगल्यावर गेले होते आणि अचानक धो धो पाऊस पडू लागला. खाँसाहेबही मूडमध्ये होते. त्यांनी राग मल्हार आळवायला सुरुवात केली. तिकडे आकाशात विजेचा कडकडाट आणि इकडे यांचा तानांचा आविष्कार, तिकडे धारांची बरसात तर इकडे स्वरांचा अभिषेक! अक्षरश: पावसाबरोबरची ती मनोहारी जुगलबंदी ऐकून कान तृप्त झाले.'' मीही ते वर्णन ऐकून अक्षरश: शहारून गेलो.

दादांची कारकीर्द ही संगीतक्षेत्राबाहेरही विस्तारलेली होती. मुलांसाठी गोष्टी आणि विविध मनोरंजनात्मक ध्वनिमुद्रिका त्यांनी काढल्या. महर्षी कर्वे यांच्या कार्यावरही रेकॉर्ड काढली, सामाजिक बांधिलकी ही सांगून येत नाही, ती रक्तातच असावी लागते. महाराष्ट्रात दारूबंदी होती तेव्हाची गोष्ट. दादांनी त्यावरही एक प्रबोधनपर कार्यक्रम तबकडीवर आणला. त्यात तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाई यांना सहभागी केले. अल्पबचतीची गोडी जनतेला लागावी म्हणून लोकसंगीताचा वापर करून एक नाटिका आणली.

संगीताचा व्यासंग आणि दरवेळी नव्या गोष्टी करण्याचा ध्यास यातून दादांच्या हातून साहित्यनिर्मितीही झाली. 'स्वरगंगेच्या तीरी' हे त्यांचे पुस्तक म्हणजे ध्वनिमुद्रण, भावगीत गायन या क्षेत्राचा अधिकृत दस्तऐवजच आहे. 'अंडरस्टँडिंग इंडियन क्लासिकल म्युझिक' हे त्यांचे इंग्रजीमधील संगीतावरील संशोधनपर पुस्तक देशविदेशातही गाजले. शास्त्रीय संगीत आणि रागदारी या विषयावर त्यांनी पाश्चिमात्य देशातील विद्यापीठांतून कार्यशाळाही घेतल्या. मला वाटते एवढे बहुआयामी व्यक्तिमत्त्व क्वचितच पाहायला मिळते. त्यांचा मित्रपरिवारही मोठा होता. आचार्य अत्रे हे त्यांचे मित्र होते. स. गो. बर्वे, मुकुंदराव किर्लोस्कर यांच्याबरोबरही त्यांचे चांगले सूर जुळले होते. आपली शास्त्रीय संगीत शिकण्याची इच्छा वयाच्या ५०व्या वर्षीही त्यांनी जिवंत ठेवली आणि जगन्नाथबुवा पुरोहित यांचे मार्गदर्शन घेण्यास सुरुवात केली. सतत काहीतरी करत राहायचे हा त्यांचा ध्यास होता. दादांच्या सहवासात मी ४ वर्षे होतो. अनेक वेळा त्यांच्याशी संवाद साधता आला. तेव्हा त्यांचे वय ७२-७३ होते. त्या वयातही त्यांनी स्वरश्री म्हणून एक कॅसेट कंपनी काढली होती. त्याच्या रेकॉर्डिंगमध्ये ते व्यग्र असायचे. पुढे मी पुण्याला आलो. कधी मुंबईला गेलो तर आवर्जून भेटायलाही जायचो, पण हळूहळू संपर्क कमी झाला. मी माझ्या व्यापात गुंतलो. मग पुढे त्यांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमाच्या निमित्ताने पुन्हा एकदा त्यांच्या आठवणींना उजाळा मिळाला. यशवंत देव, श्रीनिवास खळे, भालचंद्र पेंढारकर, गजानन वाटवे या मंडळींना भेटून त्यांच्याकडून दादांच्या आठवणी ऐकल्या. त्या ध्वनिचित्रमुद्रित केल्या. त्यावर आधारित एक माहितीपट बनवला. दूरदर्शनवरून तो प्रसारितही झाला. आजही विविध भारतीवर सुधीर फडके, अरुण दाते यांची भावमधुर भावगीते कानी पडतात तेव्हा आवर्जून दादांची आठवण येणे साहजिक आहे, कारणे भावगीताच्या या विस्तारलेल्या वटवृक्षाचे महत्त्व जितके आहे त्याहीपेक्षा महत्त्वाचे आहे त्याचे बीज आणि ते म्हणजे जी. एन. जोशी...

**डॉ. केशव साठ्ये**
९, सावरी सोसायटी, हॅपी कॉलनी,
कोथरूड, पुणे-४११०२९
फोन:०२० २५४५२०९४
भ्रमणध्वनी : ९८२२१०८३१४
keshavsathaye@gmail.com

# हृदयस्थ पंचम

निलु निरंजना गव्हाणकर

मला जेव्हा पंचमच्या 'द जेट' ह्या घरी पहिल्यांदा एकटीनंच जावं लागलं त्यावेळी मी साधारण तेरा वर्षांची असेन. दादा पान खात पेटी वाजवत होते. ते जोरानं ओरडून म्हणाले, ''पंचम, कोई छोटी लडकी तुझे मिलने आयी है.'' दादांनी माझं नाव विचारलं आणि मी पिट गव्हाणकरची लहान बहीण आहे हे समजल्यावर फारच प्रेमानं घरात बोलावलं. पंचम आतून हसत बाहेर आला आणि माझ्या डोक्यावर टपली मारत म्हणाला, 'अरे पगली!!' दादा व त्यांची मंडळी सर्व हसले. मला तो अपमान न वाटता उलट आनंदच वाटला. जसं कोणी माझं फारच कौतुकानं स्वागत करत होतं.

२०१३ च्या मार्चमध्ये अमेरिकेत टीव्हीवर हायनाकन बिअरची जाहिरात चालू होती. अचानक मला जाणवलं, अरे! हे तर पंचमचं (आर. डी. बर्मन) गाणं आहे. दर अर्ध्या तासानं ती जाहिरात परत परत दाखवली जात होती आणि पंचमच्या आठवणीनं माझं मन उचंबळून गेलं...

कडक उन्हाळ्याची दुपार होती. मी साधारण आठ वर्षांची असेन. घराच्या समोर असलेल्या आंब्याच्या झाडावर चढण्याच्या प्रयत्नात मग्न होते. इतक्यात घराजवळ एक कार उभी राहिली. साधारण पंधरा वर्षांचा एक मुलगा माझ्या भावाच्या पाठोपाठ घरात शिरला. मीही आंब्याच्या झाडावरून घाईघाईनं खाली उतरले. माझा लहानसा पांढरा फ्रॉक चुरगळला होता आणि मातीनं भारला होता. त्यांच्यामागे धावत धावत मीही घरात शिरले. माझ्या भावाचा मित्र एकदम वळला आणि माझं ध्यान बघून तो खुदूखुदू हसला. माझ्या गालावरची माती पुसत त्यानं माझा एक हलकासा गालगुच्चा घेतला आणि माझ्या डोक्यावर टपली मारत म्हणाला, 'पगली!' आई स्वयंपाकघरात चकल्या करत होती. भावानं (ज्याचं नाव आहे पुष्पहास पण आम्ही त्याला पिट म्हणत होतो) काही चकल्या त्याच्या मित्राच्या हातात कोंबल्या आणि ते दोघे आले तसे वाऱ्याच्या झुळुकीसारखे निघून गेले. मीही आंब्याच्या झाडावर परत चढण्याच्या उद्योगाला लागले. बरोबर खेळणाऱ्या एका मुलाने विचारले, तो एस. डी. बर्मनचा मुलगा होता ना? 'मला नाही माहीत' ह्या अर्थानं मी खांदे उडवले. मला एस. डी. काय नि कोण ह्यात काहीच गम्य नव्हतं. एक गोष्ट नक्की कळली, की 'पगली' हा बहुमोल किताब देणारा मला जन्मोजन्मीसाठी नवा भाऊ मिळाला होता. अशी माझी पंचमशी पहिली भेट.

त्यानंतर माझ्या भावाबरोबर पंचम जवळजवळ दररोजच यायचा. जेव्हा माझा भाऊ अमेरिकेत इलेक्ट्रॉनिक इंजिनीयरिंगमधील उच्च शिक्षणासाठी १९६० साली गेला, तेव्हा ते दररोजचं भेटणं बंद झालं. परंतु प्रत्येक भेटीत तो माझ्या आई-वडिलांना वाकून पायांना स्पर्श करून नमस्कार



आर.डी. बर्मन आणि निलु गव्हाणकर

करायला कधी चुकला नाही. जाताजाता रस्त्यावरून चालताना मी त्याला कधी दिसले तर तो कार थांबवून चौकशी तर करायचाच, शिवाय कधी त्याच्या गाडीतून मला जिथे जायचं तिथे पोचवायचा. अगदीच साध्या स्वभावाचा माणूस. भावाचे रूपारेल कॉलेजमधले तीन घनिष्ठ मित्रही सातत्यानं यायचे. भीष्म कोहली, सलीम शहा आणि रोनो मुखर्जी. भीष्म कोहली हा देवानंदचा भाचा. तो तर दुपारच्या जेवणासाठी भावाबरोबर आमच्या घरी हमखास असायचा. नंतर त्यानं विशाल आनंद नावानं सतरा सिनेमांतून भूमिका केल्या व दिग्दर्शक आणि निर्माता म्हणून अकरा सिनेमे काढले. खरं म्हणजे त्यानंच पंचमची ओळख माझ्या भावाशी करून दिली होती. परंतु नंतर पंचम फारच कामात व्यस्त झाल्यामुळे 'चलते चलते' ह्या सिनेमाला संगीत देऊ शकला नाही. तेव्हा भीष्मनं बप्पी लाहिरी ह्या नवोदिताला संधी दिली आणि भारताला एक उमदा संगीतकार दिला. सलीम शहाच्या वडिलांचा मोहन स्टुडिओ होता. परंतु माझ्या भावाच्या पावलावर पाऊल ठेवून तो लगेचच अमेरिकेला, भाऊ ज्या गावात होता तिथे, उच्च शिक्षणासाठी गेला. रोनो मुखर्जीनं त्याच्या तरुणपणीच 'तू ही मेरी जिंदगी' हा सिनेमा डेबु मुखर्जी ह्या लहान भावाला घेऊन केला. रोनो हा एस. मुखर्जींचा सगळ्यात मोठा चिरंजीव, जॉय मुखर्जींचा मोठा भाऊ, सम्राट व शरबानीचे वडील, काजोल आणि आयन मुखर्जींचे सख्खे काका आणि राणीचे चुलत काका. परंतु त्यांना वडिलांच्या फिल्मालया स्टुडिओची जबाबदारी घ्यावी लागल्यामुळे स्वतःच्या आशाआकांक्षा मागे ठेवायला लागल्या. एस. मुखर्जींनी माझ्या भावाचं नाव 'मिरॅकल बॉय' असं प्रेमानं ठेवलं होतं. पंचमच्या आईनं त्याला तर ठासून सांगितलं होतं की गव्हाणकरची मैत्री आयुष्यभर जपून ठेव. त्या काळात बहुतेक सर्व इंग्लंडला जायचे. परंतु एस. डी. बर्मननी 'तू एक अतिशय हुशार मुलगा आहेस तर इलेक्ट्रॉनिक इंजिनीयर होण्यासाठी तू अमेरिकेला जावं' असं पिटला फारच उत्तेजन दिलं.

भावाच्या आणि पंचमच्या जबरदस्त मैत्रीमुळे आतल्या गोष्टी मला आपसूकच समजायच्या. जशा, 'फंटुश' ह्या सिनेमातील गाणं 'ये मेरी टोपी पलटके आ' हे त्यानं अवघ्या बाराव्या वर्षी केलं होतं. तर 'चंपी मालीश' हे गाणं चौदाव्या वर्षी केलं. अवघ्या सतराव्या वर्षी 'सोलहवा साल'मधील 'है अपना दिल तो आवारा' हे गाणं तर त्यानं रचलंच शिवाय त्यातील माउथ ऑर्गनही त्यानं वाजवला. तर मला त्यानं केलेली गाणी आधीच समजू लागली. जसं 'सुजाता'मधील 'तुम जीयो हजारो साल' किंवा 'लाजवंती'मधील 'चंदामामा मेरे द्वार आना' किंवा 'गा मेरे मन गा' ही गाणी. त्यामुळे जेव्हा काहीजण तावातावानं चर्चा करतात की एस. डी.च्या रचना चांगल्या की पंचमच्या, मला जरा हसूच येतं. त्यानं वडिलांसाठी बरीच गाणी रचली, परंतु त्याचं श्रेय त्याला कधी मिळालं नाही. तशी सिनेमावाल्यांची पद्धतच होती. जयदेव हे दादांचे जेव्हा असिस्टंट होते तेव्हा त्यांनी रचलेल्या 'हम बेखुदीमे तुम को' ह्या गाण्याचं श्रेय एस. डी. बर्मननाच मिळालं. पंचमनं मला एकदा सांगितलं की, जयदेवांच्या रचना तेलात तळत असलेल्या जिलबीसारख्या न तुटता गोल गोल फिरत राहतात आणि त्या तितक्याच गोड असतात. मग त्यानं मला 'हम दोनो'तील गाण्यांची काही उदाहरणं दिली. जेव्हा लक्ष्मीकांत–प्यारेलालना 'दोस्ती' हा महत्त्वाचा सिनेमा मिळाला तेव्हा अतिशय आनंद व्यक्त करून त्यानं लक्ष्मीकांत कुडाळकरना सांगितलं, की जर त्यांना माउथ ऑर्गन वाजवायला चांगलं कोणी मिळालं नाही तर तो त्यांच्यासाठी वाजवेल. असा पंचम मनानं उमदा होता. दुसऱ्यांच्या यशाचा त्याला मनापासून खराखुरा आनंद होत असे.

मला जेव्हा पंचमच्या 'द जेट' ह्या घरी पहिल्यांदा एकटीनंच जावं लागलं त्यावेळी मी साधारण तेरा वर्षांची असेन. तेव्हा माझ्या आईला ते आवडलं नव्हतं. कारण त्याकाळी वांद्र्याचा लिंकिंग रोड वर्दळीचा रस्ता नव्हता. मुंबईच्या मेयर सितु पाटकरांच्या घरानंतर भाजी आणि फुलांच्या मळ्यांशिवाय व नॅशनल कॉलेजशिवाय दुसरं काहीच त्या रस्त्यावर नव्हतं. भावाचं अमेरिकेहून आलेलं पत्र पंचमला द्यायची जबाबदारी

घेऊन मी तिथे पोचले तेव्हा दादा बर्मन बऱ्याच मंडळींबरोबर तिथे बसले होते. सर्व मंडळी प्रसिद्ध असावीत असं वाटलं, परंतु मी कोणालाच ओळखलं नाही. दादा पान खात पेटी वाजवत होते. ते जोरानं ओरडून म्हणाले, ''पंचम, कोई छोटी लडकी तुझे मिलने आयी है.'' दादांनी माझं नाव विचारलं आणि मी पिट गव्हाणकरची लहान बहीण आहे हे समजल्यावर फारच प्रेमानं घरात बोलावलं. पंचम आतून हसत बाहेर आला आणि माझ्या डोक्यावर टपली मारत म्हणाला, 'अरे पगली!!' दादा व त्यांची मंडळी सर्व हसले. मला तो अपमान न वाटता उलट आनंदच वाटला. जसं कोणी माझं फारच कौतुकानं स्वागत करत होतं.

आपले पाय रोवले. मंगेशमामा व पंचम हे जोडीनं काम करत राहिले. 'शोले' हा पहिला स्टेरिओ सिनेमा ह्या दोघांनी प्रयत्नपूर्वक यशस्वी केला.

१९६८ साली जेव्हा पंचम त्याच्या प्रसिद्धीच्या मार्गावर प्रवास करत होता तेव्हा मी उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत असल्यानं पंचमचं यश व लोकप्रियता अनुभवायचं चुकलंच. परंतु तो माझ्या भावाच्या आणि आईवडिलांच्या संपर्कात होता. जेव्हा पंचम आणि आशाताई भोसले १९७७ साली अमेरिकेत दौऱ्यावर आले, त्यावेळी मी पेन्सिल्वेनियातील एका लहान गावात न्युक्लिअर पॉवर प्लांटमध्ये काम करत होते, त्यामुळे त्याची व माझी भेट घडू शकत नव्हती. परंतु पंचमचा मला



बिल-पंचम-जोस-पिट

दादांना दिसायला व ऐकायला कमी येऊ लागलं, तसं त्यांना कामासाठी फोन यायचे जवळजवळ बंद झाले. तेव्हा दादांच्या लक्षात आलं की त्यांनी आपल्या मुलाला श्रेय न देण्यामध्ये मोठी घोडचूक केली. ती चूक त्यांनी 'गाईड' ह्या सिनेमात सुधारली व पंचमला खास श्रेय दिलं. माझा मामा-सुप्रसिद्ध रेकॉर्डिस्ट मंगेश देसाई आमच्या घरी दररोज फेरी मारायचा. एके दिवशी तर तो गातच आला, 'गाता रहे मेरा दिल'. मी विचारलं की हे नवीन गाणं आहे का? मंगेशमामा म्हणाला, ''हो. हे गाणं मी कालच रेकॉर्ड केलं. जबरदस्त गाणं आहे आणि जाम चालणार. पुष्प्याला अमेरिकेत सांगा की त्याचा मित्र पंचम म्हणजे एक जीनियस आहे आणि त्याच्या बापानं त्याला आता न्याय दिला आहे.'' पुढे पंचमनं 'तिसरी मंझील', 'भूत बंगला' ह्या सिनेमांसाठी जबरदस्त संगीत देऊन

दररोजचा फोन चुकला नाही. त्यानं माझ्या सानफ्रान्सिस्कोच्या आठ मित्रमंडळींना कार्यक्रम बघण्यासाठी आमंत्रण दिलं. मला माझ्या मित्रमंडळींचा खूप हेवा वाटला. तेव्हा माझ्या खास मैत्रीण कॅथी बर्जेसनं, मी पंचमसाठी लॅटिन अमेरिकेचं आणि जॅझ संगीत खूपच गोळा केलं होतं ते त्याला कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी पोचवलं. त्यावेळेची कॅथी आठवण सांगते, ''पंचमसारखा साध्या स्वभावाचा आणि प्रेमळ माणूस फारच विरळा. त्यानं जे आपुलकीनं माझं स्वागत केलं ते मी कधीच विसरणार नाही. एक मस्त व्यक्ती.''

१९७९ साली मी जेव्हा सानफ्रान्सिस्कोच्या जवळच्या गावात एक घर घेतलं होतं, तिथे मी तीन आठवडेसुद्धा नव्हते. मध्यरात्री माझ्यावर दोन चोरांनी भयंकर हल्ला केला. त्यात मी जवळजवळ मृत्यूच्या दारात पोहोचून परतले. बेशल स्कल

पॅन्तेरा म्युझिशियन्समसवेत
आर.डी. बर्मन



फ्रॅक्चर झाल्यामुळे कानातून चार दिवस रक्त येत होतं व स्पाईन फ्लुईड वाहिल्यामुळे डॉक्टरांनी सांगितलं की मी आयुष्यभर व्हीलचेअरवर बसणार. त्यावेळी बरीच डोकेदुखी होऊन बेशुद्धही पडायला व्हायचं. डाव्या कानाला १८ टक्के बहिरंपण आलं होतं. डाव्या हाताच्या हाडांचा चक्काचूर झाला होता आणि बरंच काही. मी निर्धार केला की न घाबरता परत आयुष्य उभारायचं. काळ्या आणि मेक्सिकन लोकांच्या संगीतक्षेत्रात प्रवेश करून ह्या हल्ल्यामुळे आपल्या मनात जी विषमतेची भावना नव्यानं निर्माण झाली आहे ती समूळ नष्ट करायची. मला कोंगा ड्रम वाजवण्याची हौस आहे ती पुरी करायची. मला गुरू म्हणून होसे फ्लोरेस म्हणून मिशन डिस्ट्रीक्टमधील एक तरुण वादक आयुष्यात आला. होसेमुळे मी जेव्हा क्युबाच्या वादकांबरोबर सानफ्रान्सिस्कोच्या कार्निवलमध्ये भाग घेतला तेव्हा तर आम्हाला बक्षीसही मिळालं. हे माझे सारे उद्योग मी माझा भाऊ पिट बरोबरच्या दररोजच्या फोनवरील संभाषणात सांगतच होते. माझा भाऊ भारतात जाताना माझ्याकडे सानफ्रान्सिस्कोला दोन दिवस भेटायला आला. रात्रभर बऱ्याचशा नाईट क्लब्समधून जाऊन माझ्या ओळखीच्या वादकांना व गाणाऱ्यांना भेटला. भारतात पंचमला भेटल्यावर त्यानं ह्या सर्व गोष्टी त्याला सांगितल्या. पिट पंचमला सानफ्रान्सिस्कोत ह्या अमेरिकेतील संगीतकारांबरोबर संगीत देण्यासाठी घेऊनच आला. १९८२च्या कार्निवलच्या निमित्तानं पंचम व त्याचा खूप वर्षांचा विश्वासनीय सहकारी दीपन चॅटर्जी सानफ्रान्सिस्कोत हजर झाले. सुप्रसिद्ध 'पान्तेरा' म्हणजे स्पॅनिश भाषेत पॅन्थर ह्या लॅटिन-रॉक अल्बमच्या निर्मितीची कल्पना व खर्च हा सर्व पिटचाच होता. हा अल्बम म्हणजे त्याची पंचमला प्रेमाची आंतरराष्ट्रीय पातळीवरची खास भेट होती. वाद्यं भाड्यांनी आणण्यापासून व सर्वांना गोळा करण्यासाठी, स्टुडियो ते सर्वांसाठी कार चालवण्यापर्यंत सर्वच काम मला करावी लागली. भावानं लगेच मला कोऑर्डिनेटर म्हणून किताब देऊन टाकला. आई पंचम-दीपनसाठी मस्त मस्त जेवण बनवतच होती. जेव्हा माझ्या भावानं आणि आईनं माझ्यावरील हल्ल्याच्या गोष्टी सविस्तर रीतीनं सांगितल्या तेव्हा ते दोघेजण फार गहिवरून गेले. पंचमनं त्याच्या बोटातील गणपतीची अंगठी काढून माझ्या बोटात घातली. त्याची अंगठी अशी काढून घेणं मला प्रशस्त वाटलं नाही आणि मी तिचा स्वीकार केला नाही. तर भारतात गेल्यावर एके दिवशी पंचमनं माझ्या आईच्या हातात गणपतीची पोवळ्याची नवीन अंगठी मला आशीर्वाद म्हणून दिली. जरी ती दररोज घालून घालून खूप झिजली आहे तरी ती अंगठी माझ्याबरोबर सतत असते.

एके दिवशी मी माझ्या कामावरून घरी आले तर माझे वडील, पंचम आणि दीपन माझ्या घराबाहेर सिगारेटी ओढताना दिसले. पंचम म्हणाला, ''नाना म्हणाले की तुझ्या अपघातानंतर तुला सिगारेटच्या धुराचा फार त्रास होतो. त्यामुळे आम्ही बाहेर उभे आहोत.'' पंचमनं त्यानंतर माझ्यासमोर कधीही सिगारेट ओढली नाही. असा त्याचा स्वभाव प्रेमळ होता. एकेदिवशी मी स्टुडियोत वाद्यांनी भरलेलं खोकं उचलून येत होते, तर पंचम धावत आला व माझ्या हातातील खोकं काढून ते तो स्वत: उचलून घेऊन गेला. एकदा माझी अमेरिकन

बहीण नॅन्सी चॅपेल स्टुडियोत भेटायला आली, तर ती जाताना तिची बॅग उचलून तिला टॅक्सीपर्यंत पंचमनं पोचवलंच, शिवाय ती व्यवस्थित बसली आहे ह्याची खात्री करून त्यानं टॅक्सीचं दार लावलं. आम्हा सर्वांची किती काळजी घ्यायचा तो!

पंचम दादा बर्मानांचा एकुलता एक मुलगा म्हणून किंवा सुप्रसिद्ध संगीतकार म्हणून आखडूपणानं कधीच वागला नाही. एकदा दुपारी तो कोणालाही काही न सांगता गायब झाला. पंचम कुठे गेला ह्याची शोधाशोध भावानं सुरू केली. मिशन डिस्ट्रीटमधला पॅट ग्लीसनचा सुप्रसिद्ध डिफ्रन्ट फर स्टुडियो फारशा चांगल्या भागात नव्हता. एकट्यादुकट्यानं भटकण्याच्या लायकीचा तर मुळीच नव्हता. पंचमच्या खिशात खूपच पैसे. काळजीनं माझा भाऊ रडकुंडीला आला. २४ तास उलटल्याशिवाय आम्ही पोलिसांकडे चौकशी करू शकत नव्हतो. काही तासांनंतर पंचम नवकोरं चीकानो (मेक्सिकन तरुण) पद्धतीचं काळ्या रंगाचं चकचकीत जॅकेट घालून एखाद्या विजेत्यासारखा तोंडभर हसत आला. लहान मुलासारखं त्याला, त्यानं विकत घेतलेला दुर्मिळ लॅटिन अल्बम सगळ्यांना कधी दाखवू असं झालं होतं. माझ्या भावानं जी शिव्यांची लाखोली सुरू केली, तितक्या शिव्यांचं भांडार माझ्या भावाकडे आहे हे आम्हाला कोणालाच माहिती नव्हतं. पंचमनंही त्या सर्व शिव्या चुपचाप ऐकून घेतल्या.

एके दिवशी पिट, पंचम, दीपन आणि मला 'इंडियाना जोन्स' हा नुकताच प्रसिद्ध झालेला सिनेमा बघायला घेऊन गेला. त्या सिनेमाची तांत्रिक दृष्ट्या त्या तिघांची इतकी चर्चा झाली की ती सर्व ऐकल्यानंतर, माझी कोणताही सिनेमा बघण्याची दृष्टी बदलून गेली. पंचम-दीपनमुळे कोणत्याही गाण्यातली सर्व वाद्यं एकाच वेळी ऐकत असताना ती त्याच वेळेला वेगळी वेगळी कशी ऐकायची हे कठीण शास्त्रही शिकले.

पान्तेराच काम संपलं. पंचम म्हणाला, तुम्ही सर्व परत जा. मी निलुबरोबर इथेच राहतो आणि जरा लेक टाहो वगैरे ठिकाणी भटकतो. परत माझ्या भावानं त्याला चुपचाप त्यांच्याबरोबर शिकागोला निघण्यासाठी दम दिला. परंतु पंचम आणि मी त्याच क्षणी ठरवलं की ब्राझीलला कार्निवलला धमाल करायला जाऊच. शेवटी ऊहापोह करून आम्ही दोघांनी १९९८ मध्ये जायचं ठरवलं. माझी मेक्सिकोला नोव्हेंबर १९९३ साली पाच पेट्रोलियम आणि पाईपलाइन ह्या प्रोजेक्ट्सवर वरील हुद्यावर मॅनेजर म्हणून बदली झाली. जानेवारी १९०४ मध्ये पंचमच्या निधनाची बातमी सांगायला भावाचा मेक्सिकोत ऑफिसमध्ये फोन आला. मी रडत रडत जवळजवळ कोसळलेच. मेक्सिकोतल्या लोकांना पंचम कोण हे माहीत नव्हतं. परंतु त्यांना कळलं की निलूचा प्रेमाचा भाऊ गेला आणि ती भयंकर दु:खी आहे. माझा भाऊ काही दिवसांनी एक आठवड्याची सुट्टी घेऊन एकटाच मला भेटायला आला. आम्हा दोघांना पंचमच्या आठवणी काढून एकत्र भरपूर रडण्याची गरज होती. आमचं दु:ख हे आम्हालाच समजणार होतं.

माझ्या डोक्यात संगीत देण्याचा व ते पंचमला अर्पण करायचा विचार सारखा घोळत होता. मग बऱ्याच वर्षांनी मसालाच सिनेमा काढायचा व त्याला संगीत द्यायचा माझा विचार पक्का झाला. भारतात येऊन 'आँखोंमें सपने लिये' हा सिनेमा पूर्ण केला व पंचमला अर्पण केला. पंचमबरोबर काम केलेल्या सर्व वादकांना तर घेतलंच शिवाय रमेश अय्यरनं अरेंजर म्हणून मला कल्पनेपलीकडे साथ दिली. आशाताईंच्या गाण्यानं व त्यांच्या आशीर्वादानं रेकॉर्डिंग सुरू झालं. कविता कृष्णमूर्ती, जासपिंदर नरुला, अनुराधा पौडवाल व पंचमचा धाकटा भाऊच अशा अमितकुमारनं बाकीची सर्व गाणी म्हटली. दीपननं स्वत:चाच सिनेमा आहे असं समजून त्यात जीव ओतला. सिनेमाचा दर्जा त्यानं इतका वाढवला, की जाणकारांनी मला तांत्रिक दृष्ट्या पूर्ण मार्क दिले. परंतु वितरण करणं न जमल्यामुळे व्यवहारात मी चिक्कार मार खाल्ला.

बऱ्याच लोकांनी मला सांगितलंय की भारतात विविध भारतीवर माझ्या सिनेमातली गाणी अधूनमधून अजून ऐकू येतात. २००८ साली त्रिनिदाद वेस्ट इंडिजमध्ये माझी बदली झाली. सकाळीच साडेसहाच्या सुमाराला एका सहकारीबरोबर कामावर जात असताना माझं 'दुर्गामाता' हे सिनेमातलं गाणं रेडियोवर लागलं. माझ्या डोळ्यांतून आश्चर्यानं व दु:खानं घळाघळा पाणी वाहू लागलं. दीपन हे जग सोडून पंचमला स्वर्गात भेटायला आधीच दोन दिवस गेला होता.

आशाताई एकदा मला म्हणाल्या, 'निलु, पंचम गंधर्वच होता. त्याचं इथलं काम संपलं तसा तो आपल्या सर्वांना सोडून आता देवाच्या दरबारात संगीत निर्माण करायला गेला.'' खरंच की!

**– निलु निरंजना गव्हाणकर**
द्वारा, चिंतामणी चितळे, गोपिकाश्रम,
७५९/३२ डेक्कन जिमखाना, पुणे
nilugavankar@gmail.com

# दूरचित्रवाणी : साहित्यविश्व आणि दृश्यकला

**रविराज गंधे**

दृश्यकलेचा उत्कट प्रभाव बघण्यासाठी तंत्र वापरण्याआधी कथावस्तू अथवा विषयाची-कल्पनेची नितांत गरज असते. त्यात वैशिष्ट्य, वैविध्य आणि आशयघनता असावी लागते. टीव्हीमालिका अन् विविध कार्यक्रमांत अशा प्रकारचं फारसं वैविध्य नसल्यानं त्याचं स्वरूप हे प्रामुख्याने संवाद-संभाषण प्रचुर असं वाचाळ पद्धतीचं आहे. त्यात दृश्यात्मक परिणाम साधण्याची फारशी गरज भासत नाही. त्यामुळे टीव्हीवर बोलत असलेला माणूस सर्वात मोठं visual असतं. करोडो भारतीय प्रेक्षकांच्या कौटुंबिक मानसिकतेला टीव्हीवरची हीच दृश्यकला परिचित आहे.

लाखो वर्षांपूर्वी आदिमानवाच्या अवस्थेतील माणसानं चित्रकला-शिल्पकला आत्मसात केली होती. त्यावेळी त्याच्या भवतालची-आजुबाजूच्या निसर्गाची विविध रूपं-प्रतीकं याचं प्रतिबिंब त्यात उमटायचं. तो राहत असलेल्या गुहांमधील भिंतींवर खोदून तयार केलेली पशू-पक्ष्यांची चित्रं किंवा मातीच्या-दगडांच्या साहाय्यानं तयार केलेल्या प्रतिकृती याची साक्ष देतात. या सर्व प्रयत्नांमधून तो आपण पाहिलेल्या अथवा त्याला आठवणाऱ्या प्रतिमांना पुन्हा दृश्य स्वरूपात पाहण्याचा प्रयत्न करायचा. तो पुन:प्रत्ययाचा आनंद हाच दृश्यकलेचा उगम होता. हीच प्रेरणा भविष्यकाळात प्रगत आणि प्रगल्भ होऊन दृश्यकलेचा अभिजात सुंदर रूपात विविध माध्यमांद्वारे व्यक्त होऊ लागली. चित्रकला-शिल्पकला, साहित्यकृती, नाटक-सिनेमा आदी अनेक कलांमधून त्या त्या वेळच्या भवतालचं राजकीय-सामाजिक-धार्मिक-सांस्कृतिक स्थितीचं अतिशय प्रभावी आणि उत्कट दर्शन ह्या माध्यमांद्वारे होऊ लागलं. जागतिक पातळीवरील असंख्य प्रतिभाशाली कलावंतांनी ही सारी स्थित्यंतरं आणि त्यांचा अन्वयार्थ आपापल्या महान कलाकृतींमधून प्रकट केला. मग ते व्यास-वाल्मीकी असोत अथवा शेक्सपीअर असो, लिओनार्दो किंवा चार्ली चॅप्लिन असो!

सदर विषयासंदर्भात विचार करायचा झाला तर काही महत्त्वाचे मुद्दे आधी लक्षात घ्यायला हवेत. दूरचित्रवाणी माध्यमात मुळात साहित्यविश्व अस्तित्वात होतं किंवा आहे का? असल्यास ते कितपत अभिजात आणि सशक्त होतं? ह्या दृक्‌श्राव्य माध्यमांतील दृक् म्हणजे दृश्यकलेला किती प्राधान्य दिलं जातं वा तिचा वापर केला जातो, की अजूनही ह्या माध्यमावर श्राव्यकलेचाच पगडा आहे, ह्या बाबी विचारात घ्याव्या लागतील. तसंच ह्या माध्यमात काम करणाऱ्यांना आणि सर्वसामान्य प्रेक्षकवर्गाला साहित्यविश्वाची कितपत गोडी आणि जाण आहे, माध्यमकर्मी आणि लाखो-करोडोंच्या संख्येतील प्रेक्षकवर्ग हा कितपत दृश्यकला साक्षर आहे, हेही तपासणं गरजेचं आहे.



कोट्यवधींची लोकसंख्या असलेल्या आपल्या या देशात अक्षर साक्षरता रुजायला अनेक शतकं खर्ची पडली. अजूनही ४० टक्क्यांहून अधिक लोक निरक्षरतेच्या अंधारगृहेत चाचपडतायत. मोबाईलचा वापर करणाऱ्यांची संख्या मात्र ९० टक्क्यांच्या आसपास आहे. शिक्षणाचा जसा जसा प्रसार आणि प्रचार होऊ लागला तसंतसं लिहण्या-वाचणाऱ्यांचं प्रमाण वाढू लागलं. वाचनसंस्कृती मूळ धरू लागली. शिक्षणक्रमातील भाग म्हणून विद्यार्थी पाठ्यपुस्तकातील कथा-कविता-कादंबऱ्या वाचू लागले. त्या निमित्तानं त्यांची साहित्यविश्वाशी थोडीफार ओळख झाली. पुढे अभ्यासक्रम पूर्ण होताच त्यांचा साहित्याशी असलेला थोडाबहुत संपर्क तुटला आणि ते नोकरी-धंद्यात रममाण झाले. ज्यांना खरंच साहित्याची गोडी अन् आवड होती. त्यांनी ती प्रेमानं जोपासली. आपल्या साहित्यविषयक जाणिवा समृद्ध केल्या. त्याचं प्रमाण अर्थातच अल्पच राहिलं. सर्वसामान्य माणसाला त्याची निकड न भासल्याने तो ह्या साहित्यविषयक जाणीवांपासून अनभिज्ञ राहिला. आपल्या समाजातील एका मोठ्या सुशिक्षित, उच्च तंत्रज्ञान आत्मसात केलेल्या मध्यमवयीन आणि युवावर्गाचा जीवनातील प्राधान्यक्रम हा व्यवसाय अन् नोकरीभिमुख झाल्यानं त्यांनाही साहित्याचं फारसं सोयरसुतक राहिलं नाही. त्यामुळे रेडिओ आणि टेलिव्हिजन ही कोट्यवधींच्या संख्येत असलेल्या सर्वसामान्यांची माध्यमं म्हणून लोकप्रिय झाली. त्यांच्या आवडी-निवडी-प्रश्न-स्वप्न-महत्त्वाकांक्षा-हौस-मौज जागवत जास्तीत जास्त लोकाभिमुख झाली. ह्या साऱ्या परिवर्तनामध्ये साहित्यविश्वाला ह्या माध्यमांमध्ये महत्त्वाचं असं केंद्रस्थान कधीच नव्हतं. दूरदर्शन आणि आकाशवाणीवर सुरुवातीच्या काळात साहित्यविश्वाचा चांगला प्रभाव होता. परंतु विशेषत: गेल्या दोन दशकांत बाजारपेठेच्या वर्चस्वाखाली तो जवळपास संपल्यात जमा झाला.

सन २००० सालापर्यंत दूरदर्शन आणि काही खाजगी वाहिन्यांचं प्रक्षेपण क्षेत्र हे मुख्यत्वे शहरी भागापुरतं मर्यादित होतं. कार्यक्रमनिर्मितीच्या आशय-विषयात सुशिक्षित शहरी लोकांना भावतील असे कार्यक्रम असायचे. दोन हजार सालानंतर ह्या खंडप्राय देशातल्या खेड्यापाड्यात उपग्रहाद्वारे सर्वच दूरचित्रवाणीच्या अनेक वाहिन्या दिसू लागल्या आणि सासू-सुनांच्या कौटुंबिक मालिकांची कथानकं लोकप्रिय होऊ लागली. भारतातील बाजारपेठ काबीज करण्यासाठी उत्पादकांना जाहिरात व विक्रीसाठी हा बॅकड्रॉप महत्त्वाचा वाटला. करोडोंच्या संख्येतील सामान्य स्त्री-पुरुष प्रेक्षकांत; त्यातही ग्रामीण-निमशहरी भागातील प्रेक्षकांत सवंग विनोदी मालिका-कार्यक्रम लोकप्रिय होऊ लागले.

दूरचित्रवाणी हे उत्कृष्ट साहित्यमूल्य आणि सुंदर दृश्यकला यांचा अपूर्व संगम असलेलं प्रभावी माध्यम होऊ शकतं याचा साक्षात्कार भारतातल्या कोट्यवधी लोकांना रामायण आणि महाभारत ह्या दोन महान ऐतिहासिक मालिकांद्वारे झाला. बी.आर. चोपडा आणि रामानंद सागर यांनी ही अभूतपूर्व अशी 'व्हिज्युअल ट्रीट' दूरदर्शनच्या माध्यमातून लोकांना दिली. हे आश्चर्य टीव्हीवर घडण्याआधी दूरचित्रवाणीचे प्रेक्षक हिंदी फिल्म्स आणि फिल्मी गाण्यांच्या कार्यक्रमातून चित्रपटांमधील दृश्यकला पुन्हा छोट्या पडद्यावर पाहत होते. त्यात दूरचित्रवाणीसाठी खास निर्माण केलेला दृश्यकलेचा प्रभावी प्रयोग नव्हता. दूरदर्शनच्या बहारीच्या काळात गोविंद निहलानींची 'तमस', कुमार वासुदेवांची 'हम लोग', शाम बेनेगलांची 'यात्रा' आणि 'भारत एक खोज', 'मुन्शी प्रेमचंद की कहानियाँ', 'मुल्ला नसरूद्दीन की कहानियाँ', भारतातील विविध भाषी नामवंत साहित्यिकांच्या कथांवर आधारित गुलजारकृत 'तेरा पन्ने', आर.के. नारायण यांची 'मालगुडी डेज', गोवर्धन त्रिपाठी यांची 'सरस्वतीचंद्र', देवकीनंदन यांच्या कादंबरीवरील 'चंद्रकांता', चंद्रप्रकाश द्विवेदी यांची 'आर्य चाणक्य' आदी अनेक मालिकांमधून भारतातल्या प्रतिभाशाली साहित्यिकांच्या कलाकृतींचा परिचय प्रेक्षकांना झाला. उत्तम संहिता, जिवंत प्रत्ययकारी बाह्यचित्रण, दिग्गज कलावंतांचा अप्रतिम अभिनय, अचूक दिग्दर्शन याद्वारे दूरचित्रवाणीच्या प्रेक्षकांना निखळ दृश्यकलेचा आनंद मिळाला. साहित्यमूल्य असलेल्या कार्यक्रमाचं लोकांना दर्शन झालं.

प्रादेशिक वाहिन्यांच्या कार्यक्रमातील साहित्यविश्वाचा विचार करायचा झाला तर मुंबई दूरदर्शन केंद्राचं योगदान मोलाचं आणि महत्त्वाचं आहे. जयवंत दळवी यांच्या कादंबरीवर आधारीत 'आव्हान' ही मालिका, ना.धों. ताम्हणकरांचा 'गोट्या', चिं.वि. जोशींचा 'चिमणराव-गुंड्याभाऊ', मधुमंगेश कर्णिकांच्या कादंबरीवरील मालिका 'भाकरी आणि फूल', गो.नी. दांडेकरांची 'पडघवली', लक्ष्मीबाई टिळकांची 'स्मृतिचित्रे', रणजित देसाईंची 'स्वामी', ना.स. इनामदारांची बाजीराव पेशव्यांच्या जीवनावरील 'राऊ' अशा अनेक मालिकांद्वारे मराठी साहित्यविश्वाचं सुंदर-आगळंवेगळं दर्शन प्रेक्षकांना झालं. या व्यतिरिक्त आघाडीच्या नामवंत कथाकारांच्या अनेक अभिजात कथा टेलिफिल्म्सच्या रूपात सादर करण्यात आल्या. अजूनही त्या कार्यक्रमाच्या आठवणी प्रेक्षक आवर्जून काढतात. 'पाऊलखुणा'सारख्या कार्यक्रमातून होणारं त्यांचं प्रक्षेपण पुन:पुन्हा एंजॉय करतात. दूरदर्शन व्यतिरिक्त झी चॅनेल्सवरील 'श्रीयुत गंगाधर टिपरे' ही दिलीप प्रभावळकरांच्या 'अनुदिनी' या रोजनिशीवजा पुस्तकावर आधारित मालिका, रमाबाई रानडे यांच्या चरित्रावर आधारित 'उंच माझा झोका', 'पिंपळपान' ही कथामालिका अशा सकस साहित्यकृतींवरील आधारित कार्यक्रमांना प्रेक्षकांची चांगली पसंती लाभली. वर उल्लेख केलेल्या मालिकांपैकी काही अपवाद वगळता बहुसंख्य मालिका ह्या घरात, वाड्यात अन् दरबार-दिवाणखान्यात चित्रित झालेल्या आपण पाहिल्या. प्रत्यक्ष स्थळांवरील घडलेल्या प्रसंग-घटनांच्या बाह्य चित्रीकरणाचं प्रमाण खूपच कमी आढळलं. त्यामुळे ह्या व अशा मालिका ह्या दृश्यकलेचा आदर्श नमुना म्हणता येणार नाहीत. त्यामुळे बहुतेक पात्रं ही घरातून बाहेर जाताना किंवा येताना येरझाऱ्या घालत वा सोफा-पलंगावर उठबस करताना वा कार्यालयातील-घरातील कामे करताना, खाता-पिताना, संवाद म्हणताना दिसतात. त्यामुळे अखंड बडबडणारी चित्रविचित्र पात्रं हीच 'दृश्यं' आहेत असं आपण समजतो. दूर-चित्रवाणीवरच्या 'दृश्यकलेची' ही पायवाट सर्व चॅन्सेल्सच्या मालिकांमधून वहिवाट झालेली दिसते.



कथा-मालिकांमधून घडणाऱ्या साहित्यविश्वा-व्यतिरिक्त मुंबई दूरदर्शनच्या 'प्रतिभा आणि प्रतिमा', 'शरदाचं चांदणं', 'अमृतवेल' अशा काही कार्यक्रमांमधून मराठी साहित्य-जगताची- लेखक-कवींची - ओळख प्रेक्षकांना झाली. अर्थात ह्या सर्व कार्यक्रमांचं स्वरूप हे मुलाखती, कविता-वाचन, चर्चा-रसग्रहण ह्या प्रकारचं होतं. 'अमृतवेल' ह्या कार्यक्रमातील पुस्तक-परिचय सदर खूप लोकप्रिय झालं. या सदरामुळे सर्वसामान्य प्रेक्षकांचं पुस्तकांविषयीचं कुतूहल जागं झालं. इतर चॅनेलवरील 'नक्षत्रांचे देणे', 'बुकशेल्फ' आदी कार्यक्रमांना देखील चांगला प्रेक्षकवर्ग लाभला. असे काही अपवाद वगळता आजच्या घडीला मुंबई दूरदर्शन वगळता अन्य कुठलाही चॅनेल साहित्यविषयक कार्यक्रम करत नाही हे मोठंच दुर्दैव म्हणावं लागेल. शास्त्रीय संगीताच्या वा साहित्यविषयककार्यक्रमांना सहसा प्रायोजकत्व मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे चॅनेल्सना ह्यात फारसा रस नसतो. 'अमृतवेल' हा कार्यक्रम त्याला अपवाद ठरला. मराठीतील अनेक आघाडीच्या नामवंत प्रकाशकांनी आपल्या लेखकांचं आणि पुस्तकांचं प्रमोशन करण्यासाठी ह्या कार्यक्रमाला प्रायोजकत्व दिलं. वाचनसंस्कृतीचा प्रसार करण्यासाठी आणि साहित्यविश्व प्रेक्षकांपुढे आणण्यासाठी प्रकाशकांबरोबर अन्य उद्योगसमूहांनी-कंपन्यांनी देखील असे कार्यक्रम प्रायोजित करण्याबाबत रस घेणं गरजेचं आहे. केवळ मनोरंजक कौटुंबिक मालिका प्रायोजित करत राहिल्यास साहित्यविश्वाचं दर्शन कार्यक्रमांतून होणं कठीण होऊन बसेल. सासू-सुनांच्या मालिका, नाच-गाण्यांचे कार्यक्रम, रिॲलिटी शोज्, रेसिपीज् तसंच अश्लील अन् पांचट विनोद असलेल्या मालिका; तसंच सुमार नट-नट्यांच्या भुक्कड मुलाखती लोकांना खूप आवडताना दिसतात. अशी विविध कंपन्यांच्या जाहिरातदारांनी चॅनेल्समधील मंडळींची दिशाभूल केली आहे आणि हेच लोकांना हवंय म्हणून प्रेक्षकांवर लादलं जातं. सुंदर, चांगलं अन् आगळंवेगळं दिलं तर लोक नक्कीच पाहतील. प्रेक्षकांना पर्याय नसल्यानं बिचारे जे दाखवलं जातं ते पाहून घटका-दोन घटका स्वत:ची करमणूक करून घेतात. हिट ॲन्ड हॉट, सिझलिंग-पेपी कार्यक्रमांचा जमाना आहे असं गृहीत धरलं तरी प्रेक्षकांच्या आवडीनिवडी घडवता येतात हे सत्य नाकारता येत नाही. दर्जेदार

अन् अभिजात साहित्यकृतींवर आधारित कार्यक्रम-मालिका यांत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. या सर्व प्रक्रियेत महत्त्वाची एक त्रुटी जाणवते ती अशी की मराठीतील नामवंत-प्रतिभावान लेखकांनी सिनेमा अथवा दूरचित्रवाणी कार्यक्रमांसाठी फारसं लेखन केलेलं नाही. किंबहुना हे तंत्र आत्मसात करण्यातही फारसा रस दाखवला नाही. सिनेमासाठी पटकथा लिहिणारे लेखक आहेत परंतु खास दूरचित्रवाणीसाठी म्हणून मालिका अथवा कार्यक्रमांची संहिता लिहिणारे खूपच कमी आहेत. त्याचाही परिणाम साहित्यकृतींवर आधारित कार्यक्रम दूरचित्रवाणीवर न दिसण्यात झाला. सई परांजपे, कमलेश्वर, गुलजार आदी लेखक मंडळींची दूरचित्रवाणीवरील या संदर्भातील कामगिरी मोलाची आहे.

दूरचित्रवाणीवरील 'दृश्यकले'ची तुलना नकळतपणे सिनेमाशी केली जाते. टीव्हीचे कार्यक्रम हे देखील सिनेमासारखे दृश्यपूर्ण असावे असं प्रेक्षकांना वाटतं. ज्या कार्यक्रम निर्मात्यांनी प्रेक्षकांची ही मानसिकता ओळखली त्यांनी आपापले कार्यक्रम एका विशिष्ट चौकटीत राहून जास्तीत जास्त दृश्यपूर्ण केले आणि ते लोकप्रिय झाले. परंतु मुळात दोन्ही माध्यमं ही भिन्न प्रकृतीची आणि वैविध्यपूर्ण, भिन्न समाजगटांसाठी निर्मिती करणारी अशी आहेत. दूरचित्रवाणी कार्यक्रमांची निर्मिती ही कमी खर्चिक आणि आटोपशीर अशी असते, असावी लागते. तसंच रोज रोज चित्रिकरण आणि प्रक्षेपण ही प्रक्रिया सातत्यानं चालू असल्यानं कार्यक्रमांच्या दृश्य भागाकडे जास्त लक्ष देणं तांत्रिक अन् व्यावहारिकदृष्ट्या शक्य होत नाही. त्यामुळे आजही टीव्हीवरील बहुतांश मालिका आणि प्रहसनं ही स्टेजवरील नाटकंच वाटतात. त्यामुळे आपले सारे कार्यक्रम हे श्राव्य माध्यमातच अडकले आहेत. ते डोळे बंद करून नुसते ऐकले तरी समजू शकतात. एन्जॉय करता येतात. याला अपवाद दूरचित्रवाणीवर प्रक्षेपित होणाऱ्या विविध वस्तूंच्या सुंदर, मनमोहक प्रतिभाशाली जाहिरातींचा. दृश्यकलेचा खरा वापर अनेकविध जाहिरातपटांमधून केलेला आढळतो. जाहिरातींच्या ह्या गुणवैशिष्ट्यांमुळे अनेक जाहिराती आबालवृद्ध आणि गृहिणीवर्गात लोकप्रिय होतात. अर्थातच त्यांचा निर्मितीखर्चही भरमसाठ असतो आणि प्रत्येक जाहिरात ही अभ्यासपूर्ण रीतीनं तांत्रिक संशोधन करून आवश्यक तेवढा वेळ घेऊन केलेली असते. टीव्ही मालिकांसारखी घाईगर्दी तिथे नसते.


''गेली ९७ वर्षे सतत ग्राहकांची सेवा करीत पूर्णपणे संगणकीकृत बारा शाखांसह आधुनिक प्रगतीची वाटचाल''

॥ असमर्थास समर्थ करणे ॥

**दि डेक्कन मर्चन्टस् को-ऑप. बँक लि. मुंबई**

मुख्य कार्यालय : २१७, राजा राममोहन रॉय रोड, गिरगांव, मुंबई ४०० ००४. दू. क्र. २३८५४९४५, २३८६८१३४, २३८५४९९४ फॅक्स क्र. - २३८९ ६८५३

मध्यवर्ती कार्यालय : १३-१४, गणानाथ को-ऑपरेटिव्ह हौ. सोसा. लि., दादर (पश्चिम) स्टेशनसमोर, मुंबई-४०० ०२८. दू. क्र. २४२२५७१८, २४२२३११६. फॅक्स क्र. - २४३१ ५० ५०

**शाखा**

**१) गिरगांव, २) दादर, ३) भायखळा, ४) घाटकोपर (प.), ५) गोरेगांव, ६) बोरीवली, ७) दहिसर, ८) घाटकोपर (पू.), ९) वाशी, १०) ठाणे, ११) खारघर, १२) हडपसर, पुणे. नियोजित शाखा - सासवड, पुणे.**

वरील सर्व शाखांमधून आरटीजीएस द्वारे फंड्स ट्रान्सफरची सुविधा उपलब्ध कोअर बँकिंगद्वारे कुठल्याही शाखेतून व्यवहार करण्याची तसेच मोबाईल, एस.एम.एस. बँकिंगची सेवा उपलब्ध. दादर, भायखळा, ठाणे या शाखांमधून फ्रॅकींग सेवा उपलब्ध. अल्पावधीत इंटरनेट बँकिंगची सेवा उपलब्ध होईल.

**वसुल भाग भांडवल १२.०२ कोटी** | **ठेवी ४४०.७० कोटी** | **कर्ज २७५.७० कोटी**

**श्री. रामदास गोविंदराव हुले**
उपाध्यक्ष

**श्री. काशिनाथ दिनकर मोरे**
अध्यक्ष

**श्री. शशिकांत ल. अभंग**
सरव्यवस्थापक

ho@deccanbank.com website-www.deccanbank.com co@deccanbank.com

आपल्या देशातल्या जनसामान्यांना शास्त्रीय अन् भावसंगीत तसंच हिंदी-मराठी नव्या-जुन्या गाण्यांची गोडी लावण्यात रेडिओनं महत्त्वाची भूमिका बजावली. रेडिओमुळे देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत सिनेसंगीताचा प्रसार झाला. ते लोकप्रिय झालं. रेडिओच्या कार्यक्रम निर्मितीमध्ये वाद्यसंगीत, कलासंगीत, मुलाखती, भावगीतं, वाद्यवृंद चर्चा, श्रुतिका, नाटकं अशा विविध श्राव्य कार्यक्रमांचं मोठ्या प्रमाणावर सादरीकरण असतं. दूरदर्शनचं आगमन झाल्यावर रेडिओसाठी काम करणारी बहुसंख्य निर्माते मंडळी टीव्हीसाठी कार्यक्रमनिर्मिती करू लागली. त्यांच्यावर रेडिओच्या पठडीतील कार्यक्रमांच्या संकल्पनांचा मोठाच पगडा होता. अजूनही तो जाणवतो. त्यामुळे रेडिओच्या कार्यक्रमात जसा समोर माईक असतो तसा इथं समोर कॅमेरा असतो, असाच काहीसा समज दृढ झाला. बहुसंख्य कार्यक्रमांच्या संकल्पना ह्या रेडिओतील कार्यक्रमासारख्या झाल्या. दूरदर्शनबरोबरच अन्य दूरचित्रवाणी वाहिन्यांनी हीच संकल्पना अंगिकारली. अर्थात ह्या सर्व कार्यक्रमनिर्मितीमध्ये बाह्य चित्रिकरणाच्या दृश्यफितीचा अंतर्भाव होता किंवा अजूनही असतो. त्याचं प्रमाण मात्र अत्यल्प असतं. कार्यक्रम visually rich असायला हवेत असं सर्वच निर्मात्यांचं मत असतं. त्यामुळे घरातल्या घरातही सुटाबुटातले पुरुष आणि पैठणी-दागिने ल्यालेल्या स्त्रिया, आकर्षक सेट, भपकेबाज भव्यता दाखवणे हे कथानकापेक्षा अधिक गरजेचं झालेलं दिसतं. त्यामुळे 'visually rich' याची नेमकी व्याख्या करता येईनाशी झाली. मालिकांमधली सुंदर, आकर्षक व्यक्तिमत्त्वाची, विविध पात्रांतील बहारदार अभिनय करणारी स्त्री-पुरुष-तरुण-तरुणी-मुलं हीच टीव्हीतील rich visuals ठरू लागली. तल्लीन होऊन गाणारा गायक-वादक-नर्तक किंवा भावपूर्ण-प्रभावी-मनाला स्पर्शून जाणारी भाषा बोलणारी माणसं हीच व्हिज्युअल ठरली. टीव्ही कार्यक्रमातील बहुसंख्य माणसांची लकब, हावभाव, बॉडी लँग्वेज प्रेक्षकांना आवडू लागली. मालिका अन् कार्यक्रमांतील गोड चेहऱ्यांची, हसतमुख-भोळीभाबडी, निरागस दिसणाऱ्या नटमंडळींत प्रेक्षक आपले भाऊ-बहीण-प्रेयसी-आई-वडील पाहू लागले. त्यांचं एकमेकांशी असलेलं नातं स्वत:शी रिलेट करू लागले.



कार्यक्रम निर्मातेदेखील प्रेक्षकांची ही मानसिकता ओळखून सातत्यानं नवनवीन चेहरे प्रेक्षकांपुढे आणत असतात. प्रेक्षकांना ह्या नवीन चेहऱ्यांचा लळा-जिव्हाळा लागतो. ते त्यांच्या प्रेमात पडतात अन् त्याच त्या विषयांवरच्या मालिका पुन्हा नवीन संचात पाहत राहतात.

सर्वसाधारणपणे चित्रकलेत पेंटिंग ब्रशचे स्ट्रोक्स अन् विविध रंगसंगती आणि त्यांच्या शेडसद्वारे दृश्यमय परिणाम साधला जातो तर रेखाचित्रांमध्ये कर्व्हज् आणि फाइन-लाइनला महत्त्व असतं. दृक्श्राव्य माध्यमातील दृश्यकलेत सौंदर्यपूर्ण दृश्यचौकटीला (फ्रेम) महत्त्व असतं. ह्या चित्रचौकटी छाया-प्रकाशाची योजना आणि विषय-आशयाची उत्कट-प्रभावी मनोहारी मांडणी ह्या गोष्टी प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतात. दृश्यकलेचा उत्कट प्रभाव बघण्यासाठी तंत्र वापरण्याआधी कथावास्तू अथवा विषयाची-कल्पनेची नितांत गरज असते. त्यात वैशिष्ट्य, वैविध्य आणि आशयघनता असावी लागते. टीव्हीमालिका अन् विविध कार्यक्रमांत अशा प्रकारचं फारसं वैविध्य नसल्यानं त्याचं स्वरूप हे प्रामुख्याने संवाद-संभाषण प्रचुर असं वाचाळ पद्धतीचं आहे. त्यात दृश्यात्मक परिणाम साधण्याची फारशी गरज भासत नाही. त्यामुळे टीव्हीवर बोलत असलेला माणूस हेच सर्वात मोठं visual असतं. करोडो भारतीय प्रेक्षकांच्या कौटुंबिक मानसिकतेला टीव्हीवरची हीच दृश्यकला परिचित आहे. ही मानसिकता जोपर्यंत अबाधित आहे तोपर्यंत टीव्हीच्या पडद्यावर विविध मालिका अन् कार्यक्रमांतून नित्यनेमाने होणारी रंगीबेरंगी चेहऱ्यांच्या वसंतपंचमीची नयनरम्य बरसात हेच टीव्हीवरचं सगळ्यात मोठं visual ठरणार आहे. दूरचित्रवाणीवरील तथाकथित दृश्यकलेचं आणि साहित्यविश्वाचं आजमितीला हेच चित्र असल्याचं जाणवतं.

**रविराज गंधे**
५८/८ वसंतस्मृती, पांडुरंगवाडी,
गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६३
भ्रमणध्वनी : ९८२०३७८४४८
ravirajgandhe@gmail.com

# थिएटर्समधील गमतीजमती

**अरुण पुराणिक**

सिनेमा आणि तमाशा यांचे तंबू शेजारीच उभारले असत. काही बायका चुकून तमाशा थिएटरमध्येही घुसत असत. सिनेमाचा शेवटच्या दिवशी वेगवेगळ्या सिनेमांच्या तुटक्या फिल्म्स एकत्र जोडून हे कल्पक तंबूवाले त्यांची स्वत:ची 'जंतरमंतर' फिल्म तयार करत. त्यात कृष्ण, हनुमान, तुकाराम, शिवाजी, सीता सारे असत. हा शो फुकटात सर्वांना दाखवला जात असे आणि तो मजेदार शो पाहायला प्रचंड गर्दी होत असे. तंबू थिएटरची मजा काही औरच होती.

रोह्याला दिनकर गांगलांच्या अध्यक्षतेखाली 'कोमसाप'चे अधिवेशन यशस्वीरीत्या पार पडल्यावर रात्री तिथल्या सरकारी विश्रामगृहात श्रमपरिहाराचा कार्यक्रम सुरू झाला. गप्पांचा विषय होता 'सिनेमा'! सिनेमा हा माझा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय! माझ्या शाळा-कॉलेजच्या दिवसांतील मधुर आठवणी म्हणजे, इराणी हॉटेल्स, रेडिओ सिलोन आणि सिनेमा!

कर्तबगार पुरुषांना विविध प्रकारचे नाद असतात. मला सिनेमा पाहण्याचा नाद होता. त्याला नादच म्हटले जाई. कारण त्या काळात सुशिक्षित, मध्यमवर्गीय घरातील लहान मुलांनी सिनेमा पाहणे, फिल्मसंगीत ऐकणे शिष्टसंमत नव्हते. शाळा-कॉलेज बुडवून हे एक चोरून जोपासलेले व्यसनच होते. चांगला सिनेमा पाहण्यासाठी ग्रँटरोडच्या बकाल आणि बदनाम वस्तीत जाण्यासही कमीपणा वाटेनासा झाला. हे एक नैतिक अध:पतन होते पण सिनेमा थिएटर्सच्या अंधारात मी रमलो. तिथे एक वेगळेच आयुष्य अनुभवले मानवी मनाचे कंगोरे पाहिले. त्या काळातले ऐकीव किस्से, प्रत्यक्ष पाहिलेले प्रसंग, घटना आमच्या गप्पाष्टकात मी सांगायला सुरुवात केली. ग्रंथालीचे अरुण जोशी, सुदेश हिंगलासपूरकर, कुमार नवाथे, दिलीप चावरे, मोहन खैरे तल्लीन होऊन ते ऐकत होते. गप्पा चांगल्या रंगात आल्या होत्या. त्याचवेळी अरुण जोशींच्या डोक्यात शब्द रुचीच्या दिवाळी अंकासाठी हा विषय घोळू लागला. त्याच आठवणी शब्दरूप करण्याचा हा एक प्रयत्न...

आयुष्यातला पहिला सिनेमा मी माझ्या आजोळी पश्चिम महाराष्ट्रातील एका खेडेगावात तंबू थिएटरमध्ये पाहिला. वर्षातून एकदा म्हसोबाच्या जत्रेच्या निमित्ताने गावात टूरिंग सिनेमा आणि तमाशा येत असे. एरवी तिथे दुसरी कोणतीच करमणूक नसे. गावाबाहेर सपाट माळरानावर गॅसबत्त्यांच्या उजेडात आठवडाभर त्यांचा मुक्काम असे.

तंबू थिएटर म्हणजे बांबूंना मळक्या कपड्याची कनात लावून बंदिस्त केलेली हजार-बाराशे फुटांची मोकळी जागा! वर मात्र सर्व उघडे! आत डिझेलवर चालणारा जनरेटर, पांढरा पडदा, १६ एमएमचा प्रोजेक्टर आणि रिळांचे डबे! सायंकाळी

छकड्याला किंवा हातगाडीला सिनेमाचे बोर्ड व भोंगे लावून ते वाजतगाजत गावातून मिरवले जात. सिनेमा कोणताही असो, त्याची जाहिरात मात्र ठरलेली असे. 'हाणामारीने भरलेला, चित्तथरारक प्रसंगांनी नटलेला, अत्यंत हृदयस्पर्शी!' चित्रपट असे 'संत तुकाराम!' आता संत तुकाराममध्ये कसली हाणामारी असणार? पण याच जाहिरातीला भुलून लोक 'संत तुकाराम' पाहायला गर्दी करत. गावातील गल्लीबोळांतून हे लोक तोंडाला भोंगा लावून ओरडत फिरत– 'याल तर हसाल! न याल तर फसाल! आईबरोबर पोरगी फुकट, बापाबरोबर पोरगा फुकट!' सायंकाळी थिएटरवर लोकांचा आरडाओरडा चालू होत असे. बाहेर गाड्यांवर शेव-चिवडा, चहा-भजी, सोडा-लेमन, पानबिडीची दुकाने थाटली जात. आसपासच्या पंचक्रोशीतील लोक चालत, सायकलीवर, बैलगाड्या जुंपून येत.

थिएटरमध्ये खुर्ची हा प्रकार नसे. गावचा सरपंच-पाटीलही खालीच बसत असे. काही उत्साही लोक पडद्याच्या मागेही जाऊन बसत. प्रोजेक्टरमध्ये खाली वाकून त्यात कुणी माणसे लपली आहेत का ते पाहत. सिनेमा सुरू होताना थिएटरमध्ये अंधार केला जाताच, लोक कंदिलाची वात मोठी करून, तो डोक्यावर घेऊन आसपास काय चालले आहे ते पाहत. सिनेमा सुरू झाला की टाळ्यांचा गजरात, शिट्ट्या फुंकत, रुमाल-पटके उडवत त्याचे स्वागत केले जाई. प्रोजेक्टरमधून सोडलेल्या प्रकाशझोतात मध्ये उभे राहून वेडेवाकडे हातवारे करत, काही लोक नाचत. तो सावल्यांचा खेळ पाहताना मजा वाटे. फिल्म तुटली, रिळे संपली की मग दहा मिनिटांची सुट्टी! आया मुलांना लघुशंकेसाठी बाहेर घेऊन जात. लोक तिथेच बसून चिवडा खात, जेवण करत, बिड्या फुंकत, गप्पा मारत.

पडद्यावर हलती-बोलती-नाचती चित्रे पाहणे म्हणजे एक रोमांचकारी अनुभव असे. कोणत्यातरी सिनेमात आगीनगाडी होती, ती आपल्या अंगावर येईल म्हणून प्रेक्षक तंबूबाहेर सैरावैरा धावत सुटले होते. लोक सिनेमातील नागालाही भीत असत. बाबुराव पेंढारकर, चंद्रमोहन खलनायकाच्या भूमिका करत. त्यांचा प्रवेश सुरू झाला की 'आला गं मुडदा! याचं मढं घातलं! मेल्याची तिरडी मोडली! याच्या आयला याच्या!' अशा अर्वाच्य भाषेत त्यांचा उद्धार केला जात असे. सिनेमात कुणी मेले. त्याचे प्रेत जाळताना दिसले की खेडूत स्त्रिया डोळ्यांना पदर लावून हमसून हमसून रडत. देवाचा सिनेमा असला तर पडद्याला भक्तिभावाने नमस्कार करत. सिनेमा आणि तमाशा यांचे तंबू शेजारीच उभारले असत. काही बायका चुकून तमाशा थिएटरमध्येही घुसत असत. सिनेमाचा शेवटच्या दिवशी वेगवेगळ्या सिनेमांच्या तुटक्या फिल्म्स एकत्र जोडून हे कल्पक तंबूवाले त्यांची स्वत:ची 'जंतरमंतर' फिल्म तयार करत. त्यात कृष्ण, हनुमान, तुकाराम, शिवाजी, सीता सारे असत. हा शो फुकटात सर्वांना दाखवला जात असे आणि तो मजेदार शो पाहायला प्रचंड गर्दी होत असे. तंबू थिएटरची मजा काही औरच होती.

सन १९४२ भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे शेवटचे रक्तरंजित पर्व चालू झाले होते. कोवळे कोवळे क्रांतिकारक हाती तिरंगा घेऊन हसत हसत फाशीच्या तख्ताला कवटाळू लागले. त्यांच्या बलिदानाने उभा भारत पेटून उठला. अवघी जनता देशप्रेमाने भारावून गेली होती. स्वतंत्र भारताचे स्वप्न साकार होणार, या सुखद कल्पनेने आबालवृद्धांत नवचैतन्य जागृत झाले होते. त्याच सुमारास जानेवारी १९४३ मध्ये मुंबईच्या रॉक्सी सिनेमात अंगावर रोमांच फुलविणारे, ज्वलंत राष्ट्रप्रेम जागृत करणारे नाट्य घडत होते.

थिएटरच्या अंधारात रॉक्सीच्या पडद्यावर बॉम्बे टॉकिजच्या 'किस्मत'ची नायिका मुमताज शांती उच्च स्वरात ब्रिटिश राजसत्तेला ठणकावत होती, 'दूर हटो, दूर हटो, ऐ दुनियावालो, हिंदोस्ता हमारा है।' थिएटरमधील सर्व प्रेक्षक जागेवर उभे राहून, टाळ्यांच्या कडकडाटात मानवंदना देत होते. संगीत नाटकातील एखाद्या नाट्यपदाला वन्समोअर मिळतो. परंतु थिएटरमध्ये एखाद्या चित्रपटगीताने वन्समोअर घेतल्याचे हे एकमेव उदाहरण असेल! लोकांच्या तुफान प्रतिसादामुळे प्रोजेक्टर ऑपरेटरला रीळ उलटे फिरवून परत परत हे गाणे दाखवावे लागत होते.

सोहराब मोदींच्या मिनर्व्हात त्यांच्याच 'शीशमहल' चित्रपटाचा शो चालू होता. तिथे फेरफटका मारताना मोदींना थिएटरमध्ये एक प्रेक्षक चक्क झोपलेला दिसला. त्यांनी थिएटरच्या मॅनेजरला बोलावून सांगितले, 'तो प्रेक्षक बहुधा आजारी असावा. त्याला उठव! तिकिटाचे पैसे परत करून त्याला व्हिक्टोरियातून घरी पाठव.'

मॅनेजर 'बरं!' म्हणून त्या प्रेक्षकाला उठवायला गेला. प्रत्यक्षात तो प्रेक्षक झोपलेला नव्हता. तो अंध होता आणि तो चित्रपट पाहायला नाही तर ऐकायला आला होता. कुतूहल चाळवल्यामुळे स्वत: मोदीही त्या अंध प्रेक्षकाला भेटायला आले. 'मी मोदी साहेबांच्या आवाजाचा दिवाना आहे आणि त्यांचा प्रत्येक चित्रपट ऐकायला मी इथे येतो. त्यांचे संवाद मला भरभरून कर्णसुख देतात.' त्या अंध प्रेक्षकाचे कौतुकाचे हे चार




शब्द कानावर पडताच मोदींच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. त्यांच्या आजवरच्या भूमिकांचे व आवाजाचे सार्थक झाले होते.

मास्टर विनायक यांच्या 'ब्रह्मचारी'चे कथानक, पटकथा, संवाद आणि गीते मराठी साहित्यातील प्रसिद्ध विनोदी लेखक प्र.के. अत्रे यांनी लिहिले होते. 'ब्रह्मचारी' हा त्या काळातला क्रांतिकारी हॉट चित्रपट. यामध्ये मराठमोळी नायिका मीनाक्षी प्रथमच स्विमिंग ड्रेसमध्ये पडद्यावर आली. प्रेक्षकांसाठी हे काहीतरी अप्रूप होते. ब्रह्मचारी पाहताना आंबटशौकिन लोक पुढील रांगा अडवून बसत. मीनाक्षीच्या स्विमिंग ड्रेसमधील 'यमुनाजळी खेळू खेळ कन्हैया का' गाण्याच्या वेळी कॅमेरा खालून वर जात असे. पुढे बसलेले प्रेक्षक खाली वाकून आशाळभूत नजरेने वर जाणाऱ्या कॅमेऱ्याकडे अजून काही दिसतंय का ते पाहत!

'गाठ पडली ठका ठका'च्या वेळी गिरगावातील सेंट्रल सिनेमात घडलेला गमतीदार किस्सा अभिनेत्री जयश्री गडकर यांच्याच शब्दांत–

''सेंट्रल सिनेमात त्याचा प्रिमिअर पंधरा दिवसांवर आला होता. मी या चित्रपटाची नायिका. त्यामुळे मी हवेतच तरंगत होते. मैत्रिणींसमोर भाव मारावा म्हणून राममोहनमधील माझ्या वर्गमैत्रिणींना घेऊन मधल्या सुट्टीत माझे चित्रपटातील फोटो दाखवायला त्यांना मी सेंट्रलला घेऊन गेले. आम्ही सर्वजणी शाळेच्या युनिफॉर्ममध्ये होतो. मी चित्रपटाची हिरॉईन असल्यामुळे गेटवरचा रखवालदार आम्हाला सहज आत सोडेल अशा थाटात मी त्याच्यासमोर उभी राहिले. पण कसचं काय? मला ओळखणं तर सोडून द्या उलट शाळा चुकवून आम्ही सिनेमा पाहायला आलो म्हणून त्याने मलाच मैत्रिणींसमोर सॉलिड दम भरला. त्या दिवशी 'गाठ पडली ठका ठका'चा सेंट्रलला प्रिमिअर शो होता. माझ्या घरापासून सेंट्रलला सिनेमा पायी चालत गेलो तरी पाच मिनिटांच्या अंतरावर होता, पण चित्रपटाच्या नायिकेनं असं पायी येऊन कसे चालेल? आम्ही एवढ्याशा अंतरासाठी खास गाडी करून सेंट्रलला गेलो. थिएटरबाहेर प्रचंड गर्दी उसळली होती. ती गर्दी माझ्यापेक्षा राजा परांजपे, राजा गोसावी, सूर्यकांत, बाबुराव पेंढारकर, दिग्दर्शक भालजी पेंढारकरांना पाहण्यासाठी जमली होती. सिनेमाच्या रुपेरी पडद्यावर झळकलेलं नाव पाहताना माझं सर्वांग रोमांचित झालं होतं. केवळ तीन तासांत गिरगावातील एका शालेय विद्यार्थिनीचं सिनेमाच्या हिरॉईनमध्ये रूपांतर झालं होतं.

चित्रपट संपल्यावर, आमची गाडी गेटबाहेर काढण्यासाठी गर्दी हटवत दारावरचा रखवालदार गाडीजवळ आला. त्यानं मला जोरदार सलाम ठोकला. मला कृतकृत्य झाल्यासारखं वाटलं. बाह्य जगासाठी माझी एक नवीन ओळख निर्माण झाली होती. मी पर्समधून चक्क दहा रुपयांची नोट काढून (१९५६ मधील ते दहा रुपये होते.) त्याच्या हातावर ठेवीत पंधरा दिवसांपूर्वीच्या त्या प्रसंगाची त्याला आठवण करून दिली. तो माझ्याकडे अवाक होऊनच पाहू लागला.''

मेहबूबच्या आजोळी गुजरातमधील काशीपुरा गावात 'मदर इंडिया' चित्रपटाचे चित्रीकरण चालू असताना अचानक नायिका नर्गिस आगीच्या ज्वाळांत वेढली गेली. सुनील दत्तने स्वत:चा जीव धोक्यात घालून नर्गिसला वाचवले. या दुर्घटनेनंतर नर्गिसचा जणू पुनर्जन्म झाला. ती सुनील दत्ताच्या प्रेमात पडली. दोघांनी विवाह करण्याचे ठरविले पण त्यामुळे निर्माते मेहबूब भलत्याच काळजीत पडले. त्यांनी या विवाहास ठाम विरोध केला, कारण 'मदर इंडिया'तील आई राधा (नर्गिस) आणि तिचा बंडखोर गावगुंड मुलगा बिरजू (सुनील दत्त) खऱ्या आयुष्यात विवाह करणार आहेत ही बातमी बाहेर फुटली असती तर तिचा प्रेक्षकांवर आणि पर्यायाने सिनेमावर विपरीत परिणाम

झाला असता. त्यांनी नर्गिसला ही विवाहाची बातमी गुप्त ठेवण्याची विनंती केली. पण शेवटी ही गोड (!) बातमी बाहेर फुटलीच! राज कपूरला या बातमीने जबरदस्त मानसिक धक्का बसला.

शेवटी गाजावाजा करत शुक्रवार, २५ ऑक्टोबर १९५७ रोजी मुंबईच्या लिबर्टी सिनेमागृहात धुमधडाक्यात 'मदर इंडिया'चा प्रिमिअर झाला. दोन अतिमहत्त्वाच्या व्यक्ती सोडून अवघी फिल्म इंडस्ट्री तिथे लोटली होती. त्या व्यक्ती होत्या राज कपूर आणि सुनील दत्त! एक नर्गिसचा प्रियकर आणि दुसरा तिचा भावी पती!

फिल्म इंडियाच्या बाबुराव पटेलांनी ताज्या अंकात खवचटपणे लिहिलं होतं, 'राज आला नाही, कारण 'मदर इंडिया'च्या प्रिमिअरचा झगमगाट त्याच्या कमकुवत डोळ्यांना सहन झाला नसता! सुनील दत्तला गहन प्रश्न पडला होता की प्रिमिअरला नर्गिसचा मुलगा बिरजू म्हणून जायचं की खाजगी जीवनातील पती म्हणून? सूज्ञ प्रेक्षकांनी या विवाहाचे स्वागत केले. 'मदर इंडिया'ने लिबर्टीत तुफान धंदा केला.

पुण्यातल्या मित्रमंडळींबरोबर मी विजयानंद थिएटरात मॅटिनी शो पाहायला गेलो होतो. मुख्य सिनेमा सुरू होऊन दहा मिनिटे झाली होती. डोअरकीपर दार बंद करून बहुधा बिडी प्यायला कुठेतरी गेला होता. दरवाजा ढकलून, खर्रदिशी पडदा सारून, आम्ही हॉलमध्ये घुसलो. अंगावर सर्रकन काटा आणणारा, पडद्याच्या लोखंडी रिंगाचा करकरणारा आवाज झाला व त्यासरशी आतल्या काळोखात, बाहेरून प्रखर उन्हाची तिरीप आली. प्रेक्षकांची तल्लीनता भंग पावली, थोडाफार आरडाओरडा झाला. काळोखात चाचपडत आम्ही सीट हुडकत फिरत होतो. पडद्यावर श्रृंगारिक प्रसंग चालू होता, आम्ही मध्येच कडमडल्याने मागे बसलेल्या प्रेक्षकांचा थोडा विरस झाला होता. लोकांची नाराजी जाणवत होती पण काही इलाज नव्हता. 'सॉरी, सॉरी' पुटपुटत आम्ही सीटवर स्थानापन्न झालो.

एक खोचट प्रेक्षक मात्र हात धुऊन आमच्या मागे लागला होता. सतत दहा मिनिटे असभ्य भाषेत शिव्या घालत होता, 'भाड्यांनो! डोळे फुटलेत का रे तुमचे? हे आयघाले उशिरा येतात आणि लोकांना लाथा मारत जातात. अशांना हात धरून बाहेर हाकलवून द्यायला हवे!'

हे आता अतीच झाले होते. एवढ्या क्षुल्लक कारणावरून त्याने इतक्या शिव्या घालण्याची गरज नव्हती. आतल्या अंधूक प्रकाशात त्या प्रेक्षकाला आम्ही पाहून ठेवला. इंटरव्हेल झाला. तो प्रेक्षक चहा घ्यायला बाहेर आला. आमच्याबरोबर नाना पेठेतला भरत घाडगे होता. त्याने कसलाही विचार न करता त्या प्रेक्षकाच्या कमरेत जोरात लाथ मारली आणि शांतपणे म्हणाला, 'याला लाथ घालणे' म्हणतात. मघाशी थिएटरमध्ये झाले, त्याला 'चुकून पाय लागणे' म्हणतात. आपला हिशोब आता बरोबर झाला.' पुणेरी हिसका काय असतो? हे मला त्या दिवशी कळले.

१९५१च्या ऑगस्ट महिन्यात इंपीरियलला भगवानदादाचा 'अलबेला' प्रदर्शित झाला. शेजारीच त्रिभुवन रोडवर राहणारे वागळे त्यावेळची आठवण सांगत होते, "मी कॉलेजमध्ये शिकत होतो. इंपीरियलच्या कोपऱ्यावर, चौरस्त्यावर मोठा चौक होता. लॅमिंग्टन रोडवर रोड डिव्हाइडर नव्हते. वाहनांची रहदारीही बेताची होती. रात्री जेवण झाल्यावर, दहा वाजताच्या सुमारास या परिसरातले हिंदू, पारशी व ख्रिश्चन तरुण या चौकात जमत. 'अलबेला'मधील 'भोली सूरत दिल के खोटे' हे गाणे सुरू होण्याआधी इंपीरियलचे सर्व दरवाजे, पडदे उघडले जात. स्पीकर्सचा आवाज वाढवला जाई. मग या गाण्यावर थिएटरमध्ये आणि थिएटरबाहेर रोंबासोंबा नृत्य केले जाई. रस्त्यावरची वाहतूक पूर्णपणे ठप्प होत असे."

गेल्या वर्षी भगवानदादांची जन्मशताब्दी होती. त्यांचे पुण्यस्मरण आणि अलबेलाची आठवण म्हणून लॅमिंग्टन रोडवरील सत्तर ते नव्वद या वयोगटातील तरुणांनी एकत्र येऊन इंपीरियलसमोरच्या विग्राम हॉलमध्ये त्या आठवणींना उजाळा दिला. विशेष म्हणजे त्या नृत्यामध्ये स्त्रियाही बहुसंख्येने सामील झाल्या होत्या. रेडिओ मिरचीने त्याचे रेकॉर्डिंग करून ठेवले आहे.

याच इंपीरियलला सेकंड रनला मित्रमंडळींसह मी 'अलबेला' पाहायला गेलो होतो. स्टेजसमोरच पिटातील पहिल्या रांगेतील लाकडी बाकड्यावर आम्ही विराजमान झालो. भगवान-गीता बालीचे धम्माल नृत्यसंगीत चालू झाले आणि शेजारी बसलेल्या दाढीवाल्या माणसाने कापडी पिशवीतून आणलेल्या सोडा वॉटरच्या बाटल्यांचे बिल्ले मुठीमुठीने पडद्यावर उधळण्यास सुरुवात केली. अंधारात चिल्लर नाणी उधळण्याचा आवाज येत होता. आम्हाला हा काय प्रकार आहे ते समजेना! मी त्याला हळूच विचारले, 'चाचा! ये आप क्या कर रहे हो?' गालातल्या गालात हसत तो म्हणाले, 'बेटा तुम सिर्फ देखते जाओ, आगे आगे होता है क्या?'

थोड्याच वेळात थिएटरच्या पडद्यावर खऱ्या नाण्यांचा (पैशांचा) वर्षाव होऊ लागला. जो तो मिळेल त्या मोकळ्या

जागेत उभे राहून भगवान-गीता बालीबरोबर नृत्य करण्याची हौस भागवू लागला. सिनेमा संपत आला तेव्हा तो पिशवी घेऊन आलेला इसम खाली बसून पडलेले पैसे गोळा करत होता. जाताना डोळे मिचकावत मला म्हणाला, 'पैसा वसूल. पिक्चर इसको बोलते है!'

थिएटरच्या अंधारात पडद्यावर एखादा प्रसंग चालू असताना त्या कलाकारांशी योग्य वेळी खुसखुशीत संवाद साधणे ही सुद्धा एक कला आहे. ती शेरेबाजी किंवा कॉमेण्टस ऐकायला इतर प्रेक्षकांनाही आवडत असे. काही चित्रपट तर या कॉमेण्टसमुळे लक्षात राहत असत.

'आरती' चित्रपटामध्ये प्रदीपकुमार-मीनाकुमारीच्या लव्हसीनमध्ये शशिकला संवाद चोरून ऐकत असते. तेव्हा न राहवून, एका प्रेक्षकाने, 'अरे हळू बोला. ती भवानी ऐकतेय' म्हणत त्या प्रेमीयुगुलाला सावध केले होते.

'दिवार'मध्ये, नीतू सिंग देवाच्या देव्हाऱ्यासमोर बसून, हिरोच्या रक्षणासाठी करुणा भाकत असते. या गंभीर प्रसंगी थिएटरमध्येही शांतता असते. प्रार्थनेसाठी हात जोडून ती खाली वाकते आणि नकळत तिचा तो लो-कट ब्लाऊज सर्वांचे लक्ष विचलित करतो. त्याचवेळी प्रेक्षकातून एक जोरदार कॉमेंट आली, 'ए वरचं बटण लाव!' आणि दुसऱ्याच क्षणी नीतू सिंगचा हात बटणाकडे गेला. थिएटरमध्ये प्रचंड हशा उमटला. अगदी ठरवून, जागा हेरून, वेळ साधून ही कॉमेंट केली गेली होती. त्याच्या या हजरजबाबीपणाला प्रेक्षकांनीही उत्स्फूर्त दाद दिली होती.

'शोले'मध्ये बसंती (हेमामालिनी) आपल्या घोडीला बजावते, 'भाग धन्नो भाग! मेरी इज्जत का सवाल है' प्रेक्षकातून एक खणखणीत आवाज आला, 'अरे तेरे पीछे सिर्फ गब्बर लगा है, उसके पीछे और दस घोडे लगे है।' शेवटच्या प्रसंगात खांबाला बांधून ठेवलेला धर्मेंद्र हेमामालिनीला ओरडून सांगतो, 'मत नाचो बसंती' प्रेक्षकांतून आवाज उमटले, 'अरे कैसे नाही नाचेगी, ब्लॅकमें तिकट खरीदा है हमने!'

ग्रँटरोडवरचा पिला हाउसचा नाका म्हणजे मुंबईच्या सांस्कृतिक इतिहासातील एकेकाळचा सर्वात गजबजलेला नाका! मनोरंजनाची आद्य राजधानी! एका हाकेच्या अंतरावर आजही तिथे शंभर-सव्वाशे वर्षे जुनी मोजून दहा थिएटर्स उभी आहेत. तमाशा, नाट्य आणि सिनेकला सर्वप्रथम इथेच रुजली आणि बहरली. पूर्वीपासूनच या परिसराने आपली स्वत:ची अशी एक वेगळी संस्कृती जोपासली आहे. कसलाही आडपडदा,




भीडभाड नसणे ही इथली खासियत!

कोरोनेशन (प्रार्थनासमाज, गिरगाव), गेईटी (सध्याचे कॅपिटॉल) इथे सिनेमाचा शो सुरू होण्याआधी बॅण्ड वादन होत असे. पिला हाउसच्या रॉयल थिएटरमध्ये 'शो'च्या आधी तमासगीर बायका, पडद्यासमोर स्टेजवर नाचत. अर्धे थिएटर भरल्यावर मग सिनेमा सुरू होत असे. एकेकाळी रॉयलच्या बोर्डावर नाचणाऱ्या पोरी नंतरच्या काळात प्रसिद्ध सिनेनट्या, नृत्यांगना झाल्या.

या परिसरात 'सी' ग्रेड नवीन चित्रपट आणि 'बी' ग्रेड सेकंड रन चित्रपट प्रदर्शित होत. सुरुवातीच्या काळातले. जयंत, जयराज, जॉन कॉवस, शेख मुख्तार, मास्टर भगवान, बाबुराव पहिलवान हे दिवसभर काबाडकष्ट करून, घामाचे पैसे खर्च करून, बकालवस्तीतील थिएटरमध्ये चित्रपट पाहणाऱ्या गरीब जनतेचे मर्दानी हिरो! शाळा-कॉलेजला दांडी मारून सिनेमा पाहायला आलेल्या विद्यार्थ्यांचे आवडते नायक! यांच्या स्टंट चित्रपटात नायिका ही जेवणातल्या मिठासारखी केवळ चवीपुरती असे. सिनेमा फक्त हाणामारी व तलवारबाजी चालत असे. साठ-सत्तरच्या दशकात रंजन आणि दारासिंगचा जमाना चालू झाला. दारासिंगच्या जोडीला कोवळ्या काकडीसारखी लुसलुशीत तारुण्याने मुसमुसलेली मुमताज असे. दारासिंग टारझन, फौलाद नाहीतर रूस्तम आणि मुमताज जेन म्हटल्यावर पब्लिक थिएटरवर तुटून पडत असे. अशी ही 'जंगल की रानी' बघायची तर कॉलेज बुडवून पिला हाउसला जाण्याशिवाय पर्याय नसे. चाचाकडची तिखटमीठ लावलेली काकडी खाता ओल्या हाताने सिगारेट पीत, पोस्टरवरील मुमूचे मादक सौंदर्य जवळून

न्याहाळताना, परीक्षा, अभ्यास, रागीट तीर्थरूप साऱ्यांचा विसर पडत असे.

इथे सिनेमा पाहायचा तर दोघांनी मिळून जायचे. एकाने तिकिटाच्या लायनीत उभे राहायचे तर दुसऱ्याने आत पंख्याखाली जागा पकडायची. तिकिटावर नंबर वगैरे प्रकार नसे. इंडियन न्यूज सुरू झाल्यावर, आडदांड डोअरकीपर आत जागेवर येऊन तिकिटे तपासत. थिएटरमधील अर्धेअधिक पंखे चालत नसत. जे चालत ते जोरात घरघर करत. थिएटरमध्ये शिरता शिरता लोक शर्ट काढत. उकाडा व मॅनेजरचा खास बंबय्या भाषेत उद्धार करत. उघडे खुर्च्या-बाकांवर बसत. पडद्यावर जाहिराती, इंडियन न्यूज चालू असताना, खिशातील आगपेटीच्या कांड्या पेटवून लोक लाकडी खुर्च्यांच्या फटीतील ढेकूण मारत. त्यावेळी पडद्यावर 'धूम्रपान निषेध', आग-रॉकेल वगैरे जाहिराती झळकत पण त्याचे कुणालाच सोयरसुतक नसे.

त्या दिवशी दौलत टॉकिजला (पूर्वीचे बाळीवाला थिएटर) मी श्री ४२० पिक्चर बघायला गेलो होतो. पडद्यावर रटाळ इंडियन न्यूज चालू होती. तिला वैतागून माझ्या बाजूला बसलेला तरुण जोरात ओरडला, 'ए ढकल!' आणि त्याच्या सुरात सूर मिसळून अनेकजण 'ए ढकल!' म्हणून ओरडू लागले. नंतर तो स्थानिक तरुण माझ्याकडे वळून म्हणाला, इधर मेन पिक्चर देखने का, क्या? ये इंडियन न्यूज सिगारेट, निरोध का फिल्म, सब बकवास है साला! किचड में जाएगा, तो गमबूट पहना या न पहना क्या फरक पडता है यार?' म्हणत पुढच्या सीटखाली त्याने जोरदार लाल पिचकारी मारली. थिएटरच्या साऱ्या भिंती, प्रसाधनगृहे लालपिवळी पडली तरी 'यहां थुंकना मना है' ही स्लाइड पडद्यावर न चुकता दिसत असे.



ऑपेरा हाउस

पडद्यावर पावसातील राज-नर्गिसचे 'प्यार हुआ इकरार हुआ' हे रोमँटिक गाणे सुरू झाले. मधल्या रांगेतील एका रसिक प्रेक्षकाने शेजारी बसलेल्या आपल्या छमियाला कवेत घेऊन, चक्क छत्री उघडून त्यांच्यासारखी ॲक्शन करत चित्रपट पाहण्यास सुरुवात केली. मागे बसलेल्या तमाम पब्लिकने 'ए भोसडी के' म्हणत शिव्यांचा वर्षाव करताच त्याने ती छत्री हळूच बंद केली.

नववीत शिकत असताना शाळेला दांडी मारून युनिफॉर्ममध्ये याच 'दौलत'ला 'बाजार' सिनेमा पाहायला गेलो होतो. इंडियन न्यूज संपलावर अंधारात काळ्या बुरख्यात एक गोलमटोल स्त्री आली. बाल्कनीतील खुर्चीवर ते प्रचंड धूड मावेना! डोअरकीपर तिच्यासाठी मोठी वेताची आरामखुर्ची घेऊन आला. माझे कुतूहल जागे झाले होते. मी तिथे शेजारीच बसलो होतो. इंटरव्हेलला चौकशी केली तेव्हा कळले, ती 'बाजार'ची नायिका निगार सुलताना होती.

थिएटरमध्ये माझ्याशेजारी बसलेला दाढीवाला इसम मध्ये मध्ये माझ्याकडे रोखून पाहत होता. तो कोण होता काही कळत नव्हते. सिनेमा संपल्यावर त्याने माझा हात पकडला व म्हणाला, 'चलो दो रुपया निकालो. नही तो मैं तुम्हारे घरमें आके बोलेगा, तुम पिक्चर देखने आए थे'.

'मेरे पास सिर्फ एक आणा है.' मी घाबरत म्हणालो.

'नही! नही! इससे ही चलेगा. हम तुम्हारे घर चलते है. तू किसीसे पैसा मांग के लेके आ.' तो म्हणाला.

प्रसंगावधान राखून मी त्याला माझा बाप म्हणून 'काफूरखान' या माझ्या नेहमीच्या ब्लॅकवाल्याकडे घेऊन गेलो तेव्हा त्याने माझा पिच्छा सोडला.

गोलपिठ्याच्या सिल्व्हर टॉकिजला अशोककुमारचा 'मिस्टर एक्स' पिक्चर लागला होता. मी त्यावेळी कॉलेज स्टुडंट होतो. माझ्या सीटच्या मागच्या रोमध्ये फॉकलंड रोडवरच्या नेपाळी वेश्या बसल्या होत्या. पाठीमागून टपल्या मारून त्यांनी मला बेजार केले होते. पिक्चर मध्येच सोडून मला जाववेना. हा प्रकार एका डोअरकीपरच्या लक्षात आला. त्याने आपणहून मला पंख्याखालची, पुढेमागे खुर्च्या मोकळी असलेली सीट शोधून दिली. मी त्याचे आभार मानले तेव्हा तो म्हणाला, 'क्या करना साब! यह बदनाम बस्ती है ना! शरीफ लोगों का खयाल करना पडता है. मेरा नाम उस्मान है. आप कभीभी बिनधास्त यहां आईये. किसीसे डरने की बात नही.' असे लोकही इथेच भेटतात.

कामाठीपुत्रातील 'अलेक्झांड्रा' थिएटरने आपले एक वेगळे अस्तित्व जपून ठेवले होते. ते म्हणजे इंग्रजी सिनेमाचे उत्तेजित करणारे पोस्टर व त्याखाली ठळक अक्षरात त्या सिनेमाचा अस्सल बंबय्या भाषेत केलेला चटपटीत अनुवाद...

बरसात में ताक धिना धिन – रायडर ऑन द रेन

सस्ता खून महंगा पानी – नेव्हाडा स्मिथ

कुछ नरम, कुछ गरम गरम – ब्लो हॉट ब्लो कोल्ड

सिनेमाची अशी चटपटीत नावे वाचून पडद्यावर काय पाहायला मिळणार आहे, याची तिथे येणाऱ्या पब्लिकला पुरेपूर कल्पना असे. ते इथे खच्चून गर्दी करत. इथे आलेला प्रेक्षक बऱ्याच वेळा दुकटा, पान खाऊन तोंड रंगविलेल्या 'नववधू' बरोबर खिदळत असणारा, इंग्रजीचा गंध नसणारा पण प्रत्येक हिरोला चेहऱ्याने ओळखणारा असे. इथे येणारी जोडपी कशासाठी आली आहेत हे डोअरकीपरपासून बाजूला बसलेल्या प्रेक्षकांपर्यंत सर्वांना ठाऊक असे. मध्येच नागपाड्यातला एखादा हिरो, 'भोसडी के खाली फोकट इधर बॅटरी नही मारना, क्या?' असा डोअरकीपरला सुखा डोस देऊनच आपल्या हिरॉईनला घेऊन कोपऱ्यातल्या सीटवर बसत असे. पिला हाउस, कामाठीपुरा परिसर म्हणजे आपल्याच मस्तीत जगणाऱ्या, गरीब कष्टकरी लोकांचे एक वेगळेच विश्व होते. सिनेकलाकारांवर यांचे मनापासून रांगडे प्रेम होते.

तंत्रज्ञान विकसित होऊ लागले. टेप, टीव्ही, व्हिसीडी, इंटरनेटचा जमाना सुरू झाला. घरबसल्या मनोरंजन होऊ लागले आणि ही जुनी सिंगल स्क्रीन थिएटर्स एकामागून एक आचके देत बंद पडू लागली. त्यांच्या जागी शॉपिंग मॉल्स, टॉवर्स व मल्टिप्लेक्स थिएटर्स आली. मुंबईतील ट्राम, घोडागाड्या, पडाव गेले. इराणी हॉटेल्स, पानगाद्या, भाजीमंडया बंद पडू लागल्या. गिरण्या जमीनदोस्त झाल्या. मध्यमवर्गीयांच्या चाळीही उद्ध्वस्त होऊ लागल्या. इतकेच काय ग्रँटरोड–फोरास रोडच्या वेश्या, फॉकलंड रोडवरचे तृतीयपंथीही स्थलांतरित झाले. एके काळचा हा सांस्कृतिक ठेवा आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

**अरुण पुराणिक**
इ–१०३, महेश्वरीनगर, एमआयडीसी,
अंधेरी (पूर्व), मुंबई–४०००९३
भ्रमणध्वनी : ९३२२२१८६५३
vgpuranik@gmail.com

*With Best Complimenst From*



**K. Thomas Architect**

Navi Mumbai

# प्रवास अजून बाकी होता...

**श्रीनिवास नार्वेकर**

त्याच्या सिनेमाबद्दल माझी काही मतांतरंही होती... आणि अर्थातच तो त्याच्या मतांवरही ठाम असायचा... मतं-मतांतरं असूनही हे मेक बिलिव्ह करणं ज्याला अगदी यशस्वीपणानं जमतं, तो फिल्ममेकर नक्कीच यशस्वी असतो. 'सावरखेड', 'पांगिरा', 'जोगवा', '७२ मैल'मधून राजनं हे मेक बिलिव्ह सिद्ध करून दाखवलं. अधिक काहीतरी आश्वासक असं नक्कीच केलं असतं त्यानं भविष्यात...

९३-९४ मधली कधीची तरी गोष्ट... एक नाट्यविषयक अंक हाताशी आला होता. त्यात एक एकांकिका होती. नाव होतं, 'ध्येयधुंद'... रिचर्ड बाखच्या जोनाथन लिव्हिंग्स्टन सीगलवरची ही एकांकिका.. खाली लेखकाचं नाव होतं, राजीव पाटील. एकांकिका वाचल्यानंतर मला खूप आवडली आणि ती मी कणकवलीतल्या नाथ पैच्या स्पर्धेसाठी करायला घेतली... साल बहुधा ९५-९६ असावं. आमच्यासारख्या हौशी रंगभूमीवर काम करणाऱ्या माणसांसाठी संपर्काची माध्यमं त्यावेळी तशी कमीच होती. हा राजीव पाटील कोण, कुठला काहीच कल्पना नव्हती. चौकशी सुरू होती. पण काही पत्ता लागत नव्हता. तशातच नाथ पैच्या शालेय एकांकिका स्पर्धेमध्ये ती एकांकिका केली, मस्त झाली.. नंबरातही आली.. पण लेखकाचा काही पत्ता लागला नव्हता. दोन-तीन वर्षं गेली. 'पुरुषोत्तम'नं पहिल्यांदाच विभागीय पातळीवर स्पर्धा जाहीर केल्या आणि त्यासाठी सावंतवाडीच्या बांदेकर फाईन आर्ट्स कॉलेजच्या वतीनं 'ध्येयधुंद' करायचं ठरलं. शालेय आणि कॉलेज अशा दोन्ही गटांसाठी होणारी ही बहुधा एकमेव एकांकिका स्पर्धा असावी. पुन्हा एकदा या लेखकाचा नव्यानं शोध सुरू झाला. दरम्यान कुठूनतरी हा राजीव पाटील प्रयोग परिवारातून कामं करतो, असा सुगावा लागला. आणि अखेर कुठेतरी सुवर्णा भट्टड हे संपर्काचं नाव मिळालं. फोन केला. सुवर्णा भट्टड म्हणजे आताच्या सुवर्णा पाटील.. राजीवची बायको.. पुरुषोत्तमसाठी आम्ही 'ध्येयधुंद' करतोय, असं सांगताच, त्यांचा मोठ्ठा ऑऽऽ... अहो, ती मुलांची एकांकिका आहे, मोठ्यांसाठी तुम्ही कशी करता, याची आम्हाला आता उत्सुकता लागून राहिलीय... प्रयोग झाला, चिपळूण केंद्रातून 'ध्येयधुंद'नं सगळी 'पुरुषोत्तम' धुऊन काढली आणि पुढल्याच वर्षी पहिल्या अल्फा महाकरंडकासाठी या एकांकिकेला निमंत्रण आलं. एल्फिन्स्टनच्या सितारा स्टुडिओत एकांकिका चित्रीत झाली. मस्त अनुभव होता होता... तरीही प्रत्यक्ष लेखकाशी बोलणं नव्हतं झालं. मोबाईल वगैरे तेव्हा काही प्रश्न नव्हता.

अखेर २००१ च्या सुमारास मी कामासाठी मुंबईत आलो आणि दरम्यान कधीतरी राजीवचा मोबाईल नंबर मिळाला.. आमचं बोलणं झालं... अंधेरीत कुठेतरी - नेमकं ठिकाण आता लक्षात नाही - राह्यचा तो.. बराच वेळ गप्पा मारल्या आम्ही... पहिल्याच भेटीत अहो-जाहोवरून एकेरीवर आलो, ते अगदी 'राज' आणि 'श्री'पर्यंत... मग अधूनमधून भेटाभेटी... सूरकरांचा कुठल्यातरी एका सिनेमाचा प्रिमियर प्लाझाला आम्ही एकत्र पाहिला, त्यानंतर जिप्सीमध्ये कॉफी पिताना बऱ्याच गप्पा झाल्या. त्यातनंच तुझ्याकडे काही छान स्टोरी असेल तर ऐकव, असं बोलणं झालं.. एव्हाना तो गोरेगावला शिवसृष्टीमध्ये शिफ्ट झाला होता. कधीतरी एका रात्रीच्या मुक्कामात काही कथा ऐकवणं झालं, साधकबाधक चर्चा झाली, अन्य काही गप्पा झाल्या. रात्री खूप उशिरापर्यंत गप्पा चालल्या होत्या आमच्या... प्रोजेक्ट काही वर्क आऊट झालं नाही, पण आमची मैत्री खूपच दृढ झाली.

नेहमी संपर्क असायचाच असं नाही, पण अधुनमधून उगाचच आठवण आली, म्हणून फोनाफोनी व्हायची. असाच एकदा कधीतरी राजचा फोन आला, माझ्याबरोबर असिस्टंट म्हणून काम करायला इंटरेस्टेड असशील तर सांग. तुकडोजी महाराजांवर फिल्म करतोय. दुसऱ्या दिवशी रात्री पुन्हा त्याच्याकडे मुक्काम. खूप बोललो प्रोजेक्टबद्दल.. सगळं सांगून झाल्यानंतर त्यानं विचारलं होतं मला, आता सांग, तू काय करशील यात? - मी उलट विचारलं त्याला, तू सांग, मी काय करावं असं तुला वाटतं? - तो म्हणाला, स्क्रीप्ट सुपरवायझर म्हणून काम करशील? लिंग्विस्टीकपासून सगळं... तू असलास तर माझा मोठा प्रश्न मिटेल. पण सहा ते आठ महिन्यांचे शेड्युल आहे. चालेल, पण दोन दिवसांत कन्फर्म सांगतो. कारण मी 'कल्पना एक आविष्कार अनेक'साठी एकांकिका करतोय. जरा शेड्युल ठरवतो आणि सांगतो. ....आणि तिसऱ्या दिवशी त्याला फोन केला. आवडलं असतं, पण आता लगेच महिनाभर शक्य होणार नाही, हे सांगण्यासाठी... झालं, तेसुद्धा काम त्याच्याबरोबर करणं राहून गेलं. 'माता सप्तशृंगी' करताना माझ्या एका मैत्रिणीचं नाव सुचवलं होतं मी त्याला असिस्ट करण्यासाठी... त्यानं दहा वेळा तिला सांगितलं, मी असं सहसा कोणाच्या सांगण्यावरून घेत नाही असिस्ट करायला... श्रीनं सांगितलंय


*With Best Compliments From*

THE MAHARASHTRA ELECTRICAL INDUSTRIES

*Specialist in Maintaince of :*

H. T. & L. T. Switchgears (M.O.C.B., B.O.C.B., SF-6, ACB & V.C.B.)

of any make upto 66 K.V. & Supply of Spares

702, C/4, Apurva Lok Rachana, C.H.S. Ltd., Amar Nagar,
Mulund (W), Mumbai-400 082
Off. : 2596 7840 / 2561 3862 ● Cell : 09820624488
mahaele@yahoo.co.in

म्हणून घेतोय तुला... खरं तर एवढा विश्वास टाकावा, असं काहीच झालेलं नव्हतं आमच्यात... पण कधी कधी काहीही कारण नसताना संबंध जुळून जातात. हे त्यातलंच काहीसं...

मला आठवतं, २००४ साल वगैरे... जफर सुलतानांचा 'मुखवटे' करत होतो मी कोल्हापुरात. शूटिंग संपलं. दुसऱ्या दिवशी थांबलो होतो एकटाच.. शाहूला 'सावरखेड..' लागला होता. मी पाह्यला गेलो. सावरखेड...' मराठी सिनेमाचं दृश्यदारिद्र्य पार करणारा पहिला सिनेमा... मी उपेन्द्र आणि राजला मेसेज केला, अभिनंदनाचा... उपेन्द्रचा लगेच रिप्लाय आला... उद्या थांब, आम्ही शोला येतोय... आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा राजीव भेटला... सोबत उपेन्द्र, बाबा शिंदे, राजीवचा भाऊ प्रशांत... श्रेयससुद्धा होता बहुतेक तेव्हा, आता लक्षात नाही... एवढ्या सगळ्या गर्दीतही मी लक्षात होतो राजीवच्या... आम्ही एकत्र जेवण केलं... वगैरे...



'ब्लाइंड गेम' बघ, श्री... आवडेल तुला... माझा खूप आवडता सिनेमा आहे तो.. रिलीज व्हायला हवा... राज सांगायचा.. पण तो काही बघायला मिळालाच नाही मला... मग हळुहळू त्याच्या कामाचा व्याप वाढत गेला... आमचा संपर्क कमी होत गेला... सहा-आठ महिन्यांतून एकदा कधीतरी फोन व्हायचा... मग तो फोनसुद्धा कमी झाला... दोघंही व्यापात अडकलो... गेल्या वर्षी नाशिकला आर्किटेक्चर कॉलेजला फिल्म ॲप्रिसिएशनच्या वर्कशॉपसाठी गेलो, तेव्हा एवढ्या वर्षांनंतर पहिल्यांदा सुवर्णा पाटलांची भेट झाली. तेव्हा बऱ्याच काळानंतर राजशी फोन झाला.. बस्स, मला वाटतं, तो आमचा शेवटचा फोन...

सोमवारी दुपारी मित्राचा फोन आला, न्यूज कळली का? - कसली? - अरे, राजीव पाटील एक्स्पायर झाला.. डिरेक्टर.. - मी क्षणभर गप्प... आणि एका क्षणांत या सगळ्या आठवणी सरकून गेल्या... मराठी चित्रपटसृष्टीत काही वेगळा विचार करू पाहणारा आणि आपल्या परीनं ते मांडण्याचा प्रयत्न करणारा दिग्दर्शक होता राज... पन्नास लाखांचा सिनेमा करणारा राज पहिला मराठी दिग्दर्शक... एकूण सिनेमाबद्दलची मतंमतांतरं तूर्तास सोडून देऊ, 'सावरखेड..'मधून त्यानं मराठी सिनेमांचं दारिद्र्य ओलांडलं.. मला यशस्वी दिग्दर्शक व्हायचं आहे, हे डोक्यात ठेवून तो पहिली कामं करत राहिला.. असिस्ट करताना चीफ असिस्टंटनं टेचात सांगितलेली फाईल वगैरे उचलून देण्याची कामंही त्यानं केली. पण त्याचा त्यानं कधी कमीपणा नाही बाळगला. आपलं लक्ष्य काय आहे, हे त्याला पक्कं माहीत होतं... गप्पा मारताना एकदा कधीतरी तो मला म्हणाला होता, काल पार्टीमध्ये ते अमुक भेटले... खांद्यावर हात ठेवून हळूच म्हणाले, पहिल्याच सिनेमानं आमची सगळ्यांचीच मारून टाकलीस की रे तू...

त्याच्या सिनेमाबद्दल माझी काही मतांतरंही होती... आणि अर्थातच तो त्याच्या मतांवरही ठाम असायचा... मतं-मतांतरं असूनही हे मेक बिलिव्ह करणं ज्याला अगदी यशस्वीपणानं जमतं, तो फिल्ममेकर नक्कीच यशस्वी असतो. 'सावरखेड', 'पांगिरा', 'जोगवा', '७२ मैल'मधून राजनं हे मेक बिलिव्ह सिद्ध करून दाखवलं. अधिक काहीतरी आश्वासक असं नक्कीच केलं असतं त्यानं भविष्यात...

हवा होता राज अजून... थोडी काळजी घ्यायला हवी होती स्वत:ची... अजून बरंच काही करायचं होतं... This was a pre-scheduled pack-up... ऐसा नही होना चाहिये था... ७२ मैलांचा प्रवास अजून बाकी होता रे...

**श्रीनिवास नार्वेकर**
भ्रमणध्वनी : ०९३२२४९२६३०
०९५९४१९११९८
shri.narwekar@gmail.com

# मोकलुनी आस। जाहलो उदास।।

दिलीप पांढरपट्टे

श्रीधरचं मन चिरडल्यासारखं झालं. हे बोलणं असंच सुरु राहिलं तर काही वेळातच आपलं मन आणि शरीर लुळं पडेल असं त्याला वाटू लागलं. हजार मैल प्रवास करून ज्या मातीच्या ओढीनं आयुष्याच्या संध्याकाळी आपण इथे पोचलो, ती मातीच भुसभुशीत झाली होती. ज्या स्वप्नांच्या भरवशावर जगण्याच्या वणव्यात आपण होरपळत राहिलो, ते स्वप्नही अखेर त्याच वणव्यात राख होताना त्याला दिसलं. अस्वस्थ होऊन त्यानं सिगारेट पेटवली आणि धुराची उदास वेटोळी सोडत तो नि:शब्द बसून राहिला...

गाडीनं माणगाव स्टेशन सोडलं आणि श्रीधरच्या मनात पुन्हा तीच जुनी ओढ जागी झाली. माणगाव आलं की गावाजवळ आल्यासारखं होतं; आणि आपलं अतृप्त मन मातीतल्या तृप्तीसाठी आणखीच अधीर होतं. लहानपणातील उनाड पण देखणे दिवस आठवतात. समुद्र, खाडी, घराभोवतालचे माड-पोफळी, कधी हिरवी तर कधी पिवळी भातं...

हा विचार मनात आला की श्रीधरला नेहमी विषण्ण वाटे. एवढ्या सुंदर कोकणपट्टीत जन्म घेतला आपण; पण आयुष्यभर तिची ताटातूटच नशिबी आली. कधी कधी वाटे, उगाच शिकलो आपण आणि दिशादिशांत भटकत राहिलो. त्यापेक्षा आपले भाऊ बरे! जिथे जन्माला आले, तिथेच वाढले, अन् तिथेच मरूनसुद्धा जातील. हे भाग्य थोरच. आपल्या प्राक्तनात ते नव्हतं एवढंच खरं...

खिडकीतून येणाऱ्या गार वाऱ्यानं श्रीधरला गुंगी आली. पण त्या तंद्रीतही त्याला स्वत:चंच उडून गेलेलं आयुष्य पुन्हा पुन्हा अंधुक दिसत राहिलं.

... श्रीधर तीन भावांत मोठा. अत्यंत बुद्धिमान मुलगा. एवढा हुशार मुलगा अख्ख्या वायंगणात दुसरा नव्हता. गावातल्या सगळ्या भंडाऱ्यांना तर त्याचं जास्तच कौतुक वाटायचं. तसा श्रीधर भंडारी वाटायचा नाही. वागणं-बोलणं काय दिसणंसुद्धा भटासारखंच. पण त्याला शेतीभातीचा फार नाद! आपल्या माड-पोफळींवर तर त्याचा भारी जीव. पुस्तकांपेक्षा जास्त तो तिथेच राहायचा. बारावीला चांगले मार्क मिळाल्यावरही त्यानं काहीही विचार न करता धाडकन सांगून टाकलं, की मी मेडिकलला नाही, इंजिनीयरिंगला नाही, बी.एस्सी. ॲग्रीकल्चरलाच जाणार. घरचे नाराज झाले, पण श्रीधर हट्टानं दापोलीला बी.एस्सी. करायला गेला.

नंतर मात्र श्रीधरच्या आयुष्यानं एकदम वेगळंच वळण घेतलं. श्रीधरला बी.एस्सी.नंतर एम.एस्सी. करून कृषी विद्यापीठातच प्राध्यापक व्हायचं होतं. तिथे भरपूर संशोधन करायचं होतं. शेतीशी असलेली आपली नाळ कोणत्याही

परिस्थितीत त्याला तोडायची नव्हती. पण नेमक्या त्याच वेळी वडील वारले आणि एका भावाला अचानक पक्षाघाताचा झटका आला. मग श्रीधरनं बी.एस्सी. होताच एका बँकेत क्षेत्रीय कृषिअधिकाऱ्याची नोकरी पत्करली. तिथून खरं तर त्याची फरफटच सुरू झाली. बँकेनं त्याची नियुक्ती दूर मराठवाड्यात केली.

मग श्रीधरचं आयुष्य दोरी तुटलेल्या पतंगासारखं भिरभिरायला सुरुवात झाली. त्या अत्यंत अनोळखी, परक्या भूमीत श्रीधरचं मन रमेना. समुद्राची गाज ऐकणारे कान, खाड्यांकिनारी हिरव्या गर्दीतल्या शुभ्र वाटांवरून मनसोक्त भटकणारे पाय उदास झाले. या नोकरीत संधोधन-बिंशोधन काहीच नव्हतं. तीच ती कर्जांची प्रकरणं, तेच ते कर्जदार आणि तेच ते साहेब!

श्रीधरनं अनेक वेळा विनंती करूनही बँकेनं त्याची बदली कधीच कोकणात केली नाही. कधी मराठवाड्यात, कधी विदर्भात त्याच्या बदल्या होत राहिल्या. या सगळ्या घुसमटीमुळे की आणखी कशामुळे; पण श्रीधरला लग्नच करावंसं वाटलं नाही. त्यानं एक मात्र नेमानं केलं. दर महिन्याला तो घरी पैसे पाठवत राहिला. त्याचा स्वत:चा संसार कधीच उभा राहिला नाही, पण त्याच्या भावा-बहिणींचे संसार त्या पैशांवर सुखासमाधानानं चालत राहिले.

हल्ली हल्ली मात्र श्रीधरला एकाकी वाटू लागलं होतं. वयाची पन्नाशी नुकतीच उलटली होती आणि जवळची सगळी माणसं हजारो मैलांवर होती. मागे एकदा एकच वर्ष मुंबईत पोस्टिंग असताना श्रीधरनं डोंबिवलीत एक वन रूम किचनचा फ्लॅट विकत घेतला होता. नोकरीतून स्वेच्छा निवृत्ती घ्यावी आणि डोंबिवलीच्या त्या फ्लॅटमध्ये राहून काही सटरफटर नोकरी करावी किंवा सरळ गावी जाऊन आपल्या माणसांत राहावं, शेतीभातीची, बागायतीची कामं करावीत, शेतीत काही नवीन संशोधन करायची आपली जुनी हौस पुरी करावी असं त्याला वाटू लागल्यावर त्यानं तसं घरी विचारलं होतं; पण घरच्यांना ही कल्पना अजिबात पसंत पडली नव्हती; विशेषत: त्याच्या भावांना! दरमहा घसघशीत पगार देणारी नोकरीची दुभती गाय आपणहूनच गोठ्यातून हालकून द्यावी हे त्यांच्या पचनी पडत नव्हतं.

... पण एके दिवशी अशाच उद्विग्न क्षणी श्रीधरनं ठरवलं- बस्स! पैशांसाठी सतत स्वत:चं मन मारून जगलो. आता खूप झालं. आपल्या मनासारखं काहीच करता आलं नाही या आयुष्यात! व्यवहाराची गणितं आणि हिशोब



मांडण्यातच आयुष्य हा हा म्हणता आपल्या हातातून निसटून गेलं. आता आपल्याला जे खुणावतंय त्याच्या मागे जाऊ, आपल्या आवडीप्रमाणे जगायला. जगायला आणि मरायलाही!

मग कुणालाही जास्त काही न विचारता, कुणाचाही सल्ला न घेता, श्रीधर गावाकडे रवाना झालाही...

... कुठल्याशा छोट्याशा स्टेशनवर गाडी थांबली. विक्रेत्यांनी एकच गलका केला आणि श्रीधर भानावर आला. बॅगेतले खायचे जिन्नस काढावेत का असा त्यानं विचार केला. पण त्यापेक्षा ते सर्व तसेच ठेवू; घरच्यांना हा वऱ्हाडी मेवा खूप आवडतो, त्यांनाच तो मनसोक्त खाऊ दे; असा नेहमीचा विचार करून त्यानं एक वडापाव घेऊन खाल्ला. नाहीतरी आता उतरायचं स्टेशन जवळ आलं होतंच...

घरी पोचल्यावर श्रीधरचं मोठ्या उमाळ्यानं स्वागत झालं. संत्र्याची बर्फी, नागपुरी मिठाई यांची पार्सलं उघडली गेली. सगळे जरा शांत झाल्यावर भाऊ शांताराम म्हणाला, ''नाना, ह्यावेळी असा मधीच कसा आलास? येतोय म्हणून तुझा फोन आला त्या टायमालाबी आमाला काहीच समजलं नाय.''

यावर श्रीधरनं ऐसपैस मांडी घातली आणि भिंतीला टेकून

तो उत्साही स्वरात म्हणाला, ''शांताराम, मी आधी ह्याच्यावर फार विचार केला होता. बऱ्याच लोकांचा– तुमचापण – सल्ला घेतला होता. पण निर्णय पक्का होत नव्हता. शेवटी आपल्या मनातलं कधीतरी एकदा खरं करावं असं वाटलं. म्हणून मी नोकरी सोडून गावाकडे आलोय. तुम्हाला पुन्हा विचारत बसलो असतो तर माझा विचार पक्का झाला नसता. म्हणून म्हटलं की गावी जाऊ अन् मगच सगळं सांगू.''

हे ऐकल्यावर वातावरणाचा नूरच पालटून गेला. दोन्ही भावांचे चेहरे साफ पडले. आतमध्ये बायामाणसांची कुजबुज सुरू झाली आणि वाढली. दुसरा भाऊ सदाशिव उघडउघड नाराजीनं बोलला, ''पण नाना, आजकालचा टाइम हा असा! नोकरी सोडून तुझ्यासारखा शिकल्याला माणूस हितं गावात काय करणार?''

श्रीधर म्हणाला, ''बाकी मी काहीच करणार नाही, सदा. शेती मात्र मनापासून करणार. लहानपणापासून माझा जीव या झाडापेडांत आणि शेतीत अडकलाय. मी माझ्या पद्धतीनं वेगवेगळे प्रयोग करून, संशोधन करून आपली शेती आणि बागायत करीन.''

''पण एवडी कुठं शेती हाय आपली? तू तिकडं शेहरात सुखाची नोकरी करत ऱ्हायलास. आमी हितं खेड्यात मातीत राबत ऱ्हायलो. पण जमीन तर हाय तेवडीच ऱ्हायली. मंग तू आता कशाला ह्या भानगडीत पडतोस, नाना!''

हे ऐकल्यावर श्रीधर हादरलाच. हे काहीतरी वेगळंच सुरू झालं होतं. त्याच्या हे ध्यानीमनीही नव्हतं. आपले भाऊ आपल्याकडे त्यांच्या मिळकतीतला आणि जमिनीतला वाटेकरी म्हणून बघायला लागलेत हे त्याच्या ध्यानात आलं. त्याच्या मनात असलं कधीच आलं नव्हतं. तो सुन्नच झाला. मग तशाच बधीर अवस्थेत तो बोलला, ''हे बघा, तुम्ही भाऊ आहात माझे. तुमच्या बाबतीत व्यवहाराचा विचार मी कधीच केला नाही. माझ्या संशोधनामुळे आपल्या जमिनीचं काही नुकसान होणार असेल तर मी तुम्हाला एक उपाय सांगतो. तुम्ही फक्त माझ्या वाट्याची जमीन मला द्या. म्हणजे तुमच्या जमिनीत माझी लुडबूड राहणार नाही; आणि तुम्हाला त्याचा काही त्रास होणार नाही.''

हे तो बोलताच, जणू काही याचीच वाट बघत असल्याप्रमाणे, सदाची बायको बाहेर आली आणि खड्या आवाजात म्हणाली, ''ह्ये बरं हाय तुमचं, भावोजी. अख्खं आयुष्य तुमी टुमटुमीत काढलं तिकडं सुखाची नोकरी करून. आमाला एवड्याच जमिनीचा आधार हाय. ती पण आता तुमी तुकडं करून घेणार. आसं कसं चालंल? ह्यो काय न्याय म्हणायचा का काय?''

ज्यांच्याशिवाय आपण आपल्या आयुष्याची कधी कल्पनाही केली नाही, ज्यांच्यासाठी आपण आयुष्यभर उपऱ्यासारखे परक्या दुनियेत जगत राहिलो; त्यांनी आता आपल्याला असं म्हणावं याचा श्रीधरला भयंकर विषाद वाटला. तो सुन्न होऊन तसाच बसून राहिला.

मग काही वेळानं शांताराम बोलला, ''नाना, दुसरं असं, की आता जमिनीला फक्त आमच्या दोगांचीच नावं हाईत. आंब्याची अन् भाताची नुकसानी झाल्यावर सरकारकडनं नुकसानभरपाई मिळायची त्यावेळी दर टायमाला तुझी सही लागायची म्हणून आम्ही मागं एकदा पाच-सहा कोऱ्या कागदांवर तुझी सही घेतली होती. त्यातल्या एकावर अर्ज करून आमी तलाठ्याकडं दिला अन् तुझं नाव कमी करून घेतलं. आता त्याला पण धा-बारा वर्षं झाली बग. पण आमच्या मनात तवा दुसरं काई नव्हतं बरं का नाना!'' शांतारामचा चेहरा अपराधी झाला; पण हे ऐकताच सदा उसळून म्हणाला, ''पण मग काय पाप केलं आपुन? जमीन आपुन कसत होतो; म्हणून आपलंच नाव ऱ्हायलं. नानानं कुठं जमीन कसली इतकी वर्सं? आता कायद्यानंबी आपुनच मालक हाय. नानाचा संबंध तरी काय म्हनतो मी या जमिनीशी?''

हे ऐकून श्रीधरचं मन चिरडल्यासारखं झालं. हे बोलणं असंच सुरू राहिलं तर काही वेळातच आपलं मन आणि शरीर लुळं पडेल असं त्याला वाटू लागलं. हजार मैल प्रवास करून ज्या मातीच्या ओढीनं आयुष्याच्या संध्याकाळी आपण इथे पोचलो, ती मातीच भुसभुशीत झाली होती. ज्या स्वप्नांच्या भरवशावर जगण्याच्या वणव्यात आपण होरपळत राहिलो, ते स्वप्नही अखेर त्याच वणव्यात राख होताना त्याला दिसलं. अस्वस्थ होऊन त्यानं सिगारेट पेटवली आणि धुराची उदास वेटोळी सोडत तो नि:शब्द बसून राहिला...

... त्या रात्री तो नेहमीपेक्षा एक पेग जास्तच प्यायला आणि फारसं काही न खाता बिछान्यावर पहुडला. झोप येत नव्हती. नेहमी अंथरुणाला पाठ टेकताच मिटणारे आज्ञाधारक डोळे सताड उघडे होते. काय करावं हे त्याला कळेना. भावांविरुद्ध कोर्टात जावं, वाटपाचा दावा करावा, आपला हिस्सा मागावा; तर कोर्टबाजीत आणि अपिलांमध्ये आपलं आयुष्य सरून जाईल. भावांशी वाकडीक येईल; आणि आपलं त्यांच्याशिवाय तसं या उभ्या जगात कुणीच नाही. आता बँकेतली नोकरीही

सुटली होती. मुंबईत जाऊन एखादी नोकरी करणं मात्र शक्य होतं. पण मग आपल्या मनाचं काय? आपल्या आयुष्याचं काय? पहाटे पहाटे त्याला काहीतरी सुचलं- आहे, अजून एक मार्ग आहे. आपण रिटायरमेंटचे सगळे पैसे संपवून इथेच एक शेत घेऊ. कलमं लावू, काजू-माड लावू. भावांशी दुष्मनी नको. त्यांच्यात वाटणी मागायला नको. आपण मेल्यावर आपलंही त्यांनाच मिळणार आहे. पण नको. त्यांना कशाला? आपण मरण्यापूर्वी एखाद्या ट्रस्टलाच सगळं दान करून टाकू. नकोच हा नात्यागोत्यांचा अन् व्यवहाराचा तिढा! या विचारानं याला अचानक खूप बरं वाटलं आणि त्याचा डोळा लागला.

सकाळी तो घरात फारसा थांबलाच नाही. त्याला थांबावंसं वाटतही नव्हतं. तो थेट गावच्या तलाठ्याकडे गेला आणि आपली ओळख करून देऊन म्हणाला, ''माझ्या भावांनी आमच्या सामाईक जमिनीतून माझं नाव दहा-बारा वर्षांपूवर्वी काढलंय, पण मी त्यासाठी आलो नाही. माझी त्याबद्दल काही तक्रार नाही.''

यावर तलाठ्यानं थोडा वेळ बरेच कागद उलथेपालथे केले आणि म्हणाला, ''तक्रार करून उपयोग पण न्हाई, साहेब. तुमच्याच सहीनं तुमचं नाव कमी झालंय.''

''हरकत नाही. पण माझ्याकडे काही पैसे आहेत. मला शेतीची चांगली माहिती आहे. मी कृषी पदवीधर आहे. मला शेतीमध्ये थोडं संशोधन पण करायचंय. त्यासाठी एखादी जमीन विकणारा कुणी आहे का तुमच्या बघण्यात?''

तलाठ्यानं यावर काही वेळ विचार केला आणि मग एकदम काहीतरी आठवल्यासारखं तो म्हणाला, ''जमिनी विकणारे हायेत. पण तुमाला जमीन विकत घेता येणार न्हाई.''

''का बरं?''

''कारण तुमी शेतकरी न्हाई. तुमच्या नावाचा सात-बारा कुठाय?''

''पण मी शेतकरी नसलो तरी पूर्वी होतो आणि ह्यापुढे पण मला शेतकरी व्हायचंय ना! सरकारच तर म्हणतं, खेड्यात चला, शेती करा, झाडं लावा. मी सरकारच्या स्कीमप्रमाणे फळलागवड पण करणाराय. आंबा, काजू, जांभूळ, नारळ, आवळे... मग काय हरकत आहे?''

हे ऐकल्यावर तलाठ्यानं श्रीधरकडे दयेनं बघितलं आणि तो म्हणाला, ''साहेब, तुमचं खरं हाय, पण कायदाच असा विचित्र हाय त्याला आमी तरी काय करणार? अहो, तुमच्या त्या अमिताब्बच्चनलाबी ह्योच कायदा नडला होता ना! पण त्यो पडला मोठ्ठा माणूस. सहीसलामत निसाटला त्यो त्यातनं!''

कायदा गाढव असतो ते श्रीधरला माहीत होतं. पण तो इतका गाढव असेल असं त्याला कधी वाटलं नव्हतं. शेतकरी नसलेल्या माणसानं शेतकरी होण्यात काय गैर किंवा चुकीचं आहे हेच त्याला कळेना. पूर्वी कधीतरी, कोणत्यातरी वेगळ्या उद्देशानं केलेले कायदे कालबाह्य आणि जाचक झाल्यावर का बदलले जात नाहीत? राज्यघटनेनं सगळ्यांना सगळे व्यवसाय करायची मुभा द्यायची; पण या शेतीप्रधान देशात एखाद्या बिगर-शेतकरी माणसाला मात्र शेतकरी होऊ द्यायचं नाही हा अजबच न्याय आहे. पण या तलाठ्याला हे सगळं सांगण्यात काही अर्थ नव्हता.

आयुष्याच्या प्रश्नावर त्यानं शोधलेलं आणखी एक उत्तर चुकीचंच निघालं होतं. आता दु:ख तरी कशाकशाचं करायचं असं त्याला वाटलं आणि तलाठ्याचा निरोप घेऊन तो घरी आला.

घरी आल्यावर त्यानं आपलं सामानसुमान सावकाशपणे आवरलं आणि तो भावांना म्हणाला, ''शांताराम, सदा, मी आता मुंबईला जातो. तिथे अंग टाकायला डोंबिवलीत एक जागा आहे माझ्याकडे. काहीतरी नोकरी करीन तिथे. मी इथे राहिलो तर माझा तुम्हाला त्रास होईल, माझ्याबद्दल संशय वाटेल. त्यामुळे माझंही मन आता इथे रमायचं नाही. तुम्ही माझे भाऊच आहात, कुणी परके नाही. फक्त या शेतीवाडीकडे दुर्लक्ष करू नका. तिची आबाळ होऊ देऊ नका. यापुढेही कधी कशाची गरज वाटली तर मला सांगा. मनात काही आणू नका. जशी जमेल तशी मदत मी तुम्हाला करीन.'' एवढं बोलून झाल्यावर त्याला थकल्यासारखं झालं. तो बोलायचा थांबला.

शांताराम आणि सदा स्तब्ध झाले होते. त्यांना काय बोलावं तेच सुचत नव्हतं.

मग श्रीधरनं आपल्या भांबावलेल्या भावांकडे एकवार समजूतदार नजरेनं पाहिलं; आणि सगळं बळ एकवटत त्यानं आपली भलीमोठी बॅग उचलली आणि तो घराबाहेर पडला.

**दिलीप पांढरपट्टे**
८, दुसरा मजला, बालाजी,
पायोनियर सोसायटीजवळ,
पनवेल, जिल्हा-रायगड ४१०२०६
दूरध्वनी : (०२१४१) २२८५३६
भ्रमणध्वनी : ९८२१०७५५४२/९४२२९१६९८६
dilip.pandharpatte@gmail.com

# कुंचल्याचे दोन किमयागार

**प्रभाकर वाईरकर, व्यंगचित्रकार**

*दोन वेगळ्या मुशीतले व्यंगचित्रकार जिद्दी, चिकाटी आणि आत्मभावातून लौकिकाला पोचलेले मनोहर सप्रे 'लोकसत्ता'मधील त्यांची वर्णी हे 'ऐकण्यासारखं नवलच!' तर दुसरे व्यंगचित्रकार प्रभाकर झळके. व्यंगचित्रांसोबतच समाजवादी जगणे त्यांनी साधले. 'एक करंजी मोलाची' त्याची परिणती. वाईटावर कुंचल्यातून रट्टे ओढत हास्याचे फवारे निर्माण करणे ही त्यांची खासियत. अशा या दोन व्यंगचित्रकारांची किमया मांडली आहे प्रभाकर वाईरकर यांनी...*

## अफलातून! मनोहर सप्रे

जिद्द, चिकाटी, प्रचंड आत्मविश्वास, आपल्या सच्च्या विचारामध्ये वा कामामध्ये झोकून देण्याची वृत्ती अशा गुणांमुळे अनेक व्यक्ती जगनिर्मिती व जगाचा डोलारा टिकवण्यासाठी अजरामर झाल्या... 'गंगा अवतरली' असे आपण सहज म्हणतो. परंतु भगीरथाने, हिमालयामध्ये ज्या चिकाटीने प्रचंड हिमवादळे, नसा गोठवणारी थंडी, हिंस्र श्वापदे, पाऊस यांचा सामना करत, तपश्चर्येमध्ये खंड पडू न देता भगवान शंकराला पृथ्वीतलावर गंगा आपल्या जटेतून आणण्यास भाग पाडले...

अंगावर मुंग्यांनी वारूळं तयार केली तरीही विचलित न होता रामनामाचा जप चालूच ठेवला आणि वाल्याचा वाल्मीकी झाला. शिक्षण घेऊनच मला मोठ्ठं व्हायचं आहे ही जिद्द लालबहादूर शास्त्रींनी बाळगली. गरिबीमुळे वाहनासाठी पैसे नसल्याने नदीच्या पलीकडच्या काठावर असलेल्या शाळेत जाण्यासाठी धोकादायक नदीचे पात्र पोहत जाऊन शिक्षण पूर्ण केले. भारताचे पंतप्रधान झाले. (आज त्यांचे नाव घेण्यास त्यांचा पक्षही कचरतो.) प्रसिद्ध कवी नारायण सुर्वे यांच्या पत्नीने हालअपेष्टा, अपमान, गरिबी सहन केली. आपली जिद्द, चिकाटी सोडली नाही. आपला नवरा कविता लिहिण्याची जी तपश्चर्या करतो आहे त्याच्यामध्ये व्यत्यय येऊ नये वा नवऱ्याचे मन विचलित होऊ नये म्हणून त्या भुकेचे चटके सृजनशील नवऱ्याला लागू नयेत म्हणून नवऱ्याकडे तक्रार केली नाही...

त्याचप्रमाणे आपली जिद्द व पक्के विचार यांच्या जोरावर एक व्यंगचित्रकाराने आपले ईप्सित साध्य केले.


राहण्याचे ठिकाण चंद्रपूर. मुंबईपासून अनेक कोसांवर. आपली व्यंगचित्रे मुंबईच्या प्रमुख दैनिकामध्ये प्रसिद्ध व्हावी

अशी दुर्दम्य इच्छा. त्यासाठी ‘लोकसत्ता’ दैनिकाशी पत्रव्यवहार. प्रत्येक वेळी नकारघंटा.

‘काय व्हायचे ते एकदा होऊन जाऊ दे पण संपादकांना भेटायचे व पुन्हा विनंती करून त्या दैनिकामध्ये आपली व्यंगचित्रे छापली जावीत’ हे इच्छामरण बाळगून त्यांनी चक्क मुंबईतील लोकसत्ताचे कार्यालय गाठले. ‘‘चंद्रपूरसारख्या दूरस्थ जागी तुम्ही राहत असल्याने रोजच्या ‘एक कलमी’ व्यंगचित्रात शिळेपणा येणार असल्याने इच्छा असूनही आपली सूचना मान्य करणे शक्य नाही.’’ असे लोकसत्ता संपादक महाजनींचे पूर्वीचे पत्र घेऊन केवळ आत्मविश्वास व आशावादापायी ते महाजनींच्या समोर ठाकले. तुम्ही जी गोष्ट अशक्य म्हणता ती मी शक्य करून दाखवीन याची हमी दिल्यावरही संपादकांनी आपले म्हणणे सोडले नाही. बाहेर जाण्यासाठी हातवारे केले. तरीही अखेरचा उपाय म्हणून त्यांनी त्यांच्याकडे ‘शुद्ध नकाराचे’ पत्र मागितले. पण संपादक आपल्या भूमिकेवर ठाम. व्यंगचित्रकारामध्ये लोकमान्य टिळक संचारले. संपादकांना ते म्हणाले, ‘‘मला नकार देणं हा आपला अखत्यार आहे पण मला शक्य वाटणारी गोष्ट नाकारून माझ्या आत्मविश्वासावर पाणी फेरण्याचा आपल्याला नैतिक अधिकार नाही!’’ यावर महाजनींना काय वाटले माहीत नाही. ‘‘ठीक आहे. चित्रं द्यायला सुरुवात करा पण खात्रीनं सांगतो की तुम्हाला शक्य होणार नाही.’’ त्यांनी आव्हान स्वीकारून दररोज चित्र देण्यास सुरुवात केली आणि नंतर तब्बल २० वर्षे त्यांची ‘ऐकावं ते नवलच!’ या सदरातून व्यंगचित्रे प्रसिद्ध होऊ लागली. त्या आत्मविश्वासी, जिद्दी व्यंगचित्रकाराचे नाव आहे मनोहर सप्रे आणि त्या प्रसिद्ध संपादकाचे नाव ह.रा. महाजनी.

सप्रे यांचा जन्म चंद्रपुरातील एका मागास खेड्यामध्ये झाला. गरिबी पाचवीला पुजलेली. कसलीही सोयी-साधनं नव्हती की विरंगुळ्यासाठी करमणूक. त्यांचं पेंटर व्हायचं स्वप्न होतं पण ते कधी शक्य झालं नाही. त्यावेळच्या नैराश्यमय स्थितीमध्ये केवळ फुकटपणे आनंद मिळवता येतो व मनापासूनच्या आवडीमुळेच ते व्यंग आणि विनोदाकडे वळले.

शाळेत ‘मनोहर’ मासिक येत असे. त्यामध्ये येणारे ‘मेवामिठाई’ नावाचे विनोदी चुटक्यांचे सदर अधाशीपणे


मनोहर सप्रे

वाचायचे व महिनाभर इतरांना सांगत त्याचा आनंद उपभोगायचा हा त्यांचा छंद होता. त्याकाळी पुण्या-मुंबईमधूनच वर्तमानपत्रे निघायची व व्यंगचित्रकारही तिकडचेच असल्याने आपणही व्यंगचित्रकार व्हावे असे काही त्याचे मनही सांगत नव्हते. १९५० मध्ये सरकारी नोकरी लागली. त्यांचा निकटचा दाक्षिणात्य सहकारी सहज बोलून गेला, ‘‘तुम्ही मराठी लोक नुसतेच चित्रकार आहात, व्यंगचित्रकला अवघड म्हणून साधली ती आमच्या साउथ इंडियन्सनीच!’’ ह्या वाक्याने ते दुखावले आणि अचानक त्यांच्यामध्ये व्यंगचित्रकलेचा कोंब फुटला. त्याला म्हणाले, ‘‘व्यंगचित्र अवघड नाही. सहा महिन्यात माझंच व्यंगचित्र प्रसिद्ध करून दाखवतो बघ!’’

जसा होतकरू, शिक्षित तरुण वेगवेगळ्या ऑफिसमध्ये नोकरीसाठी अर्ज करून आपले नशीब फळफळते का याचा वेध घेत असतो तसेच सप्रे यांचे झाले. चित्रकलेचे कसलेही शिक्षण न घेता एकलव्याप्रमाणे चितारण्याची साधना चालू ठेवली व त्या साधनेतून निर्माण झालेली ओबडधोबड व्यंगचित्रे मराठी मासिकांना पाठवत राहिले व तेवढ्याच वेगाने ती साभार परतू लागली आणि निराश होऊन त्यांनी व्यंगचित्रे चितारणे बंद केले.

अचानक नागपूरच्या नावाजलेल्या ‘उद्यम’ मासिकाचे संपादक वाडेगावकर यांचे ‘भेटायला या’ म्हणून पत्र आले, तेही त्यांच्याकडे पडून असलेल्या सप्रेंच्या व्यंगचित्रांच्या संदर्भात. त्याकाळी संपादकाचे पत्र येणे म्हणजे एव्हरेस्ट शिखर पादाक्रांत केल्यासारखे वाटे.

सप्रेंना मिळालेले वृत्तपत्रीय व्यंगचित्रे कशी रेखाटावीत याचे भान व शिक्षण याचे संपूर्ण श्रेय वाडेगावकरांना जाते. व्यंगचित्रे ठरावीक आकारात का असावीत. त्यांच्या रेषा बारीक न काढता ठळक का काढाव्यात व त्यामुळे छापल्यावर ती परिणामकारक कशी होतात याचे ज्ञान वाडेगावकर यांनी दिले. एका अर्थाने वाडेगावकर हेच सप्रेंचे ‘ड्रॉईंग मास्तर’! आणि हाच सल्ला सप्रेंनी शिरसावंद्य मानला. महिनाभरात त्यांचे पहिले व्यंगचित्र नावाजलेल्या ‘स्त्री’ मासिकात प्रसिद्ध झाले. सरकारी नोकरीत मन रमेना म्हणून खाजगीत एम.ए. करून प्राध्यापकी

पेशा पत्करला. पण ही नोकरी रोगापेक्षा औषध वाईट अशी निघाली. महिन्याचा पगार ५-६ महिन्यांनी मिळू लागला. सुरक्षितता नाही. अशा अवस्थेत पैसा व सुरक्षितता देणारी व्यंगचित्रकला ही पर्यायी सुरक्षितता वाटली. तसेच व्यंगचित्रकलेसाठी आवश्यक असणारी प्रखर कल्पनाशक्ती, विनोदबुद्धी आणि चित्रकलेचे अंग असलेली गुणवत्ता त्यांच्याकडे होती म्हणून त्यांनी व्यंगचित्रकलेच्या सागरात उडी घ्यायचे ठरवले. हे काम करताना त्यांना किती कष्ट घ्यावे लागले याची आठवण सांगताना ते म्हणतात, ''त्याकाळी कुरियर किंवा इंटरनेटसारख्या सोयी नव्हत्या. दररोज पहाटे उठून रोज काढलेले व्यंगचित्र एक्स्प्रेस डिलिव्हरीने रेल्वेच्या आरएमएसमध्ये टाकून ते मुंबईत पोहोचायला आठवडा लागायचा. तोवर चित्राचा विषय ताजा राखणे हे आव्हानच.'' व्यंगचित्राचा विषय शिळा होऊ नये म्हणून सामाजिक-राजकीय व कौटुंबिक यांचे मिश्रण असलेली व्यंगचित्रे त्यांनी चितारायला सुरुवात केली.

सप्रेंची व्यंगचित्रे पाहताना ती फार सोपी अशी वाटतात. त्यांची व्यंगचित्रांची स्टाईल पटकन लक्ष वेधून घेते. चित्रकलेचे शिक्षण न घेताही एखाद्या कसलेल्या चित्रकाराने रेखाटाव्या अशा त्यांच्या ओघावत्या-बोलक्या रेषा असतात. चेहऱ्यावरचे हावभाव व बॉडी लँग्वेजमधून अचूक अर्थ बाहेर येतो आणि खुदकन हसू येते. ही त्यांच्या व्यंगचित्रांची खासियत आहे.

ऐंशीच्या दशकात राजकारणामध्ये घराणेशाहीचा उगम होत होता. त्यासाठी राजकारणी लोकांनी घराणेशाहीचा अवलंब किती खालच्या थराला जाऊन केला याचे मार्मिक चित्रण 'आ उंडगे' या व्यंगचित्रांतून दिसून येतो.

रोगाचे योग्य निदान न करता केवळ शरीराच्या अवयवांच्या सर्व 'टेस्ट' करायला लावून रोग्याला कसे लुटणे चालू आहे याचे भेदक चित्र 'दवाखाना' या चित्रात दिसून येते. तसेच एक आर्थिक विवंचनेत असणारा कुटुंबप्रमुख बायकोचा वॉशिंग मशीन घेण्याचा अट्टहास कसा मोडून काढतो याचे उत्तम उदाहरण सोबतचे व्यंगचित्र आहे.

सप्रे म्हणतात, अनेकांनी पोचपावती दिली. परंतु ह.रा. महाजनींनी २९-६-१९६३ रोजी त्यांना लिहिलेले पत्र 'आपली कार्टून्स वेळेवर पोहोचतात' अशी दिलखुलास दिलेली पावती त्यांना कोणत्याही मानसन्मानापेक्षा मोठी वाटते. त्याने त्यांचे आयुष्य दैदिप्यमान केले. सप्रे यांचा फ्रेंच व्यंगचित्रकार 'सॅम्पे' अतिशय आवडीचा पण त्याची स्टाईल त्यांनी वापरली नाही. तो उपहासात्मक व विनोदनिर्मितीचा बादशहाच.



''रक्त, मल, मूत्र, थुंकी, एक्स-रे, इको, स्कॅनिंग वगैरे सगळं झाल्यावर डॉक्टर म्हणताहेत चष्म्याचा नंबर वाढलाय्!''

व्यंगार्थी... ७८



बराय मंडळी तुम्ही म्हणताय म्हणून घेऊया वॉशिंग मशीन, पण मग चार वर्षं कपडे मागायचे नाहीत!

सप्रे यांनी तीन कॉलमी मुख्य व्यंगचित्रे फारच कमी केली, परंतु ती जर केली असती तर मराठी राजकीय व्यंगचित्रांसाठी तो मैलाचा दगड ठरला असता.

आपल्याला नाकारणाऱ्या अन्यायकारक प्रस्थापित व्यवस्थेशी जुळवून न घेता झुंज देऊन ती उलथवण्याबरोबर जाण्याचा मार्ग सप्रे यांच्या धडपड्या, अन्यायाविरुद्ध बंड

पुकारणाऱ्या स्वभावाला साजेसाच होता. त्यांनी त्यासाठी राजकारण आणि कामगार चळवळीमध्ये भाग घेतला आणि त्यात उणीपुरी दहा वर्षे काढली आणि अचानक त्यातून काढता पायही घेतला.

त्यांनी १९६३ पासून अनेक वर्तमानपत्रांमध्ये व्यंगचित्रे रेखाटली. गुजराती 'जनसत्ता', 'लोकसत्ता', 'आंध्रप्रभा', 'हितवाद', 'ब्लिटस्' ते 'रिडर्स डायझेस्ट' असा प्रवास करता करता ते आता विसावले आहेत. त्यांची 'दहीवर', 'अलस कलस', 'बिल्लोरी', 'रूद्राक्षी', 'सांजी', 'व्यंगार्थी', 'हसा की', 'व्यंगविनोद', 'फरसाण' अशी व्यंगचित्रे व इतर विषयांवरील पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

त्यांच्याशी बोलताना किंवा त्यांचे साहित्य वाचताना एका तत्त्ववेत्त्याशी बोलत असल्याचा भास होतो. व्यंगचित्रकाराचे महत्त्व सांगताना ते म्हणतात, ''हिशोबाबत जी ऑडिटर्सची भूमिका आणि महत्त्व तेच नेमके वृत्तपत्रीय व्यंगचित्रकाराचे असते. ते न्यायालयीन निणर्यासारखे समीक्षण करते.''

सप्रे यांचा हा प्रवास मोठमोठ्या खड्डे पडलेल्या वाटेतून झाला. त्यासाठी त्यांच्या सुविद्य पत्नीची साथ त्यांना लाभली. दोन मुलगे आहेत. एक कारखानदार तर दुसरा स्वत:चा व्यवसाय करतो आहे, तर मोठी सून नावाजलेली लॅन्डस्केप डिझायनर आहे.

त्यांच्यातील असुरक्षिततेची भावना त्यांचे जीवन घडवणारी ठरली. ते म्हणतात, ''कोणतेही संकट वा असुरक्षितता सोबतीला असणे हा शाप नसून नियतीची एक हेतुगर्भ योजना असते.''

## 'रंगीबेरंगी पैठणीतला' व्यंगचित्रकार – प्रभाकर झळके



प्रभाकर झळके

'मामा' हे शब्द कानावर पडताच हरणाचे पाडस जसे कान टवकारते तसेच लहान मुलांचे कान अत्यानंदाने टवकारतात, डोळ्यांत आनंदाची वीज चमकते आणि सर्वांग बागडू लागते. असे या 'मामा' या शब्दाचे गारुड प्रत्येकाच्या मनावर कायमचे ठाण मांडलेले असते. मामा म्हणजे लळा, प्रेम, मज्जा, मित्र सर्व काही. आईवडिलांनंतर अगदी जवळचा कोण तर मामाच, काका नाही. एकत्रित राहत असला तरीही मामा सांगेल ती पूर्व दिशा... मामाने पायवाटेला हमरस्ता असे संबोधले तरीही आपण त्यावर अविश्वास दाखवत नाही. उगाच नाही तान्हुल्याला कमरेवर घेऊन इटुकला घास भरवताना आई आकाशाकडे बोट दाखवून त्याला सांगते, तो बघ तुझा 'चंदा मामा' आणि बाळ पटकन घास फस्त करते.

आपण परगावी गेलो तर एखाद्या माणसाला सहज विचारतो. ''काय हो 'मामा' अमूक घर कुठे आहे?'' मामाबद्दलची आंतरीक जवळीक आपल्याला दूर जाऊ देत नाही. 'मामा' घडवतात आणि बिघडवतातही. शकुनीमामाने कौरवांना बिघडवले नसते तर महाभारत घडले नसते. कंसमामाची तऱ्हाच वेगळी. पण असे मामा अगदी तुरळकच. मामाचे गाव म्हटले की त्या ठिकाणी केव्हा जातो असे होते किंवा मनाने त्या गावी पोचलेलो असतो. हल्लीच्या दिवसात 'मामा' या नात्याचे बाजारीकरणही झाले आहे. हॉटेल वा रेसॉर्टची नावे 'मामाचे गाव' म्हणून ठेवली जातात.

असाच एक मामा भाच्यांना घेऊन चित्रकलेबद्दल माहिती देतो, विनोद सांगतो, वाचणे, ऐकणे, त्यातील मर्म सांगतो, त्याच्याच जोडीला व्यंगचित्र कसे पाहावे या सर्व गोष्टींचा छंद अगदी लहानपणीच लावतो. अगदी खेड्यात राहून! तसेच विनोदी चुटके सांगतो, शब्दविरहित व्यंगचित्रात दडलेला विनोद नेमका काय याचे विवेचन करतो. मामाला वाचनाची आवड असल्याने भाच्यांवरही त्याचा परिणाम झाला. कळत-नकळत भाचेमंडळी वाचनाकडे वळली. मामाचे संस्कार भाचेमंडळींवर पडलेले आपण नामवंत व्यक्तींच्या आयुष्याकडे अगदी निरखून पाहिले तर सहज लक्षात येते. जगप्रसिद्ध क्रिकेटपटू सुनील गावस्कर हे त्यांचे क्रिकेटपटू




नेहमीच मार्मिकचा अंक विकत घेऊन त्यातील बाळासाहेबांच्या शैलीचा ते अभ्यास करत. बाळासाहेबांच्या व्यंगचित्रांत दिसणारे अचूक रेखाटन, अनॅटॉमीचा अभ्यास, ब्रशचा यथेच्छ वापर, त्यातून निर्माण झालेल्या जाड–बारीक रेषा, त्यांचा गोडवा, समाजकारणाचे व राजकारणाचे बारकाईने केलेले निरीक्षण, चेहऱ्यावरचे अचूक भाव, याचा परिणाम व्हायचा तोच झाला. नियमितपणे त्यांचीही व्यंगचित्रे मार्मिकमध्ये झळकू लागली.

मामा माधव मंत्री यांच्यामुळेच जगप्रसिद्ध क्रिकेटपटू बनले.

असाच एक मामाच्या 'विनोदी' वातावरणात रमणारा मुलगा मोठेपणी विनोदावर कार्यक्रम करणारा, जादूगार आणि व्यंगचित्रकार होणार नाही का? या सुप्रसिद्ध व्यंगचित्रकाराचे नाव 'प्रभाकर झळके.'

सुरुवातीला वरील वातावरणामुळे दिवाळी अंक वाचण्याची व त्यातील व्यंगचित्रे निरखण्याची व त्यातून आनंद घेण्याची वृत्ती तयार झाली. आपणही व्यंगचित्रे करावीत अशी ऊर्मी निर्माण झाली. 'स्त्री', 'किर्लोस्कर' व 'मनोहर' मासिकांतून हरिश्चंद्र लचके व शं.वा. किर्लोस्करांची व्यंगचित्रे प्रसिद्ध व्हायची. मामाने दाखवलेल्या वाटेने झळके चालायला लागले. त्यांना हरिश्चंद्र लचकेंची व्यंगचित्रे फारच आवडत. तसेच 'मोहिनी' मासिकात येणाऱ्या शि.द. फडणीसांच्या खास शैलीने त्यांच्यावर मोहिनी घातली. परंतु मनावर हे जे संस्कार होत होते ते कागदावर उतरवण्यासाठी झळके यांना संधी मिळत नव्हती. अचानक एका 'मार्मिक'च्या अंकामध्ये १९६३ साली 'वस्त्रे अशी अब्रू घेतात' या शीर्षकाखाली व्यंगचित्रस्पर्धा जाहीर झाली. सहज म्हणून त्या स्पर्धेसाठी त्यांनी व्यंगचित्र पाठवले आणि पहिल्या बक्षिसाचे मानकरी ठरले! झळक्यांचे ते पहिले व्यंगचित्र... इथूनच झालेली व्यंगचित्र रेखाटण्याची सुरुवात आजपर्यंत अव्याहतपणे चालू आहे नैसर्गिक झऱ्यासारखी.

हरिश्चंद्र लचके, दीनानाथ दलाल, शं.वा. किर्लोस्कर, श्रीकांत ठाकरे, शि.द. फडणीस व बाळासाहेब ठाकरे यांच्या मुशीतून तयार झालेल्या झळके यांना बाळासाहेब ठाकरे यांच्या व्यंगचित्रांनी 'वेड' लावले.

झळके यांची व्यंगचित्र चितारण्याची शैली ही साधारण बाळासाहेबांच्या शैलीसारखी वाटते. कारण ते बाळासाहेबांना गुरुस्थानी मानत होते. अनेक मराठी व्यंगचित्रकारांनी बाळासाहेबांच्या पायवाटेने चालण्याचा प्रयत्न केला. ते ब्रशचा वापर करतात त्यामुळे त्यांच्या चित्रांमध्ये जाड–बारीक रेषांचा संयोग साधला जातो. कमीत कमी रेषा काढून ते व्यंगचित्र पूर्णत्वाला नेण्याचा प्रयत्न करतात. जाडजूड, जोरकस रेषा. आवश्यक त्या त्या ठिकाणी परस्पेक्टिव्हचा वापर करतात आणि जे भाष्य करायचे आहे ते उठून दिसण्यासाठी चित्राची सुयोग्य मांडणी करतात.

राजकीय व्यंगचित्रे का नाही चितारली याबाबत सांगताना ते म्हणतात, ''राजकीय व्यंगचित्रे चितारण्याची नेहमीच खुमखुमी यायची व तसा प्रयत्न केलाही. परंतु ज्या शाळेमध्ये चित्रकला शिक्षकाची नोकरी करत होतो त्या ठिकाणच्या मॅनेजमेंटने हा 'उद्योग' बंद करायला लावला आणि राजकीय व्यंगचित्रे चितारणे बंद झाले.''



तरीही सामाजिक आणि राजकीय संदर्भ घेऊन ते व्यंगचित्रे चितारू लागले. अप्रत्यक्षरीत्या राजकारण्यांचे कान पिळण्याचे कार्य करू लागले. हास्य-चिन्हे आणि शब्दविरहित चित्रे चितारण्यात झळके यांचा हातखंडा आहे. आता हेच पाहा- • सुखवस्तू स्त्रियांची अवस्था काय होते ते सादर करण्यासाठी दोन जोड छत्र्यांचा वापर केला आहे तो अफलातूनच • सतत बायकोबरोबर झडणारे वादविवाद व त्यातून आपली सुटका करून घेण्यासाठी स्वत:चे शरीर कमावण्यासाठी मानसिक आणि शारीरिक क्षमता वाढवण्यासाठी बायकोच्या चेहऱ्याचा केलेला वापर • राजकारण्यांमध्ये गल्लीबोळातलेही पुढारी 'आपण मोठ्ठे पुढारी आहोत' हे छातीठोकपणे लोकांना सांगून मूर्ख बनवतात. हे सादर करताना वापरलेली कल्पना मार्मिकच! समाजात आजुबाजूला घडणाऱ्या अनिष्ट प्रथा, नातीगोती यांच्यावर बोट ठेवण्यासाठी नटीच्या बेडरूममधील विजेच्या बल्बच्या माध्यमातून उघड केलेली सामाजिक दांभिकता.

ते म्हणतात, ''एखादी कल्पना मनासारखी पेपरवर चितारण्यापूर्वी बरेच पेपर फाडावे लागतात. एकदा कल्पना पक्की झाली की झरझर ब्रशने रेखाटन करणे सोपे जाते.''

जीवन महागाईग्रस्त, धकाधकीचे २४ तास, दहशत, घोटाळे, जातीय तणाव यांनी बरबटलेले आहे व त्यासाठी एकमेव औषध म्हणजे हास्य-चित्रे असा त्यांचा विश्वास आहे.

साहित्यिक आणि व्यंगचित्रकार यांचे नाते म्हणजे मनुष्य आणि ऑक्सिजन यांच्या संबंधासारखे आहे. दोघेही एकमेकांना पूरक. तरीही व्यंगचित्रकारांना साहित्यिकाचा दर्जा देण्यास साहित्यिक हातचे राखूनच व्यवहार करतात, याबद्दल झळके यांना दु:ख आहे.

येवले गाव, जिल्हा नाशिक - पैठणी साड्यांचे माहेर - अशा खेड्यात आयुष्याची सुरुवात... इंग्रजी वर्तमानपत्रे व मासिक हातात पडणे अशक्यच. त्यामुळेच विदेशी व्यंगचित्रकारांची व्यंगचित्रे त्यांच्या पाहण्यात आली नाहीत. पर्यायाने त्यांच्या व्यंगचित्रांवर कोणा परदेशी व्यंगचित्रकारांची छाप नाही.

त्यांची व्यंगचित्रे अनेक मासिके-पाक्षिकांमधून प्रसिद्ध झाली. मार्मिक, जत्रा, दक्षता, किशोर, लोकमत, गावकरी, आवाज, मोहिनी वगैरे.

बाळासाहेब ठाकरेंच्या हस्ते त्यांना तीन वेळा पुरस्कृत करण्यात आले हे ते त्यांचे महद्‌भाग्य समजतात. अंजली आणि किर्लोस्कर दिवाळी अंकांची प्रथम पारितोषिके. १९८६ साली अखिल भारतीय व्यंगचित्र स्पर्धेत तिसरे पारितोषिक, जर्मनी-फ्रँकफर्ट येथील स्पर्धेत व्यंगचित्राला बक्षीस. अशा प्रकारे स्थानिक, सामाजिक व सांस्कृतिक संस्थांकडून अनेक पुरस्कार लाभले.

त्यांच्या व्यंगचित्रांनी सामाजिक विसंगती, ढोंग-दांभिकपणा, जीवनातील विदारक सत्य हे दाखवण्याचे धैर्य दिले - जीवनाकडे मिस्कीलपणे व खिलाडूपणे पाहण्याची शिकवण दिली.

झळके हे हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे सामाजिक कार्यही तेवढेच महत्त्वाचे आहे. 'धडपड मंच' स्थापन करून त्यामधून समाजपयोगी कामे, दिवाळीमध्ये 'एक करंजी मोलाची' या उपक्रमाद्वारे प्रत्येक घरातून दिवाळी फराळ जमा करून तो लांब पल्ल्याच्या ठिकाणी असलेल्या आदिवासी व गरिबांना दिवाळीची भेट म्हणून वाटण्याचे काम, 'हास्यपंचमी' हा विनोदी चुटक्यांचा कार्यक्रम, छंद म्हणून जादूचे प्रयोग असे त्यांचे समाजासाठी जगणेही आहे. झळके सर्व प्रकारचे वाचन करतात. शिवाय लेख, स्फुटे, कथा यांचे लिखाण सतत चालू असते.

अनेक ठिकाणी व्यंगचित्रे प्रात्यक्षिकांचा कार्यक्रम करतात. त्याचवेळी नकलाही सादर करतात. ते तबला व बासरी उत्तम वाजवतात.

'हास्यप्रभा झळके' हे त्यांचे व्यंगचित्रांचे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. त्यांना त्यांची पत्नी सतत क्रियाशील ठेवत असते. तन-मन-धनाने. मुलगी संसारात रममाण झाली आहे. घरामध्ये चित्रकलेचा वारसा नाही. घरातून त्यांना एकच सल्ला दिला जातो- देवदेवतांवर कार्टून काढू नका. तसेच वात्रटही कार्टून्स काढू नका. त्यांनी स्वत:ला याही वयात एवढे सक्रिय ठेवले आहे की, त्यांच्या घरी फोन करा, त्यांच्या पत्नी एकच वाक्य उच्चारतात ''कोण बोलतंय?... 'ते' कार्यक्रमाला गेलेत...!''

ए.एम. झाल्यामुळे कलाशिक्षकाची 'चोळी' आणि अनेक कलांची रंगीबेरंगी 'पैठणी' लेऊन समाजातील वाईटांवर कुंचल्यातून रट्टे ओढत हास्याचे फवारे 'ते' निर्माण करतात. तर धार्मिक प्रवचनातून नीती-अनिती, निर्भयता यांचे धडे देऊन ज्ञाना-तुक्या-चोख्याच्या अमृतधारेचा सतत वर्षाव जनमानसावर करत असतात.

**प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी-४०५, वाकोला ब्रीज,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९
prabhakarwairkar@rediffmail.com

# खेळ

प्रा. मिलिंद जोशी

त्या मन:शांती शिबिरातला आज आठवा दिवस होता. गेले सात दिवस योगासने, प्राणायाम, मौनव्रत आणि अतिशय साधा, अल्प आहार घेतल्यामुळे सर्वच शिबिरार्थी एक प्रकारची प्रसन्नता अनुभवत होते. वर्षानुवर्षे मनाच्या तळाशी साचलेले वर येऊ पाहते आहे हे प्रत्येकालाच जाणवत होते. इंटरनेट, मोबाईल, फेसबुक, रिमोटच्या दुनियेतून बाहेर पडून डोंगरांच्या रांगांनी आणि वृक्षांनी वेढलेल्या त्या आश्रमाच्या परिसरात शिबिरार्थी आले तेव्हा त्यांनी एक विलक्षण शांतता अनुभवली होती. पण हळूहळू ही शांतता जीवघेणी वाटत होती. सततचे मौनव्रत खायला उठत होते. इतरांशी बोलणे खूप सोपे असते कारण हवी ती नाटके करीत बोलता येते. पण स्वत:शी बोलणे खूप अवघड आहे हे प्रत्येकाला जाणवत होते. आयुष्यभर स्वत:ला फसवत वाटचाल करणाऱ्यांना तर ते जास्तच अवघड वाटत होते. आपण स्वत:ला आणि जगाला फसवत कसे वाटचाल करीत राहिलो याची पदोपदी जाणीव होऊन खिन्नता वाढत होती.

पहाटे साडेपाचची घंटा वाजली तशी नम्रता भानावर आली. सहा वाजता योगासने आणि प्राणायाम करण्यासाठी आवरून जाणे आवश्यक होते. ती आरशासमोर उभी राहिली. गोरापान, मोठ्या डोळ्यांचा चेहरा एरवी न्याहाळताना तिला आपल्या सौंदर्याचा खूप अभिमान आणि गर्वही वाटायचा. मानेवर रुळणाऱ्या बटांशी चाळा करीत कितीतरी वेळ स्वत:कडे पाहत राहणे हा तिचा नित्यनेम असायचा. त्यात तिला खूप आनंद मिळायचा. गेल्या चार-पाच दिवसांपासून मात्र तिला स्वत:ला न्याहाळताना अपराध्यासारखे वाटत होते. जगाच्या दृष्टीने हा एक सुंदर, भोळाभाबडा चेहरा अगदी निष्पाप वाटावा असावा पण... मी खरेच तशी आहे? इतके दिवस त्याची कधीच जाणीव झाली नाही, पण आता प्रकर्षाने होतेय. या शिबिरात आपल्यापासून तिला फार वेळ आरशासमोर उभे राहवले नाही. कपडे घेऊन ती बाथरूममध्ये शिरली. एरवी शॉवर घेताना स्वत:ला सूक्ष्मपणे न्याहाळणारी ती स्वत:च्याच शरीराला टाळत होती. बाथरूममधल्या आरशात दिसणारे स्वत:चे रूप स्वत:लाच दिसू नये यासाठी ती डोळे बंद करून घेत होती. ती आवरून तयार झाली. तिचे घड्याळाकडे लक्ष गेले तेव्हा सहाला दहा मिनिटे कमी होती. ती डोळे बंद करून शांतपणे बसून राहिली. आश्रमातल्या घंटानादाने तिला जाग आली. खोलीचे दार बंद करून ती योगासनवर्गाच्या हॉलच्या दिशेने जायला निघाली. तिच्याबरोबर शिबिरात सहभागी झालेले तिचे पन्नास-साठ सहकारीही त्याच दिशेने निघाले होते. जमिनीवर रांगेत घातलेल्या आसनावर ती येऊन बसली. आठ दिवसांच्या सरावामुळे शास्त्रशुद्ध पद्धतीने योगासने करण्याची जिद्द प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली होती. योगासनानंतर प्राणायामाची प्रात्याक्षिके झाली. ॐकाराचा जप झाला. बरोबर साडेसहा वाजता स्वामी विद्यानंद त्या

हॉलमधल्या खास त्यांच्यासाठी बनविलेल्या आसनावर येऊन बसले. त्यांच्या शांत, प्रसन्न आणि तेजस्वी चेहऱ्यावरून शिबिरार्थींची नजर काही केल्या हटत नव्हती. स्मित करीत स्वामीजी म्हणाले ''आज शिबिराचा आठवा दिवस आहे. योगासने, प्राणायाम, मौनव्रत आणि अल्प आहार यांचे शरीरावर आणि मनावर होणारे परिणाम आपण अनुभवत आहोत. आजचा दिवस इतर दिवसांपेक्षा वेगळा आहे. आज आपण आपल्या आयुष्याचा लेखाजोखा मांडायचा आहे, आपल्याच मनात. त्याचा हिशेब स्वत:तच मांडायचा. स्वत:च पुसून टाकायचा. असा लेखाजोखा मांडणे ही आपली मानसिक आणि भावनिक गरज असते. आपण तो कधी मांडत नाही. अंतुर्मख होत नाही, म्हणून गोष्टी मनातल्या मनात साचत राहतात. त्याचेच ताण आपल्या जीवनात निर्माण होतात. ते नष्ट करण्यासाठी मग आपल्यासारख्या लोकांना अशी शिबिरे घ्यावी लागतात. आपल्या आयुष्यातल्या ठळक घटनांचे स्मरण करा. आपण कुठे आणि का चुकलो? याचा विचार करा. बरोबर असाल तर का आणि कसे बरोबर हे स्वत:ला समजावून सांगा. स्वत:चे समर्थन करीत असताना तुमचेच मन तुम्हाला खात नाही ना, याचाही विचार करा. हा लेखाजोखा मांडताना तुम्ही स्वत:शी बोलाल, हसाल, रडाल, धाय मोकलून रडाल, तेच आम्हाला हवे आहे. मनात साचून राहिलेले असे बाहेर काढण्याची संधी आपण मनाला कधीच देत नाही.'' स्वामी उठले आणि त्यांच्या खोलीच्या दिशेने निघून गेले. दररोज योगासने आणि प्राणायाम झाल्यानंतर स्वामीजी पाच-दहाच वाक्ये बोलत असत. पण त्यांचे बोलणे काळजाला जाऊन भिडायचे!

स्वामीजींचे आजचे बोलणे ऐकल्यानंतर तर नम्रता जास्तच अस्वस्थ झाली. गेले सात दिवस मनाशी बोलत आहोत पण ते सोपे नाही याचा अनुभव घेतो आहोत. आता तर स्वत:च्याच आयुष्याचा लेखाजोखा मांडायचा. काय चूक काय बरोबर? मोठे अवघड काम आहे. ती स्वत:लाच बजावत होती.

योगासनवर्गातून बाहेर पडलेले शिबिरार्थी आपापल्या खोलीच्या दिशेने निघाले. नम्रता तिच्या खोलीत आली. रात्रभर तिला झोप आली नव्हती. विचारांच्या तंद्रीत या कुशीवरून त्या कुशीवर वळत राहिली होती. तिच्या चाळीस वर्षांच्या आयुष्यात प्रथमच ती या शिबिराच्या निमित्ताने एकटी राहिली होती. नवरा अनय, मुलगी वैदेही यांची तिला सारखी आठवण येत होती. अनय मित्राबरोबर गोव्याला जाणार होता. वैदेही मैत्रिणींबरोबर ट्रेकिंगला जाणार होती. त्यामुळे एकटीने घरात राहून काय करायचे? म्हणून मैत्रिणीच्या आग्रहाखातर थोड्याशा नाखुशीनेच ती शिबिरासाठी आली होती. सात-आठ दिवसांत इथल्या वातावरणाची तिला सवय झाली होती. अनयची आठवण तिला असह्य करत होती. डोळ्यांजवळ हात नेत ती शांत पडून राहिली.

वर फिरणारा पंखा विचारांची चक्रे अधिक वेगाने फिरवत होता. अनय... हा आयुष्यातला पहिला अध्याय... जो आजही सुरू आहे... नवरा म्हणून...

अनय समोरच्याच पॉलिटेक्निक कॉलेजात शिकणारा. पॉलिटेक्निक कॉलेजात मुलींची संख्या कमी असल्यामुळे सगळी मुले समोरच असणाऱ्या होम सायन्सच्या कॉलेजच्या गेटवर उभी असायची. रुबाबदार, देखणा आणि मितभाषी. माझ्यासाठी वेडे झालेले पुष्कळ होते. पण भावला तो अनयच. तसे खेळवले मी अनेकांना. त्या वयात ते एक वेडच असते. प्रत्येक चांगली गोष्ट हवीहवीशी वाटतच असते त्या वयात... तरीही अनयच आवडत होता. घरी समजले तेव्हा घरच्या लोकांनी आकांडतांडव केला. कारण त्यांना श्रीमंत, चांगला स्थिरस्थावर झालेला, भरपूर इस्टेट असलेला जावई हवा होता. मी माझ्या मतावर ठाम होते. अनयचे वडील लहानपणीच वारलेले होते. आई शिक्षिका म्हणून काम करणारी. परिस्थिती बेताचीच होती. लग्न झाले. मुलगी झाली. अनय कॉन्ट्रॅक्टच्या बिझनेसमध्ये घुसला. त्याला यश आले. आज काय कमी आहे. बंगला आहे. गाडी आहे. बँक बॅलन्स आहे. वैदेही-सारखी सोन्यासारखी पोर आहे. आता आईबाबांचाही विरोध मावळलाय. अनयने माझा शब्दही कधी मोडला नाही. मी श्रीमंत घरातली आणि त्यात दिसायला सुंदर म्हणून दबलेलाच असायचा कायमचा. माझ्या कोणत्याच गोष्टीला कधीच नकार नाही. मी मात्र त्याचा खूप गैरफायदा घेत राहिले. माझी बहीण वनिता म्हणायची, ''तू नवऱ्याबरोबर अगदी नोकरासारखे वागतेस'' तेव्हा तिचा राग येण्याऐवजी मला हसूच आले होते.

माझ्या मनात असल्याशिवाय त्याला मी कधीच शरीरसुख दिले नाही. कितीतरी वेळा त्याने आशेने अंगावर टाकलेला हात मी कधी रागाने तर कधी चरफडत बाजूला केलाय. तो बिचारा कधी रागावला नाही. की त्याने कधी तक्रार केली नाही.

त्याला खूप वाटायचे मी आईसाठी करावे, त्याच्या धाकट्या बहिणीसाठी करावे, पण इतरांसाठी करणे हा माझा स्वभावच नव्हता. मी ही नाती जपली, पण अंतरावरूनच.

मुलाची आर्थिक स्थिती सुधारली तरी त्याचा फायदा त्याच्या आईला अणि बहिणीला कधीच होऊ दिला नाही आपण. त्यात असूयेची भावना नव्हती कधी पण असे का वागले याचे उत्तर मात्र देता येत नाही.

मी सौंदर्याच्या अणि पैशाच्याच जोरावर मस्ती करीत होते. हे सौंदर्य तरी काय जगाला दाखवायलाच! अनयला शरीरसुख तरी पूर्ण कुठे देऊ शकले मी? डोळ्यांपासून पायाच्या बोटापर्यंत एकही अवयव दुखला नाही असं घडलंच नाही या चाळीस वर्षांत. सारख्या प्रकृतीच्या तक्रारी असायच्या. अनयने मात्र कधीही कसलीही तक्रार केली नाही. दुसरी कोणी बाई माझ्या जागी असती तर देवघरात बसवून त्याची पूजा केली असती. इतका चांगला नवरा असताना, घरात कशालाच कमी नसताना, वैदेहीसारखी गोंडस पोर असताना 'रणजीतचं' आकर्षण का वाटलं? ती स्वत:लाच प्रश्न विचारत होती. हा दुसरा अध्याय का सुरू झाला? रणजीत आणि अनय पार्टनरशिपमध्ये कॉन्ट्रॅक्टचा बिजनेस करीत होते. रणजीतचे नुसते नावच ऐकले होते अनयकडून. तो साईटवर असायचा आणि फार तर मुंबईला जाऊन कॉन्ट्रॅक्ट टेंडरशी रिलेटेड काम करायचा. त्या दिवशी तो प्रथम घरी आला तेव्हा किती भारावून गेलो आपण. दिसायला अनयइतका नक्कीच भारी नव्हता. तरीही त्याच्या डोळ्यांत एक चमक होती. तो डोळ्यांत डोळे घालून बोलायचा. त्याच्या डोळ्यांत चमक असली तरी तो अशा पद्धतीने बघायचा की त्यावेळी आपल्या अंगावर कपडेच नाहीत असं वाटायचं! तरीही ती नजर आवडली का? सांगता येत नाही.

एका मुलीची मी आई खरे तर. ते असे कुणाच्या प्रेमात पडण्याचे वय नव्हते आणि वेळही! तरीही त्याच्या येण्याने, त्याच्या विषयीच्या चर्चेने भारावून जात होते मी. तेव्हा त्याचा लॅण्डलाईनवर फोन यायचा. फोन अनयसाठी यायचा. तरीही मीच तो फोन उचलायचे. त्याचा आवाज ऐकून अनयकडे द्यायचे.

एखाद्या दिवशी त्याचा फोन आला नाही तर चुकल्या चुकल्यासारखे वाटायचे. तो दिवस किती अशांत जायचा. अनय एकदा त्याला ड्रिंक्स घेण्यासाठी घरी घेऊन आला. अचानक तेव्हा मला किती आनंद झाला होता? तेव्हा मी मुद्दामच हॉलमध्ये खूर्ची टाकून बसले होते. टीव्ही चालू होता. मांडीवर वैदेही होती. वैदेहीला थापटायचे. एकटक टीव्हीकडे पाहायचे आणि मधूनच एखादा कटाक्ष रणजीतकडे. त्या दिवशी किती मनापासून स्वयंपाक केला होता. माझे वागणे वयाला शोभणारे नव्हते तरीही मी एका धुंदीत वावरत होते. पंकज उधासच्या मस्त गझला ऐकत अनय आणि रणजीत पेग भरत होते. रणजीत म्हणाला, ''अनय, 'ला पिला दे साकिया' लाव.'' अनयने 'ला पिला दे साकिया' ही गझल लावली.

''वक्त सारी जिंदगी में
दोही गुजरे है कठीन
इक तेरे आने से पहिले
इक तेरे जाने के बाद'' या ओळी ऐकताना मी किती चमकून पाहिले होते रणजीतकडे. त्याच्या मनातही नसेल. पण मला या ओळी त्यावेळी माझ्याचसाठी वाटत होत्या.

एरवी आलेल्या पाहुण्यांना जेवाला वाढायचे म्हणजे किती कंटाळा यायचा, पण त्या दिवशी किती उत्साहात वाढत होते मी!

रणजीत जायला निघाला तेव्हा मी म्हणाले, ''आता पुढच्या वेळेस येताना मिसेसना घेऊन या. अमचीही मैत्री होऊ द्या.'' तेव्हा तो शांतपणे हसला होता.

अनय त्याला पार्किंगमध्ये सोडायला गेला. तेव्हा खिडकीतून किती टक लावून पाहत होते मी. त्याची गाडी दिसेनाशी होईपर्यंत.

मलाच त्याला भेटायचं निमित्त हवे असायचे.

एके दिवशी मीच अनयची परवानगी घेऊन रणजित आणि त्याची बायको नयनाला जेवायला बोलावले.

नयनाशी बोलताना मी रणजीतकडे कटाक्ष टाकतेय हे तिला जाणवत होते.

नयना त्या दिवशी जीन पँट घालून आली होती.

मी तिला विचारले ''तू नेहमी जीन्स वापरते!''

नयन किती सहज म्हणाली, '' रणजितला जीन्स घालणाऱ्या बायका आवडतात.''

''बायको की बायका?'' या माझ्या प्रश्नावर निखळपणे हसत ती म्हणाली ''दोन्हीही.''

''माझ्या भिशीच्या ग्रुपमध्ये येणार का तुम्ही?'' असे विचारल्यावर किती पटकन हो म्हणाले मी!

रणजीतच्या घरी मी पहिल्यांदाच गेले तो दिवस अजूनही स्पष्ट आठवतो. त्याचे घर पाहण्याची केवढी उत्सुकता लागली होती. रणजीतला जीन्सची पॅन्ट घातलेली बाई आवडते हे समजले होते. त्या दिवशी मी देखील जीन्सची पॅन्ट घालून गेले त्याच्या घरी. त्याचा तो सुंदर बंगला, घराभोवती सुंदर बाग, दारात उभी असणारी महागडी गाडी साऱ्या वैभवाचा

केवढातरी हेवा आणि कौतुक वाटले होते. त्याच्या बायकोने सगळे घर फिरून दाखवले, अगदी बेडरूमसकट! त्या सुरेख इंटेरिअयर असणाऱ्या खोलीत माझं मन किती कावरेबावरे झाले होते. त्याचे घर पाहून आल्यानंतर त्याच्याविषयीची उत्सुकता आणखीच वाढायला लागली होती.

रणजीत आणि अनय यांची पार्टनरशिप असली तरी बाहेरगावची सगळी कामे रणजीतकडेच असायची. टेंडरच्या कामासाठी तो नेहमी मुंबईला जायचा. मलाही नाटक, चित्रपट, मालिका या सगळ्यांचे खूप आकर्षण होते. त्यावेळी कुठे काही संधी मिळते का, म्हणून माझ्याही तेव्हा मुंबईला चकरा व्हायच्या.

मीच एकदा अनयला म्हणाले, ''रणजीत तुमच्या ऑफिसच्या कामासाठी नेहमीच मुंबईला जात असतो. माझं काम असेल तेव्हा मी जाईन त्याच्याबरोबर. तेवढीच कंपनीही होईल. नाही तर अशा मठ्ठ ड्रायव्हबरोबर प्रवास खूप बोअर होतो!''

भोळ्या अनयने किती सहजतेने विनंती मान्य केली. त्या दिवशी किती आनंद झाला होता!

काहीही काम नसतानादेखील रणजीत मुंबईला जाणार आहे हे समजल्यानंतर मीही निघाले. रणजीतबरोबर जायचे म्हणून पहाटे पहाटे किती छान आवरून तयार झाले होते मी.

तो सकाळी सहालाच गाडी घेऊन आला. तो स्वत:च गाडी चालवत होता.

खरे तर पुढे त्याच्या शेजारी बसून प्रवास करण्याची खूप इच्छा होती. पण रणजीतने दरवाजा उघडून मागे बसण्याची विनंती केली. अनय समोर असताना रणजीतशेजारी पुढे जाऊन बसणेही शक्य नव्हते. रणजीत मितभाषी होता. त्याला वेगाची आणि गाण्याची आवड होती. वेगाने गाडी चालवताना तो गाणी मात्र जुनी, शांत स्वरातली, फारसा वेग नसलेली, हळुवार अशी ऐकायचा. त्याच्या व्यक्तित्वाला हा विरोधाभास त्या क्षणी किती पटकन जाणवला होता आणि तरीही त्याचे खूप कौतुकही वाटत होते. मी कितीही बोलण्याचा प्रयत्न केला तरी 'हो' किंवा 'नाही' एवढेच त्याचे उत्तर असायचे. एखादी गोष्ट पटली की, 'खरंच, एवढंच म्हणायचा. त्यानं आपल्याशी खूप मनमोकळे बोलावे यासाठी किती प्रयत्न केला आपण त्यावेळी! पण तो काही दादच लागू देत नव्हता. मोकळेपणाने वागणे हा त्याचा स्वभावच नव्हता.

लोणावळ्याला चहासाठी गाडी थांबली. बाहेर मस्त पावसाळी वातावरण होते. हलक्या हलक्या सरी मधूनच येत



होत्या. हवेत मस्त गारवा होता. कोणत्याही रसिक माणसाच्या कामभावना अणि प्रेमभावना उसळून याव्यात असेच धुंद वातावरण होते. त्याच्या हातून चहाचा कप घेताना झालेला स्पर्शसुद्धा निखाऱ्यावरची राख फुंकून टाकण्यासाठी पुरेसा होता. त्या अनामिक स्पर्शाची ओढ पुढच्या प्रत्येक भेटीत वाटत राहिली.

गाडीत बसताना मी किती धिटाईने त्याला म्हटले, ''पुढे बसू तुमच्याजवळ?''

तो खिडकीतून बाहेर पाहत संकोचाने म्हणाला, ''बसा की.'' आवडलेल्या माणसाच्या शेजारी बसण्याचेसुद्धा केवढे अप्रूप वाटले होते त्यावेळी!

त्याच्या हाताचे स्पर्श व्हावेत म्हणून खुर्चीच्या किती एका टोकाला बसले होते मी! तो चोरटा स्पर्शदेखील किती सर्वांग शहारून टाकायचा. त्याच्याकडे माझे लक्ष नाही असे दाखवत किती सूक्ष्मपणे न्याहाळत होते मी त्याला. पुणे-मुंबई या प्रवासात तोच एक माझा आवडता खेळ होता. मुंबई येण्यापूर्वीच मी मस्त नाटक केले, माझ्या मोबाईलवर एसएमएस आल्याचं आणि म्हणाले. ''शट्, ही माणसं अशीच असतात. आज भेट होणार नव्हती तर बोलवलं कशाला?'' त्यावर तो शांतपणे म्हणाला, ''जाऊ द्या. उगाच तुम्हाला हेलपाटा

झाला.''

''ही माणसं ना अशीच असतात!'' मी राग आल्याचा खोटेपणाचा आव आणत म्हणाले.

'' तुमच्या नातेवाईकांकडे सोडू का कुठे?'' तो सालसपणे म्हणाला.

''माझे फारसे कोणी नातेवाईक नाहीत. जे एक-दोन आहेत ते जॉब करणारे. ते आज वर्किंग डे असल्यामुळे जागेवर नसणार!''

''मग तुम्ही काय करणार माझी कामं होईपर्यंत?''

''मी येईन तुमच्याबरोबर. फार तर गाडीत बसून राहीन तोपर्यंत.''

तो 'हो' म्हणाला. मला तरी वेगळे काय हवे होते.

मुंबईतला पाऊस सतत किरकिरणाऱ्या पोरासारखा भोकाड पसरून कोसळत होता. या ऑफिसातून त्या ऑफिसात जाताना दोघेही भिजायचो. मी बाहेर उभी राहायचे. तो त्याचे कामे करून यायचा.

दोघेही मस्त भिजलेले, त्या दिवशी एकत्र केलेले दुपारचे जेवण. पहिल्याच भेटीत किती मोकळेपणा होता. तरीही माझ्या भिजलेल्या देहाकडे तो मोकळेपणाने पाहत नव्हता. जेवताना देखील खाली मान घालून जेवत होता.

मुंबईहून निघायला संध्याकाळचे सात वाजले होते. पाऊस वेड्यासारखा कोसळत होता. गाडीच्या बंद काचाचून आत येऊ पाहत होता, 'कभी कभी मेरे दिल में खयाल आता है', 'जिदंगी धूप तुम घना साया' अशी हुरहुर लावणारी गाणी रेकॉर्डवर वाजत होती.

येताना मी आणखी सीटच्या कडेला बसले होते. भिजलेल्या अंगाला त्याचे नकळत होणारे स्पर्श आणखी सुखद वाटत होते. अशा मस्त वातावरणात पुणे येऊच नये असे वाटत होते. बाहेर दाटलेला काळोख, कोसळणारा बेभान पाऊस, रस्त्यावर मोटारींच्या दिव्यांचा होणारा खेळ, गाडीत मस्त गाणी आणि रणजीतसारखी मस्त कंपनी! केवढी नशा चढल्यासारखी वाटत होती या वातावरणाची. त्याचा देह मिठीत घट्ट पकडून ठेवावा असे वाटत होते. पण ते माझे स्वप्नच. तो शांत, निर्विकारपणे गाडी चालवत होता. माझ्या मनात ज्या भावना येताहेत, त्या त्याच्या मनात येत असतील का? असाही विचार माझ्या मनात येत होता. पण माझ्या मनात येताहेत याचाच मला जास्त आनंद वाटत होता.

पुणे आणि घर जसजसे जवळ येत होते तशी मनात


*With Best Compliment From*

# Mayur Paper Corporation

**STATIONERS & PAPER MERCHANTS**

***We are paper suppliers of reputed publishers like Granthali***

23-B, Podar Chambers, S.A. Brelvi Road, Fort, Mumbai-400 001.
e-mail : mayurpapercorp@gmail.com

किती कालवाकालव होत होती. रणजीतबरोबरचा प्रवास संपूच नये असे वाटत होतं. हे कसले आकर्षण, ही कसली ओढ मला त्याच्याकडे खेचत होती माहीत नाही, पण रणजीतने माझे भावविश्व व्यापून टाकले होते. युगायुगांची ओळख असावी तसे! त्याला त्या रात्री 'बाय' करताना आवाज किती जड झाला होता.

घरी आल्यानंतर भिजलेली साडी बदलून बेडरूममध्ये आले. अनय जागाच होता. बाहेरून थंडगार आणि आतून गरम असलेल्या शरीरावर त्याचा हात पडला तेव्हा मनातल्या मनात 'रणजीत' अशीच हाक मी मारली होती. असा भास का होत होता! त्या रात्रीच्या प्रणयक्रीडेत अनयच्या जागी रणजीतच का दिसत होता? या प्रश्नाचे उत्तर त्यावेळी ही सापडले नाही आणि पुन्हा कधीच सापडले नाही. शोधण्याचाही कधी प्रयत्न केला नाही. एक-दोन भेटीतच एखादा माणूस आपल्या भावविश्वाचा ताबा घेतो असे काय होते रणजीतमध्ये समजलेच नाही.

मुंबईला जायचे म्हणजे रणजीतबरोबरच! असे जणू समीकरणच ठरून गेले होते. चर्चेच्या ओघात स्त्री-पुरुष नातेसंबंधाचा विषय काढून मी त्याला अनेकदा छेडण्याचा प्रयत्न केला. पण तो काहीच बोलायचा नाही. वेगाने गाडी चालवणे आणि हळुवार गाणी ऐकणे एवढेच त्याचे विश्व! तेव्हा नुकताच मोबाईल आला होता. त्याला अनेकदा ब्लँक एसएमएस पाठवूनही त्याचे मन जाणून घेण्याचा प्रयत्न केला होता. पण रणजीत काही केल्या दाद देत नव्हता. एकदा धाडसाने त्याला एसएमएस केला ''तू माझ्या स्वप्नात येतोस.''

त्याचे काहीच उत्तर आले नाही. तेव्हापासून तो घरी यायचा बंद झाला. फोन घेणे टाळू लागला. मुंबईला न सांगता जाऊ लागला. त्याचे दर्शन सुद्धा दुर्मिळ झाले. दुसरा कोणताही पुरुष त्याच्या जागी असता तर माझ्यासारखी सुंदर स्त्री प्रेमात पडलीय हे समजल्यानंतर वेडा झाला असता पण रणजीतने मात्र दाद लागू दिली नाही. त्याला शरीरापेक्षाही पार्टनरशिप, बिजनेस महत्त्वाचा होता का? उत्तर सापडलेच नाही. जीन्सची पॅन्ट घालताना प्रत्येक वेळी त्याची आठवण येते. पुणे-मुंबई प्रवास करायचा म्हटले की आजही जीवावर येते. इतरांना मस्त वाटणारी पावसाळी हवा खायला उठते. वेगाने धावणारी गाडी आणि हळुवार गाणी मन पोखरून काढतात. रणजीत हा मी सुरू केलेला अध्याय त्याने अर्ध्यावर संपवला. त्यानंतर अनेकदा भेटी झाल्या. आजही होतात. चारचौघांत असे काही घडल्याचे भाव त्याच्या चेहऱ्यावरही नसताना इतक्या निर्विकारपणे तो माझ्याशी, अनयशी बोलत असतो तेव्हा मला मात्र त्याच्या नजरेला नजर भिडवणे खूप अवघड जाते.

हे सारे आठवताना तिच्या डोळ्यांत आसवे उभी राहिली. आश्रमातल्या घंटेच्या नादाने ती भानावर आली. तिने घड्याळाकडे पाहिले. दुपारचे बारा वाजले होते. जेवणाची वेळ झाली होती. ती उठून आरशासमोर उभी राहिली. तिचा मलूल चेहरा तिलाच पाहावत नव्हता. तिने केसावरून कंगवा फिरवला.

जेवणाच्या रांगेत ताट घेऊन ती उभी राहिली तरी तिचे लक्ष नव्हते. रणजीत नावाच्या आयुष्यातल्या दुसऱ्या अध्यायाच्या आठवणीने तिची अस्वस्थता खूप वाढली होती. खूप अवघड आहे स्वत:च्या आयुष्याचा लेखाजोखा मनात मांडणे आणि तो पुसून टाकणेही.

।।२।।

ती तिच्या खोलीत आली. रणजीतच्या आठवणीने मनावरची खपली काढली होती. रणजीत ही एक भळभळणारी जखमच होती. तिच्या स्त्रीपणाला, अहंतेला सतत दंश करत राहणारी. असा का वागला रणजीत माझ्याशी? त्याने स्वीकारले असते तरी काय देऊ शकलो असतो आपण? अनयची भूक आपण नीट भागवू शकत नाही. रणजीतला आपण न्याय देऊ शकलो असतो का? आपल्या मर्यादांची जाणीव असतानाही आपण इतकी पुढे पावले का टाकली होती? आश्रमाच्या आजूबाजूला असणाऱ्या डोंगरदऱ्यातून उसळणाऱ्या वाऱ्याप्रमाणे तिचे मन सैरभैर झाले होते.

टेबलावर पडलेल्या मोबाईलने एसएमएस आल्याची जाणीव करून दिली. ती भानावर आली.

"Missing u lot" अनयचा एसएमएस होता.

"Same here" तिने यांत्रिकपणे मेसेज टाईप केला. त्यात कसलीच भावना नव्हती.

एसएमएस आला तरी आपल्याला खूप दचकायला होते, तिला जाणवले. त्याला कारण मिहीरचा दोन वर्षांपूर्वी आलेला तो एसएमएस. मलेशियाला जाण्यापूर्वी तिने सर्वच मित्रांना टूरवर जात असल्याचा एसएमएस केला. सर्वांचे हॅपी जर्नीचे एसएमएस आले.

मिहीरचा एसएमएस खूप वेगळा होता.

"Happy Journey to a good player, Godess of innocence, woman of all perfections and mountain of show off."

त्याचा तो एसएमएस काळजाला चिरत गेला  होता. खरे तर परदेशप्रवास म्हणजे किती आनंददायी गोष्ट! पण मिहीरचा  तो एसएमएस त्या आनंदाला एक हळवी किनार लावून गेला.

मिहीर हा आयुष्यातला तिसरा अध्याय. दुसऱ्या अध्यायाची अपूर्णता माहीत असूनही खेळाच्या नादात आपल्याकडून उघडले गेलेले हे नवीन पान.

मिहीर आपल्याला गुड प्लेयर का म्हणाला? गॉडेस ऑफ इनोसन्स का म्हणाला?

खरेच का आपण खेळत राहिलो त्याच्या आयुष्याशी! त्याची भेटही अशीच झालेली एका कविसंमेलनात. आपण त्याच्याकडे पाहून भारावलो की नाही माहीत नाही पण तो मात्र पहिल्याच भेटीत प्रेमात पडलेला. त्याच्या डोळ्यांत ते जाणवत होते. ते मला सुखावणारेही होते. मग सुरू झाला खेळ एसएमएसचा.

तो धाडसी नव्हता. मीच धाडसाने त्याला आव्हानात्मक एसएमएस पाठवला. तो भांबावला. वेडाही झाला असेल कदाचित. त्याचा एसएमएस आला. ''आपल्याला काय म्हणायचंच ते मला समजलं नाही.''

मी शांतपणे एसएमएस केला. ''ही कविता आहे माझी नवी.'' तेव्हापासून एसएमएसचा सिलसिला सुरूच राहिला.

या एसएमएसचे मैत्रीत, घनिष्ठ मैत्रीत आणि भावनिक मैत्रीत रूपांतर कधी झाले ते समजलेच नाही.

तो गुंतला होता. गुंतत चालला होता.

माझ्यासाठी तो एक खेळ होता. रणजीतच्या आठवणीतून बाहेर पडण्याचा.

या खेळासाठी सगळे अनुकूल वातावरण नियती तयार करत होती. आयुष्यात योगायोग किती असावेत. मिहीरचा मित्र पनवेलला अणि माझी बहीण प्राजक्ताही पनवेलला. त्याचा मित्र आणि बहिणीचे मिस्टर हे फॅमिली फ्रेंड असावेत हा देखील विलक्षण योगायोग.

तो पनवेलला येणार हे समजले की मीही बहिणीकडे पनवेलला जायचे. मी पनवेलला आहे हे समजले की तोही आवर्जून यायचा काहीतरी कारणे सांगून!

या नादात अनय आणि मिहीरचीही मैत्री झाली.

पनवेलला असो अथवा पुण्याला कवितांची मैफल जमली की मिहीरच्या कविता प्रभाव पाडून जायच्या. प्रेमकविता तर तो माझ्याकडेच पाहत म्हणायचा. जणू ही कविता माझ्यासाठीच होती. पनवेलला गेल्यानंतर ड्रिंक्स पार्ट्या



व्हायच्या. बहिणीच्या घरातले वातावरण मोकळे असल्यामुळे अनय, मिहीर आणि माझे मेहुणे ड्रिंक्स घेत असताना मी अणि ताईदेखील बाहेर येऊन बसायचो. गप्पांच्या ओघात मिहीर जे काही बोलायचा ते ऐकत राहावे असे वाटायचे. मिहीरच्या 'आर्त' या पहिल्या कवितासंग्रहाचं पुण्यात प्रकाशन झाले तेव्हा त्याचे सूत्रसंचालन मीच केले होते. किती मनापासून...

मिहीरचेही लग्न झालेले होते. एक गोंडस पोरगा त्यालाही होता. तरीही त्याला माझ्याविषयी खूप आकर्षण वाटत होते. त्याच्या प्रत्येक कृतीतून ते जाणवले होते.

कवितेच्या प्रांतात तो एकेक वरची पायरी  चढत होता. त्याचे कौतुक, त्याचे नाव, त्याच्या बातम्या, त्याचे फोटो तसे माझ्याही आकर्षणाचे विषय होतेच. दुसरीकडे खंतही. माझ्याकडे टॅलेंट असूनही मी काही करू शकत नाही याची... सकाळ, दुपार आणि संध्याकाळ एसएमएसला अंत नसायचा. त्याच्या प्रत्येक एसएमएसला मी उत्तर द्यायचे.

अनय त्याच्या कंपनीच्या कामासाठी बऱ्याचदा बाहेरगावीच असायचा अशा वेळी मिहीरचे एसएमएस मला मोठा दिलासा देऊन द्यायचे.

मिहीर ड्रिंक्स पार्टीमध्ये असेल तर त्याचे रात्री बारा बारा वाजेपर्यंत एसएमएस यायचे. मीही प्रत्येक एसएमएस रिप्लाय

करायचे.

एकमेकांचे कौतुक आता कवितांपुरते राहिलेले नव्हते. माझ्या केशभूषेपासून वेषभूषेपर्यंत प्रत्येक गोष्टींचा ठळक उल्लेख त्याच्या एसएमएसमध्ये असायचा. मलाही ते आवडायचे.

पनवेलला दोन दिवसांचे कविसंमेलन होते. त्यातलं एक सत्र खास मिहीरचे होते. खरे तर मी दोन दिवस पनवेलला राहावे असे मिहीरला वाटत होते. मिहीरचे सत्र संपले. ते ऐकून एक दिवस राहून मी पुण्याला परतले. अनय मला न्यायला आला होता. घरी वैदेहीला सासुबाईंकडे ठेवून आले होते. मिहीर कार्यक्रमाच्या गडबडीत असल्यामुळे त्याला न सांगताच मी परतले. त्या दिवशी मिहीरला खूप राग आला. मी त्याला अनेकदा एसएमएस केले. पण त्याने एकाही एसएमएसचे उत्तर दिले नाही. खूप मिनवताऱ्या केल्यानंतर त्याचे उत्तर आले.

मी त्याला विचारले, "What do you think of me."

त्याचे उत्तर आले, ''तुला माहीत आहे. माझ्याकडून वदवून घेऊ नकोस.''

तो प्रामाणिक होता. म्हणाला, ''आपण मैत्री थांबवूया. कारण मी मैत्रीच्या सीमारेषा ओलांडतोय.''

मला ते सहन झाले नाही. हा खेळ विचित्र असला तरी मला तो खेळायचा होता.

मी त्याला म्हणाले, ''मी तुझ्या भावनांचा आदर करते. पण मैत्री तोडणे हा त्याच्यावरचा उपाय नाही.''

खरे तर मी चुकत होते. त्याच्या या प्रकारच्या भावनांचा मी कसा काय आदर करू शकणार होते. पण मला मिहीरला झुलवत ठेवण्यात आणि त्याच्या प्रेमाच्या झुल्यावर झुलत राहण्यात वेगळाच आनंद मिळत होता. तो मला गमावायचा नव्हता.

मिहीर मात्र माझ्यात खूप गुंतत चालला होता. मी मात्र खेळ म्हणून या साऱ्या प्रकाराकडे पाहत होते. कुणाच्या तरी आयुष्याशी आपण खेळतोय याचे मला भानच नव्हते. तो परदेशात गेला, कुठेही गेला की तिथून येताना माझ्यासाठी भेटवस्तू घेऊन यायचा. मीही त्या स्वीकारायचे. मिहीरचा वाढदिवस झाला की, पुढच्या एकदोन दिवसांत मी त्याला माझ्या घरी जेवायला बोलवायचे. तोही यायचा. अनयचा तो मित्र असल्यामुळे दोघांत हे वेगळे नात असतानाही अवघडलेपण यायचे नाही.

मिहीरचा एखादा कोड्यात टाकणारा एसएमएस आला की, माझे त्याला Hmmm एवढेच उत्तर असायचे.

त्याला राग खूप यायचा. भूमिका स्पष्ट असावी असा त्याचा आग्रह असायचा.

'या एसएमएसला काय रूप द्यावे ते समजतच नाही' अशा शब्दात एखादा कोड्यात टाकणारा एसएमएस मी त्याला पाठवत राहायचे. माझ्या या दुटप्पी वागण्याचा त्याला खूप राग यायचा.

त्याच्या ऑफिसात मी कितीतरी वेळा त्याला भेटायला जायचे. त्याच्या बरोबर कॉफी पिताना खूप मजा यायची. जीवनावर भरभरून प्रेम करणारा आणि स्वप्नातच जगणारा होता तो. त्याच्या स्वप्नात तो मला रंगवत होता. गुंतवत होता. मला या साऱ्याची खूप गंमत वाटत होती.

तो जास्त भावनिक होऊन एसएमएस पाठवायला लागला की मी त्याला म्हणायचे, "Be normal". त्याला खूप राग यायचा. एकदा तर त्याने रागारागाने बोलणे सोडून दिले.

मी त्याला सारखे एसएमएस करून पुन्हा गुंतवण्याचा प्रयत्न करीत होते. त्याला अपेक्षित असणाऱ्या कोणत्याही निर्णयाप्रत मी येत नव्हते. कारण मला खेळच खेळायचा होता.

तो प्रसंग अजूनही आठवतो. बऱ्याच दिवसांच्या अबोल्यानंतर मी त्याला भेटायला त्याच्या ऑफिसात गेले.

तो म्हणाला ''माझ्याशी असा खेळ का खेळते आहेस?''

मी म्हणाले ''तू मला नीट समजून घेतले नाहीस?''

तो : ''तुला समजत होतं ना मी कोणत्या नजरेनं तुझ्याकडे पाहतोय? बायकांना तर ती नजर निसर्गाने दिलेली असते. तरीही तू हे सगळं का सहन केलंस?

मी : मी तुझ्याकडे मित्र म्हणून पाहते. मित्रांच्या चांगल्या गुणांकडे पाहावं असं मी मानते.

तो : तू माझ्या अश्लील आणि घाणेरड्या एसएमएसला देखील उत्तर दिलंस.

मी : दिलं नसतं तर जास्त गैरसमज झाले असते.

तो : तू तुझ्या प्रत्येक मित्राशी इतक्याच मोकळेपणाने वागतेस?

मी : हो, अर्थात! मला खूप मित्र आहेत.

माझी लबाडी लपविण्याचा मी प्रयत्न करीत होते.

तो : या साऱ्यात तूही तेवढीच गुन्हेगार आहेस. कारण गुन्हा करणाऱ्याला तू चुकतो आहेस असं तू कधी सांगितले नाहीस. यू आर अल्सो कलप्रिट फ्रेंड?

मी फक्त हसले.

तो प्रांजळपणे म्हणाला, ''मी चुकलो''

मी : जगात हवी असणारी प्रत्येक गोष्ट मिळावी असं वाटलं तरी ती मिळते का? मला देखील सचिन तेंडुलकरला घट्ट मिठी मारावीशी वाटते म्हणून ते शक्य होणार आहेत का?

माझ्याकडे युक्तिवाद होता. पोकळ शब्दांचा मारा. स्वत:च्या भावनांशी प्रतारण करणारा. त्याच्याकडे सच्चाई होती. त्याच्या प्रश्नांची उत्तरे मी देत होते. मी मात्र माझ्या मनात अनुत्तरीतच होते. त्याच्याविषयी मला काहीच वाटत नव्हते तर त्याच्या प्रत्येक चांगल्या, वाईट एसएमएसला मी का उत्तर देत होते? त्याची पाहण्याची नजर काय आहे हे माहीत असतानाही मी त्याच्याशी संबंध का वाढवत राहिले? दोघेही ज्या मार्गाने जात आहोत तो मार्ग योग्य नाही हे माहीत असा नाही मी स्वत: त्यातून बाहेर का पडले नाही? त्यालाही बाहेर काढण्याचा प्रयत्न का केला नाही? मी स्वत:शी एवढी प्रामाणिक होते तर का वाहत गेले त्याच्याबरोबर? अनयासारखा नवरा असताना मैत्रीच्या नावाखाली एखाद्या मित्राच्या इतके जवळ जाणे योग्य होते का? या प्रश्नांची उत्तरे माझ्याकडे नव्हती.

तो भूमिका असणारा, तत्त्वांशी प्रामणिक असणारा होता. माझ्या कोणत्याच आणि कसल्याही वागण्याला पायाच नव्हता. पाया नसलेल्या खोटेपणाच्या इमारती उभ्या करीत होते. अबोला, राग आणि धुसफूस चालूच असायची.

माझ्या अहंतेला दंश करणारा त्याचा एखादा एसएमएस यायचा.

मी त्याला उत्तर पाठवायचे. ''तुला हो म्हणाले नाही म्हणून जळफळाटानं तू हे सगळं बोलतोयस.''

त्यावर त्याचा एसएमएस आला. 'होय म्हणून काय देणार होतीस. काय आहे तुझ्याकडे देण्यासारखं?''

खरेच, काय देणार होते मी मिहीरला. देण्यासारखे काय होते माझ्याकडे! अनयशी प्रेमविवाह करूनही माझे परपुरुषांविषयीचे आकर्षण वाढतच होते. माझे पहिले प्रेम असूनही कुठे मी त्याच्याशी प्रामाणिक राहिले. मिहीर मला good player म्हणाला. काय चुकले त्याचे? godess of innocence म्हणाला. खरंच मी इतकी निष्पाप होते या खेळात? मला सारे कळत असूनही का मी गुंतत आणि गुंतवत होते या खेळात! तो छद्मीपणे म्हणाला, "Woman of all Perfections." खरेच त्याच्यासमोर मी किती अचूक आहे, तत्त्वाची आहे हे पटवण्याचा मी लटका प्रयत्न केला. त्याच्यासमोर वाद विवादात मी जिंकलेली असेन कदाचित. पण माझे मन मला सांगतेय की मी हरले. मला बजावतेय तू खेळ मोडलास. यू आर चिटर! हा भोळा भाबडा गोरागोमटा चेहरा जगाला खूप निष्पाप आणि सात्त्विक वावरतोय. पण त्याच्या आतला एक भयानक चेहरा मला सतत दिसतो. तो जाणीव करून देतो मला माझ्या दुटप्पीपणाची.

मिहीर मला छद्मीपणाने म्हणाला, "You are a very good player."

पण खेळण्यात खिलाडूवृत्ती असावी लागते. ती तरी कुठे आहे माझ्याकडे? दुसऱ्या खेळाडूंशी छद्मीपणाने वागायचे नसते. त्या छद्मीपणाच्या सगळ्या सीमारेषा ओलांडून मी खेळ खेळत राहिले. चांगला खेळाडू म्हणण्याच्या लायकीचीही मी नाही.

या भांडणानंतर मिहीरशी असणारा संपर्क तुटला नव्हे, त्यानेच तो तोडला.

दुसऱ्याच दिवशी मस्त अवकाळी पाऊस आला.

मी मिहीरला एसएमएस केला ''बऱ्याच दिवसांनी पहिल्या पावसामुळे एक कविता सुचलीय. वेळ असेल तर एसएमएस करू का?'

मिहीरचे कसलेच उत्तर आले नाही.

मिहीर कधी कधी गमतीने आणि लाडाने म्हणायचा, ''You are good opportunist. तू संधीसाधू आहेस!''

मिहीर खरेच मी संधिसाधू आहे.

ती स्वत:लाच बजावत होती. तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहत होत्या. ती खोलीच्या बाहेर आली. डोंगररांगांनी वेढलेल्या त्या आश्रमाच्या परिसरातील वातावरण कुंद होतं. आभाळ ढगाळून आलं होतं. ढगाळून आलेलं आभाळ पाहिलं की तिला मिहीरची एसएमएसची आणि त्याच्या कवितांची खूप आठवण यायची. रेंगाळणारा आणि न थांबणारा पाऊस असेल तर तो म्हणायचा, ''प्रियकराला चांदण झुल्यावर तिष्ठत ठेवणाऱ्या, ना होकार ना नकार देणाऱ्या प्रेयसीसारखा छळवादी आहे हा पाऊस.''

मीही तुझ्याशी अशीच वागले रेंगाळणाऱ्या पावसासारखी!

मिहीर, मलाही आता कविता सुचतात. पण ऐकवू कुणाला? आभाळ भरून आले की तू म्हणायचास, भरून येणाऱ्या आभाळासारखे मनही थकून येतं आभाळ थकून आले की जवळच्या माणसांची खूप आठवण येते.

मलाही तुझी खूप आठवण येते. पण आता दोघांमधले अंतर इतकं आहे की ते मिटणे शक्य नाही.

मिहीर, अखेर तूच जिंकलास. मी कसल्याच अर्थाने

तुझ्यात गुंतले नव्हते तर तुझ्याजवळ नसण्याचा इतका त्रास का होतोय मला?

मलेशियाला जाण्यापूर्वी मिहीरच्या आलेल्या शेवटच्या एसएमएसमधले वाक्य होते- "You are mountain of show off."

खरंच मी दिखाऊगिरीचा पर्वत आहे?

आत एक आणि बाहेर एक असे का वागत राहिले मी तुझ्याशी!

या प्रश्नाचे आज तरी माझ्याकडे उत्तर नाही. मिहीर, एवढे मात्र खरेय "I am missing you lot at this moment and every moment of my life."

तिला वाटले मिहीरला फोन करावा, किमान एसएमएस तरी करावा आणि सांगावे, मी चुकले.

पण नको! बंद केलेले कप्पे पुन्हा उघडून नवे ताण नवे तणाव कशासाठी? जो खेळ मोडला तो पुन्हा मांडायचा कशासाठी? मिहीर, तुझे एक बरेय. तू कविता लिहून रिकामा झाला असशील. मोकळा झाला असशील. मी किती काळ घुसमटत राहू?

किती ठामपणाने तू म्हणायचास, ''आपलं आयुष्य म्हणजे इतरांसाठीची अभिप्राय वही नव्हे!'' खरेच तू जगाचा कधीच विचार केला नाहीस! जगत राहिलास स्वतःच्याच मस्तीत आणि तालात!

तुझ्या बोलण्यात एक वाक्य नेहमी यायचे, ''लेखकाला लिहिण्याचा शाप लाभलेला असतो आणि त्या शापातून मुक्त होण्यासाठी त्याला लिहावंच लागतं!''

तुझ्या मनात साचलेलं लिहून एव्हाना तू शापमुक्त झालाही असशील. मी मात्र अस्वस्थ आहे. भळभळणारी जखम घेऊन फिरणाऱ्या अश्वत्थाम्यासारखी! न दिसणारी, न दाखवता येणारी तरीही ठसठसत राहणारी जखम! तिला हुंदका अनावर झाला. ती खूप रडली स्वतःशीच! तिला हलके वाटले.

एकांताच्या अभयारण्यात एकटेपणाने चालणे किती अवघड आहे हे तिला जाणवले!

ढगाळून आलेले आभाळ आता बरसत होते. तिला रणजीत आणि मिहीरचीही आठवण येत होती अनयच्या बरोबरीने!

।।३।।

ती आत आली आणि खोलीत स्वस्थपणे पडून राहिली. आपल्या अंगात कणकण आहे असे तिला वाटत होते. हात मानेजवळ नेत तिने अंदाज घेतला. ताप नसला तरी अंग कोमट होते. आतून तिला कसर आल्यासारखी वाटत होती.

मानेजवळ नेलेला हात तिने पटकन बाजूला काढला. तिचा ताप पाहण्याच्या उद्देशाने लालासाहेबांनी असाच स्पर्श केला होता तिला. तिला स्वतःचीच घृणा वाटली.

लालासाहेब हा ध्यानीमनी नसताना घडलेला आणि संपलेला अध्याय.

पुण्यात येण्यापूर्वी पुण्याजवळच्या त्या छोट्याशा गावात अनयचे काम चालू होते. म्हणून काही काळ अनय कुटुंबासह तिथे राहिला होता. गाव छोटे असले तरी तिथले सांस्कृतिक वातावरण खूप छान होते. लालासाहेबांचे व्यक्तिमत्त्व अतिशय राजबिंडे होते. एखाद्या हिरोसारखे. कुणीही प्रथमदर्शनी प्रेमात पडावे असे. त्यांचे घर सुसंस्कृत होते. त्यांच्या पत्नी विद्याताई उच्च विद्याविभूषित होत्या. दिसायलाही सुंदर. त्या दोघांना पाहिले की, लक्ष्मीनारायणाच्या जोड्याची आठवण यायची. हे कुटुंब गर्भश्रीमंत. राजकारणात स्वतःचे स्थान निर्माण केलेले. या दोघांनाही कला, साहित्य आणि खेळाची खूप आवड होती. गावाची सांस्कृतिक समृद्धी वाढावी यासाठी ते प्रयत्न करीत होते. वैदेही लहान होती. अनय साईटवर गेल्यानंतर फावल्या वेळात काय करायचे म्हणून मीही लालासाहेब आणि विद्याताईंना त्यांच्या सामाजिक कार्यात मदत करायला लागले. माझे परगावी असणारे कॉन्टॅक्स, साहित्य-नाट्य-चित्रपट क्षेत्रातल्या लोकांच्या असणाऱ्या ओळखी यामुळे काही कार्यक्रम असला की माझी त्यांना मदत व्हायची. या ओळखीचे रूपांतर नंतर कौटुंबिक मैत्रीत कधी झाले ते समजलेच नाही.

त्यांनी कोणताही कार्यक्रम आयोजित करायचा असे ठरवले की ते दोघेही प्रथम मला बोलवायचे. मला विचारायचे. नियोजनाची सगळी जबाबदारी माझ्याकडे असायची. त्यामुळे त्या छोट्याशा गावात माझं महत्त्व वाढत चालले होते. लालासाहेब तसे माझ्यापेक्षा पंधरावीस वर्षांनी मोठे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहिल्यानंतर तसे वाटायचे नाही. त्यांची नजर थेट होती. इतक्या उघड्या डोळ्यांनी ते पाहायचे की ते पाहणे सहनच व्हायचे नाही.

त्या छोट्याशा गावात असल्यामुळे आपण करिअर म्हणून काहीच करत नाही याची एक बोचणी मनाला असायची. खूप घुसमटायला व्हायचे आतल्या आत. अशा वेळी लालासाहेब आणि विद्याताईंचा तो छोटासा ग्रुप म्हणजे वाळवंटातले ओॲसिस होते माझ्यासाठी! कार्यक्रम असले की महिनाभर आधी तयारीच्या बैठक व्हायच्या, नंतर कार्यक्रम आणि कार्यक्रम झाल्यानंतर कसा झाला या चर्चेत महिनाभर

निघून जायचा. माझी लालासाहेबांच्या कुटुंबाशी वाढणारी जवळीक अनेकदा चर्चेचा विषय बनायची गावामध्ये. पण त्याचे कधीही काहीही वाटले नाही कारण माझ्या मनातच नव्हते तसे कधी! कार्यक्रमासंदर्भातला काहीही निर्णय घ्यायचा असला की, लालासाहेब थेट मला फोन करायचे. अनयच्या समोर आमचे फोनवर अर्धा अर्धा तास बोलणे व्हायचे. तो बोलायचा काहीच नाही पण त्याची अस्वस्थ नजर खूप काही सांगून जायची. कार्यक्रमाच्या निमित्ताने होणाऱ्या मीटिंगसाठी मी गेले की, हस्तांदोलन करताना ते माझा हात हातात घ्यायचे. त्या हाताची एक वेगळी ऊब जाणवायची. त्या हाताचा स्पर्शच वेगळा जाणवायचा. त्यांच्या बलदंड अशा तळव्याने माझा हात हळूच दाबायचे. विद्याताईंना हे फारसे आवडत नाही हे त्यांचा चेहरा आणि डोळे सांगून जायचे. पण त्या काही बोलायच्या नाहीत. त्यांच्या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी माझ्याइतकी दुसऱ्या कुणाचीही मदत त्यांना त्या तत्परतेने आणि मनःपूर्वक होणे शक्य नव्हते. लालासाहेबांचा तो हस्तांदोलनच्या वेळेसचा स्पर्श मला तरी कुठे आवडायचा मनापासून? पण त्या गावात आघाडीवर असणे, व्यासपीठावर असणे आणि मिरवणे ही माझी मानसिक आणि भावनिक भूक होती. ती भागण्यासाठी अशा छोट्या प्रकारांकडे काणाडोळा करण्याची माझी तयारी होती. कधी कधी माझे मन सांगायचे, कुठेही गेले तरी पुरुष हे असेच असतात. सुंदर स्त्रियांच्या वाट्याला हे प्राक्तनभोग येणारच! दुसरीकडे कुठेही असले तरी हेच घडलेच असते. दुसरीकडे मनातून आनंदही व्हायचा, एवढा राजबिंडा पुरुष, ज्याच्याविषयी आपल्या मैत्रिणी एकांतात खूप बोलतात. चर्चा करतात. ज्याला एवढी देखणी बायको असताना आपले आकर्षण वाटतेय म्हणजे आपणही काही कमी नाही.

अनय पंधरा दिवस मित्रांबरोबर फिरण्यासाठी बाहेर गेला होता. वैदेही आजीकडे चिपळूणला गेली होती सुटीसाठी. कार्यक्रम होता म्हणून मीच तेवढी थांबले होते. इतरही काही कामे होती. त्या दिवशी दुपारीच लालासाहेबांचा फोन आला. ‘‘आज संध्याकाळी सहा वाजता ऑफिसमध्ये या कार्यक्रमा–संदर्भात काही बोलायचंय.’’ ‘‘आज जरा तब्येत नरमगरम आहे. अंगात कणकण आल्यासारखं वाटतंय!’’ मी म्हणाले.

‘‘या हो, दहा मिनिटांचं तर काम आहे. लगेच घरी जाऊन विश्रांती घ्या! हवं तर गाडी पाठवतो.’’

‘‘नाही. गाडीची आवश्यकता नाही. मी येईन आमच्या


**ग्रंथाली मुद्रण सुविधा केंद्र**

नोव्हेंबरमध्ये प्रकाशित होत आहे

# मी मवाली तुमच्या हवाली

**कवी – सुभाषचंद्र मयेकर**

गाडीतून''

''या. मी वाट पाहतोय.''

रविवार असल्यामुळे लालासाहेबांचे ऑफिस शांतच होते. बाहेर एक शिपाई होता. मला सोडल्यानंतर ड्रायव्हरला त्याची कामे करून अर्ध्या एक तासात मी यायला सांगितले. केबीनमध्ये गेल्यानंतर लालासाहेब एकटेच होते. त्यांनी बाहेर असणाऱ्या शिपायाला काहीतरी काम सांगितले. तो गेला. त्यांच्या त्या देखण्या केबीनकडे मी पाहातच राहिले. उत्तम लाकडी फर्निचर, विदेशातून आणलेल्या शोभिवंत वस्तू, कमालीची स्वच्छता. त्या छोट्याशा गावात इतके सुंदर ऑफिस आहे असं कुणी म्हटले असते तर त्याला लोकांनी वेड्यातच काढले असते.

''लालासाहेब, खूप सुंदर सजवलीय तुम्ही तुमची केबीन.''

''या ना.'' असे म्हणत लालासाहेब उठले. त्यांनी त्यांची ती केबीन, परदेशातून आणलेली प्रत्येक वस्तू दाखवली. मी त्यांच्या मागोमाग केबीन पाहत फिरत होते.

त्या केबीनला जोडून एक मीटिंग हॉल होता. तो त्यांनी दाखवला.

स्वतःचे रूप पाहता येईल एवढी स्वच्छता सर्वत्र!

नंतर ते मला त्यांच्या अँटीचेंबरकडे घेऊन गेले. दरवाजा ढकलताच आम्ही दोघेही आत गेलो. तो दरवाजा आपोआप बंद झाला. त्या ॲण्टीचेंबरमध्ये एक सुंदर सोफा होता. ''बसा ना!'' म्हणत लालासाहेब समोरच्या खुर्चीवर बसले.

मीही समोरच्या खुर्चीवर बसले.

''ताप कमी झाला का?'' लालासाहेबांनी विचारले आणि विचारता विचारता माझ्या मानेजवळ स्वतःचा हात ठेवला. त्यांच्या स्पर्शाने सर्वांग थरारले.

''लालासाहेब, काय हे? कुणी येईल?'' मी म्हणाले.

''कुणीही येणारच नाही याची सगळी चोख व्यवस्था केलीय.''

मीही शांत झाले. त्या बलदंड बाहुपाशात एक वेगळीच ऊर्जा जाणवत होती. झोपेतही पैशाचे आकडे आणि कॉन्ट्रॅक्टच्या बिलांची चर्चा करणाऱ्या अनयच्या सहवासातही मनापासून फार काही मिळत नव्हतं. शरीरसुख हा उपचाराचाच एक भाग होता. इच्छा नसतानाही अनेकदा तो ओरबाडत राहायचा. लालासाहेबांच्या सहवासात सरीवर सरी येत गेल्या. वर्षानुवर्षाची लागलेली तहान भागली असे वाटले. हे घडले एकदाच अपघाताने. माझ्या मनात काहीही नसतानाही, या प्रकारच्या सुखाची इच्छा नसतानाही!

त्यांच्या ऑफिसातून बाहेर पडताना खूप अपराध्यासारखे वाटले. अनयशी प्रतारणा करतो आहोत, त्याचा विश्वासघात करतो आहोत असेही वाटले. पण शांत झालेली 'गात्रं' हा अपराध आहे, गुन्हा आहे असे मानायला मात्र तयार नव्हती. त्या रात्री आलेली शांत झोप अजूनही आठवते. नंतरच्या आयुष्यात मात्र हा प्रसंग नैतिक-अनैतिकेचे प्रश्न उभे करीत छळत राहिला.

ती भानावर आली. तिला आठवले स्वामींनी पहिल्याच दिवशी सांगितले होते. आयुष्य हा खेळ आहे. खेळात प्रत्येकक्षणी जी उत्कंठावर्धक अनिश्चितता असते तीच जीवनातही असते. खेळात सगळ्याच गोष्टी मनाप्रमाणे घडत नाहीत. तरीही तो खेळ खेळत राहायचे असते!

आपल्याही आयुष्याचा खेळच झाला. अनयला आपण स्वतःहून निवडले. त्याच्याशी आपण प्रामाणिक राहू शकलो नाही. त्याला न्याय देऊ शकलो नाही. रणजीत आपल्याला हवाहवासा वाटत होता तो मिळाला नाही. मिहीरला मी हवीशी वाटत होते. त्याच्याशी मी छद्मीपणाने खेळत राहिले. तोही माझा होऊ शकला नाही. ध्यानीमनी नसताना लालासाहेब आयुष्यात आले आणि काही क्षणांपुरते का होईना मी त्यांना सर्वस्व दिले. मिहीर कधी कधी म्हणायचा, बायकोचे सर्वस्व म्हणजे एका बोटाच्या एका पेराएवढे असते. त्या सर्वस्वाच्या आधारे त्या खेळवत राहतात पुरुषांना! पटतेय आज त्याचे ते बोलणे.

या खेळाला अंत नाही. निर्णय नाही. विजयही नाही आणि पराजयही नाही.

त्या खेळाच्या आठवणी म्हणून जखमा वागवायच्या आयुष्यभर एवढेच आपल्या हाती असते!

आश्रमातली घंटा वाजली तशी ती पुन्हा भानावर आली.

शांतपणाने तिची पावले पडत राहिली मनःशांती केंद्राच्या दिशेने.

**प्रा. मिलिंद जोशी**
बी १/१२, रविराज टेरेस,
सुखसागर नगर, कात्रज, पुणे ४६
भ्रमणध्वनी : ९८५०२७०९२३
joshi.milind 23@gmail.com

## कवितेचींयाने

### पुन्हा सज्ज होतो...

खोल जखमा होतात मनाला ज्यांच्यामुळे
नको आता संबंधच त्यांचा म्हणून
दूर ढकलू पाहतो त्यांना, आपल्या विश्वातून

पण तसं होत नसतं
छोटं असतं जग आपलं
त्यांना तरी ढकलायचं कुठे आणि
आपण तरी जाणार कुठे...

जखमा आपल्याला होत असतात
करणाऱ्यांना मिळत असतो आनंद असुरी
कसं रडवतोय बेट्यांना, म्हणून मिशा कुरवाळतात
आणि पुन्हा पुन्हा आनंद लुटण्यासाठी,
सुरू करतात मानभावीपणा
हसू पाहतात, 'सॉरी सॉरी' म्हणतात
'पुन्हा नाहीच होणार असं',
असं आश्वासनही देतात!

आपण बावळटच, पुन्हा फसतो त्या भुलाव्याला,
पुन्हा सज्ज होतो, ...नव्या जखमांसाठी

**उषा मेहता**
उद्यम, १६-२७,
शिवाजी पार्क, दादर (पश्चिम),
मुंबई - ४०० ०२८

### गझल

फुलांसारखे नाजुक असते वार फुलांचे
कधीच मानले असते मी आभार फुलांचे

एक एक पाकळी करी कुर्निसात त्यांना
ओठ तुझे वाटतात मनसबदार फुलांचे

मने होऊ द्या फुलांसारखी नाजुक आधी
मग केव्हाही येईल हो सरकार फुलांचे!

एकेका स्पर्शाची लीला कमाल आहे
स्पर्श तुझे वाटती जणू अवतार फुलांचे

तुझ्याकडे आहे ताबा अवघ्या ताऱ्यांचा
तुझ्याकडे शाबुत सारे अधिकार फुलांचे

रंग, गंध पाकळ्यांत सारे गुंतून जाती
कोठे कोणाला कळते मन फार फुलांचे

मीही माझा प्रपंच आता सोडत नाही
तूही टाकू नको तुझे घरदार फुलांचे

म्हणून होते हवा गुलाबी अमुच्या नावे
तिला समजते, आम्ही म्हणजे यार फुलांचे

झुळुक एकही नाही माझ्यापास तरीही
अजून येती निरोप वारंवार फुलांचे

हाच अर्थ ताऱ्यांच्या लुकलुकण्याचा आहे
हे अंबर टिपते आहे उद्गार फुलांचे

**चंद्रशेखर सानेकर**
सुयोग सोसायटी, सी-१२,
मुलुंड (पूर्व), मुंबई ४०००८१
भ्रमणध्वनी : ९८२०१६६२४३

## तुमचं काय जातं?

तळहातावरच्या फोडासारखं जपलेलं
आमच्या दारचं हे चिमणं पाखरू
कधी गेलं फसवून, नकळत उडून
आम्हीच चालवलं तिला हातात बोट धरून...
कुळ बुडवलं कार्टीनं परस्पर लग्न करून
खालच्या जातीतल्या पोराशी प्रेम करून
...अन् म्हणे आता आहे मी दोन जिवांची बाई
सासरच्या माणसांची किती सांगू भलाई?
सुखात नांदतेय मी माझ्या झोपड्यात
चिंब भिजून गेलेय नवऱ्याच्या प्रेमात...

– आईबापाला खडे बोल सुनावणारी ही पोर
आमच्या जगण्यालाच लावून गेली घोर
जातपंचायतीनं तोंडात शेण घातलं
वाळीत टाकलं, या पोरीनं नाक कापलं

काय करावं आता अब्रू गेली पार
रोजच्या रोज जगण्याचा झाला कहार

गोड गोड बोलून आणली की माहेराला
खुळी पोर! फसली आमच्या नाटकाला
खाऊपिऊ घालून झोपू दिलं तिला
–आणि एकाच फटक्यात पाठवलं देवाच्या घरला!

इज्जत आम्हाला प्राणाहून प्यारी
काय गेलं तुमचं? मारली जर अब्रूसाठी पोरी?

पोरीच्याच पायी होतं ना जगणं खुटलं?
तुम्हाला काय करायचं, आमचं खटलं?

**शंकुतला मुळ्ये**
५ विजय निवास, भास्कर कॉलनी,
नौपाडा, ठाणे (प) ४०० ६०२
भ्रमणध्वनी : ९८६९६१९९०६

## काही हजार कोटी

भूखंड मोठमोठे सस्त्या दरात गेले
काही हजार कोटी त्यांच्या घशात गेले!

सहकार चांगला पण, झाली तिथे घराणी
उद्योग साखरेचे त्यांच्या घरात गेले!

कॉलेज शिक्षणाचा बाजार मांडलेला
एकेक 'सीट'मागे लाखो खिशात गेले!

सरकारही तयांचे अन् यंत्रणा तयांची
अहवाल चौकश्यांचे बघ बासनात गेले!

झाकावयास अब्रू काही न राहिलेले
अंतिम वस्त्र त्यांचे न्यायालयात गेले!

सामान्य माणसाला वाली न राहिलेला
गाळात अडकलेले, आता तळात गेले!

**सदानंद डबीर**
१ बी/२०६ विमानदर्शन
जीवा महाले मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९
भ्रमणध्वनी : ९८१९१७८४२०

## फक्त ते

कानाला यंत्र लावून
पुटपुटताहेत ते काहीतरी
अखंड
सर्वच
सर्वदूर
सतत
सर्वत्र

कोणाशी हे एवढे
काय बोलताहेत?

बोलताहेत तरी का ते?
ऐकताहेत तरी का ते?
परस्परांचे काही
या बोलण्या–बोलण्यात
विसरून गेले आहे ते की
आपण आपल्याशी काही
बोलतच नाही
ऐकतच नाही स्वत:चे काही

हे अज्ञाता यांना उचलून
अशा जागी ने
जिथे ते
फक्त ते असतील

**श्रीपाद भालचंद्र जोशी**
१०५, संकल्प सहनिवास,
४०, खरे टाउन, धरमपेठ,
नागपूर–४४००१०
भ्रमणध्वनी : ९९६०४९३६२२

## फिदा स्वत:वर

आता माझ्यातच मी रमते
गाणं खुषीचं दिलखुलास गाते
दुसरं कुणी ना अध्यातमध्यात
माझ्याच मी खुशाल पडते प्रेमात
माझीच मला प्यारी संगत
एकटीची जेवणाची अंगतपंगत
माझा हात हाती घेऊन
येते मजेत जगभर हिंडून
माझेच मी करते लाड
माझ्या मिठीत झोपेत गाढ
स्वत:च्या दिठीत दिठी मिसळून
खुदकन हसते
स्वत:वर बेहद्द फिदा होऊन
मस्तीत राहते
नार्सिससला दिली हूल
त्याच्यापुढे माझे पाऊल
मी स्वयंनिर्भर नार
फिदा स्वत:वर, स्वत:वर

**सरोज जोशी**
८१/७ आझाद, पेस्तम सागर रोड नं. १
पोस्ट-टिळकनगर, चेंबूर, मुंबई-४०० ०८९
भ्रमणध्वनी ९८३३०५४१५७

## रान

रान बोलावते आहे पाय ओढतात मागे
तिथे माझ्या चाहुलीने पान पान झाले जागे

तिथे झाडेही रांगडी वडालाही नाही पार
रानफुले पसरली नाही वाढीला आकार
गावं मोकळं मोकळं असं वाटतंय फार
गुलमोहोर घरचा तरी खेचतोय मागे

जीव लावतील मला सारे रानातले जीव
नदी नाले डोंगरही तिथे आहेत सजीव
येई गोड शिरशिरी जीवघेणी हुरहुर
हे डोईचे ओझे कसे ठेवू की हो मागे

पक्षी उडती रानभर गुरे मोकाट चरती
पौर्णिमेची रोषणाई होते रोजच वरती
झाडाखाली पसरावं, फुलं घ्यावी अंगावर
पण ओढतात मागे हे रेशमाचे धागे

वाटे रानात शिरावं असं धावत धावत
रानचा गंध मात्र नाही उरात मावत
असं धावलं की रान नवसालाही पावतं
मग शेकडो शहरं बघा राहतात मागे

**रवींद्र भगवते 'गौतम'**
६०२, अनिल अपार्टमेंट,
पालखी सोसायटीजवळ, मिठागर क्रॉस रोड,
मुलुंड (पूर्व), मुंबई ४०००८१
भ्रमणध्वनी : ९८३३१५७७७१

## काळतोंडे स्वप्न

या शहरानं मला गिळून टाकायला
आज उणीपुरी तीन दशकं लोटली

शहराचा श्वास
आता तोच माझाही श्वास झालाय

बावरलो मी जेव्हा आलो होतो शहरात
सावरलो तेव्हा माझे हात नव्हते राहिले माझे
अख्खी रात्र त्यांच्या मलमपट्टीतच जायची निघून!

ज्याच्या भरोशावर मी आलो होतो इथवर
ते काळतोंडे स्वप्न
केव्हाच निघून गेलंय वेशांतर करून

**अशोक कोतवाल**
'संदर्भ' ४८/१/५४, ब्लॉक क्र. ६,
शिवा अपार्टमेंटजवळ, शिव कॉलनी,
जळगाव ४२५००२
भ्रमणध्वनी : ९८५०११७५३९

## गळाभेट

सांग पोरी तुला
देऊ तरी काय
मरणाची साय
ओंजळीत
तुझ्यासाठी नाही
दवडीत काही
देऊ कशी ग्वाही
जगण्याची
अन्नाविणा तुझे
पदरात हाल
कुणी असे साल
दिले आम्हा
देता आला फक्त
जन्म माझ्या पोटी
तुला मात्र रोटी
भेटली ना
आम्हावर कुणी
असा केला दंश
राख झाला वंश
झोपडीत
कुणी नाही आलं
धावूनिया पोरी
टाळावया वारी
वैकुंठाची
शेवटची घेऊ
चल गळाभेट
शोधू मग वाट
स्मशानाची

**गणेश एस. भाकरे**
श्री निवास, वार्ड क्र. ८,
जटाशंकर नगर, छिंदवाडा रोड-सावनेर,
सावनेर, जि. नागपूर ४४१ १०७
भ्रमणध्वनी : ९९२३८२९७१७

## पावसानं...

हल्ली पाऊस
नपूसक झाल्यासारखा वाटतोय...

मातीच्या डोळ्यांतील अतृप्त तृष्णा बघून
जुळणातल्या नागासारखं
धुंद होता येत नाही पावसाला
मृगातल्या रानमातीचा सुगंध
रानोमाळ पसरला तरी...

उलट, धगधगीत वैराग्याची राख
अंगावर पांघरून
अरण्यात भटकणाऱ्या अस्वस्थ गोसाव्यासारखी
पावसाला लहर येते
संन्यस्त होण्याची...
तेव्हा मातीच्या आयुष्याचं वाळवंट
आतल्या आत कसं पेटत असेल
याची कल्पना करवत नाही

म्हणून पावसानं असं नपंसूक होऊ नये
बहकलेल्या पोरा-टोरासारखे
सारेच कायदे धाब्यावर बसवू नये
उतावीळ तर मुळीच होऊ नये
आणि वेळी अवेळी ओकू नये
राजकारणी स्टाइल्सचे वांझ उन्माद...
पावसानं आपलं 'पाऊसपण' जपावं

**प्रा. कैलास देवराम सलादे**
मु.पो. वडनेर भैरव, ता. चांदवड
जि. नाशिक ४२३ १११
भ्रमणध्वनी : ९९२१५२८४२१

## ओलावा

नदीनाला आटलेला
कसा संपला ओलावा
काठावर खडकांना
कुणी करावा गिलावा

दूरदेशी गेला कसा
माझा पाखरांचा थवा
विस्कटल्या घरट्यात
खिन्न उदास पारवा।

झाला उद्ध्वस्त पिंपळ
रंग विटला गारवा
मारुतीच्या पारावर
नाही तेवणारा दिवा।

माझं भंगलं गोकुळ
कुठं सुदाम्या शोधावा
कशी हरवली राधा
कुठं हरवला पावा।

पंढरीच्या पांडुरंगा
ये मुक्कामी माझ्या गावा
तुझ्या सोबतीला आण
माझ्या पाखरांचा थवा।

**रमेश पवार**
१४ माधवनगर, अमळनेर
भ्रमणध्वनी : ९४२१५१९०५१

## गावकुसावरची आग

काल रात्री
गावकुसावरच्या झोपड्यांना
अचानक आग लागली
धडधडून

सकाळी
वर्तमानपत्रात रंगीबेरंगी बातमी
फोटोसकट

दुपारी माझा लहान मुलगा
वर्तमानपत्राच्या कागदी होड्या बनवतोय
अन् एकेक करून सोडतोय
अंगणात साचलेल्या पाण्यात

अंगणात पाणी
पाण्यात होड्या
अन् होड्यांत
काल पेटलेल्या झोपड्या

आता थोड्याच वेळात
पाण्यात सोडलेल्या ह्या होड्या
ओल्या होतील, भिजतील आतून ...बाहेरून
गावकुसावरची आग मात्र
अजूनही विझलेली नाही!

**प्रशांत असनारे**
'अभिनंदन'
मुकर्जी बंगल्याजवळ, राऊतवाडी,
अकोला
भ्रमणध्वनी : ९७६३७१४३०४

## घाव

कंदिलाच्या खाली
अंधाराचे व्रण
तसे घरपण काळोखले...

देवळाच्या तळी
शापीत दगडे
रिते रिते घडे इमानाचे...

चढत चालला
क्षितिजाचा भाव
नभ सोसे घाव पृथ्वीसंगे...

**बबन सराडकर**
हनुमान मंदिराजवळ,
पद्मसौरभ कॉलनी,
शेगाव रोड, अमरावती-४४४६०४
भ्रमणध्वनी : ९९७०९०९७०९

## हाराकिरी

माझ्या राजी-नाराजीचा
प्रश्नच नव्हता
ओली माती तुडवित तो
रांगडा पुरुष पाऊल उमटविणार आहे
लाघववेल्हाळ धरित्रीवर
लग्नामुळे त्याला समाजाकडून नैतिक
अन् राजसत्तेकडून कायदेशीर
अधिकार प्राप्त झाला आहे
एखाद्या नीट नजरही न आलेल्या
बालकाच्या हाती, कागद-पेन यावा
अन् त्याने यदृच्छया वाटेल तशा
रेघोट्या ओढून कागदाचं
कोरेपण नासवून टाकावं
तसं माझ्या देहाचं होणं
आता अटळ आहे.
या हाराकिरीला सामोरं जाताना
घसा कोरडा पडणार आहे
देह घामेजून जाणार आहे
अन् मन हातापायात बेड्या
ठोकलेल्या कैद्यासारखं
हतबल, हताश होणार आहे.
ही हाराकिरी स्वीकारण्याला आता
कोणताही पर्याय उरलेला नाही
माझ्यासारखा जीवघेणा प्रसंग
अनुभवलेल्या घरातील बायांचीही
या प्रकाराला संमती आहे.
नव्हे सक्रिय भागीदारी आहे
हे केवढं दुर्दैव!

**गोविंद मोतलग**
सावंतवाडी, रणपिसे नगर,
अकोला-४४४००५
भ्रमणध्वनी : ९४२०८३९५७५

## पत्रं

पुन्हा पुन्हा पारायणं करीत,
पेटीच्या तळाशी जपून ठेवावीत अशी
आताशा येत नाहीत पत्रे, पूर्वीसारखी!
परवा परवापर्यंत खूप हाताळलीत पत्रे
कुणाकुणाच्या हिमालयाएवढ्या सुखाची,
कुणाची आकाश कोसळलेल्या दु:खाची,
कुणाची मनमोकळी, प्राजक्त फुलागत कोमल
गुलाबी हृदयं अंथरलेली!
भावाची, बहिणीची, माहेराची, मामाची,
सीमेवर लढणाऱ्या सैनिकांची, कितीतरी!
कुठे गेलीत ही पत्रे?
आता इवल्याशा टेलिफोनच्या तारेत
नि मोबाईलच्या पेटिकेत
मावलेली दिसते सुखाची मलमल
आणि वेदनेची फरफटसुद्धा,
एसएमएसच्या रूपात अवघडून बसलेली
ती कुठे ठेवावी जपून?

माणसांच्या सुखालाच लागली ओहोटी की,
टेलिफोनच्या तारेतून, मोबाईलच्या चपट्या पेटिकेतून
झरझर गळणारं दु:खच
झालेय गतिमान?
कळत नाही

आताशा, पत्रे येत नाहीत
पूर्वीसारखी.

**सदानंद सिनगारे**
जिजामाता मार्ग, खामगाव
जि. बुलडाणा
भ्रमणध्वनी : ९४२२५६८१२७

## काय सांगू सये तुला

काय सांगू सये तुला या पावसाची गत
पायी नायी भुई आन नायी डोईवर छत

फुटलं आभाळ जसा कोपलाय देव
पाखरांच्या चोचीमधी दान कसं द्यावं?
कडाडली वीज मला नाय तिचं भ्याव
कोपीतल्या तान्ह्याकडं मन माझं धावं
जात होते मजुरीला पाटलाच्या मळ्यात... ।।१।।

माझ्या फाटक्या संसाराचा आभाळात झुले झुला
डोई धरून लुगडं समधा पावूस लोटला
गाली बघून आसव हाथ धन्यानं धरला
घडीभर सये मला लई पावूस भावला
दिसू लागली डोळ्यांत गहाणवटीची ग नथ...।।२।।

माझ्या लेकरांनी बाई उभा पावूस झेलला
इवल्याशा मुठीमधी सारा चंद्र ग झाकला
पाटी पेन्सिलीच्यासाठी हाथ वटीत घातला
कर्जदार यम सये उभा दारात ठाकला
मंग बांधली कनात आमि वरच्या नभात... ।।३।।

**भगवान निळे**
२३/३२ विजयनगरी अनेक्स, घोडबंदर रोड,
वाघबीळ नाका, ठाणे (प) ४०० ६०७
भ्रमणध्वनी : ९७०२१४६८८०

## प्रिय आई...!

प्रिय आई...!
मी तुझ्या गर्भात सध्या सुरक्षित आहे
तुझ्या मायेची उबदार उब मिळते आहे
तुझ्या रक्तामांसाचा गोळा माझ्या रूपानं आकार घेत आहे
मला बाहेरचं जग दाखव
बाहेरचं विश्व कसं असेल? निसर्गाचे रंगरूप दाखव
मला उत्सुकता आहे
नऊ महिने, नऊ दिवस मी थांबेन

प्रिय आई,
माझी विनंती आहे
तू माझं सांगणं ऐक, तुला, बाबांना, आजी, आजोबांना सांग
त्यांनाही मी डोळा भरून पाहीन
तुमच्या सगळ्यातून आदर्श संस्कारातून मी घडेन, वाढेन.
मला जगायचं आहे
आई तुझी शपथ मला खरंच जगायचं आहे

मला तुझ्या गर्भातच मारू नये
माझी हत्या करू नये
इथल्या पुरुषप्रधान संस्कृतीत
मी शिकून मोठी होईन, ताठ मानेनं जगेन
मी वंशाचा दिवा होईन

प्रिय आई,
मी तुझं अवघं भावविश्व होऊन राहीन
तुझ्या आयुष्यात लखलखणारी चांदणी होईन
सांग ना, तुझ्या हातून चिऊ-माऊचा घास भरवताना
किती मज्जा येईल, मला खूप आवडेल

प्रिय आई,
मला जर भीती वाटली तर...
तुझ्या पदरामागे दडेन आणि तू मला उचलून माझे मुके घेशील
छातीशी घेशील, होय ना?
म्हणून म्हणतेय आयेऽऽऽ
मला जगात येऊ दे!

**बबन लोंढे**
२५/१ सम्राट अशोकनगर को.ऑप.हौ सोसा.
शेल कॉलनी रोड, चेंबूर, मुंबई-४०००७१

## आगळे अवसान माझे

आगळे अवसान माझे सावल्यांना भीत होते
पावलांना सावराया कोणते मज हात होते

दु:ख माझे झोंबणारे दाटले माझ्या उराशी
पापणीतील थेंब माझ्या मज दिलासा देत होते

दावती रे वाकुल्या मज रक्तवर्णी सापळे
खेळ हे तर जीवघेणे हारण्याचे बेत होते

हे नवे आवेश वेडे माणसांना भावणारे
आंधळ्या दुनियेतले ते रानटी संकेत होते

माजले ते साव सारे आव मोठा आणणारे
बहरणारे पावसाळे तेच सारे खात होते

**रमेश सावंत**
वडाळा, मुंबई
भ्रमणध्वनी : ९८२१२६२७६७

# ‘किचन पोएम्स’: एक आस्वाद्य रुचिपालट

**डॉ. शुभांगी पातुरकर**

*समस्त स्त्री-पुरुषांना स्मरणरंजनाचा आणि पुन:प्रत्ययाचा आनंद देण्यास सज्ज असलेली ही कविता मराठमोळ्या शब्दकळेचे लेणे लेऊन ओघवत्या मुक्तछंदातून अवतरली आहे. स्त्रीप्रधान आशयसूत्रामुळे या भाषेतील बायकी ढंगही सुखवणारा आहे. तिच्यातील नाट्यमयता, दृश्यात्मकता विस्मयकारक आहे. कोणत्याही इझमच्या फारसे आहारी न जाता, टोकाची भूमिका न गाठता एक प्रकारचा वैचारिक समतोल या कवितांनी साधलेला आहे. आणि तो आजच्या स्त्रीवादी कवितांच्या काळात विशेष म्हणावा लागेल.*

‘किचन पोएम्स्’ हा अनुवादित मराठी काव्यसंग्रह म्हणजे मराठी काव्यप्रांतात आलेली एक नवी, ताजी, मन प्रसन्न करणारी छानशी झुळूक आहे. भाषा कोणतीही असो, भावनांची भाषा सर्वत्र सारखीच असते. म्हणूनच हा काव्यसंग्रह अनुवादित न वाटता ही अशाप्रकारे स्वतंत्र मराठी साहित्यकृती वाटते. याचे श्रेय जितके तिच्या मूळ कवयित्री धीरूबेन पटेल यांच्या प्रतिभेला द्यावे लागते तितकेच ते तिच्या मराठी अनुवादिका उषा मेहता यांच्या सहजसुलभ अनुवादालाही आहे.

धीरूबेन पटेल हे नाव भारतीय साहित्य वर्तुळात आदराने उच्चारले जाते. ‘किचन पोएम्स्’ नुकत्याच जर्मन भाषेत अनुवादित झाल्या आहेत. अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय पातळीवरही आपली नाममुद्रा ठसठशीतपणे उमटवलेल्या आणि साहित्य अकादमीसारखा भारतीय पातळीवरील मानाचा पुरस्कार लाभलेल्या धीरूबेन ज्येष्ठ आणि प्रतिथयश लेखिका गणल्या जातात. अशा प्रतिभासंपन्न गुजराथी भाषक कवयित्रीच्या इंग्रजी भाषेतील शंभर कवितांचा संग्रह ‘किचन पोएम्स्’ म्हणजे काव्यरसिकांसाठी मेजवानी आहे. त्यांनी या कविता आपल्या गुजराथी या मातृभाषेतून न लिहिता इंग्रजीतून लिहिल्या हे एका परीने बरेच झाले, कारण त्यामुळे त्यांचा आस्वाद अगुजराथी अशा सर्व स्तरातील इंग्रजीच्या जाणकार रसिकांना घेता येणे शक्य झाले. आणि आता कवयित्री उषा मेहता यांनी त्या मराठीत अनुवादित केल्यामुळे मराठी काव्यरसिकांनाही या रसपूर्ण मेजवानीचा आस्वाद घेता येणे शक्य झाले आहे.

खरे तर बहुतांश स्त्रियांच्या आयुष्यात स्वयंपाकघराचे अस्तित्व नुसतेच त्यांच्या केंद्रस्थानी नसते तर परंपरेने ते स्त्रीचे सत्ताकेंद्रही राहिलेले असते. धीरूबेनच्या अस्सल रसिक नजरेने आणि जातिवंत प्रतिभेने हा विषय आपलासा केला आणि बात बन गयी! साध्याही विषयात दडलेला मोठा आशय एखाद्या सिद्धहस्ताला गवसला की त्याच्या मिडास स्पर्शाने त्याचे सोनेच होऊन जाते. काही विषय विशिष्ट कलावंतांसाठी राखीव असतात हेच खरे!

इथे दृष्टिकोनाचे नाविन्य तर आहेच पण हे परिचित जग

धीरूबेन यांनी ज्या जाणीवसंपन्न आत्मीयतेने,आणि रसमय संवेदनशीलतेने टिपले आहे त्याची खरी किमया आहे. मग कविता हा निव्वळ शाब्दिक फुलोरा उरतच नाही. तो प्रत्ययात्मक आस्वादच होऊन जातो. एखाद्या सुग्रणीने एखादा पदार्थ सहजच करावा आणि तो चविष्ट व्हावा अशी सहजता या सगळ्या अनुवादित कवितांमध्ये भरून राहिली आहे. आणि म्हणूनच,

*यातून घेतलं थोडं काही नि घेतलं थोडंसं त्यातूनही*
*खरं तर तंद्रीत होते विचारांच्या....*
*....तर त्यांनी कृती विचारली,*
*पदार्थाचं नाव विचारलं*
*मी बाई काय सांगणार...*
*बस्, थोडंसं हे अन् थोडंसं ते....*

असा उत्तम कलाकृती सहजगत्या निर्माण झाल्याचा भास निर्माण करणारा 'किचन पोएम्स् 'चा निरासक्त भाव तिच्या या मराठी अनुवादातही भरून राहिला आहे.

स्वयंपाक आणि स्वयंपाकघर हे एक निमित्त आहे. ते एक परिप्रेक्ष आहे. त्या परिप्रेक्षातून दिसणारे हे जीवनदर्शन आहे, मुख्यत: स्त्रीजीवनदर्शन आहे. त्यात बहिरंगाबरोबर स्त्रीचे आंतरिक जीवनही आलेले आहे. म्हणूनच त्या अनुषंगाने तिच्या विविध अनुभवांची, संवेदनांची, नात्यांची रमणीय गुंफण त्यात आहे. तिच्या भावजीवनाशी निगडित अशा विविध रंगच्छटांचा हा काव्यमय गोफ आहे. तिचे जीवन व्यापून टाकणाऱ्या वैविध्यपूर्ण घटनाप्रसंगांचा सप्तरंगी आविष्कार आहे. स्त्री मनाचा एक संपूर्ण स्पेक्ट्रमच या निमित्ताने हळुवारपणे उलगडला आहे.

'किचन पोएम्स्' म्हणजे जरी असे स्त्रीजीवनदर्शन असले तरी रूढ अर्थाने ही कविता स्त्रीवादी नाही. त्यातून स्त्रीजाणिवा प्रकट झाल्या असल्या तरी. मुख्य म्हणजे इथे कोणताही पक्ष, झेंडा, रंग नाही. आहे ते स्त्रीच्या दैनंदिन जीवनातील नेहमीच्या परिचित बाबींवरील निरीक्षण, भावदर्शन आणि मतप्रदर्शन. तेही हसतखेळत, गंमत घेत-देत, जाता जाता केलेले. मुख्य म्हणजे या सगळ्याला एक खास हलका फुलका, नर्मविनोदी, मिश्कील टच आहे.आणि तो फार लोभस आहे. फूल फुलावे तशी कविता सहज उमलून आलेली आहे. उदाहरणार्थ, तयार डबाबंद पदार्थ हे गृहिणीचा वेळ वाचवतात हे खरे. पण त्यामुळे विशिष्ट पदार्थ बनवण्याचे तिच्या हातचे कौशल्य, ते करण्यातून तिला मिळणारा आनंद आणि समाधान या रम्य गोष्टी वजा होतात. अशी प्रकारची भावरम्यता त्यांच्या या साध्या विषयावरील कवितेला मोल मिळवून देते.

या संग्रहातील कविता या मालिका रूपातील नसून स्वतंत्र आहेत हे खरे. मात्र त्यातील काही कवितांमधून एक कालसुसंगत सूत्र गोवत तिचा सगळा जीवनप्रवास रेखाटता येतो.अजाण परकरी बालिकेपासून सुजाण प्रौढेपयतचा स्त्रीजीवनाचा प्रवास, तिच्या निरनिराळ्या अवस्था, तिच्या आयुष्यातील विविध टप्पे आणि तिचे विविध नातेसंबंध असा एक मोठा पट या अशाप्रकारच्या कवितांनी कवेत घेतला आहे. अर्थात स्त्रीजीवनातील अवस्थांतराचा हा निव्वळ पद्यरूपातील आढावा नाही वा रुक्ष लेखाजोखा नाही. तर इथे जिवंत, स्पंदनशील असा रसरसता जीवनानुभव आहे. एका कवितेत लहानपणीची मैत्रिणीकडील स्वयंपाकघराची आणि तिच्या आईने केलेल्या पदार्थाची एक रम्य आठवण आहे.

*आम्ही तिच्या घरी गेलो,*
*साधंसं छोटंसं घर*
*घराच्या मध्यभागी स्वयंपाकघर,*
*सगळं कसं आनंदी,आणि हसरं,*
*आई काहीतरी करण्यात गुंतली होती....*
*डोळ्यांत एक चमक तिच्या नि गाल जरासे लाल झालेले*
*किणकिणत्या आवाजात खोटंखोटं रागावली आम्हांला*
*मग ठेवलं पुढ्यात काहीतरी ताजंताजं खायला*
*अर्थात चहाही आलाच*

पुढे वाढीच्या वयात भूक अनावर झाल्याने अपरात्री स्वयंपाकघरावर टाकलेला छापा आणि त्यावेळच्या स्वयंपाकघराचे गूढगहिरे रूप आहे. यथावकाश प्रेमात पडल्यावर स्वप्नीच्या राजकुमाराने विचारलेला, स्वयंपाक येतो ना तुला? हा वरकरणी हसत हसत विचारलेला प्रश्न आणि त्याबरोबर उडालेली भंबेरी आहे. याशिवाय आपल्या स्वयंपाकघरात आवडत्या पाहुण्यांची सुद्धा लुडबूड नको असणारी गृहिणी, मुलाबाळांच्या सहलीसाठी तऱ्हातऱ्हांचे पदार्थ करून दमलेली आई, भाजीवाल्याशी घासाघीस करून भाजी कमी भावात मिळवण्याचा पराक्रम करणारी व त्यामुळे आनंदून जाणारी संसारदक्ष गृहिणी आहे.आपल्या छोटुकल्याला मधल्या वेळच्या डब्यासाठी रोज नवा वेगळा खाऊ देणारी वात्सल्यमय आई, रांगत्या बाळाला स्पेशल फूड करून देणारी, त्याच्याशी बोबडे बोलत त्याला भरवणारी आईही आहे. मुलाचे लग्न होऊन घरात सुनबाई आल्यानंतर आपल्या स्वतंत्र अशा स्वयंपाकघरातील आपला मालकी हक्क संपुष्टात आला की काय, या कल्पनेने आपल्या स्वयंपाकघराच्या अधिसत्तेत तिला वाटा न देणारी सासूही आहे. मोठ्या लेकाचे वाढत्या वयात शिगोशिग भरलेली

भांडी रिकामी करणे आणि नंतर त्याच्या चवीबाबतच्या तक्रारी कौतुकाने सांगणारी प्रेमळ आई, वयात आलेल्या लेकीचे डाएटिंगचे वाढते फॅड समजून घेणारी समंजस माता, घरातल्या आजारी व्यक्तीसाठी काळजीपूर्वक पथ्याचे खाणे बनवणारी मायाळू आई, लाडक्या लेकीच्या मैत्रिणींनी सुट्टीत स्वयंपाकघरावर केलेला हल्ला आणि नंतरचा पसारा न आवरातच त्यांनी काढलेला पळ कौतुकाने सांगणारी आई... अशी घरगुती नात्यांत गुरफटलेल्या स्त्रीरूपांची, तिच्या विविध मूडस्ची आणि तिच्या जीवनाची अनेक सुखचित्रे 'किचन पोएम्स' काढते.

या कवितांमधून काही भावचित्रे, क्षणचित्रेही बंदिस्त झाली आहेत.त्यातून संस्कृतिदर्शनही आहे. सण-वार, परंपरापालन, रीतरिवाज या स्त्रीजीवनाशी निगडित बाबीही त्यातून सहजीच आल्या आहेत. एका कवितेत गुजराथी समाजात असलेल्या बहिणीने भावाच्या सुखसमृद्धीसाठी करायची पौष पौर्णिमेच्या व्रताची गोष्ट आहे. या व्रताची ही छोटीशी रीत कवितेत गुंफतांना बहीणभावांचे सुंदर नाते, परकरी वयाच्या बहिणीचा वयानुरूप असणारा निर्व्याज भाव, भावाने तिची केलेली मिश्किल थट्टा, आणि शेवटी उपास सोडायची दिलेली निर्मळ परवानगी, या सगळ्यातून प्रकटणारे नाट्य फार खेळकरपणे व्यक्त झाले आहे. यात असलेली संवादात्मकताही फार रंगत आणणारी आहे. कथा, नाट्य, व्यक्तिरेखा, प्रसंग, संवाद असे सगळे इथे निव्वळ काही ओळीतून प्रकटले आहे. ही भाषिक ताकद सर्वच कवितांतून कमीअधिक प्रमाणात प्रकटली आहे. कधी मंद निखाऱ्यात घातलेल्या कणसांच्या खरपूस वासाने घमघमलेले स्वयंपाकघर आहे. पण त्यात चिल्ल्यापिल्लयांचा गोड गोंगाट आणि त्यांचे लुकलुकणारे डोळे नाहीत, मला आधी, मला आधी म्हणत पुढे सरसावणारे हात नाहीत म्हणून वाटणारी खंत आहे. कधी सुट्टीत इटालियन, मेक्सिकन, चायनीज असे सगळ्या प्रकारचे जेवण जेवल्यानंतर घरच्या साध्या आमटी भाताच्या चवीची थोरवी ओघवत्या शैलीत आली आहे. कधी शेतावर काम करणाऱ्या नवऱ्यासाठी शिदोरी घेऊन जाणारी नवोढा आहे. या निमित्ताने त्या तरुण जोडप्याला चौकसखोर नजरांचा पहारा चुकवत एकमेकांना घास भरवायला मिळणारी संधी आहे. कधी शेतात साजरा होणारा उंधियोदिन आहे. त्यानिमित्ताने जमलेल्या सगळ्यांचा मोकळ्या आकाशाखाली झालेला संवाद, त्यांच्या रंगलेल्या गप्पागाणी यांच्यासह साजरा होणारा अन्नब्रह्माचा उत्सव आहे. कधी हिवाळी पौर्णिमेला हंगामातील पहिल्या साळीच्या कांडलेल्या, दुधात भिजवलेल्या, चांदण्यासारख्या शुभ्र पोह्यांच्या चवीच्या आठवणी आहेत. त्यावेळी रंगलेली गपपाष्टवां आहेत.कधी घरातले सगळे गच्चीवर पतंगाच्या काटाकाटीत गर्क असताना थोड्या थोड्या वेळाने त्यांना सुंदर चवीचे गरमागरम पदार्थ करून पाठवणारी हौशी गृहिणी आहे. या सगळ्यांना असणारे अस्सल भारतीय मूल्य आणि त्यांचे संस्कृतीशी असलेले घट्ट नाते पाहता या सगळ्या कवितांना आपल्याही आठवणींचे स्मृतीरम्य संदर्भ मिळत राहतात आणि कविता अधिकाधिक आपली वाटू लागते. अशी ही लोभस सांस्कृतिक क्षणचित्रे कवितेला खऱ्या अर्थाने काव्यमयतेची डूब देतात. कुटुंबसंस्थेत, नातेसंबंधात आणि समाजपरंपरेत रमलेली, त्यात आकंठ बुडालेली देशीयता या टवटवीत कवितांमधून भेटत राहते, जी अलिकडील कवितांतून जवळजवळ अदृश्यच झालेली आहे.

स्वयंपाकघर हे इतर खोल्यांप्रमाणे सामान्य नाही तर विशेष आहे याची जाणीव देणाऱ्या यातील काही कविता खास आहेत.

*स्वयंपाकघर,*
*साऱ्या घराचा मूलाधार,....*
*....ज्याच्याभोवती निर्माण होतो समाज*
*समाज म्हणजे, सुसंस्कारांचं अधिष्ठान*
*सुसंस्कारांमुळेच निर्माण होते एक प्रबळ संस्कृती*
*संस्कृतीमुळे समाजविकास*
*आम्हांला अत्यंत अभिमान असतो आमच्या संस्कृतीचा...*

स्वयंपाकघराचे हे माहात्म्य आणि स्थान आपण आज जवळजवळ विसरून गेलो आहोत. तसेच स्वयंपाक हे उरकून टाकायचे काम नसून ती एक पवित्र बाब आहे याचाही आज विसर पडलेला आहे.त्या अन्नाचा ते शिजवणाऱ्या व्यक्तीच्या मन:स्थितीशी फार जवळचा संबंध असतो. म्हणून तो नेहमी शुद्ध भावाने करायचा असतो याची जाणीवही इथे आलेली आहे. केलेला स्वयंपाक आजूबाजूच्या पशूपक्ष्यांना, देवदेवतांना, अभ्यागतांना अर्पण केल्याशिवाय ग्रहण न करण्याची परिसरप्रेमी, मानवतावादी आणि कृतज्ञ रीत कधी काळी आपले पूर्वज पाळीत होते याचे स्मरण या कवितां आपल्याला करून देतात. प्रियजनांना आठवत केलेला स्वयंपाक पक्ष्यांना, प्राण्यांना, माणसांना विन्रमपणे वाढला की तो प्रियजनांपर्यंत पोचणारच ही पारंपरिक धारणेतून आलेली श्रद्धाही इथे आलेली आहे. स्वयंपाकघरातील स्त्री ही साक्षात अन्नपूर्णारूपाने वावरते, सगळ्या कुटुंबाची काळजी घेते, सांभाळ करते हा भावही यात आलेला आहे. सर्वात

महत्त्वाचे म्हणजे नेहमीच्या मापाऐवजी सव्वा पटीच्या बेताने सामग्री घेतली म्हणजे जसा प्रसाद सिद्ध होतो तसाच कोणताही पदार्थ उत्तम होण्यासाठी नुसती सामग्री महत्त्वाची नसून त्यासाठी मनात काठोकाठ प्रेम असले पाहिजे असे ही कविता म्हणते.




यातील काही कविता रूढ अर्थाने स्त्रीवादी म्हणवल्या नाहीत तरी एक व्यक्ती म्हणून असलेले स्वातंत्र्य आपले आपणच जपायचे आहे याचे भान देणाऱ्या आहेत. कुटुंब या परिसंस्थेत राहून, समाजव्यवस्थेची पारंपरिक घडी विस्कटू न देता, पिढ्यांन्पिढ्या चालत आलेल्या आणि शतकानुशतके जपलेल्या लोकधारणांचे सामाजिक मोल जाणत चौकट तर सांभाळायची आहे मात्र फक्त स्वत:वर अन्याय होऊ न देण्याची, 'स्व'चे मोल राखण्याची खबरदारी घ्यायची आहे याचे भान अशा काही कविता देतात.

*मात्र हुकूम नाही करायचे तुम्ही मला*
*सगळ्यांनी एकत्र राहायचं आपण*
*प्रगती करायची आपआपल्या क्षेत्रात*

असा यांचा सूर आहे.

कोणत्याही इझमच्या फारसे आहारी न जाता, टोकाची भूमिका न गाठता एक प्रकारचा वैचारिक समतोल या कवितांनी साधलेला आहे. आणि तो आजच्या स्त्रीवादी कवितांच्या काळात विशेष म्हणावा लागेल. समानतेच्या या युगात पुरुषाच्या खांद्याला खांदा भिडवून वावरतांना तिचे स्त्रीत्व कधी फुलतेही पण बऱ्याचदा ते कोमेजतेही. रोजच्या संसारातील मीठमोहऱ्यांपासून सतराशेसाठ बारीकसारीक गोष्टी लक्षात ठेवता ठेवता बऱ्याचदा तिची स्वप्ने विरून गेलेली असतात. बाईच्या जातीला एकाच वेळी बायको, गृहिणी, माताही व्हावे लागते आणि तिला पुन्हा संशोधक, वैज्ञानिक, साहित्यिक किंवा मग शल्यविशारद व्हायचे आहे. आणि तिथेही उत्कृष्ट असायचे आहे.यामुळे कधी तिला स्वयंपाकघर हा एकप्रकारचा तुरूंगच वाटतो. मग तो कितीही उजेड असलेला, प्रशस्त आणि छान असला तरी! म्हणूनच एका कवितेत एकाकी स्वयंपाकघराला निळेशार पडदे लावण्याचा तिचा मनोदय बोलून दाखवला गेला आहे. मग या पडद्यावर ती...

पांढरे पक्षी चितारणार आहे त्यांच्यावर पंख फैलावलेले...

असे हे पांढरे पक्षी वाऱ्याच्या झुळुकीसरशी पंख फडफडतील आणि पडदे जीर्णशीर्ण होऊन नाहीसे होईपर्यंत तिची सोबत करतील अशी तिची भावना आहे. आजच्या अनेक आधुनिक, सुशिक्षित, पुरोगामी विचारांच्या स्त्रियांना दैनंदिन घरकाम हे कंटाळवाणे तसेच घरात अडकवणारे वाटते ही वस्तुस्थिती आहे. स्वयंपाकघर सांभाळणारी घरगुती गृहिणी म्हणजे बावळट बाई असाही एक साधारण समज असतो. एका कवितेत या कल्पनेला छेद दिला गेला आहे.

*तर महाशय,*
*गैरसमज आहे तो तुमचा*
*मला अगदी व्यवस्थित जाणीव असते,*
*माझ्या जगाभोवती*
*उलटसुलट वाहणाऱ्या नि उसळणाऱ्याही प्रवाहांची*

ही कविता परंपरागत स्त्रीमनाची आणि तिच्या आधुनिक विचारांची गाणी तर गातेच पण त्याच स्त्रीमनाच्या एका आणखी वेगळ्या पैलूचा परामर्शही घेताना दिसते. तो म्हणजे पुरुषजातीच्या जन्मजात असणाऱ्या भ्रमरवृत्तीवर तिने केलेली सरळ टीका.

*पण कधी कधी संभ्रमात पडते मी*
*फक्त अन्नाच्या ओढीनं येणाऱ्याला*
*दार उघडावं की नाही घराचं...?*
*की सरळ सांगावं शांतपणे,*
*चालता हो बाबा इथून...*

रसरशीत जीवनसन्मुखता आणि आनंदी मनमोकळेपणा हा या कवितांचा वृत्तीविशेष आहे. खिडकीच्या कट्ट्यावर ठेवलेल्या तुळशीजवळ असलेल्या कोथिंबीर, पुदिना, कढिलिंब, या स्वयंपाकाशी निगडित असलेल्या वनस्पतींच्या कुंड्यांच्या योगाने स्वयंपाकाबरोबरच तिचे भावजीवनही रसरशीत, स्वादिष्ट होऊन जाते. कधी स्वयंपाकघर म्हणजे रंगदंगल होऊन जाते. रंगीबेरंगी भाज्या तिची नजरबंदीच करून टाकतात.कधी पहिली हिरवी कैरी नजरेला पडते आणि मनात उसळतो एक स्वादसागर. या कैरीबाईच्या हिरवाईने उजळून निघालेले स्वयंपाकघर, तिच्या दशावतारापेक्षा अधिक

अवतारात अवतरणाऱ्या पाककृती, त्यांचे आंबट-गोड स्वाद मनात फेर धरू लागतात. कधी प्रवासातून घरी परतल्यावर पातेली, सतेली, तवे, कढया, डबे, बरण्या, ताटं नि वाट्या या तिच्या आवडीच्या नेहमीच्या वस्तूंना जिथल्या तिथं बघून तिला होणारा आनंद आहे.

समस्त स्त्री-पुरुषांना स्मरणरंजनाचा आणि पुन: प्रत्ययाचा आनंद देण्यास सज्ज असलेली ही कविता मराठमोळ्या शब्दकळेचे लेणे लेऊन ओघवत्या मुक्तछंदातून अवतरली आहे. स्त्रीप्रधान आशयसूत्रामुळे या भाषेतील बायकी ढंगही सुखवणारा आहे. तिच्यातील नाट्यमयता, दृश्यात्मकता विस्मयकारक आहे.

*सुरेख, पायघोळ घागरा,*
*त्यावर लालनिळ्याकाळ्या रंगाचं*
*भरगच्च भरतकाम*
*आणि त्या नक्षीत बसवलेले छोटे छोटे चमचमणारे आरसे*
*प्रत्येक पावलाला तो घागरा*
*आनंदानं फुलारतोय!*
*चालत होती भरभर, तरी*
*ऐट होती चालण्यात*
*माहीत होतं ना,*
*कुणीतरी वाट पाहतंय अधीर होऊन,*
*दुपारच्या जेवणासाठी...*
*ताजं ताकही आहे बरोबर*
*नंतर पिण्यासाठी...*

यातील रंगसंवेदन तर मनोहर आहेच, पण इथली दृश्यात्मकता आणि नाट्यही रसिलं आहे. नवपरिणित जोडप्यातील नर्मशृंगाराचं सूचक वर्णन इथे फार नजाकतीने आले आहे.

एखाद्या कसबी चित्रकाराने मोजक्याच रेषांनी एखादे चित्र साधावे तशा प्रकारची मोजक्याच शब्दांनी रंगवलेली आठवणींची क्षणचित्रेही इथे फार बहारदार उतरली आहेत.

*केवढी मजा असायची तेव्हा*
*स्वयंपाकघरातच बसायचं जमिनीवर मांडी ठोकून*
*हसायचं, खिदळायचं, बडबड करायची....*
*....जेवण संपेपर्यंत चालत असायची ही धमाल*
*धूसर होत चालल्या आहेत आठवणी...*
*तरीही लपेटून आहेत, आयुष्याला*
*तलम धाग्यांच्या कोळ्याच्या जाळ्यासारख्या*
*आईचं ते हसू*
*अजून रेंगाळत राहिलंय त्या विरळ धाग्यांमध्ये*

कौटुंबिक सुखाच्या या जरतारी आठवणीत गुंफलेला एक संयत उदास सूर फार गहिरा आहे. तो मन व्याकूळ करून टाकतो. कधी ही भाषा नर्म विनोदी आणि मिश्कीलही होते.

*नाही आवडत मला कुणी माझ्या स्वयंपाकघरात आलेलं*
*ती मदतही नको नि ती शेरेबाजीही नको*
*नकोतच कुणाच्या धुंडाळणाऱ्या नजरा*
*....माझं स्वयंपाकघर फक्त माझ्यासाठी*
*मी आटपत असताना*
*नो घुसखोरी....इन माय किचन ...*

इथला हलकाफुलका मूड, त्याचा नर्म रागरंग, त्याचा विनोदी सूर इंग्रजीमिश्रित शब्दरचनेने किती छान तोलून धरला आहे. शिवाय त्यामुळे तिची प्रत्ययकारिता वाढली आहे हे आणखी विशेष. 'किचन पोएम्स्' मधे अधूनमधून येणारी अशी भाषिक खिचडी फार मस्त आहे.

उंधियोदिन म्हणजे हिवाळी वातावरणाला, मोकळ्या आभाळाखालच्या शेतातील रंगगंधनादाला मनातल्या उत्फुल्लतेने दिलेली सलामीच. ही आनंदपर्वणी तशाच खेळकर शब्दशैलीतून जीवनानंद घेऊन कवितारूपाने अवतरली आहे.

सगळेजण बसलेले असतात भोवती गोल धरून
गप्पा मारतात, गाणी म्हणतात
यथावकाश हंडी पुकारते,
होऽ गयाऽ ऽ!
उतरवायची हंडी विस्तवावरून
थांबायचं, जराशी निवेपर्यंत
एकदा का उघडलं झाकण
ऐकायला येणारच सर्वांचा आ; हाहाऽ!

उंधियोदिनाच्या निमित्ताने जमलेल्या मंडळीचा आनंद इथे त्यांच्या उल्हासाच्या चित्कारांसह, उद्गारांसह तर प्रकटला आहेच शिवाय उद्गारवाचक चिन्हांचा सुयोग्य वापर करीत, तो सगळा माहोल अधिक स्पष्टपणे, ठळक करीत थेटपणे या भाषेने आपल्यापर्यंत पोचवला आहे. कधी हिंदी उद्गार तर कधी इंग्रजी.अर्थप्रकटीकरणाची ती एक खास ढब. तिच्या योगाने या कवितेचा माहोल कसा अनौपचारिक, मनमोकळा झाला आहे.अशा अनेक कविता आपापल्या पद्धतीने विशेष ढंगदार झाल्या आहेत.

*कधी तिच्यातून प्रकटणारं रंगसंवेदन कवितेलाही रंगीबेरंगी करून सोडतं.*
*आज माझं स्वयंपाकघर म्हणजे*

*रंगारंगांची दंगल!*
*हिरवीगार कोथिंबीर, पालक-मेथीच्या जुड्या आणि*
*शेवग्याच्या शेंगा*
*यांच्या पार्श्वपडद्यावर*
*वांगी, दुधी, मुळा आणि जांभळा कोबी*
*लालेलाल टोमॅटो, हिरव्यापिवळ्या ढब्बू मिरच्या*
*गाजरंदेखील लालकेशरी रचलेली!....*

या सगळ्या रंगांच्या कोलाजमुळे अशी काही नजरबंदी होते की तिची तंद्रीच लागून जाते. मग स्वयंपाकाचाही विसर पडतो.

डोंगरी मुलुखातील स्वयंपाकघरापासून शाही मुदपाकखान्यापर्यंत, आणि अंतराळातील स्वयंपाकघरापासून जगन्नाथाच्या भोजनालयापयतच्या स्वयंपाकघरांची विविधता ही कविता कवेत घेते. मुलांच्या वसतिगृहातील स्वयंपाकघर, सामुदायिक स्वयंपाकघर तसेच पवित्र तीर्थक्षेत्री लाखो भाविकांसाठी भोजन बनवणारी, एका रात्रीत उभारलेली स्वयंपाकघरंही इथे आलीत. प्रसादाच्या पवित्र भोजनापासून शिळासप्तमीच्या शिळ्या अन्नापर्यंतच्या अन्नब्रह्माचा परामर्श ही कविता घेते. सुजातेच्या अन्नामुळे मरणासन्न बुद्धाला जीवदान मिळाले आणि आपल्याला बुद्ध.. ही अन्नाची महतीही ती सांगते.

आणखी एका अविस्मरणीय कवितेचा उल्लेख अपरिहार्य आहे. ती लहानशी कविता, किती आणि काय सांगून जाते... पाहा.

*आमटीभाजीत मीठ घालताना*
*आठवण येते त्या कृश म्हाताऱ्याची*
*किती भराभर चालायचा तो*
*अनुयायांच्या पुढे असायचा बराच*

*सर्वांसाठी त्यानं जे सोसलं*
*त्याची परिणती...*
*त्याची हत्या करण्यात आली*
*तोच होता तो त्यानं दांडीयात्रा काढली होती*
*सामान्य माणसाचा*
*सागरलाटांपर्यंत पोचून, मीठ मिळविण्याचा हक्क*
*अबाधित राहावा यासाठी त्यानं लाठीमार सोसला होता*
*कारावास भोगला होता.*

एकूण आजच्या काव्यक्षेत्रातील सगळ्या गद्य रुक्षतेवर ही कविता चांगला उतारा देते आणि रुचिपालटही घडवते. पदार्थांचा दरवळ खिडकी ओलांडून बाहेर जावा आणि त्याने खवय्यांना साद घालावी तसे इथे झाले आहे. आशयाच्या बाबतीत तर त्या स्वयंपाकघराचा उंबरठा ओलांडून बाहेरच्या जगात कुठल्याकुठे गेल्या आहेतच पण भाषिक खिडकी उघडूनही त्या मराठी रसिकांच्या मनात या संग्रहाच्या निमित्ताने डोकावत आहेत.

अखेरीस विचार अनुवादाचा. मुळात कविता हा प्रकार फसवा असतो. हा आकृतिबंध दिसतो लवचिक पण असतो आडमुठा. साधला तर ठीक, नाही तर तिच्यापुढे शरणागती पत्करावीच लागते. इथे मात्र सुदैवाने तसे झाले नाही. मुळात अनुवाद म्हणजे भाषांतर नव्हे. वेगळ्या भाषेतून प्रकटलेल्या मूळ कलाकृतीतील मर्म समजून घेऊन, आधी ते आपलेसे करून,स्वत:मध्ये मुरवून मग पुन्हा आपल्या मातृभाषेतून त्याची पुनर्निर्मिती करावी लागते. एकवेळ नवनिर्मिती सोपी पण असे अनुवादाचे पुनर्निर्मितीचे काम कठीण. मात्र स्वत: उत्तम कवयित्री असणाऱ्या उषा मेहता यांनी ही कामगिरी उत्तम रीतीने पार पाडली आहे. कविता हा धीरूबेन यांच्याप्रमाणेच त्यांचाही जिव्हाळ्याचा आणि प्रत्ययाचा विषय असल्याने हा अनुवादही कवितापणाला साजेसा झाला आहे..

मूळ इंग्रजी 'किचन पोएम्स्'चे प्रस्तावनाकार, रॉयटरचे संपादक पीटर डी ओनील यांनी आपल्या प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे अनुभवाचा केवढा तरी खजिना धीरूबेन यांच्या शब्दात लपलेला आहे. तो मराठी रसिकांसाठी आता या संग्रहाच्या निमित्ताने खुला झाला आहे. त्यांनीच म्हटल्याप्रमाणे या शंभर कविता म्हणजे स्वयंपाकघर आणि त्यात तयार होणाऱ्या अन्नब्रह्माचा उत्सवच आहे. मूळ इंग्रजी 'किचन पोएम्स'चे प्रकाशक आणि विख्यात गुजराती साहित्यिक सुरेश दलाल यांनी मलपृष्ठावर म्हटल्याप्रमाणे या कवितांमधील युनिव्हर्सल अपीलमुळे काव्यजगतासाठी ही अनमोल भेट असणार आहे हे नि:संशय. अशा या कवितासंग्रहाचे प्रकाशन 'मौज'ने त्यांच्या नावलौकिकाला साजेशा दर्जाने केले आहे. चित्रकार सतीश भावसार यांचे मुखपृष्ठही कल्पक आहे. हा सरस रुचिपालट मराठी रसिकांना आस्वाद्य ठरेल. त्याचे ते मन:पूर्वक स्वागतच करतील. धीरूबेन पटेल आणि उषा मेहता यांना त्याबद्दल धन्यवाद द्यायला हवेत.

**डॉ. शुभांगी पातुरकर**
डी ९, स्प्रिंग फ्लॉवर्स सोसायटी,
पंचवटी, पाषाण, पुणे-४११००८
भ्रमणध्वनी : ९८७०३११५३४
shubhangipaturkar@gmail.com

# आम्ही गातो, नाचतो....

**शुभदा पटवर्धन**

माणसानं वाटेल तसं वागून निसर्गाचा तोल बिघडवला की त्याचे परिणाम मात्र प्राणी, पक्षी आणि झाडं यांना भोगावे लागतात. मग कधीतरी माणूस एकदम जागा होतो. जैवविविधता कमी होते आहे, प्रजाती नष्ट होत आहेत, याचा त्याला साक्षात्कार होतो. मग तो हे सगळं वाचवायच्या मागे लागतो. त्यासाठी कुठल्या कुठल्या योजनांची आखणी करतो. 'अमुक डे', 'तमुक डे' सुरु करतो. मोठमोठे कार्यक्रम घेतो. सेलेब्रिटींना हाताशी धरतो. पर्यावरण जतन-संवर्धनाबाबतीत जे पोकळ आणि भोंगळ प्रचार आणि प्रसार चाललेले आहेत, त्याच्या अशा अनेक सुरस आणि चमत्कारिक कथा, प्रसंग सांगता येतील आणि त्यातून छान करमणूकही होईल, पण जे साध्य व्हायचं ते होणार नाही...

एखादी गोष्ट सहजी मिळत असते, तोपर्यंत माणसाला त्याची कदर नसते. काही कारणवशात जेव्हा तिच्या अस्तित्वालाच धक्का पोचतो, तेव्हा त्याचे डोळे खाडकन उघडतात आणि मग लढा सुरू होतो तिला वाचवण्यासाठी. माणसानं ही वृत्ती आतापर्यंत अनेक वेळा सिद्ध केली आहे. अर्थात ही जाग वेळीच आली, वेळीच प्रयत्न सुरू झाले तर बरं, नाही तर ती गोष्ट हातातून जाण्याचीही शक्यता असते. चित्याच्या उदाहरणावरून माणूस त्याही थराला जाऊ शकतो, हे सिद्ध झालं आहे. चित्यासारखा प्राणी जे आपलं वैभव होतं, शान होती, ती आपल्या हातातून निसटेपर्यंत जाग येऊ नये, याला काय म्हणायचं? चित्ता हे एक नजरेत आलेलं ढळढळीत, बोचरं उदाहरण आहे. नजरेपलीकडे कितीतरी झाडं, पक्षी, प्राणी कालौघात नष्ट झाले आहेत. त्यांची कुठे दखलही घेतली गेली नाही. आज या मार्गावर अनेक प्राणी आहेत. वाघ, माळढोक, चिमण्या, झाडांच्या अनेक प्रजाती... यादी वाढवू तेवढी वाढेल. या प्राण्यांना आणि वृक्षांना नामशेष होण्याच्या मार्गावर आणून सोडलं ते माणसानंच. त्यांच्या राहण्याच्या जागांवर घाला घातला. बेसुमार शिकारी केल्या. औषधी उपयोगाच्या नावावर अनेक प्राण्यांना आणि वृक्षांना यमसदनाला धाडलं. आज एखाद्या वृक्षाच्या औषधी गुणांबाबत माहिती लगेच कर्णोपकर्णी होऊन त्या झाडाच्या मुळावरच येऊ शकते.

वास्तविक एखादी जात पूर्णत: नष्ट होणे, ही काही एका रात्रीत घडणारी गोष्ट नाही. त्याची सुरुवात होऊन पूर्णत्वाला जाईपर्यंत बराच काळ उलटून गेलेला असतो. बऱ्याच उलथापालथी झालेल्या असतात. ही प्रक्रिया स्लो पॉयझनिंगसारखी आहे. तिचा दृश्य परिणाम आरंभी कमी असला तरी त्यात भविष्यात काय होणार आहे, याची चाहूल नक्कीच असते. या चाहुलीलाच समजून घेणं, भविष्याचा अंदाज घेणं, त्यासाठी धोरणात्मक योजना आखणं, शिस्तबद्ध पावलं उचलणं, या पायऱ्या चढत गेलं तर परिस्थिती आटोक्यात येऊ शकते. परिस्थिती कधी कशी बदलेल, नियतीच्या पावलांची दिशा कधी बदलेल, याचा कधीच अंदाज देता येत नाही. ही अनिश्चितता

या विश्वात सर्वत्र व्यापून राहिली आहे. या अनिश्चिततेचा वेध घेतच आपण पुढे जात असतो आणि हा प्रवास कान, नाक, डोळे उघडे ठेवून केला तर हे बदल लक्षात येत राहतात. बदल लक्षात आल्यानंतर त्यांच्याकडे काणाडोळा न करता त्याबाबतीत जागरूकपणे पावलं उचलली तर आणि तरच परिस्थिती आटोक्यात येण्याची शक्यता असते. आपल्याला सुधारण्याची संधी मिळत जाते. अन्यथा प्रश्न गंभीर रूप धारण करतात. घराला किंवा इमारतीला तडा गेलाय हे लक्षात आल्यानंतर आपण भराभरा सूत्रं हलवतो. त्या त्या विषयातले तंत्रज्ञ येतात. सखोल पाहणी केली जाते. निर्णय घेतले जातात. त्यासाठी आवश्यक तो पैसा उभा केला जातो आणि युद्धपातळीवर दुरुस्तीचं काम केलं जातं. कारण या गोष्टीत चालढकल केली तर ते आपल्याच अंगाशी येतं, हे आपल्याला माहीत असतं. आज आपल्याला भेडसावणारे पाणी, वीज या बाबतीतले सगळे प्रश्नही पुढे मागे अक्राळविक्राळ रूप धारण करतील, याकडे मात्र दुर्लक्ष केलं जातंय. किंवा ज्या गांभीर्यानं या प्रश्नांचा विचार केला जायला हवाय तितकं ते दिसत नाही.

जे हातातून निसटून चाललं आहे, ती खरं तर माणसाच्याच कर्माची फळं आहेत. गेली कित्येक वर्षं माणूस सातत्यानं निसर्गाच्या विरोधात जाण्याचा वसा न उतता न मातता पाळत आला आहे. याचा परिणाम काय होऊ शकतो, हे आपल्याला माहीत होतं. एक बरं आहे, समाजात सगळ्यांनीच दूरदृष्टीशी फारकत घेतलेली नाही. जागरूक असलेले नागरिक या बाबतीतल्या भीषण परिणामांची कल्पना वेळीच समाजाला देण्याचा प्रयत्न सातत्यानं करत असतात. पण भविष्यातील भीषण वास्तवाची वेळीच दखल घेईल तर तो माणूस कसला? आपल्याला प्रत्यक्ष झळ लागत नाही, प्रकरण अगदी गळ्याशी येऊन ठेपत नाही, तोपर्यंत त्या प्रश्नाकडे लक्षच द्यायचं नाही, हा मानवी स्वभाव आहे. जेव्हा डोळे उघडतात तेव्हा प्रश्न सोडवणं फार अवघड होऊन बसलेलं असतं. आज पाणी, वीज, अन्नधान्य, स्वच्छ-सुंदर परिसर, अशा आवश्यक गोष्टींच्या बाबतीत माणूस बेफिकीर राहिलेला आहे. महागाई, भ्रष्टाचार या आणि अशा अनेक गोष्टी कशा आटोक्यात आणायच्या हा मोठा प्रश्न झाला आहे. तो नष्ट होण्याच्या मार्गावर असलेल्या, पशू, पक्षी, प्राणी आणि झाडं या नैसर्गिक संपत्तीच्या बाबतीत किती जागरूक असणार, हे विचारायलाच नको. कारण यांचं आपल्या आयुष्यातलं महत्त्व काय या बाबतीत तो बऱ्यापैकी अनभिज्ञ आहे. नान्नज अभयारण्यातील माळरान हे माळढोक पक्ष्यांचं वसतिस्थान, पण आज याच वसतिस्थानाला इतक्या प्रश्नांनी ग्रासलं आहे की माळढोकसारख्या शांतताप्रिय पक्ष्यानं तिथून काढता पाय घेतला आहे. दरवर्षी कमी होत जाणाऱ्या माळढोकांच्या संख्येनं धोक्याची सूचना दिलेली आहे. पण जगण्याच्या पिरॅमिडमध्ये प्राणी आणि पक्ष्यांपेक्षा माणसाला प्राधान्य मिळालं पाहिजे हा अलिखित नियम आणि माणसाची हाव आभाळाला भिडलेली, या व्यस्त प्रमाणामुळे शेवटी बळी जातो तो या मुक्या जीवांचाच. याबद्दल वाईट वाटणारे फारच थोडे. कारण बहुतांश जनता ही पैशांची जबरदस्त भूक, सत्तेची धुंदी यातच लडबडत असते. नान्नजमध्ये माळढोक पक्ष्यांना वाचवायचं तर दूरच, पण त्यांच्यासाठी असलेला राखीव भाग कमी केला गेला. खाणी, हॉटेल्स, राहण्यासाठी घरं वगैरे विकासकामांनी आधीच बराचसा भाग बळकावला आहे, त्यात आता राखीव भाग कमी केल्यानं या पक्ष्यांच्या अस्तित्वावरचं संकट अजूनच वाढलं आहे. वाघांच्या आणि गेंड्यांच्या शिकारीला आळा बसला नाही तर एक दिवस हेही प्राणी नामशेष होतील. आज बिबट्यांवर माणसाचा राग आहे, कारण तो गावात येतो बायाबापड्यांना, लहान मुलांना पळवून नेतो, मारतो. त्यामुळे बिबट्या गावात शिरला असं कळलं रे कळलं की त्याला मारण्यासाठी धडपड सुरू होते. पण मुळात माणसं गावात आणि प्राणी जंगलात या नैसर्गिक विभाजनावर कोणी अतिक्रमण केलं, हे लक्षात न घेता दोष सर्वस्वी बिबट्याच्या माथी मारला जातोय. वाघ काय, बिबट्या काय किंवा इतर प्राणी काय, ते स्वत:हून कधी आक्रमण करत नाहीत. त्यांना जंगलात खायला मिळालं नाही तरच ते गावाकडे वळतात. ही जंगलं नष्ट करण्याचे, कमी करण्याचे उद्योग माणसानंच केले आहेत, हे आपण विसरतो.

निसर्गात एक साखळी असते, ज्यामुळे नैसर्गिक समतोल व्यवस्थित राखला जातो. या साखळीतला एखाद्या घटकावर जरी परिणाम झाला तर ती साखळी खिळखिळी होते आणि त्याचे परिणाम दिसायला लागतात. उदाहरणार्थ, साप कमी झाले की उंदीर वाढतात आणि ते शेतात धुडगूस घालतात. कोल्हे सशांना खातात, पण कोल्हे कमी झाले की सशांची संख्या वाढते. हे ससे तापदायक होतात. निसर्गात कुणाची संख्या प्रमाणापेक्षा वाढू नये आणि निसर्गाचा तोल बिघडू नये यासाठीच परस्परशत्रूंची नैसर्गिक व्यवस्था आहे. मानवप्राणी या व्यवस्थांनाच धक्का लावतो. आपल्याला हव्या त्या प्राण्यांना मारतो. मजा मिळवण्यासाठी शिकार करतो. कातडीसाठी मारतो. औषधं बनवण्यासाठी मारतो. मांस मिळवण्यासाठी मारतो. एक ना दोन अनेक कारणं. या कारणांपायी अनेक प्राणी, पक्षी मरतात. नैसर्गिक साखळी तुटते. मग त्याचं खापर कुठल्यातरी प्राण्याच्या

माथ्यावर फोडून मोकळा होतो. बिचारे प्राणी त्यांची बाजू मांडू शकत नाहीत, आपल्या माथ्यावरचा हा शिक्का पुसून टाकू शकत नाहीत.

या नैसर्गिक साखळीबरोबर पर्यावरणातले अनेक घटक एकमेकांवर अवलंबून असतात, त्यामुळेही एखादा घटक निकाली निघाला की त्याचा परिणाम त्याच्यावर अवलंबून असणाऱ्यांवर झाल्याशिवाय राहत नाही. कित्येक वेळेला अनवधानानंही हे होऊ शकतं. त्यामुळेच असं वारंवार सांगितलं जातं की निसर्गातली कोणत्याही गोष्टीला आपण हात लावायचा नसतो. ती आपल्या दृष्टीनं वाया गेलेली असली तरी ती दुसऱ्या कुठल्या तरी घटकाला उपयोगी पडणारी असू शकते. त्यासाठी निसर्गाचा अभ्यास हवा. नैसर्गिक समतोल, निसर्गातील घटकांचा परस्परसंबंध, त्यांच्या सवयी, लकबी याचा अभ्यास हवा. पण सगळ्यांकडून अशी अपेक्षा ठेवता येणं शक्य नाही. अशा वेळेला आपण एक करू शकतो, की आपण फक्त निरीक्षक म्हणून जायचं. आपल्या हातून कुठल्याही प्रकाराने नैसर्गिक समतोल बिघडणार नाही याची काळजी घ्यायची. त्यासाठी निसर्गातील काहीही उचलून आणायचं नाही. जंगलात फिरताना कित्येकांना अशी सवय असते की जरा काही वेगळं दिसलं की उचलून घे. पण काही काही फुलं ही अगदी दुर्मिळ असतात. ती तोडून घेतली की मागून येणाऱ्यांना ती बघायलाही मिळू शकत नाहीत. किंवा असं प्रत्येकजण तोडत गेला तर ती जात नष्टही होण्याची शक्यता असते. फुलं सोडाच, पण जंगलात कुजलेली फांदीही कोणाच्या तरी उपयोगाला येऊ शकते, असंही जाणकार सांगतात. त्यामुळेच पर्यावरणाचं संरक्षण करायचं तर कित्येक गोष्टी समजून घेण्याची आवश्यकता आहे. आज इको टूरिझम हा परवलीचा शब्द झाला आहे. पण चांगल्या कल्पनेचं कसं मातेरं होऊ शकतं, याचं ते उत्तम उदाहरणही ठरते आहे, हे विचित्र आहे. आज लोकांकडे पैसा आहे, वेळ आहे आणि उत्साह आहे. त्यामुळे नव्या नव्या कल्पनांचं स्वागत करण्यास ते नेहमीच उत्सुक असतात. इको टूरिझम हे त्याचंच फळ. इको टूरिझमच्या नावाखाली जो काय सावळा गोंधळ चाललेला असतो, तो पाहिला की हे लोक पर्यावरणाचं संरक्षण करण्यासाठी आहेत की पर्यावरणाच्या मुळावर उठलेले आहेत अशी शंका यावी. त्यामुळे आयोजक आणि प्रवासी यांनी या संकल्पनेचा पुनर्विचार करावयास हवा.

पशू, पक्षी, प्राणी आणि झाडं या सर्वांना एक विशिष्ट प्रकारच्या वातावरणाची सवय असते. ते त्याच परिस्थितीत राहू आणि जगू शकतात. आणि त्याबाबतीत ते एवढे संवेदनशील असतात की या नैसर्गिक वातावरणात बदल झाला तर ते स्थलांतर करतात किंवा संपुष्टात येतात. हापूसचा आंबा म्हटलं की कोकण डोळ्यांसमोर येतो, सूचिपर्णी वृक्ष म्हटलं की हिमालयाची आठवण येते, खारफुटी म्हटलं की सुंदरबन आठवतं, कारण ते त्या त्या भागाचं वैशिष्ट्य असतं. त्यामुळे या वैशिष्ट्यांची जपणूक करायची तर तिथली भौगोलिक परिस्थिती बदलली न जाणं हे महत्त्वाचं. तसं झालं नाही तर त्या जातीच्या अस्तित्वावरच घाला पडणार. कारण त्या बाबतीत या घटकांना पूर्णपणे निसर्ग आणि माणूस यांच्यावरच अवलंबून राहावं लागतं. गोष्टी आपल्याला हव्या तशा बदलणं, त्यासाठी कुठल्याही थराला जाणं, परिणामांची चिंता न करणं, दुसऱ्याची पर्वा न करणं, हे सगळं माणूस करतो. माणसानं वाटेल तसं वागून निसर्गाचा तोल बिघडवला की त्याचे परिणाम मात्र प्राणी, पक्षी आणि झाडं यांना भोगावे लागतात. मग कधीतरी माणूस एकदम जागा होतो. जैवविविधता कमी होते आहे, प्रजाती नष्ट होत आहेत, याचा त्याला साक्षात्कार होतो. मग तो हे सगळं वाचवायच्या मागे लागतो. त्यासाठी कुठल्या कुठल्या योजनांची आखणी करतो. 'अमुक डे', 'तमुक डे' सुरू करतो. मोठमोठे कार्यक्रम घेतो. सेलेब्रिटींना हाताशी धरतो. हल्ली सगळे सेलेब्रिटी कुठल्याही सामाजिक आशयाच्या कार्यक्रमासाठी एका पायावर उपलब्ध असतात. कारण प्रसिद्धीची एकही संधी हातून जाऊ द्यायची नसते. बरं, नुसतं तोंड तर दाखवायचं असतं, प्रत्यक्ष कृतीची अपेक्षा नसतेच. मग जायचं, मिरवायचं, नंतर आवर्जून फोटो छापायचे, चॅनलवर झळकायचं, भरपूर प्रसिद्धी मिळवायची की झालं. पुन्हा दुसऱ्या सामाजिक कारणाकडे वळायचं. मागे एकदा एका अभिनेत्रीनं वाघ बचाव मोहिमेसाठी वाघासारखा मेकप वगैरे करून स्वत:ला पिंजऱ्यात बंद करून घेतलं होतं आणि त्या वेषातले तिचे फोटो प्रसिद्ध करून भरपूर प्रसिद्धी मिळवली होती. काही उच्चभ्रू मॉडेल्सनी 'शाकाहारी व्हा' असा संदेश समाजाला देण्यासाठी भाज्यांचे ड्रेस (?) घातले होते. या मॉडेल्सना बघण्यासाठी जमलेल्या गर्दीला आवरता आवरता पोलिसांच्या नाकीनऊ आले होते आणि गर्दीतल्या बऱ्याच लोकांना तर हे कशासाठी आहे ते कळलंच नव्हतं! तिथून परत गेल्यावर त्यांनी सामिष भोजनही केलं असेल. पर्यावरण जतन-संवर्धनाबाबतीत जे पोकळ आणि भोंगळ प्रचार आणि प्रसार चाललेले आहेत, त्याच्या अशा अनेक सुरस आणि चमत्कारिक कथा, प्रसंग सांगता येतील आणि त्यातून छान करमणूकही होईल, पण जे साध्य व्हायचं ते होणार नाही. कारण गंभीर प्रश्नांकडे अत्यंत उथळपणे पाहिल्यानं प्रश्न सुटत नाहीत. आज ज्या पद्धतीनं

प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला जातोय, त्यात मूळ प्रश्नाच्या गाभ्यापर्यंत कुणी पोचतच नाहीये. जे काही चाललं आहे ती वरवरची मलमपट्टी आहे. प्रश्नाचा आगाज खूप होतो, पण साध्य काहीच होत नाही. गरजते है वो बरसते नही, असा हा प्रकार आहे. सगळीकडे दिसतो तो फक्त उत्सवी हलकल्लोळ. आपल्याला छळणाऱ्या सगळ्याच प्रश्नांच्या बाबतीत आपण किती दांभिक धोरण स्वीकारलेलं आहे, हे वेगळं सांगायची गरज नाही. आतून तमाशा वरून कीर्तन अशी भूमिका स्वीकारून आपण स्वत:च्याच हातांनी स्वत:च्या पायावर धोंडा पाडून घेत आहोत.

एकदा पाण्याच्या प्रश्नाच्या जागृतीसाठी एक जंगी कार्यक्रम झाला. कार्यक्रमाची भव्यता डोळे दिपवणारी होती. लोकांनीही मोठ्या प्रमाणावर तिथं हजेरी लावली असं नंतर झोकात छापून आलेल्या छायाचित्रांवरून लक्षात आलं. पण या कार्यक्रमासाठी किती मोठ्या प्रमाणावर वीज खर्च झाली याचं भान नव्हतं. म्हणजे आज एका संस्थेनं पाण्यासाठी कार्यक्रम केला, उद्या दुसरं कोणी उठेल आणि विजेसाठी कार्यक्रम करेल. ध्वनिप्रदूषण झालं म्हणून तिसरं कोणी ध्वनिप्रदूषणाच्या मुद्यासाठी कार्यक्रम करेल... कारण आज एखाद्यानं सुरुवात केली आणि त्या कल्पनेला प्रसिद्धी मिळतेय हे लक्षात आलं की की प्रत्येक जण त्याच्या पावलावर पाऊल टाकून जायला तयारच असतो. आपलं घोडं पुढे दामटण्यासाठी प्रयत्न करतोच. त्यामुळे असा पायंडा पडायला वेळ लागत नाही. आज पाणी, उद्या वीज, परवा महागाई, मग शिक्षणाचा खेळखंडोबा, मग महिला अत्याचार..... ही यादी अजून कितीही वाढवता येईल. वर्षाचे तीनशे पासष्ठ दिवस काही ना काही तरी कारण मिळू शकतं. कारण आज कुठल्याही गोष्टीला सामाजिकतेची डूब देण्याची पद्धतच आहे. व्यापक जनजागृतीसाठी अशा सांस्कृतिक जागराचा उपयोग होतो, नाही असं नाही. भूतकाळात हे तंत्र फार प्रभावीपणे वापरल्याचंही दिसून येतं. आज समाजाची वीण विस्कळीत झाली आहे. त्यामुळे समाजाला संघटित करणाऱ्या, एकत्रित बांधून ठेवणाऱ्या शक्तीची खूप गरज आहे. पण प्रत्यक्षात मात्र असली आणि नकली यात जो फरक आहे तोच अलीकडच्या या सांस्कृतिक जागरांमध्ये दिसून येतो. इथं उद्देशाच्या सच्चाईबाबतच शंका उपस्थित व्हावी अशी परिस्थिती असते. जमाव एकत्र येतो पण तो फक्त संख्येनं, विचारधारेशी देणंघेणं असतंच असं नाही. त्यांच्या दृष्टीनं ते फक्त एक 'गेट टूगेदर' असतं. त्यामुळेच या कार्यक्रमांच्या आयोजनामागे सामाजिक बांधिलकीपेक्षा तापल्या तव्यावर पोळी भाजून घेण्याचा अट्टहास जास्त वाटतो. लाखो झाडांचा बळी देऊन टाउनशिप वसवणाऱ्या एका समूहातर्फे 'सामाजिक प्रश्नांना वाचा' फोडण्यासाठी 'कार रॅली' आयोजित केली जाते. सामाजिकता खपते, हे लक्षात आल्यानंतर जो तो ती एन्कॅश करण्यासाठी धडपडतो आहे. सामाजिक प्रश्नही खूप आहेत, त्यामुळे कार्यक्रमांना तोटा नाही. एखाद्या सामाजिक प्रश्नाची जोड दिली की जनताही लगेच हळवी होते. लाखोंच्या लोंढ्यानं कार्यक्रमाला हजेरी लावते. मग कार्यक्रम यशस्वी झाला (कार्यक्रमाला किती माणसं हजर होती, यावर कार्यक्रमाचं यशापयश मोजलं जातं) म्हणून आयोजक खूश, एक दिमाखदार सोहळा बघायला मिळाला म्हणून जनता खूश अशी विन विन सिच्युएशन असते. पण हे सगळं प्रत्यक्ष कृतीपर्यंत येत नाही. सगळ्यांचा पाठिंबा असतो, पण प्रत्यक्ष कृतीची वेळ आली की हाताच्या बोटावर मोजता येतील एवढी मंडळी उरतात. हीच तर आजची शोकांतिका आहे. आज आम्ही सतत गात असतो, नाचत असतो. पाणी बचाव, मराठी अस्मिता, पर्यावरणाचा ऱ्हास... असे कितीतरी कार्यक्रम झाले आहेत, होत असतात आणि भविष्यकाळात होत राहतील. कारण छोटं-मोठं कुठलेही कारण आपल्याला पुरतं. आपण एका पायावर नाचायला-गायला तयार असतो. आपल्याला हवी असते, ती फक्त करमणूक. मग ती कुठलाही मुखवटा घालून येऊ दे. त्याच्याशी कोणाला काही देणं-घेणं नसतं. फार फार तर एसीत बसून, फुल कोर्स जेवण घेताना आणि टीव्ही बघताना आपण थोडीफार चर्चा करतो आणि पाहिल्या कार्यक्रमाला जागतो. पण तोपर्यंत दुसऱ्या कार्यक्रमाच्या जाहिराती झळकायला लागलेल्या असतातच. त्यामुळे पहिल्या कार्यक्रमाचा सामाजिक मुद्दा मनावरून पुसला गेलेला असतो. नवा गडी नवं राज्य सुरू झालेलं असतं. असं होता होता कुठलाच सामाजिक मुद्दा मनावर नीट ठसत नाही, मग गांभिर्य तर सोडाच. तरी कार्यक्रम मात्र जोर शोरसे सुरू असतात, पृथ्वीतलावरच्या अगणित प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी...

आणि प्रश्न मात्र सुटतच नाहीत.

**शुभदा पटवर्धन**
भ्रमणध्वनी ९८ ९०४ ५२० ८०
shubhadey10gmail.com

# भुवनेश्वर येथील ईश्वर

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

इजिप्तच्या, चीनच्या व मोगल राजांनी आपला लौकिक इतिहासात कायमचा उमटला जावा म्हणून मोठमोठी थडगी बांधलेली मी माझ्या विश्वभ्रमंतीत बघितली. त्यातलं सर्वाधिक सुंदर थडगं म्हणजे आपला ताजमहाल. त्यावेळी त्यांच्या राजवटीच्या शोकाकूल इतिश्रीची आठवण होते. याउलट आमच्या हिंदू राजांनी थडग्यांवर भर न देता शिल्पाकृतींतून जीवनातील श्रद्धा, कला, काव्य आदी उदात्त मूल्यं आविष्कारीत केली. आपल्या देवळात आणि त्यांच्या थडग्यांत हा एक मोठा फरक मला जाणवला.

भारताला पूर्वभाग आहे हे मला भूगोल वाचून ठाऊक होतं. पण मला त्याला वास्तवाचं असलेलं अधिष्ठान अगदी अलिकडे म्हणजे फेब्रुवारी २०१२ मध्ये लाभलं. मी अप्पा परचुरेंबरोबर भारताच्या या अपरिचित भागात सपत्नीक आगेकूच करण्याचं ठरवलं. त्यासाठी ओरिसा म्हणून परिचित असलेल्या प्रांताची राजधानी – भुवनेश्वर, हे स्थळ प्रतिनिधिक ठरलं. आता त्या राज्याला ओडिशा म्हणतात. सुरुवातीला मला तो मुद्रणदोष वाटला पण मग कळलं की तो अधिकृत बदल आहे. आपल्या भौगोलिक ज्ञानावर बुरसं चढलेलं बघून मी खजिल झालो.

हा भाग इतिहासानं ओथंबलेला आहे. जी सत्यमेव जयतेची त्रिमूर्ती आज आपलं सरकार बोधचिन्ह म्हणून सर्रास वापरते तिचा जनक – अशोक, याच भागातला. त्यानं वंग (बिहार), बंग (बंगाल) व कलिंग (ओडिशा) या भागावरच नव्हे तर सबंध उत्तर हिंदुस्थान, नेपाल, पाकिस्तान व अफगाणिस्तानपर्यंत आपल्या राज्याचा विस्तार केला. गुलाब म्हटलं की काटे आलेच. तसंच कुठलाही राजा म्हणजे युद्ध आलंच. अशोकानं १०-२० दशलक्ष लोकवस्तीच्या आपल्या साम्राज्यातून अर्धा दशलक्ष लोकांची फौज उभी केली. आज १२९० दशलक्ष लोकसंख्या असलेल्या उभ्या भारताजवळ १ दशलक्ष सैन्य आहे. यावरून अशोकाच्या लष्करी बळाची कल्पना येते.

या युद्धात झालेली जीवहानी बघून अशोकाला पश्चात्ताप झाला. त्यानं अहिंसा व बौद्ध धर्म पत्करून इतिहासातलं एक न्याय, धर्म व नीतिनिष्ठ राज्य स्थापन केलं. अशोक जनतेवर प्रेम करणारा राजा म्हणून ओळखला जातो. तो मौर्य राजवटीला तिसरा राजा व चित्रगुप्ताचा नातू. त्यानं इसवी सनापूर्वी ३०४-२३२ काळात त्यानं राज्य केलं. त्यावेळी जग अक्षरश: गवत खाऊन राहत होतं तर आपला भारत कला, विज्ञान व सौंदर्यशास्त्रात अग्रणी होता. हे कागदपत्रांत सापडत नसून शिल्परूपानं अभिव्यक्त झालेलं दिसतं. त्यामुळे शिवाजीच्या जन्मतारखेविषयी आपले इतिहासकार जसे

काथ्याकूट करतात तसं करण्याची जरुरी नाही. अशोकाच्या राज्याचे अवशेष सर्वांना स्पष्ट दिसतात. वन्यप्राण्यांचं संरक्षण करण्याची अक्कल जगाला अलिकडे आली पण अशोकानं त्यावेळी तसा कायदा केला. जगातलं सर्वात मोठं साम्राज्य म्हणून अशोकाचं राज्य ओळखला जाई. त्याची राजधानी म्हणजे आजची पाटना.

गुलामगिरीत पिचून परदेशी संस्कृती गळ्यात कोंबलेल्या आजच्या भारतीय माणसाला आपल्या श्रेष्ठत्वाचा इतिहास आज उपरा वाटतो. आपण ऐकेकाळी जगात अग्रणी होतो याचा आपल्याला पार विसर पडला आहे. दु:खाची गोष्ट म्हणजे आपण तसं होण्याच्या आकांक्षा देखील बाळगत नाही. असं चीनमध्ये सापडत नाही. त्यांना आपल्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वर्चस्वाचं भान असून ते आपलं स्थान पटकावण्याचा मार्गावर आहेत. अशी भावना आपल्यात सापडत नाही. आपली आजची किडलेली राज्यव्यवस्था व त्यावेळचे जगाला धडे शिकवणारे अशोकाचे साम्राज्य हा एकाच देशाचा इतिहास आहे असं वाटत नाही.

तर भुवनेश्वरला भेट देणं म्हणजे एकेकाळच्या उज्ज्वल इतिहासात प्रवेश करणं हे ओघानं आलंच. त्याच्या परिसरात आपल्या श्रेष्ठत्वाच्या व भरभराटीच्या अनेक खुणा सापडतात. त्यावेळी भारतात शिल्पकला केवढी विकसित झाली होती याची कल्पना येते.

भुवनेश्वरच्या आम्ही बघितलेल्या भागांतले रस्ते बहुपदरी, स्वच्छ, खड्डेमुक्त व दुतर्फा झाडांनी सुशोभित होते. रस्त्यांवर बेताचीच गर्दी. त्यामुळे आपण भारतात नसून एखाद्या युरोपीय देशात आहोत असं वाटलं. पण ओडिशा भाषेतल्या पाट्या आपण भारतात आहोत याची आठवण करून देत होत्या. अख्ख्या ओडिशाची लोकसंख्या फक्त ३६.७ दशलक्ष म्हणजे मुंबईपेक्षा दुप्पट. याउलट महाराष्ट्रात ११२ दशलक्ष जीव राहतात. त्यामुळे या बेताच्या लोकसंख्येचा भार गलिच्छता, गर्दी व गोंगाट अशा प्रदूषणात होत असलेला दिसला नाही. शिवाय इथे आयुष्याला मुंबईतल्या किंवा न्यू यॉर्कमधल्या जीवनाप्रमाणे भिंगऱ्या लागल्या नव्हत्या. इथे लोकांना फुलांचा वास घेण्यास वेळ मिळतो.

आम्ही फेब्रुवारी २२ ते २५ पर्यंत तिथे होतो. त्यावेळी सर्व अमेरिका व युरोप शीतपेटीत गोठलेला असल्यामुळे भारतात उन्हाळ्यानं अकाली डोकं वर काढलेलं लक्षात राहिलं नाही. आम्ही अमेरिकेहून उन्हाळी कपड्यांऐवजी हिवाळी वस्त्रं घेऊन आलो होतो. या चुकीमुळे जीव घायाळ झाला. भूमी तव्यासारखी तापलेली. त्यावर ज्वारी ठेवली असती तर तिच्या लाह्या सहज झाल्या असत्या. सारखं पाणी ढोसून आत्मा शांत व शीतल ठेवण्याचा विफल प्रयत्न केला. डोक्यावर रूमाल पांघरून सूर्याची भोसकणारी किरणं अडवणं पळीच्या साहाय्यानं समुद्र रिकामा करण्याएवढं हास्यास्पद आणि कठीण. दोन्ही कृतीत यश लाभत नाही.

इथे प्राचीन देवळांची रेलचेल आहे. त्यात शिवाची श्रद्धास्थानं बहुसंख्येनं आढळतात. प्रत्येक मंदिर म्हणजे चिरकालत्व लाभलेली एक कलाकृतीच. त्यातलं सौंदर्य, कला व वास्तुशास्त्रीय कौशल्य बघून मन कौतुकाच्या व अभिमानाच्या तुषारांनी भिजून जातं. ही हेमाडपंती देवळं १५०० वर्षांपूर्वी बांधलेली. छोटेखानी पण टुमदार. बाहेरच्या भिंतीवर देवांच्या मूर्ती कोरलेल्या. हे दगड एकमेकांशी जोडलेले कसे राहिले? त्यावेळी सिमेंटचा शोध लागला नव्हता. झुलते मनोरे किंवा चीनमधील महाभिंत बघताना माझ्या डोक्यात तोच प्रश्न आला होता. आत शिवाची पिंड होती. परिसरात अनेक लहानमोठी मंदिरं आहेत. अशा ठिकाणी जलकुंड असंतच. पण ते नेहमी गलिच्छ असल्याचा माझा अनुभव आहे. इथला जलाशय मात्र स्वच्छ होता, हा एक चमत्कारच म्हणायला पाहिजे.

इजिप्तच्या, चीनच्या व मोगल राजांनी आपला लौकिक इतिहासात कायमचा उमटला जावा म्हणून मोठमोठी थडगी बांधलेली मी माझ्या विश्वभ्रमंतीत बघितली. त्यातलं सर्वाधिक सुंदर थडगं म्हणजे आपला ताजमहाल. त्यावेळी त्यांच्या राजवटीच्या शोकाकूल इतिश्रीची आठवण होते. याउलट आमच्या हिंदू राजांनी थडग्यांवर भर न देता शिल्पाकृतींतून जीवनातील श्रद्धा, कला, काव्य आदी उदात्त मूल्यं आविष्कारीत केली. आपल्या देवळात आणि त्यांच्या थडग्यांत हा एक मोठा फरक मला जाणवला.

या सर्वातलं मोठं देऊळ म्हणजे लिंगराज मंदिर. ही कलाकृती म्हणजे परसुपरमेश्वर मंदिराची मोठी आवृत्ती. देवळाचा गोलाकार कळस वरच्या देवांशी कुजबुज करतो. परंतु काळाच्या फटकाऱ्यामुळे तो काही कारणास्तव अस्थिर झाला. तो दुरुस्त न करता आपल्या पुरातत्त्व खात्यानं लाकडाच्या फळ्यांनी टेकू देऊन त्याला स्थिरावलं. हे टेकू एवढे कुरूप दिसतात की त्यामुळे या भव्य शिल्पाकृतीला कलंक लागला असं वाटतं. सौंदर्यानुभूतीचा हा खून मला इतर देशांत सापडला नाही.

हे भ्रष्ट सौंदर्यदर्शन एकदा पचवता येईल, पण आत



लिंगराज मंदिर

देवळात श्रद्धेचं झालेलं स्थित्यंतर कुणालाच रुचणार नाही. पदोपदी पंडे पैसे उकळून 'पुण्य' वाटत होते. हे देवदर्शनाचं व्यापारीकरण बघून उबग आला. मी रोम येथील व्हॅटिकनमध्ये कॅथलिक धर्माच्या आद्य देवळाचं दर्शन घेतलं आहे. त्याला बांधायला शंभरहून अधिक वर्षं लागलीत. तिथेसुद्धा भक्तांची व बघ्यांची तोबा गर्दी. पण आपल्या देवळात केलेला श्रद्धेचा विपर्यास मला तिथे आढळला नाही. एक प्रवेशशुल्क भरलं की कुठल्याही धर्माच्या माणसाला किंवा स्त्रीला आत जाण्याचं स्वातंत्र्य. पैशांसाठी कुणी हात पुढे करत नाही. पण आपल्या देवळात पदोपती तसं घडताना आढळलं.

दुसऱ्या दिवशी देव सोडून घटकाभर निसर्गाला भेट दिली. इथलं नंदनवन उद्यान प्रेक्षणीय समजण्यात येतं. तिथे प्राणिसंग्रहालयही आहे. इथले प्राणी पिंजऱ्यात कोंडून न ठेवता नैसर्गिक वन्यस्थितीत विहार करतात. म्हणून त्यांचं आकर्षण जास्त. मला वाघ आणि सिंह बघायचे होते. तिथे त्यांचं दर्शन होईल हे ऐकताच मला कोण आनंद झाला. याचं कारण असं की आतापर्यंत माझं आणि या प्राण्यांचं सूत कधीच जमलं नाही. राजस्थानातील रणथंबोर (Rathanbore) राष्ट्रीय उद्यान या प्राण्याचं वन्यस्थितीत दर्शन घेण्यास सर्वोत्तम ठिकाण समजतात. तिथे २००८च्या व्याघ्रगणतीत २३ वाघ असल्याचं कळलं. भल्या पहाटे थंडीत कुडकुडत आम्ही तिथे गेलो होतो. परंतु वाघोबांचं कुठेच दर्शन झालं नाही. त्याला त्या दिवशी तहानही लागली नसावी. कारण पाण्याजवळही तो फिरकला नाही. दर्शन झालं ते जमिनीवर उमटलेल्या त्याच्या पंजांचं. यावरून वाघ इकडे फिरकला हे सिद्ध झालं. पण केव्हा? ते ठसे कालचे किंवा मोगल काळातले असू शकतात!

या निराशाजनक अनुभवांपूर्वी मिळालेली अनुभूतीही फारशी आल्हादकारक नव्हती. मी खुजराहो बघितल्यावर मध्यप्रदेशातील बांधवगड राष्ट्रीय उद्यानात खास गेलो होतो. त्यावेळी तिथे तर वाघांचं पेव फुटलं आहे असं कळलं. एका पुस्तकानं तिथे व्याघ्रदर्शन होतं याची शाश्वती दिली होती. पण मी तिथे येणार हे कळताच सर्व प्राण्यांनी वनवास सोडून अज्ञातवास पत्करला आणि माझी पुन्हा निराशा झाली. त्यामुळे लहान मुलांची दूध **पुड्यातून** येतं ही धारणा झालेली असते तशी वाघ फक्त सर्कशीतल्या पिंजऱ्यातच सापडतात अशी माझी खात्री झाली. म्हणून आज भुवनेश्वरजवळील उद्यानात या दुर्मिळ प्राण्याचं दर्शन होणार का याविषयी मी जरा साशंक होतो. त्या दिवशी ऊन खूप तापलं होतं. धरणी आग ओकत होती. खरोखरीच जमिनीवर पोळ्या भाजता आल्या असत्या. अशा वातावरणात वाघोबा बाहेर फिरकण्याऐवजी एखाद्या थंड गुहेत अदृश्य होणार नाही का?

आम्ही प्रवेशशुल्क भरून एका वाटाड्याला घेऊन आत शिरलो. देशी माणसाला ३० रु. तर परदेशीयांना २०० रु. फी होती. अर्थातच मी देशी माणसाची फी भरून आत गेलो. पाच तपं परदेशात राहिल्यामुळे मी गोरा झालो नव्हतो. जन्मानं भारतीय म्हणजे आजन्म देशीच. अशा वेळी त्या अव्यवहारी धर्मराजाचा अवतार धारण करणं व्यवहार्य नसतं.

एका जुनाट बसमध्ये बसून सर्व मंडळी वाघोबाच्या दर्शनार्थ निघाली. त्यांच्यासाठी खास राखून ठेवलेल्या अरण्यात प्रवेश करून पाच मिनिटंही झाली नसतील तोच बसमधल्या पर्यटकांनी गदारोळ सुरू केला. बाहेर एका झाडाच्या सावलीत आपल्या विशाल धडाची ऐटदार घडी करून एक पांढरा वाघ आत्ममग्न होऊन एखाद्या ध्यानस्थ ऋषीसारखा बसला होता. आतापर्यंत मी फक्त पिवळ्या रंगाचे वाघ पिंजऱ्यात कोंडलेले बघितले होते. प्रथमच मला पांढऱ्या वाघाचं दर्शन झालं होतं. पर्यटकांनी आपली आयुधं सरसावून पटापटा त्या एकाकी प्राण्याची चित्रं टिपली. त्याला आम्हा मानवाची क्षिती किंवा भीती वाटली नाही. हे मानवी बघे उगाचच इकडे फिरकतात

असं त्याला वाटत असावं. म्हणून त्यानं आमच्याकडे ढुंकूनही बघितलं नाही. त्यामुळे अपमान झाल्यासारखं वाटलं. शेवटी ते ध्यान उठलं आणि बससमोरून रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला गेलं. त्याची ऐटदार चाल विश्वसुंदरीच्या चालीपेक्षा मोहक वाटली.

वाघांसाठी राखून ठेवलेल्या वनापासून जवळच सिंहाचं अधिपत्य असलेल्या अरण्यात त्याच बसनं गेलो. लगेच त्या वनराजाचं दर्शन झालं. सावलीत बसून तोही बेफिकीरीनं आसमंत न्याहाळत होता. त्यानंही आम्हाला दुर्लक्षित केलं. उन्हानं करपलेल्या अरण्यात तो थंड ठिकाण शोधत असावा.

या दुर्मिळ अनुभूतींच्या उन्मादात दुसऱ्या दिवशी आम्ही इथून जगन्नाथपुरीला जाण्यास निघालो. वाटेत कोणार्क नावाच्या एका लहान गावात थांबलो. इथे दरवर्षी कोणार्कनृत्य महोत्सव साजरा केला जातो. त्याची काही दिवसांपूर्वीच सांगता झाली होती. पण त्या उत्सवाचं सुशोभित केलेलं रंगीबेरंगी उघडं प्रेक्षागार आकर्षक वाटलं. गाव लहान असलं तरी इथला सांस्कृतिक ठेवा मोठा व अतुलनीय आहे. इथलं सूर्यमंदिर (Sun Temple) जगविख्यात आहे. त्यातून भारतीय संस्कृतीची कलात्मक अभिव्यक्ती होते. नरसिंहदेव नावाच्या राजानं १३व्या शतकात मुस्लिमांवरील लष्करी विजय साजरा करण्यासाठी हे अप्रतिम देऊळ बांधलं. श्रद्धास्थानाबरोबर ती एक अनन्यसाधारण शिल्पाकृती झाली आहे. ती बांधण्यास १२ हजार मजूर १२ वर्षं सातत्यानं राबले. त्यांच्या कष्टांच्या फळाला जागतिक कलारक्षण संस्थेनं विश्वदाय स्मारक म्हणून प्रमाणपत्र देऊन गौरवान्वित केलं. पण युनेस्कोचा (UNESCO) हा वरदहस्त म्हणजे देवाला बक्षीस देण्यासारखं आहे. मुळातच ही शिल्पाकृती भारतीय संस्कृतीच्या महत्तेनं मढलेली आहे. त्याचं महत्त्व अशा वायफळ प्रमाणपत्रानं अंशत:ही वाढत नाही.

हे मंदिर केवळ श्रद्धास्थान नसून हिंदू शिल्पकलेचा तो परमोच्च बिंदू समजण्यास हरकत नाही. त्यात कमालीची सौंदर्यदृष्टी, ज्ञान व सांस्कृतिक अभिव्यक्ती सापडते. ते ७०० वर्षांपूर्वी जेव्हा बांधलं तेव्हा समुद्र त्याच्या पायापाशी लोळत होता. त्यामुळे तो परिसर किती सौंदर्यवान दिसत असेल याची कल्पनाच केलेली बरी. पण आता तो समुद्र ३ किलोमीटर पूर्वेला पळून गेला. इजिप्तचे झुलते मनोरे तर त्यापेक्षा जुने. तेही नाईल (Nile) नदीच्या काठावर वसले होते पण आता त्या नदीनं भलतंच वळण घेऊन त्या थडग्याशी गट्टी फू केली आहे. त्यामुळे ते स्मारक वाळवंटात कुठेतरी बांधलं असं वाटतं. दर्याकाठी किंवा सरितेकाठी बांधलेली शिल्पं आता आई हरवलेल्या बालकासारखी विन्मुख झालेली दिसतात.

या सूर्यमंदिरात कमालीचा आशय दडलेला आहे हे तज्ज्ञ वाटाड्या घेतल्यावरच कळतं. ते सूर्याचा रथ म्हणून बांधण्यात आलं. या रथाकृतीला आठवड्यात सात दिवस म्हणून ७ सशक्त, सुदृढ व सुबद्ध अश्व जुंपलेले आहेत. तसंच दिवसाला २४ तास म्हणून त्या भव्य रथाला २४ चाकं आहेत. प्रत्येक चाकाला १२ आरे आहेत. त्यावरून सूर्यकिरणं परावर्तित झाली म्हणजे दिवसाची वेळ अचूकपणे सांगता येते. एवढं खगोलशास्त्रीय ज्ञान आपल्या पूर्वजांना होतं. आता आपण त्याचे वारसदार म्हणून शोभत नाही ही गोष्ट वेगळी. उष:कालात सूर्यकिरणं आतला गाभा प्रकाशित करून तिथली मूर्ती तेजोवलयीत करत. मुस्लिमांच्या विनाशक प्रवृत्तीपासून सुरक्षित ठेवण्यासाठी इथली मूर्ती व प्रवेशद्वाराजवळील एक स्तंभ शिवाजी महाराजांनी जगन्नाथपुरीच्या देवळात स्थलांतरीत केला. देव नसलेलं मंदिर म्हणजे आत्मा नसलेलं शरीर. तिकडे कुणी बघत नाही. भक्तांनी इथे येणं बंद केलं.

**वेळ दर्शवणारं एक चाक**



सर्वच जंगल वाढलं आणि खुजराहोच्या शिल्पाप्रमाणे ही कलाकृतीही कालौघात अदृश्य झाली.

देवळाच्या भिंतींवर तत्कालीन कलिंग जीवन शिल्पबद्ध करण्यात आलं आहे. त्यात कामजीवन व फॅशनवर भर दिलेला असतो. हे देऊळ किंवा खुजराहोची मंदिरं बघितली की कामसूत्र वाचण्याची जरुरी राहत नाही. म्हणूनच की काय या दोन्ही ठिकाणी परदेशी पर्यटकांची रीघ लागलेली असते. त्यावेळच्या स्त्रियांनी केलेली फॅशन बघून सूर्याखाली काही नवीन नाही याची प्रचीती येते. न्यू यॉर्क, पॅरिस, लंडनमध्ये आधुनिक केश व वेषभूषांच्या राजधान्या म्हणून ढोल पिटवला जातो. त्याचं मूळ भारतात आहे हे जगाला ठाऊक नाही. तेराव्या शतकात आपल्या स्त्रिया स्कर्ट (skirt) घालत. आंबड्याऐवजी आधुनिक वेशभूषा करत आणि हातात बटवे घेऊन मिरवत. तिथे मला एकही पदर किंवा घुंघट असलेली स्त्री दिसली नाही. या जीवनशैलीवरून आमच्या स्त्रियांना त्यावेळी आजच्या भगिनींपेक्षा जास्त स्वातंत्र्य होतं हे सिद्ध होतं. त्यांच्या पुरोगामीत्वाची आज दखल घेताना नवल वाटू लागतं.

या शिल्पकृतीलाही हलाखीचे दिवस आले. सुमारे ३०० वर्षांपूर्वी मुस्लिमांनी या श्रद्धास्थानावर हल्ला करून ते कुरूप केलं. देवळाच्या कळसात असलेले दगड तांब्याच्या तारेनं धरून ठेवण्याची कला त्यावेळच्या शिल्पकारांनी शोधून काढली होती. अर्थातच हा दोरखंड अदृश्य होता. तो मुस्लिमांनी तोडून सगळा कळस ढिला केला. तरीही तो खाली कोसळून पडला नाही. मग १९०३ मध्ये बंगालच्या उपसागरावरून येणाऱ्या चक्रीवादळात हा कळस अजूनच खिळखिळीत झाला. तो स्थिरावण्यासाठी तत्कालीन ब्रिटिश गव्हर्नर लॉर्ड कर्झन यांनी त्याची दुरुस्ती न करता गाभाऱ्यात वाळू भरली व तो कायमचा बंद करून टाकला. आता स्वातंत्र्य मिळून ६६ वर्षं झाली तरी तो गाभारा जशाच्या तसाच आहे. त्यात योग्य डागडुजी करून त्याला पुनरुज्जीवित करण्याचं सरकारला अजून उमगलेलं नाही. ही लांच्छनास्पद गोष्ट बघताना चीड येते कारण जपानमध्ये गेलो असता तिथली अनेक बौद्ध धर्माची देवळं सारख्या होणाऱ्या धरणीकंपाच्या आहारी जाऊन जमीनदोस्त झाल्याचं ऐकलं, पण दरवेळी तिथल्या सरकारनं प्रत्येक पर्यटनस्थळ जसंच्या तसं पुन्हा उभं केलं. त्यामुळे त्यांचा सांस्कृतिक ऱ्हास झालेला दिसत नाही. मग आपण या बाबतीत मागे का? जो देश आपल्या सांस्कृतिक संचिताचं जतन करू शकत नाही त्याचं उत्थान होणं कठीण. प्रवेशद्वारावरची एक नार कोसळून खाली पडली. ती पूर्वीसारखी बसवण्याऐवजी ते भग्न शिल्प आवारात बघण्यासाठी ठेवलं आहे. मुख्य देवळापासून विलग होऊनही या शकलात सौंदर्य आढळतं हे विशेष. ही अपंग कलाकृती बघताना त्यात अश्लिलता आहे असं वाटत नाही. उलट तिथल्या आस्वाद्य आकृतिबंधातून आपल्या कलेची, काव्याची व ज्ञानाची अनुभूती होते.

कोणार्कपासून जगन्नाथपुरी ६० किलोमीटर अंतरावर आहे. रस्ता चांगला असल्यामुळे हा दीड तासाचा प्रवास सुखकर वाटतो. तो समुद्रकिनाऱ्याला लपेटून पळतो. दुतर्फा झाडी सूर्याला अडवून पर्यटकांना आईच्या पदराखाली झोपलेल्या बालकासारखा आश्रय देतात. रहदारी अगदी तुरळक. त्यामुळे हा बहुपदरी खड्डेमुक्त गुळगुळीत रस्ता परदेशातल्या रस्त्यांची आठवण करून देतो. पण या सुखद संवेदनांवर पुरीमध्ये शिरताच गदा पडते. सगळीकडे बकाली सुरू होते. ज्या विस्तृत रस्त्यावर दर आषाढीला जगन्नाथाची रथयात्रा सुरू होते आणि जी पाहून आपण कुठलीही योजना पूर्णत्वास नेण्यास जगन्नाथाचा रथ ओढण्यास लागणार अनेकांचं साहाय्य लागेल असं म्हणतो, तो तसा रुंद आहे. पण मानवी अतिक्रमणामुळे तो निमुळता झाला आहे. हे ५७,००० लोकवस्तींचं ठिकाण यात्रेच्या वेळी अनेकपट वाढतं.

गावात प्रवेश करताच क्षितिजावर ८०० वर्षांपूर्वी बांधलेलं उत्तुंग देवस्थान दिसतं. तो जगन्नाथाचा प्रसिद्ध रथ दरवर्षी नवीन बनवण्यात येतो. तो ओढण्यास ४००० भक्त लागतात. या यात्रेला ६००० कर्मचाऱ्यांचं योगदान लागत असून ७२ कोटी रुपयांचा खर्च येतो. या यात्रेला १० लक्ष भक्त जमतात.

बिगर हिंदूंना देवळात जाण्याची मनाई आहे. आपल्याला मक्केमध्ये तरी कुठे जाता येतं? तरीही एकेकाळी गोरे लोक तिथे बहुसंख्येनं येतं. ते विलास करण्यासाठी. व्हिएतनाम युद्धाच्या वेळी विफलग्रस्त झालेली लष्करयोग्य तरुण पिढी (हिप्पी) इथे मुक्तजीवन कंठण्यास येत असे. स्वैराचाराबरोबरच हशीश, अफू, गांजा यांसारखे अंमली पदार्थ मुबलक प्रमाणात मिळत असल्यामुळे व त्यावर सरकारचा अंकुश नसल्यामुळे त्यांच्या विलासाला सीमा राहिल्या नव्हत्या. अशा जीवनाचा आजकाल इथे लवलेशही सापडत नाही हे विशेष.

आम्ही अगोदरच एक पुजारी आरक्षित करून ठेवला होता. त्याच्या मदतीमुळे आम्ही जनसमुद्रात कसेबसे तरंग



**कर्णालंकार व कडं धारण करून फॅशन करणारी ७०० वर्षांपूर्वीची स्त्री**

राहिलो. पुजाऱ्याची उघडीबंब छाती, अर्धं धोतर आणि तोंडात पानाची गुळणी असा अवतार होता. त्याच्या कडव्या नजरेचा मला अर्थ कळला आणि मी लगेच अनावृत्त पायांनी गरम धरणीवर उभा राहिलो. चालताना तळपायांचा अक्षरश: तीळपापड झाला. हे एक अग्निदिव्यच होतं. बिचाऱ्या सीतेनं ते कसं केलं कुणास ठाऊक! इंद्रद्युम्न नावाच्या राजाच्या स्वप्नात एक दिवस जगन्नाथ आले. म्हणून त्याला हे देवस्थान बांधण्यास प्रेरणा मिळाली. ते तसं मोठं. पण भक्तगणांची गर्दी त्यापेक्षा मोठी. त्यामुळे सगळीकडे कुंभमेळ्याचं बेशिस्त वातावरण.

पुजारीबुवांनी आम्हाला प्राधान्यक्रमानं दर्शन घडवण्याची व्यवस्था केली होती. याचा अर्थ असा की कायद्यासमोर सगळे समान समजण्यात येत असले तरी देवासमोर हा नियम चालत नाही. तेथे पैसे भरून पुण्य विकत घेता येतं. आमचा नंबर लागण्यास थोडा वेळ असल्यामुळे तिथल्या इतर देवळांचं दर्शन घेण्यास निघालो. देवळाच्या प्रवेशद्वारासमोरच सूर्यमंदिराचा, शिवाजी महाराजांनी स्थलांतरीत केलेला, उंच गरुडधारी स्तंभ दिसला. आता प्रत्येक देवळाजवळ पंडे पैसे मागू लागलेत. पुजाऱ्यांनी आम्हाला अगोदरच बजावलं होतं की जे काही दान करायचं असेल ते एका वेळी अन्नासाठी करा, इतर ठिकाणी पैसे उधळू नका म्हणून आम्ही मूठ आवळून धरली. त्यामुळे सर्व पंडे आमच्यावर नाखुश झाले. भक्त म्हणजे पैसे उकळण्याचं एक षडयंत्र अशी त्यांची भावना झाली होती.

शेजारीच बळिरामाचं छोटंसं देऊळ आहे. आत गेलो. नवीन सावज मिळालं म्हणून तिथला पंडा खुश. समोर बघितलं तर मूर्तीवर गलेलठ्ठ झुरळांची पलटण अनिर्बंधपणे फिरताना दिसली. हा प्राणी दिसला की सर्वसाधारण माणसाची प्रतिक्रिया एकच, जोड्याखाली त्याला चिरडणं. पण इथे ते शक्य नव्हतं. एक तर आम्ही अनवाणी चालत होतो. दुसरं म्हणजे देवस्थानातील कीटकांना अभय मिळालं होतं. त्यामुळे त्यांचं अखंडितपणे प्रजनन सुरू होतं. नवलाची गोष्ट म्हणजे आमच्या सौ.ला झुरळ म्हटलं की गळ्यातली स्वरपेटी तारस्वरात वाजवण्याची सवय. पण तिथे देव होता म्हणून म्हणा किंवा उपस्थित मंडळींच्या भीतीनं म्हणा, तिनं संयम कसा राखला हे मला अजूनही कळलेलं नाही.

अखेर दर्शनासाठी आमचा नंबर लागला. उंबरठा ओलांडताच धोतरातल्या एका गृहस्थानं फडासदृश काड्या पाठीवरून फिरवल्या व लगेच हात समोर केला. हा 'आशीर्वाद' विनामूल्य नव्हता तर! मग थोडं आत गेलो तर भलीमोठी परात घेऊन एक टिकलाधारी पंडा उभा. त्यातल्या ज्योतीनं त्याचा चेहरा प्रकाशमान झाला होता. त्या भांड्यात अनेक भारी नोटा पडल्या होत्या. त्या हेतूत: ठेवल्या असाव्यात. त्या बघून इतरांनाही अनुकरणीय कृत्य सुचेल हे फ्रॉईडचं तत्त्वज्ञान इथल्या पंड्यांनी अभ्यासलं होतं असंच म्हणावं लगेल. ते न कळण्याएवढे आपण मठ्ठ असाल तर तो पंड्या स्पष्ट शब्दांत आपल्याला दान करण्याची आठवण करून देण्यास मागेपुढे पाहत नव्हता.

शेवटी गाभाऱ्यात शिरलो. मिणमिणत्या प्रकाशात काही नीट दिसत नव्हतं. खाली जमीन ओली झालेली. त्यामुळे पाय घसरत होते. तरी भुईसपाट होणं शक्य नव्हतं कारण त्यासाठी तिथे मोकळी जागाच नव्हती. जगन्नाथ म्हणजे विष्णूचा अवतार. पण इथे तो निराकारी म्हणजे विनाआकाराचा होता. तिथे कुठल्याच प्रकारची मूर्ती नव्हती. होत्या त्या जगन्नाथ, त्याची बहीण सुभद्रा व भाऊ बलराम यांच्या लाकडी प्रतिमा.

गाभाऱ्यात अनेक आरत्या तेवत होत्या. प्रत्येकीत पैसे टाका म्हणून तिथले पंडे भक्तांना दटावत होते. तसं केलं नाही तर पाप पदरात पडेल असं त्यात अभिप्रेत होतं. लहान नोट टाकली तर ते जळजळीत कटाक्ष टाकून शाप देत. खिडक्या किंवा झरोके नसल्यामुळे आतलं अंधारलेलं वातावरण आरोग्यवर्धक व मन प्रसन्न करणारं वाटलं नाही. देवदर्शनाचं व्यापारीकरण मी जगात कुठे बघितलं नव्हतं. बेजिंगमधल्या बौद्ध पॅगोडात देखील मला अशी आक्रमक वृत्ती आढळली नाही. परातीत पैसे टाकेपर्यंतच इथे उभं राहण्यास परवानगी, पण भक्तिभावे नमस्कार करण्यास मनाई होती. तिथून आपली एवढ्या तडकाफडकी हकालपट्टी करण्यात येते की नॅनो सेंदकांची संकल्पना तिथेच जन्मली की काय अशी शंका येते.

काही वर्षांपूर्वी आम्ही तिरुपतीला गेलो होतो. तिथेही तेच. तिथे उभं राहून देवासमोर नतमस्तक होण्यापूर्वीच आपल्याला बाजूला सारण्यात येतं. या लघुदर्शनानं मन तृप्त होत नाही हे निश्चित.

हे 'देवदर्शन' झाल्यावर आमच्या पुजाऱ्यानं प्रसाद म्हणून हातावर भाताची शितं ठेवली. असा लाक्षणिक प्रसाद देण्यात त्याचा दोष नव्हता. आम्ही अनिवासी आजारी पडून सुटीचा बट्ट्याबोळ होऊ नये म्हणून एक नियम पाळतो. बाहेरचं काही एक खात नाही. नळाचं पाणी वर्ज्य! म्हणून पुजाऱ्याला फोनवरच सांगितलेलं होतं, की प्रसाद वगैरे नको. इथला प्रसाद म्हणजे उदार हातानं दिलेलं जेवणच. घामेजलेले, उघडबंब सेवक भाताचे व वरणाचे हांडे डोक्यावर घेऊन भोजनालयात जाताना दिसले. ते अन्न भारतातील सर्वात मोठ्या स्वयंपाकघरात शिजवलेलं. ते महालक्ष्मीच्या नजरेखाली तयार होतं अशी एक आख्यायिका आहे. एकंदरीत ५६ प्रकारचे नैवेद्य हिंदू चालीरीतींनुसार मातीच्या भांड्यात बनवण्यात येतात व देवाला दाखवल्यावर भक्तांना वाटण्यात येतात. इथे आलेला कुठलाच भाविक उपाशी परत जात नाही असं पुजारी म्हणाला. देवाला प्रथम नैवेद्य देण्याची संकल्पना आपल्या धर्मातच आढळते. ती मुस्लिमात किंवा ख्रिस्ती लोकांत मला दिसली नाही.

महालक्ष्मीच्या नजरेखाली हे अन्न तयार होतं हे खरं असावं कारण ती भाताची शितं मला अमृततुल्य वाटली. आरोग्यनियम धाब्यावर बसवून आम्ही इतर भक्तांप्रमाणे महाप्रसाद घेण्याचं ठरवलं. आमचं मनपरिवर्तन बघून पुजारी खुश झाला. त्यानं लगेच भात व वरणमिश्रित मातीचं भांडं आणलं आणि एका केळीच्या पानावर ते वाढलं. टेबल नसल्यामुळे ते पान पायरीवर ठेवण्यात आलं होतं. आम्ही चौघंही त्या सामूहिक जेवणावर तुटून पडलो. पण तत्पूर्वी मी जरा संभ्रमात पडलो, ते अन्न खाणार कसं?

आजकालच्या जगात बोटं निरुपयोगी झाली आहेत. नाठाळ मुलाला वठणीवर आणण्यास आपण त्यांचा उपयोग करू शकतो. पण तसं केलं तर बापाला अमेरिकेत तरी कारावासाची शिक्षा होण्याची शक्यता. संगणकावर टंकलेखन करण्यासाठी बोटं नक्की हवीत असं कुणी म्हणेल, पण ते चुकीचं आहे. स्टिव्ह जॉब्जनं आयफोन काढल्यापासून टंकफलक बोटांनी कुटण्याऐवजी नुसती टिचकी मारली की गणपतीला असलेलं सर्व ज्ञान उपलब्ध करता येतं. मग राहिलं जेवण. त्यासाठीही आजकाल कुणी बोटं वापरत नाही. मग काटेचमचे कशासाठी असतात! म्हणून देवानं आपल्याला बोटं कशासाठी दिलीत हा प्रश्न पडतो.

पुजाऱ्याला चमचा मागण्याचं मनात आलं. पण तिथली एकंदरीत परिस्थिती बघून ते साधन मिळण्याची शक्यता कमी होती. म्हणून अस्मादिकांना अनेक तपांत पहिल्यांदा बोटं वापरणं भाग पडलं. हे असंस्कृतपणाचं लक्षण समजतात हे माहीत असूनही. आयुष्यात कधी कधी अविचारानं जीवन जगावं लागतं.

शेवटी आम्ही चौघांनी तो गोपालकाला भारतीय पद्धतीनं ग्रहण केला. काटेचमच्यांच्या निर्जंतुक भोजनापेक्षा मला ते जेवण कितीतरी चविष्ट वाटलं हे विशेष. बोटांचं ओठांशी एक प्रकारचं भावनिक नातं आहे हे बऱ्याच वर्षांनंतर कळलं.

तिथले जीवाणू देवजंतू असल्यामुळे म्हणा, नाहीतर ते अन्न महालक्ष्मीच्या नजरेखाली तयार केलं म्हणून म्हणा, माझ्या तब्येतीवर ते बाहेरचं अन्न सेवन केल्यामुळे काहीएक परिणाम झाला नाही. देवावर विश्वास ठेवणं हा वैयक्तिक प्रश्न आहे. आजकाल नास्तिक होणं फॅशनेबल समजण्यात येतं. परंतु देवावर नसली तरी कशावर तरी माणसाची श्रद्धा असणं आवश्यक असतं. परंतु भुवनेश्वर व परिसर ही अशी ठिकाणं आहेत की ती नास्तिकांना देखील या जगात ईश्वर आहे हे पटवून देतील.

**अनंत लाभसेटवार**
2 Second Street, Unit # 2001,
Jersey City, N.J. 07302 USA
latalabh@aol.com

# नताशा कुठे गेली असेल?

**प्रा. प्रतिभा सराफ**

''हाय! मी रेखा'' मी माझं सामान खाली ठेवत म्हटलं.

माझ्याकडे जराही वर न बघता ती तिच्या पर्समधले सामान खालीवर करत राहिली.

मला जरा विचित्र वाटलं पण तरीही तिच्याचसोबत अजून याच खोलीत पुढील कितीतरी दिवस काढायचेत या विचारानं मी पुन्हा एकदा बोलण्याचा प्रयत्न केला.

''काय नाव आहे तुझं?''

''अबोली!'' अजूनही तिनं माझ्याकडे पाहण्याची तसदी घेतली नाही.

''वा! काय मस्त नाव आहे.'' ही माझी उत्स्फूर्त प्रतिक्रिया होती. मनात आलं; खरंच ही अबोल असेल तर माझं काय होईल?

कपाटाची भिंत तिच्या-माझ्यामध्ये होती त्यामुळे हवी तितकी जवळीक तर साधता येणार होती तरीही हवी तितकी प्रायव्हसीसुद्धा मिळणार होती. तिचं सामान अत्यंत व्यवस्थित लावून ठेवलेलं दिसत होतं. ते पाहूनही बरं वाटलं. खिडकीकडच्या बाजूच्या बेडवर ती होती. त्यामुळे मला मधला किंवा दाराकडचा बेड घेता येणार होता. माझी नजर इकडे-तिकडे फिरत असताना अचानक पाहिलं तर अबोली माझ्याकडे एकटक निरखून पाहत होती. माझं तिच्याकडे लक्ष जाताच ती म्हणाली,

''वेलकम्!'

मी हसले मनात म्हटलं, ''दिसते तितकी शिष्ट नसावी!''

''तू मधल्या बेडच्या क्युबिकलमध्ये ये, दाराकडे नको!''

हे ऐकून खूप बरं वाटलं म्हणजे हिच्या मनात मी हिच्या बाजूला असावं, एका अर्थानं जवळ असावं असं वाटतंय, ही खूप आनंदाची गोष्ट आहे. मी माझ्या बेडवर गेले. सर्व सामान काढून ठेवलं तर ती स्वत: उठून आली. म्हणाली,

''तुला मदत करू का?''

मी म्हटलं, ''मदत नको, पण तू इथे बसलीस गप्पा मारत तर मला बरं वाटेल.''

ती बसली. मी आधी बॅगेतले कपडे वेगवेगळे काढून गठ्ठे करू लागले, तर मध्येच एखादा कपडा पाहून ''काय मस्त रंग आहे!'' तर ''किती सुंदर टॉप आहे'', ''वा, काय डिझाइन आहे'' वगैरे बोलत बसली. मलाही हुरूप आला. तिच्याबद्दल खूप जाणून घेता आलं. पंढरपूरच्या जवळच्या खेडेगावांतून ती आलेली होती. तिचे वडील मुंबईमधील नावाजलेल्या हॉस्पिटलमध्ये सर्जन आहेत आणि आई सामाजिक कार्यकर्ती. कोणे एके काळी ती मुंबईतच राहायची पण तिसरीत असताना तिची रवानगी तिच्या आईच्या आईकडे म्हणजे पंढरपूरच्या आजीकडे झाली. शालेय शिक्षण संपल्यावर तिच्या आईनं तिला पुण्याच्या एका हॉस्टेलमध्ये सायन्सला टाकलं आणि आता आर्किटेक्ट करण्यासाठी, ती या हॉस्टेलवर आली होती.

मीही तिला माझ्याबद्दल सगळं सांगितलं. बोलता बोलता म्हटलं मला वडील नाही तर पटकन् म्हणाली,

''मला वडील असून नसल्यासारखेच आहेत.''

तिच्या या वाक्यावर मी तिच्याकडे आ वासून पाहू लागले तर ती तिथून उठून निघून गेली. माझं सामान लावून झालं तेव्हा आमच्या खोलीत अजून एक मुलगी आली. तिच्यासोबत आई, मावशी, मैत्रीण वगैरे होते. नितळ गोरा चेहरा, शेलाटा बांधा, उंच टाचेच्या सॅन्डल नि चेहऱ्यावर बेफिकिरी भाव! ती सोडून तिच्याबरोबरचे सगळे माझ्याशी खूप बोलले. मी कुठून आलीयपासून हिची काळजी घे, इथपर्यंत सगळं!

ती आली तेव्हा अबोली तिथे नव्हती. अबोली परतली तेव्हा तिनं मला ह्या नवीन मुलीचं नाव काय म्हणून विचारलं. पण मी तर तिचं साधं नावही विचारलं नव्हतं. मग आम्ही दोघी तिच्याकडे गेलो. तिचा चेहरा खूप उदास वाटला. साहजिकच होतं ते. इतके सगळे तिला सोडायला आले होते ना. तिला एकटं एकटं वाटत असणार. मी म्हटलं,

''मी रेखा, ही अबोली, तुझं नाव काय?''

''नताशा' म्हणत तिनं मोबाइल उचलला नि दाराबाहेर निघून गेली.

तिच्या वागण्याचं कारण लवकरच कळलं. तिच्या मनाविरुद्ध तिला हॉस्टेलमध्ये आणून सोडलं होतं. नताशा एका कपड्याच्या व्यापाऱ्याची मुलगी. तीही एकुलती एक. सायन्सला चांगले गुण मिळाल्यावर तिला इंजिनीअरिंगला जायचं होतं. पण दरम्यान ती आर्किटेक्टची परीक्षाही (CET) पास झाली होती त्यामुळे तिनं ह्याच क्षेत्राकडे जावं असं आई-वडिलांनी सुचवलं. नताशाला मात्र नाशिक सोडायचं नव्हतं. तिथे आयुष्य गेलं होतं आणि तिथेच तिला तिच्या जीवनाचा साथीदारही भेटला होता. त्या दोघांची ताटातूट करण्यासाठी नताशाच्या आई-वडिलांनी तिला इथं धाडलं होतं. नताशा अबोलीइतकी बोलकी नसली तरी मनात काही ठेवणारी नव्हती. पहिल्याच भेटीत तिनं तिची जीवनगाथा आम्हा दोघींना ऐकवली होती. नताशाचे वडील गुजराती आणि आई महाराष्ट्रीयन. त्यामुळे दोन्ही भाषांवर तिचं प्रभुत्व. पहिलाच दिवस असल्यामुळे आम्ही तिघी सोबतीनं बाहेर पडलो. कॉलेजची बिल्डिंग पाहून आलो. कॅन्टिन, मेस, जिमखाना, स्विमिंग पूल, लायब्ररी, गार्डन, शॉप्स, सगळंच त्या परिसरातच होतं. प्रवासानं दमल्यामुळे असेल वा पहिलाच दिवस असल्यामुळे असेल तिघींनाही अस्वस्थ वाटत होतं. रात्री उशिरापर्यंत आमचे फोन चालू होते. केव्हातरी आम्हाला झोप लागली.

अलार्मनं जाग आली तेव्हा दोघीही उठून तयार झालेल्या दिसल्या. मीही पटकन् तयार झाले. मेसमध्ये नाष्टा करून आम्ही कॉलेजमध्ये गेलो. आमच्या वर्गात तीस मुली आणि पाचच मुलगे होते. आमच्या सगळ्या फॅकल्टीच्या बद्दल आम्हाला माहिती दिली गेली. एकंदरीतच अभ्यासक्रम, टाईमटेबल, इतर कार्यक्रम, शिस्त वगैरेंबद्दल माहिती दिली. मी मनापासून शिकण्यासाठी इथे आले होते. त्यामुळे मला ते ऐकण्यात खूपच आनंद मिळत होता. जून महिन्यातील पावसामुळे असेल हवेतही आल्हाददायक गारवा जाणवत होता. हॉलमधून बाहेर पाहताना सगळीकडे हिरव्यागार झाडांनी नटलेला परिसर सुखावत होता. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे आईपासून सुटका झाल्यासारखं वाटत होतं. रोज इतकेच वाजता उठायचं, हेच खायचं, कुठे गेलीस? केव्हा येणार? कोणाशी बोलतेस? ह्या सगळ्या प्रश्नांचा भडीमार संपलेला होता. त्या दिवशी इतर मुलींशीही ओळख झाली. एकंदरीत आपलं चांगलं जमेल असं वाटून गेलं.

अबोलीच्या आई-वडिलांचा डायव्होर्स झाल्याचं तिनं सांगितलं तेव्हा माझ्याही डोळ्यांत पाणी आलं. आई कधीतरी भेटायला यायची पण वडिलांनी कधीच तिची चौकशी केली नाही. अबोली ही त्यांची मुलगी नाही हा त्यांना संशय होता आणि यावरून आई-वडिलांची भांडणं व्हायची. त्याला कंटाळून एकदा आईनं घर सोडलं; अबोलीला ह्या आजीकडे आणून ठेवलं नि ती सिमल्याच्या कुठल्याशा आश्रमात समाजसेवा करण्यासाठी निघून गेली. महिन्यातून एकदा आईचा फोन असायचा. तेव्हा अबोली दोन मिनिटांच्यावर बोलत नसे. मात्र आजीला फोन करून तिच्याशी तासन् तास गप्पा मारायची. हे मी पाहिलं होतं. नताशा मात्र आई-वडिलांशी मोजकंच बोले. मात्र तिच्या सख्याशी तासन् तास गप्पा करायची. त्याचा फोनसुद्धा तिचा मूड पूर्णत्वानं बदलून टाकायचा. आई कशीही असली तरी माझ्या चांगल्यासाठी ओरडायची. हे आताशा कळू लागलं होतं. मी तिला स्वत:हून फोन करायचे. तेव्हा ती किती खूश व्हायची. ती माझ्याशिवाय किती एकटी पडली असेल हे आतून जाणवायचं. तसं ऑफिसच्या कामात ती पूर्ण गढलेली असली तरी रात्री माझ्यासाठी अस्वस्थ होतच असणार, हे जाणवायचं.

मी माझ्या आईबद्दल फार बोलते असं अबोली म्हणायची पण मी अजून कोणाबद्दल बोलणार म्हणा? मला

आहेच कोण? आम्हा तिघींनाही आपापले प्रश्न होते. तरीही घरापासून दूर आम्ही एक कुटुंब म्हणून राहत होतो. मी तोच विचार करते की घरात चार माणसं असली तरी ते वेगवेगळ्या रूममध्ये झोपतात. त्यांच्या खाण्याच्या, बाहेर जाण्याच्या वेळा वेगवेगळ्या असतात त्यामुळे ते दिवसभरात फक्त काही तासच एकमेकांना भेटतात. पण आम्ही तिघी एकाच वेळी उठायचो, एकत्रच नाष्टा; जेवण घ्यायचो. एकत्रच कॉलेजमध्ये जायचो. कोणत्याही प्रोजेक्टवर तासन् तास एकत्रच काम करायचो आणि शेवटी झोपण्यासाठीही एकाच खोलीत यायचो. म्हणजेच कुटुंबासारखंच किंवा कुटुंबातील दोन सदस्यांपेक्षाही कितीतरी जास्त काळ एकत्र घालवायचो. फळं आणली तर अबोलीच कापणार, भेळ मीच बनवणार, नताशाच्या घरून गाठीया आल्या तरी ती अख्खी पिशवी मलाच सुपूर्द करणार. एकमेकांच्या संगतीत राहून आम्ही एकमेकींच्या सवयींना, स्वभावाला जाणून दिवस काढत होतो. कामाचा ताण वाढत होता. मी अधूनमधून घरी यायचे. मित्रमैत्रिणींना भेटायचे आणि फ्रेश होऊन जायचे पण नताशा घरी जायलाच तयार नसायची. तिच्या घरून त्यांच्या गाडीचा ड्रायव्हर खूप खायचं-प्यायचं आणून द्यायचा. इथे काही काम नसेल तरी नताशा 'खूप काम आहे' असं सांगून घरी जायचं टाळायची. या उलट अबोलीला खूप आजीकडे जायचं असायचं पण हळूहळू माझ्या लक्षात आलं की तिची आर्थिक परिस्थिती तशी चांगली नसल्यामुळे तिला फारसं जाता यायचं नाही. त्यामुळे तिची चिडचिड व्हायची. मुलींचं हॉस्टेल असल्यामुळे नताशाचा तो मित्र तिला भेटायला यायचा तेव्हा त्याला बाहेर थांबावं लागायचं, आम्हाला तिच्यावतीनं खूप खोटं बोलावं लागायचं. एकदा नताशाची आई तिला भेटायला आली. त्यांचं बोलणं मला स्पष्टपणे ऐकू येत होतं,



''तू मला मनाविरुद्ध इथे पाठवलंस, माझं इथे मन लागत नाही.''

''तुला तर तुझे डॅडी माहीतच आहेत, ते माझं काही ऐकतच नाहीत.''

''तू त्यांनाच मिळालेली आहेस.''

''असेलही, तुझ्या भवितव्याची मला काळजी आहे.''

''माझं भवितव्य निहार आहे.''

''निहार आपल्या तोलामोलाचा नाही.''

''या विषयावर मला बोलायचं नाही, आजही निहारच माझं सर्वस्व आहे.''

''तू इथे राहिलीस, तर हळूहळू त्याला विसरशील.''

''मी मेल्यावरही त्याला विसरणार नाही.''

''बेटा, तू आमची एकुलती एक मुलगी आहेस, आमचं सर्वस्व आहे. तू मरणाच्या गोष्टी करू नकोस.''

''पण जगण्यासाठी फक्त निहारच हवाय, हे लक्षात घ्या तुम्ही.''

''तो इथेही भेटायला येतो तुला, हे आम्हाला कळलंय. तुझे डॅडी तुला माहीत आहेत, ते काहीही करू शकतात.''

''तू मला धमकी देण्यासाठी आली आहेस?''

''नाही. समजावण्यासाठी!''

''तुझं बोलणं झालं असेल तर तू जाऊ शकतेस.''

''बेटा... प्लीज...''

''इनफ्, तू जा, परत परत येत जाऊ नकोस, मला त्रास होतो.''

''आईचा? त्रास?''

''...''

''बेटा...''

त्यानंतर हातातली कोणतीतरी वस्तू धाडकन् खाली फेकून नताशा खोलीबाहेर गेली. त्या आवाजानं मीही दचकले. मग पाच-दहा मिनिटे बसून तिची आई माझ्याकडे आली.

''बेटा, तुझ्याशी बोलू शकते?''

''हो मावशी, बोला ना!''

''मला विचारायचंय... की... की... नताशाला भेटायला कोणी येतं का इथे?''

''मला तरी माहीत नाही.''

''ती खूश आहे का इथे?''

''कदाचित!'' मी म्हटलं, तेव्हा तिच्या आईला डोळे टिपताना मी पाहिलं.

जड पावलांनी तिची आई बाहेर गेली. खाली ऑडी उभी होती. त्याच्यात बसून ती निघून गेली. मग खूप उशिरा नताशा परतली. त्या दिवशी आग्रह करूनसुद्धा ती जेवायला आली नाही. अबोली म्हणाली,

''नताशा किती लकी आहे, काय मस्त गाडी आहे तिची!''

मी म्हटलं, ''गाडी असून काय उपयोग, तिचे डॅडी राक्षस आहेत!''

''राक्षस? तू पाहिलं आहेस त्यांना?'' अबोली आश्चर्यानं म्हणाली.

''अगं, राक्षस म्हणजे, वाईट माणूस.''

''ते वाईट आहेत?''

''अगं वाईट म्हणजे, नताशाला जबरदस्तीनं त्यांनी ह्या कोर्सला पाठवलं. तिला इंजिनीअर व्हायचं होतं.''

''हं... शिवाय तिचा तो...''

असो, आपल्याला काय करायचंय? म्हणतच आम्ही खोलीत परतलो. खोलीत अंधार होता. आम्ही घाबरलो. लाईट लावला तर नताशा रडत झोपली होती. आम्ही तिच्या बेडवर बसलो. तिला खूप समजावून सांगितलं तरी ती रडायची थांबेचना. इतक्यात तिच्या बॉयफ्रेंडचा फोन आला. ती रडत रडत त्याच्याशी बोलली. त्यानंच बहुधा तिला शांत केलं. मेसमधून आम्ही बटाट्याची भाजी आणि पुऱ्या आणल्या होत्या. ते आग्रहानं तिला खाऊ घातलं. मग खूप उशिरापर्यंत गप्पा मारून आम्ही झोपलो.

कॉलेजमध्ये लेक्चर चालू असताना अबोलीला ऑफिसमधून कोणीतरी बोलवायला आलं. ती तिथून रडतच परतली. तिच्या आजीनं तिच्या दुसऱ्या टर्मची फी भरली नव्हती. तिला फोन केल्यावर अजून काही दिवस तरी तिला पैसे पाठवता येणार नव्हते. त्यामुळे ती डिस्टर्ब होती. माझी फी माझी आई किती मुश्किलीनं भरते ते मला माहीत होतं. त्यामुळे तिला ही मदत करणं मला शक्यच नव्हतं. नताशाला हे सहज शक्य होतं पण ती तिच्या वडिलांशी तर एक शब्दही बोलायची नाही आणि आई भेटायला आली तर त्या दोघी फक्त वादच घालायच्या. त्यामुळे मला नेमकं काय करावं कळेना. आठवडाभरानं तिच्या फीचे पैसे आले असं तिला सांगण्यात आलं. तिनं आजीला फोन केला तेव्हा तिला कळलं की तिचे फीचे पैसे वडिलांनी पाठवले. त्या दिवशी ती इतकी डिस्टर्ब होती की म्हणाली,

''मला शिकायचंच नाही!''

मी तिला समजावलं की जेव्हा तू कमवायला लागशील तेव्हा त्यांचे पैसे परत करून टाक. तिला ते पटलं नाही पण तिच्याकडे दुसरा काही पर्याय नव्हता. मध्यंतरी आईला बरं नव्हतं पण तिनं मला कळवलं नाही म्हणून मी आईवर खूप चिडले. मग मलाच वाईट वाटलं की मला टेन्शन येऊ नये म्हणून बिचारीनं कळवलं नसेल, इतकंही मी समजून घेऊ नये? अभ्यास वाढत होता. दिवस पुरत नव्हता. अर्धी रात्र सुद्धा अभ्यासातच जायची. प्रीती, नेहा, आकांक्षा ह्याही बाजूच्या खोलीमधल्या आमच्या मैत्रिणी आमच्या सोबतीनं अनेक विषयांवर चर्चा करण्यासाठी यायच्या. घरच्यांबद्दलचा विचार करण्यासाठी तसा वेळच मिळायचा नाही. पहिल्या वर्षाची परीक्षा जवळ आली होती. आम्ही सर्वच अभ्यासात गर्क होतो.

''निहारचा खूप दिवसांपासून फोन नव्हता असं नताशा म्हणाली'' असं अबोलीनं मला सांगितलं.

''आता आपण अभ्यास करायला हवा. परीक्षा आलीय ह्या विचारानं त्यानं फोन केला नसेल!'' मी म्हटलं आणि आम्ही परत कामाला लागलो. दोन दिवसांनंतर आमचा शेवटचा पेपर होता त्यानंतर महिनाभरासाठी आम्हाला सुट्टी मिळणार होती. आम्ही सगळ्याच आनंदात होतो. अचानक अबोली किंचाळली. तिचा आवाज ऐकून मी नताशाकडे

धावले. नताशा जोरजोरानं रडत होती. अबोली तिला समजावून सांगत होती. पण ती काहीही ऐकून घ्यायच्या मन:स्थितीत नव्हती. थोडंसं बोलल्यावर मला कळलं की, निहार बाईक चालवत असताना त्याला ट्रकनं ठोकलं आणि तो जागच्या जागी मेला. या घटनेला आठवडा झाला आणि आता ही बातमी नताशाला कळली. माझेही डोळे भरून आले. कोणत्याही परिस्थितीत तिला समजावणं भाग होतं कारण दोन दिवसांनी आमचा शेवटचा पेपर होता. आमचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. ती रात्री जेवायला आली नाही. खरं तर आम्हालाही जावंसं वाटेना. पण तिच्यासाठी काहीतरी खायला आणावं म्हणून गेलो, कारण खाल्ल्याशिवाय तिला झोप येत नाही, हे आम्ही दोघी जाणून होतो. आम्ही एकमेकांशी एकही शब्द न बोलता दोन घास पोटात ढकलून दोन पोळ्या नि भाजी घेऊन मेसमधून परतलो. नताशा तिच्या बेडवर नव्हती. वॉशरूम वा बाथरूममध्ये गेली असेल म्हणून आम्ही अर्धा तास वाट पाहिली तर ती तिथेही गेलेली नव्हती. शेजारपाजरच्या खोल्यांमध्ये तिची चौकशी केली तर ती तिथेही नव्हती. तिचा फोन बेडवरच पडलेला होता. आम्ही दोघी घाबरलो. मेट्रनला सांगितलं. तिनं सिक्युरिटी वगैरेंना सांगून तिचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. पण ती सापडली नाही. शेवटी तिच्या घरी फोन केला तर ते मेट्रनवर खूप चिडले. तिचे आई-वडील काही तासांतच हॉस्टेलवर पोहोचले. मी पहिल्यांदाच तिच्या वडिलांना पाहत होते. सहा फूट उंच, निळ्या डोळ्यांचे ते गोरेपान हॅन्डसम डॅडी लहान मुलांसारखे धाय मोकलून रडत होते. आई चिडून मेट्रनला ओरडत होती. पोलीस आले. आम्हाला दोघींना तर तीन-चार तास त्यांच्या प्रश्नांना सामोरं जावं लागलं. शेवटपर्यंत आम्ही तिच्या निहारबद्दल अजिबात बोललो नाही. कसं आम्हाला ते जमलं कोणास ठाऊक! त्या रात्री मी आणि अबोली एकाच बेडवर झोपलो. झोपलो कसले, रात्रभर रडलो. नेमकी नताशा कुठे गेली असेल?... निहारकडे?

**प्रा. प्रतिभा सराफ**
इ-१५०३, रुणवाल सेंटर,
देवनार, मुंबई ४०० ०८८
भ्रमणध्वनी : ९८९२५३२७९५

The Right Chemistry for a Brighter Tomorrow

*With Best Compliments From*

**AARTI INDUSTRIES LIMITED**

Manufactures and Exporters of
Benzene based intermediates, Bulk Pharmaceuticals; Agrochemicals;
Speciality Chemicals and Sulphuric Acid & Allied Products

**Head Office :** 'Udyog Kshetra', 2nd floor, Mulund-Goregaon Link Road,
Off. L.B.S.Marg, Mulund (W), Mumbai-400 080
Phone : 6797 6666 / 2591 8195 ● Fax : 2590 4806

**Factory & Regd. Office :** Plot No. 801, 801/23, GIDC Estate, Phase-III,
Vapi-396 195, Dist. Valsad
Phone : 0260 2400059 / 2431306 ● Fax : 0260 2401322

# असंही एक जग

**नीलिमा कानेटकर**

*उत्तरकाशीपासून चार तासांच्या अंतरावरचा पहाडी इलाखा. डोंगराच्या सान्निध्यातलं भांकोली गाव. खळाळत्या गंगेच्या पल्याडच्या या पहाडवासीयांनी जपलेली संस्कृती आणि आधुनिक साधनांचा वापर यांचा राखलेला विवेकी मेळ उल्लेखनीय आहे. मात्र नदीच्या अल्याड, उत्तरकाशीत, जगभर प्रसिद्ध असलेली श्रद्धास्थानं, तिथली बाजारू वृत्ती, देवळांमध्ये चालणारी दादागिरी, एटीएम सेंटरवर नजर ठेवून पीन नंबरच्या होणाऱ्या आधुनिक चोऱ्यांपासून छोटे-मोठे दरोडे, वेश्याव्यवसाय, स्त्रियांना मिळणारी दुय्यम वागणूक, अल्पवयीन मुलींचं शोषण ही तथाकथित आधुनिक जीवनाची दुरवस्था. गंगेच्या दोन तटांवरचं हे वास्तव... दोन प्रकारच्या जीवनपद्धतीतील ही तफावत विचार करायला लावणारी आहे.*

या वर्षीच्या पहिल्या चार महिन्यांतील प्रदीर्घ आजारानं माझ्यातला आत्मविश्वास डगमगला होता. व्हर्टिगोचं निदान झालं होतं, मधुमेहाचीही लागण झाली होती. अशक्तपणामुळे चक्कर येत होती. अनेक महिने बरा न झालेला ॲलर्जीचा खोकला जोडीला होताच. जीव जेरीला आला होता. माझा गेलेला आत्मविश्वास परत मिळवण्यासाठी प्रयत्न करणं अत्यावश्यक झालं होतं.

तब्येत थोडी सुधारत असताना उत्तरकाशीला डोडिताल या ठिकाणी गिर्यारोहणाला जाण्याची मला संधी आली. माझी वकील मैत्रीण सुमन जैन ही अनुभव ॲव्हेंचर या गटाबरोबर जाणार होती. गेल्या बारा वर्षांत तशीही कामाच्या व्यापामुळे हिमालयाकडे पाठ फिरवलेली मी, यावेळी मात्र मोह टाळू शकले नाही. सर्व शक्याशक्यतांचा विचार करून मी वय वर्षं अठ्ठावन आणि माझे पती श्रीकांत, वय वर्षं साठ, सर्व तयारीनिशी या गटाला दिल्लीत सामील झालो. गटातील सर्व वयोगटांतले स्त्री-पुरुष उत्साही होते. मी नुकतीच आजारपणातून उठले होते हे जाणल्यावर, विशेष ओळख नसतानाही सर्वजण माझी आस्थेनं काळजी घेत होते.

दिल्ली सोडल्यानंतर मात्र मी नकळत पण एकटीच, अंतर्मनातील वेगळ्याच जगात ओढले गेले. सर्वांमध्ये राहूनही मी माझ्या अंतरंगात प्रवेश केला होता. सुमारे बारा वर्षांपूर्वी सतत हिमालयाची वारी करताना तेथील निसर्गानं माझा ताबा कधी घेतला ते कळलंच नाही. त्यापुढे घडलेला वियोग अपरिहार्य होता. आता मात्र आतुरता वाढली होती, उत्सुकता होती. स्वत:बद्दल सर्व बाजूंनी मन साशंक झालं होतं. सर्वांसाठी मी अबोल झाले होते. परंतु माझा माझ्याशीच निशब्द संवाद सुरू झाला. बाहेरच्या निसर्गाशी, हिमालयातील वाटांशीसुद्धा!

रुढार्थानं धार्मिक नसूनही मी हळूहळू कळत-नकळत अध्यात्माची एकेक पातळी चढू लागले.

हरिद्वार, ऋषिकेश, उत्तरकाशी या मार्गानं आम्ही इच्छित स्थळी पोचण्यासाठी मार्ग कापत होतो. गेल्या वर्षी येऊन गेलेल्या पुराच्या खुणा, अनावर झालेल्या निसर्गाच्या

कोपाचे अवशेष दर्शवत होत्या. हिमालयातील अवघड वळणावळणाचे रस्ते, त्यावर पडलेल्या प्रचंड शिळा, रस्त्यांवर पडलेला ठिसूळ दगडांचा खच, यामुळे मार्ग खडतर झाला होता. केवळ वाहनचालकाच्या कौशल्यावर आमचं जीवन सुरक्षित होतं. क्षणोक्षणी वाटत होतं, आज काही खरं नाही... आता आपण पोचत नाही... घरी जाणं तर दूरच... जीवनाची क्षणभंगुरता अंगावर काटा आणत होती. आकाशाला भिडणाऱ्या हिमालयाच्या शिखररांगा, त्यावरील उंच वनराई कानात कुजबुजत होती, कशाला आलीस इथे? एवढासा जीव तू! आमच्यापुढे मात्र एक बिंदूच! माझ्याही नकळत माझ्यातील अहंभाव रसातळाला जात होता. मान त्या विराट रूपापुढे झुकत होती. दुसऱ्याच क्षणी एक विचार मनात डोकावला, जर मी इथे आलेच नसते तर हा अनुभव, ही जाणीव मला कशी आणि कधी अनुभवता आली असती? भीषण, क्षणभंगुर, तरीही ते अतुलनीय निसर्गसौंदर्य त्या क्षणाला माझ्या अंतर्विश्वातील एक अविभाज्य भाग झालं होतं.

प्रवासातील या क्षणांमुळे माझ्यावर विशेष संस्कार होत होते. मला माझ्या मागे गेलेल्या जीवनाचा अर्थ सापडत गेला. उंच झाडी, घनदाट जंगलं, ठिकठिकाणी पसरलेले रानफुलांचे सडे मला शिकवत होते – जग कसंही असो, ते तुझ्याशी कसंही वागो, तुला फक्त देतच राहायचं आहे... निरपेक्षपणे! जे पेरशील तेच उगवेल. तेव्हा पेरत जा, त्यातूनच काहीतरी चांगलंच उगवेल. यातूनच मला माझं भावनिक आणि वैचारिक अधिष्ठान मिळत गेलं. आमच्या 'आदिपथ फाउंडेशन' या संस्थेच्या संकल्पनेचा पाया बळकट करण्यात, व्यावसायिक जीवनात येणारे चांगले-वाईट प्रसंग आणि त्यांना सामोरं जातानाची मनस्थिती यांचा मेळ आता बसू लागला. कारण साक्षात निसर्गच गुरूच्या रूपात होता. इथेच स्वशोधाचा प्रवासही सुरू झाला.

उत्तरकाशीला खळाळणारी गंगा ओलांडून, उत्तरसंध्येला आम्ही हिमालयाच्या कुशीत शिरलो. घड्याळाच्या काट्यांवर समांतर रात्र पुढे सरकत होती. आमची बस अवघड घाटातून, डोंगरराशीतून घरंगळत होती. रस्त्याला दिवे नव्हते. संगम चेट्टी या बेस कँपवर पोचलो मात्र! तेव्हाचा नजारा अवर्णनीय होता. आकाशात लक्ष लक्ष तारे चमकत होते. झाडाझाडांतून लक्षावधी काजवे चमकत होते. इतर वेळी शहरी रोशणाईत रमलेला माझा जीव कितीतरी वेळ अवाक होऊन या मनोरम अंधारानुभवाचा प्याला बेभानपणे प्राशन करत राहिला. मधूनच रात्रीच्या अंधाराला छेदणारे पक्ष्यांचे चीत्कार ऐकू येत होते. प्राण्यांचे हुंकारही कानी पडत होते. शब्दांत न मावणारा हा क्षणभंगुर क्षण माझ्या मनावर कायमचा कोरला गेला.

उजाडल्यावर मात्र या जागेची निर्मनुष्यता अंगावर आली! ही जागा सोडून आम्ही पुढे प्रस्थान केलं. पुरामुळे रस्ते वाहून गेले होते तेव्हा पर्वतातील पायवाटेवरून आमची मार्गक्रमणा सुरू झाली. ही अक्षरश: पायवाट होती. दोन पाय मावतील एवढी अरुंद आणि खूप अवघड चढाची. सपाटीचा मार्गच नव्हता. ऊन चढू लागताच हा चढ पार करणं अवघड होऊ लागलं. दम लागला. वाटेत कसलंही दुकान अथवा चहाची टपरीही दिसेना. आमचा गट पुढे गेला. माझी चालण्याची गती कमी होत गेली. श्रीकांतनं माझ्यासाठी मागे राहणं पसंत केलं. सुमन जैन आणि गटप्रमुख अतुलभाई शहा हेही माझी काळजी घेण्यासाठी आमच्याबरोबर चालू लागले. आता मीच निर्णय घेतला की सोबत म्हणून गावातल्या एखाद्याची मदत घ्यावी आणि अतुलभाईंना पुढे जाऊ द्यावं. अतुलभाईंनी सहदेव या भांकोली गावातील घोडेवाल्याची ओळख करून दिली आणि सुमन आणि अतुलभाई पुढे होऊन गटाला जाऊन मिळाले.

सहदेवनं आमच्याकडून; विशेषत: माझ्याकडून अत्यंत काळजीपूर्वक जपून वाटचाल करवली. त्याच्याशी आमचे सहज भावबंध जुळले. सुमारे चार तासांनी, चहा प्यायला त्याच्याच घरी गेलेल्या आम्ही, त्याच्या घरकुलातच मुक्काम ठोकला. चार-पाच दिवस तिथेच राहिलो.

हा एक विलक्षण अनुभव होता. सहदेवचं घर पर्वताच्या टोकावर. खाली गुरांचा गोठा, वर चार खोल्या बांधलेल्या आणि इमारतीच्या टेबलावर स्वयंपाकघर शेजारी त्यानं पाहुण्यांसाठी दोन खोल्या बांधल्या होत्या. त्यापुढे दोन फुटांची ओटावजा ओसरी. ओसरीपुढे अडीच फुटांचं 'विस्तृत' अंगण! त्या अंगणातूनच गावातला रस्ता गेलेला. गावकरी, घोडे, खेचरं, बकऱ्या, शाळकरी मुलं, कॉलेजचे तरुण-तरुणी याच रस्त्यानं ये-जा करत होते. सहदेवनं घराबाहेर स्वतंत्र शौचालय व न्हाणीघराची सोय केली होती. पहाडातील गावातलं ते एक प्रगतिशील घर होतं.

आशिया खंडात, विशेषत: भारतीय संस्कृतीत अतिथी देवो भव ही खास संकल्पना जोपासलेली आहे. आता शहरी वातावरणात ही भावना कमी आढळते. नि:स्वार्थ बुद्धीनं आलेल्या पाहुण्याचं मनापासून स्वागत करण्याची प्रथा आमच्या शहरी जीवनातून वजा होते आहे. पहाडातील



सहदेव आणि रमेश

गावकऱ्यांमध्ये मात्र ही मूल्यं अजूनही जपलेली आढळतात. आपण काही विशेष करत आहोत असा भाव त्यामागे नसतो.

सहदेवच्या घरी राहताना त्याच्या कुटुंबाशी व आसपासच्या गावकऱ्यांशी परिचय होत गेला. या पहाडी रहिवाशांची मानसिकता समजत गेली. आम्ही समुद्रसपाटीवर राहणारी माणसं आणि हिमालयातील निमुळत्या पायवाटा, अवघड चढउतार ओलांडताना आमची उडालेली भंबेरी हा या गावकऱ्यांसाठी विनोदाचा विषय झाला होता.

तास तास आमच्या गप्पा रंगत होत्या. संगम चेट्टीहून भांकोली गावात येण्यास आम्हाला चार तास लागले, पण हेच डोंगरदऱ्यांतील अंतर गावकरी वीस ते तीस मिनिटांत पार करत असतात. सर्व वयोगटांतील म्हणजे अगदी पंचाहत्तरीच्या पुढचे लोकही हे अंतर बोलता बोलता सहज पार करून जातात. रोजची सवय आणि शुद्ध हवेतील प्राणवायूचा अनिर्बंध पुरवठा हे त्याचं मुख्य कारण. हिमालयातील जडीबुटींच्या औषधांचीही त्याला जोड असतेच.

गावाची अर्थव्यवस्था गुरांच्या व्यवसायावर अवलंबून आहे. पर्यटकांना सामान वाहण्यासाठी घोडे-खेचरं पुरवणं, सामान वाहून नेण्यासाठी हमाल देणं, चिंटुकल्या शेतीच्या तुकड्यावर शेती करणं या कामात त्यांचा दिवस पार पडतो.

घरातील मुलं पाच वर्षांची झाली की घरातील कामांची जबाबदारी उचलायला लागतात. धाकटी भावंडं सांभाळणं, गुरांना चारा घालणं, छोट्या पातेल्यातून गुरांना पाणी पाजणं अशी त्यांना झेपतील अशी कामं ते करतात. गावकऱ्यांत शिक्षणाचं महत्त्व आहे. घरातील पुरुष सकाळी साडेआठ-नऊच्या सुमारास लहानग्यांना स्वच्छ करून बालवाडीसाठी, शाळेसाठी तयार करतात. शाळेत पोचवतात. गृहिणींची नाश्त्याची तयारी चाललेली असते. तर कुणी गुरांना चारापाणी देण्यात मग्न असतात. मोठी मुलं स्वत:सोबत लहानग्यांना शाळेत नेतात. हे सारं अत्यंत सहजतेनं, शांतपणानं होत असतं.

सरकारनं या गावात शाळा काढल्या तशीच शिक्षणाची साधनंही पुरवली आहेत. इथे ज्युनियर कॉलेजपर्यंतचं शिक्षण पुरवलं जातं. त्यापुढचं उच्च शिक्षण घेण्यास इच्छुक मुलं-मुली उत्तरकाशी, डेहराडून अशा ठिकाणी जातात. शाळेत जाणारी ही मुलं चुणचुणीत होती. शाळकरी मुलांना पाढे येत होते. वरच्या वर्गातल्या मुलांना इंग्रजी शिकवायला सुरुवात झाली होती. या मुलांना आमच्याकडची इंग्रजी पुस्तकं चाळण्याची उत्सुकता होती.

हिमालयात जायचं म्हणून मी कॅननचा नवीन कॅमेरा विकत घेतला होता. सोबत त्याचं माहितीपुस्तकही होतं. गावातल्या भीषम् म्हणजे भीष्म या तेरा वर्षांच्या मुलाला या पुस्तकाची गोडी लागली. नववीच्या वर्गात शिकणारा हा मुलगा उत्सुकतेनं हे पुस्तक वाचत होता. त्यातील सूचना, चित्रं बघत होता. त्याबाबत माझ्याशी चर्चाही करत होता. सुरुवातील लांबून कुतूहलानं बघत राहणारी ही मुलं संकोच कमी झाला की जवळ येत होती. लहान मुलं मांडीवरही येऊन बसत होती.

भांकोली गावातून गावकरी तीस मिनिटांत पायी संगमचेट्टीला पोचतात. तिथून बसमधून तळाशी असलेल्या उत्तरकाशीला जातात. मोटारगाडीचा हा प्रवास अत्यंत खडतर व अवघड आहे. या प्रवासाला जाता-येता दोन्ही वेळा साडेतीन तास लागतात. उत्तरकाशी हे त्यातल्या त्यात सुधारलेलं गाव. खाजगी व सरकारी सुधारित शैक्षणिक सोयी, वैद्यकीय सोयी तिथे उपलब्ध आहेत. दिवस भरलेल्या स्त्रियाही बाळंतपणासाठी पदोपदी शरीराला गचके देणारा हा प्रवास करत उत्तरकाशीला जातात. सहदेवची पत्नी सीमाभाभीनंही हा अनुभव तीन वेळा घेऊन तीन कन्यारत्नांना जन्म दिलाय. तिसऱ्या मुलीच्या जन्मानंतर मात्र सहदेवनं नसबंदीची शस्त्रक्रिया करून घेतली.

सहदेवचे वडील सुरजीतसिंग यांनी आयुष्यभर हा पारंपरिक व्यवसाय केला. आज जवळजवळ ऐंशीच्या घरात असलेल्या सुरजीतसिंग यांनी भांकोली गावात तीनमजली घर बांधलं होतं. तसंच खालच्या अंगाला दुसरं एक तीनमजली घर बांधून ते पत्नी व मुलगा राजेश यांच्यासह तिथे राहत होते. एक छोटा जमिनीचा तुकडा शेतीसाठी होता. त्यावर आणखी दोन तुकडे त्यांनी विकत घेतले होते. ते आणि त्यांची पत्नी शेतीची कामं करतात. निसर्गाच्या प्रतिकूल परिस्थितीत आर्थिक कमतरता होती, मात्र चेहऱ्यावरील समाधानात काही उणीव नव्हती! त्यांनी सहदेवला जवळजवळ पदवीधर केलं, पण या परिस्थितीत त्यानं पुढचं शिक्षण घेण्याचं नाकारलं. काही वर्षं सहदेवनं दिल्ली व डेहराडून इथे नोकरीही केली. पण त्याला घरापासून दूर राहवेना. वडीलधाऱ्यांना गावात कष्ट करायला सोडून शहरात नोकरी करणं त्याला पटेना. नोकरीतही पगार तसा खूप काही नव्हता. स्वत:चं भागवून गावाकडे पाठवायला पैसे उरायचे नाहीत. एकटी पत्नी घरीदारी काम करते आहे, घरातल्या मंडळींना, मुलांना सांभाळते आहे हेही त्याला रुचेना. सीमाभाभी व सहदेवचे कुटुंबीय म्हणेज तिच्या सासरची मंडळी यांच्यात कमालीचा संमजसपणा आहे. परस्परांत प्रेम होतंच, तितकाच आदरभावही आहे. कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी सीमाभाभीच्या चेहऱ्यावरचं स्मिताचं चांदणं कधी मावळत नाही. सहदेवला, त्याच्या आईवडिलांना तिच्या घरातील, शेतीकामातील कष्टांची कदर असते. प्राप्त परिस्थितीतही घरच्या सूनेच्या छोट्या छोट्या हौशी पुरवण्याकडे त्यांचा कल असतो!

सहदेवच्या तुलनेत मोठा राजेश कमी कुवतीचा होता. त्याला शिक्षणात रस नव्हता. शहरात जाऊन नोकरी करण्याचं धाडस नव्हतं. गावी परत आल्यावर सहदेवनं त्याला चार खेचरं घेऊन दिली आणि पारंपरिक उपजीविकेचं साधन उपलब्ध करून दिलं. आज सहदेवकडे चार, राजेशकडे चार व वडिलांकडे दोन असे दहा घोडे/खेचरं आहेत. दोन गाई आहेत. बकऱ्या मात्र कोठे दिसल्या नाहीत. सहदेवचं हे कुटुंब आणि कौटुंबिक जीवन हे इथलं प्रातिनिधिक स्वरूप आहे.

पर्यटकांना घोडे पुरवणं, सामान वाहायला खेचरं पुरवणं, रानावनातील रस्ते शोधण्यासाठी वाटाडे पुरवणं या व्यवसायात हे कुटुंब व्यग्र आहे. या परिसरात हा व्यवसाय तीन-चार महिनेच चालतो. पावसाळ्यात वादळाचं, पुराचं तांडव असतं. थंडीच्या दिवसांत मरणाची थंडी असते. पूर्ण प्रदेश बर्फाच्छादित असतो.

सहदेवमध्ये उद्योजकाचे गुण आहेत. त्यामुळे त्यानं पर्यटकांसाठी गेस्ट हाऊस म्हणून सिमेंटच्या दोन पक्क्या खोल्या बांधल्या आहेत. या खोल्यांमध्ये तो हळूहळू नवनवीन सोयी करून घेतो. थंडीच्या दिवसांत बर्फाच्या खेळाची मजा लुटायला येणाऱ्या पर्यटकांसाठी खास सोयी करून घेतल्या आहेत. सहदेवचं घर तसं मोक्याच्या ठिकाणी आहे. समोरच जवळजवळ सहा हजार फूट खोल दरी, पलीकडे घनदाट जंगलाची झूल पांघरलेला विशालकाय डोंगर, गावाला सर्व दिशांनी वेढलेली हिमालयाची दहा शिखरं दिसतात. त्यापैकी दोन-तीन शिखरांनाच हिमाचे मुकुट घातलेले दिसत होते.

असं असलं तरी गावाला वीज आणि पाणीपुरवठा आहे. गावात सरकारी दवाखाने, आरोग्यकेंद्रं आहेत. पशुसंवर्धनासाठी व त्यांच्या आरोग्यासाठी केंद्रं आहेत. तिथे येणारे तज्ज्ञ उत्तरकाशीहून रोज तो प्रवास करून येतात! हवामान थंड असलं तरी दिवसा उन्हाचा तडाखा जाणवत होता. प्रत्येक घरात सोलर सिस्टिम होती. सोलरवर चालणारे कंदील घराघरात होते. जरुरीपुरतं पाणी गरम करण्याची सोय होती. विजेची चोरी, पाण्याची चोरी हे विषय त्यांना माहीत नव्हते!

गावात दारूचे गुत्ते नाहीत. काही वेळा चोरून हा उद्योग केला गेला तरी गावकरी, ग्रामपंचायत यांच्या जागरूकतेनं ते बंदही केले जातात. ज्यांना 'पार्टी' करायची असेल ते गावकरी उत्तरकाशीला जाऊन 'जीवाची उत्तरकाशी' करतात. त्यानंतर एवढा प्रवास करून गावात परत येईपर्यंत त्यांची झिंग उतरलेली असते. शिवाय पैसेही खूप खर्च होतात. त्यामुळे गावात दारूबाजांचं प्रमाण जवळजवळ नाहीच. दारू पिऊन पत्नीला, मुलांना मारहाण, वडीलधाऱ्यांची पैशांसाठी गळचेपी असे प्रकार तिथे आढळत नाहीत.

एकंदरीतच गावकऱ्यांकडे मालमत्ता कमी, त्यामुळे संपत्तीसंबंधी, घरगुती हिंसाचाराबाबत तंटे सहसा उद्भवत नाहीत. जर असे प्रसंग आलेच तर ग्रामपंचायत त्यात हस्तक्षेप करते आणि समन्वय घडवून आणते. इतर गावकरीही यात सक्रिय मदत करतात.

आर्थिक सुबत्ता नसली तरी शांती-समाधानाची इथे वानवा नाही. आमच्या चार-पाच दिवसांच्या तिथल्या मुक्कामात कुठल्याही घरातून कुणाचे कारवादलेले, त्रासलेले, भांडणाचे आवाज, रडारड असे काही आढळले नाही.

गावातील विवाहपद्धतीमध्ये कुटुंबातील वडीलधाऱ्यांनी ठरवून दिलेले विवाह होतात, पण प्रीतिविवाहही त्यांना मान्य आहेत. मुलींना विवाहामध्ये ऐपतीप्रमाणे दागिने, कपडे दिले जातात. त्यावरून कुटुंबांत मान-अपमान होत नाहीत. मुलींच्या

माहेरच्या कुटुंबीयांची पिळवणूक केली जात नाही. हुंडाबळी, हुंड्यासाठी सुनेवर अत्याचार होण्याचे प्रकारही इथे नाहीत. घरात येणाऱ्या सुनेला पूर्ण सन्मानानं स्वीकारलं जातं. कुटुंबातील खडतर प्रसंगांना, समस्यांना तोंड देणारी एक सक्षम सदस्य म्हणून तिच्याकडे पाहिलं जातं. स्त्री-भ्रूणहत्या हा प्रकार या परिसरात नाही. अगदी लहान मुलीपासून वृद्धेपर्यंत घरातील समस्त स्त्रीवर्गाचं कष्टांत प्रचंड योगदान असतं. कुटुंबातील पुरुषवर्ग याची मन:पूर्वक जाणीवही ठेवतो. त्यांचा मान राखतो. अनेक पुरुषांनी, तरुण मुलांनीही गप्पा मारताना मोकळेपणानं सांगितलं की त्यांच्या कुटुंबातील स्त्रिया पुरुषांपेक्षा अनेक पटींनी कष्ट करतात. पुरुषवर्ग पर्यटकांबरोबर आठवडेच्या आठवडे बाहेर असतात, पण घराचे दैनंदिन व्यवहार याच स्त्रियांमुळे सुरळित चालू राहतात. पुरुषांना घराची काळजी नसते. त्यामुळेच पुरुष घरी असतील तेव्हा दिसेल ते काम मनापासून करतात व दैनंदिन कामात मदत करतात. इंपॉर्टन्स ऑफ ह्युमन रिसोर्सेस आणि मॅनपॉवर या संकल्पना तिथे नैसर्गिक रीत्या रुजल्या आहेत. मात्र स्त्री-पुरुषांमध्ये फाजील मोकळेपणा दिसला नाही, तरी संकोच व भयही नव्हते. लैंगिक असमानतेचा जणू तेथे स्पर्शही झाला नव्हता. बलात्कारासारखे गुन्हे, ॲसिड ॲटॅक, स्त्रियांवरील लैंगिक अत्याचार गावात आढळत नाहीत, पण बाहेरचे लोक येऊन काही आमिषं दाखवून मुलींना शहरात नेण्याचे तुरळक प्रकार मात्र घडलेले आढळले. या मुलींना शहरातून शोधून आणण्याची आर्थिक क्षमता व धैर्य गावकऱ्यांत नसते. मुलगी परत येण्याची ते वाट बघत राहतात. अनेक वेळा शहरात गेलेल्या मुलींकडून पैसेही येत राहतात. शहरात गेलेली मुलगी मात्र, सहसा परत येत नाही.

दरवर्षी अतिवृष्टमुळे, वादळामुळे, पुरामुळे रस्ते-पूल वाहून जातात व सर्व पहाडी परिसर जलमय होतो. शहराशी संपर्क तुटतो. त्यामुळे अन्नधान्य, भाजीपाला व इतर जीवनावश्यक वस्तू अनेक दिवस मिळत नाहीत. अशा अडचणीच्या वेळी सरकारकडून या गावांना मदत मिळते. हेलिकॉप्टरमधून जीवनावश्यक सामान पुरवले जाते तरी परिस्थिती गंभीरच असते.

यथावकाश आमच्याशी गप्पा मारायला गावातील तरुण-तरुणी एकत्र आले. रोज जणू काही आमच्या सभा झाल्या. त्यातूनच आम्ही त्यांना सहकारी तत्त्वावर धान्य, किराणा माल व इतर सामानाची गोदामं, दुकानं उभी करून गावकऱ्यांची सोय करण्याचं आवाहन केलं. या तरुणवर्गाला सहकारी तत्त्वावर दूधव्यवसाय चालतो याची माहिती होती. म्हणूनच त्यांना आमच्या सूचनेचं महत्त्व पटलं. तरुणवर्गातील अनेकजण शिक्षित असल्यानं उत्साही होते. अडचणीही दिसत होत्या, पण चर्चेतूनच मार्गही निघत होते. सहदेव व त्याचा मित्र रमेश यांच्या नैसर्गिक नेतृत्वगुण होते. गावातील बहुतेक सर्व तरुणांकडे मोबाइल होते. त्याचा उपयोग माहीत होता. गावात सहा-सात टीव्ही होते. दोघांकडे संगणकही आहे. इंटरनेटही आहे. त्यायोगे बाहेरच्या जगाशी त्यांची ओळख होत असते.

मोबाइल फोनच्या वापरानं या तरुणांचं त्या भागात प्रभावी नेटवर्क पसरलेलं असतं. व्यावसायिक कंत्राटदारांची काही प्रमाणात पद्धत आहे. शिवाय सहकार्य व मैत्रीच्या भावनेतून एकमेकांना मदत केली जाते. एकमेकांकडे पर्यटक ग्राहक पाठवले जातात व त्यांची पूर्णत: काळजी घेतली जाते. उत्तरकाशीहून गंगोत्रीला जाण्यासाठी रस्ता आहे. शेवटपर्यंत गाड्या जातात तरी हजारो पर्यटकांना या परिसरातील गावकऱ्यांची मदत घ्यावीच लागते. नैसर्गिक आपत्ती आली तर मोबाइलद्वारा हे लोक एकमेकांच्या संपर्कात राहण्याचा पुरेपूर प्रयत्न करतात.

पहाडी रहिवाश्यांना या नवीन साधनांची ओळख आहे. मात्र औद्योगिक क्षेत्रात आढळणारे हेवेदावे, स्पर्धा, पैशांचा हव्यास इथे कमी प्रमाणात आढळला. त्यांच्यात असलेलं निसर्गाबद्दलचं प्रेम व आदर उल्लेखनीय आहे.

देशाच्या लोकसंख्येच्या तुलनेत हा आकडा लहान आहे. परिस्थिती प्रतिकूल आहे. दारिद्र्य आहे. पण सक्षम जीवनमूल्याचं धन जपल्यानं हे पहाडी लोक एकप्रकारे श्रीमंत आहेत, हे आपल्याला डोळसपणे स्वीकारावं लागतं.

हिमालयातील दऱ्याखोऱ्यांमध्ये दोन्ही दिशांना जाणारा एकुलता एक अरुंद रस्ता, रस्त्यावर फक्त सिझनमध्ये आढळणारी पर्यटकांची, गिर्यारोहकांची तुरळक गर्दी, रहिवाशांची ये-जा, एका बाजूला डोळे फिरवणारी खोल दरी, दरीतलं आणि दरीपलीकडचं घनदाट जंगल, उंच झाडांचं वैभव, वेळी-अवेळी पडणारा पाऊस, अनेक तासांच्या प्रवासानंतर येणारं पायथ्याचं शहर/गाव, अशा डोंगरमाथ्याच्या टोकावर लक्ष्मीचं चिमुकलं घर! या चारएक खोल्यांतच तिनं पाच-सहा गिर्यारोहकांची एक-दोन दिवसांच्या वस्तीची सोय केली आहे. तिच्या अंगणातच 'मचाण' करून तिथे जेवणखोली ठेवली आहे. ती या उंचावरच्या खोलीत प्रवाशांसाठी नाश्ता-जेवण पुरवते. तीसेक वर्षांचं वय

असलेल्या या स्त्रीला एक वर्षाचा, नुकताच चालू लागलेला, मुलगा आणि तीन वर्षांची एक मुलगी होती. तिचा पती शहरगावात नोकरीला होता. पती वर्षातून काही महिने घरी येऊन राहत असे. पण शहरात त्याला कायमचा पत्ता असलेलं घर नाही. तो नोकरीही बदलत असतो त्यामुळे तिला त्याचा ठावठिकाणाही माहीत नसतो. अशा प्रतिकूल परिस्थितीत दोन लहानग्यांना घेऊन ती एकटीच राहते. एकटीच व्यवसाय सांभाळते. देशी-परदेशी अनोळखी प्रवासी, रस्त्यावरून जाणारे हमाल व इतर प्रवासी यांना चहा-पाणी पुरवणारी लक्ष्म खरं तर अशिक्षित, पण हिशोब ठेवण्यात अत्यंत हुशार! काय बिशाद कोणाची की कोणी तिला पैशांसाठी फसवेल.

पर्यटकांना आईच्या मायेनं खाऊ घालणारी ती तिची नजर मात्र करारी आणि धारधार! कोणाही पुरुषाची तिच्याकडे नजर वाकडी करून बघण्याची हिंमत होत नाही. सतत जळणाऱ्या चुलीतलं जळकं लाकूड आणि कोयता हीच तिची हत्यारं. या हत्यारांच्या जोरावर ती स्वत:चं संरक्षण करत असते.

जंगलातील बिबळे, चित्ते, अस्वलं यांसारखे पशू आणि माणसांतले पशू या सर्वांनाच ती याच हत्यारांनी पळवून लावते. जवळपास साप, किरडू, विंचू निघाल्यास लोखंडी कांबेनं ढोसून दूरवर ढकलून देते. स्वत:ला सांभाळण्यासाठी, सुरक्षिततेसाठी ही पहाडकन्या इतरांकडे हात पसरत नाही. इतरांवर अवलंबून नाही. रोजच्या जीवनाच्या धकाधकीतून, हालअपेष्टांतूनच ती स्वतंत्र जीवन जगत आहे. कोणत्याही दृष्टीनं 'मी कमी पडते आहे' ह्या भावनेचा तिला स्पर्शही झालेला नाही. स्वदया (सेल्फ पिटी) हा शब्द तिनं कधी ऐकलेला नाही. ही निसर्गकन्या आपलं आयुष्य सहजतेनं जगत आहे.

'आपल्याला अभिप्रेत असलेली स्त्रीशक्ती हीच तर नव्हे!' माझ्या मनात साक्षात्काराचा जणू स्फोटच झाला. माझी आर्थिक सुस्थिती, उच्च शिक्षण, व्यावसायिक जीवन याबद्दलचा माझ्या मनातला अहंभाव जणू बाष्परूपानं विरून गेला.

या गावातील वास्तव्यात मी जणू भावनिक पातळीवर त्या गावाचीच होऊन गेले.

आम्ही राहणार हे कळल्यावर दुसऱ्या दिवशी सहदेव बाजारहाट करण्यास उत्तरकाशीला गेला. सकाळी सात वाजता गेलेला सहदेव रात्रीचे आठ वाजले तरी परतला नाही तेव्हा सगळ्यांनाच काळजी लागली. त्याची परतीची बस

*With Best Complimenst From*



# Chetana Enterprises

M.I.D.C., Taloja

अंधारामुळे उलटली का, वाघानं खेचून नेलं का, अशा अनेक शंका-कुशंकांनी मन भरून आलं.

सामानाच्या ओझ्यानं वाकलेला सहदेव धापा टाकत येताना पाहून सगळ्यांचा जीव भांड्यात पडला. दुसऱ्या दिवशी दुपारच्या जेवणाचे पदार्थ मी करून सगळ्यांना 'पार्टी' द्यायची असं ठरलं. सहदेवनं हट्टच धरला.

सकाळी मी त्याच्या घराच्या तिसऱ्या मजल्यावरचं स्वयंपाकघर बघितलं. हलणाऱ्या दगडांच्या पायऱ्यांवरून माझा महाकाय देह वर चढवणं हा एक विनोदी व प्रेक्षणीय प्रसंगच ठरला! पोरांपासून थोरांपर्यंत सारे पोट धरून हसत होते.



सुंदरी आणि वीर यांच्यासोबत नीलिमा कानेटकर

स्वयंपाकघर अंधारं! एक मिणमिणता दिवा! पत्र्याच्या पेटीतून खाद्यपदार्थ, मसाल्याचे पदार्थ भरून ठेवलेले. लाकडाच्या चुलीवर स्वयंपाक करण्याची माझी भीष्मप्रतिज्ञा! सगळाच विनोद. सहदेव-सीमा माझ्या मदतीला धावले. पूर्ण गुळगुळीत झालेल्या दगडावर दुसऱ्या गुळगुळीत दगडानं सीमानं तळलेला जाडाभरडा खडा मसाला वाटून दिला. चुलीत कांदे भाजले. सहदेवनं कापून दिलेल्या कांद्याची खमंग फोडणी करून प्रेशर कूकरमध्ये कोंबडी शिजायला ठेवली. या स्वयंपाकघरात प्रेशर कूकरशिवाय कोणत्याही नव्या साधनाचा प्रवेश झाला नव्हता. मुंबईचं माझं स्वयंपाकघर सगळ्या सोयींनी सुसज्ज असल्यामुळे या स्वयंपाकघरात पुराणातल्या सीतेची किंवा द्रौपदीची आठवण झाली. त्यांच्या वनवासातील वास्तव्यात त्यांना असाच अनुभव आला असेल का?

त्या दिवशी महाराष्ट्रातील आदिवासींमध्ये केलं जाणारं 'वशाटाचं कालवण' हिमालयातील पहाडवासीयांनी चाखलं. चाखलं कसलं, चाखून बोटं झिजायची वेळ आली! खमंग भाजलेला मसाला घालून चुलीवर शिजलेल्या कोंबडीच्या मटणाची चव अजूनही सर्वांच्या जिभेवर रुळते आहे. माझ्या कल्पनेपलीकडे हा प्रयोग यशस्वी झाला.

या पार्टीच्या आठवणी घेऊन आम्ही मुंबईला घरी परतलो. आल्यानंतर काही दिवसांतच उत्तराखंडात निसर्गाचा कोप झाल्याची दृश्यं टीव्हीवर दिसत होती. निसर्गाचं ते भीषण थैमान बघताना आम्ही किती सुखरूप घरी आलो याबद्दल देवाचे आभार मानत होतो. भांकोलीच्या गावकऱ्यांची आठवण येत होती. आम्ही सतत फोनवर त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत होतो, पण त्यांचा जगाशी संपर्क तुटला होता.

सहदेवच्या कुटुंबावर आर्थिक संकट आलं होतं. श्रीकांतच्या ओळखीतून त्यानं सहदेवसाठी हृषिकेश, रूरकी, डेहराडून येथे नोकरीही शोधली होती, पण भांकोली गावाचा जगाशी संपर्कच तुटल्यामुळे सहदेवला नोकरीच्या ठिकाणी जाता येत नव्हतं. पैसे पाठवले असते तरी मिळाले नसते अशी स्थिती होती. त्या दरम्यानच सरकारनं त्या प्रदेशाला हेलिकॉप्टरनं रसद पुरवली आणि संकट तात्पुरतं टळलं. सहदेवच्या कुटुंबियांशी आमचा सतत फोनवरून संपर्क असतो.

आजही आम्ही आणि सहदेवचं कुटुंब एकमेकांना जीवनाचा अविभाज्य भाग मानतो. 'वसुधैव कुटुंबकम्' या संकल्पनेचा यापेक्षा वेगळा अर्थ काय असू शकतो?

**नीलिमा कानेटकर**

जी ९१, लोकमान्यनगर, तळमजला,
कटारिया मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
दूरध्वनी : ०२२-२४३६६३८३
भ्रमणध्वनी : ९९६७०१५२०
neelimakanetkar@gmail.com

# कहाणी पार्वतीबाई आठवले यांची

**प्रभाकर भिडे**

पार्वतीबाई आठवले व रमाबाई रानडे या पाच–दहा वर्षांच्या फरकांनी एकाच वेळी समाजकार्य करत होत्या. रमाबाईंना आर्थिक पाठबळ होते. त्यांचे यजमान न्यायमूर्ती होते. त्यांना समाजात मान होता, परंतु पार्वतीबाईंना प्रतिकूल काळ असूनही त्यांनी महत्त्वाचे काम केले. त्यांनी अनेक मौलिक सूचना केल्या. केशवपन नाभिकाकडे न करता वडील, दीर किंवा मुलगा यांनी करावे, त्यात जास्त सुरक्षितता येईल असे त्यांचे विचार कृतीच्या जवळ जाणार होते. स्त्री सुधारणांच्या इतिहासात त्यांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल.

अनेक पुस्तके वाचत असताना एखादे पुस्तक आपल्याला 'प्रभावीत' करते, का करते? 'अभिजात' पुस्तक कुठले याची निश्चित व्याख्या करता आली नाही तरी वेगवेगळ्या लोकांनी वेगवेगळी मते मांडली आहेत. त्यातून खऱ्या कसोटीच्या जवळ जाणारी व्याख्या म्हणजे अभिजात गायकासारखी आहे. जो त्याचा आकृतिबंध न तोडता, परंपरेत राहून पण आपली एक नवीन चौकट तयार करतो. पुस्तकाचीही तशीच व्याख्या करता येईल की जे कादंबरी किंवा कथा किंवा ललित साहित्याची पारंपरिक चौकट न मोडता, पण आकृतिबंधाच्या पलीकडे जाऊन नवीन चौकटीचे दर्शन घडवते.


या दृष्टीने राजहंस प्रकाशनचे पुनर्प्रकाशित पुस्तक 'माझी कहाणी' हे पार्वतबाई आठवले यांचे आत्मचरित्र खिळवून ठेवते. वास्तविक त्यावेळी रमाबाई रानडे यांच्या जीवनावरील 'उंच माझा झोका' ही मालिका चालू होती. लोक रमाबाई रानडे यांच्या 'आमच्या जीवनातील आठवणी' या पुस्तकावर व मालिकेत गुंगून गेले होते. ती मालिका लोकप्रिय झाली होती.

पार्वतीबाई आठवले या रमाबाईंच्या समकालीन, पण त्यांच्यापेक्षा कठीण परिस्थितीवर मात करून त्यांनी स्त्रीजीवन सुधारण्याचा प्रयत्न कसा केला हे या आत्मचरित्रात फार सुंदरपणे उलगडले आहे. त्यावरून त्यावेळचे स्त्रीजीवन किती कठीण, त्रासदायक व पुरुषावलंबी होते याची कल्पना येते.

अशा कठीण प्रसंगातसुद्धा स्त्रिया आपले मार्ग स्वत: कसा शोधतात याची गोष्ट म्हणजे पार्वतीबाई आठवले यांचे 'माझी कहाणी' हे पुस्तक. हे पुस्तक पहिल्यांदा १९२८ साली प्रकाशित झाले. त्यामध्ये १८९८ ते १९२८ पर्यंतच्या ३० वर्षांची मध्यमवर्गीय स्त्रियांची कहाणी सांगितली आहे. जसजसा काळ पुढे गेला त्याप्रमाणे सुधारणा झाल्या, पण त्यांची गती फार मंद होती. कारण लोकांच्या मनावर धार्मिक संस्काराचा पगडा फार खोलवर रुजलेला असतो.

अलिकडे 'काकस्पर्श' चित्रपट आणि 'उंच माझा

झोका' ही टीव्ही मालिका यांनी भारतीय परंपरेतील 'लाल आलवणा'चा दुष्ट भाग 'ग्लॅमर वर्ल्ड'मध्ये आणला आहे. भारतीय संस्कृतीमध्ये विधवा स्त्रियांच्या कहाण्या दु:खार्त आहेत. पतीचे निधन झाल्यावर पत्नीचे केशवपन करण्यासाठी समाजाने केलेले हाल भयंकर होते. मुलगी जीवाच्या आकांताने ओरडत असे. सर्व पुरुष सुंदर स्त्रीचे केशवपन करून तिला लाल आलवणात विद्रूप करताना हताशपणे बघत. धर्मशरण वृत्तीने होणारे ते अत्याचार मनाला क्लेश देत. तरी रूढी इतकी प्रबळ होती! मात्र तशा तऱ्हेचे जीवन वाट्याला आलेल्या पार्वतीबाई आठवले यांनी लिहिलेले आत्मचरित्र- 'माझी कहाणी' हे पुस्तक म्हणजे मनोधैर्याची अद्‌भूत गोष्ट आहे. पुस्तक फक्त शंभर पानी आहे. विनया खडपेकर यांनी प्रस्तावनेत, 'एक सामाजिक कर्तव्य म्हणून हे पुस्तक पुनर्मुद्रित केले आहे' असे म्हटले आहे. ती योग्य गोष्ट वाटते. ते वाचताना, स्त्रीसुधारणांसाठी स्त्रियांनी किती मौलिक काम केले आहे ह्याची जाणीव होते.




पार्वतीबाई आठवले (माहेरचे नाव कृष्णा बाळकृष्ण जोशी) यांचा देवरूख या कोकणातील खेड्यामध्ये १८७० साली जन्म झाला. त्यांचा त्यावेळच्या प्रथेप्रमाणे अकराव्या वर्षी विवाह झाला. त्यांचे यजमान गोव्यामध्ये कारकून म्हणून काम करत असत. ते एका पायाने अधू होते. पार्वतीबाईंनी लग्नापूर्वी त्यांना पाहिलेही नव्हते. त्याकाळी मुला-मुलींची लग्ने घरातील मोठी माणसे ठरवत. पार्वतीबाईंची तीन बाळंतपणे वयाच्या अठरा वर्षांपर्यंत झाली. तीन मुलांपैकी एक मुलगा जगला. पार्वतीबाई अठरा वर्षांच्या असताना त्यांच्या पतीचे दुर्धर रोगाने निधन झाले. तेथून त्यांच्या जीवनाचा अवघड प्रांत सुरू झाला.

पतीच्या सात वर्षांच्या सहवासानंतर, त्यांच्या मृत्यूनंतर अठरा वर्षांच्या पार्वतीबाईंचे मुंडन करण्यात आले व त्यांना संन्यासधर्माची दीक्षा देण्यात आली. त्यांच्या नशिबी लाल लुगडे नेसण्याचे आले. एकदा संन्यासधर्म स्वीकारला, की त्या व्यक्तीने कसली आसक्ती ठेवायची नाही; कुठल्याही शुभ प्रसंगाला जायचे नाही. बायकांच्या बाबतीत तर लाल लुगड्याच्या बाईचे दर्शन अशुभ मानले जाई. अठरा वर्षांच्या मुलीला ते कसे शक्य व्हावे? ज्यांनी संसाराची व ऐहिक सुखाची चवच चाखली नाही, त्यांना ते जीवन कसे कळणार? त्यांच्यावर बळजबरी व जुलूम करून ते लादले जाई. ते देखील घराच्या लोकांकडून, नातेवाईकांकडून- आई-वडील-सासू-सासरे यांच्याकडून! पण पार्वतीबाई धीट व धाडसी होत्या. त्या न घाबरता अथक प्रयत्नांनी पुढे शिकल्या. त्यांनी मिळालेल्या संधीचे सोने केले. ती कहाणी म्हणजे हे पुस्तक.

पार्वतीबाई आठवले या महर्षी धोंडो केशव कर्वे यांची पत्नी बाया कर्वे यांची सख्खी धाकटी बहीण. बाया कर्वे वयाच्या नवव्या वर्षीच विधवा झाल्या होत्या. कर्वे यांनी विधवा बाया यांच्याशी विवाह केला. बायाबाईंचे भाऊ नरहरपंत जोशी यांची धों.के. कर्वे यांच्याशी मैत्री होती. दोघे शिक्षणानिमित्त एकत्र आले. दोघेही एकत्र राहत. दोन्ही कुटुंबे एकत्र राहत असल्यामुळे धों.के. ऊर्फ अण्णांनी १८९८ साली दोन्ही घरांच्या संमतीने विवाह केला. ती बातमी वृत्तपत्रामध्ये छापून आली. तेव्हा, देवरूखच्या जोशी (बाया कर्वे यांचे माहेर) यांचे घर वाळीत टाकले गेले. पुढे, एक वर्षानंतर त्यांनी प्रायश्चित्त घेऊन गावाच्या देवळाला देणगी दिली तेव्हा बहिष्कार मागे घेतला गेला.

आई-वडील पार्वतीबाईंना घेऊन काशियात्रेला निघाले. त्यावेळी पुण्याला भेट दिली असताना अण्णा कर्वे व पत्नी बाया कर्वे यांनी त्यांना आग्रहाने काशियात्रेला न जाता आपल्या घरीच ठेवून घेतले. पार्वतीबाईंना ट्रेनिंग कॉलेजपर्यंत शिक्षण दिले. पण सुज्ञ पार्वतीबाईंनी पुन्हा विवाहाच्या भानगडीत न पडता धोंडो केशव कर्वे यांनी सुरू केलेल्या 'अनाथ बालिकाश्रम' या संस्थेमध्ये आजन्म सेविकेचे व्रत स्वीकारले.

कर्वे यांनी 'अनाथ बालिकाश्रम' १९०२ साली पुण्याजवळील हिंगणे येथे सुरू केला. पहिल्या वर्षी अठरा मुलींनी आश्रमाचा आश्रय घेतला. आश्रम तीन खोल्यांमध्ये होता. मुली एका खोलीमध्ये राहत असत. दुसरी खोली शिक्षणासाठी व तिसऱ्या खोलीत स्वयंपाकघर होते. पार्वतीबाई स्वत:हून स्वयंपाकापासून सर्व कामे करू लागल्या. जणू त्यांना त्यांच्या जीवनाचा उद्देश कळला. आश्रमातील स्त्रियांची संख्या १९०४ साली पन्नासपर्यंत गेली. अण्णा कर्वे बैलगाडीतून आश्रमात जात. रस्ता चांगला नव्हता. त्यांची गाडी एक-दोन वेळा उलटली. अण्णांना छोटा अपघात झाला. अण्णा कर्वे यांना, तसे काही झाल्यास आश्रम पुढे

कसा चालेल, ही चिंता होती. कारण अण्णा मुलींना शिकवत. इतर वेळेमध्ये आश्रमासाठी वर्गणी/देणग्या गोळा करत व त्यासाठीच मुख्यत: बाहेर जात. म्हणून पार्वतीबाईंनी आश्रमासाठी वर्गणी/देणग्या गोळा करण्याचे काम पत्करले. त्यांनी ते काम सातत्याने व सचोटीने केले. त्यामध्ये त्यांना अनंत अडचणी आल्या. त्या कोठे गेल्या की सभा घेत. पण सभेमध्ये कोण बोलणार, असे विचारल्यावर त्या स्वत:चे नाव सांगत. दुर्दैवाने त्या सोवळ्या, लाल लुगडे नेसलेल्या बाई. त्यांचे भाषण कोण ऐकणार? लोक लक्ष देत नसत. त्याकाळी स्त्रियांना समाजात किंमत नव्हती. पण इच्छा असते तेथे मार्ग असतोच! पार्वतीबाई चिकाटीने आश्रमाची माहिती सांगत. त्या आलेल्या अनुभवांतून शहाणे होत पार्वतीबाईंनी आपले काम सातत्याने चालू ठेवले. अर्थात त्यांना अण्णा कर्वे यांचा पाठिंबा होता, मदत होती.

पार्वतीबाईंचे बोलणे ऐकल्यावर लोकांना त्यांची कामाबद्दलची कळकळ व आत्मीयता कळे. पण १९०५ साली एक विधवा बाई स्त्रियांच्या आश्रमासाठी वर्गणी गोळा करते, गावोगावी जाते हे अपूर्व होय! त्या इंदूर–भोपाळ येथपर्यंत गेल्या; तेथील संस्थानिकांना, श्रीमंत लोकांना, शाळा–कॉलेजांमधील मुलांना भेटल्या. त्यांना कामामध्ये यश मिळू लागले. वर्गणी गोळा होऊ लागली. त्या आश्रमाच्या वार्षिक खर्चाएवढी अंदाजे तीन हजार रुपये वर्गणी दरवर्षी दोन–तीन महिन्यांमध्येच गोळा करू लागल्या. अण्णा कर्वे यांनी त्यांच्या आत्मचरित्रात त्यांच्याविषयी गौरवोद्गार काढले आहेत. 'पार्वतीबाईंशिवाय आश्रमाचा एक पाय लंगडा राहिला असता' असे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या धाडसासंबंधीच्या हकिगती दिल्यावाचून हे आश्रमवृत्त पुरे होऊ शकणार नाही असे काम त्यांनी जवळजवळ एक तप केले, असा उल्लेख केला आहे.

अण्णा कर्वे यांना महिला विद्यापीठ सुरू करायचे होते. त्यांनी त्याकरता पार्वतीबाईंना १९१८ साली अमेरिकेत व युरोपमध्ये पाठवले. त्यांनी तेथील शिक्षणसंस्था बघाव्या, आश्रमाकरता मदत गोळा करावी असा अण्णांचा हेतू होता. पार्वतीबाईंना इंग्रजी विशेष येत नव्हते, पण निष्ठेने काम करणाऱ्यांना कुठलीच अडचण येत नाही! त्यातून त्या पूर्ण शाकाहारी. दोन–तीन महिन्यांचा प्रवास बोटीवर भाज्या मिळत नसत. ब्रेड, बटर व फळे खाऊन राहावे लागे. त्यामुळे त्या आजारी पडल्या. पण त्याही अवस्थेत त्या अमेरिकेला गेल्या. तेथील चरितार्थासाठी कुटुंबात मुले सांभाळणे, भांडी घासणे अशी कामे केली. त्या जवळजवळ एक वर्ष आजारी होत्या. त्यांना बऱ्याच भारतीयांनी सल्ला दिला, की त्यांनी परत जावे. तेथील थंड हवा त्यांना झेपणार नाही, असा त्यांचा सल्ला. पण पार्वतीबाई त्यांच्या निश्चयावर ठाम होत्या. त्या एक वर्षानंतर अमेरिकेत समाजकार्य करणाऱ्या बाईबरोबर राहू लागल्या. त्या दोघींचा स्नेह चांगला जमला. अमेरिकन बाई मजूर संघटनांचे काम करत असे. पहिली 'जागतिक मजूर परिषद' अमेरिकेत भरली होती. पार्वतीबाई त्या अमेरिकन बाईबरोबर मजूर परिषदेला गेल्या. तेथे त्यांना भाषण करण्याची संधी मिळाली नाही तरी त्यांनी आश्रमाची माहिती सांगून वर्गणी गोळा केली. तेथून त्या तीन वर्षांनंतर परतल्या. त्यावेळी त्यांनी भरपूर वर्गणी/देणग्या गोळा केल्या होत्या. पण त्यांतील एका पैशाचाही त्यांनी स्वत:करता उपयोग केला नाही. त्यांनी परत येताना इंग्लंडला भेट दिली, तेथील महत्त्वाची ठिकाणे पाहिली.

भारतात परत आल्यावर त्यांनी राष्ट्रीय सभा–राष्ट्रीय समाजवादी परिषदेला हजेरी लावली. त्यामध्ये स्त्रियांच्या प्रश्नावर जोर देऊन स्त्रियांचे विवाहाचे वय वाढवावे– ते वीसपर्यंत असावे, विधवांवर केशवपनाची सक्ती करू नये, विधवा विवाहाची परवानगी द्यावी, बालविवाह करू नये असे विचार प्रकट केले.

त्यांनी त्यांच्या मुलाला शिकवले. त्यालाही आश्रमाचा आजीव सेवक केले. पुढे तो तेथील महाविद्यालयाचा प्राचार्य झाला. पार्वतीबाईंनी त्यांचे आयुष्य स्त्री सुधारणांसाठी वाहिले. पार्वतीबाई आठवले व रमाबाई रानडे या पाच–दहा वर्षांच्या फरकांनी एकाच वेळी समाजकार्य करत होत्या. रमाबाईंना आर्थिक पाठबळ होते. त्यांचे यजमान न्यायमूर्ती होते. त्यांना समाजात मान होता, परंतु पार्वतीबाईंना प्रतिकूल काळ असूनही त्यांनी महत्त्वाचे काम केले. त्यांनी अनेक मौलिक सूचना केल्या. केशवपन नाभिकाकडे न करता वडील, दीर किंवा मुलगा यांनी करावे, त्यात जास्त सुरक्षितता येईल असे त्यांचे विचार कृतीच्या जवळ जाणार होते. स्त्री सुधारणांच्या इतिहासात त्यांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल. स्त्रियांनी घेतलेल्या मेहनतीमुळे धर्माचा पगडा कमी होऊन स्त्री–पुरुष समानता निर्माण होण्यास मदत झाली. तो न्याय मिळण्यास पुढे बराच काळ जावा लागला, पण पार्वतीबाईंसारख्यांच्या कामामुळे त्याला गती आली असे म्हणावे लागेल.

**प्रभाकर शंकर भिडे**
२०२, राधाश्री सोसायटी,
सावरकर रोड, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९८९२५६३१५४

# डायरी भरण्याचा दिवस

**सुभाष सुंठणकर**

जानेवारी महिना. अण्णासाहेब सहस्रबुद्धे महाविद्यालयात ती बातमी आली आणि अचानक खळबळ उडाली. बातमी मंगळवारी आली आणि बातमी समजताच प्राचार्यांनी सर्व प्राध्यापकांसाठी फर्मान काढले, की उद्या बुधवारी कॉलेज शिक्षणाधिकारी सकाळी ११ वाजता कॉलेजला भेट देणार आहेत. ते सर्व प्राध्यापकांच्या डायऱ्या चेक करणार आहेत. सर्व प्राध्यापकांनी संपूर्ण भरलेल्या डायऱ्या आजच तयार ठेवाव्यात.

शिक्षणाधिकारी कडक होते. त्यांचा सर्व परिसरात दरारा होता. ते आधी कळवून येत असत. कोणती पाहणी करणार ते कळवत असत व मग पाहणी करत असत.

त्यामुळेच ते येणार हे समजल्यावर कॉलेजात खळबळ उडाली. बऱ्याच जणांनी डायऱ्या भरलेल्या होत्या. अत्यंत व्यवस्थित भरल्या होत्या. ते मुळीच डगमगले नाहीत. मात्र ज्यांनी अर्धवट भरल्या होत्या अथवा थातुरमातुर पद्धतीने भरल्या होत्या त्यांची पांचावर धारण बसली.

डायरी भरणे हे तसे सोपे काम नव्हते. प्रत्येक प्राध्यापकाला एक मोठी डायरी देण्यात आली होती. त्या डायरीत रोज केलेल्या कामाची रोज नोंद करणे गरजेचे होते. तारीख, वेळ, वर्गात काय शिकवले त्याची सविस्तर नोंद, वर्गातील हजर मुलांची संख्या, गैरहजर मुलांची संख्या आदी तपशील रोजच्या रोज भरणे आवश्यक होते. काही प्राध्यापक रोज डायरी भरत नसत. कधी ४-५ दिवसांनी तर कधी १०-१२ दिवसांनंतर एकदम भरत असत. त्यामुळे काही नोंदी ते अंदाजपंचे करत असत.

नांदेडकरांची तर तारांबळच उडाली. प्राचार्य सहसा अधेमध्ये डायऱ्या चेक करत नाहीत हे माहीत असल्याने नांदेडकरांनी आपली डायरी घरी ठेवलेली होती. ते घरीच डायरी भरत. त्यांनी ऑक्टोबर महिन्यापर्यंतचीच डायरी भरली होती. नोव्हेंबर, डिसेंबर व जानेवारीची डायरी लिहायची होती. ते इकॉनॉमिक्स शिकवत असत. घरी जाऊन पटकन डायरी आणणे व भरणे भाग होते. त्यांचे घर १२ किलोमीटरवर ससेवाडी या गावात होते. ते कधी बसने तर कधी स्कूटरने येत. आज ते बसने आले होते. स्कूटर असती तर घरी जाऊन डायरी आणण्यास निदान पाऊण ते एक तास लागला असता. बसने तर खूपच वेळ लागला असता. एकेक तासाला बस सुटत असे. बसला ससेवाडीला पोचण्यास पाऊण तास लागे. तेथून घरी चालत जाऊन डायरी आणणे, स्टँडवर बससाठी थांबणे, मग ससेवाडी ते शहर. शेवटी बस स्टँड ते कॉलेज आणि मग भराभर डायरी भरणे हे सारे कठीणच होते.

कुणाची तरी स्कूटर घेऊन जायचे नांदेडकरांनी ठरवले. कन्नमवार यांची स्कूटर मागावी तर कन्नमवारांशी त्यांचे वैर होते. दोघांमध्ये सिनियर कोण हा त्यांच्यामध्ये वर्षानुवर्षे वाद होता. मालवणकरांची स्कूटर मागावी तर ती स्कूटर मोडकी

होती. हॉर्न सोडून त्या स्कूटरचे सर्व भाग खडखड खडखड वाजत असत. शेवटी सपकाळ सरांची स्कूटर न्यायची त्यांनी ठरवले. सपकाळकडे त्यांनी स्कूटर मागितली तेव्हा सपकाळ म्हणाले, 'घेऊन जा की हो. ससेवाडी, कासववाडी, मुंगूसवाडी, कोल्हेवाडी, शिक्षणाधिकारी येणार म्हंजी तीन तिक्कट महा बिक्कट काम. स्कूटर घेऊन जा पण संध्याकाळी तुमी मला चिरमुरे, शेव, खारे बुंदी, कोरडी भेळ दिली पायजे बगा गाडीवरची.'

अट मान्य करून स्कूटरची चावी घेऊन नांदेडकर निघणार तोच त्यांच्या लक्षात आले आज एक वाजता आपला इकॉनॉमिक्सचा क्लास सेकंड इयरच्या वर्गावर आहे. नांदेडकरांना क्लास घ्यायचा नव्हताच. त्यांनी हळूच हणमंता पिऊनला बोलावून सांगितले ''आज एक वाजता सेकंड इयरच्या वर्गावर जायचं आणि हळूच मुलांना आज क्लास नाही म्हणून सांगायचं. अगदी गुपचूप हं, त्या हरामखोर कन्नमवारला अजिबात कळता कामा नये.''

हणमंताला अधुनमधून नांदेडकरसर रगडा-पॅटिस देत असल्याने तो त्यांची कामे बिनबोभाट पार पाडायचा.

नांदेडकर बाहेर पडणार तोच औरादकर-कुलकर्णी समोर प्रकट झाले. नांदेडकर डायरी आणायला चाललेत हे त्यांनी ओळखले होतेच. ते म्हणाले, ''नांदेडकर उन्हाचं कशाला जाता हो एवढ्या लांब? तेही डायरी आणायला. गप्प बसा. काही जाऊ नका. उद्या बहुतेक शिक्षणाधिकारी येणार नाहीच. प्राचार्यांनी त्यांच्या नावाखाली सर्वांच्या डायऱ्या भरून घेण्याचं हे कुटिल कारस्थान रचलेलं दिसतंय. प्राचार्य स्वतः लेचापेचा. वरिष्ठांचा धाक दाखवून कामं करवून घेतोय. ससेवाडीला जात बसू नका.''

नांदेडकर औरादकर-कुलकर्णींना चांगलेच ओळखत होते. औरादकर-कुलकर्णींनी स्वतःची डायरी आजपर्यंत भरलेली असणार व इतरांना डायरी न भरायला प्रोत्साहन देऊन ते इतरांना तोंडघशी पाडणार हे नांदेडकरांनी ओळखले व ते औरादकर-कुलकर्णींना न जुमानता ससेवाडीकडे रवाना झाले.

पटकन जाऊन डायरी घेऊन यायची म्हणून नांदेडकर निघाले तर वाटेत पेट्रोलच संपले. स्कूटरमधले रिझर्वचेही पेट्रोल संपले. सपकाळ नेहमी एक लीटर पेट्रोल फक्त भरत असत. त्यामुळे पेट्रोल संपल्याने पेट्रोलपंपापर्यंत त्यांना गाडी ढकलत न्यावी लागे. कधी कधी त्यामुळे ते कॉलेजात उशिरा पोचत व प्राचार्यांकडून ओरडून घेत. आता नांदेडकरांनी स्कूटर पेट्रोल पंपापर्यंत म्हणजे जवळजवळ अर्धा किलोमीटर चालत नेली. पेट्रोल भरले. ते ससेवाडीला गेले. त्यांना पाहताच तीनचार गिऱ्हाईके गोळा झाली. नांदेडकर ससेवाडीत फावल्या वेळात चारा, गवत व कीटकनाशके विकत असत. आज डायरी भरायची असल्याने त्यांनी गिऱ्हाईकांना 'संध्याकाळी या'. म्हणून कटवले व डायरी घेऊन ते लगबगीने कॉलेजकडे परतले. भराभर डायरी लिहिण्यात गुंगून गेले.

डायरी लिहिण्याची राघवन यांची पद्धत निराळीच होती. ते डायरी लिहायला खुर्चीवर न बसता स्टुलावर मांडी घालून बसायचे. शर्टाचे वरचे बटण ते कधी लावत नसत आणि मान व गळा ते रुमाल बांधून झाकत. त्यांच्या तोंडात सदा मसाला पान असे. त्यामुळे त्यांचे तोंड लाल लाल असायचे. केस भरपूर असूनही जन्मात त्यांनी कधी कंगवा विकत घेतला नसावा. त्यामुळे गोडबोले सरांनी त्यांचे नाव 'मवाली राघवन' ठेवले होते. ते रोज डायरी न लिहिता कामगारांच्या साप्ताहिक पगाराप्रमाणे फक्त शनिवारी संध्याकाळी डायरी लिहीत. डायरी सविस्तर लिहिली पाहिजे हा नियम सरळ धुडकावून ते शॉर्ट फॉर्म वापरत. ऑक्सिजन न लिहिता $O_2$, नायट्रोजन न लिहिता $N_2$, थेयरी ऑफ डायल्युट सोल्युशन्स न लिहिता फक्त डी. सोल्युशन्स, सॉलीड स्टेट न लिहिता फक्त एस. एस., पिरिऑडिक क्लासिफिकेशन ऑफ इलिमेंटस न लिहिता फक्त पी.सी.ओ.ई., अरेनियस थेअरी ऑफ इलेक्ट्रोलेटिक डिसोसिएशन न लिहिता ए.टी.ओ.इ.डी. असे ते लिहीत.



त्यामुळे त्यांची डायर इतर कुणी वाचली तर त्यांना समजत नसे. ती फक्त राघवनलाच समजत असे. गोडबोले सरांनी त्या शब्दांना 'टेलिग्राफिक लँग्वेज' असे नाव ठेवले होते.

शिक्षणाधिकाऱ्याला सर्वांच्या डायऱ्या दाखवत बसायचे नाही असे त्यांचे मत, ते 'गिव्ह मनी. डोन्ट शो डायरी अँड डायरी' म्हणायचे. चिरीमिरी देऊन प्रकरण मिटवण्याकडे त्यांचा कायमचा कल असे. केव्हाही पगारवाढ जाहीर झाली की 'गिव्ह मनी मी. डिफरन्स ब्रिंग आय, अर्ली इन अर्ली' असे काहीसे ते म्हणायचे. सर्वांकडून पैसे गोळा करायचे व वरिष्ठ कार्यालयात जाऊन पगारवाढीच्या डिफरन्सचे चेक घेऊन यायचे. आता सुद्धा घाईघाईत डायऱ्या लिहीत न बसता शिक्षणाधिकाऱ्याला चिरीमिरी देऊन संकटातून बाहेर पडूया असे त्यांचे मत. ते त्यांनी अनेकांना सांगितले पण गलेलठ्ठ पगार मिळवणाऱ्या प्राध्यापकांमध्ये ५० टक्के प्राध्यापक काटकसरी तर २० टक्के प्राध्यापक चिक्कू होते. त्यांनी राघवनचा हा बेत उधळून लावला, 'पैसे काय झाडाला लागतात?', 'आय वील नॉट गिव्ह ए सिंगल रुपै', 'करप्शन इज ऑलवेज बॅड', 'आधी ही लोकं डायऱ्या भरण्यात कामचुकारपणा करणार आनी आपल्या आंगलट येतंय म्हनल्यावर हा हलकटपणा करनार व्हय रं? आमी सज्जन लोकांन्नी आमच्या आमच्या डायऱ्या आदीच भरलेत, तुमची पापं झाकऱ्यासाठी आमी पयशे कां म्हनून देयाचे?', 'इतरांनी पाहिजे तर पैसे द्यावेत. माझ्याकडे आता पैसे नाहीत.', 'मी नाही बाई देणार. आधीच हळदीकुंकवाचा खर्च काल खूप झालाय. पैसे कधी वाटत सुटतात की काय?' अशी मुक्ताफळे उधळण्यात आली.

इकडे प्रा. औरादकर-कुलकर्णींनी प्राध्यापिका वाळिंबे यांना त्यांच्या केबीनमध्ये जाऊन गाठले. ते म्हणाले,

"काय म्हणता वाळिंबे मॅडम? मॅगझिनची तयारी चालली वाटतं? हे प्रिन्सिपॉलनी डायरीचं मध्येच काय नस्तं खुळ काढलंय?"

"माझी तर जवळजवळ सगळीच डायरी भरायची आहे हो."

प्राध्यापिका वाळिंबेनी जुलै महिन्यात फक्त एक आठवडाच डायरी लिहिली होती. त्यामुळे त्यात हिंदीच्या फक्त ३ कविता व २ धडे यांची नोंद होती. पुढील २२ धडे व ५० कवितांची नोंद करायचीच होती.

"मग आता डायरी भरत बसणार की काय? मूर्खपणा करणार? हं हे हं हं ..." औरादकर-कुलकर्णी हसले.

"मी कशाला डायरी भरू?"

"म्हणजे?"

"हे बघा. मी स्पष्टच सांगते. कोणत्याही प्राध्यापकानं डायरी भरूच नये, असं माझं स्पष्ट मत आहे..."

"आँ ... म्हणता काय?"

"अहो डायरी भरायला लावणं हा प्राध्यापक जमातीवरचा अविश्वास झाला. जमात हा शब्द उचित आहे की नाही याबाबत वाद होऊ शकेल. प्राध्यापकवर्ग म्हणा. प्राध्यापक समुदाय म्हणा. प्राध्यापक जात म्हणा. पण अविश्वास आहे हे नक्की."

"अविश्वास?"

"डायरी भरायला लावणं हा प्राध्यापकांवरचा अविश्वास झाला. सारे प्राध्यापक मनापासून काम करत असतात. आपापलं काम व्यवस्थित करत असतात. मग ते लिहून आणि कशाला दाखवायला पाहिजे? 'आम्ही कामं करतो, ही बघा' म्हणून डायरीत लिहून ती काय जाहिरातबाजी करायची आहे?"

"करेक्ट, अगदी करेक्ट."

"मी तरी डायरी लिहिणार नाही बाई."

"लिहूच नका तुम्ही."

"आणि तुम्हीही लिहू नका."

"मी कशाला लिहू?"

असे जरी औरादकर-कुलकर्णींनी म्हटले तरी त्यांनी डायरी आधीच लिहिलेली होती. ते दररोज इतरांना नकळत डायरी भरून ठेवत असत.

"आणि उद्या जर शिक्षणाधिकाऱ्यांनी विचारलंच तर मी त्यांना सरळ सांगणार, माझा डायरी लिहिण्यावर विश्वास नाही. मी डायरी लिहिणार नाही..."

"गुळमुळीतपणे सांगून उपयोग नाही हो. स्पष्टपणे..."

"गुळमुळीतपणे काय गुळमुळीतपणे? मी अगदी स्पष्टपणे सांगणार आहे. अगदी निक्षून सांगणार आहे. प्राध्यापकांना डायरी लिहायला लावणं हा प्राध्यापकांवर अन्याय आहे. जास्त पगार देता म्हणजे काय वाट्टेल ती कामं लावायची? आणि ..."

"पगार जास्त कुठं आहे? नवीन स्केल अजून लागू व्हायचं आहे."

"शिक्षणाधिकाऱ्यांनी जर जास्त आवाज केला तर मी सरळ त्याच्याशी भांडणार आहे. सरळ त्यालाच फैलावर घेते की नाही ते बघा."

"सोडू नकाच तुम्ही."

शिक्षणाधिकाऱ्यांचे व वाळिंबेबाईंचे भांडण व्हावे व याचा परिणाम होऊन वाळिंबेबाईंना प्राचार्यांकडून मेमो मिळावा व शिक्षणाधिकाऱ्यांकडून लेखी तंबी मिळावी हा हेतू मनात बाळगूनच औरादकर-कुलकर्णी बाईंना उत्तेजन देत होते.

''सोडणार नाहीच मुळी.''

''पण मी म्हणतो, प्राचार्यांनी तरी डायऱ्या भरण्याबाबत इतक्या उशिरा आम्हाला का कळवावं?''

''त्यांना आजच फोन आलाय ना?''

''अहो, प्राचार्यांना चार दिवसांपूर्वीच फोन आलाय. शिक्षणाधिकारी बुधवारी डायऱ्या चेक करणार हे त्यांना चार दिवसांपूर्वीच समजलंय.'' औरादकर-कुलकर्णींनी थाप ठोकली.

''अस्सं? मग प्राचार्यांनाही जाब विचारला पाहिजे. आधी चार दिवस समजलं असतं तर सर्वांनी शांतपणे व्यवस्थित डायऱ्या भरल्या असत्या. शांत मनानं कामं जशी नीटनेटकी होतात तशी गडबडीत होत नाहीत. आता सगळे जण शॉर्टकट मारत वाट्टेल तशा डायऱ्या भरत बसले असणार. मी सरळ प्राचार्यांनाच जाब विचारणार. सरळ शिक्षणाधिकाऱ्यांच्या पुढ्यात त्यांना जाब विचारते बघा.''

''तुम्ही एकदा मनावर घेतलं की काही सोडत नाही. हं हं हं हं.'' एवढे बोलून औरादकर-कुलकर्णी तेथून बाहेर पडले.

इकडे प्राचार्यांनी 'सगळा स्टाफ डायऱ्या भरतो आहे की नाही ते बघा. नाहीतर त्यांना लवकर डायऱ्या लिहायला सांगा' असा निरोप सर्व विषयांच्या विभागप्रमुखांना पाठवला. मग बरेचसे प्राध्यापक सुसाट वेगाने, शॉर्ट कट मारत डायऱ्या भरू लागले.

'शोधा म्हणजे सापडेल' हे तत्त्व प्रा. अगरवाल यांना नेहमी लागू पडायचे. कॉलेजात त्यांना शोधल्याशिवाय ते कधी सापडत नसत. गणिताचे अगरवाल नेहमी कॉलेजच्या बाहेर जात. कधी सिगारेट आणायला तर कधी जेवायला. कधी लाल रिफील आणायला तर कधी झेरॉक्ससाठी. कधी बँकेत तर कधी फोन बिल भरायला. पण आज त्यांना शोधण्याचा प्रश्न नव्हता. ते हैदराबादला जाऊन बसले होते. ते मूळचे अकोला गावचे. त्यांचे सारे नातलग वर्धा, चंद्रपूर, खामगाव, गडचिरोली, धनोरा, कोठारी, हैदराबाद, सिकंदराबाद या भागात राहत असत. त्यामुळे लग्नसमारंभ, सण, उत्सवासाठी ते नेहमी चंद्रपूर, हैदराबादला जात असत.

ते आता हैदराबादला गेले होते आणि त्यांची डायरी त्यांच्या कपाटात होती. 'त्यांचे कपाट दुसऱ्या चावीने उघडा व डायरी बाहेर काढा.' या विभागप्रमुखांच्या आदेशानुसार त्यांचे कपाट उघडण्यात आले. कपाटात अत्यंत बेशिस्त पद्धतीने ठेवलेल्या अनेक वस्तू होत्या. कागदपत्रे, नोटस्, पत्त्यांचा कॅट, लायब्ररीची एक-दोन पुस्तके, ७-८ खडू, काही रंगीत खडू, एक जिमखाना कमिटीची फाईल, ३-४ तपासलेले जुने पेपर्स या सर्व पसाऱ्यात थोडीफार चुरमडलेली डायरी अखेर सापडली.

''डायरी भरलेली आहे का पाहा?'' विभागप्रमुखांचा आदेश.

''अर्धवट भरलेली आहे. नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारीची भरायची आहे.'' गणिताचा प्राध्यापक.

''डायरी न भरता हैदराबादला कसे काय जाऊन बसतात समजत नाही.''

''आता काय करणार?''

''ताबडतोब हैदराबादहून बोलावून घेतलं पाहिजे त्यांना. कामाची पर्वा नाही म्हणजे काय? डायरी न भरता जातात म्हणजे काय? बोलवूया काय त्यांना हैदराबादहून?'' विभागप्रमुख चिडले.

''हैदराबादहून बोलवू म्हटलं तरी काय उपयोग होणार म्हणा. कितीही लवकर म्हटलं तरी अगरवाल हैदराबादहून रात्रीच्या गाडीनंच निघणार. लवकर म्हटलं तरी उद्या सकाळी दहा वाजताच इथं पोचणार. उद्या अकरा वाजता म्हटलं तरी शिक्षणाधिकारी येणारच. तेवढ्यात त्यांची डायरी भरून होतच नाही.''

''या अगरवालनी प्रॉब्लेमच निर्माण केलाय बघा. आता असं करा...''

''काय?''

''अगरवालांची डायरी तुम्हीच दोघं-तिघं लिहून टाका. दुसरं काय करणार?'' विभागप्रमुख नाईलाजाने म्हणाले.

''आम्ही?''

अगरवालांची डायरी भरण्यास दुसरे कोणीच तयार होईना. 'मला माझीच डायरी अजून भरायची आहे', 'आय ॲम गोईंग टू बँक. देन आय हॅव थर्ड यिअर्स लेक्चर,' 'त्याची डायरी आम्ही का म्हणून भरायची म्हणतो मी. हा डायरी न लिहिता हैदराबादेत जाऊन बसणार. याची हमाली आम्ही का करायची?' 'माजे चार पेपर तपासून दे म्हनताना हा अकोल्याला पळून गेलता. मी त्याची डायरी का भरू? हा काय मला डायरी भरल्याचे पयशे देनार हाय? मी प्रान ग्येला तर भी त्याची डायरी भरनार न्हाई. न्हाई म्हंजी न्हाई.' अशी



कारणे सगळे सांगू लागले. ''त्यापेक्षा असं केलं तर? तो चार दिवस रजेवर आहे हे सत्य आपण शिक्षणाधिकाऱ्याला सांगूया. त्याची डायरी भरलेली आहे. ती कपाटात आहे व कपाटाची चावी त्याच्याकडेच आहे म्हणून सांगू.'' एकाने उपाय सुचवला.

''पण प्रत्येक वेळी अगरवाललाच सवलत का? तो कामं चुकवून हैदराबादला जातो. आम्हाला कधी कोणी सवलत देत नाही.''

असे जरी गोडबोले म्हणाले असले तरी त्यांच्या मुलीच्या लग्नात ते रजा न काढता कॉलेजच्या वेळातच आमंत्रणपत्रिका वाटत फिरत होते.

''बरोबर आहे आणि अगरवालची ही काही पहिली वेळ नाही. मागे गॅदरिंगच्या वेळी असंच झालंय. विजयी स्पर्धकांना वाटण्यासाठी म्हणून बक्षिसाचे ६ कप विकत घेतले होते. ते आपल्या कपाटात ठेवून हा हैदराबादला जाऊन बसला. पुन्हा नवे कप आणून गॅदरींगमध्ये वाटावे लागले, ऑफिसात सगळा हिशोब दाखवेपर्यंत आमची पुरेवाट. 'गॅदरिंग चुकवलं तर चालून राह्यलं राव,' म्हणत हा गेला आपला हैदराबादला.'' आणखी कोणीतरी बोलले.

तेवढ्यात एका प्राध्यापकाला अगरवाल यांच्या कपाटात त्यांची मागच्या वर्षीची डायरी मिळाली. त्यांनी ती विभागप्रमुखाला दाखवत म्हटले,

''ही बघा. अगरवालांची डायरी. मागच्या वर्षीची आहे. तीच डायरी सबमिट केली तर?''

विभागप्रमुखांना आधी हा गैरप्रकार मान्य नव्हता. पण नंतर त्यांनीही विचार केला. अगदीच डायरी सबमिट नाही केली तर आपल्यावर निष्काळजीपणाचा ठपका येणार. त्यापेक्षा सर्व डायऱ्यांच्या गठ्ठ्यात ही जुनी डायरी ठेवून टाकायची. शिक्षणाधिकाऱ्यांनी आत न पाहता शेवटच्या पानावर जर भराभर सह्या करून टाकल्या तर आपण सुटलो. चुकून जर शिक्षणाधिकाऱ्यांनी आतून उघडून जर डायऱ्या पाहिल्याच तर आपण समर्थन देऊ शकतो. 'अरेच्च्या! अगरवाल सर चुकून यंदाची डायरी ठेवण्याऐवजी मागच्या वर्षीची डायरी ठेवून गेले वाटतं, आता ते एका लग्नासाठी चार दिवस हैदराबादला गेलेत, काय करणार?'

तेवढ्यात कांबळेसरांनी सुचवले,

''मागल्या वर्षाच्या त्यांच्या डायरीतल्या आपण तारखा बदलायच्या हो. तारखा म्हणजे वर्ष २०१२ असेल तिथं तिथं २०१३ करून सोडायचं हो. उगीच टकल्यात काळजी कशाला घेऊन बसायचं हो.''

''अहो पण...''

''पणबीण नकोच. तुम्ही टकल्यातली काळजी काढाच.''

''अहो, पण मागच्या वर्षीची डायरी त्यांनी १ जुलै पासून ३१ मार्चपर्यंत भरलेली आहे आणि आता तर जानेवारी महिना सुरू आहे. ३१ मार्चपर्यंतची डायरी जानेवारीतच भरून ठेवता काय म्हणून शिक्षणाधिकारी दमदाटी करेल. फसवेगिरी उघडकीला येईल.''

त्यापेक्षा मागच्या वर्षीची डायरी जशीच्या तशी ठेवायची. ती गुपचूपपणे गठ्ठ्यात शक्यतो खाली ठेवायची. शालेय विद्यार्थी आपली वही गठ्ठ्यात ठेवतात त्याप्रमाणे. असे विभागप्रमुखाने ठरवून टाकले. इतर डिपार्टमेंटस्ना याचा गाजावाजा न करता डायरी गुपचूपपणे ठेवायची हेही ठरले.

प्रा. सपकाळ हे अकाउन्टन्सीचे सर. मुलांना जड वाटणारा अकाउन्टन्सी हा विषय जास्त अवघड करणे हा सपकाळ सरांचा हातखंडा. डायरी भरण्याचे जाऊदे. जुलैमध्ये ऑफिसातून त्यांनी डायरी घेतली सुद्धा नव्हती. आता लगबगीने नवी डायरी घेण्यासाठी ऑफिसात ते गेले तेव्हा संबंधित क्लार्क केतन चहा पिण्यासाठी कँटिनला गेला होता. तो अर्ध्या तासाने परतला. त्याच्याकडे सपकाळ सरांनी डायरी मागितली तेव्हा तो म्हणाला.

''तशी डायरी देता येत नाही.''

''देता येत नाही म्हणजे? मी जुलैमध्ये घेतली नाही.''

‘‘का घेतली नाही?’’

‘‘तीन तिक्कट, महा बिक्कट बघ रे. आता जुलैमध्ये का घेतली नाही ते आता कसं आठवणार? शनिवारचं सोंग, आमावशेचं सोंग, तेरा तारखेचं सोंग.’’

‘‘डायरी पाहिजे तर प्रिन्सिपॉलची परवानगी घ्यावी लागेल.’’

‘‘कर्म माझं. प्रिन्सिपॉल सुतार. व्हाइस प्रिन्सिपॉल लोहार, चेअरमन शिंपी. सेक्रेटरी गवंडी. आता परवानगी बिरवानगी काही नको घे. तूच देऊन टाक.’’

असे म्हणून खिशातून सपकाळसरांनी दहाच्या काही नोटा काढल्या व केतनला हळूच दिल्या. त्याने मुकाट्याने डायरी काढून दिली. ती घेऊन सपकाळ डिपार्टमेंटला आले.

त्यांना डायरी भरण्याचा प्रचंड आळस. नवी डायरी आणली तरी आपल्या हातून भरून होणार नाही हे त्यांनी ओळखले. आपली डायरी कोण भरून देईल हे ते पाहू लागले. जो तो आपापले वर्ग सोडून देऊन अथवा प्रॅक्टिकल पार्टनरवर ढकलून आपापली डायरी भरण्यात गुंग होता. धुळेकर मात्र आपली डायरी पूर्ण भरलेली असल्याने स्वस्थ बसले होते. अधूनमधून पेंगत होते. सपकाळनी हळूच त्यांना बोलावून व्हरांड्यात नेले व म्हणाले,

‘‘आडलं गाढव कुणाचं तरी पाय धरी की काय म्हणतात तसं झालंय बघा. गाढव गेलं मसणात. डुक्कर गेलं स्वर्गात...’’

‘‘काम काय आहे ते सांगा’’

‘‘कामच सांगायला तुम्हाला व्हरांड्यात आणलं. मोडका व्हरांडा आणि तुटकी गॅलरी. तर काम म्हणजे... माझी डायरी भरून द्यायची. जुलैपासून आजपर्यंतची भरायची आहे.’’

‘‘मी तयार आहे.’’

‘‘अरे वा! बेस्ट झालं. लंगडा मागतोय दोन डोळे. देव देतोय तीन डोळे!’’

‘‘मला काय देणार?’’

‘‘म्हणजे?’’

‘‘डायरी भरल्याबद्दल मला काय देणार?’’

‘‘चुरमुरे, खारेबुंदी...’’

‘‘मी भरत नाही.’’

‘‘तसं नव्हे हो. आमचं तोंड म्हणजे गळक्या नळाचं पाणी बघा...’’

मग सपकाळ-धुळेकरमध्ये डायरी भरण्याचा करार झाला. धुळेकरने त्यांची डायरी लगेच भरून द्यायची त्या बदल्यात सपकाळने त्यांना धुणीभांडी, फरशी धुणे या कामासाठी मोलकरीण मिळवून द्यायची, शिवाय रात्री गार्डन पॅलेस हॉटेलमध्ये मॅक्डोनल्ड, चिकन बिर्याणीची पार्टी द्यायची.

मग धुळेकर सरांनी सपकाळांची जुलैपासूनची डायरी भराभर भरून दिली. त्यासाठी त्यांनी राघवन स्टाईल बरेचसे शॉर्ट फॉर्म वापरले. रविवार पाहून त्यांनी डायरी भरली. पण ते इतर सणांचे व सुट्ट्यांचे दिवस कॅलेंडरात बघत बसले नाहीत. सुट्ट्यांच्या दिवसांची डायरीसुद्धा त्यांनी भरून टाकली. ‘कुणी विचारलंच तर मी सुटीच्या दिवशी जादा क्लास घेतले म्हणून सांगा.’ ही सूचना त्यांनी सपकाळांना दिली. प्रत्येक दिवशीची हजर व गैरहजर मुलांची संख्या अंदाजपत्रे भरून टाकली. सपकाळांची डायरी भरून तयार झाली.

केळुसकरबाई फिजिक्स शिकवत असत. त्यांनी कॉलेजात डायरी भरताना इतर प्राध्यापकांच्या गप्पांचा अडथळा होतो म्हणून डायरी घरी नेलेली होती. खरे तर प्राध्यापकांच्या गप्पांपैकी ८० टक्के गप्पा त्याच मारत असत. त्यामुळे इतर जणांनी त्यांना ‘नॉनस्टॉप लाऊडस्पिकर’ असे नाव ठेवले होते. केळुसकरबाईंनी डायरी घरी नेली होती व ती अर्धीच भरलेली होती. केळुसकरबाईला ५ मुले होती. एकही मुलगी नव्हती. ती ५ मुले म्हणजे देवाची देणगी असे त्या म्हणत असत. ती मुले अर्थातच दंगेखोर व उपद्व्यापी होती. त्यांनी बाईंच्या डायरीची ड्रॉईंगवही केली होती. नंतरच्या कोऱ्या पानांवर मुलांनी चित्रे काढली होती. चंद्र, झाड, भगवा झेंडा, उगवता सूर्य व कावळे, झोपडी, होडी, शिवाजी महाराज, साप, आकाशदिवा अशा विविध चित्रांची गर्दी त्या डायरीत होती.

हे बाईंना माहीतच नव्हते, त्यांनी भराभर घरी जाऊन जेव्हा डायरी पाहिली तेव्हा कपाळावर हात मारला. शिवाय डायरीची ५-६ पाने फाडली होती तर पंचवीस-तीस पाने वाकडीतिकडी दुमडलेली होती. ती डायरी शिक्षणाधिकाऱ्या-समोर तर अजिबात सबमिट करण्याजोगी नव्हती. पण इतर प्राध्यापकांनाही दाखवण्याजोगी नव्हती. सारे प्राध्यापक जन्मभर हसत व चेष्टा करत बसले असते.

पावसाळ्यात त्या ३-४ दिवसांतून एकदा संध्याकाळी डायरी भरत असत. पण ऑक्टोबरनंतर शारदोत्सव, नवरात्र, दिवाळी, हळदीकुंकू, नवस, दत्तजयंती, सहली, शिबिरे या सर्वांमध्ये डायरी लिहायची राहूनच गेली होती. ती डायरी मुलांच्या हातात पडली याकडेही त्यांचे लक्ष नव्हते.

आता मात्र काय करावे ते त्यांना सुचेना. ऑफिसातून

केतनकडून नवीन डायरी घ्यावी म्हटले तर केतन आपला वैरी. तो डायरी देईल पण कॉलेजभर डंका पिटणार. दुसरा काहीतरी उपाय काढला पाहिजे.

दोन-तीन दिवसांची आजपासून अचानक रजा टाकली तर? कॉलेजकडे फिरकायचेच नाही. कॉलेजातून आलेला फोनच उचलायचा नाही. नाहीतर सरळ जाऊबाईंच्या घरी जाऊन गुपचूप मुक्काम ठोकायचा. जाऊबाईंचे आणि आपले पटत नाही, पण काय करणार?

त्यांची रजा संपलेली असल्याने तेही शक्य नव्हते. दुसरा उपाय करणे भाग होते. त्यांनी डोके खाजवले आणि त्यांना उपाय सुचला. त्या डायरीतील जुलै महिन्याची पाने चांगली होती. त्यांनी १ जुलै ते ३१ जुलैपर्यंतची भरलेली पाने सुटी केली. पटापट समोरच्या दुकानात जाऊन त्यांनी त्याच्या ६ झेरॉक्स प्रती मारल्या. एक प्रत ऑगस्ट महिन्यासाठी वापरायची. जुलैच्या ७ या महिन्याजागी ऑगस्टचा ८ हा महिना असा बदल केला. म्हणजे ५ जुलै २०१३ या तारखेचे ५-७-२०१३ ऐवजी ५-८-२०१३ असे केले. ऑगस्टची पाने तयार झाली. तसेच सप्टेंबरसाठी दुसरी झेरॉक्स प्रत वापरली व तेथे ७ चे ९ केले. ऑक्टोबरसाठी तिसरी झेरॉक्स प्रत, नोव्हेंबरसाठी चौथी, डिसेंबरसाठी पाचवी व जानेवारीसाठी सहावी प्रत तयार झाली.

मग त्या बाईंडिंगच्या दुकानात गेल्या. घराजवळचा ओळखीचा बाईंडिंगवाला असल्याने त्याने पटकन् बाईंडींग करून दिले. कुणालाही संशय येणार नाही अशी डायरी पुन्हा तयार झाली.


केळुसकरबाई पटकन कॉलेजात आल्या व डिपार्टमेंटच्या डायऱ्यांच्या गठ्ठ्यात घुसडून बाईंनी डायरी सबमिट केली.

मंगळवारी संध्याकाळपर्यंत निरनिराळ्या डिपार्टमेंटस्च्या भरलेल्या डायऱ्यांचा मोठा गठ्ठा प्राचार्यांच्या खोलीत जमा होत होता.

बुधवारी शिक्षणाधिकाऱ्यांच्या तपासणीला तोंड देण्यासाठी डायऱ्यांचा गठ्ठा समर्थपणे उभा होता.

**सुभाष सुंठणकर**
२२१/१, दि आदर्श को. ऑ. क्रेडिट सोसा. इमारत,
शनी मंदिराजवळ, कपिलेश्वर रोड,
बेळगाव-५९०००१
भ्रमणध्वनी : ९९०२८९५५१०

*With Best Complimenst From*



# M/s Thakur Intra Project's

Panvel

## अमेरिका व वेस्ट पाम बीच फ्लोरिडाचे भूषण

# कर्नल ब्याना घीयेटो

**जयंत कुलकर्णी**

अशोकबरोबर गाडीने जाताना अलिशान पांढऱ्या शुभ्र बंगल्याजवळ येताच ब्रेक लावून मला म्हणाला, 'जयंता, येथे आमच्या परिचयाची शेजारीण-मैत्रीण राहते. तिचे नाव ब्याना घीएटो. ती स्पॅनिश असून तिचे वय आहे फक्त ९६ वर्षांचे. परंतु, ती धडधाकट असून याही वयात उत्तम मोटार चालवते व सर्व कारभार एकटीने करते. आश्चर्य म्हणजे, याही वयात ब्यानाने अजूनही हँडिकॅप पार्किंगचे पर्मिट घेतले नाहीये! म्हातारपणाची कुठलीही चाहूल तिच्यात दिसणार नाही. शिवाय, बुद्धीने अजूनही तल्लख व कर्तबगार असून आमच्या पाम बीचच्या टाऊन हॉलमध्ये तिचा खूप दरारा आहे. बहुतेक कौन्सिलमन व कायदेपंडित तिला घाबरून असतात. न्यूज पेपरमध्ये ती सतत लिहीत असते व तेथील दररोजच्या वातावरणाबाबत सदैव जागृत असते. अशी सदा कर्तव्यदक्ष ही बाई वर्ल्ड वॉर टूमध्ये नर्स होती. म्हणून तिला सर्वजण अभिमानाने कर्नल म्हणतात. वगैरे, वगैरे' असे अशोक सांगत असतानाच, योगायोगाने ब्याना घराबाहेर यार्डमध्ये काम करताना दिसली व अशोकला पाहून म्हणाली, 'Good Morning Ashok, good to see you, come on in...' 'No, not this time some other time. We are just passing by and my younger brother is here with me...' अशोक म्हणाला, 'OK, then do come next time...' असे म्हणत ब्याना आत गेली. अशोक जेथे राहतो तो हा वेस्ट पाम बीच भाग उच्चभ्रू व खाजगी लोकवस्तीचा भाग आहे.

मी अशोकला त्वरित म्हणालो, 'मला या तरुण मुलीला भेटायला आवडेल.' काय आश्चर्य, दुसऱ्या दिवशी कामानिमित्ताने ब्यानाचाच अशोकला फोन आला. त्यानंतर तिने न चुकता माझी चौकशी केली व दुपारी आम्हाला चहाला घरी बोलाविले. हा विलक्षण योगायोग होता. याचे अशोकलाही आश्चर्य वाटले. कारण, सदैव बिझी असणाऱ्या ह्या बाईने आपल्याला त्वरित कसे काय बोलाविले..? मी त्यावर अशोकला म्हणालो, 'अरे, ही माझी पुण्याईच म्हणायची, दुसरे काय..?' असो.

ठरल्याप्रमाणे आम्ही ब्यानाकडे गेलो. मिठ्या-बिठ्या मारून, चुंबने घेऊन ओळख करून आम्ही तिच्या त्या अलिशान दिवाणखाण्यात बसलो. सर्व थाट बघण्यासारखा होता. मी ब्यानाची मुलाखत घेण्याच्या उद्देशाने तेथे गेलो होतो. हे अशोकला सांगितले नव्हते. तेव्हा सर्व मामला तेथील परिस्थितीवर अवलंबून होता. अर्ध्या तासात सर्व खतम होईल अशी अशोकची भावना होती. सुदैवाने, तसे बिलकुल घडले नाही. ब्यानाशी मी हळुहळू बोलून तिला तिच्या तरुण वयात नेऊन तिच्या भूतकालीन जीवनात नेले. मग, असंख्य रेशीमगांठीनी विणलेल्या तिच्या त्या अनमोल आठवणी तिने अलगद उलगडून सांगायाला सुरुवात केली व त्वरित आत जाऊन पूर्वीची सर्व कागदपत्रे, फोटो, कात्रणे, पारितोषिके,



कर्नल ब्याना घीयेटो

मानपत्रके, बक्षिसे वगैरे जे काही जतन करून ठेवले होते ते सर्व माझ्यासमोर आणून ठेवले. सावकाशीने त्यातील एक एक दाखले दाखवून मला त्याची पूर्ण माहिती सांगत गेली. हा एक चमत्कार घडत आहे असे अशोकला जाणवले. तो माझ्याकडे पाहतच राहिला व ब्यानाला म्हणाला, 'You know Banna, it is very nice of you, but we are here for only few minutes. Hope, we are not disturbing you.' ब्याना म्हणााली, 'No, not at all. In fact, I am very pleased with your younger brother Jayant, who is quite interesting person I have ever met. I am truly enjoying. I must thank him for the same. He made me nostalgic today and am proud of him...' आमचे संभाषण पुढे चालू राहिले...

ब्यानाने तिच्या दुर्मिळ फोटोंचा अल्बम उघडला व फोटोंवरून हात फिरवीत पाणावलेल्या डोळ्यांनी भावनावश होऊन प्रत्येक फोटोच्या मागे आठवणींवजा कसा इतिहास आहे त्याची व्यवस्थित माहिती देत राहिली. ह्या सर्व आठवणी, हे भूतकाळातील चित्रमय जगत प्रत्यक्षात आम्हाला जाणवत आहे असाच भास होत होता. इतके ते बघण्यासारखे व कौतुकाचे होते. कुणालाही अभिमान वाटावा अशाच त्या आठवणी अनमोल होत्या. मी क्षणाक्षणाला भावनावश होऊन ब्यानाच्या पाठीवरून हात फिरवून तिचे कौतुक करीत होतो. तसेच, अशोक व मी अधूनमधून फोटोही काढीत होतो, आठवणी टिपून घेत होतो. मी अत्यंत खुशीत होतो व सुखावलो होतो... तेवढ्यात, ब्यानाला तिच्या आजारी नवऱ्याची आठवण होऊन ती आम्हाला आत घेऊन गेली व ९९ वर्षांच्या नवऱ्याची भेट करून दिली. विल्फर्ड त्याचे नाव. काही वर्षांपूर्वी त्याला स्ट्रोक आल्याने तो अंथरुणात हालचाल न करीत झोपला होता. दुर्दैवाने त्याला काहीच कळत नव्हते. हे बघून मला धक्का बसाला व खूप वाईटही वाटले. सेवेला चोवीस तास नर्स असून ब्याना त्याची उत्तम काळजी घेत होती व घराबाहेरची कामेही नियमितपणे स्वतःच करीत होती. घरात सोबत म्हणून, मांजरे होती. सयामी जातीचे ब्रॉउन व काळ्या रंगाचे स्यामी व पांढऱ्या रंगाचे बोनिसू. साऱ्या विश्वात अमेरिकेत कुत्री-मांजरे पाळणाऱ्या लोकांचे प्रमाण जास्त प्रमाणात आहे. थोडक्यात, येथे माणसांपेक्षा पाळीव प्राणीच घरात जास्त आढळतात...

ब्यानाने न कंटाळता उत्साहाने व प्रेमाने मला तिच्या सर्व दुर्मिळ वस्तू, पत्रव्यवहार, हस्तलिखिते, पदके, आणि मिळालेले मानसन्मान दाखविले. त्यातील काही कात्रणे, माझ्या नावे सही केलेला तिचा आर्मी-नर्स मधला फोटो व इतर गोष्टी मला भेट म्हणून दिल्या. नाही म्हणताना, आम्ही तेथे चक्क साडेतीन तास बसलो होतो..! चहा पाणी घेऊन निरोप घेताना आनंदाने ब्याना म्हणाली, 'Ashok, I like your brother very much. I am impressed. He is very compassioante and respectful like you. We will go to 'Olive Garden Reataurant' for lunch on Monday and that will be my treat...'

तर ह्या ब्यानाचा १९१७ मध्ये निओदेशा, क्यान्सस



मला आनंदाने व अभिमानाने स्वतःचा अमुल्य ठेवा दाखवितांना ब्याना



ब्यानासह मी व अशोक

येथे जन्म झाला. तिचे आई-वडील हे स्पेनहून अमेरिकेत स्थाईक झाले होते. परंतु १९१९ ते १९३९ पर्यंत ल्युक, मेरिलंड, येथे आई-वडिलांबरोबर बालपण गेले. १९३९ मध्ये, मेरिलंड येथील मेमोरिअल हॉस्पिटलच्या नर्सिंग कॉलेजमधून ब्याना ग्रॅज्युएट झाली. पुढे १९५० मध्ये, मिशिगनच्या युनिव्हर्सिटीमधून पब्लिक हेल्थमध्ये पदवी मिळविली. इथपर्यंत न थांबता १९६२ मध्ये, मेरिलंडच्या युनिव्हर्सिटीमधून नर्सिंगमधील मानसशासत्राची मास्टर्स पदवी घेतली. तत्पूर्वी, ब्यानाला त्या क्षेत्रात नर्स म्हणून प्रथम नोकरी मिळायला त्रास पडला होता हे खरे वाटणार नाही.

१९४१च्या वर्ल्ड वॉर टूमध्ये ब्याना प्रथम रजिस्टर्ड अमेरिकन आर्मी नर्स म्हणून कामाला लागली. मग तिने तेथे ३८ वर्षे सातत्याने सेवा केली. त्यात, युरोपीयन व पॅसेफिक खंडात तिने भूषणीय सेवा केली. अनेक मानसन्मानासह तिला अमेरिकन सरकारतर्फे प्राविण्यपदकेही मिळालीत...

ब्याना अनेक संस्थांशी संलग्न आहे. सिग्मा थेटा टाउ, ऑनररी नर्सिंग सोरोरीटी, रिझर्व व निवृत्त ऑफिसर्स असोसिएशनची पूर्व प्रेसिडेंट, अमेरिकन मिलिटरी सेवा केलेल्या देशीय व अंतर्देशीय महिलांची सदस्य, परदेशी युद्धात मिलिटरी सेवा केलेल्या व वॉशिंग्टन येथील मिलिटरी सेवा केलेल्या महिला मेमोरिअलची व पाम बीच येथील कम्युनिटी कॉलेजची सदस्य.

ब्यानाची व्यावसायिक पार्श्वभूमी अशी आहे... ॲटोमिक एनर्जी कमिशनमध्ये १९५० ते १९५२ पब्लिक हेल्थ नर्स, १९५२ ते १९६२ पर्यंत ग्लेड्स ऑफ पाम बीचमध्ये सुपरवायझर नर्स, १९६२ ते १९७४ पर्यंत फ्लोरिडाच्या मानसिक हेल्थ विभागाची सल्लागार, नंतर १९७९ पर्यंत पाम बीचच्या कम्युनिटी कॉलेजमध्ये नर्सिंग कार्याची प्राध्यापिका व नंतर सेवानिवृत्त.

१९३४ च्या ब्रूस शाळेतील माजी विद्यार्थी म्हणून ब्यानाला, जीवनात यशस्वीपणे कार्य बजावल्याबद्दल 'हॉल ऑफ फेम'चा सर्वोत्कृष्ट किताब २००० मध्ये मानाने दिला गेला होता. १९९५ मध्ये ब्यानाने 'व्हिक्टरी इन द पॅसेफिक' ही डॉक्युमेंटरी फिल्म प्रस्तुत केली होती. सिबीएस न्यूजच्या डॉन रादरने त्याचे कथन केले होते. त्या डॉक्युमेंटरी फिल्ममध्ये, अमेरिकन प्रेसिडेंट जॉर्ज बुश व अमेरिकन आर्मीचे प्रमुख जनरल नॉर्मन श्वाझकॉफ यांचा समावेश होता...

ब्यानाला गौरवास्पद व मानाची मिळालेली पदके अशी आहेत... वर्ल्ड वॉर टूचे विजयी पदक, अमेरिकन व नॅशनल डिफेंस सर्व्हिसचे पदक, फिलीपाईन लिबारेशनचे पदक, युरोपीयन-आफ्रिकन-मिडल इस्टर्न पदक, एशियाटिक-पॅसेफिक खंडाचे पदक व अमेरिकन राखीव आर्मीच्या गुणवत्तेच्या पदकांनी ब्यानाला मानाने गौरविले आहे. एका बाईची केवढी ही यशोगाथा व केवढी ही यशोकीर्ती! मेरिलंडला राहणारी ब्यानाची वडील बहीण, ऑड्रे ही १०२ वर्षांची आहे. ती अजूनही व्यवस्थित हिंडती-फिरती आहे... शिवाय, ब्यानाच्या इतर काही तरुण बहिणीही हयात असून त्यांच्या जीवनकार्यात त्या मग्न आहेत. जेक नावाचा धाकटा भाऊ हयात नाही. हा जेक, अमेरिकन गुप्तहेर म्हणून युरोपमध्ये काम करीत होता. एकदा रस्त्यावर त्याला तो जेथे होता त्या देशाच्या पोलिसाने बंदुकीने मारण्याचा प्रयत्न केला होता. परंतु, हा जेक त्यातूनही वाचला व त्या देशातून पसार होऊन अमेरिकेत सुखरूप आला होता.


अशी ही बयाना घिएटोची ज्वलंत कहाणी. ती आता माझीही चांगली मैत्रीण झाली आहे. ह्यासारखे दुसरे भाग्य कोणते..? मी नशीबवानच, नाही का..? असो.

**जयंत विठ्ठल कुळकर्णी**
न्यू यॉर्क
jvkny1@gmail.com


बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
एक कुटुंब एक बँक
भारत सरकारचा उद्यम
आधुनिक नारीसाठी आधुनिक सेवा
आपल्याला सुविधासंपन्न जीवनाचा आनंद घेता यावा यासाठी महाबँकेने आणल्या आहेत इंटरनॅशनल क्रेडिट/डेबिट कार्ड, महा गोल्ड लोन, महानिधी या व अशा अनेक योजना. शिवाय,१००% शाखा कोअर बँकिंग प्रणालीने जोडल्यामुळे कोणत्याही शाखेतून आपले खाते चालविणे शक्य होते.
आपली आधुनिक जीवनशैली ओळखून खास आपल्यासाठी आखलेल्या या योजनांचा लाभ घ्या. आपले ध्येय लवकर साध्य करा.
अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे बँकिंग सेवेचा आनंद, आमच्यासंगे!
इंटरनेट/फोन/एसएमएस बँकिंग | देशभर RTGS/NEFT द्वारे फंड्स ट्रान्सफर
टॅक्सेसच्या ई-पेमेंटची सुविधा | डिमॅट सेवा | ATM सुविधा | एटीएम द्वारे टॅक्स पेमेंटची सुविधा
महा-ई-ट्रेड ऑनलाईन शेअर ट्रेडिंग | ई-स्टेटमेंट | युटिलिटी बिल पेमेंट
टोल-फ्री: 1800-233-4526 • वेबसाईट: www.bankofmaharashtra.in
• नेट बँकिंग: https://www.mahaconnect.in

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MH/MR/WEST/310/2013-2015
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.